

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. ३४७
१९६४
REFBK-0014262

३८२९८
ह्म. ज्ञा.
१११८
श्रु. अवास
[illegible]

# ते झुंजार प्रवासी



REFBK-0014262

१४२६२

# ते झुंजार प्रवासी

लेखक : फ्रान्सिस पार्कमन
अनुवादक : मंगेश पाडगांवकर

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई चार

आवृत्ति पहिली, १९६४

मूल्य आठ रुपये

मुखपृष्ठ सजावट
केशव फडके

प्रकाशक :
वि. ग. परचुरे
ग. पां. परचुरे, प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्र. २,
मुंबअी ४

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबअी ४

'THE OREGON TRAIL'
या पुस्तकाचा अनुवाद
By Francis Parkman
Introduction by Mark Van Doren
Illustrated by James Daugherty
Published by Holt, Rinehart
and Winston, Inc.

# प्रस्तावना

मिसिसिपी नदी आणि पॅसिफिक समुद्र यांच्यामधला अमेरिकन प्रदेश ‘पश्चिम विभाग’ या नांवानें ओळखला जातो. या विभागावर लिहिल्या गेलेल्या पुस्तकांत ‘धी ऑरेगॉन ट्रेल’ हें एक उत्कृष्ट पुस्तक आहे. १८४९ सालीं सोन्याच्या खाणी शोधण्यासाठीं इथं वर्दळ सुरू होण्यापूर्वीच्या दिवसांचं हें चित्र आहे. गंमत अशी कीं हें पुस्तक लिहिणारा लेखक पश्चिमेकडचा नव्हता. हार्वर्ड कॉलेजांतून नुकताच्च बाहेर पडलेला तो एक बोस्टनचा तरुण होता. या लेखकाची प्रकृती तशी दणकट नव्हती. पश्चिमेविषयीं त्याला वाटणाऱ्या कुतूहलांत साहसाचा भाग होता, परंतु केवळ साहसासाठीं तो या प्रवासाला प्रवृत्त झालेला नव्हता. त्याला या प्रदेशाविषयीं वाटणारं कुतूहल मुख्यतः बौद्धिक स्वरूपाचं होतं. आणि म्हणून त्याचं थोडं विवरण केलं पाहिजे. खरं म्हणजे या पुस्तकाविषयीं लिहिण्यापूर्वी लेखकाविषयीं थोडं लिहिणं आवश्यक आहे. फ्रान्सिस पार्कमनची जीवनकथा ऑरेगॉन ट्रेल इतकीच्च रोमहर्षक आहे.

दहाव्या प्रकरणाच्या सुरवातीला हा प्रवास आपण कां अंगीकारला याविषयीं सांगतांना फ्रान्सिस पार्कमन लिहितो, “रेड इंडियनांचा स्वभाव, त्यांच्या चालीरीति यांचा अभ्यास करावा या हेतूनंच्च मी या प्रदेशांत आलों होतों. केवळ पुस्तकं वाचून माझं हें कुतूहल शमणं शक्य नव्हतं. माझा हा हेतु साध्य करण्यासाठीं रेड इंडियनांच्या समाजांत राहणं, त्यांची शासनसंस्था, अंधश्रद्धा, कुटुंबसंस्था यांचा अभ्यास करणं, त्यांच्यांत मिसळून जाणं आवश्यक होतं. आणि म्हणूनच्च त्यांच्या वस्तीवर जाऊन रहाण्याचा मी बेत केला.” आपला हा हेतु साध्य करण्यासाठीं फ्रान्सिस पार्कमननं ज्या गोष्टी केल्या, जे अनुभव घेतले त्यांचं वर्णन या पुस्तकांत आहे. या प्रवासांत आपल्या हेतूविषयीं पार्कमन सविस्तरपणें लिहीत नाहीं, आपल्यावर जीं संकटं कोसळलीं त्यांचंहि फारसं तपशीलवार वर्णन करीत तो बसत नाहीं—हीं संकटं अशीं होतीं कीं कुठल्याहि तरुण माणसानं त्यांच्यापुढें हात टेकले असते. ऑरेगान ट्रेल या

पुस्तकांतलीं सगळीं माणसं धाडशीं आहेत. पण या माणसांत सर्वांत अधिक धाडशी या पुस्तकाचा लेखकच होता.

फ्रान्सिस पार्कमनचा जन्म बोस्टन येथें १८२३ सालीं झाला. लहानपणीं तो अत्यंत संवेदनाशील आणि अस्वस्थ होता. त्याची सगळी शक्ति त्याच्या मनांत आणि कल्पनेंत होती. बाराव्या वर्षी त्याला रसायनशास्त्राची ओढ वाटूं लागली. पंधराव्या वर्षीं रसायनशास्त्राविषयींचा हा उत्साह मावळला आणि साहित्याविषयीं त्याला उत्साह वाटूं लागला. साहित्याविषयींच्या उत्साहाची जागा पुढें बरीचशी जंगलप्रदेशांच्या इतिहासाच्या अभ्यासानं घेतली. लहानपणींच्या कांहीं आठवणी आणि न्यू इंग्लंडच्या जंगलांतून एकदोनदां केलेला प्रवास यांच्यामुळें अमेरिकेच्या जंगलप्रदेशांचा इतिहास, तिथली परिस्थिति यांच्याविषयीं आपल्याला माहिती करून घेतली पाहिजे अशी जाणीव त्याच्या मनांत निर्माण झाली. हें कुतूहल आणि लेखनवाचनाविषयीं वाटणारा अपार उत्साह यांच्या मिश्रणांतूनच पार्कमनचं व्यक्तिमत्त्व घडलं. हार्वर्ड विश्वविद्यालयांत पाऊल टाकल्यानंतर इतिहास या गोष्टीशीं त्याचा परिचय झाला. आपलं जीवन महान् अशा इतिहासलेखनाला आपण वाहून घेतलं पाहिजे असं त्याला वाटूं लागलं. कॅनडासाठीं इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यांत झालेल्या युद्धाची कहाणी तो सांगणार होता. तो म्हणतो, "लवकरच माझ्या योजनेच्या मी बराच पुढें गेलों व फ्रान्स आणि इंग्लंडशीं झालेल्या अमेरिकन संघर्षाचं चित्र रेखाटावं किंवा दुसऱ्या शब्दांत सांगायचं तर अमेरिक जंगलप्रदेशाचा इतिहास लिहावा–माझा या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हाच होता—असं मला वाटूं लागलं. या विषयानं मी पछाडलों गेलों. रात्रंदिवस जंगलप्रदेशांतल्या प्रतिमा माझ्या डोळ्यांसमोर तरळूं लागल्या."

या कार्यासाठीं फ्रान्सिस पार्कमननं केलेली जय्यत तयारी वैशिष्ट्यपूर्ण आहे. यूरोपच्या दप्तरखान्यामधून यासंबंधीं जितकी माहिती मिळेल तितकी सर्व त्यानं मिळवली, या विषयावर उपलब्ध असलेलं प्रत्येक पुस्तक त्यानं वाचलं. पण, केवळ पुस्तकं आणि बखरी वाचून पार्कमनचं समाधान होण्यासारखं नव्हत. या प्रदेशांत प्रत्यक्ष फिरून त्याला तिथलं जीवन पहायचं होतं. असं करायचं म्हणजे शरीरांत रेड इंडियनासारखा जोम, सोशिकपणा असणं अत्यावश्यक होतं. फ्रान्सिस पार्कमननं या दृष्टीनं आपल्या शरीराला शिस्त लावायला सुरवात केली. तो शर्यती धांवूं लागला, मुष्टियुद्ध खेळूं लागला, घोडदौड करूं

लागला. सर्व तऱ्हेचे मार त्यानं सहन केले. हें सगळें करीत असतांना त्याच्या शरीरावर आत्यंतिक ताण पडला आणि अनेक दुखण्यांनीं त्याच्या शरीरांत घर केलं. कॉलेजांत तो ज्युनिअरच्या वर्षाला असतांना हृदयविकाराचीं लक्षणं दिसूं लागलीं, आणि यानंतर त्याचे डोळेहि फार बिघडले. एक वर्ष तो परदेशीं गेला. त्यामुळें त्याला कांहींसं बरं वाटलं. परंतु हार्वर्ड विश्वविद्यालयांतून ग्रॅज्युएट झाल्यानंतर त्यानं जेव्हां संशोधनाला सुरुवात केली तेव्हां आपल्या मेंदूवर फाजील ताण पडल्याची आणि आपले डोळे फारच बिघडत असल्याची जाणीव त्याला झाली.

रेड इंडियनांचं जीवन प्रत्यक्ष पहावं आणि प्रकृतीलाहि आराम वाटावा म्हणून पार्कमन पश्चिमेच्या प्रवासाला निघाला. न्यू इंग्लंड आणि कॅनडा इथल्या रेड इंडियन लोकांत यापूर्वी तो फिरला होता. कॉलेजला सुटी पडली कीं त्याला शक्य होईल तेवढ्या दूरच्या जंगलांतून तो फिरून येत असे. परंतु ईशान्येकडच्या या रेड इंडियनांचा अभ्यास करून त्याचं भागण्यासारखं नव्हतं. किंबहुना त्याच्या डोळ्यासमोर जी योजना होती तिच्या दृष्टीनं याची तेवढी आवश्यकताहि नव्हती. याचं कारण असं कीं ईशान्येकडच्या या रेडइंडियनांवर अमेरिकन संस्कृतीचा खूप परिणाम झाला होता. परंतु मिसिसिपी नदीच्या पलीकडच्या रेड इंडियन जमातींचं मात्र असं नव्हतं. त्यांची संस्कृति ही अजूनहि अश्मयुगांतलीच होती. ज्यांचा इतिहास पार्कमनला लिहायचा होता ते हेच लोक होते. तेव्हां १८४६ च्या वसंतऋतूंत आपल्या वयाच्या तेविसाव्या वर्षी पार्कमन त्याचा तरुण मित्र क्विन्सी ए शॉ याच्याबरोबर सेंट लुईस इथं जाऊन पोंचला. यापूर्वी जवळपासच्या प्रवासांत शॉ पार्कमनबरोबर होताच. या प्रवासांतून परत आल्यानंतर पार्कमनचा लेखनिक होऊन शॉ त्याचं ऑरेगॉन ट्रेल हें पुस्तक लिहून घेणार होता. कारण पार्कमन जेव्हां प्रवास संपवून बोस्टनला परत आला तेव्हां तिथलं ऊन, काटक्यांचा धूर यांच्यामुळें त्याचे डोळे फारच बिघडले होते. अशा डोळ्यांनीं कांहीं काळपर्यंत तरी त्याला स्वतःच्या हातानं लिहिणं शक्य नव्हतं. प्रकृतीच्या दृष्टीनं विचार करतां पार्कमनचा हा प्रवास त्याला तापदायकच ठरला. सैनिकांना हैराण करणाऱ्या आमांशाच्या विकारानं त्याला खिळखिळा करून टाकला. ऑरेगॉन ट्रेल या पुस्तकांत याविषयींचे थोडेच उल्लेख आहेत, पण ते अतिशय बोलके आहेत. शहरामध्यें असा विकार एखाद्या माणसाला झाला असता तर तो औषधोपचार, पथ्यपाणी

करत अंथरुणावर झोपून राहिला असता. परंतु रेड इंडियनांच्या प्रदेशांत प्रवास करतांना पार्कमनला हें शक्य नव्हतं. आपण आजारी आहोंत असं त्या रेड इंडियनांना दाखवणं धोक्याचं ठरलं असतं. कारण त्यांनीं असलं जबाबदारीचं ओझं मुळींच सहन केलं नसतं. आणि दुसरं असं कीं मनांत एक विशिष्ट हेतु धरून पार्कमन इथवर आला होता. आपल्या संकल्पापासून ढळणाऱ्या माणसांपैकीं तो नव्हता. आणि म्हणूनच त्याच्या प्रवासाची ही कहाणी वाचत असतांना सर्व तऱ्हेचं खडतर जीवन जगत असलेला पार्कमन आपल्याला दिसतो. घोड्यावर बसण्याची शक्ति नसतांनासुद्धां तो अनेक आठवडे घोडदौड करतो. जमिनीवरचं खोगीर खालीं वाकून उचलून घेण्याचं त्राण अंगांत नसतांनासुद्धां तो रेड इंडियनांबरोबर गव्यांच्या शिकारीला जातो. जेवणाचा विचारसुद्धां जेव्हां त्याला नकोसा वाटत असतो तेव्हां आपल्या रेड इंडियन यजमानांना वाईट वाटूं नये म्हणून वीस कटोरे कुत्र्याचं मांस तो खातो. थोडक्यांत सांगायचं तर प्रकृति सुधारणं हें जर या प्रवासाचं उद्दिष्ट मानलं तर यांत पार्कमनला अपयश आलं असंच म्हणावं लागेल. परंतु ज्याच्यासाठीं म्हणून पार्कमननं हें खडतर अयुष्य स्वीकारलं त्या दृष्टीनं पाहतां त्याचा हा प्रवास यशस्वी झाला असंच म्हटलं पाहिजे. आम्हां वाचकांच्या दृष्टीनं त्याचं हेंच उद्दिष्ट महत्त्वाचं आहे. ज्यांचं वैशिष्ट्यपूर्ण अस्तित्व नाहींसं होणार होतं अशा रेड इंडियन लोकांविषयींची माहिती पार्कमनमुळें आपणाला मिळते. ही सगळी माहिती त्यानं मिळवली, स्मरणांत ठेवली, त्याच्यांत कमीअधिक बदल करून आपलं इतिहासलेखन केलं याबद्दल आपण पार्कमनचे ऋणी आहोंत. या इतिहासलेखनाबद्दलच काय पण या प्रवासांतून निर्माण झालेल्या ‘दि ऑरेगॉन ट्रेल’ या साहसकथेबद्दलहि आपल्याला पार्कमनचं ऋण विसरतां येणार नाहीं.

पार्कमन आणि शॉ यांनीं २८ एप्रिल १८४६ रोजीं सेंट लुईस शहर सोडलं आणि उत्तर अमेरिकेच्या प्रदेशांत पाऊल ठेवलं, हा प्रदेश आतां मिसुरी, कानसास, नेब्रास्का, साऊथ डाकोटा, वियोमिन आणि कोलोरॅडो या परिचित नांवांनीं ओळखला जातो. मिसिसिपी नदी आणि रॉकी पर्वत यांच्या मधल्या प्रदेशांत कांहीं ठिकाणीं गोऱ्या लोकांचीं पावलं उमटलेलीं होतीं. नैर्ऋत्येकडे सांताफेच्या वाटेनं न्यु मेक्सिको आणि स्पॅनिश व्यापारी गड्या इथपर्यंत आणि वायव्येकडे मिसुरी आणि प्लाट नदीच्या वाटेनं ऑरेगॉन आणि कॅलिफोर्निया-

पर्यंत अनेक गोरे लोक प्रवास करून जात होते. पार्कमन आणि शॉ परत आल्यानंतर तीन वर्षांनीं सोन्याच्या शोधार्थ निघालेलीं माणसं नंतर ऑरेगॉन-वरून कॅलिफोर्नियाला जाऊं लागलीं. पार्कमन आणि शॉ मिसुरी नदींतून बोटीनं मिसुरी आणि कानसास यांच्यामधल्या सीमेपर्यंत गेले. इथं कांहीं काळ प्रवासाची तयारी करण्यासाठीं ते थांबले. कांहीं इंग्रज माणसं त्यांच्याबरोबर या प्रवासांत होतीं. हेन्री शॅटिलॅाँ हा बुद्धिमान आणि उमदा 'फ्रेंचकॅनेडियन' मनुष्य त्यांचा मार्गदर्शक होता. आपल्या प्रवासवर्णनांत पार्कमन हेन्री शॅटिलॅाँची अतिशय स्तुति करतांना दिसतो. वायव्येच्या दिशेनं हे सगळे प्रवास करत होते. वियोमिनची सीमा ओलांडल्यानंतर लारामीच्या किल्ल्यावर पोंचण्याची घाई असल्यामुळें त्या इंग्रज प्रवाशांचा पार्कमन आणि शॉनं निरोप घेतला. लारामीचा किल्ला हे अमेरिकन फर कंपनीचं व्यापारी ठाणं होतं. या या किल्ल्याचं अठराव्या शतकांतल्या फ्रेंच व्यापारी गढ्यांशीं साम्य असल्यामुळें पार्कमनला इतिहासलेखनाच्या दृष्टीनं हा किल्ला महत्त्वाचा वाटणं स्वाभाविक होतं. शिवाय इथं रेड इंडियनहि रहात होते. पार्कमननं इथं आपला मुक्काम ठेवला आणि इथून तो या प्रदेशांतल्या प्रवासाला ठिकठिकाणीं गेला.

लारामीच्या किल्ल्याजवळ डाकोटा जमातीच्या रेड इंडियनांची वस्ती होती. ओल्ड स्मोक हा या वस्तीचा प्रमुख होता. पार्कमन आणि शॉ यांनीं डाकोटांच्या या वस्तीवर अनेक दिवस घालवले आणि बरीच माहिती मिळवली. पण नंतर व्हर्लविंड हा ऑगीलाल्ला जमातीचा प्रमुख डाकोटांच्या तीनशें वस्त्यांना एकत्र आणून त्याच्या मुलाचा वध करणाऱ्या स्नेक जमातीशीं युद्ध करणार आहे असं समजतांच पार्कमनला विशेष उत्साह वाटला—कारण रेड इंडियनांचं युद्ध पाहण्याची संधी आतां त्याला मिळणार होती. ही संधी मिळवण्यासाठीं पार्कमननं जी धडपड केली तिचं वर्णन हा या पुस्तकांतला एक महत्त्वाचा भाग आहे. अर्थात् पार्कमनला यांत यश आलं नाहीं. कारण ज्यासाठीं त्यानं ही धडपड आरंभली होती तें युद्धच झालं नाहीं. हें युद्ध जरी झालं नाहीं तरी ऑगीलाल्लांचा एक प्रमुख बिग क्रो याच्याबरोबर राहून पार्कमननं बरीच महत्त्वाची माहिती मिळवली.

पार्कमननं रेड इंडियनांबरोबर मेजवान्यांची देवाणघेवाण केली. ज्या ज्या वस्तू त्याला बरोबर आणणं शक्य झालं होतं त्या त्यानं रेड इंडियनांना भेट दिल्या. तो त्यांच्याबरोबर राहिला, त्यांची संभाषणं, भांडणं, शिकार

करणं, त्यांचा प्रणय, त्यांचे रागलोभ या सगळया गोष्टी त्यानं बारकाईनं अभ्यासल्या. या सगळया निरीक्षणाचा निष्कर्ष नुसताच रोमांचकारी नव्हता. वास्तवतेचं निखळ दर्शन पार्कमननं घेतलं होतं. रेड इंडियनांच्या स्वभावांतली अविश्वसनीयता, घाणेरडेपणा, कुरूपता हा या वास्तवतेचाच भाग होता. पण या बरोबरच त्यांच्यांतल्या कांहीं गुणांचीहि पार्कमनला जाणीव झाली होती. व्हर्लविंड, माहतो-ताटोंका, कोंग्रा-टोंगा, मेनेसीला इत्यादि वीरांचा पार्कमननं आपल्या पुस्तकांत गौरव केला आहे. मात्र, या लोकांच्या शौर्याचा आणि कौशल्याचा साक्षात्कार पार्कमनला ते गव्याची शिकार करतानांच तेवढा झाला.

शॉ लारामीच्या किल्ल्यांत राहिला होता. ऑगस्टच्या सुरवातीला पार्कमन इथं त्याला पुन्हां भेटला. इथून हे दोघे सेंट लुईसला आले. यावेळीं त्यांनीं दक्षिणेकडची वाट घेतली. रॉकी पर्वतांच्या सीमेवरुन ते प्युब्लो इथं आले. इथून ते पूर्वेला वळून बेंटच्या किल्ल्यावरुन अर्कांसास नदीकडे आले. जिथपर्यंत शक्य होतं तिथपर्यंत त्यांनीं या नदीच्या काठानं प्रवास केला. मग ते नैऋत्येकडे वळले. आणि कानसास ओलांडून वेस्टपोर्टला आले. वेस्टपोर्ट हा मिसुरी राज्यांतील कानसास शहराचाच एक भाग आहे. यानंतर ते मिसुरी नदींतून बोटीनं ऑक्टोबरच्या सुरुवातीस सेंट लुईसला आले. इथून शिकागो आणि ग्रेट लेक्सवरून ते बोस्टनला पोंचले.

अनेक आजारांना तोंड देत पार्कमन सत्तर वर्षांपर्यंत जगला. १८९३ सालीं तो वारला. त्याच्या मरणापूर्वी त्यानं प्रवास केलेला हा सगळा विभाग इतका बदलला होता कीं १८९२ सालीं दि ऑरेगॉन ट्रेलला नव्या आवृत्तींत लिहिलेल्या प्रस्तावनेंत तो म्हणतो, "या रेडइंडियन लोकांचे तंबू, त्यांचे भाले, धनुष्य, ढाल, त्यांनीं कापून घेतलेल्या कवटीवरच्या केसांसकट कातड्या यांची जागा आतां शहरं, आरोग्यधामं, सुखाचा शोध करणारे प्रवासी, पॅरिसच्या फॅशन्स, सुखद वाटणारा समाज, मासिकं, अगदी अलिकडची कविता, अगदी अलिकडची नवी कादंबरी यांनीं घेतली आहे. ते लक्षावधी गवे आतां गेले. त्यांची आतां नुसती हाडं उरली आहेत. त्यांची जागा आतां हिरव्यागार कुरणावर चरणावर माणसाळलेल्या गुरांच्या कळपांनीं घेतली आहे. जंगलप्रदेशांतला तो रेडइंडियन आतां त्याला जिंकणाऱ्या गोऱ्या लोकांचं कुरूप व्यंगचित्र होऊन बसला आहे......जंगलांनीं भरलेला हा पश्चिम विभाग आतां मवाळ झाला आहे.

या रानटी प्रदेशाचं आकर्षण विरून गेलं आहे. या प्रदेशाची स्मृति जागवण्याचं काम जरी माझ्या या पुस्तकानं केलं तरी हें पुस्तक यशस्वी झालं असं मी समजेन."

दि ऑरेगॉन ट्रेल या फ्रान्सिस पार्कमनच्या या पुस्तकानें अमेरिकेच्या इतिहासाची स्मृति जिवंत ठेवली आहे. या पुस्तकामुळें अमेरिकेच्या भूतकाळाची ही स्मृति सदैव जिवंत राहील यांत शंका नाहीं.

—मार्क व्हॅन डोरेन



# १ | सरहद

१८४६ सालच्या गेल्या वसंतऋतूंत सेंट लुईस शहर नुसतं गजबजून गेलं होतं. आपापले मुलूख सोडून निघालेले अनेक लोक ऑरेगॉन आणि कॅलिफोर्निया इथें जाण्याच्या तयारीला लागले होते; आणि त्यांच्याच बरोबर मालवाहू गाड्या आणि इतर सामान यांची जमवाजमव करणाऱ्या व्यापाऱ्यांची फारच मोठी रीघ होती—हे व्यापारी निघाले होते सँटा फे इथें. सगळीं

हॉटेलं खच्चून भरलीं होतीं. प्रवाशांच्या या ताफ्यांना बंदुका, खोगीर इत्यादि सामान पुरवणारे दुकानदार कामानें वाकले होते. धक्क्यावरून सुटून मिसुरी नदींतून सरहद्दीच्या प्रदेशाकडे निघालेल्या बोटी प्रवाशांनीं खच्चून भरलेल्या असत.

अशा या अनेक बोटींपैकीं 'रॅड्नर' ही एक बोट. ही बोट शेवटीं खडकावर आपटून फुटली आणि नाहींशी झाली. या बोटींतून मी आणि माझा नातेवाईक-स्नेही क्विन्सी ॲडम्स शॉ रॉकी पर्वतांच्या प्रवासाला निघालों. २८ एप्रिल या दिवशीं आम्ही बोटींत बसलों आणि सेंट लुईस शहर सोडलं. बोटींत इतकं वजन लादलेलं होतं कीं पाण्याच्या लाटा अधूनमधून 'सुरक्षिततेच्या रेपेला' स्पर्श करून जात. बोटीच्या अपरडेकवर सांता फे येथें व्यापारासाठीं लागणाऱ्या मालवाहू गाड्या भरल्या होत्या. माल ठेवण्याची खालच्या मजल्यावरची जागा तर सांता फे येथें नेल्या जाणाऱ्या सर्व तऱ्हेच्या व्यापारी मालानें भरून गेली होती. गवताळ प्रदेशांतल्या सफरीसाठीं लागणारं घोडे, खेचरं, खोगीर, लगाम, आणखी अशाच अनेक वस्तु इत्यादि ऑरेगॉनला निघालेल्या प्रवाशांचं सामान याच बोटींत भरलेलं होतं. या सगळ्या प्रचंड गोंधळांत खेचरांनीं ओढायच्या गाड्या, तंबू, हरतऱ्हेच्या पेट्या, पिंपं इत्यादि सामानहि दडलेलं होतं. या इतक्या लादलेल्या सामानाचं हें दृश्य दिसायला अगदींच कुरूप दिसत होतं. एवढंच कीं, दूरच्या आणि अतिशय खडतर अशा प्रवासासाठीं तें घेतलेलं होतं—वाचकाला तिथेंच निघायचं आहे!

या अठरा जातींच्या सामानाबरोबर शोभतील असेच या बोटींतले एकूण प्रवासी होते. केबिनमधें सांता फे येथील व्यापारी, जुगारी, सट्टेवाले, साहसाच्या इच्छेनें निघालेले कांहीं प्रवासी...असे लोक होते. खालच्या वर्गांत ऑरेगॉनला निघालेलीं कांहीं माणसें, कांहीं डोंगराळ मुलखांतले लोक, निग्रो, सेंट लुइस शहरांत कामकाजासाठीं गेलेले कांझास जमातींतले रेड इंडियन असे एकूण लोक होते.

अशीं हीं माणसं आणि सामान घेऊन मिसुरी नदीच्या ओघवान् प्रवाहाशीं झगडत आठ दिवस आमची बोट प्रवास करीत होती. मधेंच पाण्याखालीं दबा धरून बसलेला एकादा खडकाचा सुळका लागला कीं आमची बोट त्याला चांगलीच घसटून जाई; एकादी वाळूची टेकडी आली कीं, दोन तीन तास अडकून पडे. मिसुरीच्या मुखाशीं आम्ही आलों तेव्हां रिमझिम पाऊस पडत

होता. पण थोड्याच वेळानें आकाश निवळलं. नदीचं विस्तीर्ण, गढूळ पात्र आतां आम्हाला स्पष्ट दिसूं लागलं. त्यांतले भोवरे, वाळूच्या टेकड्या, खडबडीत बेटं, जंगलांनीं झांकलेले कांठालगतचे प्रदेश या सगळ्या गोष्टींचं दर्शन आम्हाला झालं.

मिसुरी नदी आपला प्रवाह सारखा बदलीत असते. तिनें आपला प्रवाह बदलला कीं एकीकडचा कांठ पाण्यांत बुडतो, आणि दुसरीकडे नवा कांठ वर येतो. बेटं तयार होतात, आणि मग नाहींशीं होतात. एका बाजूचं जंगल पाण्याखालीं गडप होतं, आणि दुसऱ्या बाजूच्या जमिनींतून नवं जंगल डोकं वर काढतं. या सगळ्या प्रकारांमुळें नदीच्या पाण्यांत गाळ फारच असतो. टम्बलर् जर पाण्यानें भरून घेतला त्याच्या तळाशीं एक इंच तरी गाळाचा थर सहज बसतो. वसंतऋतूच्या सुमारास पाणी भलतंच गढूळ असतं. सध्यां पाण्याला भरती होती. पण नंतर शरदृतूंत आम्ही नदींतून प्रवास केला तेव्हां ओहोटीची वेळ असल्याकारणानें बोटीचा विश्वासघात करणाऱ्या पाण्याच्या पोटांतल्या सर्व भयानक गोष्टींचं दर्शन आम्हाला झालं होतं. मोडून तुटून पडलेलीं, पाण्याखालच्या वाळूंत रुतून बसलेलीं झाडं खरोखरीच मोठीं भीतिदायक दिसतात. सैन्याच्या तुकडीनें शत्रूंना रोखण्यासाटीं झाडं तोडून त्यांचा आडवा तिडवा ढीग रचावा तशीं तीं झाडं दिसत होतीं; भरती असतांना पाण्याच्या पृष्ठभागावरून बोट जाऊं लागली कीं पाण्याच्या खालून तिला भोसकण्यासाटीं हीं झाडं अगदी तयार रहात!

पांच सहा दिवसांतच या गवताळ प्रदेशाच्या दिशेनें निघालेल्या प्रवाशांचा प्रवाह आम्हाला जाणवूं लागला. आपापला प्रांत सोडून 'इंडिपेंडन्स्'कडे निघालेले प्रवासी वाटेंत नदीच्या कांठाशीं मोकळी जागा पाहून उतरले होते. त्यांनीं तंबू टाकले होते; त्यांच्या मालवाहू गाड्या आजूबाजूला दिसत होत्या. मिसुरी नदीच्या टोकाच्या सरहद्दीपाशीं, नदीपासून कांहीं मैल अंतरावर ही जागा आहे. आम्ही इथें पोहोचलों तेव्हां सूर्यास्ताची वेळ होती, आणि पाऊस पडत होता. भोवतालचं निसर्गदृश्य वैशिष्ट्यपूर्ण होतं : नुसती नजर टाकली तरी साहसवृत्तीला आवाहन करणाऱ्या या जंगलप्रदेशाचीं ही वैशिष्ट्यं ठळकपणें जाणवत.

नदीच्या गाळभरल्या कांठावर तीसचाळीस स्पॅनिश माणसं उभीं होतीं— रापलेल्या रंगाचीं, चेहऱ्यावर गुलामीची कळा असलेलीं. त्यांच्या डोक्यावर

मोठाल्या रुंदट हॅट्स् होत्या, त्या हॅट्सखालून तीं माणसं आजूबाजूला पहात होतीं; त्यांच्या नजरेंत एकप्रकारची खुळचटपणाची झांक होती. सांता फे मधल्या एका कंपनींत काम करणारीं तीं माणसं होतीं, त्यांच्या कंपनीच्या मालवाहू गाड्या दाटीवाटीनें कांठावर पडलेल्या होत्या. मधें मेक्सिको येथील जमातीची एक रेड इंडियनांची टोळी होती. त्यांच्या समोरची शेकोटी धुमसत होती; त्या शेकोटीवर किंचित् झुकून तीं माणसं उभीं राहिलीं होतीं. डोंगराळ मुलखांतले, लांब केस राखलेले, काळविटाच्या कातड्याचा पोषाख घातलेले एक दोन फ्रेंच शिकारी तिथें होते. हे शिकारी बोटीकडे पहात उभे होते. जवळच एका लाकडाच्या ओंडक्यावर तीन माणसं बसलीं होतीं; आपल्या गुडघ्यांवर त्यांनीं रायफली ठेवल्या होत्या. या तिघांतला पहिला उंचापुरा, बळकट बांध्याचा, स्वच्छ निळ्या डोळ्यांचा, चेहऱ्यावर बुद्धिमत्तेची छाप असलेला असा गृहस्थ होता. त्याच्याकडे नुसतं पहातांक्षणींच हें ध्यानांत आलं असतं कीं, ज्या लोकांनीं बंदूक आणि कुऱ्हाड घेऊन ॲलेगनी पर्वतांपासून तों थेट या गवताळ जंगल प्रदेशापर्यंतची वाट काढली त्या पहिल्या धाडसी आणि साहसप्रिय लोकांच्या वंशांतलाच हा मनुष्य असला पाहिजे. जिथें त्याच्या साहसप्रिय वृत्तीला पूर्ण वाव होता अशा ऑरेगॉनच्या वाटेनेंच तो निघाला होता.

दुसऱ्या दिवशीं पहाटे आम्ही मिसुरी नदीच्या मुखापासून पांचशे मैलांच्या अंतरावर असलेल्या 'कांझास' येथें जाऊन पोहोचलों. इथें उतरल्यानंतर कर्नल चिक याच्या ताब्यांत आम्ही आमचं सामान दिलं. कर्नल चिकचं ओंडक्याचं घर ही आमची खानावळच होती असं म्हणायला हरकत नाही. तिथें सामान टाकून आम्ही पुढच्या प्रवासासाठीं खेचरं आणि घोडे मिळवण्या-साठीं म्हणून 'वेस्टपोर्ट' येथें गेलों.

मे महिन्यांतली ती प्रसन्नसुंदर सकाळ होती. जंगलांतून जाणारा आमचा रस्ता अगदींच भिकार होता; पण सगळं जंगल स्वच्छ सूर्यप्रकाशानें न्हाऊन निघालं होतं, पक्ष्यांच्या किलबिलाटानें जिवंततेनें भारलं गेलं होतं. कांझासच्या रेड इंडियनांच्या टोळीला आम्हीं वाटेंत मागें टाकलं. चित्रविचित्र पोषाख केलेले ते लोक संथ गतीनें घराकडे निघाले होते. हीं रेड इंडियन माणसं बोटींत असतांना कशींहि दिसलीं तरी या चित्रमय जंगल प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर तीं ठळकपणें उठून दिसत होतीं.

वेस्टपोर्ट रेड इंडियन लोकांनीं गजबजलेलं होतं. घरांच्या बाजूला, कुंपणाजवळ बांधलेलीं त्यांचीं केसाळ घोडीं आजूबाजूला दिसत होतीं. सॅक्स आणि फॉक्सेस या जमातींतल्या रेड इंडियनांचीं तोंडं रंगवलेलीं असत, आणि ते आपली डोई तुळतुळीत करीत. शॉनीज आणि डिलावेर्स जमातींतले लोक चटेरीपटेरी कापडाचे झगे घालीत आणि डोक्याला फेटे बांधीत. विॲण्डॉट्स जमातींतले लोक गोऱ्या लोकांसारखा पोषाख करीत. भिकारड्या कांझास जमातींतले लोक नुसतींच कांबळी गुंडाळून फिरत; ते रस्त्यांत भटकतांना किंवा घरीं, दुकानांत आराम पडलेले दिसत.

मी जिथें उतरलों होतों त्या ओंडक्याच्या घराच्या—म्हणजे आमच्या खानावळीच्या दारांत मी उभा होतों. इतक्यांत समोरच्या रस्त्यावरून आमच्या घराच्या दिशेनें येत असलेली वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची एक व्यक्ति मला दिसली. या व्यक्तीचा चेहरा लालबुंद होता. हनुवटीवरील लाल दाढीचा खुंट आणि त्याच्या मिशा चेहेऱ्याला शोभा आणीत होत्या. स्कॉटलंडमधले मजूर घालतात तसली गोंडा असलेली वाटोळी टोपी त्यानें घातली होती. स्कॉटलंडमधल्याच बुरणुसाच्या कापडाचा, टोकाला झालरी लोंबत असलेला कोट त्यानें घातला होता. घरींच विणलेल्या खरखरीत कापडाची विजार त्यानें घातली होती. तळव्याला रुंदट खिळे असलेले बूट त्याच्या पायांत होते. आणि या सगळ्या पोषाखाला पूर्णता यावी म्हणूनच कीं काय, त्यानें काळ्या रंगाचा पाईप ओठांच्या कोपऱ्यांत मोठ्या रुबाबानें धरला होता. अशी ही या विचित्र पोषाखांत येणारी व्यक्ति म्हणजे कॅप्टन 'सी' आहे हें मीं ओळखलं. ब्रिटिश सेनेंतल्या या कॅप्टनबरोबर शिकारीसाठीं निघालेला त्याचा भाऊ आणि मित्र 'आर' हाहि होता. कॅप्टन आणि त्याच्या बरोबरच्या लोकांना सेंट लुईस इथें मीं पाहिलं होतं. आतां इथें वेस्टपोर्टला दोन कारणांसाठीं ते थांबले होते : एक म्हणजे त्यांना आपल्या पुढच्या प्रवासाची तयारी करायची होती; आणि दुसरं असं कीं, त्यांचं संख्याबळ अगदींच कमी असल्यामुळें अधिक कुमक त्यांनीं मागवली होती, आणि या नव्यानं येणाऱ्या माणसांची ते वाट पहात होते. आपापले मुलुख सोडून ऑरेगॉन आणि कॅलिफोर्निया येथें निघालेल्या प्रवाशांबरोबर या कॅप्टनला निघतां आलं असतं; परंतु "केंटकीच्या रहिवाशांबद्दल" त्यांच्या मनांत जराहि आदर नसल्यामुळें त्यांच्या सोबतीनें जाणं नकोच असं त्यांनीं ठरवलं असलं पाहिजे.

कुमक आल्यानंतर आम्ही कॅप्टनबरोबरच निघावं असं आम्हाला त्यानेंच सुचवलं. इतर प्रवाशांबद्दल आम्हाला खास असा जिव्हाळा थोडाच होता ! तेव्हां अर्थातच कॅप्टनच्या विनंतीला आम्ही होकार दिला. आमचे हे भावी सहयात्री एका लाकडी घरांतच राहिले होते. पिस्तुलं, सुऱ्या, खोगीर, दुर्बिणी, बंदुका हें त्यांचं सगळं सामान आजूबाजूला पडलं होतं. कॅप्टनचा मित्र 'आर्' याला निसर्गशास्त्राची आवड होती; तो सुतारपक्ष्यांत पेंढा भरीत बसला होता. कॅप्टनचा भाऊ जमिनीवर बसून दोर वळत होता.

प्रवासासाठीं जमा केलेलं सामान स्वयंतुष्ट वृत्तीने कॅप्टननें आम्हाला दाखवलं. सामान दाखवतांना तो म्हणाला. "हें पहा, आम्ही आहोंत मुरलेले प्रवासी. आमच्यासारखी जय्यत तयारी करून सरहद्द विभागाच्या या प्रवासाला अजूनपर्यंत कोणीहि गेलेलं नाहीं, मी अगदीं खात्रीपूर्वक सांगतों." या मंडळींनीं एक शिकारी आपल्याबरोबर घेतला होता. तो मूळचा होता कॅनडांतला. त्याचं नांव होतं सॉरेल. त्याचा चेहरा अगदीं दुर्मुखलेला दिसायचा. त्यांच्याबरोबर एक खेंचरहाक्याहि होता. तो होता अमेरिकन. वृत्तीनें चांगलाच टग्या. सॉरेल आणि तो घराच्या बाहेर आराम घेत पडले होते. बाजूलाच एक लाकडी तबेला होता; त्यांत कॅप्टननें आपल्या तरबेज नजरेनें निवडलेले घोडे आणि खेचरं होतीं.

कॅप्टनची अजूनहि तयारी व्हायची होती. तेव्हां आपण जरा पुढें निघावं असं म्हणून आम्ही रमत गमत पुढें झालों. ज्या इतर प्रवाशांविषयीं कॅप्टननें तिटकारा व्यक्त केला होता ते प्रवासी आठ दहा मैलांवर तळ ठोकून राहिले होते. हजाराच्या आसपास त्यांची संख्या होती, नवे नवे तांफे येऊन सारखी या संख्येंत भर टाकीत होते. हे सगळे प्रवासी फारच गोंधळलेले होते, ते सभा भरवीत, ठराव करीत, नियम आंखीत...पण इतकं सगळं करूनहि गवताळ प्रदेशाच्या पल्याड हा जथा नेण्यासाठीं नेतृत्व कुणाकडे द्यावं या बाबतींत त्यांचं एकमत होत नव्हतं.

मला त्या दिवशीं कसलीच घाई नव्हती. म्हणून मी घोडा घेऊन इंडिपेंडन्सला गेलों. शहरांत खूपच गर्दी होती. प्रवाशांची, व्यापाऱ्यांची इतकी गर्दी झाल्यामुळें त्यांना लागणारं सामान पुरवण्यासाठीं अनेक दुकानं नव्यानेंच उगवलीं होतीं. दहाबारा लोहारांचीं दुकानं होतीं. गाड्या दुरुस्त करणं, घोड्यांना, बैलांना नाल मारणं इत्यादि कामं इथें जोरांत चालू होतीं. त्यामुळें हातोड्यांची कर्णकर्कश ठोकठोक हवेंत भरून राहिली होती. रस्त्यांत पहावं

तिकडे माणसं, घोडे, खेचरं यांची गर्दी दिसत होती. मी शहरांत असतांना इलिनॉयहून निघालेल्या प्रवाशांच्या गाड्यांचा एक तांडा हमरस्त्यावर येऊन उभा राहिला. गाड्यांतून अनेक निरोगी चेहेऱ्याचीं मुलं बाहेर डोकावून पहात होतीं. मधूनच एखादी घोड्यावर बसलेली, उन्हानें रापलेल्या आपल्या चेहेऱ्यावर छत्री धरलेली गोंडस, देखणी स्त्री दिसे. घरून निघतांना तिनें भडक रंगाचे कपडे घातलेले असावेत, परंतु इतक्या प्रवासानंतर तो रंग पार उडून गेलेला असे. पुरुषमंडळी घोड्या-बैलांच्या आसपास उभीं होती. त्यांच्या चेहऱ्यांत समजूतदारपणाची झांक होती. या प्रवाशांतल्या तीन वृद्ध माणसांकडे माझं सहज लक्ष गेलं. त्यांच्या हातांत चाबूक होते; आणि ते आध्यात्मिक उन्नति या विषयावर चर्चा करीत होते. सरहद्दविभागाकडे निघालेले सगळेच प्रवासी कांहीं असे नसतात. त्यांतलीं कांहीं तर गांवानें ओवाळून टाकलेलीं माणसं असतात. स्वतःच्या मुलूख सोडून माणसं दुसरीकडे जायला कां प्रवृत्त होतात या गोष्टीचा मीं खूप विचार केला आहे; हीं कारणं शोधतांना मन अगदीं गोंधळून जातं. पण एक गोष्ट मात्र खरी : आपली परिस्थिति बदलून टाकण्याच्या वेड्या आशेमुळें असो, कायद्याचं, समाजाचं बंधन उखडून टाकण्याच्या इच्छेमुळें असो, किंवा नुसत्याच मानसिक अवस्थते-मुळें असो—हीं सगळीं माणसं आपल्या वांच्छित स्थळीं जाऊन पोहोचलीं कीं त्यांचा स्वप्नभंग होतो, आणि केव्हां एकदां तिथून निसटूं असं त्यांना होऊन जातं.

सात आठ दिवसांनंतर प्रवासाच्या तयारीची आमची धांदल संपली. आमच्या मित्रांचीहि तयारी झाली होती. ते वेस्टपोर्टला कंटाळले होते; तेव्हां त्यांनीं पुढें निघावं आणि कांझासच्या हद्दीजवळ आमच्यासाठीं थांबावं असं ठरलं. त्याप्रमाणें 'आर' आणि तो खेचरहांक्या गाड्या आणि तंबू घेऊन पुढें निघाले. कॅप्टन, त्याचा भाऊ, सॉरेल, आणि त्यांना नुकताच येऊन मिळालेला बॉयसव्हर्ड नांवाचा फांसेपारधी असे घोडे घेऊन त्यांच्या मागून गेले.

प्रवासाच्या सुरवातीलाच कांहीं शकुन ठीक झाला नाहीं. वेस्टपोर्टपासून कॅप्टन मैलभर अंतरावर गेला असेल नसेल इतक्यांत पाऊस असा कांहीं जोराचा कोसळला कीं हीं सगळी मंडळी नखशिखान्त भिजून निघाली. सातआठ मैलांच्या अंतरावर 'आर' तंबू' ठोकून आपली वाट पहात असेल असा विचार करून कॅप्टन आणि त्याच्याबरोबरीची मंडळी घाई करून निघाली.

परंतु पावसाला जशी सुरवात झाली तशी ‘आर’नें ठरलेला बेत बदलला. रानांत एका आंतल्या बाजूला झाडांचें गर्द छत पाहून तिथेंच त्यानें तंबू ठोकले. ‘आर’चा हा दूरदर्शी बेत कॅप्टनला अर्थातच कळणं शक्य नव्हतं. त्यामुळें ‘आर’ला शोधीत या अशा मुसळधार पावसांतून कॅप्टनला चांगलंच भटकावं लागलं. अखेर तीक्ष्ण नजरेच्या त्या फांसेपारध्यानें ‘आर’चा तंबू शोधून काढला. ‘आर’नें नुकतीच कॉफी पिऊन संपवली होती आणि तो आरामांत पाइप ओढीत पडला होता. कॅप्टनसारखा शांत मनाचा मनुष्य शोधून सांपडला नसता. तेव्हां त्यानें आपल्या वाट्याला आलेलं हें दुर्दैव शांत चित्तानें सहन केलं; कॉफीचा जो कांहीं गाळ तळाशीं उरला होता त्यांतला थोडा पिऊन थोडा त्यानें भावाला दिला; आणि अंगावरच्या ओलेत्या कपड्यांनीं तसाच झोपी गेला.

या वादळाचा तडाखा आम्हालाहि बसला होता. खेचरांची जोडी घेऊन आम्ही कांझासला निघालों होतों : इतक्यांत वाटेंतच पावसानें झोडायला सुरवात केली. अशा कडकडणाऱ्या तीक्ष्ण विजा आणि असं अविरत घोंघावणारं पिसाट वादळ मीं पूर्वी कधींहि पाहिलं नव्हतं. पावसाच्या उभ्या आडव्या धारांनीं रानं अगदीं पुरतीं झांकून गेलीं होतीं. या धारा जोरानें जमिनीवर कोसळल्या कीं त्या एखाद्या कारंज्याच्या फवाऱ्यासारख्या उळट वर उसळत. झरे इतक्या वेगानें वहात होते कीं मोठ्या प्रयासानेंच आम्ही ते ओलांडूं शकलों.


शेवटीं एकदाचं कर्नल चिकचं लाकडी घर पावसाच्या धारांतून अंधुकपणें आम्हाला दिसलं. कर्नलनें आपल्या नेहमींच्या दिलखुलास आतिथ्यानें आमचं स्वागत केलं. त्याची बायको नुकतीच धार्मिक सभेला जाऊन आल्यामुळें थोडीशी थकल्यासारखी दिसत होती; परंतु सौजन्याच्या बाबतींत ती आपल्या नवऱ्याच्या जराहि मागें नव्हती. आम्ही चिखलानें चांगलेच भरून गेलों होतों, तेव्हां तिनें आधीं आमचीं स्वच्छ होण्याची सगळी सोय केली. कर्नलचं घर उंच टेकडीवर होतं. सूर्यास्ताच्या सुमाराला जेव्हां पाऊस थांबला तेव्हां कर्नलच्या घराच्या ओसरीवरून अतिशय सुंदर दृश्य दिसूं लागलं. मधें येणाऱ्या ढगांतून सूर्याचे किरण मिसुरी नदीच्या वेगवान, क्रुद्ध प्रवाहावर आणि नदीच्या कांठापासून पल्याडच्या डोंगरकड्यांपर्यंत प्रदीर्घ जंगलावर ओघळत होते.

दुसऱ्या दिवशीं आम्ही वेस्टपोर्टला परतलों. तिथें गेल्यावर कळलं कीं कांहीं निरोप सांगण्यासाठीं म्हणून कॅप्टन स्वतः येऊन गेला. परंतु आम्ही कांझासला गेल्याचं कळल्यामुळें त्यांच्या ओळखीच्या व्हॉगेल नांवाच्या

माणसाकडे तो निरोप ठेवून गेला. व्हॉगेलचं एक छोटंसं किराणामालाचं आणि मद्याचं दुकान होतं. या भागांत व्हिस्कीचा प्रसार तर खूप आहेच, पण हें पेय इथें सुरक्षिततेच्या मर्यादा ओलांडून जातं : कारण इथला प्रत्येक मनुष्य खिशांत पिस्तूल घेऊनच हिंडत असतो. आम्ही व्हॉगेलला शोधीत त्याच्या त्या दुकानावर गेलों. व्हॉगेलनें दार उघडलं; त्याचा जर्मन ठेवणीचा रुंद चेहेरा बाहेर दिसला. "तुम्हाला कांहीं महत्त्वाचं सांगायचं आहे" असं म्हणून त्यानें मद्य घेण्यासाठीं आम्हाला आंत बोलावलं. त्यानें दिलेली दारू आणि सांगितलेला निरोप या दोन्ही गोष्टींची चव आम्हाला सुखाची वाटली नाहीं.

कॅप्टन निरोप ठेवून गेला होता तो असा : कोणत्या वाटेनें जायचं याविषयीं आधीं ठरलेला वेत 'आर'नें बदलला होता. ज्या वाटेनें व्यापारी जातात त्या वाटेनें न जातां उत्तरेच्या दिशेनें लीव्हनवर्थच्या किल्ल्यावरून जायचं, आणि मग गेल्या उन्हाळ्यांत ते इथून गेले असतांना घोडदळाच्या तुकड्या जिथून गेल्या त्या वाटेवरून जाऊन पुढचा मार्ग शोधायचा. आम्हांला न विचारतां त्यांनीं असा वेत ठरवावा ही गोष्ट आम्हांला मुळींच रुचली नाहीं; हा आम्हांला आगाऊपणाचाच प्रकार वाटला. परंतु आम्ही होता होईल तेवढा मनावर ताबा ठेवला आणि आमचं असमाधान व्यक्त होऊं दिलं नाहीं. त्यांनीं आंखलेल्या या नव्या वेताप्रमाणें लीव्हनवर्थच्या किल्ल्यावर त्यांना जाऊन मिळायचं असं आम्हीं ठरवलं.

एव्हाना आमची प्रवासाची तयारी झालेलीच होती; तेव्हा ठरलेल्या या नव्या बेतानुसार एके सकाळीं आम्ही निघालों. सुरवात केली खरी, पण शकुन कांहीं चांगला झाला नाहीं. आमच्या गाडीचं एक खेचर बुजलं आणि उधळलं —थोडक्यांत वाचलं. कारण गाडी अगदी मिसुरी नदींत कोसळायला आली होती. तेव्हां अधिक धोका नको म्हणून आम्हीं तें खेचर मिस्टर बूनकडे बदलून घेतलं. या विभागांत प्रारंभीं आलेल्या गोऱ्यांपैकीं एक प्रवासी डॅनिएल बूनचा हा नातू, वेस्टपोर्ट इथें रहाणारा. असं हें पहिलं संकट ओसरलं, पण त्यानंतर दुसरं संकट उभं राहिलं. वेस्टपोर्ट मागें टाकून कांहीं अंतर आम्ही ओलांडलं आणि चिखलभरली वाट लागली. नंतर पुढें अशा अनेक वाटा लागल्या. आम्हाल त्यांची सवय झाली हें खरं; पण ही तशी पहिलीच वाट होती. इथल्या या चिखलांत गाडीचं चाक अडकून पडलं—तासापेक्षां अधिक वेळ!



## २ | सुरवात तर झाली

वेस्टपोर्ट इथें चिखलांतून वाट काढली आणि एका चिंचोळ्या रस्त्यानें आम्हीं पुढें निघालों. या वाटेवर झाडांच्या सावल्या आणि प्रकाश यांचं एक आडवं उभं जाळं विणलं गेलं होतं. अशा रीतीनें प्रवास करीत शेवटीं आम्हीं त्या प्रचंड जंगलाची सीमा ओलांडली, आणि स्वच्छ सूर्यप्रकाशांत आलों. पश्चिमेकडच्या सपाट प्रदेशापासून तों थेट अटलांटिक समुद्राच्या किनाऱ्यापर्यंत हें जंगल पसरलेलं होतं. समोर पसरलेल्या झुडपांवरून आम्ही पलिकडे नजर टाकली तेव्हा क्षितिजापर्यंत हेलावत जाणारा गवताळ प्रदेशाचा हिरवा विस्तार आम्हाला दिसला.

वसंतऋतूंतला तो एक सौम्यशांत दिवस होता. अशा दिवशीं कसलंहि काम न करतां दिवास्वप्न पहात आपल्याच तंद्रींत पडून रहावं असं वाटतं; स्वाभाविकच अशा वेळीं माणसाच्या स्वभावांतल्या नाजूक भावनांचं प्राबल्य

त्याला जाणवूं लागतं. झुडपांतून आम्ही वाट काढीत होतों. मी इतरांच्या थोडा पुढें गेलों. वाटेंत मला हिरव्यागार गवताचा एक कोपरा दिसला. कांहीं क्षण तिथें थांबण्याचा मोह पडावा असंच तें स्थळ होतं. मी घोड्यावरून खालीं उतरलों आणि त्या गवतावर शांत पडून राहिलों. मोठे वृक्ष आणि कोवळीं झाडेंसुद्धां पानांफुलांनीं डंवरलीं होतीं. ही कळ्याफुलांची भूमि सोडून गवताळ प्रदेशाच्या आणि डोंगरांच्या उग्र दृश्यांनीं भरलेल्या प्रवासाला निघायचं माझ्या अगदीं जिवावर आलं.

इतक्यांत झुडपं ओलांडून माझे सहप्रवासी माझ्या नजरेच्या टप्प्यांत आले. सर्वांत पुढें होता हेन्री शॅटिलॉं : उत्तम शिकारी आणि आमचा मार्गदर्शक. त्याचं शरीर कमावलेलं, पीळदार होतं. एका काटक, पांढुरक्या तट्टावर तो बसला होता : हें तट्टू होतं वायण्डॉट इथलं. पांढऱ्या बुरणुसाचा कोट, रुंद फेल्ट हॅट, रेड इंडियन पद्धतीचे जोडे, शिवणीच्या रेषांवर झालरीच्या रांगांनीं सजवलेली हरणाच्या कातड्याची विजार असा त्याचा एकूण पोषाख होता. कमरपट्ट्यांत त्यानें आपला खंजीर खोवला होता. दुसऱ्या बाजूला बंदुकीच्या गोळ्यांची पिशवी आणि ठासण्याची दारू भरलेला शिंगाडा होता. खोगिराच्या उंचवट्याला टेकून त्यानें आपली रायफल आडवी ठेवली होती. त्याचं हें खोगीर बरींच वर्षें वापरल्यामुळें अगदीं विटून गेलेलं होतं.

हेन्री शॅटिलॉंच्या मागून शॉ येत होता. एका लहानशा तांबूस घोड्यावर तो बसला होता. दोरानें बांधून एक मोठा घोडा तो ओढून नेत होता. शॉचा एकूण सामानसंच माझ्यासारखाच होता. देखणेपणापेक्षां उपयुक्ततेवरच त्याचा भर होता. काळ्या रंगाचं एक साधं स्पॅनिश खोगीर, त्या खोगीरालाच शिवलेलीं भक्कम पिस्तुलांसाठीं म्यानं, मागें एक गुंडाळी करून ठेवलेलं कांबळं, घोड्याच्या मानेला अडकवलेली जाड दोऱ्याची गुंडाळी अशी त्यानें तयारी केली होती. गुळगुळीत दोन नळ्यांची बंदूक त्यानें बाळगली होती. माझ्याजवळ एक पंधरा पौंड वजनाची रायफल होती. असं हें आमचं सामान आणि पोषाख : हें सगळं दिसायला जरी फारसं आकर्षक नसलं, तरी सुसंस्कृत जगाची छाप त्या सगळ्या संचावर होती. पण आम्ही जेव्हां प्रवासाहून परतलों तेव्हां आमचे कपडे असे कांहीं झाले होते कीं, निघतांना घातलेल्या कपड्यांशीं त्यांनीं उत्तम विसंगति साधली होती. आम्ही परत येतांना आमच्या अंगावरचे कपडे इतके घाणेरडे होते कीं त्यांच

अनुकरण करतों असं जरी एखाद्यानें म्हटलं, तरी त्याला साधायचं नाहीं. झग्यासारखा कमरेला पट्ट्यानें बांधलेला तांबडया फ्लॅनेलचा शर्ट, आमच्या फाटलेल्या बुटांच्या ऐवजीं घातलेले रेड इंडियन पद्धतीचे जोडे, आणि यानंतर अत्यंत महत्त्वाचा असा जो कपडयांचा भाग तो एका रेड इंडियन स्त्रीनें धुरी देऊन सुकवलेल्या काळविटाच्या कातड्याचा शिवलेला होता !

डेस्लॉरियर्स हा आमचा खेचरहांक्या गाडी घेऊन सर्वांच्या पिछाडीनें येत होता. गुडघाभर चिखलांतून त्याला वाट काढावी लागत होती. तोंडांत धरलेल्या पाइपमधून धूर सोडणें आणि खास गवताळ प्रदेशी हेल काढून उधळू पहाणाऱ्या खेचरांना शिव्या घालणें असा आलटून पालटून कार्यक्रम चालला होता. एकादा मोठा चिखलाचा खड्डा आला कीं खेचरं अर्थातच बुजूं लागत. क्यूबेकच्या बाजारांत दिसतात तसल्या प्रकारची गाडी आमच्या या खेचरहाक्याकडे होती. गाडींतलं सामान सुरक्षित रहावं यासाठीं एक पांढऱ्या रंगाचं आवरण गाडीवर टाकलेलं होतं. आमचं सामान, तंबू, दारुगोळा, ब्लँकेटं, रेड इंडियनांना देण्यासाठीं घेतलेल्या भेटी अशा सगळ्या गोष्टीं गाडींत भरलेल्या होत्या.

आम्ही एकूण चौघेजण होतों; आमच्याबरोबर आठ जनावरं होतीं. मी आणि शॉनें एक एक राखीव घोडा बरोबर चालवलेला होता. अपघात झालाच, तर उपयोगी पडावं म्हणून एक राखीव खेचरहि आम्हीं बरोबर बाळगलं होतं.

आमच्या एकूण तयारीचं हें वर्णन केल्यानंतर, आमच्याबरोबर जीं आणखीं दोन माणसं होतीं त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांकडे मी वळलों, तर तें अस्थानीं ठरणार नाहीं असं मला वाटतं.

डेस्लॉरिअर्स हा मूळ कॅनडांतला. एखाद्या खऱ्याखुऱ्या जँ बॅप्टीस्टच्या स्वभावांतले सगळे गुण त्याच्यांत होते. कितीहि थकवा येवो, कष्ट पडोत, संकटांना तोंड द्यावं लागो त्याच्या स्वभावांतली प्रसन्नता किंवा आपल्या धन्यांच्या बाबतींतली त्याची नम्रता कमी म्हणून व्हायची नाहीं. रात्र झाली कीं तो शेकोटीशेजारीं बसे, पाइप पेटवी आणि समाधानभरल्या मनानें गोष्टी सांगे. गवताळ प्रदेश हीच त्याची स्फूर्ति होती.

हेन्री शॅटिलॉं हा वेगळ्या प्रकारचा मनुष्य होता. सेंट ल्युई इथें असतांना फर कंपनींतल्या अनेक लोकांनीं डोंगराळ प्रदेशांत आम्हाला मार्गदर्शन करूं

शकेल असा एखादा उत्तम शिकारी शोधून देतों असं आपणहून सांगितलं होतं. एके दिवशीं दुपारीं आम्ही ऑफिसांत आलों, तर तिथें एक उंच आणि उत्तम पोषाख केलेला एक मनुष्य आम्हांला दिसला. त्याचा चेहरा इतका मनमोकळा वाटला कीं त्यामुळें त्याच्याकडे चटकन आमचं लक्ष वेधलं गेलं. आमचा मार्गदर्शक म्हणून येण्याची त्यानें इच्छा प्रकट केली आहे असं जेव्हां आम्हाला कळलं तेव्हां आम्हाला आश्चर्यच वाटलं.

सेंट ल्युई जवळच्या एका छोट्याशा फ्रेंच शहरांत त्याचा जन्म झाला होता. पंधराव्या वर्षापासून तो सतत रॉकी पर्वतांच्या सान्निध्यांत रहात आला होता. फर कंपनीनें आपल्या गढ्यांवर गव्याचं मांस पुरविण्याचं काम त्याला दिलं होतं. त्या प्रदेशांत सिमॉनो हा एकच मनुष्य शिकारीच्या कामांत त्याचा प्रतिस्पर्धी होता. परंतु त्यांचा स्नेह होता : दोघांच्याहि प्रतिष्ठेला साजेशीच ही गोष्ट होती. चार वर्षं डोंगरप्रदेशांत राहिल्यानंतर तो एका दिवसापूर्वीच सेंट ल्युई इथें आला होता आणि आतां या नव्या मोहिमेवर निघण्यापूर्वी फक्त एकच दिवस आपल्या आईजवळ रहाण्याची इच्छा त्यानें व्यक्त केली होती. तिशीच्या आसपास त्याचं वय होतं. त्याची उंची होती सहा फूट, आणि अत्यंत रेखीव आणि पीळदार अशी त्याची अंगकाठी होती. तो निरक्षर होता. गवताळ प्रदेश हीच त्यांची शाळा होती. पण असं असूनहि स्त्रियांतहि क्वचितच आढळावी अशी मनाची संस्कारिता आणि ऋजुता त्याच्यांत होती. त्याच्या पौरुषसंपन्न चेहऱ्यावर त्याचा बाणेदारपणा, सहृदयता, आणि साधेपणा यांचं प्रतिबिंब उमटलेलं होतं. मनुष्यस्वभाव जाणण्याची सूक्ष्म शक्ति त्याच्या ठिकाणीं होती आणि कुठल्याहि समाजांत त्याला सोडला असता तरी वागण्याच्या बाबतींत कसलीहि लक्ष्यांत येण्याजोगी चूक त्याच्या हातून झाली नसती अशी हातोटी त्याला अवगत होती.

इंग्रज रक्ताच्या अमेरिकनांत असतो तसा चळवळ्या उत्साह हेन्रीच्या स्वभावांत नव्हता. येईल त्या परिस्थितीचा स्वीकार करावा अशीच त्याची वृत्ति असे. आत्यंतिक औदार्य हाच त्याच्या स्वभावांतला दोष होता. औदार्याची ही वृत्ति या जगांत जगायला फारशी उपकारक ठरत नाहीं. परंतु सर्व लोक त्याच्याविषयीं असं मात्र म्हणत कीं, स्वतःच्या मालमत्तेबाबत या औदार्यामुळें तो बेफिकीर असला तरी दुसऱ्यांची मालमत्ता त्याच्या ताब्यांत असतांना पूर्ण सुरक्षित असते. डोंगरप्रदेशांत आपलं शौर्य आणि शिकारीचं कौशल्य या

बाबतींत त्यानें चांगलंच नांव मिळवलं होतं. परंतु ज्या प्रदेशांत दोन माणसांतलीं भांडणं बंदुकीनेंच मिटवलीं जातात तिथेंहि हेन्री अगदीं क्वचितच भांडणांत पडलेला दिसे हें त्याच्या व्यक्तित्वाचं खास वैशिष्ट्य म्हणून नमूद केलं पाहिजे. एक दोनदां त्याचं हें सौजन्य कोपरानें खणण्याचा कांहीं लोकांनीं प्रयत्न केला, पण परिणामीं हेन्रीनें त्यांना अशी कांहीं जरब बसवली कीं पुन्हा तसला प्रकार करायचा धीर कुणाला झाल्याचं ऐकिवांत नाहीं. त्यानें तीस धिप्पाड अस्वलांची केलेली शिकार सर्वांना ठाऊक होती—त्याच्या निर्भयतेविषयीं एवढा पुरावा पुरेसा होता. नागरी जीवनाचे कसलेहि संस्कार नसतांना निसर्ग कसा उत्तम मनुष्य निर्माण करूं शकतो याचं हेन्री हें उत्कृष्ट उदाहरण होतं. रानांत किंवा शहरांत माझा सच्चा दिलाचा मित्र हेन्री याच्यासारखा उमदा मनुष्य मला तरी आढळलेला नाहीं.

जंगलं आणि झुडपं ओलांडून आम्ही लवकरच गवताळ प्रदेशाच्या विस्तृत भूमीवर कांहींसे येऊन ठेपलों. वाटेंत सुती कापडाचा शर्ट घातलेला, कमरबंध कसलेला, लाटा लाटा असलेल्या केसांना वाऱ्यावर उडणारा रंगीत रुमाल बांधलेला शॉनी जमातींतला एकादा रेड इंडियन केसाळ तट्टावर बसून जात असलेला दिसे.

दुपारीं आम्ही एका ओढ्याच्या जवळ विश्रांति घेण्यासाठीं थांबलों. या ओढ्यांत बेडूक आणि छोटी कासवं खूप होतीं. तिथें यापूर्वी रेड इंडियनांचा तळ पडलेला असला पाहिजे. कारण त्यांनीं बांधलेल्या घरांच्या बाहेरच्या चौकटी शिल्लक राहिलेल्या दिसत होत्या. त्या चौकटींवर आम्हीं छपरांसारखीं ब्लँकेटं पसरलीं आणि उन्हाला आडोसा केला.

आम्हीं आमचीं खोगिरं अंथरलीं आणि ब्लँकेटांच्या सावलीखालीं बसलों. शॉनें पहिल्याप्रथमच आपला रेड इंडियन पाइप् शिलगावला. डेरलॉरियर्स जमिनीवर मांडी घालून बसला होता. त्याच्यासमोर फुललेल्या निखाऱ्यावर तवा ठेवला होता. त्यानें एका हाताचा डोळ्यांवर आडोसा केला होता, आणि दुसऱ्या हातांत काठी घेऊन तव्यावरचा चुरचुरणारा पदार्थ तो परतीत होता. आजूबाजूच्या ओलसर झुडुपांत घोडे चरायला सोडले होते. वसंतऋतूंतल्या-सारखा शीण आणणारा उष्मा हवेंत होता. ओढ्यांतून आणि झुडपांतून हजारो बेडकांच्या आणि किड्यांच्या आवाजांचा सामूहिक घोष कानावर आदळत होता.

आम्ही जरा विसावलों असूं नसूं, इतक्यांत आम्हाला भेटायला एक मनुष्य आला. तो कांझास रेड इंडियनांच्या जमातीपैकीं एक होता. त्यानें केलेल्या पोषाखावरून पहातां तो त्यांच्या जमातींतला एक प्रतिष्ठित गृहस्थ असावा असं वाटत होतं. त्यानें तुळतुळीत गोटा केला होता आणि डोक्याला लाल रंग दिला होता. डोक्यावर राखलेल्या लहानशा घेरांत त्यानें शेंडी ठेवली होती. शेंडीच्या टोकाला गरुडाचीं पिसं आणि खडखड्या नागाच्या दोन तीन शेपट्या बांधल्या होत्या. भडक लाल रंगानें त्यानें आपले गाल रंगवले होते. हिरवे लोलक घालून कान सजवले होते. पहाडी अस्वलाच्या नखांची एक माळ त्यानें गळ्यांत घातली होती. मोठ्या शंखमण्यांचा हार त्याच्या छातीवर रुळत होता. त्यानें आमच्याशीं हस्तांदोलन केलं आणि गुरगुरल्यासारखे कांहीं अभिनंदनपर शब्द त्यानें उच्चारले. मग त्यानें आपल्या खांद्यावरचं लाल कांबळं खालीं टाकलं आणि त्याच्यावर पायांची फुली घालून तो बसला. आम्ही त्याला साखरपाणी प्यायला दिलं. तें पाहून "छान" असं तो उद्गारला; आणि मग त्यानें आपण कसे मोठे आहोंत, पॉनी या जमातींतले किती लोक आपण ठार केले इत्यादि माहिती सांगायला सुरवात केली. इतक्यांत आमच्या समोरचा ओढा तुडवून येत असलेला रेड इंडियनांचा घोळका आम्हाला दिसला. ते बाप्ये, बाया, पोरं एका रांगेत चाललीं होतीं. त्यांच्यापैकीं कांहीं घोड्याच्या पाठीवर बसले होते, कांहीं पायीं चालत होते. पण ते सगळे एकजात भिकार दिसत होते. खुरट्या केसाळ तट्टांवर म्हाताऱ्या बसल्या होत्या. त्यांच्यामागें फाटक्या कांबळ्यांना बिलगलेलीं सापासारख्या डोळ्यांचीं एक दोन पोरं बसलेलीं दिसत होतीं. हातांत धनुष्यबाण घेतलेले उंच किडकिडीत तरुण पायीं चालत होते. तरुण मुलींनीं जांभळे कपडे आणि कांचमण्यांच्या माळा घातल्या होत्या; परंतु या अलंकरणामुळें त्यांची कुरूपता जराहि झांकली जात नव्हती. या सर्व माणसांप्रमाणेंच आमच्या पुढें बसलेल्या सारखा एकादा प्रतिष्ठित गृहस्थहि अधूनमधून दिसत होता. हीं सगळीं माणसं हा कांझास जमातींतला तळचा गाळ होता. त्यांच्यांतलीं जीं निवडक माणसं होतीं तीं गेलीं होतीं गव्याच्या शिकारीसाठीं आणि मागें उरलेला हा गाळ गांव सोडून भीक मागण्यासाठीं म्हणून वेस्टपोर्टकडे निघाला होता.

या भिकार तांड्याला आम्ही पुढें जाऊं दिलं. मग आम्ही चरायला सोडलेले आमचे घोडे धरून आणले, त्यांचा सरंजाम चढवला आणि प्रवासाला पुन्हा

सुरुवात केली. ओढा उतरून आम्ही पुढें निघालों. डाव्या हाताला झाडा-झुडपांच्या पुंजक्यांतून गचाळ घरांचीं ठेंगणीं छपरं दिसत होतीं. रानगुलाब आणि इतर फुलं यांनीं वेढलेल्या छोट्या वाटेनें आम्ही पुढें झालों तेव्हां शॉनींच्या मेथॉडिस्ट मिशनचं ओंडक्यांचं चर्च आणि शाळा आमच्या दृष्टीस पडली.

तिथल्या रेड इंडियनांची धार्मिक सभेसाठीं जमण्याची तयारी चालली होती. अर्धवट शहरी पोषाख केलेले बरेचसे उंच लोक झाडांखालीं टाकलेल्या बाकड्यांवर बसले होते. कुंपणाला आणि झाडांखालीं सावलींत त्यांचे घोडे बांधलेले होते. पार्क्स हा त्यांचा टोळीप्रमुख. बळकट बांध्याचा हा मनुष्य नुकताच वेस्टपोर्टहून आला होता. तिथें त्याच्या मालकीची एक व्यापारी कंपनी होती. याखेरीज त्याचं एक मोठं शेत होतं, आणि अनेक गुलामहि त्याच्या मालकीचे होते. मिसुरीच्या सरहद्दीवर असलेल्या रेड इंडियन जमातींत शेतीच्या बाबतींत प्रगति केलेली शॉनी ही एकच जमात आहे. आम्हाला आधीं भेटलेल्या कांझास जमातींत आणि यांच्यांत स्वभाव आणि पोषाख यांच्या बाबतींत खूपच फरक आढळून येतो.

आणखी थोडे तास घोडदौड केल्यानंतर आम्ही कांझास नदीच्या तीरावर येऊन पोहोचलों. तीरावरच्या जंगलांतून वाळू तुडवीत 'लोअर डिलावेअर' येथें जाण्यासाठीं जिथें रस्ता फुटतो त्याच्या मागें थोड्या अंतरावर आम्ही आमचा तळ ठोकला. जंगलानजीकच्या मैदानावर आम्ही प्रथमच आमचे तंबू ठोकले होते. आमची सगळी तयारीहि पूर्ण झाली होती. स्वाभाविकच आम्हाला जेवणाची आठवण झाली. डिलावेअर जमातींतली एक म्हातारी पाण्या-जवळच्या आपल्या ओंडक्यांच्या घरापुढील अंगणांत बसली होती. तीनशें पौंडांच्या आसपास तिचं वजन असेल. आजूबाजूला क्वॅक् क्वॅक करीत कोंबड्या फिरत होत्या. मिश्र रक्ताची एक देखणी मुलगी या म्हातारीच्या देखरेखीखालीं कोंबड्यांना दाणे घालीत होती. पैसे आणि तंबाखू या दोन्ही गोष्टींचा मोह आम्ही त्या म्हातारीला दाखवला; पण ती एकहि कोंबडं सोडायला तयार होईना! तेव्हां मी माझी रायफल उचलली आणि नदीच्या कांठीं किंवा जंगलांत कांहीं शिकार मिळते किंवा काय हें पहावं म्हणून निघालों.

गवतांत बरेच लाव पक्षी उदास शीळ घालीत बसलेले होते. एका वठलेल्या सिकॅमोर झाडाच्या भुताच्या हातासारख्या दिसणाऱ्या फांदीवर तीन ससाणे

छातीजवळच्या पिसांत आपली कुरूप डोकीं खुपसून ऊन खात बसले होते. यांखेरीज रायफल उचलावी अशा योग्यतेचं कांहींच दिसेना. भोजनसुख प्राप्त होईल अशा योग्यतेचे हे पक्षी नसल्यामुळें त्यांच्या सुखांत व्यत्यय न आणण्याचं मीं ठरवलं. शिकारीचा विचार बाजूला टाकून सूर्यास्ताचं सौंदर्य न्याहाळण्यांतच मीं माझं समाधान मिळवलं. दोन्ही बाजूला उंच उभ्या असलेल्या झाडांमधून नदी वहात होती. गाढ जांभळ्या सावल्या तिच्या पात्रावर पसरल्या होत्या. या सावल्यांतून भोवऱ्यांच्या गिरक्या घेत ती नदी वहात होती. या प्राकृतिक दृश्यांत मन शांत करण्याची शक्ति होती.

मी परत फिरलों आणि आमच्या तंबूतळावर आलों. शॉ एका म्हाताऱ्या रेड इंडियनाशीं कांहीं खलबत करीत होता. पाइपची देवाणघेवाण त्यांच्यांत सुरू होती. एकूण गोरे लोक आपल्याला आवडतात, आणि तंबाखूवर तर आपली विशेष प्रीति आहे ही गोष्ट तो म्हातारा शॉला सांगत होता. डेस्लॉरिअर्स आमच्या भोजनसाहित्याची मांडामांड करण्यांत गुंतला होता. दुसरं कांहीं नसल्यामुळें बिस्किटं, बेकन आणि कॉफी यांवरच भागवायचं होतं. म्यानांतून सुऱ्या बाहेर काढून आम्हीं त्या बेकनवर हल्ला केला, त्यांतलं बरंचसं संपवलं; आणि जें कांहीं थोडं उरलं होतं तें त्या रेड इंडियन माणसाकडे फेकलं.

झाडांच्या आसपास आमचे घोडे चरत होते. त्यांच्या पुढल्या पायांना आम्ही दोऱ्या बांधल्या होत्या. असा हा प्रसंग प्रथमच त्यांच्यावर आल्यामुळें वैताग आणि आश्चर्य या दोन्ही भावना त्यांच्यांत निर्माण झाल्या होत्या. पुढें आपल्यासाठीं कोणतं ताट वाढून ठेवलं आहे याची या क्षणींच त्यांना थोडी चाहूल लागली असावी. माझ्या घोड्यानें तर गवताळ प्रदेशाचा धसकाच घेतला होता. आमच्या या घोड्यांपैकीं एकाचं नांव होतं हेन्ड्रीक. ताकद आणि काटकपणा हेच त्याचे गुण होते. त्याला कोणतीहि गोष्ट पटवून देण्याचं एकच प्रत्ययकारी साधन होतं : तें म्हणजे चाबूक. असा हा हेन्ड्रीक आमच्याकडे संतापल्या चेहऱ्यानें पहात होता. आम्ही त्याच्यावर केलेल्या अन्यायाचा सूड लाथेनें घेण्याचा विचार बहुधा तो करीत असावा. दुसरा घोडा पॉंटिॲक हा तसा चांगला होता. त्याचा वंश खालच्या दर्जाचा होता. त्याची आयाळ डोळ्यांवर झुकली होती, त्यानें मान दुःखानें खालीं टाकली होती. मनाविरुद्ध शाळेंत पाठवलेल्या एखाद्या मठ्ठ मुलासारखा दुर्मुखलेला चेहरा करून तो उभा

राहिला होता. आपल्या भविष्यकाळाची त्याला लागलेली ही चाहूल अगदीं अचूक होती असंच म्हटलं पाहिजे : कारण माझ्याकडून सुटल्यानंतर क्रोज जमातीशीं युद्धांत गुंतलेल्या एका ऑगिह्लालह जमातीच्या रेड इंडियन योद्धयानें त्याला लगाम जोडल्याचं मला समजलं.

अंधार पडला. लाव पक्ष्यांची शीळ थांबून त्यांची जागा व्हिपुअरविल्स पक्ष्यांच्या आवाजानें घेतली. उशांसारखा उपयोग करण्यासाठीं आम्ही आमचीं खोगिरं सोडवून घेतलीं आणि आमचीं ब्लँकेटं जमिनीवर पसरलीं या मोसमांतला उघड्यावरचा असा हा आमचा पहिलाच तळ होता. पुढल्या प्रवासांत तंबूत कोणत्या जागेवर कोणी झोपायचं हें याच मुक्कामाच्या वेळीं निश्चित झालं. डेस्लॉरिअर्सनें गाडींत झोपायचं असं ठरलं होतं. पावसाच्या दृष्टीनें ही फारच सोयीची जागा होती. तंबूत झोपणाऱ्या त्याच्या धन्यापेक्षांहि त्याची ही जागा अधिक सोईची होती.

या ठिकाणीं कांझास नदी शॉनी आणि डिलावेअर्स या प्रदेशांच्या सीमारेषेवर येते. दुसऱ्या दिवशीं आम्हीं ही सीमा ओलांडली. तीरावरची पुढली चढण विकट असल्यामुळें आमचे घोडे, आणि सगळं सामान आम्ही तराफ्यांवर टाकलं. गाडींतलं सुद्धां सगळं सामान मोकळं केलं होतं. ती रविवारची ऊबदार, शांत, स्वच्छ प्रकाशाची सकाळ होती. हजारों किड्यांची किरकिर सोडल्यास सगळीकडे शांततेचं राज्य होतं. अधूनमधून एकादा रेड इंडियन घोड्यावरून सभागृहाकडे जात असलेला दिसे, किंवा एखाद्या जुनाट ओंडक्यांच्या घराच्या मोडकळीला आलेल्या दरवाजांतून आळसाचं सुख भोगीत असलेली एकादी म्हातारी बाई दिसे. रविवारचा दिवस हा सॅबाथचा—विश्रांति घेण्याचा. या विश्रांतिदिनाची, शांतता पाळण्याची सूचना देण्याची सार्वजनिक घंटा कांहीं गांवांत नव्हती; पण असं असूनहि न्यू हॅंपशार येथील डोंगरांतल्या किंवा व्हर्मॉंट जंगलांतल्या न्यू इंग्लंडमधल्या एकाद्या खेड्यांत नांदावी तशी शांतता या अविकसित वस्तींत नांदत होती.

इथून फोर्ट लीव्हनवर्थ येथें जाण्यासाठीं मिलिटरीनें तयार केलेला रस्ता होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंला डिलावेअर्स जमातींतल्या रेड इंडियनांचीं शेतं आणि खोपटं लागत. झाडांच्या कडेला असलेलीं हीं खोपटं ही या निसर्गचित्रांतली एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट होती; परंतु या दृश्याच्या सौंदर्यासाठीं मनुष्यनिर्मित गोष्टीची कसलीहि आवश्यकता नव्हती हें तितकंच खरं. अधून मधून लागणारीं

हिरवीं शेतं, झाडांचे पुंजके, किंवा छोट्या छोट्या अनेक झऱ्यांच्या कांठाशीं रांग करून उभीं असलेलीं झाडं यांच्यामुळें माणसाच्या कौशल्याचे संस्कार अनेक शतकं घेत आलेल्या एखाद्या प्रदेशाचं नाजूक, रेखीव सौंदर्य या जागेला प्राप्त झालेलं होतं, अशी ही निसर्गाची किमया होती. फुलं बहरलीं होतीं. सगळा परिसर टवटवीत दिसत होता.

टेकडीजवळच्या एका झऱ्यापाशीं आम्ही आमचा तळ ठोकला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुन्हा प्रवासाला सुरवात केली. दुपारीं फोर्ट लीव्हनवर्थच्या जवळ थोड्या मैलांवर आम्ही येऊन ठेपलों. इथें रस्त्यांत दोन्ही बाजूंला दाट झाडी असलेला एक झरा लागला. झऱ्याच्या दोन्ही बाजूंना झाडांच्या दाट रांगा होत्या. कांहीं अंतरांवर हा झरा दाट झाडीच्या एका खोल घळींतून वहात होता. झरा उतरून पुढें होण्याचा विचार आम्ही करतों आहोंत इतक्यांत शिकारीहून परत येत असलेलं एक डिलावेअर्स रेड इंडियनांचं टोळकं समोरून चढण चढून येत असलेलं आम्हाला दिसलं. आम्ही थांबलों, आणि त्यांना पुढं जाऊं दिलं. पुरुष आणि स्त्रिया घोड्यावर बसलेल्या होत्या. त्यांच्याबरोबर बरींच ओझ्याचीं खेचरं होतीं. या खेचरांवर फरचे गठ्ठे, गव्याच्या कातड्याचे कपडे, किटल्या, प्रवासाचं साहित्य, बरींच वर्षं वापरून मळीण झालेले कपडे आणि हत्यारं इत्यादि सामान लादलेलं होतं. या सगळ्या तांड्याच्या पिछाडीला एक म्हातारा मनुष्य होता. चढण चढून होतांच वाटेंत आमच्यापाशीं बोलण्यासाठीं त्यानें घोडा थांबवला. एका काटक, केसाळ तट्टावर तो बसला होता. मधून मधून राठ पुंजके सोडून या तट्टाच्या शेपटीला गांठी मारलेल्या होत्या. एक गंजलेलं स्पॅनिश मुखयंत्रण या घोड्याच्या तोंडांत अडकवलेलं होतं, आणि त्याला लगामाच्या ऐवजीं कच्च्या चामड्याची वादी जोडली होती. तट्टावरचं खोगीर कुठल्या तरी मेक्सिकन माणसाचं चोरलेलं असावं. सध्यां मात्र या खोगिराचा स्पॅनिश धाटणीचा आंतला सांगाडाच तेवढा उरलेला होता. या सांगाड्यावर आवरणादाखल अस्वलाचं कातडं टाकलेलं होतं. खोगीरबंधाऐवजीं चामड्याची एक वादी तट्टाच्या पोटाभोवतीं गुंडाळलेली होती. रिकीब लाकडाची होती, आणि तीहि ओबडधोबड. स्वाराची काळ्या रंगाची ती एकूण ठेवण, आणि त्याचे ते सापासारखे डोळे यांवरून तो रेड इंडियन आहे हें वेगळं सांगायची जरूरच नव्हती. त्यानें काळविटाच्या कातड्याचा झगा घातला होता. त्यानें पायाला बांधलेल्या चामड्याप्रमाणेंच या झग्यालाहि झालर लावलेली

होती. या दोन्ही वस्तु चांगल्या पॉलिश केलेल्या होत्या, तसेंच, वंगण लावल्यामुळें आणि बरेच दिवस वापरल्यामुळें त्या काळ्या दिसत होत्या. त्यानें आपल्या डोक्याभोवतीं एक जुना रुमाल बांधला होता. खोगिराला टेकवून त्यानें आपली रायफल ठेवली होती. डिलावेअर्स जमातींतीले रेड इंडियन रायफल वापरण्यांत अत्यंत कुशल असतात. परंतु गवताळ प्रदेशाच्या मुलखांत जसजसें पुढें जावें तसतसे तिथले रेड इंडियन रायफल बरोबर नेत नाहींत असं आढळतं : कारण रायफल जड असल्यामुळें ती उचलून नेण्याचा त्यांना आळस असतो.


"तुमचा प्रमुख कोण ?" त्यानें प्रश्न विचारला.

हेन्री शॅटिलॅनें आमच्याकडे बोट दाखवलें. त्या म्हाताऱ्या रेड इंडियनानें कांहीं क्षण आमच्यावर डोळे खिळवले, आणि मग आपण कांहीं महत्त्वाचें मत देत आहोंत अशा थाटांत तो म्हणाला, "चांगले नाहींत ! फारच तरुण आहेत !" अशा तऱ्हेनें आमची स्तुति केल्यानंतर तो घोड्याला टांच मारून पुढें निघाला, आपल्या लोकांच्या मागून गेला.

या डिलावेअर्स जमातीचं आणि विल्यम पेनचं पूर्वीं सख्य होतं. इरॉकी जमातीचे मांडलिक म्हणूनहि ते रहात असत. परंतु आतां मात्र अत्यंत धाडशी आणि भयंकर योद्धे म्हणून ते गवताळ प्रदेशांत ओळखले जातात. पूर्वींच्या पेन्सिल्व्हानियांत रहाणाऱ्या त्यांच्या बापजाद्यांनीं ज्यांचीं नांवंहि कधीं ऐकलीं नसतील अशा दूरदूरच्या जमातींशीं खास रेड इंडियन खुनशीपणानें ते युद्धं करतात. आपल्या लढाऊ टोळ्या ते रॉकी पर्वत आणि मेक्सिकन प्रदेशांतहि पाठवतात. शॉनी आणि डिलावेअर्स या दोन जमातींत पूर्वीं सख्य होतं, ते एकमेकांचे शेजारीहि होते. या शॉनी जमातींतल्या लोकांना शेती बरी जमते. त्यामुळें त्यांची चांगली भरभराट आहे. परंतु लढाईत माणसं मेल्यामुळें डिलावेअर्स जमातीची संख्या दर वर्षीं कमी होत असते.

रेड इंडियनांचा हा ताफा पुढें गेल्यानंतर कांहीं वेळानें मिसुरी नदीच्या कांठानें वाढलेला विस्तृत जंगलपट्टा आमच्या दृष्टीस पडला. नदीच्या वळणाकडे एका उंचवट्यावर असलेल्या झाडींतून फोर्ट लीव्हनवर्थच्या पांढऱ्या बराकीहि कांहीं वेळानें आम्हीं पाहिल्या. मिसुरी नदी आणि आम्ही यांच्यामधें एखाद्या तलावासारखं शांत असं एक कुरण होतं. या कुरणांतून वहाणाऱ्या एका झऱ्याच्या कांठाशीं असलेल्या झाडांजवळ कॅप्टन आणि त्याचे साथी यांनीं

ठोकलेले तंबू दिसत होते. बाजूलाच त्यांचे घोडे चरतांना दिसत होते, पण या घोड्यांचे मालक मात्र कुठें दिसत नव्हते. त्यांचा खेचरहाक्या राइट हा गाड्याच्या जिभेवर बसून घोडयाचा सरंजाम दुरुस्त करीत होता. तंबूच्या दारापाशीं बसून बॉयूस्वर्ड आपली रायफल साफ करीत होता. सॉरेल बाजूलाच आराम करीत पहुडला होता. जवळ जाऊन बारकाईनें पाहिल्यानंतर तंबूंत बसून दोर वळण्याच्या आपल्या नेहमींच्या कामांत मग्न असलेला कॅप्टनचा भाऊ जॅक आम्हाला दिसला. शब्दांना खास आयरिश हेल्कावे देत त्यानें आमचं स्वागत केलं. आपला भाऊ नदींत मासे पकडायला गेला असून 'आर्' किल्ल्यांतल्या शिबंदींत कांहीं कामासाठीं गेला असल्याचं त्यानें आम्हाला सांगितलं. सूर्यास्ताच्या पूर्वी ते परतले. आम्ही आमचे तंबू जवळच ठोकले. रात्रीं जेवणानंतर आमची बैठक भरली. फोर्ट लीव्हनवर्थ इथें एक दिवस राहून या सरहद्द विभागाला रामराम करायचा असं आम्हीं या बैठकींत ठरवलं. दूर अंतरावर सुकलेलं गवत पेटवलेलं होतं; त्याच्या तांबूस प्रकाशाच्या सान्निध्यांत आमची ही चर्चा चालली होती.



## ३ | लीव्हनवर्थचा किल्ला

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही लीव्हनवर्थकडे निघालों. कर्नल, आतां जनरल कीर्नी, मला पूर्वी सेंट ल्युई येथें भेटला होता. तो नुकताच आला होता. त्यानें आपल्या घरीं नेऊन आपल्या नेहमींच्या आतिथ्यशील वृत्तीनें आमचं स्वागत केलं. बरकंदाजांच्या दोन खोल्या सोडल्यास संरक्षणाचं असं कसलंच साधन नसल्यामुळें फोर्ट लीव्हनवर्थ हा नांवाचाच किल्ला उरला आहे. इथल्या शांततेवर युद्धाच्या बातमीचं एकदांहि आक्रमण झालेलं नाहीं. किल्ल्याच्या भोवतीं छोटं चौकोनी मैदान आहे. मैदानाच्या कडेनें बराकी आणि अधिकाऱ्यासाठीं घरं बांधलेलीं आहेत. या मैदानांतून माणसं येतांजातांना दिसत होतीं; कांहीं झाडांच्या बाजूला आराम करीत पहुडलीं होतीं. कांहीं आठवड्यांनंतर मात्र हें वातावरण बदललं. सरहद्द विभाग धुवून काढल्यासारखीं गोळा झालेलीं माणसं 'सांता फे'वर हल्ला करण्यासाठीं म्हणून आधीं इथें जमलीं.

शिबंदी ओलांडून आम्ही सहा मैलांवर असलेल्या किकॅपू खेड्याच्या दिशेनें निघालों. ज्या वाटेनें आम्ही निघालों होतों ती वाट कांहींशी शंकास्पद, अनिश्चित

होती असं म्हटलं तरी चालेल. या वाटेनें आम्ही निघालों आणि मिसुरीच्या कांठानें उभ्या असलेल्या कड्यांच्या रांगांत जाऊन पोहोचलों. डाव्या आणि उजव्या हाताला एकमेकांपासून पार वेगळीं अशीं निसर्गदृश्यं दिसत होतीं. डाव्या हाताला लाटालाटांनीं हेलावणारा, अधून मधून शिंपडल्यासारखे झाडांचे पुंजके असलेला, नदीकांठच्या विस्तीर्ण हिरव्यागार प्रदेशाला मिळणारा, क्षितिजाकडे वळतांना सूर्यप्रकाशांत न्हालेल्या झाडांचं जणु छत्र घेऊन उभा असलेला गवताळ प्रदेश दिसत होता. त्या ऋतूचा टवटवीतपणा आणि हवेंतलं मार्दव यांनीं त्या दृश्याला अधिकच कोवळीक आणली होती. उजव्या हाताला खरबरीत, तुटक अशी जंगलपट्टी होती. खालीं डोकावून पाहिलं तेव्हां आम्हाला झाडांचे माथे दिसले. कांहीं झाडं जितीं होतीं; तर कांहीं साफ कोळपलेलीं. कांहीं झाडं ताठ उभीं होतीं; तर कांहीं ठिकठिकाणीं वाकडींतिकडीं झालीं होतीं. कांहीं झाडं वादळाच्या तडाख्यानें खालीं कोसळून त्यांचा ढिगारा ढिगारा झाला होता. जंगलपट्टीच्या अगदीं टोकाला झाडांच्या फटींतून झेपावत जाणारा मिसुरी नदीचा गढूळ प्रवाह दिसत होता.

या वाटेनें आम्हीं पुढें त्या प्रदेशाच्या आंतल्या अंगाला जाऊन पोचलों. थोड्या वेळानें आम्हाला घरांचा एक पुंजका दिसला. उंचवट्यावर हीं घरं होतीं, आणि त्यांच्याभोवतीं बरींच माणसं गोळा झालेलीं दिसत होतीं. तीं घरं म्हणजे बिकापूच्या एका व्यापाऱ्याचीं कोठारं, तबेला, झोपड्या यांचा समूह होता. त्या क्षणीं त्या वस्तींतले जवळ जवळ अर्धे रेड इंडियन जणुं कांहीं त्या व्यापाऱ्यावर कोसळण्याच्या बेतांत होते! त्या रेड इंडियनांनीं आपलीं भिकार, दुर्लक्षित तट्टं कुंपणाला बांधलीं होतीं; त्यांच्यापैकीं कांहीं आजूबाजूला आरामांत पहुडले होते, आणि बाकीच्यांनीं त्या व्यापाऱ्याच्या दुकानाभोवतीं एकच गर्दी केली होती. लाल, हिरवा, पांढरा, काळा असे रंग त्यांनीं आपल्या तोंडावर थापले होते. रंगीत कापडाचे शर्ट, लाल आणि निळीं ब्लँकेटं, पितळेचीं कर्णभूषणं, शंखमण्यांच्या माळा यांची गर्दी आजूबाजूला दिसत होती.

निळ्या डोळ्यांच्या, मोकळ्या चेहऱ्याच्या त्या व्यापाऱ्याच्या वागण्या-बोलण्यांत सरहद्द विभागांत दिसतो तसला खडबडीतपणा जराहि दिसत नव्हता. आतां या क्षणीं मात्र त्यानें दुकानांतल्या पेट्या, गठ्ठे यांच्याभोवतीं गर्दी करणाऱ्या त्या रेड इंडियन गिऱ्हाइकांवर आपली धूर्त नजर ठेवली होती.


गांव इथून फार दूर नव्हतं, त्या दुर्दैवी आणि स्वतःचीच आबाळ करून घेतलेल्या लोकांची परिस्थिति कशी असेल हें त्या गांवावरून अगदीं सहज कळून येण्यासारखं होतं. या लोकांचीं घरं कशीं होतीं याची जर कांहीं कल्पना हवी असेल, तर डोळ्यांसमोर एक झरा आणा—दाट झाडीच्या दरींतून वेडींवाकडीं वळणं घेऊन जाणारा, कधीं पडलेल्या झाडांच्या आणि ओंडक्यांच्या गर्दीत अदृश्य होणारा, तर कधीं पसरत पसरत एखाद् रुंद, नितळ तळं करणारा : अशा या झऱ्याच्या कांठाकांठानें झाडांच्या कोपऱ्यांत कशीबशी जागा करून लाकडाच्या ओंडक्यांची भिकार घरं या रेड इंडियनांनीं बांधलेलीं होतीं; या घरांची कसलीहि काळजी न घेतल्यामुळें तीं अगदीं कळाहीन दिसत होतीं. चक्रव्यूहासारख्या दिसणाऱ्या वाटांनीं हीं घरं एकमेकांशीं जोडलीं गेलीं होतीं. वाटेंत कुठल्यातरी खेडुताच्या मालकीचं एखादं वासरूं, तट्टू, डुक्कर आम्हाला दिसे. ही खेडूत मंडळी आपल्या घरासमोर सूर्यप्रकाशांत बसलेली असत. आम्ही जातांना दिसलों कीं संशयी नजरेनें तीं आमच्याकडे पहात. इथून पुढें गेल्यानंतर पोटॅवॅटॉमिज् जमातीच्या झोपड्या आम्हीं पाहिल्या. किकॅपूंचे हे शेजारी. पण किकॅपूंपेक्षां त्यांच्या घरांची स्थिति खूपच बरी दिसली.

हवेंत खूपच उष्मा होता. भटकून भटकून आम्ही दमलों, आणि आमच्या व्यापारी मित्राच्या घराकडे परतलों. त्याच्या भोवतींची रेड इंडियन खेडुतांची गर्दी आतां ओसरली होती, आणि त्यामुळें त्याला उसंत मिळाली होती. व्यापाऱ्यानें आम्हाला आपल्या घरीं नेलं. पांढऱ्या आणि हिरव्या रंगाचं त्याचं घर जुन्या फ्रेंच वसाहतींतल्या घरांच्या धाटणीचं होतं. त्यानें आम्हाला आपल्या नीटनेटक्या सजवलेल्या बैठकीच्या खोलींत नेलं. खिडक्यांचे पडदे सोडलेले असल्यामुळें उन्हाची झळाळी डोळ्यांवर येत नव्हती. एखाद्या गुहेसारखी ती खोली थंडगार होती. जमिनीवर गालिचे अंथरलेले होते. सरहद्द विभागांत इतकं छान सजवलेलं घर असूं शकेल असं कुणालाहि वाटलं नसतं. कोच, खुर्च्या, टेबलं, पुस्तकांनी भरलेलं कपाट...अमेरिकेंतल्या कुठल्याहि घरांत शोभेल असंच तें सगळं सामान होतं. सरहद्द विभागांल्या संस्कृतीच्या कांहीं खुणा तिथें अर्थातच दिसत होत्या. शेल्फवर एक भरलेलं पिस्तूल होतं, आणि पुस्तकांच्या कपाटांत मिल्टनच्या ग्रंथावर ठेवलेल्या खंजिराची मूठ मिस्किलपणें चकाकत होती.

थोड्या वेळानें तो व्यापारी बाहेर गेला आणि येतांना ग्लासं, बर्फाचं पाणी,

त्या उष्म्यांत सुखकारक होईल अशी मद्याची बाटली बरोबर घेऊन आला. थोड्या वेळानें आनंदी, हसऱ्या चेहऱ्याची एक स्त्री खोलींत आली आणि तिनें पलिकडच्या खोलींत जेवणाची सर्व तयारी झाली असल्याचं आम्हांला सांगितलं. त्या स्त्रीकडे पहातांच मिश्र रक्ताच्या स्त्रीसौंदर्याचा अत्यंत आकर्षक असा नमुना ती वर्षा दोन वर्षांपूर्वी असली पाहिजे हें सहज कळत होतं. आमची ही यजमानीण अगदीं सुखासीन जीवन जगत असली पाहिजे. आयुष्यांतल्या कटकटी तिच्या वाट्याला येत नसाव्यात हें स्पष्ट दिसत होतं. आम्ही जेवतांना ती माशांची शिकार, किल्ल्यांतले अधिकारी इत्यादि विषयांवर गंमतीने बोलून आमचं मनोरंजन करीत होती. शेवटीं आम्ही तो व्यापारी आणि त्याची ही मैत्रीण यांची रजा घेतली. शिबंदीकडे परत निघालों.

शॉ आमच्या तंबूतळाकडे गेला. आणि मी कर्नल कीर्नीला भेटायला गेलों. कीर्नी अजून जेवतच होता. त्याच्या बाजूला, ज्या विक्षिप्त पोषाखांत आम्ही कॅप्टनला वेस्ट पोर्ट येथें पहिलं, त्याच पोषाखांत कॅप्टन बसला होता. सध्यां त्यानें तोंडांतला काळा पाइप् बाजूला काढून ठेवला होता. हातांतली टोपी हलवीत तो घोडदौडीची शर्यत आणि आपण केलेल्या गव्यांच्या शिकारी या विषयांवर बोलत होता. कॅप्टनच्या बाजूलाच 'आर्' बसला होता. कॅप्टनपेक्षां त्याचे कपडे चांगले, नीटनेटके होते. सुसंस्कृत जगांतल्या सुखोपभोगाच्या पदार्थांची अखेरची चव आम्ही तिथें घेतली; मद्याचे घुटके घेत या संस्कृतीचा निरोप घेतला. त्या निरोप घेण्याचं दुःख व्हावं इतकं तें मद्य झकास होतं. मग आम्ही घोड्यांवर बसून तंबूतळावर गेलों; उद्यांच्या प्रवासाची सर्व तयारी तिथें पूर्ण झाली होती.



# ४ | सरहद्दीला रामराम

आमच्या ब्रिटिश सहयात्रींनीं प्रवासाची जय्यत तयारी केली होती त्यांच्याकडे सहा खेचरं जोडलेला एक मोठा गाडा होता. या गाडयांत त्यांनीं सहा महिने पुरावी इतकी सामुग्री भरली होती. याखेरीज एका रेजिमेंटला पुरेल इतका दारूगोळा त्यांनीं बरोबर घेतला होता. याप्रमाणेंच अनेक जादा रायफली, पाखरं मारण्यासाठीं बंदुका, दोरखंड, घोडयांचे सरंजाम, वैयक्तिक सामान यांचाहि एक प्रचंड ढिगारा त्यांनीं सोबत घेतला होता. दुर्बिणी आणि छोटीं होकायंत्रं खांद्याला लटकावून त्यांनीं आपल्या पोषाखाच्या शोभेंतहि भर टाकली होती. घोडदळांतल्या शिलेदारांप्रमाणें त्यांनीं रतलाच्या सोळा गोळ्या बसतील एवढी दोन नळयांची रायफल खोगिराला अडकवली होती.

तेवीस मे रोजीं सूर्योदयाच्या वेळीं आम्ही आमची न्याहारी केली; तंबू मोकळे केले, घोडयांवर खोगीर चढवले, खेचरं गाडयांना जोडलीं आणि निघण्याची सर्व तयारी केली. “चल, ऊठ!” डेस्लॉरिअर्सनें आपल्या खेचराला आज्ञा दिली. आमच्या मित्राचा खेचरहाक्या राइट् यानेंहि दोनचार शिव्या उच्चारून, चाबकाचे आवाज करून आपल्या ताब्यांतल्या खेचरांना जमिनीवरून उठवून रांगेत उभं केलं. अशा रीतीनें आम्ही त्या सरहद्दीला रामराम केला.

आम्ही निघालों तो दिवस खरं म्हणजे अगदीं चांगला होता. परंतु माझ्या आणि शॉच्या मनांत आशंका निर्माण होत होत्या; आणि परिणामीं त्या

खऱ्याहि ठरल्या. कोणत्या वाटेनें जायचं हें ‘आर ’नें आमचा सल्ला न घेतां ठरवलं होतं; ही वाट आमच्यापैकीं एकालाहि ठाऊक नव्हती. अर्थातच, या वाटेनें पुढें जाण्याचा वेडगळपणा आमच्या लवकरच प्रत्ययाला आला. गेल्या उन्हाळ्यांत कर्नल कीर्नीच्या नेतृत्वाखालीं घोडदळाच्या तुकड्या फोर्ट लॅरामी येथें गेल्या होत्या. या तुकड्या गेल्या त्या वाटेनें पुढें जाऊन ‘ प्लाट ’ जवळ ज्या वाटेनें सगळे स्थलांतरित प्रवासी ऑरेगॉनला निघाले त्या वाटेला मिळायचं अशी ‘ आर ’ची योजना होती. तास दोन तास प्रवास केल्यानंतर एका उंच टेकडीवर ओळखीच्या घरांचा एक पुंजका आम्हाला दिसला. “ हॅलो, तुम्ही कुठें निघालांत ? ” किकॅपूचा तो व्यापारी कुंपणापलिकडून ओरडला. कांहीं ठाशीव उद्‌गारवाचकें आमच्यापैकीं कांहीं जणांच्या तोंडून बाहेर पडलीं; परंतु लवकरच आम्हाला कळलं कीं वाट चुकून आम्ही बरेच मैल पुढें आलों होतो आणि रॉकी पर्वतांच्या दिशेनें एक इंचहि आमची प्रगति झाली नव्हती. शेवटीं त्या व्यापाऱ्यानें सांगितलेल्या दिशेनें सूर्यावरून अंदाज घेत, गवताळ प्रदेशाच्या आडव्या अंगानें सरळ रेषेंत निघालों. झाडांच्या गर्दीतून वाट काढीत ओढेनाले तुडवीत आम्ही चाललों होतों. हिरव्यागार पाचूसारखी मैलोंगणती पसरलेली गवताळ प्रदेशाची भूमि आम्ही ओलांडली ‘मॅझेपा ’नें कवितेंत जशी निर्मनुष्य भूमीची वाटचाल केली :

*नच मनुष्य अथवा आला नाहीं प्राणी*
*नच टाप उमटली, पाउल पडलें नाहीं*
*पसरली भूमि समृद्ध दूरवर पाही*
*नच खूण श्रमांची किंवा स्पर्श जराही*
*अन् स्तब्ध स्तब्ध ही हवाहि मौन्यावाणी*

तशीच आमचीहि वाटचाल चालली होती.

आम्ही इतरांच्या जरा पुढें झालों, आणि असंच एक मैदान ओलांडलं. आम्ही मागें वळून पाहिलं तेव्हां विखुरलेल्या घोडेस्वारांची मैलभर रांग आम्हाला दिसली. त्यांच्या मागें, अगदीं क्षितिजाकडे, पांढऱ्या गाड्यांचीहि रांग संथपणें सरकतांना दिसत होती. “शेवटीं आले एकदांचे.” कॅप्टन ओरडला. आणि खरोखरीच आम्हाला घोड्यांच्या टापा उमटलेली वाट लागली. आम्ही मोठ्या आनंदानें वळून या नव्या रस्त्याला लागलों. आतां आमच्या

मनोवृत्ति कांहींशा बदलल्या होत्या. सूर्यास्ताच्या सुमारास एका उंच हेलावत्या गवताळ मैदानाच्या जवळ आम्ही आमचा तळ ठोकला. मैदानाच्या पायाशींच एक झरा वहात होता : दाट माजलेल्या गवतांत तो झरा बराचसा विरला होता.

अंधार पडूं लागला. आम्ही आमचे घोडे चरायला मोकळे सोडले. "तात्बडतोब तंबू ठोका—चांगले जोरांत ठोका. वादळाचा रंग दिसतो आहे." हेन्री शॅटिलॉं म्हणाला. त्याप्रमाणें आम्हीं केलं; तंबू जमिनींत जितके मजबूत ठोकतां येतील तेवढे ठोकले : कारण आकाशाचा रंग आतां पालटला होता, आणि वाऱ्यांत भरलेला ओलसर दमट वास वादळी पावसाची सूचना देत होता. हेलावणाऱ्या गवताळ मैदानांनींहि नवं रूप धारण केलं होतं : त्यांचा हेलावणारा विस्तार काळ्या ढगांच्या छायांनीं झांकोळून गेला होता. थोडयाच वेळांत कांहीं अंतरावरून वादळाची गुरगुर ऐकूं येऊं लागली. चरायला सोडलेले आमचे घोडे आम्ही पकडले आणि त्याच्या पुढच्या पायांना दोरी बांधली. मग आम्ही तंबूत आलों आणि आंत आसऱ्याला बसून बाहेर चाललेली कॅप्टनची धडपड पाहूं लागलों. पावसाशीं झगडत, टांगा टाकीत तो घोडयांच्या आसपास फिरत होता. आपले हे घोडे पळून जातील का ? वादळांत त्यांना कांहीं अपघात तर होणार नाहीं ना ? अशा काळजीचं ओझं त्याच्या मनावर होतं. मैदानाच्या एका बाजूनें तीन लांडगे पुढें सरकत होते. आपल्या घोडयांवरील त्यांच्या संभाव्य आक्रमणाची भीति जाणवून कॅप्टननें एक नजर त्यांच्यावर ठेवली होती.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही मैल दोन मैल पुढें गेलों. आम्हाला वाटेंत एक मोठी जंगलपट्टी लागली. या जंगलांतून एक मोटा ओढा वहात होता. त्याच्या आसपास खूप चिखल असून एकूण हें प्रकरण धोक्याचं आहे ही गोष्ट त्याच्याकडे पहातांच कळत होती. डेस्लॉरिअर्स आपली गाडी हांकीत सर्वांच्या पुढें गेला होता. चाबूक हाणीत, शिव्यांची फैर झाडीत, तोंडांतला पाइप खालींवर करीत तो खेचरांना पुढें हांकीत होता. गाडी पाण्यांत उतरली खरी, पण अर्ध्यावर जातांच चिखलांत अडकून पडली. तो गाडीवरून उतरला आणि गुडघाभर पाण्यांत उभा राहिला. शिव्या आणि चाबूक यांचा उपयोग करून त्यानें त्या खेचरांना दलदलीबाहेर काढलं. मागून आमच्या मित्रांचा जड गाडा आला, पण तो पाण्यांत न उतरतां कांठावरच उभा राहिला.

त्या दलदलीविषयीं विचार करीत असलेला कॅप्टन म्हणाला, "माझा सल्ला असा आहे कीं—"

"हांका पुढें!" 'आर्' एकदम ओरडला.

परंतु खेचरहांक्या राइटनें या परिस्थितींत काय करावं याचा निर्णय आपल्या मनाशीं घेतला नसल्यामुळें तो विचार करीत, शीळ वाजवीत तसाच गाडीवर बसून राहिला.

पुन्हा कॅप्टननें सुरवात केली, "माझा असा सल्ला आहे कीं, गाड्यांतलं सामान आपण खालीं उतरून ठेवूं. मी पांच पौंडांची पैज मारायला तयार आहें : जर गाडा असाच पाण्यांत घातला, तर तो चिखलांत रुतून बसेल."

"देवाच्यान्, आपण अडकून पडूं" कॅप्टनच्याच मताचा त्याच्या भावानें आत्मविश्वासपूर्वक मान हलवीत पुनरुच्चार केला.

"पुढें हाका, पुढें—हाका" रुष्ट स्वरांत 'आर्' पुन्हा ओरडला.

उत्तरप्रत्युत्तराचा हा खेळ पहात आम्ही बाजूला बसलों होतों. आमच्याकडे वळून कॅप्टन म्हणाला, मी फक्त माझा सल्ला देऊं शकेन, पण लोकांना जर तो ऐकायचाच नसेल तर त्यांना नको ऐकूं देत; यापेक्षां मीं काय म्हणणार!"

मध्यंतरीच्या काळांत राईटनें आपला निर्णय घेतला होता. त्यानें खेचरावर शिव्याशापांचा वर्षाव करायला सुरवात केली. फटाक्यानंतर तोफांचा गडगडाट व्हावा त्याप्रमाणें डेस्लारिअर्सच्या चिडचिडण्यानंतर राईटची आरडाओरड आम्हाला जाणवली. शिव्याशापांचा वर्षाव करीत असतानांच राइट खेचरावर गुद्यांचाहि वर्षाव करीत होता. गुद्दे मिळाल्यानंतर तीं खेचरं चिखलांत शिरलीं. आणि आपल्यामागून गाडा अवजडपणें ओढूं लागलीं. कांहीं क्षण एकूण सगळंच प्रकरण संशयास्पद होतं. राइटचं शिव्या घालणं सारखं चालूच होतं; परंतु अर्ध्या चिखलांत शिरलेल्या खेचरांवर विसंबून रहाणं कसं शक्य होतं?

आणीबाणीच्या क्षणीं—जेव्हां सगळे प्रयत्न एकवट व्हायला पाहिजे होते तेव्हांच त्या मूर्ख खेचरांचं डोकं फिरलं आणि तीं एकच गोंधळ करून पुढच्या कांठावर जाऊन उभीं राहिलीं. अर्ध्या चाकापर्यंत बुडालेला गाडा होता चिखलांतच. आतां एकच उपाय उरला होता, तो म्हणजे गाड्यांतलं सगळं सामान उतरून घेणं, त्यानंतर फावडं घेऊन चाकाभोंवतीचा चिखल उपसणं, आणि गाड्याच्या पुढें झुडपं—फांद्या तोडून टाकून वरून जाण्याकरितां एक छोटासा पूल तयार करणं. हे 'सुखपूर्ण' श्रम केल्यानंतर गाडा एकदाचा

चिखलांतून बाहेर निघाला. दर पंधरा दिवसांनीं दिवसांतून चारपांच वेळां तरी आमच्यावर हा प्रसंग येई. प्लाटकडे जाण्याचा आमचा मार्ग असल्या संकटांशिवाय कधींच सुना गेला नाहीं.

आम्ही सहा सात मैल पुढें प्रवास केला आणि दुपारीं एका ओढ्याच्या कांठीं विश्रांति घेण्यासाठीं म्हणून तळ ठोकला. परत निघायची वेळ झाली तेव्हां आधीं कांहीं वेळ आम्हीं आमच्या घोड्यांना पाणी प्यायला सोडलं. माझा घोडा पॉन्टीॲक कंटाळला होता. घरच्या आठवणीनें तो व्याकुळ झाला होता! क्षणार्धांत तो उधळला, आणि वस्तीच्या दिशेनें धावत सुटला. मीं माझ्या दुसऱ्या घोड्यावर स्वार झालों आणि पॉन्टीॲकचा पाठलाग सुरू केला. त्याला वळसा घालून मी किंचित् त्याच्यापुढें गेलों. हेतु हा कीं, त्याला तसाच हाकीत हाकीत आमच्या तंबूतळापर्यंत आणावा. परंतु मला पहातांच तो पुन्हा उधळला. गवताळ माळावर बराच हुंदडला आणि नंतर पुन्हा आम्ही दोघे जवळ आलों. असं हें अनेक वेळां झालं. मी जवळ आलों रे आलों कीं पॉन्टीॲक् उधळायचा. पॉन्टीॲक् गवताळ प्रदेशांतल्या आयुष्याला कंटाळला होता हें उघड होतं. तेव्हां मीं माझी ही पद्धत सोडली; आणि त्याच्यामागून हळूच माझा घोडा नेला. घोडा जवळ नेऊन पॅन्टीॲक्च्या गळ्यांत बांधलेला दोर पकडावा असा माझा बेत होता.

असा हा गमतीचा पाठलाग चालला होता. मैलांमागून मैल मीं त्याच्या मागें चाललो होतों. माझ्या येण्यामुळें तो हरामखोर दचकूं नये याची मी शक्य तेवढी काळजी घेत होतों. एकदा तर मीं त्याच्या इतका जवळ गेलों कीं, मीं ज्याच्यावर बसलों होतों त्या घोड्याचं नाक पॉन्टीॲक्च्या शेपटीला घासून गेलं. या क्षणीं मीं लगाम न ओढतां एका बाजूनें किंचित् घसरुन खालीं उतरलों. परंतु दुर्दैवानें खोगिराला माझी रायफल किंचित् आपटली. तिचा जो थोडासा आवाज झाला तेवढा पॉन्टीॲक्ला पुरला. त्यानें आपले कान हलवले आणि तो चौखूर उधळला. मीं पुन्हा घोडयावर स्वार झालों आणि पॉन्टीॲकला उद्देशून म्हणालों, "माझ्या मित्रा, आतां तूं पुन्हा असं कर म्हणजे मी तुला गोळी घातली म्हणून समज!"

लिव्हनवर्थचा किल्ला आतां जवळ जवळ चाळीस मैलांच्या अंतरावर आला होता. मी तिथपर्यंत घोड्याचा पाठलाग करायचा असं ठरवलं. एकल्यानं जेवणाशिवाय रात्र घालवायची आणि पुन्हा सकाळ झाल्यानंतर पाठलागावर

निघायचं असं मीं ठरवलं होतं. एकच आशा मला होती कीं, पॉन्टीअॅकला तहान लागेल आणि ज्या ओढ्यांत आमचा गाडा रुतला होता तिथें तो पाणी प्यायला जाईल. तो दचकणार नाहीं इतक्या बेतानें मीं त्याच्या जवळपास रहात असे. शेवटीं, मीं म्हटलं होतं तसंच झालं. धावून धावून पॉन्टीअॅकला तहान लागली, आणि तो ओढ्याकांठीं पाणी प्यायला आला. मी हळूच माझ्या घोड्यावरून खालीं उतरलों. माझ्या घोड्याला ओढीत ओढीत मी चिखलांतून पुढें नेला. विलक्षण समाधानाच्या भावनेनें मी पुढें झालों, आणि पॉन्टीअॅकच्या गळ्याला बांधलेल्या दोरीचं टोक मीं पकडलं. त्या दोरीचे चांगले तीन वळसे मी माझ्या हाताला गुंडाळून घेतले आणि माझ्या पहिल्या घोड्यावर स्वार होतांना मी म्हणालों, "आतां पुन्हा कसा पळून जातोस तें पहातों" परंतु पुन्हा माझ्याबरोबर परत यायला पॉन्टीअॅकचं मनच घेत नव्हतं. मीं तंबूतळाकडे वळलों आहे हें लक्षांत येतांच ज्या घोड्यावर मीं बसलों होतों तो घोडाहि आपली अस्वस्थता व्यक्त करूं लागला. त्याच्यावर बसून मी निघालों तेव्हां या खडतर जीवनापासून आपण मुक्त होणार अशी खोटी आशा त्यानें मनाशीं बाळगली असावी. मी त्याला तंबूतळाच्या दिशेनें वळवतांच तो विमनस्क झाला. परंतु विमनस्कतेच्या या क्षणींच चाबकाचा एक उत्तम फटका लगावून मीं त्याची प्रसन्न वृत्ती पुन्हा जागी केली; आणि पॉन्टीअॅकला मागे ओढीत नेत नेत मी तंबूतळ शोधीत निघालों.

तास दोन तास भटकल्यानंतर सूर्यास्ताच्या वेळीं जंगलपट्टीच्या पलीकडे गवताळ माळाच्या एका उंचवट्यावर मला आमचे तंबू दिसले. आमचे घोडे जवळपास चरत होते. जॅक 'सी' पायांची फुली घालून दोर वळीत बसला होता आणि बाकीचे गवतावर धूम्रपान करीत, गप्पा मारीत पहुडले होते. त्या रात्रीं लांडग्यांनीं आपलीं प्रेमगीतें आम्हांला ऐकवलीं. यापूर्वीं त्यांनीं आम्हांला ऐकवलेल्या गीतांहून या वेळचीं हीं गाणीं कितीतरी अधिक सजीव होतीं. सकाळ झाली तेव्हां कांही गज अंतरावर या संगीतकारांपैकीं एक आमच्या घोड्यांच्या जवळ बसलेला दिसला. आपल्या तांबूस पांढऱ्या डोळ्यांनीं तो आमच्याकडे पहात होता. परंतु आपल्यावर बंदूक रोखली गेली आहे हें ध्यानांत येतांच विलक्षण वेगानें उडी मारून तो पळाला.

यानंतरच्या दोन दिवसांत विशेष कांहीं घडलं नाहीं, आणि म्हणूनच तें वर्णन करीत मी बसत नाहीं. गवताळ प्रदेशाकडे जायला प्लाट नदीवरून

जाणारा मार्ग हाच सर्वांत उत्तम. या मार्गानें तिथें जाण्याची इच्छा माझ्या वाचकांपैकीं जर कोणास झाली तर त्यांनीं आपल्या कल्पनेंत रंगवलेलं स्वर्गाचं चित्र त्याला चटकन् आढळेल असं समजण्याची चूक मुळींच करूं नये हें मी आधीं सुचवून ठेवतों. या प्रवासाचा प्रारंभ अगदींच शुष्क असतो. सरहद्द ओलांडून बराच कंटाळवाणा प्रवास यानंतर करावा लागतो. इतकं सगळं केल्यानंतर जिथें गवे आणि रेड इंडियन यांची वस्ती आहे, आणि जिथून सुशिक्षितांचं जग शेंकडों मैल दूर राहिलं आहे अशा गवताळ प्रदेशाच्या आसपास तो पोहोचतो.

सरहद्द ओलांडल्यावर प्रत्यक्ष या प्रदेशाजवळ जाईपर्यंत दरम्यान शेंकडो मैल पसरलेला सुपीक प्रदेश लागतो. सर्वसामान्य माणसानं गवताळ प्रदेशाविषयीं जीं चित्रं मनाशीं रंगविलेलीं असतात त्यांच्या जवळपास हा प्रदेश येतो. आणि त्यांचं कांहींसं समाधानही होतं. अशा या प्रवाशाची नजर जर चित्रकाराची असेल, तर हा प्रारंभीचा काल त्याच्या दृष्टीनं फुकट जात नाहीं हें खरं कारण या प्रदेशांतील निसर्ग. चित्र असाधारण वेगळं जरी नसलं तरी मोठं रेखीव आणि वृत्ती प्रसन्न करणारं आहे. डोळ्यांत मावणार नाहींत असे विस्तीर्ण माळ इथं पसरले आहेत. हिरव्या समुद्रावर लाटा याव्या तसं हें दृश्य दिसतं. अनेक झरे इथं वहात असतात. आणि वेडींवांकडीं वळणं घेत घेत जाणाऱ्या या झऱ्यांच्या कांठांशीं झाडांच्या रांगा आपल्याला दिसतात. निसर्गाचं हें लावण्य पहाण्यापलीकडे आणखी जर त्याचा उत्साह असेल तर मात्र त्याच्यावर पाणी पडल्याखेरीज राहणार नाहीं हें त्यानं निश्चित समजून असावं. कारण असं कीं, ठिकठिकाणीं लागणाऱ्या चिखलांत त्याच्या गाड्यांचीं चाकं रुतून बसणार, त्याचे घोडे उधळणार, चाकांचा कणा कुरकुरूं लागणार; त्याला नरम बिछाना मिळेल,—पण अर्थातच तो चिखलाचा. खाणं म्हणाल तर बिस्किट, आणि बरोबर घेतलेलं खारावलेलं मांस यावरच त्याला भागवावं लागेल. आश्चर्य वाटेल, पण या सगळ्या पट्ट्यांत शिकारीसाठीं जनावरं जवळ जवळ नाहींतच म्हटलं तरी चालेल. प्रवासी जसजसा पुढें जातो तसतशीं त्याला वाटेंत सडत पडलेलीं सांबरशिंगं, आणि गव्यांच्या पांढऱ्या कवट्या ठिकठिकाणीं दिसतात. एके काळीं हीं जनावरं इथें विपुल असलीं पाहिजेत. परंतु सध्यां मात्र त्यांच्या सांगाड्याशिवाय इथं कांहीं दिसत नाहीं. आमच्याप्रमाणेंच एखाद्यानें पंधरा दिवस इथं सतत प्रवास केला

तर एखाद्या हरणाच्या उमटलेल्या खुरांखेरीज त्याला कांहीं दिसणार नाहीं. वसंतऋतूंत एकादं रानकोंबडंसुद्धां दिसणं केवळ अशक्य आहे.

शिकारीसाठीं जरी त्याला जनावरं मिळालीं नाहींत तरी त्यांची जागा इतर तापदायक जनावरांनीं मात्र घेतलेली त्याला दिसेल. रात्र पडली कीं, लांडगे आपल्या संगीतसभेनें त्याचं मनोरंजन करतील; आणि दिवसा लपतछपत त्याच्याभोंवतीं घोटाळत असतील—अर्थात्च रायफलचा नेम हुकेल इतक्या अंतरावरच. चालतां चालतां घोड्यांचे पाय तरसांच्या बिळांत रुततील. चिखलाचं एखादं डबकं लागलं कीं नाना आकारांचे आणि रंगाचे शेंकडों बेडूक एकच कल्लोळ माजवतील. त्याच्या घोड्याच्या पायांखालून सापांचं चलनवलन सुरू होईल किंवा त्यांतला एकादा सर्पराज रात्रीं त्याच्या तंबूंत त्याला भेट द्यायला येईल. झोपायला म्हणून जर त्यानं डोळे मिटले तर असंख्य डांस भुणभुण करून त्याच्या डोळ्यांतली झोप हद्दपार करतील. भाजून काढणाऱ्या उन्हांत वणवण करून तहानेनं त्याचा घसा जर कोरडा झाला आणि तो पाणी पिण्यासाठीं म्हणून एकाद्या तळ्याकाठीं आला तर त्यानं भरून घेतलेल्या पेल्यांत ल्हान-ल्हान बेडकुळ्यांचा ताफा त्याला तरंगतांना दिसेल. सबंध दिवस सूर्य तर भाजून काढीत असतोच, परंतु संध्याकाळचे चार वाजले म्हणजे न चुकतां वादळी पाऊस येईल आणि त्याला चिंब भिजवून टाकील.

बराच वेळ प्रवास केल्यावर एके दिवशीं सकाळीं आम्हीं एका माळावर विश्रांति घेण्यासाठीं म्हणून तळ ठोकला. दुपारची वेळ होती. आजूबाजूला एकही झाड दिसत नव्हतं. जवळच एक ल्हानसा झरा मात्र वेडींवाकडीं वळणं घेत एका घळींतून वहात होता. मध्येंच तो झरा एखाद्या छोट्या निश्चल डबक्याचं रूप घेई, नंतर तो घसरत घसरत माजलेल्या गवतांतून आणि निःसत्त्व भासणाऱ्या झुडपांतून चिखलांत शिरे. अशा वेळीं त्या झऱ्याचा प्रवाह आहे कीं नाहीं याचा संशय यावा इतका तो क्षीण दिसे. त्या दिवशीं ऊन भयंकर तापलं होतं. गारवा भासावा म्हणून घोडे आणि खेचरं गवतावर गडबडा लोळत होतीं. कांहीं घोडे घळींत उगवलेल्या छोट्या झुडपांशीं चरत होते.

आम्हीं जेवणं उरकलीं. डेस्लॉरिअर्स तोंडांत पाईप घेऊन धूर सोडीत सोडीत थाळ्या धूत होता. "आतां घोडे पकडा" या आरोळीची वाट पहात शॉ गाड्याच्या खालीं सावलींत विसावला होता. हेन्री शॅटीलॉं विश्रांतिसाठीं जागा शोधीत होता. अशी जागा शोधण्यापूर्वी सापांचीं बिळं कुठं आहेत किंवा काय

याचा शोध घेणं हा त्याचा ठरलेला उद्योग असे. सजीव प्राण्यांत सापाखेरीज इतर कशालाही तो भीत नसे. एखादं संशय यावं असं बीळ दिसलं कीं शिव्या-शापांची तो फैर झाडी. सावलीच्या एका छोट्याशा तुकड्यांत मी चाकाला टेंकून घोड्याच्या पुढच्या पायाला बांधण्याचा पायबंध तयार करीत होतों. माझा उर्मट घोडा पॉंटीॲक यानें आदल्याच रात्रीं आपला पायबंध तोडून टाकल्यामुळें त्याच्यासाठीं मी नव्यानें या उद्योगाला लागलों होतों. गज दोन गज अंतरावर आमच्या मित्रांनीं तळ ठोकलेला होता. तिथेंही शांतताच होती.

सापांच्या बिळांचं संशोधन करतां करतां हेन्री मध्येंच म्हणाला, "हा पहा कॅप्टन आला."

कॅप्टन आमच्याजवळ आला आणि क्षणभर आमच्याविषयीं विचार करीत न बोलतां उभा राहिला. थोड्या वेळानं तो म्हणाला, "दोस्त, त्या शॉकडे पहा तरी, गाड्याखालीं तो झोपलाय् आणि चाकांच्या तुंब्याला लावलेलं डांबर त्याच्या खांद्यावर टपकतंय्," शॉनं हे शब्द ऐकले. अर्धवट उघड्या डोळ्यांनी तो उठला. आपल्या एका हातानं त्यानं खांदा चांचपून पाहिला, तेव्हां त्याचा हात खांद्यावर पडलेल्या डांबराला चिकटला.

खंवचटपणानें हंसत कॅप्टन म्हणाला, "रेड इंडियन वायांत मिसळला कीं शॉ आतां चांगला खुलून दिसेल नाहीं?" मग कॅप्टन स्वतः गाड्याखालीं गेला आणि पडल्यापडल्या गंमतीच्या गोष्टी सांगूं लागला. अशा चवदार गोष्टींचा न संपणारा सांठा त्याच्याकडे होता. गोष्टी सांगत असतांना मात्र अधूनमधून बावरलेली नजर तो घोड्याकडे टाकीत असे. इतक्यांत मध्येंच त्यानं एकदम बाहेर उडी टाकली, आणि तो म्हणाला, "तो पहा, घोडा दिसतोय का? त्या तिकडे—त्या टेकडीच्या माथ्यावर. मी नक्की सांगतों तो आपल्यापैकीं नक्की कोणाचा तरी पळून गेलेला घोडा आहे. अगदी गळ्याच्यान्. मला वाटतं शॉ, तो तुझाच घोडा आहे; नाहीं नाहीं, तो जॅकचाच घोडा आहे असं मला वाटतं. जॅक, ए जॅक, ऐकतोयूस ना?" कॅप्टनचे शब्द ऐकतांच जॅक टुणकन् उडी मारून उभा राहिला आणि शून्य नजरेनं आमच्याकडे पाहूं लागला. कॅप्टन त्याच्याकडे पाहून ओरडला. "जा, घोडा घालवून बसायचं नसेल तर धांवत जा आणि पकडून आण त्याला." जॅक गवतांतून धांवत सुटला. तो धांवतांना पायाकडे रुंद असलेली त्याची विजार फडफडूं लागली. जॅक त्या टेकडीवर जाऊन आपला घोडा धरीपर्यंत कॅप्टन त्याच्याकडे काळजीच्या नजरेनं पहात होता. जॅकनें घोडा

पकडला तेव्हां कॅप्टन खालीं बसला. त्याच्या चेहऱ्यावर याक्षणीं काळजीची, विचारमग्नतेची छाया दिसत होती.

कॅप्टन म्हणाला, "मी आतां काय होणार आहे तें सांगतों तुम्हांला. आपलं जें सध्यां चाललं आहे, त्यामुळें आपण अडचणींत येणार. आपल्या घोड्यांपैकीं एक एक घोडा अशा रीतीनें नाहींसा झाल्यानंतर शेवटीं आपले काय हाल होतील हें सांगायला नकोच. माझी खात्री झाली आहे कीं आपल्यापैकीं प्रत्येकानें पाळीपाळीनें घोड्यावर पहारा करण्याचं काम केल्याखेरीज आपलं भागणार नाहीं. असं समजा कीं, शंभर पॉनी जमातींतले रेड इंडियन त्या समोरच्या घळींतून त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने किंकाळ्या फोडत आले. असं जर झालं, तर दोन मिनिटांच्या आंत घोड्याची एक टापहि आपल्या नजरेस पडणार नाहीं." कॅप्टन असं बोलतांच आम्हीं त्याला सांगितलं कीं, शंभर रेड इंडियन जर चाल करून आले तर घोड्यावर पहारा करणारा मनुष्य त्यांचा लुटारू हल्ला कसा काय थोपवूं शकणार?

आम्हीं सुचविलेल्या या मुद्द्याला बगल देत कॅप्टन पुढें म्हणाला, "तें कांहींही असो, आपली ही सगळी पद्धतच चूक आहे. माझी खात्री झाली आहे. मिलिटरींतल्या लोकांना हें शोभतच नाहीं. आपण प्रवास तरी कसा करतों पहा ना. आपल्यापैकीं आघाडीवर असलेल्या माणसावर जर कोणी हल्ला केला तर पिछाडीचे लोक त्याला मदत करण्यापूर्वींच तो हल्ल्याला बळी पडलेला असणार."

शॉ म्हणाला, "हें पहा, अजून तरी आपण शत्रूंच्या प्रदेशांत आलेलों नाहीं. त्यांचा धाक सुरू झाला म्हणजे मग आपण सगळे एकत्र प्रवास करूं, म्हणजे झालं."

कॅप्टन म्हणाला, "पण समजा, आपल्या तळावरच शत्रूंनीं हल्ला केला तर पहारा करायला आपल्याकडे कोणीच नाहीं. अचानक हल्ला आला तर त्याआधीं आपल्याला सावध कोण करणार? तेव्हां मला असं वाटतं कीं, आपल्यापैकीं प्रत्येकानें रात्रीच्या वेळीं टेहेळणीचं काम केलं पाहिजे. आणि शत्रू जर अचानक येतो आहे असं दिसलं तर त्याची वर्दी दिली पाहिजे. आपली तळ ठोकण्याची जागासुद्धां थोड्याशा सखल चौकोनांत असावी. मध्यभागीं धुनी पेटवून ठेवावी आणि परवलीचा शब्द दिल्याखेरीज पहारेकऱ्यानं कोणालाही आंत सोडूं नये. माझं असं ठाम मत आहे. माझीं

मतं कुणावरही लादणं मला आवडत नाहीं. माझी सर्व बुद्धि वापरून मी सल्ला देतों. लोकांनीं तो हवा तर ऐकावा. माझी कसलीच सक्ति नाहीं."

पहारा ठेवण्याची ही योजना कॅप्टनला विशेष जिव्हाळ्याची वाटत होती. परंतु कोणीच त्याच्याकडे लक्ष देईना तेव्हां घोडा घेऊन टेहेळणी करण्यासाठीं आपण सर्वांपुढें जायचं असं त्यानं ठरवलं. मला तो म्हणाला, "मी हें असं ठरवलंय, तूं येणार का माझ्यावरोबर?"

आम्हीं दोघं बरोबर निघालों आणि इतरांपुढें मैल दोन मैल गेलों. ब्रिटिश सैन्यांत कॅप्टनचीं २० वर्षं गेलीं होतीं. जीवनाचें अनेकविध अनुभव त्यानं घेतले होते. त्याचा स्वभावही मोठा दिलखुलास होता. त्यामुळें त्याच्या सहवासांत माझा वेळ मोठा छान जाऊं लागला. तो विनोद करी. तास दोन तास गप्पा रंगवी. आम्ही अशा तऱ्हेनें प्रवास करीत होतों. कांहीं वेळानं आम्हीं मागें वळून पाहिलं. क्षितिजापर्यंत गवताळ माळ पसरला होता. चुकूनही एखादी गाडी किंवा घोडेस्वार नजरेला पडत नव्हता.

कॅप्टन म्हणाला, "आतां इतर लोक इथं येईपर्यंत टेहेळ्यांनीं थांबावं हेंच बरं." माझंही तसंच मत होतं. बाजूलाच एक झरा वहात होता, आणि त्याकाठीं दाट झाडी होती. झरा ओलांडून आम्ही पलीकडे गेलों तेव्हां आम्हांला झाडांनीं अर्धवर्तुळाकार वेढलेलं सपाट कुरण लागलं. आम्हीं आमचे घोडे झाडाला बांधले आणि गवतावर बसलों. माझ्याकडे सरहद्द विभागांत तयार झालेली एक रायफल होती. कॅप्टनकडे परदेशी घडणीची रायफल होती. त्याच्यापेक्षां माझी देशी बंदूक कशी चांगली आहे हें मी समोर असलेल्या झाडाच्या एका जुनाट खुंटावर नेम धरून दाखवूं लागलों. आमचा हा असा खेळ चालू असतांनाच आमच्या कानीं माणसांची गजबज आली. कॅप्टन म्हणाला, "मंडळी येऊन पोंचली. आतां ओढा ओलांडून ते इथें कसे येतात तें आपण पाहूंया." आम्ही घोड्यावर स्वार झालों आणि ओढ्याच्या कांठाशीं उभे राहिलों. दाट झाडी असलेल्या एका खोल घळींतून तो ओढा वहात होता. आम्हीं खालीं पाहिलं तेव्हां गोंधळलेल्या घोडेस्वारांची तुकडी पाण्यांतून येतांना आम्हांला दिसली. आमच्या या लोकांच्या मळलेल्या कपड्यांत घोडदळांतल्या चार सैनिकांचें गणवेष उठून दिसत होते.

घोड्याला चाबकानें हाणीत शॉ इतरांच्या पुढें आला. त्याचा चेहरा संत्रस्त दिसत होता. त्यानें प्रथम पिछाडीवरून ओशाळल्या चेहऱ्यानें येणाऱ्या

'आर'ला सणसणीत शिवी घातली. 'आर'च्याच शहाणपणामुळें आम्ही वाट चुकून 'आयोवा' जमातींतल्या रेड इंडियनांच्या वस्तीकडे जात होतों. 'प्लाट'वरून जाणारी वाट राहिली होती भलतीकडेच. लिव्हनवर्थवरून घोडदळांतले चार सैनिक पळून चालले होते. ते आम्हांला वाटेंत भेटले, आणि म्हणूनच वाट चुकल्याचं आम्हांला कळलं. त्या चार सैनिकांनीं आम्हांला सल्ला दिला कीं ऑरेगॉनला निघालेल्या लोकांचा तांडा ज्या वाटेनं गेला त्याच वाटेनं आम्हीं जावं. ऑरेगॉनला निघालेले हे लोक त्यावर्षी मिसुरी राज्यांतील सेंट जोसेफ या ठिकाणाकडून निघाले होते.

आम्ही सगळेच अतिशय चिडलेले होतों. कांहीं काळ त्या दुर्दैवी जागेवर आम्हीं आमचा तळ ठोकला. ते चार घोडेस्वार अर्थातच थांबले नाहींत. कारण त्यांना वेळ गमावून चाललंच नसतं. दुसऱ्या दिवशीं सेंट जोसेफचे लोक जिथून गेले होते त्या मार्गानं आम्हीं लारामीच्या किल्ल्याकडे जायला निघालों. पश्चिमेकडे लारामीचा किल्ला दोनशें मैलांच्या अंतरावर होता.



## ५ | नील नदी

ऑरेगॉन आणि कॅलिफोर्निया येथें निघालेल्या लोकांनीं इंडिपेंडन्स या गांवाच्या आसपास आपले तळ ठोकले होते. नाना तऱ्हांचे हे लोक होते. सेंट जोसेफकडून उत्तरेच्या दिशेनें आणखीहि कांहीं लोकांचें तांडे निघाले असल्याची बातमी त्यांच्या कानीं आली. हे लोक मॉर्मन संप्रदायाचे असून त्यांची संख्या २३०० आहे अशी जेव्हां बातमी आली तेव्हां या सगळ्या मंडळींत घबराटीचं वातावरण पसरलं. इथं आधीं तळ ठोकून राहिलेल्या या लोकांपैकीं बहुतेक लोक

इलिनॉय आणि मिसुरी राज्यांतील होते. हे लोक आणि मॉर्मन संप्रदायाचे लोक यांचा छत्तिसाचा आंकडा. पुष्कळ वेळां भर वस्तींतसुद्धां त्यांच्या भांडणांचं पर्यवसान रक्तपातांत झालेलं होतं. तेव्हां अनेक दिवसांचं शत्रुत्व असलेले हे दोन सशस्त्र गट एकत्र आल्यानंतर काय होईल याचा नेम नव्हता. शिवाय जिथं कायद्याचं राज्य नाहीं; मिलीटरीचे हात जिथं पोचूं शकत नाहींत, इतक्या दूर अंतरावर शत्रुत्वानं पेटलेल्या या दोन गटांची गांठ पडणार होती.

मॉर्मन संप्रदायाचे लोक येत आहेत असं कळतांच इंडिपेंडन्सच्या आसपास तळ ठोकून राहिलेल्या लोकांच्या बायका पोरांत एकच कल्लोळ माजला. पुरुष मंडळीही घाबरली, आणि त्यांनीं कर्नल कीर्निला त्यानें घोडदळांतले कांहीं सैनिक मदतीला पाठवावे अशी विनंति केली. त्यांची ही विनंति मान्य झाली नाहीं. परिणामीं ही गोष्ट बरोबर ठरली; घोडदळाच्या तुकडीची मदत घ्यावी लागेल असा प्रसंग उद्‌भवलाच नाहीं; कारण सेंट जोसेफहून जो नवा तांडा निघाला होता तो खिश्चन लोकांचाच होता आणि इथं आधीं पोचलेल्या लोकांप्रमाणेंच तेहि मॉर्मन संप्रदायाच्या लोकांचे द्वेष्टे होते.

सेंट जोसेफची माणसं ज्या वाटेनं चाललीं होतीं त्या वाटेनंच आम्ही निघालों. आमच्या अगोदर बरींच माणसं पुढें गेलेलीं असलीं पाहिजेत हें वाटेवर उमटलेल्या खुणांवरून दिसत होतं. हा ताफा मॉर्मन संप्रदायांच्या लोकांचा असावा असं आम्हांलाही वाटलं होतं. आणि त्यामुळें गडबड होण्याची शक्यता असल्याची अटकळ आम्ही बांधली होती.

प्रवास अगदींच कंटाळवाणा झाला. एके दिवशीं तर आम्हीं अनेक तास प्रवास केला पण एकही झाड किंवा झुडूप दृष्टीस पडेना. मागें, पुढें, आजू-बाजूला हिरव्यागार गवताचा हेलावणारा गालीचा पसरला होता. मधेंच एखादा कावळा किंवा ससाणा उडतांना दिसे आणि त्यामुळें एकसुरीपणांचं हें वातावरण कांहींसं सुसह्य होई.

"पाणी आणि लाकडं आपण कशी मिळवायचीं?" आम्ही एकमेकांना विचारूं लागलों. कारण सूर्यास्ताची वेळ आतां जवळ आली होती. इतक्यांत उजव्या हाताला दूरवर एक गडद हिरव्या रंगाचा ठिपका आम्हांला दिसला. उंचवट्यावरच्या माळावरील एका झाडाचा तो माथा होता. आम्ही वाट सोडून त्या ठिपक्याच्या दिशेनें पुढें झालों. आमचा अंदाज खरा ठरला. तिथें अनेक झाडं होतीं. आम्हांला दुरून दिसलेलं तें आघाडीवरचं झाड होतं.

या झाडीच्या बाजूला, घळींत पाण्याचीं तळींही होतीं. आम्ही जवळच एक उंचवटा शोधला, आणि तिथें आमचा तळ ठोकला.

मी आणि शॉ तंबूंत बसलों होतों. इतक्यांत डेस्लॉरिअर्सनें तंबूची कनात बाजूला केली आणि आपलं तोंड आंत खुपसलं. विस्फारलेल्या डोळ्यांनीं त्यानें जेवण तयार असल्याचं आम्हांला सांगितलं. पत्र्याचे पेले आणि लोखंडी चमचे त्याने गवतावर मांडून ठेवले होते. मध्यभागीं कॉफीचं भांडं ठेवलं होतं. लवकरच आम्हीं जेवणाचा फडशा पाडला. हेन्री शॅटिलॉं पायाची फुली घालून पेल्यांत उरलेल्या थोड्याश्या कॉफीशीं खेळ करीत ती पीत होता. गवताळ प्रदेशांतल्या वास्तव्यांत लाभणारं हें एकमेव पेय हेन्रीच्या आवडीचं होतं. कॉफीमध्यें साखर किंवा दूध न घालतां पिणं त्याला आवडत असे. कॉफीचा अशा रीतीनें येणारा मूळचा स्वाद त्याला विशेष आवडे. आतां या वेळची कॉफी तर चांगलीच कडक झाल्यामुळें तो तिच्यावर विशेष खूष होता. त्याच्याच शब्दांत सांगायचं म्हणजे, 'कॉफी चांगली झकास काळी झाली होती'.

सूर्यास्ताचे भडक रंग पसरले होते. झाडांच्या सावल्यांत पाणी सांचून तळीं तयार झालीं होतीं. तांबूस आकाशाचं प्रतिबिंब या पाण्यांतून उमटलं होतं.

शॉ म्हणाला, "कसंहि करून आज आंघोळ ही केलीच पाहिजे. डेस्लॉरिअर्स, तुला कसं काय वाटतं? पलिकडे जर गेलों तर पोहण्याजोगं पाणी कुठं मिळेल काय?"

"मीं कसं सांगूं साहेब? तुम्हांला जसं बरं वाटेल तसं करा." डेस्लॉरिअर्सनें खांदे हलवीत उत्तर दिलें. धन्याच्या मताप्रमाणें वागण्याची तीव्र इच्छा, आणि आपल्या इंग्रजीच्या अज्ञानाची जाणीव या दोन्ही गोष्टींमुळें डेस्लॉरिअर्स उत्तर देतांना गोंधळला होता.

"याच्या पायांतल्या जोड्यांकडे तरी पहा!" मी म्हणालों. चिखलाच्या भल्या मोठ्या डबक्यांत डेस्लॉरिअर्स पाय बुडवून आला असला पाहिजे हें अगदीं उघड दिसत होतं.

शॉ म्हणाला, "चल, पोहण्याची कांहीं व्यवस्था होते किंवा काय हें आपणच पाहूं."

मी आणि शॉ पाण्याच्या शोधार्थ निघालों. थोडा वेळ चालल्यानंतर कांहीं अंतरावर आम्हाला झुडपं दिसलीं. परंतु आजूबाजूला इतका चिखल होता कीं, पाऊल केव्हां फसेल हें सांगतां आलं नसतं. मधेमधें उगवलेल्या दाट गवताच्या

पुंजक्यावर पाय ठेवीत ठेवीत आम्ही चिखल ओलांडून पलिकडे जात होतों. आमच्या पायांना आधार होणारे हे गवताचे पुंजके म्हणजे चिखलाच्या समुद्रांतलीं थरथरतीं बेटंच म्हणायला हरकत नाहीं. ही कसरत करतांना पाऊल जरा जर चुकलं असतं तर डेस्लॉरिअर्सच्या जोड्यांसारखीच आमची अवस्था झाली असती. एकूण परिस्थिती फारच वाईट दिसत होती. आम्हीं वेगवेगळ्या दिशेनें व पाण्याचा शोध करायचं ठरवलं. शॉ उजव्या हाताला वळला आणि मी सरळ दिशेनें निघालों. कांहीं वेळ चालल्यानंतर मला एक पाणझुडपांचा थवा दिसला. या झुडपांवर सुरवंटांसारखा दिसणारा मोहर लटकलेला दिसत होता. मी उभा होतों तें गवत आणि हीं पाणझुडपं यांच्यामध्यें चिखलाचं एक खोल डबकं होतं. मी माझी सगळी शक्ति एकवटून या डबक्यावरून पलिकडच्या झुडपांत उडी मारली. झुडपं तुडवीत तुडवीत मी पुढं निघालों. गुळगुळीत चिखलावरून संथपणें सरकणारा दोनतीन इंच खोल पाण्याचा झरा मला दिसला. या झऱ्याजवळ मीं येतांच मोठीच खळबळ उडाली. एका मोठ्या-थोरल्या हिरव्या बेडकानें रागानें डरांव केलं आणि कांठावरून पाण्यांत उडी घातली. पाण्याचा मोठा आवाज झाला. पाण्यांत शिरतांशिरतां त्या बेडकानें आपले पाय जोरानें मागें झटकले. त्याच्या पायाचे पडदे क्षणभर चमकून उठले. कसलाहि अडथळा न येतां तळाशीं असलेल्या चिखलांत जाऊन तो सुखानें स्थिरस्थावर झाला. पाण्याचे बुडबुडे सुस्तपणें वाट काढीत पृष्ठभागावर आले. आपल्या कुटुंबप्रमुखाचं हें उदाहरण ठिपक्याठिपक्यांच्या इतर कांहीं लहानलहान बेडकांनीं गिरवलं. तीन छोट्या-छोट्या कासवांनींहि या बेडकांमागून पाण्यांत उड्या मारल्या. डॉलरच्या आकाराचीं हीं कासवं कमळाच्या जाड पानावर विश्रांति घेत बसलीं होतीं. काळे आणि पिवळे पट्टे असलेला एक साप कांठावरून घसरत आला आणि वळवळत पलिकडे गेला. माझ्या पायांचा धक्का लागून बाजूला असलेल्या एका डबक्यांत एक छोटासा दगड पडला. त्याबरोबर जाग येऊन तें पाणी बारीक बारीक बेडकुळ्यांनीं भरून गेलं.

थोड्या अंतरावर उभ्या असलेल्या शॉनें मला हांक मारून विचारलं, "अ.घोळीचं जमतं आहे काय तिथं?"

मीं दिलेल्या उत्तरांत अर्थातच कसलाहि उत्साह नव्हता. पाणझुडपांच्या त्या गर्दींतून मी परत निघालों आणि शॉ उभा होता तिथं गेलों. आतां आम्ही

दोघांनीं मिळून पाणी शोधायला जायचं असं ठरलं. उजव्या हाताला जवळच एक उंचवटा होता. तिथलीं झाडंझुडपं अचानक पाण्याकाठीं झुकल्यागत आम्हाला दिसलीं. तिथं गेलों असतां यश मिळेल असं वाटल्यावरून त्या झाडांच्या दिशेनं आम्ही निघालों. तिथं जाऊन पोंचतांच पाण्याजवळ जाणं तेवढं सोपं नाहीं असं आम्हाला आढळून आलं. कारण तो उंचवटा आणि तें पाणी यांच्यामध्यें बरींचशीं झाडं उभीं होतीं आणि या झाडांत द्राक्षांच्या वेलींनीं दाट जाळं केलं होतं. संध्याकाळच्या त्या मंद प्रकाशांत चालतांचालतां मध्येंच आमचा तोल जाई आणि आधारासाठीं एकाद्या रानगुलाबाची काटेरी फांदी आम्हाला हातांत धरावी लागे. शॉ माझ्या जरा पुढें चालत होता; इतक्यांत त्यानें हासडलेली शिवी माझ्या कानीं आली. मीं चमकून त्याच्याकडे पाहिलं. त्याचा एक पाय पाण्यांत बुडाला होता; पण तो वर काढून घेण्याकडेहि त्याचं लक्ष नव्हतं. त्याचं सगळं लक्ष एका पाणसर्पाच्या हालचालीवर केंद्रित झालं होतं. जवळजवळ पांच फूट लांबीचा तो साप होता. त्याच्या अंगावर हिरवेकाळे पट्टे होते. तो संथपणें पाण्यांतून पोहून येत होता. त्याच्यावर तडाखा हाणण्यासाठीं आमच्याजवळ काठी किंवा दगड कांहींच नसल्यामुळें आम्हीं नुसत्या क्रोधानेंच त्याच्याकडे पाहिलं आणि तसेच पुढें निघालों.

आमच्या या चिकाटीला पुढें यश आलं. कांहीं गज चालून गेल्यानंतर एक हिरव्यागार गवताचा कोपरा आम्हाला लागला. आमच्या सुदैवानें तिथं असलेलं पाणी काटक्या-झुडपानीं झांकलेलं नव्हतं. आम्हीं त्या पाण्यांत काठी बुडवून पाहिली. पाणी अंदाजें चार फूट तरी खोल असावं. नमुना पाहण्यासाठीं म्हणून आम्हीं थोडं पाणी हातांत घेतलं. तें माफक स्वच्छ असल्याचं आम्हाला दिसलं. इतकं सगळं झाल्यानंतर आम्ही आंघोळीसाठीं पाण्यांत उतरलों. परंतु आमच्या शरिरांत अनेक विषारी सुया बोचल्याचं जाणवल्यामुळें आमच्या या अंगप्रक्षालनांत अडथळा आला. आजूबाजूच्या चिखलांतून आपलं निवासस्थान सोडून असंख्य डांस त्यांचा भोजनविषय बनलेल्या आमच्या दिशेनें झेपावत येत होते. आम्हीं ताबडतोब शक्य तितक्या वेगानें तिथून पलायन केलं.

आम्हीं आमच्या तंबूच्या दिशेनें निघालों. आंघोळीमुळें आम्हाला बरंच प्रसन्न वाटत होतं. हवेंतला असह्य उष्मा आणि प्रवासांतील दगदग यांच्यामुळें त्यावेळीं आंघोळ अत्यंत आवश्यक होती.

शॉ म्हणाला, "कॅप्टनकडे पहा तरी, त्याचं काय चाललं आहे!" कॅप्टन एकटाच माळावर उभा होता. आपली हॅट हातांत घेऊन तो ती डोक्याभोवतीं जोरजोरानें फिरवीत होता. तो आपला एक पाय वर उचलून घेई, आणि नंतर खालीं करून दुसरा पाय उचली. पण असं असून तो आपल्या जागेवरून मात्र हलतांना दिसत नव्हता. मधेंच तो जमिनीकडे तिरस्कारानें पाही, तर कांहीं वेळानें आकाशाकडे संतापलेल्या, गोंधळलेल्या चेहऱ्यानें पाहूं लागे : जणूं कांहीं तो कुठल्यातरी अज्ञात शत्रूंच्या उड्डाणाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करीत होता. आम्ही त्याला हांक मारून काय चाललं आहे असं विचारलं. पण कॅप्टनचं उत्तर आलं तें त्या अज्ञात शत्रूंना हासडलेल्या शिवीच्याच रूपानें आम्ही जवळ आलों तेव्हां वीस मधमाशांचीं पोळीं फुटून त्या माशा घोंगावूं लागाव्यात तसा आवाज आमच्या कानांत घुसला. डोक्यावर काळ्या रंगाच्या मोठ्या किड्यांचे थवेच्याथवे उडत होते. गवताच्या टोकावर असेच थवे घोंगावत होते. या किड्यांच्या जगांत प्रचंड खळबळ उडालेली दिसत होती.

आम्हीं मागें वळतों आहोंत असं पहातांच कॅप्टन म्हणाला, "भिऊं नका! हे किडे चावणारे नाहींत." याच वेळीं मीं एक किडा माझ्या हॅटनें मारला आणि त्याचं निरीक्षण केलं. त्या किड्यांनीं जमिनीला हजारों छिद्रं पाडून आपलीं घरं केलीं होतीं. किड्यांच्या या भरभराटलेल्या वसाहतीची आम्ही घाईघाईनें रजा घेतली आणि आमच्या तंबूकडे परत आलों. डेस्लॉरिअर्सनें पेटवलेली शेकोटी अजूनहि चांगली जळत होती. आम्ही तिच्याभोवतीं बसलों. आम्हीं संध्याकाळीं शोधलेल्या आंघोळीच्या पाण्याची सोय कशी झकास होती हें शॉ सविस्तर सांगूं लागला. सकाळ झाल्यावर कॅप्टननें न्याहारीच्या पूर्वी आंघोळ करून यावं असं त्यानें आग्रहानें सुचवलं.

तुम्हीं सांगतां त्यावर माझा विश्वास बसत नाहीं असं सांगण्याच्या बेतांत कॅप्टन होता. पण तो बोलणार इतक्यांत मघांचा तो किडा त्याच्या गालावर येऊन बसला, आणि त्यामुळें त्याचं बोलणं थांबलं. "हे सैतानी किडे लागले वाटतं मागें पुन्हां." असं म्हणून गालावर बसलेल्या किड्यावर कॅप्टननें एक चापट लगावली. असंख्य गोळ्या डोक्यावरून जाव्यात तसा आवाज ते किडे करीत होते. इतक्यांत माझ्या कपाळावर कसला तरी फटका बसला. त्यानंतर मानेवर एक फटका बसला. त्या क्षणीं अनेक नखं माझ्या मानेंत खुपसलीं

जात आहेत असं मला वाटलं. त्या नखांचा बेत माझ्या मानेंत आणखी पुढें रुतण्याचा असावा याची जाणीव होतांच मी सावध झालों. मी हात मानेकडे नेला आणि मानेवर बसलेल्या त्या किड्याला हस्तगत करून आगींत भिरकावला. आम्ही सगळे त्यानंतर आपापल्या तंबूंत जायला निघालों. तंबूचीं दारं लावून घेतल्यावर या किड्यांच्या आक्रमणापासून आपला बचाव होईल असं आम्हांला वाटलं होतं. परंतु आम्हीं घेतलेली ही तसदी व्यर्थ ठरली. ते किडे घोंगावत घोंगावत आमच्या तंबूंतून आंत शिरूं लागले. आणि सूर्य मावळेपर्यंत त्यांनीं आमच्या अंगावर ठाण मांडलं. आम्हीं आमचीं ब्लँकेटं उघडलीं तेव्हां शेंकडो किडे अत्यंत चिवटपणें ब्लँकेटांना चिकटून राहिलेले आम्हांला दिसले. आम्हीं जेव्हां सकाळीं उठलों तेव्हां आमच्या नजरेला प्रथम पडला तो डेस्लॉरिअर्स. तव्याची दांडी हातांत धरून जणूं कांहीं तो त्या तव्याला व्याख्यान देत होता. अनेक किडे त्या तव्याला चिकटून राहिले होते आणि इतर शेंकडों जळलेल्या, सुरकुतलेल्या अवस्थेंत राखेंत पडले होते.

घोड्यांना आणि खेचरांना आम्ही चरायला सोडलं होतं. न्याहारी करण्यासाठीं म्हणून आम्हीं पाय पसरून जरा ऐसपैस बसलों होतों. इतक्यांत हेन्री शॅटिलॉंच्या तोंडची कांहीं उद्‌गारवाचकें आणि कॅप्टनच्या तोंडची आरोळी आमच्या कानीं पडली. ती कसल्यातरी अपघाताची सूचना असावी हें आमच्या ध्यानांत आलं. आम्ही वर पाहिलं तेव्हां आमच्या लक्षांत आलं कीं आमच्या घोड्यांपैकीं तेवीस घोडे पळून जात आहेत. हे सगळे घोडे नाठाळ पॉटिॲकच्या नेतृत्वाखालीं रेड इंडियन वस्तीच्या दिशेनें धावत होते. या सगळ्या घोड्यांना पायबंद घातलेले असल्यानं ते लंगडत लंगडत धावत होते. पॉटिॲकच्या धावण्यांत डौल जरी नसला तरी त्याचा वेग बऱ्यापैकीं होता. घोड्यांना पळतांना पाहून आम्हीं तिघेचौघे दंवानें चमकणारं गवत तुडवीत त्यांच्या मागं धावत सुटलों. अशा रीतीनें मैलभराची शर्यत धावल्यावर शॉनें एक घोडा पकडला. लगामाच्या ऐवजीं त्यानं त्या घोड्याच्या तोंडांत दोरा अडकवला आणि उडी मारून त्यावर तो स्वार झाला. त्या घोड्यावरून दौडत पळून जाणाऱ्या घोड्यांच्या तो पुढे जाऊन ठेपला. अशा रीतीनें आम्ही त्या सगळ्या घोड्यांना हांकत हांकत तंबूतळापर्यंत आणलं. तंबूतळावर येतांच प्रत्येकानें आपापला घोडा पकडला आणि तावडतोब त्यावर खोगीर चढवलं. हें करीत असतांना सुस्कारे आणि शिव्या आमच्या कानांवर येत होत्या. कारण पायबंध असतांना घोडे

धावल्यानें त्यांच्या पायांना चकणं पडलीं होतीं. त्याप्रमाणेंच कांहीं घोड्यांनीं पायबंध तोडूनही टाकले होते.

त्या दिवशीं सकाळीं मुक्काम हलवून पुन्हां प्रवासाला निघायला आम्हांला थोडा उशीरच झाला. दुपारीं आम्हांला पुन्हां तळ ठोकणं भाग पडलं; कारण अचानक वादळी पावसानं आम्हांला घेरलं आणि घोंगावणाऱ्या झडींनीं आम्हांला झोडपायला सुरवात केली. या प्रचंड माऱ्याला तोंड देत कसेबसे आम्ही तंबू ठोकले. रात्रभर आमच्या डोक्यावर वादळ गर्जना करीत होतं, गुरगुरत होतं. पावसाचा हा प्रचंड धबधबा सकाळीं थांबला. आणि त्याची जागा हलक्या सरींनीं घेतली. तंबू जरी बंद होता, तरी रात्रींच्या पावसाचा तडाखाच इतका प्रचंड होता कीं त्यामुळें कनातींतून पाणी ठिबकून आम्ही चिंब भिजून गेलों होतों. संध्याकाळीं हवा निवळल्याच्या फसव्या खुणा वातावरणांत दिसूं लागल्या, तेव्हां आम्ही तंबू आवरले आणि पुन्हां प्रवासाला निघालों.

सभोंवतालचे विस्तीर्ण गवताळ माळ स्तब्ध होते. वाऱ्याची एक झुळूकही त्यांच्यावर उमटलेली दिसत नव्हती. कापसाच्या हलक्या ढिगासारखे ढग आकाशांत दिसत होते. अधून मधून आकाशाचा निळा रंग दिसे. पण तो कांहींसा धुरकट आणि सुस्त भासे. असह्य आगीचा वर्षाव करून सूर्य आम्हांला भाजून काढीत होता. आमचा तांडा माळांच्या त्या न संपणाऱ्या विस्तारावरून संथपणें सरकत पुढें चालला होता. घोडयांनीं आपली डोकीं खालीं घातलीं होतीं आणि घोट्यापर्यंत चिखल तुडवीत ते चालले होते. जितकं नीट बसतां येईल तेवढे स्वार खोगिरावर बसले होते. शेवटीं संध्याकाळ जवळ आली तसं पुन्हां वादळी पावसाच्या काळ्या ढगांनीं सगळं क्षितिज झांकळून टाकलं. हे ढग आणि त्यांचा प्रताप आमच्या ओळखीचा झाला होताच. आणि यानंतर दुपारीं कोसळला होता तसाच प्रचंड पाऊस कोसळूं लागला. सगळा गवताळ माळ आणि झाडांचे पुंजके आभाळाच्या शाईसारख्या सावलीमुळें जांभळेकाळे दिसूं लागले. ढगांच्या घनदाट समूहांतून विजेनं उसळी घेतली आणि गवताळ माळाच्या कडेपर्यंत थरथरत थरथरत ती कोसळूं लागली. याच क्षणीं प्रचंड घणाघात करीत पाऊस धो धो कोसळत होताच. पावसाचा वास भरलेला थंडगार वारा गवत वाकवीत आमच्या अंगावरून पुढें वहात होता.

"चला लौकर, आतां येथून पळालं पाहिजे!" असं शॉ ओरडला आणि त्यानं आपला घोडा भरधाव सोडला. इतरांनींहि आपले घोडे समोर दिसणाऱ्या

झाडांच्या गर्दीच्या दिशेनें भरधांव सोडले. या झाडांच्या जवळ आल्यावर त्यांनीं अर्धवट झांकलेलं छोटंसं कुरण आम्हांला दिसलं. आमचा सगळा घोळकाच्या घोळका त्या कुरणावर जाऊन ठाकला. आम्हीं घोड्यावरून खालीं उड्या मारल्या. भराभर खोगिरं सोडवून घेतलीं आणि घोड्याच्या पायाकडे अंग चोरून आम्हीं उभे राहिलों. घोड्यांचे पायबंध आम्हीं बांधले आणि त्यांना चरायला सोडलं. इतक्यांत आमच्या गाड्याही भराभर तेथें आल्या. आम्ही तावडतोब तंबू बाहेर काढले आणि वादळ कोसळतं न कोसळतं इतक्यांत तंबू ठोकून तयार झालों. रात्रीचा काळोख घेऊन जणूं तें वादळ आमच्यावर कोसळलं. पावसाच्या गरजणाऱ्या झडींनीं आजूबाजूचीं झाडं संपूर्णपणें झांकून टाकलीं होतीं.

आम्हीं सगळे आंत बसलों होतों इतक्यांत डेस्लॉरिअर्सनं बाहेरून आपल्या रुंद फेल्टहॅटसकट तंबूंत तोंड खुपसलं. त्याच्या खांद्यावरून पावसाचं पाणी ओघळत होतं.

"मी आग पेटवतों, आणि जेवणाची तयारी करतों. मला वाटतं तें मला जमेल,"

"बाबा रे, जेवणाचं राहूं दे, तूं भिजतो आहेस, आधीं तंबूंत ये."

आम्हीं असं म्हणतांच डेस्लॉरिअर्स तंबूंत सरकला. फार पुढें मात्र तो आला नाहीं. कारण धन्यांच्या फार जवळ येणं त्याच्या नम्र स्वभावाला रुचण्यासारखं नव्हतं.

आम्हीं तंबू ठोकून बसलों होतों खरे, परंतु त्या धबधब्यासारख्या कोसळणाऱ्या पावसापासून आमचं संरक्षण करायला हे तंबू फारसे समर्थ होते असं म्हणतां येणार नाहीं. पाऊस जरी सरळ आंत येत नव्हता तरी छतांतून पाणी ठिबकत होतं आणि आम्हांला पूर्णपणें भिजवून काढीत होतं. आम्ही तशा भिजलेल्या अवस्थेंत उदासवाणे चेहरे करून खोगिरावर बसलों होतों, आमच्या टोप्यांवरून आणि गालांवरून सारखं पाणी ओघळत होतं. माझ्या अंगांतल्या खरी ओव्हरकोटवरून पाण्याचे वीस छोटे छोटे ओघळ जमिनीवर पडत होते. शॉच्या अंगांतल्या लोकरी कोटांत एखाद्या स्पंजांत भरावं तसं पाणी भरलं होतं. आम्हांला सगळ्यांत भीति वाटत होती ती तंबूभोंवती सांचणाऱ्या पाण्याच्या डबक्यांचीं. कारण जसजशीं ही डबकीं अधिक सांचत जातील, तसतसं तें पाणी पसरत पसरत तंबूंत शिरणार आणि रात्रीं झोंपणं अशक्य होणार हें आम्हांला

स्पष्ट दिसत होतं. सूर्यास्ताची वेळ झाली तसं तें वादळ जसं अचानक सुरू झालं, तसंच अचानक शमलं, माळाच्या पश्चिमेकडच्या कडेवर आकाशाचा लालसर पट्टा दिसूं लागला. मावळत्या सूर्याचे किरण ओल्या गवतावर व झाडांवर पडल्यानें इंद्रधनुष्याचे रंग त्यांतून उमटले. तंबूबाहेर सांचलेलीं पाण्याचीं डबकीं पाऊस थांबतांच हळूहळू मातींत जिरलीं.

आम्हांला वाटणारी आशा फसवी ठरली. कारण रात्र होतांच पुन्हां प्रचंड वेगानं वादळ कोसळूं लागलं. अटलांटिकच्या किनाऱ्यावरचीं सौम्य वादळें ज्यांनीं पाहिलीं आहेत त्यांना या वादळाच्या भयानकतेची कल्पनाही येणार नाहीं. भयानक वेगानं हें वादळ आमच्या डोक्यावर कोसळूं लागलं आणि गवताळ माळांच्या असीम विस्तारावर त्यानं आपलं तांडव सुरू केलं. अवकाशाच्या पोकळींत त्या वादळाचा भीतिदायक आवाज घुमूं लागला. रात्रभर वीज कडाडत होती. वीज कोसळली कीं तिचा पांढरा फटक प्रकाश आजूबाजूच्या झाडांवर पडे. एक क्षणभर भोंवतालच्या माळांचा विस्तार उजळून दिसे आणि पुन्हां काळोखाच्या भिंतींत–जणूं काय हाताला जाणवणाऱ्या काळोखाच्या भिंतींत–आम्हीं कोंडले जात असूं.

आतां या वादळाची संवय झाल्यामुळें आम्हीं फारसे अस्वस्थ झालों नाहीं. अधूनमधून पावसाच्या घणघणाटानें आम्हांला जाग येई आणि अवकाशांत चाललेल्या विद्युत् संग्रामाची आम्हांला जाणीव होई. तंबूच्या छतावर पावसाच्या झडी प्रचंड टकरा देत असल्याचं आमच्या ध्यानांत येई. आमचे रबरी ओव्हरकोट जमिनीवर पसरून आम्हीं त्यांवर आमची ब्लँकेटं अंथरलीं होतीं. कांहीं काळ आम्हीं केलेल्या या व्यवस्थेनं पाण्यापासून आमचं संरक्षण केलं. परंतु हळूं हळूं तंबूंत पाणी येऊं लागलं आणि रबरी रेनकोटांच्या कडांभोंवतीं डबकं तयार होऊं लागलं. रात्रभर आम्हांला नकळत आम्हीं या डबक्यांतच विश्रांति घेत होतों असं म्हणायला हरकत नाहीं.

सकाळीं आम्हांला जाग आली तेव्हां वातावरण कांहीं फारसं सुधारलं नव्हतं. पावसाचा मारा जरा कमी झाला होता. परंतु तंबूच्या छतांतून पाणी ठिपकतच होतं. आम्हीं ब्लँकेटांतून बाहेर आलों तेव्हां सगळं ब्लँकेट मण्यांसारख्या थेंबांनीं भरून गेल्याचं आम्हांला दिसलं. आतां हवा थोडी निवळेल अशा अपेक्षेनं आम्ही बाहेर पाहिलं, पण व्यर्थ! शिशासारखे दिसणारे ढग विस्तीर्ण माळाच्या काठावर ओथंबून झुकले होते. सगळीकडे सांचलेले पाणी, झोडपलेलं

झाडांच्या गर्दीच्या दिशेनें भरधांव सोडले. या झाडांच्या जवळ आल्यावर त्यांनीं अर्धवट झांकलेलं छोटंसं कुरण आम्हांला दिसलं. आमचा सगळा घोळकाच्या घोळका त्या कुरणावर जाऊन ठाकला. आम्हीं घोड्यावरून खालीं उड्या मारल्या. भराभर खोगिरं सोडवून घेतलीं आणि घोड्याच्या पायाकडे अंग चोरून आम्हीं उभे राहिलों. घोड्यांचे पायबंध आम्हीं बांधले आणि त्यांना चरायला सोडलं. इतक्यांत आमच्या गाड्याही भराभर तेथें आल्या. आम्ही तावडतोब तंबू बाहेर काढले आणि वादळ कोसळतं न कोसळतं इतक्यांत तंबू ठोकून तयार झालों. रात्रीचा काळोख घेऊन जणूं तें वादळ आमच्यावर कोसळलं. पावसाच्या गरजणाऱ्या झडींनीं आजूबाजूचीं झाडं संपूर्णपणें झांकून टाकलीं होतीं.

आम्हीं सगळे आंत बसलों होतों इतक्यांत डेस्लॉरिअर्सनं बाहेरून आपल्या रुंद फेल्टहॅटसकट तंबूंत तोंड खुपसलं. त्याच्या खांद्यावरून पावसाचं पाणी ओघळत होतं.

"मी आग पेटवतों, आणि जेवणाची तयारी करतों. मला वाटतं तें मला जमेल,"

"बाबा रे, जेवणाचं राहूं दे, तूं भिजतो आहेस, आधीं तंबूंत ये."

आम्हीं असं म्हणतांच डेस्लॉरिअर्स तंबूंत सरकला. फार पुढें मात्र तो आला नाहीं. कारण धन्यांच्या फार जवळ येणं त्याच्या नम्र स्वभावाला रुचण्यासारखं नव्हतं.

आम्हीं तंबू ठोकून बसलों होतों खरे, परंतु त्या धबधब्यासारख्या कोसळणाऱ्या पावसापासून आमचं संरक्षण करायला हे तंबू फारसे समर्थ होते असं म्हणतां येणार नाहीं. पाऊस जरी सरळ आंत येत नव्हता तरी छतांतून पाणी ठिबकत होतं आणि आम्हांला पूर्णपणें भिजवून काढीत होतं. आम्ही तशा भिजलेल्या अवस्थेंत उदासवाणे चेहरे करून खोगिरावर बसलों होतों, आमच्या टोप्यांवरून आणि गालांवरून सारखं पाणी ओघळत होतं. माझ्या अंगांतल्या रबरी ओव्हरकोटवरून पाण्याचे वीस छोटे छोटे ओघळ जमिनीवर पडत होते. शॉच्या अंगांतल्या लोकरी कोटांत एखाद्या स्पंजांत भरावं तसं पाणी भरलं होतं. आम्हांला सगळ्यांत भीति वाटत होती ती तंबूभोंवती सांचणाऱ्या पाण्याच्या डबक्यांचीं. कारण जसजशीं ही डबकीं अधिक सांचत जातील, तसतसं तें पाणी पसरत पसरत तंबूंत शिरणार आणि रात्रीं झोंपणं अशक्य होणार हें आम्हांला

स्पष्ट दिसत होतं. सूर्यास्ताची वेळ झाली तसं तें वादळ जसं अचानक सुरू झालं, तसंच अचानक शमलं, माळाच्या पश्चिमेकडच्या कडेवर आकाशाचा लालसर पट्टा दिसूं लागला. मावळत्या सूर्याचे किरण ओल्या गवतावर व झाडांवर पडल्यानें इंद्रधनुष्याचे रंग त्यांतून उमटले. तंबूबाहेर सांचलेलीं पाण्याचीं डबकीं पाऊस थांबतांच हळूहळू मातींत जिरलीं.

आम्हांला वाटणारी आशा फसवी ठरली. कारण रात्र होतांच पुन्हां प्रचंड वेगानं वादळ कोसळूं लागलं. अटलांटिकच्या किनाऱ्यावरचीं सौम्य वादळें ज्यांनीं पाहिलीं आहेत त्यांना या वादळाच्या भयानकतेची कल्पनाही येणार नाहीं. भयानक वेगानं हें वादळ आमच्या डोक्यावर कोसळूं लागलं आणि गवताळ माळांच्या असीम विस्तारावर त्यानं आपलं तांडव सुरू केलं. अवकाशाच्या पोकळींत त्या वादळाचा भीतिदायक आवाज घुमूं लागला. रात्रभर वीज कडाडत होती. वीज कोसळली कीं तिचा पांढरा फटक प्रकाश आजूबाजूच्या झाडांवर पडे. एक क्षणभर भोंवतालच्या माळांचा विस्तार उजळून दिसे आणि पुन्हां काळोखाच्या भिंतींत—जणूं काय हाताला जाणवणाऱ्या काळोखाच्या भिंतींत—आम्हीं कोंडले जात असूं.

आतां या वादळाची संवय झाल्यामुळें आम्हीं फारसे अस्वस्थ झालों नाहीं. अधूनमधून पावसाच्या घणघणाटानें आम्हांला जाग येई आणि अवकाशांत चाललेल्या विद्युत् संग्रामाची आम्हांला जाणीव होई. तंबूच्या छतावर पावसाच्या झडी प्रचंड टकरा देत असल्याचं आमच्या ध्यानांत येई. आमचे रबरी ओव्हरकोट जमिनीवर पसरून आम्हीं त्यांवर आमची ब्लँकेटं अंथरलीं होतीं. कांहीं काळ आम्हीं केलेल्या या व्यवस्थेनें पाण्यापासून आमचं संरक्षण केलं. परंतु हळूं हळूं तंबूंत पाणी येऊं लागलं आणि रबरी रेनकोटांच्या कडांभोंवतीं डबकं तयार होऊं लागलं. रात्रभर आम्हांला नकळत आम्हीं या डबक्यांतच विश्रांति घेत होतों असं म्हणायला हरकत नाहीं.

सकाळीं आम्हांला जाग आली तेव्हां वातावरण कांहीं फारसं सुधारलं नव्हतं. पावसाचा मारा जरा कमी झाला होता. परंतु तंबूच्या छतांतून पाणी ठिपकतच होतं. आम्हीं ब्लँकेटांतून बाहेर आलों तेव्हां सगळं ब्लँकेट मण्यांसारख्या थेंबांनीं भरून गेल्याचं आम्हांला दिसलं. आतां हवा थोडी निवळेल अशा अपेक्षेनं आम्ही बाहेर पाहिलं, पण व्यर्थ! शिशासारखे दिसणारे ढग विस्तीर्ण माळाच्या काठावर ओथंबून झुकले होते. सगळीकडे सांचलेले पाणी, झोडपलेलं

गवत, घोड्यांनीं आणि खेचरांनीं तुडवलेला चिखल असंच दृश्य दिसत असल्यानं पृथ्वीचं स्वरूप अवकाशापेक्षां कांहीं वेगळं आहे असं जाणवत नव्हतं.

आमच्या सहप्रवाशांचे तंबू आणि गाड्या एखाद्या परित्यक्त माणसासारख्या मूकपणें दुःख सहन करीत उभ्या होत्या. नेहमीप्रमाणें घोड्यांची सकाळची तपासणी संपवून कॅप्टन नुकताच परत येत होता. त्यानं अंगाभोंवती लोकरी शाल गुंडाळली होती. त्याच्या मिशीखालून दिसणारा त्याच्या तोंडांतला पाईप इतका मळला होता कीं एखाद्या प्राचीन अवशेषासारखा तो दिसत होता. धुक्यांतून व पावसांतून वाट काढीत कॅप्टन येत होता; त्याचा भाऊ जॅक त्याच्या बाजूनेंच चालत होता.

दुपारीं आकाश निवळलं. सहा इंच चिखल तुडवीत आम्हीं चालूं लागलों. रोज रात्रीं पावसानं आम्हांला झोडपायचं हें अगदीं ठरून गेलं होतं. पण त्या रात्रीं मात्र तसं घडलं नाहीं.

दुसरे दिवशीं दुपारीं आम्हीं संथपणें प्रवास करीत होतों. उजव्या हाताला जवळच झाडांचा एक पट्टा दिसत होता. जॅक 'सी' सगळ्यांच्या पुढें होता.

"दिवस सगळा तो बोललाहि नाहीं!" अशी त्याची अवस्था होती. पण इतक्यांत त्यानं मागें वळून पाहिलं आणि समोर झाडांकडे बोट दाखवून तो आपल्या भावाला मोठ्यानं म्हणाला, "बिल, ती पहा गाय!" कॅप्टन हें ऐकतांच घोडा पिटाळून पुढें झाला. त्या दोघां भावांनीं त्या गाईला पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या हेतूंचा सुगावा लागल्यामुळें ती गाय झाडांत घुसली. आतां "आर" ही त्यांच्या मदतीला गेला. त्या तिघांनीं झाडांत लपलेल्या गाईला हुसकून काढलं. दोरीचा फास करून गाईला पकडण्याचा ते तिघं प्रयत्न करीत होते, आणि आम्हीं त्यांच्याकडे पहात होतों. शेवटीं फास घालण्याचं कांहीं त्यांना जमेना. तेव्हां त्यांनीं हुसकीत हुसकीत गाईला आमच्या तांड्या-बरोबरच न्यायला सुरुवात केली. लौकरच वादळाला सुरवात झाली. वारा त्वेषानें वाहूं लागला. धबधब्यासारख्या पावसाच्या आडव्या तिडव्या धारा कोसळूं लागल्या. वादळाच्या दिशेला घोड्यांनीं पाठ फिरवली आणि मान खालीं घालून नाराजी व्यक्त करीत ते मुकाट्यानें पावसाचा मारा सोसूं लागले. आम्हींहीं खांद्यांत डोकीं खुपसलीं, सरकत सरकत पुढें झालों आणि पाठीचा आडोसा करून शरीराचं पावसापासून रक्षण करण्याचा प्रयत्न करूं लागलों.

या सगळ्या गोंधळाचा अर्थातच त्या गाईनं फायदा घेतला आणि ती पुन्हां एकदां उधळली. कॅप्टनला वाईट वाटलं. वादळाची पर्वा न करतां त्यानं आपली हॅट डोळ्यावर ओढून घेतली आणि गव्यांची शिकार करण्याचं पिस्तूल म्यानां-तून बाहेर काढून तो गाईमागें भरधांव निघाला. पाऊस व धुकं यांचा इतका जाड पडदा समोर पसरला होता कीं कांहीं काळ कॅप्टन काय करतो आहे हेंच आम्हांला दिसलं नाहीं. थोड्या वेळानं कॅप्टनच्या आरोळ्या आम्हांला ऐकूं येऊं लागल्या आणि त्यानंतर एका हातांत पिस्तूल घेतलेला, आयरिश शिलेदारासारखा दिसणारा कॅप्टन आमच्या नजरेला दिसूं लागला. त्याच्या समोरून गाय धावत होती. कॅप्टन ओरडून आम्हांला सांगत होता कीं, बाहेर या आणि गाईला तंबूकडे वळवा. परंतु आमच्या कोटांच्या कॉलरमध्यें पावसाचं पाणी सांचलं होतं. पावसाचे ओघळ आमच्या मानेवरून वहात होते. आम्हीं जरा मान हलवली असती तर अधिकच पाणी आंत शिरलं असतं. तेव्हां कॅप्टनच्या हांकांना न जुमानतां आम्हीं किंचित् नाराजीच्या तिरक्या नजरेनं त्याच्याकडे पाहिलं, आणि त्याच्या त्या सगळ्या धडपडीकडे पहात तसेच हंसत बसलों.

गाय पुन्हां एकदां उधळली आणि तिनें धूम ठोकली. कॅप्टननें पिस्तुलावरील पकड घट्ट केली. घोड्याला टांच मारली आणि गाईमागें आपला घोडा वेगानं सोडला. कॅप्टनच्या मनांतले विचार आतां बदलेले होते हें उघड होतं. गाईला अद्दल घडवायची त्यानं ठरवलं होतं. थोड्या वेळानें गोळीनें जखमी झालेली गाय कॅप्टनमागून लंगडत येतांना दिसली. कांहीं वेळानें वादळ कमी झालं. आणि आम्हीं प्रवास पुढें चालू केला. कॅप्टननें आपली टेहेळ्याची भूमिका पूर्ववत् घेतली आणि तो सर्वांपुढें निघाला. झऱ्याच्या कांठानें झाडांची एक लांबलचक रांग होती. त्या झाडांच्या ओळीनें आम्ही चालूं लागलों. इतक्यांत कॅप्टन आमच्या दिशेनं हंसत येत असलेला दिसला. तो ओरडून म्हणाला, "या गाईला मागेंच राहूं द्या. तिच्या मालकांचा तळ तिथें दिसतो आहे." आम्हीं थोडे पुढें गेलों तेव्हां तंबूच्या आकाराची कसली तरी पांढरी वस्तू दिसली. मॉर्मन लोकांचा तो तंबूतळ असावा असं वाटलं होतं. परंतु जवळ जाऊन पाहतांच तो तंबू नसून एक मोठा थोरला पांढरा खडक होता असं आढळून आलं. अर्थातच आतां आम्हीं त्या गाईला मागं न ठेवतां बरोबरच घेतलं. आम्हीं तळ ठोकेपर्यंत ती गाय आमच्या बरोबर चालत

४


होती. तळ ठोकणं पूर्ण झाल्यावर 'आर'नें आपली दोन नळ्यांची बंदूक काढली आणि त्या गाईवर नेम धरून गोळी सोडली. त्या दिवशीं त्या गाईमुळें आमच्या भोजनाची यथासांग सिद्धता झाली आणि तिच्यामुळें आमच्या प्रवासाच्या मर्यादित भोजनविषयांत स्वागतार्ह भर पडली हें वेगळें सांगावयास नकोच !

एकदोन दिवसांतच आम्हीं नील नदीपाशीं येऊन थडकलों. नांवासारखीच ही नदी सुंदर आहे. या प्रदेशांतल्या प्रत्येक झऱ्याला त्याचं नांव आहे. आम्हीं सकाळपासून चिखल आणि खड्डे तुडवीतच प्रवास केला होता. परंतु नदीकांठीं येतांच त्याहूनही अधिक मोठं संकट आमच्यापुढं वाढून ठेवलं आहे हें आम्हांला कळून चुकलं. कारण पावसामुळं नदीला पूर आला होता आणि तो फुगलेला पाण्याचा प्रवाह झपाटल्यासारखा वहात होता. आम्हीं नदी-कांठाशीं जाऊन पोंचतांच 'आर'नें पाण्यांत उडी टाकली आणि दोऱ्याचं एक टोंक तोंडात धरून पोहत पोहत तो पुढं निघाला. त्याच्या या उत्साहपूर्ण धडपडीचा हेतु काय असावा याचा विचार करीत आम्हीं त्याच्याकडे मोठ्या कौतुकानं पहात राहिलों. इतक्यांत पाण्यांतून तो ओरडला, "या दोऱ्याचं एक टोक झाडाच्या त्या खुंटाला बांधा. सॉरेल, ऐकतो आहेस कीं नाहीं, मी काय म्हणतों आहें तें ? वॉईसवर्ड नीट पहा, तुमच्यापैकीं कांहीं जण या बाजूला व्हा आणि मला मदत करा." हे हुकूम "आर' ज्यांना सोडीत होता, त्यांच्यापैकीं कोणीही 'आर'कडे लक्षच देत नव्हता. पण तरीही अधूनमधून थांबत 'आर' हुकमांचा वर्षाव करीतच होता. कांठावरचे लोक कामाला लागले होते, आणि हेन्री शॅटिलॉं त्यांचं नेतृत्व करीत होता. काम झपाट्यानं सुरू झालं होतं. खणखणीत आवाजांत केलेली 'आर'ची आरडाओरड अजूनही ऐकूं येत होती. परंतु महंमद आणि नाठाळ पर्वत ही गोष्ट त्याला आठवल्यामुळं कीं काय कोणास ठाऊक त्यानं आपल्या हुकुमांचा रोख बदलला. कांठावरचीं माणसं जें काम करीत होतीं, तें काम त्यांनीं नीट करावं अशा अर्थाचे हुकूम तो सोडूं लागला. हा सर्व प्रकार पाहून शॉ हसला. आरच्या तें लक्षांत आलं. तो एकदम गरम झाला. पण लौकरच त्याला शांत व्हावं लागलं.

एव्हांना तराफा बांधून झाला होता. आम्हीं आमचं सगळं सामान तराफ्यावर चढवलं. त्यांत फक्त बंदुका घातल्या नाहींत. कारण प्रत्येकानं

आपापली बंदूक आपल्या हातांतच ठेवली होती. आमची सगळी मालमत्ता नील नदीच्या गढूळ पाण्यावरून तरंगत जाऊं लागली. कांठावर बसून आम्हीं सगळे तराफा कसा काय जातो आहे हें पहात होतों. सॉरेल, बॉईसवर्ड, राईट आणि डेस्लॉरिअर्स या चौघांनीं तराफ्याचीं चार टोकं आपल्या हातांत धरलीं होतीं आणि ते तराफ्याबरोबर पोहत जात होते. नदीपलीकडे एक छोटीशी खाडी होती. तिथं तराफा सुरक्षित लावण्यांत आला. रिकामे गाडे आतां पाण्यांतून नेणं सहज शक्य झालं. आम्ही घोड्यावर स्वार होऊन घोडे पाण्यांत घातले. इतर जनावरं आमच्या मागून येऊं लागलीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९८२६२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)



# ६ | प्लाट नदी आणि वाळवंट

सेंट जोसेफवरून येणाऱ्या वाटेनं चाललेल्या आमच्या एकाकी प्रवासाचा अखेरचा टप्पा आतां आम्हीं गांठला होता. ऑरेगॉनला निघालेल्या स्थलांतरितांचा तांडा ज्या वाटेनं जातो ती वाट सेंट जोसेफच्या मार्गाला जिथं मिळते तिथं आम्ही आमचा तळ ठोकला. २३ मे हा तो दिवस होता. त्या दिवशीं संध्याकाळी आम्ही सर्पण व पाणी शोधण्यासाठीं खूपच वणवण केली. शोधतां शोधतां शेवटीं एकदां खडक व झुडूप यांच्यामध्यें असलेलं पाण्याचं

तळं आम्हांला आढळलं. सूर्यास्ताचं आकाश त्या पाण्यांत उमटलं होतं. पाण्याच्या सभोंवतीं गवताळ माळ समुद्रासारखे हेलावत होते. या तळ्याच्या बाजूलाच आम्ही तंबू ठोकले. इतक्यांत दूरच्या एका माळाच्या पार्श्वभूमीवर कसलीतरी एक वेगळीच आकृति हेन्री शॅटिलॉंच्या तीक्ष्ण नजरेनं हेरली. परंतु त्या संध्यांकाळचं तें वातावरण इतकं धुरकट होतं कीं ती आकृति नेमकी कसली आहे हें कांहीं आम्हांला ओळखतां येईना. आम्ही जेवणं उरकलीं आणि शेकोटीच्या भोंवतीं बसलों. विस्तीर्ण माळांच्या प्रदेशांतील तो एकान्त आमच्याभोंवतीं पसरला होता. इतक्यांत स्त्रीपुरुषांच्या हसण्याचे बोलण्याचे अस्पष्ट आवाज आमच्या कानावर आले. आठ दिवसपर्यंत कुठेंही माणसं आम्हाला भेटलीं नव्हतीं. त्यामुळं जवळपास कुठेंतरी माणसं आहेत असा भास होतांच आमच्या मनांत विलक्षण औत्सुक्य निर्माण झालं.

अंधार पडला तेव्हां फिकट चेहेऱ्याचा एक घोडेस्वार टेकडी उतरून तळ्यांतलं पाणी तुडवीत आमच्या तंबूंच्या दिशेनं येत असल्याचं आम्हांला दिसलं. त्या घोडेस्वारानें एक ऐसपैस अंगरखा धातला होता. संध्याकाळच्या दंवानं चिंब झालेली त्याची रुंद फेल्टहॅट त्याच्या कानावरून टपकत होती. या स्वारामागून बळकट बांध्याचा आणि तरतरीत चेहेऱ्याचा दुसरा घोडेस्वार होता—तो आमच्याजवळ आला, आणि त्यानें आमच्या पुढं मैलभर अंतरावर तळ ठोकून राहिलेल्या प्रवाशांच्या तांड्याचे आपण प्रमुख असल्याचं आम्हांस सांगितलं. तो म्हणाला कीं, त्याच्याबरोबर एकूण वीस गाड्या होत्या; आणि त्याच्या तांड्यांतले बाकीचे लोक नील नदीच्या पलीकडच्या कांठावर होते. हे बाकीचे लोक तिथं थांबले होते. कारण त्यांच्याबरोबर असलेली एक स्त्री बाळंत व्हायला आली होती. तिथं ते थांबून तिच्या प्रसूतीची वाट पहात होते. आणि या वेळांत एकमेकांशीं बाचाबाचीहि करीत होते.

आम्हीं गांठलेला असा प्रवाशांचा हा पहिलाच तांडा होता. यापूर्वी प्रत्यक्ष हे प्रवासी आम्हांला भेटलेले नसले तरी त्यांच्या मार्गावर त्यांच्या जीवनांतल्या कांहीं उदास खुणा आम्हांला अनेकदां आढळल्या होत्या. प्रवासांत त्यांच्यापैकीं आजारी पडून मेलेल्या माणसाचं थडगं कधीं कधीं आम्हांला वाटेंत दिसे. या थडग्याच्या आसपासची माती लांडग्यांनीं उकरलेली असे. कांहीं थडगीं या विध्वंसांतून वाचतही असत. एके दिवशीं सकाळीं एका हिरव्यागार टेकडीच्या माथ्यावर आम्हांला एक पाटी दिसली. ती कसली पाटी असावी, याचा विचार

करीत आम्हीं तिथपर्यंत आमचे घोडे नेले. तापलेल्या सळईनं त्या पाटीवर पुढील शब्द कोरलेले होते.

*"मेरी एलिस*
*मृत्यु : ७ मे १८४५*
*वय : १ महिने."*

अशा तऱ्हेच्या या उदास खुणा वारंवार आम्हांला दिसत.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही थोडा उशीराच मुक्काम हलवला. आम्ही मैलभर पुढं गेलों असूं नसूं, इतक्यांत समोरच्या क्षितिजावर माळाच्या कडेला रांगेनं जाणाऱ्या कांहीं आकृत्या आम्हांला अधून मधून दिसूं लागल्या. मध्येंच एखाद्या हेलावणाऱ्या माळामागें त्या आकृत्या नाहींशा होत, आणि कांहीं वेळानें पुन्हां दिसूं लागत. पंधरा मिनिटांनीं आम्हांला या आकृत्या स्पष्ट दिसल्या. स्थलांतरित प्रवाशांचा तो तांडा होता. माणसं, पांढऱ्या रंगाचे संथ सरकणारे गाडे, गुरांचा मोठा कळप यांची रांगच्या रांग चालली होती. पिवळट चेहेऱ्याचे अर्धा डझन मिसुरीयन घोडेस्वार आपसांत भांडत होते. किडकिडीत देहयष्टीच्या या स्वारांनीं तपकिरी रंगाच्या लोकरीचे कपडे घातले होते. त्यांच्या अंगावरच्या त्या कपड्यांकडे पाहतांच तें शिंपीकाम घरच्या बायकांचंच असावं हें उघड दिसत होतं. आम्ही या लोकांच्या जवळ जातांच त्यांनीं आम्हांला विचारलं, "कसं काय? कुठं निघालांत? ऑरेगॉनला कीं कॅलिफोर्नियाला?" आम्ही गाड्यांच्या रांगांना समांतर झालों तेव्हां गाड्यांत बसलेलीं पोरं पांढरे पडदे बाजूला करून आमच्याकडे पाहूं लागलीं. गाड्यांत पुढील बाजूला रेखीव चेहेऱ्याच्या कांहीं पुरंध्री आणि गोंडस मुली बसलेल्या होत्या. आम्हीं जाऊं लागतांच आपलं विणकाम थांबवून कुतूहलाच्या नजरेनं या बाया आमच्याकडे पाहूं लागल्या. या प्रौढ स्त्रियांच्या चेहेऱ्यावर चिंतेच्या खुणा उमटलेल्या दिसत होत्या. सगळा दिवस या बायकांचें विणकाम चालू असे. प्रत्येक गाड्याच्या शेजारून गाड्याचा मालक चालत असे. संथपणें चालणाऱ्या बैलांना पुढे रेटण्याचं काम तो करीत असे. हे बैल आपल्या अवजड चालीनं इंचइंच पुढे सरकत असत. त्या बैलांच्या लेखीं तो जणूं कांहीं न संपणाराच प्रवास होता. त्या तांड्यांतल्या लोकांत घबराटीची भावना आणि आपसांतला बेबनाव या दोन्ही गोष्टी असल्याचं आम्हांला जाणवलं. त्यांच्यापैकीं एक सोडल्यास बाकीचे

सगळे अविवाहितच होते. आम्हांला भराभर पुढे जातांना पाहून हे लोक आमच्याकडे हेवा वाटून पहात. या हेव्यामागं आपण अवजड गाड्यांमुळें आणि जड गतीच्या बैलामुळें कसे अडकून पडलों आहोंत ही भावना होती. या लोकांत आपसांत वेबनाव सुरू झाला होता याचा उल्लेख मीं केलाच आहे. या वेबनावाचे मुद्दे असे होते : कांहीं लोकांना मागं राहिलेला तांडा आपल्याला येऊन मिळेपर्यंत आपण पुढं जाऊं नये असं वाटत होतं. तर त्यांच्यापैकीं कांहींना तांड्याचा प्रमुख होता त्याला पदच्युत करावं असं वाटत होतं. ती जागा आपल्याला मिळावी असं वाटणाऱ्या त्यांच्यापैकीं कांहींनीं या असंतोषांत मुद्दामच् तेल ओतलं होतं. या तांड्यांत असलेल्या स्त्रिया एकीकडे घरच्या आठवणी येऊन उदास होत होत्या; आणि दुसरीकडे रानटी लोक आपल्यावर घाला घालतील कीं काय या कल्पनेनं भीत होत्या.

आम्हीं लवकरच हा तांडा मागं टाकला. त्यांची व आमची आतां पुन्हां गांठ पडणार नाहीं असंच आम्हांला वाटत होतं. परंतु आमच्या एका सोबत्याचा गाडा वाटेंत चिखलांत रूतून बसला. तो बाहेर काढण्यांत आमचा इतका वेळ गेला कीं आम्हीं मागं टाकलेल्या तांड्यानं आम्हांला गाठलं. बाजूच्या टेकडीवरून ते खालीं उतरतांना आम्हांला दिसले. दुपार झाली होती, या जागेवर पाणी व सांवली या दोन्ही गोष्टी होत्या. तेव्हां हा तांडा इथं तळ ठोकणार असं आम्हीं हेरलं. आणि झालंही तसंच. आतां हें सगळं लटांबर आमच्याबरोबर येणार नाहीं या जाणिवेमुळें आम्हांला बरं वाटलं. लवकरच त्या लोकांनीं आपल्या गाड्या वर्तुळाकार उभ्या केल्या. जनावरं चरायला सोडलीं आणि आंबट, उदासवाण्या चेहेऱ्याचे ते लोक सर्पण आणि पाणी शोधण्यासाठीं निघाले. परंतु त्यांना विशेष यश मिळालं नाहीं. आम्हीं निघतांना एक उंच, पोक काढलेला इसम मजजवळ आला. पूर्व अमेरिकेंतले लोक बोलतात तसा तो किंचित् नाकांत बोलत होता. त्याच्या हातांत पाण्यानं भरलेला पेला होता. त्यातलं पाणी दाखवीत मला तो म्हणाला, "हें पाहिलंस का ? सगळं पाणी नुसतं जीवजंतूंनीं भरलेलं आहे." मीं त्या पेल्यांत डोकावून पाहिलं. बारीक बारीक प्राणी व वनस्पति त्यांत तरंगत असलेल्या मला दिसल्या.

आम्हीं टेकडी चढून वर गेलों. टेकडीवरून मागं वळून आम्हीं या तांड्याकडे पाहिलं तेव्हां तिथं कांहींतरी गडबड असल्याचं ध्यानांत आलं. तीं

माणसं गर्दी करून उभीं होतीं आणि तावातावानं कशावर तरी चर्चा करीत होतीं. आमच्याबरोबर 'आर' नव्हता. कॅप्टननं आम्हांला सांगितलं कीं या तांड्याबरोबर असलेल्या एका लोहाराच्या दुकानांत तो घोडयाला नाल मारून घेण्यासाठीं थांबला होता. कांहीं तरी घोटाळा होणार असं उगीचंच आम्हांला वाटलं. तरीपण न थांबतां आम्हीं पुढं निघालों. थोड्या वेळानें त्यांतल्यात्यांत स्वच्छ पाण्याचा झरा आम्हांला लागला. त्या झऱ्याच्या कांठीं जेवण करून विश्रांति घ्यावी म्हणून आम्हीं थांबलों. 'आर'चा अजूनही पत्ता नव्हता. इतक्यांत मैलभर अंतरावर घोडयावरून येतांना 'आर' आम्हांला दिसला. टेकडीच्या माथ्यावर असलेल्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर त्याची आकृति कोरल्यासारखी रेखीव दिसत होती. त्याच्यामागून दुसरी कसलीतरी पांढरी आकृति येतांना आम्हांला दिसली.

"हा टोणगा आपल्याबरोबर काय घेऊन येतो आहे कुणाला ठाऊक!"

कांहीं क्षणांतच तें गूढ स्पष्ट झालं. संथ गंभीरपणें 'आर्'च्या मागून चार मोठे गाडे, बैलांच्या चार रांगा टेकडीच्या माथ्यावरून येतांना दिसूं लागल्या. त्या सर्वांच्या पुढं घोड्यावर बसून 'आर' येत होता. घोड्याला नाल मारून घ्यायला गेला असतांना प्रवाशांतल्या तांड्यांतला वेबनाव निकराला आला होता. त्यांच्यापैकीं कांहीं म्हणत होते पुढें चला, कांहीं म्हणत होते मागें चला, तर कांहीं म्हणत कीं इथंच थांबा. या कटकटीला कंटाळून त्यांचा प्रमुख किअर्सेली म्हणाला कीं तुमचं हें नेतृत्व मला नको. तो चिडून उद्गारला, "तुमच्यापैकीं कोणाला जर पुढं जायचं असेल तर त्यानं माझ्याबरोबर यावं." चार गाडे, दहा पुरुष, एक स्त्री व एक मूल असा हा जायला तयार झालेला गट पुढें निघाला. कांहींतरी आगाऊपणा करणं हा 'आर्'चा स्वभावधर्मच असल्यानें त्यानें या लोकांना आमच्याबरोबर प्रवास करण्याचं आमंत्रण दिलं. मनांत वाटणाऱ्या रेड इंडियन लोकांच्या भीतीमुळं कदाचित् त्यानें या सगळ्या लटांबराचा पत्कर घेतला असेल. नाहींतर हें ओझं बरोबर बाळगायला दुसरं कांहीं कारण असेल असं मला वाटत नाहीं. आमच्याबरोबर आलेले हे लोक वागायला थोडे ओबडधोबड असले तरी मोकळ्या स्वभावाचे, शूर आणि हुशार होते. तुमच्याबरोबर आम्हांला प्रवास करायचा नाहीं असं त्यांना आतां सांगणं शक्य नव्हतं. मी आपलं सहज किअर्सेलीला सुचविलं कीं ओझीं लादलेले त्याचे बैल त्यांच्या अवजड चालीमुळें आमच्या खेचरांबरोबर धावूं शकणार

नाहींत; आणि असं जर झालं तर नाइलाजास्तव या सगळा लोकांना मागं ठेवून आम्हांला पुढं जावं लागेल. मी असं सुचवतांच किअर्सेली ताबडतोब म्हणाला, "बैलांनीं भरभर चाललंच पाहिजे, आणि ते जर चालले नाहींत तर त्यांना कसं चालवायचं तें मी बघेन."

दुसऱ्या दिवशीं दैवयोगानं असं घडलं कीं कॅप्टनच्या गाड्याचा कणा मोडला आणि तो मोठा गाडा झऱ्याच्या पात्रांत रुतून बसला. तो बाहेर काढायला आणि मोडलेला कणा नीट करायला आम्हांला एक दिवस लागला. किअर्सेलीचा आमच्याबरोबरचा तांडा एवढ्या वेळांत पुढं गेला. त्यांनीं आपले बैल इतक्या वेगानं पिटाळले कीं आमच्या कुरकुरणाऱ्या कण्याचा गाडा घेऊन रखडत जात जात जेव्हां आम्हीं जेव्हां त्यांना गाठलं तेव्हां एक आठवडा लोटला होता. आम्ही जेव्हां त्यांना गाठलं तेव्हां दुपारची वेळ होती. प्लाट नदीच्या रेताड कांठावरून ते शांतपणें पुढं चालले होते. हें इतकं सगळं होईपर्यंत मधल्या दिवसांत आम्हांला बरेच अनुभव आले ते इथं सांगितले पाहिजेत.

आमचा हा प्रवास चालू असतांना पॉनी रेड इंडियन आमच्यावर हल्ला करून आमचं सगळ सामान केव्हां लुटून नेतील याचा नेम नव्हता. तेव्हां आम्हीं असं ठरवलं कीं रात्रीच्या वेळीं पहारा बसवायचा. तीन पहाऱ्यांत आम्हीं रात्रीची विभागणी केली. प्रत्येक पहाऱ्याला दोघा जणांनीं बसायचं ठरवलं. पहारा करण्यासाठीं डेस्लॉरिअर्स हा मला जोडीदार मिळाला. सैन्यामधले लोक रात्रभर गस्त घालून जसा पहारा करतात तसा अगदी कडक शिस्तीचा पहारा कांहीं आम्ही करीत नव्हतों. अंगाभोंवती चादर गुंडाळून आम्हीं धुनी पेटवून तिच्यासमोर बसत असूं. पहारा करतां करतां दुसऱ्या दिवशींच्या न्याहारीकरतां काळविटाचं डोकं शिजत ठेवून डेस्लॉरिअर्स स्वयंपाकाचं कामही उरकून घेत असे. परंतु असं असूनही आमच्याबरोबरचे इतर लोक त्यांची पाळी आली कीं जसा पहारा करीत त्याच्याशीं तुलना करतां आम्हां दोघांचा पहारा आदर्श होता असं म्हणावं लागेल. कारण बाकीचे लोक शेजारीं जमिनीवर रायफल टाकून डोक्यावरून ब्लँकेट घेत आणि आपल्या प्रियतमेच्या चिंतनांत मग्न होऊन झोपी जात. कांहीं रेड इंडियन लोक हल्ला करून प्रवाशांचे घोडे आणि खेचरं पळवून नेतात. पण याहून अधिक त्रास ते देत नाहींत. अर्थात् प्रत्येक वेळीं पॉनी रेड इंडियन असा संयम दाखवतीलच हें धरून चालतां येणार नाहीं. परंतु जसजसं पश्चिमेकडे आपण पुढं जाऊं तसतसं पहाऱ्यावरच्या माणसाला

अत्यंत सावधपणें जागं रहावं लागतं. धुनीच्या प्रकाशांत आपलं शरीर दिसणार नाहीं इतकी खबरदारी त्याला घ्यावी लागते. कारण न जाणों, जर का समोरच्या आगीच्या प्रकाशांत त्याचं शरीर दिसलं तर एखाद्या रेड इंडियनाच्या गोळीनं किंवा बाणानं त्याचा वेध घेतलाच म्हणून समजावं. अशा तऱ्हेच्या बळी गेलेल्या लोकांच्या अनेक गोष्टी शेकोटीसमोर बसलों कीं सांगितल्या जात. बॉईसवर्डनं आम्हांला अशी एक गोष्ट सांगितली. ब्लॅकफूट प्रदेशाच्या सीमेवर तो आणि त्याचे कांहीं साथी फांसेपारध करीत होते. त्यांच्यापैकीं एकजण रात्रीं पहाऱ्यावर बसला होता. हा पहारेकरी आतिशय सावध होता. आपलं शरीर आगीच्या प्रकाशांत दिसूं नये म्हणून तो कांहींसा दूर अंतरावर बसून डोळ्यांत तेल घालून पहारा देत होता. इतक्यांत एक काळी आकृति चोर पावलांनीं सरकत सरकत पुढें येत असलेली त्याला दिसली. त्यानं चटकन् आपली बंदूक सांवरली आणि तिचा घोडा ओढला. घोडा ओढण्याचा थोडासा आवाज झाला. तो त्या रेडइंडियनच्या कानीं जातांच त्या रेड इंडियनानें आवाजाच्या अनुरोधानें क्षणार्धांत बाण सोडला. त्याचा शब्दवेधी नेम इतका अचूक होता कीं त्याचा बाण त्या पहारेकऱ्याच्या गळ्यांत घुसून तो गतप्राण होऊन पडला. पहारेकरी खालीं कोसळतांच तो रेड इंडियन मोठमोठ्यानें किंकाळ्या फोडीत, उड्या मारीत पसार झाला.

मी माझ्या पहारेकरी जोडीदाराकडे पाहिलं. कांहीं गडबड झाली तर या जोडीदाराचा आपल्याला कांहीं उपयोग होईल किंवा नाहीं असा विचार माझ्या मनांत चमकून उठला. मीं त्याला विचारलं, "डेस्लॉरिअर्स, रेड इंडियन लोकांनीं जर आपल्यावर गोळ्या झाडल्या तर तूं पळून जाशील का?"

"होय, होय, नक्की जाईन." डेस्लॉरिअर्सनें निश्चयपूर्वक उत्तर दिलं.

त्या क्षणीं वेगवेगळ्या आवाजांत केंकाटणं, भुंकणं, रडणं सुरू होतं. जणूं कांहीं लांडग्यांचा एक समुदायच एकत्र जमला आहे असं वाटावं. डेस्लॉरिअर्सनं त्यांच्या आवाजाची नक्कल करायला सुरुवात केली. आपल्याला प्रतिस्पर्धी निर्माण झाल्याचं पाहतांच ते संगीतकार लांडगे अधिकच जोरानं ओरडूं लागले. थोड्या वेळानं आम्हांला कळलं कीं ते आवाज अनेक लांडग्यांचे नसून एकाच लांडग्याचे होते. वेगवेगळ्या आवाजांत केंकाटणारा हा लांडगा साधारण एकाद्या स्पॅनियल कुत्र्याएवढा होता. आम्हीं पहारा देत होतो तिथून कांहीं अंतरावर तो बसला होता. गवताळ प्रदेशांतल्या लांडग्यांची ती खास जात

होती. या लांडग्यांचीं तोंडं उग्र दिसतात. पण तसे ते निरुपद्रवी असतात. त्यांचा विशेष उपद्रव एकच आणि तो म्हणजे ज्या चामड्याच्या दोरांनीं घोडे खुंटांना बांधलेले असतात तो चामडी दोरा हे लांडगे कुरतडून टाकतात. गवताळ प्रदेशांत या लांडग्याहून अधिक सामर्थ्यवान् असे इतरही अनेक प्राणी फिरत असतात. पांढऱ्या रंगाचा एक मोठा लांडगा असतो. या मोठ्या लांडग्यांनीं घातलेली कुई आम्हांला अधूनमधून ऐकूं येई.

मला डुलकी आली होती. मी जागा झालों आणि बाजूला पाहातों तर डेस्लॉरिअर्स गाढ झोपलेला होता. त्यानं केलेला शिस्तीचा हा भंग पाहतांच मला राग आला. बंदुकीच्या दस्त्यानं ढोंगसून त्याला उठवावं असं मला वाटलं. पण पुन्हां मला दया आली. म्हटलं, "झोपलाच तर झोपू दे, त्याच्या या कर्तव्यच्युतीबद्दल तो उठल्यानंतर त्याला चांगला खडसावूं म्हणजे झालं."

रात्रीं मी घोड्यांजवळ फिरून अधूनमधून त्यांची खुशाली घेत होतों. रात्र अगदीं सर्द काळोखी होती. बर्फगार दंव पडल्यामुळं गवत वाकलं होतं. गज दोन गजांच्या अंतरावर तंबू दिसत नव्हते. खोल श्वास घेणाऱ्या,- झोंपेंत मध्येंच बिचकणाऱ्या किंवा गवत चघळणाऱ्या घोड्यांचा अंधुक आकृतीशिवाय दुसरं कांहींच डोळ्यांना दिसत नव्हतं. गवताळ माळाच्या काळ्या कुट्ट सीमारेषेपलीकडे वणवा पेटल्यासारखा लालसर प्रकाश मला दिसला. थोड्या वेळानं एखादा रुंद ताटलीएवढा तांबडा लाल चंद्र संथपणें काळोखांतून क्षितिजावर येतांना दिसला. धुक्यामुळं तो अधिकच मोठा दिसत होता. चंद्राच्या पुढं छोट्या ढगांचे एक दोन ठिपके तरंगतांना दिसत होते. चंद्राचा प्रकाश त्या खिन्न माळावर पडतांच त्याच्या नको असलेल्या आगमनाचा निषेध लांडग्यांनीं दीर्घ कुई घालून केला. आकर्षक, भीतिदायक असा कांहींसा चमत्कारिक तो वेळ होता. मी आणि आजूबाजूची जनावरं यांखेरीज अनेक मैलपर्यंत कुणालाही त्या वातावरणाचं भान नव्हतं.

असेच कांहीं दिवस लोटले. मजल दर मजल करीत आम्हीं प्लाट नदीपाशीं येऊन ठेपलों. तिथं पोंचल्यानंतर एके दिवशीं सकाळीं दोन घोडेस्वार आमच्याकडे येत असलेले आम्हांला दिसले. गवताळ प्रदेशांतल्या त्या असीम एकांतांत सहसा कोणी भेटत नाहीं. त्यामुळें कुणी नवा मनुष्य दिसला कीं उत्सुकता शिगेला पोंचते. त्या घोडेस्वारांच्या घोडा चालवण्याच्या लकबीवरून ते श्वेतवर्णीय असावे हें सहज ओळखतां येत होतं. या प्रदेशांत फिरणारा गोरा मनुष्य

बरोबर रायफल आळगल्याशिवाय कधींच बाहेर पडणार नाहीं; परंतु येणाऱ्या या माणसांकडे रायफल नव्हती याचं आम्हाला आश्चर्य वाटलं.

हेन्री शॅटिलॉं म्हणाला, "मूर्ख लेकाचे! रायफल घेतल्याशिवाय फिरतात. वाटेंत पॉनी रेड इंडियन भेटले म्हणजे मग चांगलीच अद्दल घडेल जन्माची."

खरी गोष्ट अशी होती कीं समोरून येणारे ते स्वार पॉनींच्या तडाक्यांत सांपडले होते, आणि मरतां मरतां वाचले होते. त्यांच्यापैकीं एकजण माझ्या आणि शॉच्या ओळखीचा होता : कारण पूर्वी तो आम्हांला वेस्टपोर्टला भेटला होता. त्याच नांव होतं टर्नर व त्याचा मित्र मागं राहिलेला बैल शोधण्याकरतां तळ सोडून कांहीं मैल दौडत निघाले होते. निष्काळजीपणा आणि बेपर्वाई या दोन्ही गोष्टी त्यांच्या स्वभावांत असल्यानं त्यांनीं आपल्या रायफली कांहीं बरोबर घेतल्या नव्हत्या. व्हायचं तेंच झालं. सहा रेड इंडियन लोकांनीं त्यांना गांठलं. त्यांच्याजवळ बंदुका नाहींत असं दिसतांच त्या रेड इंडियनांनीं त्यांना घोड्यावरून खालीं उतरण्याचा हुकूम केला. टर्नर पूर्णपणें निःशस्त्र होता. त्याच्या मित्राकडे मात्र खिशांत पिस्तुल होतं. त्यानं चटकन् पिस्तुल काढून त्या रेड इंडियनांवर रोखलं. त्याबरोबर ते रेड इंडियन जरा मागं फिरले. त्याच वेळीं या दोघांच्या सुदैवानं आमचा तांडा कांहीं अंतरावर येत असलेला त्या रेड इंडियनांना दिसला. त्याक्षणीं घोड्यांना टांचा मारून ते रेड इंडियन बघतां बघतां नाहींसे झाले. इतकं सगळं होऊन सुद्धां टर्नर तशाच निःशस्त्र अवस्थेंत पुन्हां पुढं जायला निघाला.

आम्हीं त्यांना सोडलं आणि पुढं निघालों. दुपारीं फिरतां फिरतां आम्हीं पॉनी रेड इंडियनांच्या गांवापासून दक्षिणेकडे जाणाऱ्या वाटेवर जाऊन ठेपलों. प्लाट नदीच्या आसपास राहणारे हे पॉनी या वाटेनं दक्षिणेकडे युद्धासाठीं व शिकारीसाठीं बाहेर पडतात. दर उन्हाळ्यांत हे रेड इंडियन आपल्या बायका, पोरं, घोडे, खेचरं, शस्त्रं आणि हत्यारं, लांडग्यासारखे दिसणारे अनेक उद्दाम कुत्रे असा सगळा लवाजमा घेऊन या वाटेनं जातात. या रेड इंडियनांचे हे कुत्रे दिसतात लांडग्यांसारखेच. भुंकण्याची सुसंस्कृत भाषा त्यांना येत नाहीं. हे कुत्रे लांडग्याप्रमाणेंच कुई घालतात. प्लाट नदीच्या मुखाकडील कांठावर या पॉनी लोकांची हिंवाळ्यांत वस्ती असते. आपलीं घरं त्यांनीं तिथंच बांधलेलीं असतात. परंतु उन्हाळ्यांत हे धोकेबाज लुटारू सर्व गवताळ प्रदेशांत लूटमार करीत संचार करीत असतात. ते करीत असलेली लुटालूट व हजारो खून लक्षांत

घेतां सरकारनें शिक्षेचा जबरदस्त वडगा त्यांचा पाठींत हाणला पाहिजे असंच मला वाटलं.

गेल्या वर्षी डाकोटा जमातींतल्या एका योद्धयानें एक लक्षांत राहील असा पराक्रम एका खेड्यांत गाजवला! रात्रीच्या वेळीं चोरपावलांनीं तो एकटाच एका वस्तींतल्या घरापाशीं आला. धूर जाण्यसाठी या घराच्या छताला मध्यभागीं एक भोंक ठेवलं होतं. त्या भोंकाच्या खालीं घरांत धुनी पेटविलेली असे. धुनी आतां अर्धवट विझली होती आणि माणसं गाढ झोपली होतीं. रात्रीच्या शांत वेळीं हा रेड इंडियन योद्धा त्या भोकांतून घरांत उतरला. त्यानं फुंकरेनं धुनी जरा फुलवली आणि निखाऱ्यांच्या प्रकाशांत आपले बळी नीट निवडून घेतले. मग त्यानें सुरा काढून त्यांना भोंसकलं, आणि त्यांच्या कवटीवरची कातडी केसांसकट कापून घेतली. त्याचा हा क्रूर उद्योग धीमेपणानं चालूं असतांना त्या घरांतलं एक मूल जागं होऊन रडूं लागलं. तेव्हां तो रेड इंडियन युद्धघोषणा देत त्या भोकांतून बाहेर आला, आणि विजयोन्मादानं आपल्या नांवाच्या घोषणा करीत माळावरच्या विस्तीर्ण अंधारांत नाहींसा झाला. या प्रकारानंतर त्या वस्तींतलीं माणसं जागीं झालीं. बायकापोरांनीं एकच रडारड आरंभली. कुत्रीं केकाटूं लागलीं आणि संतापलेले योद्धे मोठमोठ्यानं गर्जना करूं लागले.

आमचा मित्र किअर्सली आतां पुन्हां आम्हांला येऊन मिळाला होता. वर सांगितलेल्या प्रमाणांत जरी नसलं तरी त्यानंही कांहीं पराक्रम गाजवल्याचं त्याच्या तोंडून आम्हांला कळलं. तो आणि त्याच्याबरोबरचीं माणसं शिकारीच्या कलेंत निष्णात होतीं. रायफल चालविण्याचं कसब त्यांना उत्तम अवगत होतं. परंतु या गवताळ प्रदेशाची त्यांना संवय नसल्यानं त्यांच्यांतलं चैतन्य इथें व्हावं तसं व्यक्त होत नव्हतं. त्यांच्यापैकीं कुणीही अजून एकही गवा पाहिला नव्हता. गवा कसा दिसतो आणि कसा वागतो याविषयीं त्यांच्या कांहीं अंधुक कल्पना होत्या. प्लाट नदीवर पोंचल्यावर दुसरे दिवशीं चालतां चालतां पलीकडच्या माळावर अनेक बारीक बारीक काळे ठिपके हलतांना दिसले. त्यांच्याकडे बोट दाखवून किअर्सली म्हणाला, "गड्यांनों, आपल्या रायफली उचला. आज आपण जेवणाला ताजं मांस मिळवूं या." त्यानें दिलेली ही चिथावणी आम्हांला पुरेशी होती. दहा माणसं गाड्या सोडून तत्परतेनें बाहेर आलीं, त्यांच्यापैकीं कांहींजण घोड्यांवर बसले तर कांहीं पायींच निघाले. असा हा सगळा तांडा गव्यांच्या शिकारीला बाहेर पडला. एका उंच गवताळ

टेकडीच्या मागें रानगव्यांचा हा कळप लपल्यामुळें ते त्या टेकडीवर चढले आणि बघतात तों काय ? तीस पॉनी रेड इंडियन गव्यांऐवजीं त्याच्यापुढें दत्त म्हणून उभे ठाकले. भीति आणि आश्चर्य यांचा धक्का उभयपक्षी बसला. त्या रेड इंडियनांजवळ धनुष्य आणि बाण यांच्याखेरीज दुसरीं कांहींच शस्त्रं नव्हतीं. त्यामुळें आतां आपल्या पापांचा घडा भरला असंच त्यांना वाटलं. तावडतोब त्यांनीं या मिसुरियन गटाशीं दोस्ती जोडण्याचं ठरवलं. हस्तांदोलन करण्यासाठीं ते रेड इंडियन उत्सुकतेनं पुढे आले. मिसुरीयन लोकांनाही संघर्ष नकोच होता. त्यामुळें आयती पीडा टळली असं म्हणून तेही खूष झाले.

आमच्यासमोर चढउतार असलेली एक वाळूची लहानशी टेकडी आम्हाला दिसली. त्या दिवशीं आम्ही जवळजवळ दहा तास घोडदौड करीत होतों. संध्याकाळच्या वेळीं या खिन्न दिसणाऱ्या टेकडीमधल्या घळींत आम्हीं शिरलों. तिथून वर चढत चढत आम्ही टेकडीच्या माथ्यावर पोंचलों. ज्याची आम्ही इतके दिवस वाट पहात होतों तें प्लाट नदीचं खोरं आतां आम्हांला दिसूं लागलं. तसं पाहिलं तर तें दृश्य मोठं सुंदर किंवा भव्य होतं असं नव्हे; पण तरीसुद्धां तें दृश्य पाहतांना आम्ही सुखावलों. किती वेगळा, कल्पना थरारून सोडणारा देखावा होता तो ! मैल न् मैल एखाद्या स्तब्ध तलावासारखा माळ पसरला होता. प्लाट नदीचे अनेक फाटे इतस्ततः वाहतांना दिसत होते. मध्येंच एखादा झाडांचा पुंजका दिसे, आणि त्या एकसुरी विस्तारांत एक प्रकारचा जिवंतपणा भासूं लागे. सरकन् धावणारे सरडे सोडल्यास त्या प्रचंड विस्तारावर एकही प्राणी दिसत नव्हता. प्रवासांतला सगळ्यांत कंटाळवाणा असलेला भाग आम्ही संपवला होता. परंतु अजूनही लारामीचा किल्ला चारशें मैलाच्या अंतरावर होता. तिथं जाऊन पोंचायला आम्हाला तीन आठवडे लागले. या काळांत आम्ही विस्तीर्ण रेताड प्रदेशांतून चालत होतों. हा विस्तीर्ण पट्टा जणूं काय रॉकी पर्वतांपर्यंत पसरलेला असावा असं आम्हाला वाटूं लागलं. डाव्या उजव्या हाताला वाळूच्या टेकडया आणि मध्यें मैल दोन मैल घळी अशीं दृश्यं आम्हाला वाटेंत दिसत. या टेकडयांपलीकडे शेकडों मैल रेताड माळ पसरलेला असे. या माळाच्या एका बाजूला अर्कानसास् आणि दुसरीकडे मिसुरीचा प्रदेश होता.

जिथें पहावं तिथें नुसता विस्तार, एकसुरी विस्तार. कधीं सूर्याच्या प्रखर उन्हानं तापलेला तर कधीं लांब खरखरीत गवताचा बुरखा घेतलेला. ठिकठिकाणीं

गव्यांच्या कवट्या व हाडं पडलेलीं होतीं. जिथं मातींत गवे लोळले होते तिथं खोलवटे तयार झाले होते. टेंकड्यांच्या मधें असलेल्या दऱ्यांतून खोल उतरत्या वाटा होत्या. या वाटांवरून प्लाट नदीवर पाणी पिण्यासाठीं गव्यांचे कळप दिवसांतून दोनदां रांगेनं जातयेत. नदीचा एक फाटा या घळीमधून वहात होता. अर्धा मैल रुंद आणि साधारण दोन फूट खोल असा हा फाटा आहे. या फाट्याच्या कांठाशीं सहसा झाडंझुडपं दिसत नाहींत. ते कांठ नुसतेच रेताड आहेत. नदीच्या पाण्यांत इथं इतकी वाळू मिसळलेली असते कीं पाणी प्यायला लागलं तर ती दांताखालीं करकरत वाजते. हा सगळा पट्टा एकसुरी असला तरी जंगली जनावरं आणि रानटी माणसं यांच्या येण्याजाण्या-मुळें या खोऱ्याला जिवंतपणा येतो. धाडसी प्रवाशाला या प्रदेशांत रस वाटतो तो यामुळेंच. इथें प्रवास करून परतल्यानंतर असा क्वचितच एखादा मनुष्य असेल कीं ज्याला आपल्या घोड्याकडे व बंदुकीकडे पाहतांना या प्रदेशांत घालवलेल्या दिवसांची याद येत नसेल.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं गलिच्छ दिसणाऱ्या रेड इंडियनांची एक मिरवणूकच्या मिरवणूक आमच्या तंबूतळाच्या दिशेनं येतांना दिसली. हे सगळे लोक घोडे हातांत धरून चालत येत होते. खांद्यावर टाकलेलं गव्याचं जुनाट कातडं आणि एक लंगोटी एवढाच त्यांचा पोषाख होता. त्यांनीं आपलीं डोकीं तुळतुळीत केलीं होतीं. केसांची एक ओळ मात्र कपाळापासून डोक्याच्या टोंकापर्यंत त्यांनीं ठेवली होती. तरसाच्या पाठीवरच्या केंसासारखी ती दिसे. गव्याचं सुकवलेलं मांस त्यांनीं किरकोळ दिसणाऱ्या आपल्या घोड्यांच्या पाठीवर लादलं होतं. प्रत्येकाच्या हातांत धनुष्यबाण होते. गवताळ प्रदेशांतल्या रानटी जमातीचा हा पहिला नमुना आम्ही पहात होतों.

पॉनी जमातींतले रेड इंडियन ते हेच. आदल्याच दिवशीं त्यांची व किअर्सलीची गांठ पडली होती. गवताळ प्रदेशाच्या आसपास शिकारीच्या निमित्तानं ते संचार करीत होते. रेड इंडियनांची ही मिरवणूक आमच्या तंबूपासून आमच्याकडे न पाहतां फर्लांगभराच्या अंतरावरून पुढं गेली. या रेड इंडियनांच्या मनांत जेव्हां कांहीं काळंबेरं असतं किंवा आपल्या अंगावर शेकेल असं त्यांना वाटत असतं तेव्हां ते अशा रीतीनं वागतात. मी पुढें झालों आणि त्या टोळीच्या प्रमुखाला गांठून त्याच्याशीं दोस्तीची बातचीत केली. त्याला अर्धा पौंड तंबाखू भेट म्हणून दिला. या अकारण मिळालेल्या


भेटीमुळं तो टोळीप्रमुख खूष झाला. आमच्या अगोदर जो प्रवाशांचा तांडा येथें पोंचला होता त्यांच्यापैकीं एकाला या टोळीनं हल्ला करून ठार केलं होतं. त्या प्रवाशांपैकीं थोडया अधिक अंतरावर असलेले दोघेजण घोडयाला चाबूक मारून पळून जाऊं लागले. त्यांपैकीं एकाच्या पाठींतून अनेक बाण आरपार मारून त्याला या रेड इंडियनांनीं खालीं पाडला. तो दुसरा मनुष्य कसाबसा सुटला आणि त्यानें तळावर येऊन झालेली गोष्ट सांगितली. तळावरच्या प्रवाशांचा तांडा इतका भ्याला कीं बरेच दिवस ते लोक तेथून हलले नाहींत. त्या मेलेल्या माणसाचं प्रेतसुद्धां शोधण्याचा त्यांनीं प्रयत्न केला नाहीं.

न्यू इंग्लंडमधली हवा प्लाटवरील हवेच्या तुलनेनं कितीतरी सौम्य व सम असते. या आजच्याच सकाळचं उदाहरण घ्या. आधीं सूर्य आपल्या उन्हानं भाजून काढीत होता. इतक्यांत अचानक पश्चिमेकडून काळोख पसरूं लागला. पहातां पहातां वादळ व गारा यांचा मारा सुरूं झाला. वादळ इतक्या सैतानी वेगानं घोंगावूं लागलं कीं तें सुयांचंच वादळ असावं असं आम्हांला भासूं लागलं. घोड्यांनीं विलक्षण नाराजीनं आपले मोहरे वादळापासून फिरवले. फटकारलेल्या कुत्र्याप्रमाणें शेंपट्या घालून ते कुडकुडत उभे राहिले. लांडग्यांच्या समूहगर्जनेपेक्षांही मोठ्यानं घोंगावणारं तें वादळ संतप्त गतीनं आमच्या अंगावरून वहात होतं.

हिंवाळी वादळानं पक्ष्यांची दाणादाण उडावी तशी राइटच्या खेचरांची गत झाली. आम्हीं सगळे घोडयांच्या मानेजवळ झुकलों आणि पावसापासून आमचं संरक्षण करण्याचा प्रयत्न करूं लागलों. कॅप्टननं एकदां कोटाच्या कॉलरमधून वर तोंड करून आमच्याकडे पाहिलं. त्याचा चेहेरा रक्ताळल्यासारखा लाल झाला होता. चेहेऱ्याचे स्नायू वेदनेनं पिळवटल्यामुळं त्याचे दांत विचकल्या-सारखे दिसत होते. तो कांहीतरी पुटपुटला. घर सोडून या प्रवासाला निघायचं ज्या दिवशीं त्यानं ठरवलं त्या दिवसाला उद्देशून त्यानं शिव्या हासडल्या असाव्या असा आम्ही तर्क केला. थोड्या वेळानें वाऱ्याचा जोर कमी होतांच आम्ही कसेबसे तंबू ठोकले आणि तो सबंध उदास, उग्र दिवस तंबूतळावरच घालवला. स्थलांतरित प्रवाशांच्या त्या तांड्यानं आमच्या तळापासून कांहीं अंतरावर आपला तळ ठोकला होता. आम्हीं तिथं अगोदर पोचल्यामुळं मिळण्याजोगं सर्व सर्पण आम्हीं आधींच गोळा केलं होतं. त्यामुळें आम्हीं पेटवलेली शेकोटी झकासपैकीं जळत होती. थोड्या वेळानं आमच्या शेकोटी

भोंवती झिमझिमणाऱ्या पावसांत कुडकुडणारीं कांहीं माणसं येऊन उभीं राहिलीं. त्यांच्यापैकी दोघेतिघे मिश्र रक्ताचे होते. रॉकी पर्वताच्या परिसरांत फासेपारध करीत आणि फर कंपनीशीं व्यापार करीत ते बेछूटपणें जगत असत. या सगळ्यांचे पूर्वज मूळ कॅनडांतले असावे. अनेक वादळांचे तडाखे खाऊन त्यांचे चेहेरे उग्र, कठोर बनले होते. त्यांनीं घातलेल्या पांढऱ्या ओव्हरकोटा-खालून त्यांच्या झुडपासारख्या मिशा डोकावत होत्या. त्यांच्याकडे पाहतांच या मिशांचे व चेहेऱ्यांचे मालक कसलेंही क्रूर कर्म करतील असंच क्षणभर वाटे. आणि त्यांच्यापैकी बरेच जण अशाच स्वभावाचे होतेही !

दुसऱ्या दिवशीं आम्हीं किअर्सलीच्या गाड्यांना गांठलं. त्यानंतर जवळजवळ दोन आठवडेपर्यंत आम्हीं बरोबरच प्रवास केला. आमच्या या सहप्रवासाचा एक फायदा आम्हाला झाला. आमची सर्वांची मिळून संख्या आतां मोठी असल्यानं रात्रीच्या पहाऱ्याची पाळी एकदां संपली कीं दुसरी पाळी येईपर्यंत मध्यें बराच काळ जाऊं लागला.



# ७ | गव्यांचं दर्शन

प्लाटच्या परिसरांत चार दिवस घालवले, पण एकाहि गव्याचं दर्शन झालं नाहीं ! गेल्या वर्षी इथं अनेक गवे फिरकल्याच्या खुणा दिसत होत्या. सर्पणासाठीं आजूबाजूला लाकडं मिळत नसल्यानं आम्हीं झुडपांच्या काटक्या तोडून त्यावरच भागवलं. एके दिवशीं सकाळीं आमच्या गाड्या तळ सोडून पुढं निघाल्या होत्या. मी आणि शॉ घोड्यावर स्वार झालों होतों; परंतु हेन्री शॅटिलॉं मात्र पायांची फुली घालून विझलेल्या निखाऱ्यांसमोर बंदुकीच्या घोड्याशीं चाळा करीत बसला होता. त्याचा काटक घोडा शेजारींच होता आणि त्याच्या डोक्यावरून पलीकडे पहात होता. शेवटीं एकदां हेन्री उठला. त्यानें घोड्याची मान थोपटली. आपल्या घोड्याचा गुणांविषयीं त्याला भलताच विश्वास असल्यामुळं त्यानं नांव "पांचशें डॉलर" असं ठेवलं होतं. घोड्याला थोपटून उदास मनानं हेन्री त्यावर स्वार झाला.

"काय झालं हेन्री ?"

"मला एकाकी वाटतंय् ! मी तिथं पूर्वी कधींच गेलेलों नाहीं. पण मला असं वाटतं कीं पाण्यांत घुसलेल्या टेकड्या आहेत ना त्यांच्या पलीकडच्या माळावर गव्यांचे काळे थवेच्या थवे फिरत असावेत." दुपारीं मी आणि

हेन्री एका काळविटाच्या शोधांत आमच्या बरोबरील लोकांच्या थोडं पुढं गेलों. इतक्यांत उजव्या बाजूला मैल दोन मैलांच्या अंतरावर उंच पांढऱ्या गाड्या आणि त्यांच्याबरोबरचे काळ्या ठिपक्यांसारखे दिसणारे घोडेस्वार आमच्या दृष्टीला पडले. हा तांडा इतक्या हळू जात होता कीं दुरून तो स्तब्ध असल्यासारखाच भासत होता. त्यांच्या डाव्या बाजूला उन्हांत रापलेल्या एकाकी वाळूच्या टेकड्यांची तुटक रांग दिसत होती. माळावर दाट उंच गवत उगवलं होतं. वाऱ्याच्या झुळुकीबरोबर तें गवत हले आणि आमच्या घोड्यांच्या पोटांना चाटून जाई. आजूबाजूला काळविटांचा व लांडग्यांचा संचार सुरू होता. लांडग्यांनीं उड्या मारल्या कीं त्यांच्या केंसाळ पाठी अधूनमधून दिसत. काळवीट कधींमधीं त्यांच्या भाबड्या कुतूहलामुळें आमच्याकडे येत. ते जवळ आले कीं त्यांचीं शिंगं व पांढरे गळे गवतांतून दिसत. आपले काळेभोर डोळे आमच्यावर रोखून ते कुतूहलाने पाहूं लागत.

मी घोड्यावरून खालीं उतरलों. आणि गम्मत म्हणून लांडग्यांवर गोळ्या झाडल्या. हेन्री आजूबाजूचा प्रदेशाचं अत्यंत काळजीपूर्वक निरीक्षण करीत होता. इतक्यांत तो एकदम ओरडला आणि समोर दिसणाऱ्या वाळूच्या टेकड्यांकडे बोट दाखवीत त्यानें मला स्वार व्हायला सांगितलं. आमच्यापासून मैल दीडमैल अंतरावरील त्या टेकडीवर काळे ठिपके सरकतांना आम्हांला दिसले; आणि थोड्या वेळानें ते टेकडीमागें गेले. "चला, जाऊं या." असं म्हणून हेन्रीनें घोड्याला जोरांत टाच मारली आणि तो दौडत निघाला. मीहि त्याच्या मागून निघालों. कांहीं वेळानंतर दाट वाढलेल्या गवतांतून वाट काढीत आम्ही त्या टेकडीच्या पायथ्याशीं पोंचलों.

दोन टेकड्यांच्यामध्यें एक खोल दरी होती. ही दरी रुंद होत होत पलीकडच्या माळाला मिळाली होती. आम्हीं त्या दरींत उतरलों. आमच्या भोंवतालीं उदास दिसणाऱ्या वाळूच्या टेकड्या होत्या. अर्ध्या अधिक टेकड्यांवर झाडझुडप कांहींच नव्हतं. कांहीं टेकड्यांवर मात्र गवताचे पुंजके, राठ झुडपं आणि सापासारखा दिसणारा निवडुंग उगवलेला दिसत होता. या टेकड्यांवर घाव पडावेत तशा मधूनमधून घळी होत्या. अचानक आकाश काळ्या ढगांनी झांकळून गेलं. थंडगार वादळी वारे वाहूं लागले. ती तिथलीं विचित्र आकाराचीं झुडपं आणि त्या शुष्क टेकड्या या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर अधिकच वैराण व एकाकी दिसूं लागल्या. परंतु हेन्रीच्या चेहेऱ्यावर उत्सुकता दाटून आली होती. खोगिरा-

खालीं ठेवलेल्या गव्याच्या कातड्याचा एक केस त्याने उपटून काढला, आणि वाऱ्याची दिशा पाहण्याकरतां तो हवेंत फेकला. तो केस आमच्यासमोर उडाला, याचा अर्थ त्या दिशेलाच जनावरं होतीं हें उघड होतं. अधिकाधिक वेगांत निघून आतां त्यांच्याजवळ जाऊन ठेपणं अवश्य होतं.

त्या दरींतून आम्ही धडपडत वर चढलों. आम्ही एका सापासारख्या वळत वळत टेकडीवर चढणाऱ्या घळींत उतरलों. ती घळ इतकी खोल होती कीं आम्ही त्या घळीच्या उताराशीं गेलों. इतक्यांत हेन्रीनें झुडपांतून पलीकडे पाहिलं आणि चटकन् लगाम ओढून घोडा थांबवला. हेन्री घोड्यावरून खालीं उतरला. पाव मैल अंतरावर असलेल्या टेकडीवर संथ, गंभीर चालीनें रांग धरून जाणारा गव्यांचा कळप आम्हांला दिसला. रुबाबांत पावलं टाकीत प्रचंड आकाराचीं ती जनावरं दरीपलीकडे जात होतीं. आपल्या शत्रूंच्या बाबतींत तीं पूर्णपणें बेसावध होतीं. क्षणार्धांत हेन्री जमिनीवर पडून गवतांतून व कांटेरी झुडपांतून त्या गव्यांच्या दिशेनें हळूहळू पुढें सरपटूं लागला. माझी आणि त्याची अशा दोन्ही रायफली त्याच्याकडेच होत्या. त्याचा घोडा धरून मी उभा होतों. बराच वेळ शांतता होती आणि नंतर अकस्मात् एकामागून एक दोन्ही रायफलींचे दोन बार ऐकूं आले. गव्यांचा तो कळप उधळला आणि टेकडीपलीकडे जाऊन दिसेनासा झाला. हेन्री उभा राहून त्यांच्याकडे टकाटका पाहूं लागला.

"नेम चुकला गड्या!" मी म्हणालों.

"होय, खरं आहे. आतां निघूं या पुढं!" तो त्या घळींत उतरला, त्यानें बंदुका भरल्या आणि पुन्हां घोड्यावर स्वार झाला. जिथें त्या गव्यांची रांग होती तिथपर्यंत आम्ही चढून गेलों. आम्ही तिथें पोंचलों तेव्हां गव्यांचा कळप दृष्टिआड झाला होता. परंतु बाजूला गवतावर एक गवा मरून पडलेला होता, आणि दुसरा मरणाच्या वेदनांनीं तडफडत होता.

"कसा नेम चुकला तें पाहिलंस का?" हेन्री म्हणाला. त्यानें जवळजवळ दीडशें यार्डांच्या अंतरावरून या गोळ्या झाडल्या होत्या. या दोन्ही गोळ्या गव्याच्या बरगड्यांतून आरपार गेल्या होत्या. गव्यांच्या शिकारींत बंदुकीचा नेम गव्यांच्या बरगडीवरच धरावा लागतो.

काळोख वाढूं लागला आणि वादळाचा झपाटा सुरूं झाला. त्या मेलेल्या गव्यांच्या शिंगांना आम्हीं आमच्या घोड्यांचे लगाम बांधले. हेन्रीनं चाकू

काढला आणि जाणकाराच्या कसबानं शिकारीच्या बळींच्या कापाकापीला सुरुवात केली. मला तें जमत नव्हतं, पण मीहि त्याचं अनुकरण करूं लागलों. कापलेलं मांस चामड्याच्या वाद्यांनीं बांधून तो गठ्ठा मी घोड्यावर लादूं लागलों तेव्हां माझा घोडा हेण्ड्रीक भयानें थरारून मागें वळला. बराच वेळ प्रयत्न करून आम्हीं त्याच्या भीतीची ही आडकाठी दूर केली. खायला उपयोगी पडण्याजोगं होतं तेवढं सगळं मांस आम्ही घोड्यावर लादलं आणि परतलों.

घळी आणि दऱ्या यांच्या चक्रव्यूहांतून आम्ही बाहेर पडतों तोंच बोच-कारणाऱ्या गारांचा वर्षाव सुरू झाला. त्या गारांनीं आमचीं तोंडं झोडपलीं जाऊं लागलीं. खरं म्हणजे सूर्यास्त व्हायला अजून तासाभराचा अवकाश होता. जड ओझं लादल्यामुळें आमचे घोडे दुडक्या चालीनें धक्के देत चालले होते. या त्यांच्या चालीनें आमच्या अंगांत थोडी ऊब निर्माण होत होती. खरं म्हणजे गारांच्या या पावसांत आम्ही त्यांना दौडवत होतों या गोष्टीला त्यांनीं विरोध करण्याचा प्रयत्न केला. परंतु आमच्या हातांतल्या चाबकांच्या प्रेमळ आग्रहापुढें त्यांचं कांहीं चालेना. तिथं माळावरची जमीन सपाट व कठीण होती. गवताळ प्रदेशांतल्या कुत्र्यांची वसाहत तिथं चांगलीच भरभराटलेली असावी; कारण त्यांनीं ठिकठिकाणीं आपलीं बिळं केलेलीं दिसत होतीं. त्यांच्या तोंडांशीं उकरलेल्या मातीचे छोटे ढिगारे दिसत होते. एकाहि कुत्र्याचं केंकाटणं ऐकूं येत नव्हतं. त्यांच्या त्या वसाहतींतल्या एकाहि नागरिकाचं तोंड दिसत नव्हतं. आम्ही पावसांत कुडकुडत होतों आणि हे सगळे कुत्रे आपापल्या बिळांत जराहि न भिजतां आराम करीत होते या गोष्टीचा आम्हाला हेवा वाटला.

तासभर घोडे दामटीत आम्ही पुढें झालों तेव्हां पावसांतून आमचे तंबू आम्हाला अंधुक अंधुक दिसूं लागले. वाऱ्यानं तंबूच्या एका बाजूला फुगवटा आला होता आणि दुसरी बाजू खप्पड दिसत होती. अस्वस्थ झालेले घोडे कुडकुडत बाजूला उभे होते. अर्धवट कोळपलेलीं तीन झाडं तंबूच्या बाजूलाच होतीं आणि त्यांच्या फांद्यांतून वारा भेसूर शीळ घालीत होता. तंबूच्या दाराशीं शॉ तोंडांत पाईप घेऊन आणि हातांची घडी घालून कुटुंबप्रमुखासारखा बसला होता. त्याच्या समोर आम्ही आणलेल्या मांसाचा ढिगारा टाकतांच तो थंड समाधानानं चिंतनशील होऊन त्याकडे पाहूं लागला. अंधारी भीतिदायक रात्र पडली. परंतु दुसऱ्या दिवशीं सूर्य उगवला तेव्हां जीवघेणी उष्णता जाणवूं

लागली. एक गवा मद्द गंभीरपणानं पाणी पिण्यासाठीं म्हणून माळावर आला होता. त्याचा मागोवा घेण्याचं या उष्णतेमुळं कॅप्टननं टाळलं. एवढ्या एका गोष्टीवरून प्लाटवरची हवा कशी असेल याची सहज कल्पना येईल.

परंतु कॅप्टनची ही वीरवृत्ती, त्याचा शिकारी उत्साह केवळ हवेमुळेंच दबला होता असं नव्हे. आदल्याच दुपारीं कॅप्टन आपल्याबरोबरच्या लोकांना घेऊन शिकारीसाठीं निघाला होता. परंतु खूप दौड करूनहि त्यांना कांहींच मिळालं नव्हतं. झालं मात्र एवढंच कीं, सॉरेलनें बेछूटपणं धावडवल्यामुळें त्यांचा एक उत्तम घोडा जखमी झाला होता. त्याचं असं झालं कीं, गोळी लागून जखमी झालेला एक गवा जिवाच्या आकांतानं पळत सुटला. सॉरेलनें मागचापुढचा विचार न करतां घळींतून व खडकांतून त्याच्यामागं भरधांव वेगानं आपला घोडा घातला. घोडदौड कशी करावी याविषयीं कॅप्टनच्या कल्पना युरोपियन होत्या आणि सॉरेल तर रॉकी पर्वतांतल्या एखाद्या बेछूट स्वाराप्रमाणं दौड करीत होता. शेवटीं व्हायचं तेंच झालं. घोडा जबर जखमी झाला. तो घोडा होता 'आर'चा. सॉरेलला मनांतून 'आर' मुळींच आवडत नसे. सॉरेलच्या दौडीचा हा प्रकार पाहून कॅप्टन चकितच झाला. कॅप्टननेंहि आपला घोडा त्या गव्यामागं घातला होता. परंतु जमीन घोडदौडीला अत्यंत वाईट असल्यानें उत्तम घोडेस्वार असूनहि कॅप्टननें तो बेत सोडून दिला होता.

"ते पहा, पॅपिन आणि फ्रेड्रिक लारामीवरून आले आहेत." हेन्री ओरडला. टेहेळणीची दौड करून नुकतेच आम्हीं आलों होतों. ही भेट होणार याची अटकळ कांहीं दिवसांपासून आम्हांला होतीच. गेल्या वर्षी व्यापारांत घेतलेल्या गव्यांच्या कातड्यांचे ढिगे होडींत लादून ही मंडळी आली होती. माझ्याबरोबरच्या सामानांत पॅपिनला देण्यासाठीं एक पत्र होतं. मी हेन्रीला होड्या थांबवून ठेव असं सांगितलं आणि तें पत्र आणण्याकरतां आमच्या गाड्यांच्या दिशेनें निघालों. आमच्या गाड्या जवळजवळ चार मैल पुढं गेल्या होत्या. अर्ध्या तासांत मी त्यांना गाठलं आणि परत आलों. मी येतांच होड्यांच्या आजूबाजूला बरीच माणसं मला दिसलीं. भरपूर माल लादलेल्या त्या एकूण अकरा होड्या होत्या. पाण्याच्या धारेंत वाहून जाऊं नयेत म्हणून किनाऱ्याशीं त्या एकमेकांना खेटून उभ्या केल्या होत्या. होडी वल्हवणारे रापलेल्या वर्णाचे मेक्सिकन होते. मी येतांच त्यांनीं जनावरांसारखीं दिसणारीं आपलीं तोंडें वर केलीं आणि ते मजकडे पाहूं लागले. पॅपिन होडीच्या

मध्यभागीं मालावर झांकलेल्या कॅनव्हासच्या कापडावर बसला होता. त्याचा बांधा वळकट होता. त्याच्या तपकिरी डोळ्यांत मिचकावलेपणाची छटा होती. रुंद हाडपेराचा फ्रेड्रिक सुद्रां आपल्या धन्याच्या बाजूला बसला होता. या दोघांच्या बरोबर डोंगराळ मुलखांतली कांहीं माणसं होतीं. या माणसांपैकीं कांहींजण होडींत बसले होते, तर कांहींजण किनाऱ्यावर फिरत होते. त्यांच्यापैकीं कांहींनीं भडक रंगवलेल्या गव्यांच्या कातड्याचे झगे घातले होते—पोषाखी वृत्तीच्या रेड इंडियनांनीं घालावे तसे. त्यांच्यापैकीं कांहींचे केंस लाल रंगानें दाट रंगवलेले असून ते कपाळावर चिकटवलेले होते. खालच्या दर्जाचे मिश्र रक्ताचे हे लोक होते. त्यांच्याकडे पाहतांच त्यांच्यांत मुख्यत्वेंकरून फ्रेंच रक्तच असावं हें कळत होतं. कांहींचे मिश्र रक्ताच्या रेड इंडियनांचे असतात. तसे सापासारखे डोळे होते. ते सगळे लोक आपल्या ओळखीच्या रेड इंडियनांमध्यें पूर्णपणें मिसळून जाण्याचा प्रयत्न करीत होते हें उघड दिसत होतं.

पॅपिन हा लारामी येथला एक धनी होता. मी जवळ जाऊन त्याच्याशीं हस्तांदोलन केलं आणि त्याला तें पत्र दिलं. नदीच्या ओहोटीची वेळ होती आणि लारामीहून निघाल्याला आतां एक महिना लोटला होता, त्यामुळें पॅपिनला निघण्याची घाई होती. मी पत्र देतांच त्यानें होड्या वळवून पाण्यांत सोडल्या व ते निघाले. त्यांच्या या प्रवासांत दिवसांतून पन्नास वेळां होड्या पाण्यांतल्या रेतीच्या पट्ट्यांत घुसत असत. प्लाट नदींतून प्रवास करणाऱ्या होड्यांचा अर्धा तरी वेळ या पाण्यांतल्या रेतीच्या पट्ट्यांशीं झुंजण्यांत जातो. अशाच खाजगी व्यापाऱ्यांच्या दोन होड्या पाण्यांत एकदां अडकून पडल्या. जवळच पॉनी रेड इंडियनांचं गांव होतं. ते रेड इंडियन टोळधाडी-सारखे जमले आणि त्यांनीं आपल्याला हवा असलेला सर्व माल लुटून नेला. इतकंच करून ते थांबले नाहींत. होडीवर पहारा करायला थांबले होते त्या माणसांना बाहेर काढून खुंटाला बांधून त्यांनीं काठ्यांनीं बेदम चोप दिला. आणि अशा रीतीनें लुटालूट केल्यानंतर आपली करमणूकहि करून घेतली.

त्या रात्रीं आम्हीं नदीच्या कांठावरच तळ ठोकला. आमच्या बरोबरील स्थलांतरितांच्या तांड्यांत शरीराची फाजील वाढ झालेला एक अठरा वर्षांचा मुलगा होता. त्याचं डोकं एकाद्या भोपळ्याएवढं होतं. ताप आणि हींव यांचे झटके येऊन येऊन त्याच्या चेहऱ्याचा रंगहि भोपळ्यासारखा झाला होता. एक जुनाट पांढरी हॅट त्यानें डोक्यावर घातली होती आणि हनुवटीपाशीं

ती रुमलानं बांधली होती. त्याचं शरीर चांगलं बळकट होतं, परंतु त्याचे पाय मात्र चमत्कारिक लांब होते. सूर्यास्ताच्या वेळीं लांब लांब टांगा टाकीत तो टेकडी चढत असल्याचं मीं पाहिलं. तो टेकडीच्या माथ्यावर गेला तेव्हां आकाशाच्या पार्श्वभूमीवर एखाद्या प्रचंड सांडशीसारखा दिसूं लागला. कांहीं वेळानंतर त्याच्या किंकाळ्या आम्हांला ऐकूं आल्या. एखाद्या अस्वलाच्या किंवा रेड इंडियनांच्या तावडींत तो सांपडला असावा असं वाटून आमच्यापैकीं कांहींजण लगबगीनं बंदुका उचलून त्याच्या मदतीस गेले. परंतु जवळ जातांच त्यांना कळलं कीं या किंकाळ्या भयाच्या नसून आनंदाच्या होत्या. लांडग्यांचीं दोन छोटीं पिलं बिळांत जातांना त्यानें पाहिलीं होतीं. तो पोरगा गुडघ्यावर बसून एखाद्या कुत्र्यासारखी त्या बिळांतल्या तोंडावरील माती उकरीत होता आणि आनंदानें किंचाळत होता.

रात्रीं त्या पोरानें तळ असाच दणाणून सोडला. ती वेळ मधल्या पहाऱ्याची होती. आणि पहाऱ्याची पाळी त्या पोराची होती. आपली पाळी येतांच त्या पोरानें गाड्याच्या खालीं जाऊन खोगिराची उशी घेऊन यथास्थित ताणून दिली. तोंड उघडं टाकून मधल्या पहाऱ्याचा हा पहारेकरी गाढ झोपला. आमच्या तांड्यांतला पहारेकरी होता. परंतु या लोकांच्या गुरांकडे त्यांनाच जर त्याची काळजी नाहीं तर आपण तरी कशाला लक्ष द्या असं म्हणून त्यानं फक्त आमच्या घोड्यांखेचरांवरच लक्ष ठेवलं. परिणाम व्हायचा तोच झाला. सकाळ झाली तेव्हां त्या लोकांच्या गुरांच्या कळपांतलं एकही जनावर जाग्यावर नव्हतं. तो पोरगा, त्याचं नांव टॉम, झोपलेला असतांना लांडग्यांनीं सगळीं गुरं हुसकीत हुसकीत दूर नेलीं होतीं.

कटकटींना इथून सुरुवात झाली. 'आर्'नें त्या लोकांना आपल्याबरोबर घ्यायची जी शक्कल काढली होती तिचीं फळं आतां आम्हाला भोगावीं लागणार होतीं. त्या लोकांना अशा अडचणींत टाकून सोडून जाणं बरं दिसलं नसतं. त्यामुळें त्यांच्या गुरांच्या कळपाविषयीं माहिती कळेपर्यंत किंवा तीं प्रत्यक्ष शोधून मिळेपर्यंत त्यांच्याबरोबर थांबणं भाग आहे असं आम्हांला वाटलं. टॉमनें पहाऱ्याच्या वेळीं झोप काढल्यामुळें हा सगळा प्रकार झाला होता; तेव्हां या चुकीबद्दल त्याला कोणती शिक्षा केली असेल असं कुतूहल वाचकांत निर्माण होणं स्वभाविक आहे. गवताळ प्रदेशांतला कायदा असा आहे कीं जो कोणी पहाऱ्यावर असतांना झोप काढील त्यानें सबंध दिवस घोड्याचा लगाम हातांत

धरून चाललं पाहिजे, परंतु त्या प्रवासी तांड्यानं ही शिक्षा टॉमला केली नाहीं. याबद्दल आम्हीं त्यांना दोष दिला. अर्थात् टॉम जरी आमच्या तांड्यांत असता तरीदेखील कसलीहि शिक्षा न होतां सहीसलामत सुटला असता याविषयीं मला तरी शंका नाहीं.

परंतु टॉमच्या तांड्यांतले लोक याहून पुढं गेले. त्यांनीं टॉमला झोपल्याबद्दल शिक्षा तर केली नाहींच, पण पहारा करतांना तो झोपतो म्हणून पहाऱ्याचं कामच त्याला देऊं नये असा ठराव केला. पहाऱ्याच्या वेळीं झोप काढल्याबद्दल जर अशी बक्षिसी मिळणार असेल तर पहारेकऱ्यावर या गोष्टीचा चांगला परिणाम होणं कसं शक्य आहे ? कारण सकाळपासून संध्याकाळपर्यंत प्रवासांत घोडदौड केल्यानंतर रात्रीं थकून झोप येते. अशा वेळीं तुमची पहाऱ्याची पाळी येतांच ज्याची संपली असेल तो पहारेकरी तुमच्याजवळ येतो, रायफलच्या टोकानं तुम्हांला ढोंगसतो, आणि घोगऱ्या झोपाळू आवाजांत तुम्हीं आतां उठलंच पाहिजे असं तुम्हांला सांगतो. आणि मग मध्यरात्रींच्या सुमाराला तीन तास कुडकुडत तुम्हांला पहारा करावा लागतो. हें कुणाला फारसं सुखाचं वाटेल ?

" तो पहा गवा ! तो पहा गवा ! " एक म्हातारा गवा गवताळ प्रदेशांतल्या त्या माणूसघाण्या एकांतांत एकटाच फिरत होता. तो जरी एकटा होता तरी टेकडीमागें आणखी इतर असण्याची शक्यता होती. मी आणि शॉ कंटाळलों होतों. आम्हीं घोड्यावर खोगीर चढवलं आणि हेन्री शॅटिलॉला बरोबर घेऊन शिकारीला निघालों. रायफल बरोबर घेण्यानें ओझं वागवल्यासारखं होईल म्हणून आम्हीं आमचीं पिस्तुलं बरोबर घेतलीं होतीं. हेन्रीला कांहीं शिकारींत भाग घ्यायचा नव्हता. तो आला होता वाटाड्याचं काम करायला. आणि म्हणून हेन्रीनें आपली रायफल बरोबर घेतली. आम्ही जवळजवळ पांचसहा मैल फिरलों. परंतु लांडगे, साप आणि कुत्रे यांच्याखेरीज आम्हांला कांहींच आढळलं नाहीं.

" हें, असं चालणार नाहीं. " शॉ म्हणाला.

" काय चालणार नाहीं ? "

" इथें कुठें लाकूड मिळत नाहीं. जखमी माणसासाठीं जर डोली करायची झाली तर तें लाकडाच्या अभावीं शक्य नाहीं. आणि मला असं वाटतं कीं आपल्यापैकीं कुणाला तरी संध्याकाळपर्यंत डोलींत बसायची पाळी येणार. "

शॉच्या म्हणण्यांत अर्थ होता. कारण जिथून आम्ही चाललों होतों, ती जमीन घोडदौडीला अगदींच वाईट होती. आम्हीं जसजसे पुढें गेलों तसतशी ती अधिकच वाईट होत गेली, कारण टेकड्या, खोल घळया, ओलांडायला अत्यंत कठीण दऱ्या आमच्या सारख्या आड येऊं लागल्या. शेवटीं एका मैलाच्या अंतरावर गव्यांचा कळप आमच्या एकदांचा दृष्टीला पडला. त्या गव्यांपैकीं कांहीं उतारावर चरत होते, तर कांहीं खालच्या रुंद घळींत घोळका करून उभे होते. आम्ही त्यांना दिसूं नये यासाठीं वळसा घेऊन टेकडी चढून गेलों. आम्ही होतों तिथून साधारण एक फर्लांगभर अंतरावर तो गव्यांचा कळप होता. आमची टेकडी आणि तो कळप यांच्या आड कांहीं येत नव्हतं.

टेकडीच्या मागच्या बाजूला आम्हीं घोड्यावरून खालीं उतरलों. खोगीर-बंध सोडवून घेतले. पिस्तुलं तपासून पाहिलीं आणि त्यानंतर टेकडीवर जायला प्रारंभ केला. चौकचालीनें जाऊन त्या कळपाच्या दिशेनें उतरलों. घोड्यांच्या मानेपर्यंत आम्हीं वांकलों होतों. आमचा सुगावा लागतांच टेकडीवरील कांहीं गवे खालीं असलेल्या घोळक्यांत मिसळले आणि ते सगळे एकमेकांना धक्के देत भांगळपणानें उड्या मारीत पळूं लागले. आम्ही आमच्या घोड्यांना टांचा मारल्या. आतां ते गवे भीतीमुळें दोन टेकड्यां-मधून जोरांत पळत सुटले. आम्हीं त्यांच्यामागें अगदीं जवळच होतों. त्यांच्या धावण्यामुळें धुळीचे ढग उसळले होते. त्या धुळीनें आम्हांला गुदमरल्यासारखं झालं. आम्ही जसे अधिक नजिक गेलों तसा त्या गव्यांचा वेग वाढला. आमचे घोडे या कामांत नवीन असल्यानें ते अतिशय बुजल्यासारखे करूं लागले. ते बाजूला वळून जोरांत उड्या मारीत. कळपांत घुसायला ते तयार होईनात.

आतां ते गवे छोट्या छोट्या गटांनीं वेगवेगळ्या दिशेनें वाट मिळेल तिथें पळूं लागले. शॉ कुठें होता तें मला दिसेना. त्यालाहि मी कुठें होतों हें ठाऊक नव्हतं. माझा घोडा पॉंटिॲक एखाद्या बिथरलेल्या हत्तीप्रमाणें चढणी-उतरणीवरून धावत होता. त्याच्या जड टापा एखाद्या घणासारख्या जमिनीवर आदळत होत्या. भीति आणि उत्सुकता या दोन्ही गोष्टींचं मिश्रण या क्षणीं त्याच्यांत दिसत होतं. एकीकडे तो त्या गव्यांच्या भ्यालेल्या कळपाला गाठण्याचा प्रयत्न करीत होता, तर दुसरीकडे त्यांच्याजवळ जाऊन पोचतांच सारखा भिऊन मागं वळत होता. पळणाऱ्या त्या गव्यांचं दृश्य दिसायला कांहीं फारसं

आकर्षक दिसत नव्हतं. त्यांची केंसाळ आयाळ आणि गेल्या हिंवाळ्यांत शिल्लक उरलेल्या पाठीवरील केंसांचे पुंजके ते धावत असतांना वाऱ्यावर उडत होते.

शेवटीं मी माझ्या घोड्याला एका गव्याच्या अगदीं जवळ आणला. टाचा आणि गुद्दे मारून त्याला मी त्या गव्याच्या अगदीं बाजूला आणण्याचा प्रयत्न केला. परंतु तें जमेना तेव्हां त्या कांहींशा गैरसोईच्या जागेवरूनच मी गोळी सोडली. बार ऐकतांच पॉंटिॲक पुन्हां वेगांत मागें वळला आणि त्यामुळें तो गवा थोडा पुढें गेला. मी झाडलेली गोळी जरा मागें बसली. त्यामुळें तो गवा जायबंदी होऊं शकला नाहीं. गव्याला विशिष्ट जागीं जर गोळी लागली नाहीं तर तशा जखमी अवस्थेंतहि तो पळून जातो. आतां तो कळप टेकडीवरून धावूं लागला. पॉंटिॲक दुसऱ्या बाजूनें बेभानपणें धांवत असतांना उजव्या बाजूच्या घळींत शॉ व हेन्री उतरतांना मला दिसले. समोर टेकडीमागें आपल्या शेपट्या उभारून धावणारा तो गव्यांचा कळप दिसेनासा होत होता. धुळीच्या ढगांतून त्यांचे खूर चमकत होते.

त्याक्षणीं शॉ आणि हेन्री यांनीं हांका मारलेल्या मला ऐकूं आल्या. परंतु पॉंटिॲक इतक्या बेभानपणें धावत होता कीं माझ्यापेक्षांहि सशक्त मनुष्य असता तरी त्याला आवरणं शक्य झालं नसतं. एखाद्या चामड्यासारखं त्याचं तोंड संवेदनाशून्य झालं होतं, त्यामुळं लगाम खेंचून फारसा उपयोग नव्हता. त्यांत त्याला घातलेला लगाम होता हलक्या लोखंडी पट्टीचा. मी सहसा कठीण लोखंडी पट्टी लावूनच पॉंटिॲकच्या तोंडांत लगाम अडकवतों. परंतु सकाळीं तोच लगाम माझ्या दुसऱ्या घोड्यासाठीं वापरल्यानें मी हलकी लोखंडी पट्टी लावली होती. ती काढायची तशीच राहून गेली होती. खरं म्हणजे पॉंटिॲक इतका काटक व बळकट घोडा या गवताळ प्रदेशांत दुसरा मिळाला नसता. परंतु गव्यांच्या कळपांचं हें दृश्य नवीन असल्यामुळें तो भ्याला आणि त्यामुळें अनावर वेगानं तो धावत सुटला. टेकडीच्या माथ्यावर मी गेलों तेव्हां एकहि गवा माझ्या दृष्टीला पडला नाहीं. घळींत व दऱ्यांत घुसून ते अदृश्य झाले होते. मी माझं पिस्तूल पुन्हां भरलं आणि तसाच त्यांचा माग काढत निघालों. टेकडीच्या पायथ्याशीं भिऊन पळत असलेला तो कळप पुन्हां मला दिसला. आतां त्यांचं भय थोडं कमी झालं होतं. पॉंटिॲकनें त्यांना गाठलं. पुन्हां तो कळप उधळला गेला. पुन्हां मी पूर्ववत् जोरांत पाठलाग केला. ते गवे सैरावैरा पळूं

लागले. उतारावर धपाधपा धावूं लागले. मी पॅाटिअॅकला सारख्या टांचा मारीत होतों, फटके लगावत होतों पण तो कांहीं केल्या त्या गव्यांजवळ जाईना.

शेवटीं एक गवा कळपाच्या मागं पडला. मी खूप प्रयत्न करून त्याच्यापासून सहा किंवा आठ यार्ड अंतरावर माझा घोडा आणला. त्या गव्याची पाठ घामामुळें काळी दिसत होती. तो जोरजोरानं धापा टाकीत होता. त्यामुळें त्याची जीभ तोंडांतून जवळजवळ एक फूट बाहेर लोंबत होती. पॅाटिअॅकला टांचा मारून मारून शेवटी मी त्या गव्याला गांठलं. अशा वेळीं गवा जें करतो तेंच त्यानं केलं—म्हणजे आपली गती कमी केली, आमच्याकडे वळला आणि संताप व अविश्वास डोळ्यांत आणून आपलं प्रचंड डोकं आमच्यावर रोखून तो हल्ला करण्याच्या पवित्र्यांत उभा राहिला. पॅाटिअॅक फुरफुरला, आणि त्यानं भिऊन मागें उडी मारली. हा सगळा प्रकार इतक्या जलदीनं घडला कीं मी जवळजवळ खालींच पडणार होतों. मी माझं पिस्तुल काढलं आणि त्यानें पॅाटिअॅकच्या डोक्यांत एक तडाखा मारण्यासाठीं म्हणून तें उगारलं. परंतु पुन्हां मी हा विचार बदलला आणि पॅाटिअॅकला फटका न मारतां त्या पळणाऱ्या गव्यावर गोळीं झाडली. मग मी माझा लगाम ओढून घेतला आणि तिथून परतून शॅा व हेन्री यांना गांठण्याचा विचार केला. गव्याचा नाद सोडून आतां परतणं अत्यंत आवश्यक होतं; कारण पॅाटिअॅक जोरजोरानं धापा टाकीत होता. आणि त्याच्या अंगावरून घामाचे मोठमोठे थेंब ओघळत होते. मी गरम पाण्यानं भिजलों आहे असं मला वाटत होतं.

या गव्यांचा सूड पुन्हां कधींतरी घेऊं असा मनाशीं पण करून मी कुठें आहे आणि कुठल्या वाटेनें मला जायचं आहे याचा शोध घेऊं लागलों. भर समुद्रांत जमीन शोधण्यासारखा तो प्रकार होता. मी किती मैल दौडत होतों, कुठल्या दिशेनें आलों होतों याचा मला पत्ता नव्हता. माझ्या सभोंवार गवताळ माळ हेलावत होते. मला वाट मिळूं शकेल अशी कसलीहि खूण दिसत नव्हती. माझ्या गळ्यांत एक छोटंसं होकायंत्र होतं. परंतु या ठिकाणीं प्लाट नदी आपला पूर्वेचा मार्ग पुष्कळच बदलून वहाते हें मला माहीत नव्हतं. त्यामुळें उत्तरेकडे गेलों म्हणजे मी नदीपाशीं पोहोचेन असं वाटत होतं.

उत्तरेकडे मी दोन तास दौड करीत होतों. परंतु प्लाट नदी कांहीं केल्या गवसेना. माझ्या सभोंवतालच्या गवताळ माळांचा निमर्नुष्य विस्तार मात्र हेलावत होता. आतां आपण वाट चुकलों असून धोक्यांत आहोंत हें माझ्या लक्षांत

आलं. मी माझ्या घोड्याला लगाम ओढून आवरलं. माझं जें कांहीं जंगलचं ज्ञान होतं त्याची मी उजळणी करूं लागलों. (जंगलचं ज्ञान हा शब्द गवताळ प्रदेशांत वापरतां आला तर.) माझ्या मनांत असा विचार आला कीं गव्यांच्या पायखुणांचा माग काढीत काढीतच आपण पुढं जावं. लवकरच मी गव्यांच्या खुरांच्या खुणा असलेली वाट शोधून काढली. इथून ते गवे नदीकडे गेले असावेत. माझ्या वाटेला काटकोन करून ही वाट जात होती. मी माझ्या घोड्याला तिथं वळवतांच तो कान उंचावून मोकळ्या गतीनं चालूं लागला. त्यावरून माझी वाट बरोबर असल्याचा अंदाज मला आला.

माझा हा प्रवास एका अर्थानें एकाकी नव्हता. त्या विस्तीर्ण माळावर शेंकडो गवे मला भेटत होते. पुष्कळदां ते उताराच्या वाटेनें रांग धरून जातांना दिसत. कधीं टेकडी लागली कीं तिथें ते धडपडत चढतांना दृष्टीस पडत. दूरवर माळांच्या हेलावणाऱ्या फिकट निळ्या विस्ताराकडे पाहिलं कीं तिथंहि या रानगव्यांच्या कळपांचे ठिपके सरकतांना दिसत. कधींकधीं एखाद्या टेकडीच्या मागें झोपलेले केसाळ म्हातारे गवे मी जवळ जातांच एकदम उडी मारून उठत. गुंतलेल्या आयाळींतून मठ्ठ नजरेनें पहात आणि मग एकदम उधळून धावत सुटत.

या ठिकाणीं काळवीटहि बरेच होते. गव्यांच्या आजूबाजूला असतांना काळवीट जरा धिटाईनंच वावरत असतात. हे काळवीट माझ्याजवळ येत, आपले मोठाले डोळे रोखून मजकडे पहात, आणि मग एकदम उडी मारून एखाद्या शर्यतीच्या घोड्याच्या वेगानं माळावरून पळून जात. कधींकधीं मला या प्रदेशांतल्या कुत्र्यांची वस्ती लागे. हे कुत्रे आपल्या बिळाच्या तोंडाशीं शेपटी हलवीत मोठमोठ्यानं केंकाटत बसलेले दिसत. त्यांनीं आपला पंजा याचना करण्यासाठीं करावा तसा पुढं केलेला दिसे. या कुत्र्यांना आपण कुठं व कोणाच्या संगतींत राहावं याचा कांहींच विवेक नसे. त्यांच्या त्या वस्तींतून लांबलचक पट्टे असलेले मोठमोठे साप ऊन खात बसलेले आढळून येत. त्या तिथंच झाडांच्या फांद्यावर, त्या वस्तीवर जणूं कांहीं हक्क सांगत, डोळ्यांच्या भोंवतीं पांढरीं वर्तुळं असलेलीं लहान लहान लाजरीं घुबडंहि बसलेलीं असत. या सगळ्या प्राण्यांनीं तो प्रदेश गजबजलेला होता. एखाद्या टेकडीवर कसली तरी गर्दी दिसली कीं ते घोडेस्वारच असावेत असं मला वाटे. रेड इंडियन निघतील कीं काय अशी भीति मनांत बाळगून मी त्यांच्याजवळ गेलों कीं तीं माणसं नसून तो गव्यांचा कळप आहे हें माझ्या ध्यानांत येई. या जनावरांच्या एवढ्या मोठ्या घोळक्यांत

चुकूनहि माणसाची आकृती दिसत नसे. गव्यांच्या या वाटेनं मी जसजसा पुढं जात होतों तसतसं माळावरचं दृश्य कमीअधिक प्रमाणांत बदलेलं मला दिसत होतं. एखाद्या सावध गुन्हेगारासारखा डाव्या किंवा उजव्या हाताला न पाहतां एखादा लांडगा सरळ पुढं जात असलेला मला दिसे. आतां माझ्या मनावर चिंतेचं ओझं नसल्यामुळं मी मोकळेपणानं माझ्या आजूबाजूच्या गोष्टी पाहूं शकत होतों. पूर्वेकडे कधीं दृष्टीला पडत नाहींत असें नाना तऱ्हेचे किडे मला इथं दिसले. भडक रंगाचीं फुलपांखरं माझ्या घोड्याच्या डोक्यावरून भिरभिरत जात होतीं. मीं पूर्वीं कधींहि न पाहिलेल्या झुडपांवर विचित्र आकारांचे किडे धातूसारखे चकाकतांना दिसत. अनेक सरडे मातीमधून सरसर पळत होते. नदीजवळ येण्यासाठीं अजून मला खूप चालायचं होतं. गव्यांच्या वाटेवरून बराच वेळ प्रवास केल्यानंतर एका वाळूच्या टेकडीवर उभा असतांना खालच्या दरींत प्लाट नदीचं पाणी फिकटपणें चमकतांना मला दिसलं. मी जिथं उभा होतों तिथून एकहि झाड-झुडूप मला दिसत नव्हतं. सर्वत्र उन्हानं रापलेली वाळूच होती. अर्ध्या तासांत मी नदीच्या जवळपासच्या वाटेवर आलों. माझ्याबरोबरचीं माणसं अजून इथून गेलीं नसल्याचं मला कळलं. त्यांना गांठण्यासाठीं मी पूर्वेच्या दिशेनं वळलों. पॉंटिॲकच्या गतीवरून माझा मार्ग चुकत नसल्याचं मला कळत होतं.

तंबूतळावरून सकाळीं मी बाहेर पडलों तेव्हां माझी प्रकृती बरी नव्हती. सहासात तास सतत घोडदौड केल्यामुळं मी अतिशय थकून गेलों होतों. थोड्याच वेळांत मी थांबलों. खोगीर जमिनीवर पसरलं. त्याची उशी केली, घोड्याच्या लगामाची दोरी हाताला बांधली आणि माझ्या सहकाऱ्यांची वाट पहात, पॉंटिॲकला कुठें जखमा झाल्या आहेत किंवा काय हें न्याहाळत पडून राहिलों. इतक्यांत पांढऱ्या रंगाच्या गाड्यांची रांग दिसली. त्याच वेळीं योगायोगानं समोरच्या टेकडीवरून दोन घोडेस्वारहि येतांना दिसले. ते शॉ व हेन्री होते. सकाळीं त्यांनीं मला खूप शोधलं होतं, परंतु या खडबडीत प्रदेशांत या शोधाचा फारसा उपयोग होणार नाहीं हें जाणून तिथं घोडे बांधून ते झोपीं गेले होते. मला दुरून दिसावं म्हणून त्यांनीं मुद्दामच तिथं घोडे बांधले होते. आमच्याबरोबरच्या प्रवाशांच्या तांड्याचा गुरांचा कळप परत मिळाल्याचं त्यांची भेट होतांच मला कळलं. सूर्यास्त होण्याच्या आंत आम्हीं सगळे आठ मैल पुढं गेलों.

"जून सात अठराशें सेहेचाळीस—चार माणसं बेपत्ता आहेत—'आर्' सॉरेल, आणि त्या प्रवाशांच्या तांड्यांतले दोघे जण. गव्यांची शिकार करण्यासाठीं म्हणून ते सकाळीं बाहेर पडले. अजून त्यांचा पत्ता नाहीं. हरवले कीं मारले गेले हें कळणं कठिण आहे."

माझ्या डायरींत वरील नोंद केलेली मला दिसते आहे. यानंतर आमची बैठक भरून याविषयीं झालेली चर्चाहि मला आठवते आहे. शेकोटीभोंवती आम्हीं जमलों होतों. हेन्री शॅटिलॉ अशा तऱ्हेच्या प्रवासांत मुरलेला असल्यामुळें संकटाच्या वेळीं त्याचाच सल्ला सगळ्यांना महत्त्वाचा वाटे. तो शेकोटीसमोर बसून सांच्यांतून बंदुकीच्या गोळ्या पाडत होता. चिंतामग्न चेहेऱ्यानें कॅप्टन त्याच्याकडे आला. कॅप्टनच्या भाऊ जॅक याच्याही चहेऱ्यावर कॅप्टनसारखीच चिंता दिसत होती. कॅप्टनचे आचारविचार तो अगदी श्रद्धापूर्वक उमटवत असे. कॅप्टनच्या मागोमाग तोहि आला होता. त्या प्रवाशांच्या तांड्यांतले लोकहि एक एक करीत हळू हळू हेन्रीच्या भोंवतीं जमले. ते हरवलेले चौघेजण कुठं असावेत, त्यांचं काय झालं असावं याविषयीं बरीच चर्चा झाली. एक दोघांनीं असं सांगितलं कीं आपण गुरांचा कळप शोधायला निघालों असतांना रेड इंडियन लोक या चौघांचा पाठलाग करीत असलेले आपण पाहिलं होतं. हें ऐकतांच कॅप्टननं अत्यंत गंभीरपणं मान हलवली आणि तो जड आवाजांत म्हणाला, "या भयाण वैराणांतून प्रवास करणं ही खरोखरीच अत्यंत भयंकर गोष्ट आहे." त्याच्या या मताला स्वाभाविकच जॅकनं होकार देण्यासाठीं मान हलवली. याक्षणीं कसलंहि निश्चित मत न देण्याची हेन्रीनं खबरदारी घेतली. तो म्हणाला, "कदाचित् ते गव्यांचा पाठलाग करीत दूरवर गेले असतील; कदाचित् रेड इंडियनांनीं त्यांचे बळी घेतले असतील. नक्की कांहींच सांगतां येत नाहीं."

हें ऐकतांच सगळे श्रोते शांत बसले. त्या प्रवाशांच्या तांड्यांतल्या लोकांना आपल्याबरोबरच्या या लोकांचं काय झालं हें जाणून घेण्याचं कुतूहल होतं; परंतु ते कांहीं फारसे घाबरलेले दिसत नव्हते. हळुहळू ते लोक आपल्या गाड्यांकडे गेले कॅप्टन विचारमग्न पावलं टाकीत आपल्या तंबूकडे वळला. मी आणि शॉ, आम्हीं दोघांनीं कॅप्टनचाच कित्ता गिरवला.



# ८ | लारामीच्या किल्ल्याकडे

आठ जून रोजीं अकरा वाजतां आम्हीं प्लाट नदीच्या दक्षिणेकडच्या फाट्यावर जाऊन पोचलों. पायउतार करून जाण्याची ही ठरलेली जागा आहे. मैलच्यामैल वालुकामय प्रदेश दिसत होता. मधेंच एखाद्या टेकडीवर खरखरीत खुरट्या गवतांचे पुंजके उगवलेले दिसत. परंतु हें सोडल्यास सर्वत्र सूर्याच्या प्रकाशांत झळकणारी वाळूच दृष्टीला पडे. नदीचं पाणी जमिनीच्या पातळीवरूनच वहात होतं. पाणी इतकं कमी होतं कीं तळची वाळू दिसत होती.

नदी रुंद असली तरी इथं तिची सर्वसाधारण खोली फूट अर्ध्या फुटाहून अधिक नाहीं. आम्हीं कांठापाशीं थांबलों आणि झुडपांच्या काटक्यांची आग करून गव्याचं मांस शिजवलं.

पलीकडच्या कांठावर एक लहानसं कुरण होतं आणि तिथं कुठल्यातरी प्रवाशांच्या तांड्याचे तंबू आणि गाड्या दिसत होत्या. पलीकडच्या बाजूला आमच्या बरोबर समोर पाण्याच्या कडेजवळ कांहीं माणसं व जनावरं आम्हांला दिसत होतीं. तिथल्या चार पांच घोडेस्वारांनीं आपले घोडे पाण्यांत घातले आणि दहा मिनटांत पाणी तुडवीत ते नदीच्या रेताड कांठावरून पुढें सरकूं लागले. रापट रंगाचीं, किरकोळ अंगाचीं हीं माणसं दिसायला बरीं दिसत नव्हतीं. त्यांच्या चेहेऱ्यावर त्यांच्या मनांतली चिंता उमटली होती. त्यांचे ओठ घट्ट आवळलेले दिसत होते. त्यांच्या चेहेऱ्यावर दिसणाऱ्या या चिंतेला तसंच कारण होतं. ते इथं आल्यानंतर त्यांच्या पहारेकऱ्यांनीं निष्काळजीपणा केल्यामुळं त्यांची एकशें तेवीस उत्तम गुरं लांडग्यांनीं हुसकावून नेली होतीं. त्यांच्यावरचं हे कांहीं पहिलंच संकट नव्हतं. वस्ती सोडून निघाल्यापासून संकटं त्यांच्यामागं हात धुवून लागलीं होतीं. त्यांच्याबरोबरचीं कांहीं माणसं वाटेंत आजारी पडून मेलीं होतीं; एकाचा पॉनी रेडइंडियनांनीं बळी घेतला होता, एका आठवड्यापूर्वीच त्यांचे सगळे उत्तम घोडे डाकोटा रेड इंडियनांनीं धाड घालून पळवून नेले होते. हे घोडेस्वार ज्या चारपांच किरकोळ अंगाच्या घोड्यावर बसून येत होते, तेवढेच घोडे शिल्लक होते. त्यांनीं आम्हाला सांगितलं कीं प्लाट नदीच्या कांठावर त्यांनीं तळ ठोकला तेव्हां सूर्यास्ताची वेळ होती. त्यांचीं गुरं, घोडें आजूबाजूला चरत होतीं. इतक्यांत पलीकडच्या टेकडीवरून कमींत कमी सहाशें रेड इंडियन घोंगावत आले. त्यांनीं भराभर घोडे ताब्यांत घेतले आणि दोन टेकड्यांच्या मधल्या वाटेने ते नाहींसे झाले.

हे प्रवासी ही गोष्ट आम्हांला सांगत असतांना समोरून चार माणसं आम्हांला येतांना दिसलीं. हीं माणसं म्हणजे 'आर' आणि त्याच्याबरोबर बेपत्ता असलेले तिघेजण होते. त्यांच्यावर कसलंहि संकट कोसळलं नव्हतं. गव्यांचा पाठलाग करीत करीत ते खूप दूरवर गेले होते इतकंच. आपल्याला रेड इंडियन कुठंहि दिसले नाहींत, फक्त "लक्षावधी गवे" आपल्याला दिसल्याचं त्यांनीं सांगितलं. 'आर' आणि सॉरेल या दोघांच्याहि घोड्यांवर गव्यांचं मांस लादलेलं दिसत होतं.

आम्हांला भेटायला आलेले ते प्रवासी नदी ओलांडून परत जायला निघाले; प्रथम आमचे जड गाडे कांठावरून पुढं झाले, आणि मग थोडया वेळानं पात्रांतल्या वाळूंतून हळूहळू पुढं सरकूं लागले. सुरवातीसुरवातीला बैलांच्या खुरापर्यंत कसंबसं पाणी असेल नसेल. थोडया वेळानें मात्र त्यांच्या बरगडयां-पर्यंत पाणी आलं आणि चाकांच्या भोंवती फिरूं लागलं. गाडे इंच इंच पुढं सरकत होते, किनाऱ्यापासून दूरदूर जात होते. कांहीं वेळानं नदीच्या मध्य-भागीं पोंचले तेव्हां ते पाण्यावर तरंगत असल्यासारखे दिसूं लागले.

आम्हांला खरी काळजी होती ती आमच्या खेचरं जुंपलेल्या गाड्यांची. इतक्या जोराच्या प्रवाहांतून या गाडया नेणं कठीण होतं. आम्हीं काळजी करीत त्यांच्याकडे पहात बसलों होतों. नदीच्या मध्यावर पोचतांच या गाडया स्तब्ध ठिपक्यांसारख्या दिसूं लागल्या. गाळांत रुतल्यामुळं चाकं पुढं सरत नव्हतीं. खेचरांचे पाय रुतूं लागले होते. चाकं अधिकाधिक बुडूं लागलीं होतीं. गाडयांच्या खालून पाणी आंत शिरून आंतलं सामान भिजूं लागलं. आम्ही कांठावर बसलेले सगळेजण घोडयावर स्वार झालों आणि या गाडयांच्या मदती-साठीं पाण्यांत शिरलों. पाण्यांत उतरून आम्हीं खेचरांना जोर लावला. बराच प्रयत्न केल्यानंतर गाळांतून चाकं सुटलीं आणि गाडया एकदांच्या पलीकडच्या कांठावर सुखरूप पोंचल्या.

कांठावर पोचतांच कांहीं आडदांड माणसं आमच्याभोंवतीं गोळा झालीं. तसं पाहिलं तर हीं माणसं फारशीं बळकट नव्हतीं; परंतु खूप झगडल्या-सोसलेल्या माणसांवर दिसते तशी ओबडधोबडपणाची कळा त्यांच्यावर दिसत होती. घरीं राहून आपल्याला आयुष्यांत विशेष कांहीं वाव मिळणार नाहीं म्हणून हे लोक गवताळ प्रदेशांत आले होते. जर्मन जंगलांतून बाहेर पडून युरोपवर लोंढ्या-सारख्या कोंसळणाऱ्या, रोमन साम्राज्याला तडाखा देणाऱ्या, कायदा धाब्यावर बसवणाऱ्या त्यांच्या पूर्वजांचं रक्त याहि लोकांच्या अंगांत खेळत होतं—दुप्पट वेगानं खेळत होतं. पंधरा दिवसांनंतर आम्हीं लारामीला असतांना हे दुर्दैवी प्रवासी तिथून जात असलेले आम्हीं पाहिले. एक आठवडाभर त्यांनीं शोध घेऊन देखील त्यांच्या हरवलेल्या गुरांच्या कळपापैकीं एक जनावरदेखील त्यांना परत मिळालं नव्हतं. सामान भरलेले गाडे अशा परिस्थितींत पुढे ओढून कसे नेतां येणार? आणि म्हणून त्या बिचाऱ्यांना आपल्याबरोबरचं बरचसं सामान फेंकून देणं भाग पडलं होतं आणि गाईंना व कालवडींना गाडयांना जुंपावं

लागलं होतं. परंतु त्यांच्या प्रवासांतला अत्यंत दगदगीचा आणि संकटांचा भाग अजून पुढं यायचा होता.

प्लाटच्या कांठावरून प्रवास करतांना कधींतरी जनावराच्या पायासारखे पाय असलेल्या एखाद्या जुन्या टेबलाचे अवशेष वाटेंत पडलेले दिसतात. कधीं चांगल्या ओक वृक्षाच्या लाकडापासून केलेलं, उत्तम पॉलिश लावलेलं एखादं कपाट पडलेलं दिसतं. वसाहतकालीन पूर्वजांच्या संपत्तीचे हे अवशेष असावेत. या फर्निचरनें प्राक्तनाचे किती चढउतार पाहिले असतील! कदाचित् तें फर्निचर प्रथम इंग्लंडमध्यें खरीदलं गेलं असेल. त्यानंतर त्याच्या मालकाचं नशीब ओसरणीला लागतांच ॲलेगनी ओलांडून ओहिओ, किंवा केंटकी आणि त्यानंतर इलिनॉय किंवा मिसुरी असा प्रवास त्याला घडला असेल आणि मग कधीतरी ऑरेगॉनच्या जणूं कांहीं न संपणाऱ्या प्रवासाला निघतांना तें फर्निचर काळजीपूर्वक रचून आपल्या सामानाच्या गाड्यांत ठेवलं गेलं असेल. या प्रवासांत किती तऱ्हांचीं संकटं येतील याची फर्निचरच्या मालकांना कल्पनाहि नसेल आणि शेवटीं तें वाटेंत फेंकून देणं भाग पडलं असेल.

आम्हीं प्रवासाला सुरुवात केली. मैलभर अंतर आम्हीं तोडलं नसेल असेल, इतक्यांत 'आर्' मागून ओरडून म्हणाला, "आपण इथंच तळ ठोकूं."

"इथं कशासाठीं? वर सूर्याकडं पहा! अजून तीन सुद्धां वाजले नाहींत."

"इथेंच तळ ठोकूं!"

'आर'नें हें एवढंच उत्तर देण्याची मेहेरबानी केली. डेस्लॉरिअर्स आपली गाडी घेऊन सर्वांपुढं होता. खेचरं जुंपलेल्या गाड्या वाटेवरून मागं वळतांना पाहतांच तोहि आपल्या बरोबरची गाडी व खेचरं वळवण्याच्या बेतांत होता.

"डेस्लॉरिअर्स, वळूं नको, तसाच पुढं चल." डेस्लॉरिअर्सची गाडी तशीच पुढं चालूं झाली. आम्हीं सगळे चालूं लागतांच तळ ठोकण्याचे बेत करणाऱ्या आमच्या मित्रांच्या गाड्याहि खडखड कुरकूर करीत येऊं लागल्या. गाड्या हाकणारा राइट् खेचरांवर शिव्यांचा वर्षाव करीत होता. वड्याचं तेल वांग्यावर काढण्याचा तो प्रकार होता. आमच्या इंग्लिश मित्रांचा आमच्यावर मुळींच लोभ नव्हता. इतकंच नव्हें, तर आम्हांला चिडवण्याचा आणि आमच्या प्रवासांत अडथळे आणण्याचा त्यांचा अंतस्थ हेतु असावा असं आम्हाला फार वाटूं लागलं. आम्हीं भरभर पुढं जावं अशा मताचे होतों. आमचे हे बेत हाणून पाडण्यासाठीं तो भलभलत्या वेळीं तळ ठोकण्याचा बेत करी. पंधरा मैल प्रवास केला

तरी तो पुरे आहे असंहि तो म्हणूं लागला. आमच्या मताला त्याच्याकडे फारशी किंमत नाहीं हें ध्यानांत येतांच आम्हीं सगळीं सूत्रं आमच्या हातांत घेतलीं. आम्ही सगळ्यांच्या पुढें रहात असूं. त्यामुळें 'आर' रागानं धुमसूं लागे. वेळ आणि स्थळ आम्हांला योग्य वाटे तेव्हांच आम्ही तळ ठोकीत असूं, बाकीचे लोक आमच्यामागून येतील किंवा नाही याचा विचारच आम्हीं बंद केला होता. अर्थात् ही सगळी मंडळी आमच्यामागूनच येत आणि दुर्मुखलेल्या तोंडांनीं आमच्या तंबूशेजारीच आपले तंबू ठोकीत.

अशा तऱ्हेनं एकत्र प्रवास करणं हें आम्हांला सुखाचं वाटेना आणि म्हणून कांहीं वेळानं आम्हीं त्यांच्यापासून वेगळं होऊन प्रवास करायचा असं ठरवलं. पहाटेच्या वेळीं तंबूतळ सोडायचा आणि जातां येईल तितक्या वेगानं लारामीच्या किल्ल्यावर जायचं असं आम्हीं योजलं. कसून दौड केली असतां चार किंवा पांच दिवसांत लारामीला पोंचणं सहज शक्य होतं. कॅप्टन दुडक्या चालीनं आपला घोडा चालवत आम्हां दोघांमध्यें येऊन उभा राहिला तेव्हां आम्हीं आमचा बेत त्याला सांगितला.

"फारच भयंकर बेत आहे, मी खरं सांगतों ऐका," कॅप्टन म्हणाला. त्यांना सोडून आम्हीं पुढं जातों आहों ही गोष्ट अतिशय धोक्याची आहे असंच कॅप्टनला वाटत होतं. आम्हीं थोडं धाडस करून त्याला सुचवलं कीं, आम्हीं आहोंत चौघेजण. आम्हीं गेलों तरी तुम्हीं सोळाजण उरतां. शिवाय आम्ही पुढं गेल्यामुळं जी कांहीं संकटं कोसळण्याची शक्यता आहे असं वाटत असेल ती आधीं आमच्यावर कोसळतील. परंतु इतकं सांगूनहि कॅप्टनच्या चर्येवरचा करडेपणा जराहि ढळला नाहीं. "फारच भयंकर बेत आहे!' असं पुन्हां एकदां म्हणून तो त्याच्या गटांतल्या इतरांबरोबर चर्चा करण्यासाठीं' निघून गेला.

सूर्योदय होण्यापूर्वीच आम्हीं आमचे तंबू गुंडाळले. आमच्याजवळचे उत्तम घोडे आम्हीं गाड्यांना जुंपले. आणि तंबूतळ सोडला. निघण्यापूर्वीं आम्हीं प्रथम आमच्याबरोबर असलेला स्थलांतरित प्रवाशांचा जो तांडा होता त्यांचा निरोप घेतला. आमचा प्रवास संकटरहित व्हावा अशी त्यांची मनःपूर्वक इच्छा होती. त्यांच्या अगदी उलट, तिथं असेहि कांहीं होते कीं ज्यांना आम्ही वाटेंत जर रेड इंडियनांच्या तडाख्यांत सांपडलों असतों तर फार आनंद वाटला असता. कॅप्टन व त्याचा भाऊ टेकडीच्या माथ्यावर उभे होते. धुकं

होतं. त्यामुळं टेकडीवर उभे असलेले ते दोघेजण भुतासारखे दिसत होते. वर उभे राहून खालीं असलेल्या आपल्या घोडयांकडे ते उत्सुक नजरेनें पहात होते. आम्ही निघतां निघतां हात हलवून त्यांचा निरोप घेतला. कॅप्टननें त्याच्या प्रतिष्ठेला साजेल असा रुबाबदार सलाम आम्हांला केला. त्याचा भाऊ जॅक यानं त्याचं अनुकरण करण्याचा प्रयत्न केला, पण त्याला तें तेवढं जमलं नाहीं.

पांच मिनिटांत आम्हीं टेकडीच्या पायथ्याशीं आलों. परंतु इथं आम्हांला थांबणं भाग पडलं. गाडीला जुंपलेला हेण्ड्रीक पाशवी हट्टानं पेटला होता. एक इंच हलायला तो तयार होईना. डेस्लॉरिअर्स त्याला झोडपून झोडपून दमला, परंतु हेंड्रिक एखाद्या खडकासारखा अचल राहिला. रागानं फुरफुरत आपल्याला झोडपणाऱ्या माणसाकडे तो तिरक्या नजरेनं पहात होता. इतक्यांत सूड घेण्याची संधी आतां आलेली आहे असं मनांत येऊन हेण्ड्रीकनं मागच्या पायाची लाथ झाडली. गाडीच्या दांड्यावर बसलेल्या डेस्लॉरिअर्सनं चटकन् हवेंतल्या हवेंत उडी मारली म्हणून तो वांचला. उडी मारण्याचा हा प्रकार फ्रेंच माणसाशिवाय दुसऱ्या कोणाला जमला नसता. आतां मी व शॉ एकत्र आलों आणि हेण्ड्रीकला चांगला ठोकला. अगदीं असह्य होईपर्यंत. तें हट्टी जनावर मार सोसेनासा झाला तेव्हां जोरजोरानं लाथा झाडूं लागलं. आपण सगळी गाडीच उध्वस्त करून टाकणार असाच धाक त्यानं निर्माण केला. आम्हीं सहज मागं वळून पाहिलं. आमच्या पासून स्फूर्ति घेऊन आमच्या इंग्रज मित्रांनीं तंबू हलवायला सुरुवात केली होती. आपले घोडे आणि गुरं ते गोळा करीत होते.

"या घोड्याला बाहेर काढा !" मी म्हणालों.

मी पॉंटिॲकचं खोगीर काढलं. तें हेंड्रीकवर चढवलं आणि पॉंटिॲकला गाडीला जुंपला. "चल पुढं !" डेस्लॉरिअर्स ओरडला. मागं जोडलेल्या गाडीला धक्के देत देत पॉंटिॲक टेकडी चढूं लागला. जणूं कांहीं त्याच्या दृष्टीनं ती गाडी पिसासारखी हल्की हाती. टेकडीच्या माथ्यावर जाऊन आम्हीं पुन्हा मागं वळून पाहिलं तेव्हां आमचे इंग्रज मित्र निघत असलेले आम्हांला दिसले. आतां ते आम्हांला गांठतील याचं आम्हांला फारसं भय उरलं नाहीं. नेहमीची वाट आम्हीं सोडली आणि त्या प्रदेशांतल्या मधल्या अंगानं निघून सर्वांत जवळच्या मार्गानं प्लाट नदीच्या मुख्य प्रवाहाच्या दिशेनं निघालों. वाटेंत एक खोल दरी मधें आली. तिच्या कडेकडेनं आम्हीं

त्यांतल्या त्यांत चांगली वाट शोधून उतरलों. ॲश हॉलो या नांवानं ओळखली जाणारी रेताड घळ ओलांडून आम्ही पुढं झालों. पावसाच्या पाण्याचं एक तळं वाटेंत लागलं. त्याच्या शेजारीं दुपारची विश्रांति घेतली. फार वेळ न थांबतां आम्हीं पुन्हा प्रवासाला सुरवात केली आणि ॲश हॉलोच्या पश्चिमेच्या बाजूला प्लाटनदीचा जो प्रवाह वहात होता त्या दिशेनं घळी आणि दऱ्या ओलांडत निघालों. घोट्यापर्यंत येणारी वाळू तुडवीत आमचे घोडे चालले होते. सूर्य भाजून काढीत होता. माशा आणि डांस यांचे थवे हवेंत उडत होते.

शेवटीं एकदां प्लाटचा प्रवाह आम्हीं गांठला. प्रवाहाच्या कांठाकांठानं आम्हीं पांच मैल गेलों. सूर्यास्ताच्या वेळीं समोर दिसणाऱ्या एका मोठ्या कुरणावर शेंकडो गुरे चरतांना आम्हीं पाहिलीं. गुरांच्या पलीकडे प्रवाशांचा एक तांडा तळ ठोकून राहिलेलाहि आम्ही पाहिला. त्यांच्यापैकीं कांहींजण आमच्याकडे येत असलेले आम्हीं पाहिले. त्यांच्या मनांत आमच्याविषयीं संशयाची भावना असल्याचं त्यांच्या चेहेऱ्यावरून स्पष्ट दिसत होतं. त्यांच्या-पेक्षां वेगळा पोषाख केलेले, वेगळी सामुग्री बरोबर असलेले असे आम्ही चौघेजण होतों. टेकडीवरून आम्ही जेव्हां वर आलों तेव्हां मॉर्मन लोकांच्या तांड्यापैकींच आम्ही असून आघाडीवरून चालत असणार असा त्यांनीं कयास बांधला. वाटेंत आपल्याला मॉर्मन लोक भेटणार असं त्यांना फार वाटत होतं. आम्ही कोण आहोंत हें जेव्हां सांगितलं तेव्हां त्यांचा संशय फिटून त्यांनीं आमचं जिव्हाळ्यानं स्वागत केलं. आम्ही चौघेजणच हा प्रवास करीत आहोंत याबद्दल त्यांनीं आश्चर्य व्यक्त केलं. रेड इंडियन व्यापारी आणि फासेपारधी यांच्याखेरीज या विस्तीर्ण प्रदेशांत इतक्या लहान संख्येनं कोणी फिरत नाहीं असं ते म्हणाले. आम्ही त्यांच्याबरोबर त्यांच्या तंबूतळावर गेलों. त्यांच्या पन्नास गाड्या त्यांनीं वर्तुळाकार उभ्या केल्या होत्या. उभ्या असलेल्या गाड्यांच्या मधें तंबू ठोकले होते. त्यांचे उत्तम घोडे त्यांनीं वर्तुळाच्या आंत बांधले होते. पेटवलेल्या शेकोट्यांच्या प्रकाशानं वर्तुळाचा परीघ उजळला होता आणि त्या प्रकाशांत शेकोट्यांभोंवती गर्दी करून बसलेल्या बायकामुलांच्या आकृत्या उठून दिसत होत्या. हे सगळं कौटुंबिक वातावरण मोठं गंमतीचं आणि वैशिष्ट्यपूर्ण होतं खरं; पण तरीहि आम्हीं लौकरच तेथून पाय काढला. आमच्याभोंवती जमलेल्या मंडळींच्या प्रश्नांच्या सरबत्तीनं जेरीला येऊन आम्हीं काढता पाय घेतला

होता. उत्तर अमेरिकेंतल्या लोकांची कुतूहलवृत्ति यांच्यापुढं कांहींच नव्हे असं आम्हांला वाटलं. आमचीं नांवं, आम्ही कुठून निघालों, कुठं चाललों, कशासाठीं निघालों हे सगळे प्रश्न त्यांनीं आम्हांला विचारले. आम्ही कशासाठीं प्रवासाला निघालों हा यांतला शेवटचा प्रश्न अडचणींत टाकणारा होता. कारण फायद्याशिवाय दुसऱ्या कुठल्याहि हेतूनं मनुष्य तिथंच काय पण कुठंहि प्रवास करूं शकतो या शक्यतेची दखल घ्यायला ते मुळींच तयार नव्हते. अर्थात ही माणसं एकूण तशीं चांगली होतीं, मनमोकळी, उदार व स्वागतशील होतीं. सरहद्द विभागांतला कमींतकमी मागासलेला जो प्रदेश आहे तिथून तीं निघालेलीं असल्यामुळं त्यांच्यांत ही संस्कारिता होती.

आम्हीं त्यांच्या तळापासून जवळजवळ एक मैल अंतरावर आमचे तंबू ठोकले. आम्हीं संख्येनं अगदी कमी असल्यामुळं फार ताण पडेल म्हणून पहारा करण्याची योजना बाद केली. शेकोटीची आग आम्ही विझवली. कारण आग तशीच जळत ठेवली असती तर रेड इंडियनांच्या दृष्टीला आम्ही पडण्याचं भय होतं. बाजूलाच घोडे बांधून ठेवले आणि झोंपीं गेलों. सकाळ होईपर्यंत आमच्या झोपेंत कसलाहि व्यत्यय आला नाहीं. यानंतर तीन दिवसपर्यंत कसलाहि अडथळा न येतां आमचा प्रवास चालला होता. तिसऱ्या दिवशीं संध्याकाळीं स्कॉट्स् ब्लफ या नांवानं ओळखल्या जाणाऱ्या झऱ्याच्या कांठीं आम्ही तळ ठोकला.

मी आणि हेन्री शॅटिलॉं सकाळीं घोड्यावर स्वार होऊन झऱ्याच्या पश्चिमेच्या दिशेनं मैदान ओलांडून पुढं निघालों. इतक्यांत मला कांहीं मैलांच्या अंतरावरील टेंकडीवर गव्यांची रांग चरत असल्याचा भास झाला. हेन्रीनं आपला घोडा थांबवला आणि मैदानाच्या पलीकडे आपल्या सराईत नजरेनं पहात त्यानं ठिपक्यांसारखी दिसणारी रांग कसली आहे हे शोधून काढलं. तो म्हणाला, "रेड इंडियन! ओल्ड स्मोक आणि त्याचे लोक यांचे हे तंबू आहेत. चला आपण जाऊं या." आपल्या "पांचशें डॉलरला" चाबकाचा फटका मारून हेन्री पुढं निघाला आणि मी त्याच्या बाजूनं निघालों.

लवकरच ते काळे ठिपके हळूहळू स्पष्ट होऊं लागले. एक काळा ठिपका दोन मैलांच्या अंतरावरून आमच्या दिशेनं येत होता. कांहीं वेळानं तो घोडेस्वार असल्याचं स्पष्ट दिसलं. एक उघडानागडा रेड इंडियन घोडेस्वार भरधाव वेगानं आमच्याकडे येत होता. आमच्यापासून फर्लांगाच्या अंतरावर आल्यावर

तो उतरला आणि त्यानं घोडा वाटोळा फिरवून त्याच्याकडून कांहीं खुणा करवून घेतल्या. ती खुणांची भाषा अवगत असलेल्या हेन्रीनं आपल्या घोड्याकडून त्याच पद्धतीनं कांहीं खुणा करवून घेतल्या. हेन्री म्हणाला, "मी नाहीं कां सांगितलं कीं ही ओल्ड स्मोकच्या लोकांची वसाहत आहे म्हणून?"

तो रेड इंडियन स्वार आमच्याजवळ येत होता. मधेंच कांहीं क्षण तो पृथ्वीच्या पोटांत गडप झाल्यासारखा अदृश्य झाला. मधेंच लागलेल्या एका घळींत शिरून तो येत होता हें उघड होतं. थोड्याच वेळांत त्याच्या घोड्याचं डोकं दिसूं लागलं, तो आमच्याजवळ आला. भरधाव सोडल्यामुळें धापा टाकणाऱ्या घोड्याला लगाम ओढून त्यानं थांबवलं आणि आमच्याजवळ येऊन आमच्याबरोबर हस्तांदोलन करण्याचा उपचार त्यानं पार पाडला.

या माणसाचं नांव मी आतां विसरून गेलों. त्याच्या समाजांत तो कांहीं विशेष महत्त्वाचा मनुष्य नव्हता. साधा प्रवासांतला पोषाख त्यानं घातला असला तरी त्याचं शरीर आणि त्याची शस्त्रं पाहतांच तो डाकोटा जमातींतला उत्तम योद्धा असावा हें कळत होतं. बहुतेक रेड इंडियन लोकांप्रमाणेंच तो सहा फूट होता. त्याची अंगकाठी बळकट असली तरी लवचिक व रेखीव होती. त्यानं आपल्या अंगातोंडावर रंग थापलेले नव्हते. डोक्यावरहि त्यानं कांहीं घातलं नव्हतं. डोक्याच्या मागें त्याच्या लांब केसांचा पुंजका गोळा झाला होता. त्यानं आपल्या डोक्यावर गरुडाच्या पंखाच्या हाडाची केलेली एक शिटी आडवी बांधली होती. अलंकार आणि जादूचा ताईत असं दुहेरी स्वरूप या शिटीचं होतं. त्यानं आपल्या केसांत पितळी पदकांची निमुळती होत जाणारी माळहि घातली होती. हा थोडासा अवजड वाटणारा अलंकार डाकोटा जमातींतल्या रेड इंडियनांना फार प्रिय असतो. व्यापाऱ्यांकडून खूप किंमत देऊन तो ते विकत घेतात. त्याची छाती व हात उघडेच होते. गव्याच्या कातड्याचा अंगरखा त्यानें घातला होता; परंतु दौडत आल्यामुळें तो घरंगळून कंबरेपर्यंत आला होता आणि पट्ट्याला अडकून राहिला होता. हरणाच्या कातड्याचे रेड इंडियन पद्धतीचे जोडे त्यानें पायांत घातले होते. असा एकूण त्याचा पोषाख होता. त्याच्या हातांत ओबडधोबड दिसणारं पण अत्यंत मजबूत असलेलं धनुष्य होतं. त्याच्या पाठीला लटकवलेला बाणांचा भाता कुत्र्याच्या कातडीचा केलेला होता. त्याच्या घोड्यावरचं खोगीर लांकडी होतं आणि त्याच्यावर कच्चं कातडं पसरलेलं होतं. खोगिराच्या लाकडी सांगाड्याचे

पुढचा आणि मागचा असे दोन्ही खुंट चांगले अठरा इंच उंच होते. त्यामुळं हा योद्धा बळकट बैठकीनं खोगिरावर मांड ठोकून बसू शकत असे. खोगिरबंध तुटल्याखेरीज त्याची ही बैठक कशामुळंही ढळण्यासारखी नव्हती. या माणसाबरोबर आम्ही निघालों. टेकडीच्या माथ्यापाशीं जातांच त्याचीं आणखी कांहीं माणसं तिथं वर्तुळाकार बसलेलीं दिसलीं; या माणसांच्या मागे असलेल्या पलीकडच्या घळींतून बरीचशीं माणसं, बायकापोरं, घोडे येत होते. या घोड्यांच्या पाठीवर तंबूच्या काठ्या लादलेल्या होत्या.

त्या दिवशीं सकाळीं जसजसे आम्ही पुढं जात होतों तसतसं वाटेंत हे उंच रांगडे रेड इंडियन आमच्या भोवतीं न बोलतां फिरत असलेले दिसत होते. दुपारीं आम्ही हॉर्स क्रीक येथें जाऊन पोंचलों. या रेड इंडियनांपैकीं बरीचशीं माणसं आमच्या आधींच तिथं जाऊन पोंचली होतीं. पलीकडच्या कांठावर जवळजवळ नग्न असलेला एक रेड इंडियन आपला पांढरा घोडा हातांत धरून उभा होता आणि आम्ही जवळ येत असतांना आमच्याकडे पहात होता. डाकोटा जमातीचा ओल्ड स्मोक हा प्रमुख तो हाच. त्याच्यामागें त्याची सर्वात आवडती आणि तरुण रेड इंडियन बाई उभी होती. एका गोजिरवाण्या खेचरावर ती बसली होती. पांढऱ्या कातड्याची झूल त्या खेचराच्या अंगावर सोडली होती. या झुलीलाच निळे आणि पांढरे मणी लावलेले होते. धातूचीं केलेलीं छोटीं छोटीं पदकंहि सजावट म्हणून या झुलीला अडकवलीं होतीं. त्या खेचरानं हालचाल केली कीं तीं पदकं किणकिणत. त्या खेचरावर बसलेल्या तरुण पोरीची अंगकाती नितळ होती. आपल्या दोन्ही गालांना तिनं लाल रंगाचे टिळे लावल्यामुळं तिच्या अंगकांतीला एक प्रकारचा जिवंतपणा आला होता. चमकणाऱ्या शुभ्र दांतांच्या रांगा दाखवीत ती हंसली. आपल्या हातांत तिनं स्त्रीदाक्षिण्य मुळींच नसलेल्या आपल्या धन्याचा भाला धरला होता. भाल्याच्या टोंकाला पिसं लावलेलीं होतीं. धन्याची पांढरी वाटोळी ढाल ती बसलेल्या खेचराच्या बाजूला लावलेली होती. आपल्या धन्याची चिलीम तिनें आपल्या पाठीला बांधली होती. गवताळ प्रदेशांत मिळणाऱ्या पांढऱ्याशुभ्र मातीनं रंगवलेला हरणाच्या कातड्याचा झगा तिनं घातला होता. या झग्यावर मण्यांची सजावट केलेली होती. मण्यांच्या या सजावटींत सौंदर्यदृष्टीपेक्षां भडकपणाची आवडच जास्त होती. झग्याच्या शिवणीवर ठिकठिकाणीं लांब झालर लावली होती.

जमातीच्या या प्रमुखाजवळच खांद्यावर गव्यांच्या कातड्याचे झगे टाकलेले डौल्दार आकृतीचे कांहीं लोक उभे होते; ते आमच्याकडे थंड नजरेनं पहात होते. त्यांच्यामागे कित्येक एकर जमिनीवर या जमातीच्या लोकांचे तात्पुरते उभारलेले तंबू दिसत होते. योद्धे, बायकापोरं, शेकडो कुत्रे यांची एकच गर्दी उसळली होती. बाजूलाच असलेल्या एका लहानश्या झऱ्यावर मुलं, मुली, तरुणी पाणी उडवीत, खिदळत न्हात होत्या. त्याच वेळीं ऑरेगॉनला निघालेल्या गोऱ्या प्रवाशांचा एक तांडा तो झरा ओलांडून या वसाहतीच्या अंगावरून जात होता. हे लोक, आणि त्यांच्या पुढल्या पिढ्या शंभर वर्षांच्या काळांत रेड इंडियन लोकांना या पृथ्वीवरून पुसून टाकणार होत्या.

दुपारच्या उन्हाला आडोसा मिळावा एवढ्याचसाठीं हे तंबू तात्पुरते उभारलेले होते. तंबूच्या काठ्या आणि कनाती यांचे ढीग बाजूला पडलेले दिसत होते. या ढिगाऱ्यांतच शस्त्रं, भांडींकुंडीं, घोड्या-खेचरांना गाड्यांना जुंपण्याचा सरंजाम वगैरे सामान पडलेलं होतं. प्रत्येक योद्ध्याच्या स्त्रीनं चार कामट्या उभारून त्याच्यावर गव्याचं कातडं पसरलं होतं. या तात्पुरत्या छताच्या आडोशाखालीं तो योद्धा आरामशीर पडला होता. या योद्ध्याचा हुद्दा दाखविणाऱ्या वस्तू बाजूलाच ठेवलेल्या एका तिकट्यावर रचल्या होत्या. गव्याच्या कातड्याची ढाल, औषध—ताईतांची पिशवी, धनुष्यबाण आणि भाता, भाला आणि चिलीम अशा त्या वस्तू होत्या. कुत्रे सोडल्यास तिथं सगळ्यांत अधिक कलकलाट म्हाताऱ्या बायकांनीं चालवला होता. केस मोकळे सोडलेल्या या म्हाताऱ्या मॅकबेथमधल्या चेटकिणींसारख्या दिसत होत्या. आपल्या सुरकुतलेल्या अंगावर त्यांनीं गव्याच्या कातड्याचा अगदी जुनाट होऊन विरविरलेला झगा घातला होता. त्यांचे लाडकौतुक होण्याचे दिवस दोन पिढ्यांपूर्वीच संपले होते. आणि आतां तंबूतळावरचीं बरीचशीं श्रमाचीं कामं त्यांच्या अंगावर येऊन पडलीं होतीं. गाडीला जुंपण्यापूर्वी घोड्यावरचा सरंजाम चढवणं, तंबू ठोकणं, अंगरखे शिवणं, शिकाऱ्यांसाठीं मांस शिजवणं हीं सगळीं कामं या म्हाताऱ्यांनाच करावीं लागत होतीं. या थेरड्यांचा कलकलाट, कुत्र्यांचं केंकाटणं, पोरांचं हंसणंखिदळणं, ओरडणं. आणि विसावा घेत पडलेल्या योद्ध्यांची स्तब्धता असे सगळे घटक असलेलं तें दृश्य एखाद्या अविस्मरणीय चित्रासारखं दिसत होतं.

या लोकांच्या तळापासून कांहीं अंतरावरच आम्हीं आमचा तळ ठोकला होता. आम्हीं त्यांच्यापैकीं कांहीं योद्ध्यांना आणि गटप्रमुखांना आमच्या तळावर जेवायला बोलावलं. बिस्किटं आणि कॉफी आम्हीं त्यांच्यापुढं ठेवलीं. अर्धवर्तुळ करून आमचे हे पाहुणे बसले होते. त्यांनीं लवकरच सगळं जेवण संपवलं.

दुपारीं आम्हीं प्रवासाला पुन्हां सुरुवात केली. नुकताच आम्ही ज्यांचा पाहुणचार केला त्यांपैकीं कांहींजण आमच्या सोबत आले होते. या लोकांत ऐसपैस फुगलेला, तीनशें पौंडांहून अधिक वजन असलेला एक मनुष्य होता. 'डुकरोबा' हें त्याचं नांवहि त्याच्या शरिराच्या प्रमाणाला शोभेसं होतं. डुकरोबा एका ल्हानशा पांढऱ्या तट्टावर बसला होता. तें बिचारं तट्टू पाठीवर बसलेलं हें प्रचंड वजन कसंबसं रेटत होतं. हें वजन रेटण्याच्या कामीं चालना मिळावी म्हणून पाठीवर बसलेला डुकरोबा त्या तट्टाच्या बरगडींत अधूनमधून टांचा हाणीत होता. डुकरोबा म्हातारा होता. तो गटप्रमुखदेखील नव्हता. प्रमुख होण्याची आकांक्षाहि त्याने बाळगली नव्हती. तो योद्धाहि नव्हता व शिकारीहि नव्हता. इतकं वजन आणि आळस असणाऱ्या माणसाला युद्ध किंवा शिकार जमणार तरी कशी ! परंतु डुकरोबा हा डाकोटा जमातींतला अत्यंत श्रीमंत मनुष्य होता. या रेड इंडियनांच्या जमातींत व्यक्तीची श्रीमंती त्याच्या मालकीचे किती घोडे आहेत यावरून अजमावली जाते. डुकरोबाजवळ तीस घोडे होते. म्हणजे त्याला आवश्यक असलेल्या घोड्यांहून दहापट ही संख्या अधिक होती. पण असं असूनहि त्याची घोड्यांची हांव जराहि कमी झाली नव्हती. दुडक्या चालीन तट्टू हांकीत तो माझ्याकडे आला. माझ्याशीं त्यानं हस्तांदोलन केलं आणि आपण माझे एकनिष्ठ मित्र असल्याचं मला सुचवलं. मग तो हातानं वेगवेगळ्या खुणा करून मला कांहीं सांगूं लागला. त्याचा तेलकट चेहेरा स्मितानं उजळला होता. डोळ्यांभोंवतीच्या मांसांतून कश्याबश्या दिसणाऱ्या त्याच्या डोळ्यांत धूर्तपणाची चमक उमटली होती. रेड इंडियनांची खुणांची भाषा मला पुरती अवगत नसल्यामुळें मी तो काय सांगत असावा याचा साधारण अंदाज केला. तरीपण त्याचं म्हणणं समजून घेण्यासाठीं मी हेन्रीला माझ्या मदतीला बोलावलं.

डुकरोबा माझ्याबरोबर एक सौदा करण्याच्या बेतांत होता. सौदा थोडासा नाजूक होता. म्हणजे असं कीं, मी माझा घोडा देऊन त्याच्या मोबदल्यांत

त्याची एक मुलगी घ्यावी असं तो सुचवत होता. मी अर्थातच त्याचा हा सौदा नाकारला. पण म्हणून डुकरोबा चिडला बिडला नाहीं. आपली विनोदवृत्ती कायम ठेवून तो हंसला आणि घोड्यावर बसून निघून गेला.

त्या रात्रीं आम्ही जिथं तळ ठोकला होता तिथं समोरच असलेल्या उंच कड्यांमधून प्लाट नदीचा एक गढूळ फाटा वेगानं वहात होता. प्रवाहाच्या या ढांसळत्या कांठावर झाडं होतीं. प्रवाह आणि टेकड्या यांच्यामध्यें एक गवताचा कोपरा होता. या जागेवर जाण्यापूर्वी आम्हांला उजव्या हाताला दोनतीन मैलांच्या अंतरावर प्रवाशांचा एक तळ दिसला होता. बाजूच्या टेकडीवर बरेचसे रेड इंडियन आमच्याकडून पूर्वी मिळाला तसा पाहुणचार पुन्हां मिळेल या आशेनं जमा होत होते. झाडांच्या मोडकळीला आलेल्या, अर्धवट कोळपलेल्या फांद्यांतून आम्हांला सूर्यास्त दिसत होता. आमच्या तंबू—तळासमोर पसरलेल्या शांततेचा भंग प्लाट नदीचा उसळता प्रवाह करीत होता. टेकड्यांचे माथे सूर्यास्ताच्या रंगांनीं नाहून निघत होते. नदीचं पात्र आणि आमचे पांढरे तंबू लाल रंगानं माखले होते. हळूहळू रंग विरले. आणि अंधार पडूं लागला. अंधुक झाडांच्या परिसरांत आम्हीं पेटवलेल्या शेकोट्यांखेरीज दुसरा कसलाच प्रकाश उरला नाहीं. शेकोटीच्या भोंवतीं आम्हीं अंगाभोंवती ब्लॅकेट गुंडाळून धूम्रपान करीत आणि गप्पा मारीत मध्यरात्रीपर्यंत बसलों होतों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्हीं उन्हानं रापून निघालेला एक माळ ओलांडला. प्लाट नदीच्या कांठाच्या अगदी टोंकावर झाडांच्या रांगा झालर लावल्यासारख्या उभ्या होत्या. त्या झाडांच्या खालीं आम्हांला एक घर उभं असल्याचा भास झाला. आम्ही जवळ जातांच ही आकृति हळूहळू स्पष्ट होऊं लागली. ती एक ओडक्यांची बांधलेली गढी होती. ती व्यापारी गढी असून व्यापाऱ्यांच्या मालकीची होती. गढीच्या मधल्या सखल चौकोनांत रहाण्यासाठीं व कोठारांसाठीं खोल्या होत्या. गढीच्या दोनच बाजू पूर्ण बांधलेल्या होत्या. संरक्षणाच्या दृष्टीनं सध्यां ही गढी फारशी उपयुक्त वाटत नव्हती. सतत पुढं पुढं सरकणाऱ्या सरहद्दविभागामधल्या सर्वच गढ्यांच्या बाबतींत असं म्हणतां येईल. परंतु हेंहि नमूद केलं पाहिजे कीं अजूनपर्यंत या गढ्या रेड इंडियनांच्या हल्ल्यांत यशस्वीपणें लढविल्या गेल्या आहेत. गढीच्या अगदीं जवळच दोन तंबू ठोकलेले होते. सूर्याच्या प्रखर उन्हानं गढी भाजून निघत होती. एका तंबूतून डोकं बाहेर काढून बघणारी एक म्हातारी रेड इंडियन बाई, त्याच

तंबूंतून कुतूहलानें बाहेर पाहणारीं तीन-चार गुबगुबीत कुत्र्याचीं पिल्लं यांच्या-खेरीज त्या परिसरांत दुसरं कुणीहि दिसत नव्हतं.

आम्ही गढीजवळ जाऊन पोचलों. गढीचं दार उघडून रापलेल्या वर्णाचा, काळ्या डोळ्यांचा एक फ्रेंच मनुष्य बाहेर आला. त्यानं कांहींसा विक्षिप्त पोषाख केला होता असं म्हटलं तरी चालेल. त्यानें आपल्या लांब कुरळ्या केसांचा मध्यभागीं भांग पाडला होता आणि खांद्यापर्यंत केस सोडले होते. हरणाच्या धुरावलेल्या कातड्याचा घट्ट अंगरखा त्यानं घातला होता. या अंगरख्यावर सजावट म्हणून साळूच्या रंगवलेल्या कांट्यांच्या आकृत्या भरलेल्या होत्या. त्याच्या पायांतले रेड इंडियन पद्धतींतले जोडे आणि पोटऱ्यांना बांधलेलं चामडं देखील अशाच तऱ्हेनं सजवलेलं होतं. या माणसाचं नांव होतं रिचर्ड. आम्हांला तें हेन्रीनं सांगितलं. रिचर्ड उंचापुरा नव्हता, परंतु त्याचं शरीर कमावलेलं दिसत होतं. या प्रदेशांत राहणाऱ्या गोऱ्या लोकांचीं शरीरं सहसा स्थूल आढळत नाहींत. रिचर्डच्या शरिरांत अनावश्यक स्थूलता कुठेंहि दाखवतां आली नसती. त्याचा प्रत्येक स्नायू उत्तम कमावलेला असून त्यांत एक प्रकारचा लवचिकपणा होता. रिचर्डकडे पाहतांच त्याचा काटकपणा आणि चपळ उत्साह यांचं प्रत्यंतर येत असे.

रिचर्डनं आमचे घोडे नावाहो या गुलामाच्या ताब्यांत दिले. मेक्सिकोच्या सरहद्दीवरून पकडून आणलेला हा गुलाम दिसायला अगदींच वाईट दिसत होता. आमच्या हातांतल्या रायफलींचं ओझं रिचर्डनं काढून घेतलं आणि आपल्या गढीच्या प्रमुख दालनांत तो आम्हांला घेऊन गेला. दहा चौरस फुटांची ही खोली होती. खोलीचं छप्पर लाकडी होतं आणि जमिनी व भिंती काळ्या मातीच्या होत्या. गवताळ प्रदेशांतून चार दगडी लाद्या आणून त्यांची शेकोटी या खोलींत केलेली होती. रेड इंडियन पद्धतीचं धनुष्य, माशाच्या कातडीचा केलेला बाणांचा भाता, रॉकी पर्वतांतून जमवून आणलेल्या भडक दिसणाऱ्या कांहीं शोभेच्या वस्तू, औषध-ताईतांची रेड इंडियन पिशवी, पाईप—तंबाखूची पिशवी या सगळ्या वस्तूंनीं खोलीची भिंत सजली होती. खोलीच्या कोपऱ्यांत रायफली होत्या. एक बाकडा सोडल्यास खोलींत दुसरं कांहीं फर्निचर नव्हतं. या बाकड्यावर गव्याचं कातडं पसरलेलं होतं. आणि त्याच्यावर मिश्र रक्ताचा एक माणूस लोळत होता. लालभडक रंगानं रंगवलेले आपले केस त्यानं झुबका करून कपाळावर चिकटवले होते.

दोन तीन डोंगराळ प्रदेशांतली माणसं पायांची फुली घालून जमिनीवर बसलीं होतीं. त्यांचा पोषाख रिचर्डसारखाच होता. या सगळ्या लोकांत आमचं लक्ष वेधून घेतलं तें एका सोळा वर्षांच्या रेड इंडियन मुलानं. दरवाज्या-जवळच्या कोपऱ्यांत हा पोरगा नागडाच बसला होता. त्याचा चेहेरा देखणा असून शरीर चपल व बांधेसूद होतं. तो एखाद्या पुतळ्यासारखा निश्चल बसला होता. दिवाणखान्यांतला कोणाकडेहि तो पहात नव्हता. त्यानं आपले डोळे त्याच्या समोरच्या शेकोटीच्या एका कोपऱ्यावर खिळवले होते.

गवताळ प्रदेशांत गोरे लोक असोत किंवा रेड इंडियन असोत एकत्र बसून धूम्रपान करण्याची पद्धत कटाक्षानं पाळली जाते. भिंतीवरचा पाइप खालीं काढण्यांत आला. तंबाखू आणि 'शॉंगसाशा' यांचं योग्य प्रमाणांत केलेलं मिश्रण पाइपमधें भरण्यांत आलं. आम्हीं सगळे वर्तुळांत बसलों होतों. प्रत्येक जण पाइपचे दोनचार दम मारून तो पुढच्याकडे देई. इथं आम्हीं अर्धा तास घालवला आणि मैलभर अंतरावर असलेल्या आमच्या तंबूवर कॉफी प्यायला या असं या नव्या मित्रांना आमंत्रण देऊन आम्हीं त्यांची रजा घेतली.

प्रवासामुळें आमचे कपडे मळले होते, फाटून गेले होते. ते शिवून नीट करावे तर त्यासाठीं लागणारीं साधनं आमच्यापाशीं नव्हतीं. लारामीचा किल्ला आतां फक्त सात मैल अंतरावर होता. संस्कृतीचा ज्यांना थोडाफार स्पर्श झालेला आहे अशा तिथल्या लोकांसमोर अशा अवतारांत जाणं आम्हांला योग्य वाटेना. जितकं म्हणून स्वच्छ आणि टापटीप होतां येईल तेवढं व्हावं यासाठीं आम्हीं नदीकांठावर थांबलों. आमच्याजवळचे छोटे आरसे आम्ही झाडाला टांगले आणि जवळजवळ सहा आठवड्यांनीं पुन्हां दाढी केली. प्लाट नदींत उतरून आम्हीं आंघोळी करून घेतल्या. चॉकलेटी रंगाचं पाणी त्यावेळीं नदींत होतं. त्यामुळं या आंघोळीचा उपयोग आम्हांला कितपत झाला हा प्रश्न वेगळा. कांठा-वर सर्वत्र पिवळट रंगाचा चिखल पसरला होता. आंघोळी केल्यावर यांतून बाहेर जावं तर तो सगळा चिखल उपसून पाय बाहेर पडणार. तसं होऊं नये म्हणून आम्हीं त्या चिखलावर फांद्या आणि झुडपं पसरून एक छोटासा पूलच तयार केला. एका रेड इंडियन बाईकडून घेतलेले हरणाच्या कातड्याचे चकचकीत जोडे आम्हीं पायांत घातले. जितकं म्हणून टापटीप दिसतां येईल, तितकं दिसण्याचा प्रयत्न केला. हें सगळं झाल्यानंतर आम्हीं गवतावर बसलों आणि आमच्या पाहुण्यांची वाट पाहूं लागलों. पाहुणे आल्यानंतर आम्हीं त्यांना कॉफी दिली,

पाइपचे दम मारून झाले आणि मग आम्हीं त्यांचा निरोप घेऊन किल्ल्याच्या दिशेनं निघालों.

एका तासानंतर समोर वैराण टेकड्यांशिवाय आम्हांला कांहीं दिसेना. या टेकड्या ओलांडल्यानंतर त्यांच्या पायथ्याशीं प्लाट नदीला जाऊन मिळणारा एक वेगवान झरा आम्हांला दिसला. या झऱ्याच्या पलीकडे अधूनमधून झुडपं असलेलं एक हिरवंगार कुरण होतं. आणि यांच्यामध्यें जिथं हा झरा प्लाट नदीला मिळतो तिथं एका किल्ल्याच्या भिंती दिसत होत्या. आम्हांला दिसलेला हा किल्ला लारामीचा नव्हता. पूर्वी बांधलेलें हें एक ठाणं होतं. परंतु लारामीचा किल्ला बांधला जातांच इथं कोणी राहीना. आणि आतां हें ठाणं अगदीं मोडकळीला आलं होतं. कांहीं वेळानं टेकडयाच्या मधल्या वाटेनं पुढं गेल्यावर उंचवट्यावर उभ्या असलेल्या उंच भिंतीचा, उंच बुरूज असलेला लारामीचा किल्ला आम्हांला दिसला. ज्या उंचवट्यावर हा किल्ला होता तो झऱ्याच्या पलीकडे डाव्या हाताला होता. किल्ल्याच्या मागं वैराण टेकड्या हात्या आणि या टेकड्यांच्याहि मागें सात हजार फूट उंचीचा 'ब्लॅक हिल्स' हा डोंगराळ भाग होता.

किल्ल्याच्या बरोबर समोरून झऱ्यांतून पायउतार करून किल्ल्यांत यावं असं आम्हीं ठरवलं. परंतु पावसाच्या पाण्यामुळं फुगलेल्या त्या झऱ्याचं पाणी विलक्षण वेगानं वहात होतं. झऱ्याच्या कांठाकांठानं पुढं चालत, पायउतारा-साठीं कुठं सोईची जागा मिळते कीं काय हें आम्ही पहात होतों. किल्ल्यांच्या भिंतीवर आम्हांला पाहण्यासाठीं लोक जमले होते. हेन्री एकदम ओरडला, "तो पहा, दुर्बिणी हातांत घेऊन बोर्डो तिथें उभा आहे आणि त्याच्या बाजूला व्हास्किस, टकर, मे, जॉर्ज आणि सिमोनो हे सगळे दिसतायृत." सिमोनो हा हेन्रीचा उत्तम मित्र होता. त्या प्रदेशांत शिकारीच्या क्षेत्रांत हेन्रीची बरोबरी करूं शकेल असा तोच एक मनुष्य होता.

बराच वेळ प्रयत्न केल्यानंतर पायउताराची वाट आम्हीं शोधून काढली. हेन्री आपला घोडा घेऊन पुढं झाला. थंड चेहेऱ्यानं त्याचा घोडा पाण्यांत पायांना नेट लावून उतरला. पाण्यांत उतरतांना त्या घोडयाचं मनःस्वास्थ्य जराहि विचलित झालेलं दिसत नव्हतं. आम्हीं हेन्रीच्या मागून निघालों. आमच्या खोगिरापर्यंत पाणी उसळत होतं, परंतु आमचे घोडे सहज पोहून गेले. गरीब बिचारीं खेचरं मात्र धडपडत होतीं. त्यांना जुंपलेल्या गाड्यांसकट तीं बुडतात कीं

दोन तीन डोंगराळ प्रदेशांतली माणसं पायांची फुली घालून जमिनीवर बसलीं होतीं. त्यांचा पोषाख रिचर्डसारखाच होता. या सगळ्या लोकांत आमचं लक्ष वेधून घेतलं तें एका सोळा वर्षांच्या रेड इंडियन मुलानं. दरवाज्या-जवळच्या कोपऱ्यांत हा पोरगा नागडाच बसला होता. त्याचा चेहेरा देखणा असून शरीर चपल व बांधेसूद होतं. तो एखाद्या पुतळ्यासारखा निश्चल बसला होता. दिवाणखान्यांतला कोणाकडेहि तो पहात नव्हता. त्यानं आपले डोळे त्याच्या समोरच्या शेकोटीच्या एका कोपऱ्यावर खिळवले होते.

गवताळ प्रदेशांत गोरे लोक असोत किंवा रेड इंडियन असोत एकत्र बसून धूम्रपान करण्याची पद्धत कटाक्षानं पाळली जाते. भिंतीवरचा पाइप खालीं काढण्यांत आला. तंबाखू आणि 'शॉंगसाशा' यांचं योग्य प्रमाणांत केलेलं मिश्रण पाइपमधें भरण्यांत आलं. आम्हीं सगळे वर्तुळांत बसलों होतों. प्रत्येक जण पाइपचे दोनचार दम मारून तो पुढच्याकडे देई. इथं आम्हीं अर्धा तास घालवला आणि मैलभर अंतरावर असलेल्या आमच्या तंबूवर कॉफी प्यायला या असं या नव्या मित्रांना आमंत्रण देऊन आम्हीं त्यांची रजा घेतली.

प्रवासामुळें आमचे कपडे मळले होते, फाटून गेले होते. ते शिवून नीट करावे तर त्यासाठीं लागणारीं साधनं आमच्यापाशीं नव्हतीं. लारामीचा किल्ला आतां फक्त सात मैल अंतरावर होता. संस्कृतीचा ज्यांना थोडाफार स्पर्श झालेला आहे अशा तिथल्या लोकांसमोर अशा अवतारांत जाणं आम्हांला योग्य वाटेना. जितकं म्हणून स्वच्छ आणि टापटीप होतां येईल तेवढं व्हावं यासाठीं आम्हीं नदीकांठावर थांबलों. आमच्याजवळचे छोटे आरसे आम्ही झाडाला टांगले आणि जवळजवळ सहा आठवड्यांनीं पुन्हां दाढी केली. प्लाट नदींत उतरून आम्हीं आंघोळी करून घेतल्या. चॉकलेटी रंगाचं पाणी त्यावेळीं नदींत होतं. त्यामुळं या आंघोळीचा उपयोग आम्हांला कितपत झाला हा प्रश्न वेगळा. कांठा-वर सर्वत्र पिवळट रंगाचा चिखल पसरला होता. आंघोळी केल्यावर यांतून बाहेर जावं तर तो सगळा चिखल उपसून पाय बाहेर पडणार. तसं होऊं नये म्हणून आम्हीं त्या चिखलावर फांद्या आणि झुडपं पसरून एक छोटासा पूलच तयार केला. एका रेड इंडियन बाईकडून घेतलेले हरणाच्या कातड्याचे चकचकीत जोडे आम्हीं पायांत घातले. जितकं म्हणून टापटीप दिसतां येईल, तितकं दिसण्याचा प्रयत्न केला. हें सगळं झाल्यानंतर आम्हीं गवतावर बसलों आणि आमच्या पाहुण्यांची वाट पाहूं लागलों. पाहुणे आल्यानंतर आम्हीं त्यांना कॉफी दिली,


पाइपचे दम मारून झाले आणि मग आम्हीं त्यांचा निरोप घेऊन किल्ल्याच्या दिशेनं निघालों.

एका तासानंतर समोर वैराण टेकड्यांशिवाय आम्हांला कांहीं दिसेना. या टेकड्या ओलांडल्यानंतर त्यांच्या पायथ्याशीं प्लाट नदीला जाऊन मिळणारा एक वेगवान झरा आम्हांला दिसला. या झऱ्याच्या पलीकडे अधूनमधून झुडपं असलेलं एक हिरवंगार कुरण होतं. आणि यांच्यामध्यें जिथं हा झरा प्लाट नदीला मिळतो तिथं एका किल्ल्याच्या भिंती दिसत होत्या. आम्हांला दिसलेला हा किल्ला लारामीचा नव्हता. पूर्वीं बांधलेलें हें एक ठाणं होतं. परंतु लारामीचा किल्ला बांधला जातांच इथं कोणी राहीना. आणि आतां हें ठाणं अगदीं मोडकळीला आलं होतं. कांहीं वेळानं टेकड्याच्या मधल्या वाटेनं पुढं गेल्यावर उंचवट्यावर उभ्या असलेल्या उंच भिंतीचा, उंच बुरूज असलेला लारामीचा किल्ला आम्हांला दिसला. ज्या उंचवट्यावर हा किल्ला होता तो झऱ्याच्या पलीकडे डाव्या हाताला होता. किल्ल्याच्या मागं वैराण टेकड्या हात्या आणि या टेकड्यांच्याहि मागें सात हजार फूट उंचीचा ‘ब्लॅक हिल्स’ हा डोंगराळ भाग होता.

किल्ल्याच्या बरोबर समोरून झऱ्यांतून पायउतार करून किल्ल्यांत यावं असं आम्हीं ठरवलं. परंतु पावसाच्या पाण्यामुळं फुगलेल्या त्या झऱ्याचं पाणी विलक्षण वेगानं वहात होतं. झऱ्याच्या कांठाकांठानं पुढं चालत, पायउतारा-साठीं कुठं सोईची जागा मिळते कीं काय हें आम्ही पहात होतों. किल्ल्यांच्या भिंतीवर आम्हांला पाहण्यासाठीं लोक जमले होते. हेन्री एकदम ओरडला, “तो पहा, दुर्बिणी हातांत घेऊन बोर्डो तिथें उभा आहे आणि त्याच्या बाजूला व्हास्किस, टकर, मे, जॉर्ज आणि सिमोनो हे सगळे दिसतायत.” सिमोनो हा हेन्रीचा उत्तम मित्र होता. त्या प्रदेशांत शिकारीच्या क्षेत्रांत हेन्रीची बरोबरी करूं शकेल असा तोच एक मनुष्य होता.

बराच वेळ प्रयत्न केल्यानंतर पायउताराची वाट आम्हीं शोधून काढली. हेन्री आपला घोडा घेऊन पुढं झाला. थंड चेहेऱ्यानं त्याचा घोडा पाण्यांत पायांना नेट लावून उतरला. पाण्यांत उतरतांना त्या घोड्याचं मनःस्वास्थ्य जराहि विचलित झाल्लेलं दिसत नव्हतं. आम्हीं हेन्रीच्या मागून निघालों. आमच्या खोगिरापर्यंत पाणी उसळत होतं, परंतु आमचे घोडे सहज पोहून गेले. गरीब बिचारीं खेचरं मात्र धडपडत होतीं. त्यांना जुंपलेल्या गाड्यांसकट तीं बुडतात कीं

काय असं वाटत होतं. झऱ्याच्या तळाशीं असलेल्या दगडावरून त्यांचे पाय घसरत. नेट धरून तीं खेचरं पुढं सरकत होतीं. शेवटीं एकदां सगळीं कांठाला लागलीं. आम्हीं एक छोटासा माळ ओलांडला. घळ उतरलों आणि कांठाची उंच चढण चढून लारामीच्या किल्ल्याच्या दरवाजापाशीं येऊन ठेपलों. दरवाज्याच्या वरच हल्ल्याला तोंड देऊन संरक्षण करतां यावं म्हणून बांधलेली खोली होती.



# १ | लारामीचा किल्ला

आतां एक वर्ष लोटल्यानंतर लारामीचा किल्ला आणि तिथं राहणारीं माणसं यांची जेव्हां मी आठवण करतों तेव्हां तें जग प्रत्यक्षापेक्षांहि जुन्या काळांतल्या एखाद्या कल्पनारम्य चित्रासारखं मला भासतं. हें दृश्य इतकं वेगळं होतं कीं सुसंस्कृत जगांत राहणाऱ्या माणसांना त्याची कल्पनाहि करतां येणार नाहीं. पांढरा रंग दिलेल्या गव्याच्या कातड्यांचे अंगरखे इथल्या उंच रेड इंडियनांनीं घातले होते. किल्ल्याच्या आवारांतून ते फिरत होते किंवा आवारांतल्या घरांच्या टेंगण्या छपरांवर ते पडले होते. अनेक रेड इंडियन बाया भडक पोषाख घालून आपल्या खोल्यांच्या समोर बसल्या होत्या. त्यांचीं गोंगाट करणारीं भिकार पोरं आवारांत इथं तिथं भटकत होतीं. फासेपारधी, व्यापारी, आणि किल्ल्यांतले इतर नोकर आपापल्या कामांत तरी होते किंवा मजा करीत होते.

आम्ही जेव्हां दरवाजाशीं गेलों तेव्हां आमचं स्वागत कांही फारशा जिव्हाळ्यानं झालं नाहीं. आमच्याकडे संशयाच्या नजेरेनंच ते लोक पाहू लागले. हेन्रीनं जेव्हां आम्ही व्यापारी नसल्याचं सांगितलं आणि बोर्डोकडे त्याच्या अधिकाऱ्याकडून आणलेलं पत्र दिलं तेव्हां या संशयाचं निराकरण झालं. बोर्डोनं पत्र हातांत घेतलं आणि तें खालींवर करीत वाचण्याचा कसून प्रयत्न केला. परंतु या क्षेत्रांतली त्याची प्रगति तें पत्र वाचण्याला पुरेशी नसल्यानं त्यानं कारकुनाला आपल्या मदतीला बोलावलं. या कारकुनाचं नांव होतं मॉटॅलॉ. तो फ्रेंच होता. हंसतमुख चेहेऱ्याचा हा मनुष्य दिसायला अगदीच गुळगुळीत होता.

पत्र वाचून झाल्यानंतर बोर्डोला परिस्थितीचं भान आलं. बोर्डो वृत्तीनं स्वागतशील नव्हता असं नव्हे. परंतु यजमानपणाच्या भूमिकेंतून पाहुण्यांचं स्वागत कसं करावं याची त्याला माहिती नव्हती. तेव्हां त्यानें सगळे उपचार बाजूला टाकले; आणि शब्दांनीं आमचं स्वागत न करतां तो चटकन् किल्ल्यांत शिरला. आम्ही आदरपूर्वक त्याच्यामागून गेलों आणि दरवाजाच्या समोरच असलेल्या कटड्यांच्या जिन्यावरून वर चढलों. जिन्यावरून आम्ही एका गच्चींत गेलों. लाथेनं दरवाजा उघडून बोर्डो आम्हांला एका मोठ्या खोलींत घेऊन गेला. एखाद्या कोठारापेक्षां थोडी अधिक व्यवस्थित ठेवलेली ती खोली होती. खोलींत एक खाट होती. पण तीवर बिछाना नव्हता. या खाटेबरोबरच दोन खुर्च्या, एक कपाट, पाणी ठेवण्यासाठीं पत्र्याची बादली आणि तंबाखू कापण्यासाठीं एक फळी इतकं फर्निचर होतं. पितळेचा एक क्रूस भिंतीवरती टांगलेला होता. बाजूलाच माणसाच्या कवटीवरची केंसासकट कापलेली कातडी ठेवलेली होती. या कातडीवरचे केस साधारण एक यार्ड लांब होते. हें जें भयानक विजयचिन्ह तिथें ठेवलेलं होतं त्याविषयींची माहिती मी ओघानं देईनच.

आम्हाला देण्यांत आलेली ही खोली लारामीच्या किल्ल्यांतली सगळ्यांत उत्तम गणलेली खोली होती. या खोलींत किल्ल्यांतला मुख्य धनी पॅपिन रहात असे. तो नसतांना त्याच्या नंतरचा अधिकारी म्हणून बोर्डो काम पहात असे. बोर्डो बळकट बांध्याचा, उद्धट दिसणारा असा मनुष्य होता. पॅपिन नसल्यामुळं नवीनच हातांत आलेल्या अधिकारानं त्याचा अहंकार फुगला होता. जमिनीवर अंथरण्याकरतां गव्याचं कातडं आणा अशी त्यानं आपल्या अधिकारयुक्त आवाजांत आरडा-ओरड करावयास सुरुवात केली. नोकर गव्याचं कातडं घेऊन आले. तीं

जमिनीवर अंथरलीं गेलीं. त्यांचाच नंतर आम्ही बिछाने म्हणून उपयोग केला. आम्हीं आतांपर्यंत पाहिलेल्या गव्याच्या कातड्यांत हींच सर्वांत उत्तम होतीं.

हीं सगळीं व्यवस्था झाल्यावर आम्ही गच्चींत आलों आणि आजूबाजूचा परिसर पाहूं लागलों. या किल्ल्यांत यायचं आमचं बरेच दिवस घाटत असल्यानं किल्ल्यांतलं आवार आणि सभोंवतीचा भाग पाहण्याची आम्हांला उत्सुकता होती. गच्चीच्या खालीं चौकोनी जागा होती आणि या चौकोनी जागेच्या भोंवतीं छोट्या खोल्या होत्या. या खोल्यांचे दरवाजे या चौकोनी आवारांत उघडत असत. या खोल्या अनेक गोष्टींसाठीं वापरल्या जात, परंतु मुख्यत्वें करून किल्ल्यांत काम करणाऱ्या नोकरांची सोय इथं केलेली असे. या नोकरांच्या रेड इंडियन बायाहि या खोल्यांतूनच रहात. त्या तिथं ठेवण्याची त्यांना परवानगी होती. त्यांची संख्या या नोकरांइतकीच होती. आम्ही जिथं उभे होतों त्यासमोर, किल्ल्याच्या प्रवेशद्वाराच्या वर, संरक्षणाची खोली होती. या खोलीच्या भिंतीवर एक भरधांव धावणाऱ्या घोड्याचं चित्र टांगलेलं होतं. लाल रंग थापून हें चित्र काढलेलं होतं. रेड इंडियन लोकांच्या अंगरख्यांवर आणि तंबूंवर केलेल्या सजावटींतून जें कसब व्यक्त होतं तेंच या चित्रांतहि दिसत होतं. किल्ल्याच्या आवारांत कामाची गडबड सुरू होती. म्हातारा व्यापारी व्हॅस्किस याच्या गाड्या डोंगराळ मुलखांतल्या एका दूरच्या ठाण्यावर जाण्याच्या तयारींत होत्या आणि कॅनडियन लोक इथं तिथं घाईघाईनं फिरत तयारी करीत होते. बाजूलाच एखादा रेड इंडियन अचल गंभीरपणें या सगळ्या दृश्याकडे पहात उभा होता.

लारामी हा अमेरिकन फर कंपनीच्या मालकीचा किल्ला आहे. या रेड इंडियन प्रदेशांतल्या सर्व व्यापाराचा मक्ता लारामीच्या या ठाण्याकडे आहे असं म्हटलं तरी चालेल. इथून पूर्वेकडे सातशें मैलांच्या सीमेवर अमेरिकन सैन्याचा तळ आहे. त्यामुळं या प्रदेशांत प्रत्यक्षांत राज्यकर्ते या किल्ल्यांतले अधिकारीच. किल्ल्याच्या भिंती पंधरा फूट उंच आहेत. आणि त्यांच्याभोंवतीं टोकेरी खुंटांचं कुंपण घातलेलं आहे. किल्ल्याच्या आवारांत एकमेकांना लागून असलेल्या छपरांचा उपयोग संरक्षणाच्या दृष्टीनंहि केला जातो—बाहेरून हल्ला झाला तर या छपरांवर झोंपून गोळीबार करणं सोईचं असतं.

किल्ल्याच्या आंत मधें एक भिंत घालून त्याचे दोन भाग केलेले आहेत. एका बाजूला कोठारें, ऑफिस आणि कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय आहे. दुसऱ्या

बाजूला मातीच्या भिंतीचा तट केलेली एक चौकोनी जागा असून तिचा उपयोग रात्रीच्या वेळीं घोडे आणि खेचरं ठेवण्यासाठीं केला जातो; या जागेमुळं धोकेबाज रेड इंडियनांपासून हीं जनावरं सुरक्षित ठेवतां येतात. किल्ल्याच्या आंत येण्यासाठीं समोरासमोर असलेलीं दोन प्रवेशद्वारं आहेत. या दोन दरवाज्यांमध्यें वर कमान असलेली वाट आहे. बाजूलाच असलेल्या एका खोलीची खिडकी या मधल्या वाटेवर आडव्या अंगानं उघडते. त्यामुळें किल्ल्याचा आंतला दरवाजा बंद असला तरी या खिडकीमधून बाहेरच्या माणसांशी बोलतां येतं. व्यापाराच्या मिषानं पहिल्या दरवाज्यांतून आंत येणाऱ्या रेड इंडियनांना आंत घेणं सुरक्षिततेच्या दृष्टीनं धोक्याचं आहे असं जर वाटलं तर आंतला दरवाजा बंद करून घेतात आणि मग या खिडकीचा उपयोग करतात. अर्थात् अमेरिकन फर कंपनीच्या प्रत्येक ठाण्यावर अशी व्यवस्था केलेली असली तरी प्रत्यक्षांत तिचा फारसा उपयोग केला जात नाहीं. अधूनमधून कांहीं गोरीं माणसं किल्ल्याच्या बाहेरील परिसरांत जरी मारलीं गेलीं तरीदेखील हे रेड इंडियन लोक किल्ल्यावर हल्ला असा सहसा करीत नाहींत.

आम्हांला दिलेल्या खोलींत आम्ही जरा विसावा घेत पडलों होतों, इतक्यांत खोलीचा दरवाजा हलकेच उघडला गेला. रात्रीसारख्या काळ्याकुट्ट चेहेऱ्यावर असलेले दोन डोळे दिसूं लागले. मग लाल हात आणि खांदे आंत आले. थोड्याच वेळांत एका उंच रेड इंडियनाचा खोलींत प्रवेश झाला. आमच्याशीं हस्तांदोलन करून कांहीं स्वागतपर शब्द गुरगुरत तो जमिनीवर बसला. थोड्याच वेळांत आणखी रेड इंडियन लोक आंत आले. त्यांनीं या पहिल्यासारखे आपले चेहेरे रंगवले नव्हते. आपल्या खांद्यावर ठेवलेले जाड अंगरखे त्यांनीं जमिनीवर टाकले आणि ते अर्धवर्तुळ करून आरामांत बसले. किल्ल्यांत राहणाऱ्या रेड इंडियन बायांचे हे नातेवाईक होते. कांहींही काम न करतां ते इथंतिथं फिरत असत.

आमच्याबरोबर जे लोक पाइपचा दम मारीत होते ते त्यांच्या समाजांतले मानकरी समजले जात. इतक्यांत दोनतीन तरूण पोरं आंत आलीं. आधी येऊन बसलेल्या वृद्धांत आणि योद्ध्यांत त्यांना स्थान नव्हतं. वय कमी आणि पराक्रम केलेला नाहीं. त्यामुळं वरिष्ठांच्या समोर संकोच व्यक्त करीत हे पोरगं आमच्याकडे पाहात कोपऱ्यांत उभे राहिले. लाल रंगानं त्यांनीं आपले गाल रंगवले होते. कानांत शिंपल्यांचे लोलक करून घातले होते. गळ्यांत मण्यांची

माळ होती. अजूनपर्यंत त्यांनीं शिकारींत नांव घेण्याजोगा पराक्रम गाजवला नव्हता किंवा माणूसहि मारलेला नव्हता. या पराक्रमाच्या अभावीं त्यांच्याकडे कुणी आदरानं पाहात नव्हतं आणि यामुळें ते तरुण पोरगे लाजून संकोचून बाजूला उभे होते. हे रेड इंडियन लोक आमच्या खोलींत घुसले ते आपल्या-बरोबर आमच्यापाठीं नवी कटकट घेऊनच. कटकट अशी कीं खोलींतली प्रत्येक वस्तू उचलून ते तिचं सर्व बाजूंनीं निरीक्षण करूं लागले. या त्यांच्या निरीक्षणां-तून आमचं सामानच काय पण आमचे कपडेदेखील सुटले नाहींत. रेड इंडियनांना कुतूहल एकूण कमी असा कांहीं लोकांचा चुकीचा समज असतो. परंतु त्यांच्या विचारशक्तीच्या कक्षेंत ज्या गोष्टी येतात त्यांच्या बाबतींत रेड इंडियनांच्या ठिकाणीं अत्यंत तीव्र कुतूहल असतं.

ज्या गोष्टी त्यांच्या विचारशक्तीच्या पल्ल्यांत येत नाहींत त्यांच्या बाबतींत ते उदास असतात. जी गोष्ट आपल्याला समजत नाहीं त्याबाबतींत ते चौकसबुद्धि न दाखवतां आश्चर्यचकित होऊन 'एक महान् जादू आहे' असं म्हणून शांत राहतात. उगीचच अंदाज बांधीत किंवा तर्क रचीत बसत नाहींत. या ठराविक वाटेनंच त्यांची विचारशक्ती जात असल्यामुळं एखादा प्रश्न त्या रेड इंडियनांना सुटला नाहीं असं होत नाहीं. त्यांचे आत्मे सुप्तावस्थेंत असतात. जेसुइट किंवा प्युरिटन पंथांच्या मिशनऱ्यांनीं कितीही प्रयत्न केला तरी या झोपलेल्या आत्म्यांना ते अजून जाग आणूं शकलेले नाहींत. सूर्यास्ताच्या वेळीं गच्चींतून आम्हीं बाहेर पाहिलं. कांहीं अंतरावर पश्चिमेच्या लाल आकाशाच्या पार्श्व-भूमीवर आम्हांला उंच चौकटी उभ्या केलेल्या दिसल्या. या चौकटींवर कांहींतरी टांगल्यासारखं दिसत होतं. आणि या चौकटींच्या पायाशीं पडलेलीं पांढरीं हाडं चमकत होतीं. डाकोटा जमातीच्या गटप्रमुखांचं हें दफनस्थान होतं. आपल्या प्रमुखाच्या शरीराचे कांहीं भाग ते या चौकटीवर टांगतात. अशा रीतीनं हे अवयव टांगले म्हणजे आजूबाजूच्या परिसरांत शत्रूचं भय उरत नाहीं अशी या रेड इंडियनांची श्रद्धा आहे. परंतु एकदोनदां असं झालं कीं क्रो जमातीचे रेड इंडियन इथं चाल करून आले. त्यांनीं या चौकटी पाडल्या आणि त्यांनां टांगलेल्या प्रेतांच्या चिंधड्या केल्या. क्रो जमातींतले योद्धे हा सगळा प्रकार करीत असतांना डाकोटा जमातींतले लोक किल्ल्याचीं दारं लावून घेऊन नुसताच आरडाओरडा करीत होते. संख्येनं क्रो योद्ध्यांपेक्षां फारच कमी असल्यामुळं आपल्या श्रद्धेय वस्तूंचं रक्षण करण्याची हिंमत त्यांना होईना. त्या श्रद्धेय

वस्तूंनीं यांचं रक्षण करणं दूरच राहिलं ! चौकटीच्या पायथ्याशीं असलेल्या ज्या हाडांचा मीं उल्लेख केला त्या गव्यांच्या कवट्या होत्या, मंतरलेल्या वर्तुळांत त्या मांडून ठेवलेल्या होत्या.

संध्याकाळच्या त्या धूसर प्रकाशांत पन्नास साठ घोडेस्वारांचं एक पथक किल्ल्याच्या दिशेनं येत असलेलं आम्हीं पाहिलं. किल्ल्याच्या मालकीचीं हीं जनावरं होतीं. या सशस्त्र पहारेकऱ्यांबरोबर त्यांना चरायला पाठवण्यांत आलं होतं. रात्रीच्या वेळीं आतां त्यांच्यासाठीं किल्ल्यांत केलेल्या कोंडवाड्यांत त्यांना ठेवण्यांत येणार होतं. किल्ल्याचं दार उघडलं. पांढऱ्या झुडपासारख्या भिवया असलेला एक म्हातारा कॅनडियन पहारेकरी दरवाजाच्या आंतल्या बाजूला उभा राहिला. दुसरा पहारेकरी घोड्यावर बसला होता. त्यानं आपली रायफल खोगिरावर आडवी ठेवली होती. त्याचा रंग रापट होता. त्याचे लांब केंस रापट रंगाच्या त्याच्या चेहेऱ्यावर उडत होते. हा पहारेकरी घोड्यांच्या मागं राहून त्यांना दरवाज्यांतून आंत ढकलीत होता. लाथा झाडीत, एकमेकांना चावे घेत, गर्दी करीत ते अर्धवट माणसाळलेले घोडे त्यांच्या तटबंदी असलेल्या चौकोनी कोंडवाड्यांत नेले जात होते.

जेवणाची वेळ झाली हें सुचवण्यासाठीं एका कॅनडियन माणसानें घंटा वाजवली. तिचा बेसूर आवाज सर्वत्र घुमला. एका ओबडधोबड टेबलावर जेवण मांडण्यांत आलं होतं. खालच्या एका खोलींतच सर्व व्यवस्था केली होती. रोट्या आणि सुकवलेलं गव्याचं मांस असा एकूण जेवणाचा बेत होता. सुकवलेलं गव्याचं मांस दांत घट्ट करण्यासाठीं व्यायामाच्या दृष्टीनं उत्तम होतं. बोर्डो आणि किल्ल्यांतले इतर वरिष्ठ अधिकारी हे पहिल्या पंक्तीला बसले. हेन्री शॅटिलॉं याला या पंक्तीला बसण्याचा मान मिळाला हें योग्यच झालं. पहिली पंगत जेवून उठली आणि मग शिकारी आणि फासेपारधी या खालच्या दर्जाच्या हुद्देदारांची पंगत बसली. या दुसऱ्या पंगतीला रोट्या वाढण्यांत आल्या नाहींत. याच वेळीं कॅनडियन नोकर त्यांच्या राहण्याच्या खोलींतच जेवायला बसले होते. त्यांना फक्त सुक्या मांसाचीच मेजवानी मिळाली. लारामीच्या किल्ल्यांतली कौटुंबिक अर्थव्यवस्था कशी होती हें सांगणारी एक गोष्ट प्रचलित आहे. मला वाटतं की ती या ठिकाणीं सांगणं औचित्याला सोडून होणार नाहीं.

पिअर नांवाचा एक म्हातारा मनुष्य होता. माणसं जेवायला बसलीं कीं त्यांच्यासाठीं कोठारांत सांठवून ठेवलेलं मांस घेऊन येणं हें म्हाताऱ्या पिअरचं

काम होतं. पिअर आपल्या दयाशील वृत्तीमुळं आपल्या मित्रांसाठीं मोठे आणि चांगले जाड तुकडे काढून आणी. बारीक लक्ष असलेल्या बोर्डोच्या डोळ्यांतून ही गोष्ट सुटली नाहीं. अशा तऱ्हेच्या वर्तनाचा त्याला राग आला आणि तें थांबवण्यासाठीं तो उपाय शोधूं लागला. शेवटीं त्याला एक उत्तम उपाय सुचला. मांस सांठवण्याच्या कोठाराच्या शेजारीं फर साठवण्याची दुसरी एक खोली होती. या दोन खोल्यांत एक छोटीशी भिंत होती. या भिंतीला असलेल्या लहानशा चौकोनी खिडकींतून या खोलीचा किल्ल्याशीं संबंध येत असे. फर सांठवण्याच्या या खोलींत गुडुप काळोख होता.

एके दिवशीं संध्याकाळीं आपल्याला कोणी पहात नाहीं याची खात्री करून घेऊन बोर्डो मांस सांठवण्याच्या खोलींत शिरला. भिंतीच्या खिडकींतून तो बाजूच्या फर ठेवण्याच्या खोलींत गेला; आणि तिथं गव्यांच्या कातड्यांच्या आणि फरच्या एका ढिगाऱ्यावर व्यवस्थित बसून राहिला. कांहीं वेळानं म्हातारा पिअर कंदील घेऊन मांस नेण्यासाठीं खोलींत आला. स्वतःशींच कांहींतरी पुटपुटत तो मांसाचे उत्तम तुकडे नेहमीप्रमाणेंच आपल्या मित्रांसाठीं नेऊं लागला. इतक्यांत थडग्यांतून यावा असा खोल आवाज आला, "पिअर, पिअर ! जाड मांसाचे तुकडे घेऊं नकोस, फक्त बारीकच तुकडे घे." हा आवाज ऐकतांच पिअरची बोबडी वळली. हातांतला कंदील त्यानं तिथंच टाकला आणि कोठारांत भूत बसलेलं आहे अशा आत्यंतिक भयानं किंकाळ्या फोडीत तो खोलींतून बाहेर आला. पण वाटेंत एके ठिकाणीं उंचवट्याला पाय अडकून तो खडीच्या जमिनीवर कोसळला आणि बेशुद्ध पडला. कॅनडियन नोकर त्याच्या मदतीसाठीं धावले. कांहींनीं दुर्दैवी पिअरला उचलून घेतलं. इतर कांहीं नोकर काठ्यांचे दोन तुकडे घेऊन खोलींतल्या भुतावर हल्ला करण्यासाठीं क्रूस करूं लागले. हा सगळा प्रकार होत असतांना पडेल चेहेऱ्यानं बोर्डो खोलीबाहेर येऊन दरवाजाशीं उभा राहिला. या सगळ्या नाचक्कींत आणखी भर म्हणून कीं काय म्हातारा पिअर शुद्धीवर यावा म्हणून आपण आखलेली सर्व योजना बोर्डोला सांगावी लागली.

दुसरे दिवशीं सकाळीं किल्ल्याच्या दरवाज्यांच्या मधल्या वाटेंत व्हास्किस आणि मे या दोन व्यापाऱ्यांशीं आम्हीं गप्पा मारीत बसलों होतों. हे दोघे व्यापारी आणि तो गुळगुळीत चेहेऱ्याचा कारकून या तिघांखेरीज त्या किल्ल्यांत कुणालाहि लिहितां वाचतां येत नव्हतं. कॅटलिन या व्यापाऱ्यांविषयीं मे एक

गंमतीची गोष्ट सांगत होता; इतक्यांत एक कुरूप चेहेऱ्याचा लहानखोर रेड इंडियन घोड्यावरून किल्ल्यांत आला. त्याला प्रश्न विचारतांच स्मोकची वसाहत अगदीं जवळ येत असल्याची बातमी त्यानं दिली. यानंतर थोड्याच वेळांत नदी-पलीकडच्या टेकड्यांवर बेशिस्तपणें येणाऱ्या रेड इंडियनांचा थवा दिसला. त्यांच्यापैकीं कांहींजण घोड्यावर तर कांहीं चालत येत होते. मे सांगत असलेली गोष्ट आतां संपली होती. आतां तो रेड इंडियनांचा थवा पाण्यांत उतरून ओढा ओलांडीत होता.

मी ओढ्याच्या कांठापर्यंत गेलों. तिथं ओढ्याचं पात्र रुंद आहे. त्यावेळीं पाणी तीनचार फूट खोल असावं. प्रवाहाला जोर होता. पाण्यांत कित्येक गज कुत्रे, घोडे आणि रेड इंडियन यांच्याखेरीज कांहींच दिसत नव्हतं. तंबू उभारण्याच्या मोठ्या काठ्या घोड्यावर लादण्यांत आल्या होत्या. या काठ्या लादण्याची एक विशिष्ट पद्धत होती. काठ्या घोड्यांच्या दोन्ही कुशींना लाद-ण्यांत येत. काठीचीं मोठीं टोकं घोड्यांच्या दोन्ही कुशींना बांधण्यांत येत आणि लहान टोंक जमिनीवर असत. दोन्ही बाजूंला बांधलेल्या काठ्यांची जीं टोंकं जमिनीवर येत त्या टोंकांत एक मोठी टोपली ठेवून तिथं ती घट्ट बांधण्यांत येत असे. घोड्याच्या मागें साधारण एक फूट अंतरावर ही टोपली येई. घोडा चालू लागला कीं सामान भरलेली ही टोपली आपोआपच ओढली जात असे. पुष्कळ वेळां कुत्रीचीं नुकतींच झालेलीं पिल्लं, किंवा रेड इंडियनांचा पोरवडा किंवा फारच म्हातारा झालेला मनुष्य या टोपलींत बसे. या वाहनाला 'ट्रेन्यु' असं नांव होतं. कॅनडियन नोकर त्याला 'ट्रॅव्हू' असंहि म्हणत. हे ट्रेन्यु पाणी उसळीत प्रवाहांतून येत होते. त्यांच्यामधून कुत्रे पोहत होते. या कुत्र्यांच्याहि दोन बाजूला दोन काठ्या बांधून अशाच प्रकारें छोटे ट्रेन्यु केलेले होते. घोड्यावर बसून योद्धे येत होते. कोल्ह्यासारखे डोळे असलेले कांहीं मुलगे त्यांच्यामागं त्यांना घट्ट धरून बसलेले होते. सामान लादलेल्या घोड्यांवर रेड इंडियन स्त्रियाहि बसल्या होत्या. आधींच ओझ्यानं वांकलेल्या घोड्यावर त्या कोणत्याहि प्रकारं कमी ओझं लादीत नव्हत्या !

प्रचंड गोंधळ सुरू होता. कुत्र्यांचं सांघिक भुंकणं चालू होतं. कुत्र्यांची पिल्लं ठेवलेल्या टोपलींत पाणी आलं कीं त्यांचं केविलवाणं रडणं सुरू होई. एका वर्षापासून वरपर्यंतचीं मुलं टोपल्यांच्या कडांना घट्ट धरून बसलीं होतीं. पाणी त्यांच्याजवळ येऊन तोंडावर उडालं कीं चुरचुर आवाज करीत तीं पोरं

वेडीवाकडीं तोंडं करीत. ओझ्यानें वाकलेले कांहीं कुत्रे केविलवाणे भुंकत प्रवाहाच्या जोरांत वाहून जाऊं लागले. ते बुडणारच होते, पण इतक्यांत कांहीं म्हाताऱ्या बाया धावल्या आणि त्यांनीं त्यांना वांचवलं. घोडे कांठावर येतांच जसं जमेल तसे वर चढूं लागले. इतर कांहीं घोडे आणि तट्टं बाकीच्या माणसांबरोबर येत होतीं. मधेंच त्यांच्यापैकीं एखादा गर्दीतून जोरांत धांवूं लागे; मग एखादी रेड इंडियन थेरडी त्याच्या मागं मोठमोठ्यानं बोंबलत धांवूं लागे. लालभडक रंगाचं प्रसाधन केलल्या गोंडस, देखण्या रेड इंडियन बाया धन्याचा भाला हातांत धरून कांठावर इथंतिथं उभ्या होत्या. तो भाला ही खूण होती. त्या खुणेच्या अनुरोधानं घरांतलं सर्व सामान एकत्र आणलं जाणार होतं.

कांही वेळानं गर्दी ओसरली. प्रत्येक कुटुंब आपापले घोडे आणि सामान घेऊन रांगेंत किल्ल्याच्या मागं असलेल्या मैदानाकडे जाऊं लागलं. अर्ध्या तासाच्या आंत या मैदानावर जवळजवळ साठसत्तर निमुळत्या आकारांचे तंबू दिसूं लागले. आजूबाजूच्या माळावर त्यांचे घोडे शेंकडयांनीं चरत होते. कुत्रे इतस्ततः फिरत होते. त्यांच्यांतले योद्धे किल्ल्यांत आले होते. आणि न थांबतां किंचाळणारीं पोरं भिंतीजवळ उभीं होतीं.

हे लोक आले असतील नसतील, इतक्यांत बोर्डो पलीकडच्या बाजूला धावत गेला. आणि दुर्बिण आणण्यासाठीं आपल्या बाईला सांगूं लागला. त्याच्या या बाईचं नांव होतं मेरी. मेरी हा रेड इंडियन स्त्रीचा अगदीं नमुना होता. अतिशय आज्ञाधारकपणं तिनं दुर्बिण आणली. दुर्बिण हातांत येतांच बोर्डो घाईघाईनं भिंतीकडे गेला. दुर्बिण पूर्वेकडे रोखून तिथून कुटुंबं येत असल्याचं त्यानं अगदीं शपथेवर सांगितलं. कांही क्षणानंतर प्रवाश्यांच्या गाडया पलीकडच्या टेकडीवरून येतांना दिसूं लागल्या. प्रवाश्यांचा हा तांडा ओढ्यापर्यंत आला आणि नंतर जराहि न थांबतां तो पाण्यांत उतरला. ओढा ओलांडून कांठावर येतांच किल्ला आणि हा रेड इंडियनांचा तंबूतळ यांच्यावरून जवळजवळ पाव मैलावर पुढं आपल्या गाडया वाटोळ्या उभ्या करून थांबला.

कांहीं वेळ शांतता पसरली होती. हे प्रवासी तंबू उभारण्यांत मग्न होते. परंतु तंबू ठोकून होतांच एकादं वादळ यावं तसे हे लोक कलकलाट करीत किल्ल्यांत आले. किल्ल्यांत येतांच जणूं कांहीं एखाद्या कुतूहलाचा राक्षसच त्यांच्या मानेवर स्वार झाला होता असं आम्हांला वाटलं. किल्ल्याच्या प्रत्येक कानाकोपऱ्यांत ते कुतूहलानं उसकाउसकी करूं लागले. हा त्यांचा उद्योग

पाहून आम्ही चटकन् आमच्या खोलींत शिरलों. या प्रवाशांच्या या उसकाउसकीपासून तिथं सुरक्षितता लाभेल असं वाटलं होतं. या प्रवाशांची शोधाशोध न दमतां चालू होती. आश्चर्यचकित झालेल्या रेड इंडियन बायांच्या खोल्यांत शिरूनहि ते शोधाशोध करीत होते. इतकंच काय, पण त्यांनीं ब्रोडो आणि मेरी यांच्या खोलींत शिरूनहि उसकाउसकी करायला सुरुवात केली. हें सगळं झाल्यानंतर या उसक्यांचं एक शिष्टमंडळ आमच्याहि दाराकडे आलं. परंतु खोलींत प्रवेश करण्यासाठीं आवश्यक तें उत्तेजन आमच्याकडून त्यांना कांहीं लाभलं नाहीं.

इतका वेळ उसकाउसकी केल्यावर आतां या प्रवाशाचं कुतूहल शमलं होतं. आतां ते प्रत्यक्ष व्यापाराच्या गोष्टीकडे वळले. त्या लोकांना पुढच्या प्रवासाच्या दृष्टीनं कांहीं सामान खरेदी करायचं होतं. या सामानखरेदीला ते लागले. यापैकीं कांहीं सामान ते पैसे देऊन विकत घेत किंवा कांहीं सामान त्यांना नको असलेली एकादी वस्तू मोबदल्यांत देऊन घेत.

किल्ल्यांतल्या फ्रेंच लोकांविषयीं ह्या प्रवाशांचा ग्रह फारच दूषित होता. या फ्रेंचांचं आपल्याविषयीं चांगलं मत नाहीं असं त्यांना वाटे—आणि त्यांत थोडं तथ्यहि होतं. हे फ्रेंच लोक रेड इंडियनांना आपल्यावर हल्ला करण्यासाठीं चिथावणी देतात अशी त्यांची खात्री झाली होती. आम्ही या प्रवाश्यांच्या तंबूतळावर गेलों. हे लोक इतके गोंधळलेले आणि अनिश्चित मनःस्थितींत होतें कीं आम्हांला त्याचं आश्चर्य वाटलं. शाळेच्या मुलांचं एकादं पथक जंगलांत हरवावं आणि घाबरून जावं, तसंच कांहींसं या प्रवाशांचं झालं होतं. त्यांच्या सहवासांत राहिल्यानंतर ते लोक तसे धाडसी होते याची आम्हांला जाणीव झाली. जंगलप्रदेशांतून येणारे हे लोक गवताळ प्रदेशांत आले कीं घाबरून जातात. ओटावा नदीच्या प्रवाहांत आपली लहानशी होडी वल्हवणारा कॅनडांतला मनुष्य आणि केपहॉर्न येथील वादळाशीं झगडणारा अमेरिकन खलाशी यांच्यांत जें अंतर आहे तसंच अंतर डोंगराळ प्रदेशांतले लोक आणि जंगलप्रदेशांतून आलेले हे प्रवासी यांच्यांत आहे.

हें जरी खरं असलं तरी त्यांनीं इतकं अस्वस्थ कां व्हावं याचं कारण आम्हांला कळेना. भित्रेपणामुळें ते अस्वस्थ झाले असतील असं म्हणतां येईना. कारण मॉंटेरी आणि युना व्हिस्टा येथील लढ्यांत ज्यांनीं स्वयंसेवक म्हणून आपलीं नांवं नोंदवलीं होतीं त्यांच्यांच कुळांतले हे लोक होते. एक मात्र खरं कीं

सरहद्दीवरच्या प्रदेशांतील लोकांत त्यांतल्या त्यांत अडाणी असे हेच होते. जगाची त्यांना कांहींच माहिती नव्हती. आतांपर्यंत बरीचशीं संकटं त्यांच्यावर कोसळलीं होतीं आणि आपल्यावर आणखी संकटं कोसळणार याचा त्यांना अंदाज होता. एकूण वेगवेगळ्या मनुष्यसमूहाविषयींचं त्यांचं ज्ञान शून्य होतंच, पण त्याबरोबरच आपल्या शक्ती त्यांनीं पुऱ्या कसोटीला अशा कधींच लावल्या नव्हत्या.

आम्ही त्यांच्या तंबूतळावर जातांच संयशाच्या नजरेनं ते आमच्याकडे पाहूं लागले. आम्ही परके असल्यानं शत्रुपक्षांतले आहोंत असंच ते धरून चालूं लागले. बंदुकीच्या गोळ्यांसाठीं शिसं आणि इतर कांहीं वस्तू आम्हांला त्यांच्याकडून खरेदी करायच्या होत्या. बराच वेळ हो ना करतां करतां शेवटीं एकदां वस्तूंचे भाव आम्हीं ठरवले. पैसेहि दिले. आम्ही ज्याच्याशीं व्यवहार करीत होतो तो मनुष्य आम्हांला हव्या असलेल्या वस्तू आणण्यासाठीं आंत गेला. बराच वेळ झाला तरी तो येईना तेव्हां आम्ही त्याच्या शोधार्थ निघालों. थोड्या वेळानं तो आपल्या गाडीवर बसलेला आम्हांला दिसला. आम्ही जवळ जातांच तो म्हणाला, "हें पाहा, तुमची आणि माझी कांहीं ओळख नाहीं. तुम्हीं परके आहांत. तेव्हां मी तुमच्याशीं व्यापाराचा हा व्यवहार करायचा नाहीं असं ठरवलं आहे."

त्याचं असं झालं कीं आमचा व्यवहार ठरल्यानंतर त्याच्या कुठल्यातरी मित्रानं त्याच्या कानांत सांगितलं कीं आम्ही लबाड आहोंत, या व्यवहारांत आम्हीं नक्कीच फसवाफसवी केली असणार. हें ऐकतांच त्यानं आपला बेत बदलला.

या प्रवाशांचा हा भित्रेपणा नक्कीच त्यांच्या घाताला कारणीभूत होणार होता. याचं कारण असं कीं जोपर्यंत तुम्ही सावध आत्मविश्वासानं, धैर्य दाखवून वागत असतां तोपर्यंत तुमचे रेड इंडियन शेजारी तुमच्याशीं भलेपणानं वागतात. तुम्ही त्यांच्या मनांत भय आणि आदर किती निर्माण करतां यावरच तुमची सुरक्षितता अवलंबून असते. परंतु तुमच्यांत भित्रेपणा किंवा अनिश्चितता आहे यांचा एकदां कां त्यांना सुगावा लागला म्हणजे ते कावेबाजीनं तुमचा घात करणारे शत्रू ठरलेच म्हणून समजावं. या प्रवाशांतली ती अस्वस्थता डाकोटा जमातींतल्या बाजूलाच तळ ठोकलेल्या रेड इंडियनांनीं हेरली आणि त्या क्षणापासून त्यांच्या दादागिरीला सुरुवात झाली. प्रवाशांचा एकादा तांडा तळ ठोकून राहिलेला दिसला रे दिसला कीं त्यांच्याकडून जेवण उकळणं हा या रेड

इंडियनांचा धंदा होऊन बसला आहे. आणि जेवण म्हणजे काय, तर कॉफीचा एक पेला आणि दोनतीन बिस्किटं. स्मोकची ही वसाहत केवळ एवढ्याच आशेनं पायपीट करीत इथवर आली होती. त्यांनीं या प्रवाशांच्या तांड्याकडे अर्थातच जेवणाची मागणी केली. आणि नाहीं म्हणण्याची या प्रवाशांना हिंमत झाली नाहीं.

एके दिवशीं संध्याकाळीं सूर्यास्ताच्या वेळीं या रेड इंडियनांचा सगळा ताफाच्या ताफा या प्रवाशांच्या तंबूतळावर येऊन ठाकला. त्यांचे चेहेरे अपेक्षांनीं उजळलेले होते. प्रवाशांच्या तळावर येतांच ते अर्धवर्तुळ करून बसले. सर्वांत मध्यें स्मोक बसला. त्याच्या डाव्या उजव्या हाताला त्याचे योद्धे बसले. त्यांच्या बाजूला तरुण माणसं आणि मुलगे. अर्धवर्तुळाच्या टोकांना रेड इंडियन बाया आणि त्यांचीं पोरं. प्रवाशांनीं तावडतोब बिस्किटं आणि कॉफी त्यांच्यापुढं आणून ठेवलीं. या खाद्यपेयांचा ते रेड इंडियन झपाट्यानं समाचार घेत असतांना ते प्रवासी तोंडं उघडीं टाकून त्यांच्याकडे पाहात होते. प्रवाशांचा नवा तांडा आला रे आला कीं रेड इंडियनांचा हा प्रकार सुरू होई. प्रत्येक वेळीं या बाबतींत यश आल्यानं त्यांचा आधाशीपणा आणि मस्तवालपणा यांना सुमार राहिला नाहीं. एकदां तर कॉफी प्याल्यानंतर त्यांनीं केवळ माज येऊन पेले आपटून फोडून टाकले. या प्रकारामुळें प्रवाशांपैकीं कांहीं जणांनीं आपल्या बंदुकी काढल्या—शेवटीं मोठ्या कष्टानं त्यांना आवरावं लागलं.

आम्हीं हा प्रदेश सोडण्याच्या वेळीं डाकोटा रेड इंडियनांच्या या प्रकारानें तर कळस गाठला होता. जेवणं काढा नाहीं तर ठार करतों अशा धमक्या ते प्रवाशांना देऊं लागले होते—इतकंच काय पण एकदोनदां त्यांनीं कांहीं प्रवाशांच्या तांड्यावर गोळीबार केल्याचंहि समजलं. या भागांत लारामीच्या ठाण्यावर किंवा आजूबाजूच्या प्रदेशांत इतर कुठं तरी सैन्याचा तळ असणं आवश्यक आहे. नाहीं तर स्थलांतर करून या प्रदेशांत येणाऱ्यांचा आणि इतर प्रवाशांचाहि जीव या रेड इंडियनांमुळें धोक्यांत राहील.

ऑगीलाल्ला आणि ब्रुल या डाकोटा किंवा सिऊ जमातीच्या पश्चिमेकडील उपशाखा. सुशिक्षित जगाचा यांच्याशीं कसलाहि संबंध नसल्यामुळें त्यांच्यावर कसलहि संस्कार नाहीं. त्यांच्यापैकीं कोणालाहि कोणतीहि युरोपियन भाषा बोलतां येत नाहीं. कुठल्याहि अमेरिकन वसाहतीचं दर्शनहि त्यांनीं घेतलेलं नाहीं. ऑरेगॉनला जाणाऱ्या प्रवाशांना पाहण्यापूर्वीं त्यांनीं फर कंपनीच्या ठाण्यावर

असलेल्या कांहीं गोऱ्या लोकांशिवाय फारसे गोरे लोक पाहिले नव्हते. फर कंपनीच्या ठाण्यावरील हे गोरे लोक तसे शहाणे आहेत, आपल्याप्रमाणेंच कातडी तंबूंत ते राहतात, आणि गव्यांचं मांस खाऊन जगतात असं त्यांना वाटे. हे लोक आपल्याहून खालच्या दर्जाचे आहेत असं ते समजत. परंतु स्थलांतर करून या प्रदेशांत येणाऱ्या प्रवाशांचे थवेच्या थवे येथें कोसळूं लागले तेव्हां या रेड इंडियनांना अतिशय आश्चर्य वाटलं. या पृथ्वीतलावर इतके गोरे लोक असूं शकतील या गोष्टीवर त्यांचा विश्वासच बसेना. आतां त्यांच्या हा आश्चर्याची जागा संतापानं घेतलेली आहे. डोळ्यांत तेल घालून जर काळजी घेतली नाहीं तर ही गोष्ट परिणामीं दुःखाला कारण ठरेल.

या रेड इंडियनांची रहाणी कशी असते हें पाहाण्यासारखं आहे. मी व शॉ पुष्कळ वेळां संध्याकाळीं त्यांच्या तंबूतळावर जात असूं. आपल्याला वैद्यकी येते, (आणि थोडीशी येतहि असे) असं शॉनं सांगितल्यामुळं आम्हांला तिथं जायला चांगलंच कारण मिळे. असेच एकदां तिथं गेलों असतांना आम्हीं तिथं काय काय पाहिलं याचं वर्णन वाचकांसाठीं आतां मला करायचं आहे.

सूर्य नुकताच मावळला होता. घोडे किल्ल्यांतल्या कोंडवाड्यांत ठेवले गेले होते. प्रेअरी कॉक हा आपल्या देखणेपणाचा गर्व असणारा रेड इंडियन तरुण मुलींचा एक ताफा घेऊन पहिल्या दरवाज्यांतून किल्ल्याच्या आवारांत आला आणि नाच करूं लागला. या मुली आणि तो वर्तुळाकार उभे राहून नृत्य करीत होते. प्रेअरी कॉक तोंडानं एकसुरी आवाज करीत होता. आणि त्या मुली त्या उदास स्वरांत कांहीं तरी गात ताल धरीत होत्या. दरवाजाबाहेर कांहीं तरुण माणसं आणि मुलगं उगीचच इथंतिथं फिरत होते. त्यांच्याकडे कठोर नजरेनं पहात काळ्याकुट्ट रंगानं चेहेरा रंगवलेला एक योद्धा उभा होता. पॉनी जमातींतल्या रेड इंडियनाची त्यानं नुकतीच केंसासकट कवटीवरची कातडी काढून घेतली होती याची तोंडाला फासलेला तो काळ रंग ही खूण होती. या सगळ्या मंडळींच्या अंगावरून आम्हीं पुढं निघालों. आणि पश्चिमेकडचं लालभडक आकाश आणि आम्ही यांच्यामध्यें उभ्या असलेल्या उंच काळ्या तंबूंकडे गेलों. आम्ही तळावर पोचतांच ओल्ड स्मोकच्या तंबूतच प्रवेश केला. इतर रेड इंडियनांसारखाच त्याचाहि तंबू होता. लोकशाही मानणाऱ्या या रेड इंडियन समाजांत जमातीचा प्रमुख आपल्या तंबूंत इतरांपेक्षां अधिक सुखसोई करून घेऊं शकत नाहीं. जमातींतल्या सर्वसाधारण माणसांसारखाच त्याचा तंबू

असतो. स्मोक पायांची फुली घालून गव्याच्या कातड्याच्या एका अंगरख्यावर बसला होता. आम्हीं आंत येतांच अतिशय जिव्हाळ्यानं तो स्वागतपर शब्द गुरगुरला. शॉच्या वैद्यकीय ज्ञानाविषयीं त्याला वाटणाऱ्या आदरामुळेंच स्वागतांतून हा जिव्हाळा व्यक्त झाला होता. तंबूंत बऱ्याच स्त्रिया बसल्या होत्या. आणि पोरवडाहि भरपूर होता.

शॉकडून तपासून घेणाऱ्या रोग्यांची तक्रार डोळ्यांना येणारी सूज हीच असे. कडक उन्हामुळें डोळ्यांवर अशा तऱ्हेचा परिणाम होत असावा. शॉच्या औषधांमुळें कांहीं लोकांना गुणहि येत असे. शॉनं आपल्याबरोबर होमिओ-पाथिक औषधांची पेटी आणलेली होती. ऑगीलाल्ला जमातीवर होमिओ-पाथीच्या औषधांचा प्रयोग करणारा शॉ हा पहिलाच असं म्हणावं लागेल. तंबूच्या दारांत गव्यांच्या कातड्याची बैठक घालण्यांत आली. शॉ आणि मी खालीं बसलों. इतक्यांत औषधोपचार करून घेण्यासाठीं पहिला रोगी आला. ती जमातीचा प्रमुख स्मोक याचीच मुलगी होती. तिच्याविषयीं योग्य तें बोलायच म्हणजे त्या सगळ्या जमातींत रूपानं ती सर्वांत सुंदर होती असं म्हणावं लागेल. शॉ तिला औषध लावूं लागला. औषध लावणं चालू असतांना ती त्याच्याकडे बघून मोठमोठ्यानं हंसत होती—स्मित करणें ही गोष्ट रेड इंडियन स्त्रीला माहीतच नसते. तिच्यावर औषधोपचार झाल्यानंतर स्मोकच्या सांगण्यावरून एक सुकून गेलेल्या अंगाची म्हातारी बाई कोपऱ्यांतून उठून शॉपुढं आली. वेदनेनं ती गदगदां हालत होती. प्रकाश पडूं नये म्हणून तिनं डोळ्यावर हात धरला होता. तिच्या डोळ्यावर इतकी सूज आली होती कीं त्यामुळं डोळे जवळजवळ दिसत नव्हते असं म्हटलं तरी चालेल. शॉनं औषधोपचार सुरू करतांच ती भयानक स्वरांत कण्हूं लागली. त्याच्या हातांतून सुटण्यासाठीं ती वळवळ करूं लागली. शॉ अगदी चिडला होता. परंतु त्यानं मनावर ताबा ठेऊन औषधोपचार पुरा केला.

शॉ म्हणाला, "सुजलेल्या जागेवर क्षोभ उत्पन्न करण्यासाठीं मी ज्या माशा वापरतों, त्या आणायला विसरलों. त्याऐवजीं आतां मला दुसरं कांहीं तरी वापरलं पाहिजे." असं म्हणून त्यानं बाजूला पेटलेल्या धुमींतलं एक कोलीत उचललं आणि म्हातारीच्या कपाळाच्या बाजूला तें घट्ट लावलं. त्याबरोबर त्या म्हातारीनं एखाद्या पिशाच्च्यासारख्या किंकाळ्या फोडायला सुरुवात केली. तिला किंकाळतांना पाहून तंबूंतली, इतर मंडळी मोठमोठ्यानं हसूं लागली

हा सगळा प्रकार चालू असतांना स्मोकची सगळ्यांत वडील स्त्री हातांत लाकडी हातोडा घेऊन तंबूंत शिरली. या लाकडी हातोड्याला बसवलेला दगड न्यु इंग्लंडमध्यें शेत नांगरतांना जमिनींत कधीं कधीं जसा एखादा प्राचीन दगड आढळतो तसा दिसत होता. लाकडी दांड्याला हातोड्याचा हा दगड कच्च्या चामड्याच्या वादीनं घट्ट बांधला होता. कांहीं वेळापूर्वीं एका टोपलींत नुकतीच झालेलीं कुत्र्याचीं पिलं मीं पाहिलीं होतीं. हीं पिलं त्या टोपलींत सुखांत बसलीं होतीं. हातोडा घेऊन आंत आलेल्या या स्त्रीनं या पिलांच्या सुखांत व्यत्यय आणला. एका पिलाच्या मागच्या तंगड्या धरून ती त्याला तंबूबाहेर घेऊन गेली. आणि त्याच्या डोक्यावर हातोडा मारून तिनं त्या पिलाचा कपाळमोक्ष केला. तंबूच्या मागच्या बाजूला असलेल्या भोकांतून बाहेर एकूण काय प्रकार चाललाय् हें मी पहात होतों. पिल्लाला मारून झाल्यानंतर तिनं त्याला ज्वालेवर धरून त्याच्या अंगावरचे केंस जाळून टाकले. मग तिनं सुरी घेऊन त्याचे तुकडे केले आणि किटलींत ते टाकून त्यांत पाणी घालून ती उकळूं लागली.

थोड्याच वेळांत लाकडी थाळ्या आमच्यासमोर ठेवण्यांत आल्या आणि त्यांत नुसतंच तयार केलेलं हें नाजूक पक्वान्न वाढण्यांत आलं. कुत्र्याच्या मांसाची मेजवानी विशेष कोणी पाहुणा आला तरच हे डाकोटा रेड इंडियन त्याला सादर करतात. आतां हें वाढून आणलेलं ताट नाकारणं म्हणजे आमच्या या यजमानांचा अपमान करण्यासारखं झालं असतं. आणि म्हणूनच त्या ताटांत वाढलेल्या पिल्लाचा त्याच्या अजाण आईबापांसमोरच आम्हीं समाचार घेतला. दरम्यानच्या काळांत स्मोक पाइपमध्यें तंबाखू भरीत होता. आमचं भोजन संपल्यानंतर आम्हीं पाईपचे दम मारायला सुरुवात केली. पाईप सरकवीत सरकवीत भरलेला सगळा तंबाखू आम्हीं संपवला. यानंतर आम्ही अधिक न थांबतां तेथून उठलों आणि किल्ल्याकडे आलों. आम्हीं आमचीं नांवं सांगतांच दरवाजा उघडून आम्हांला आंत घेण्यांत आलं.



# १० | युद्धाचा संकल्प

१८४६ च्या उन्हाळ्यांत डाकोटा जमातीची पश्चिमेकडची शाखा युद्धाच्या भावनेनं भारून गेली होती. १८४५ मध्यें त्यांना फारच मोठी पिछेहाट सोसावी लागली होती. त्यांनीं पाठवलेल्या सैनिकांच्या पथकांपैकीं कांहीं पथकं गारद झालीं होतीं, तर कांहीं मार खाऊन खचलेल्या मनानं परतलीं होतीं. या पराभवामुळं या सगळ्या समाजावर दुःखाची छाया पसरली होती. उरलेल्या सैनिकांपैकीं दहा योद्धे स्नेक जमातीवर हल्ला करण्यासाठीं गेले होते. या योद्धयांचं नेतृत्व ऑगीलाह्ला जमातीचा प्रमुख व्हर्लविंड याच्या मुलानं केलं होतं. लारामीच्या मैदानावरून योद्धयांचं हें पथक पुढं जात असतांना त्यांच्या शत्रूंनीं त्यांना गाठलं. हे स्नेक रेड इंडियन संख्येनं अधिक होते. त्यामुळं त्यांच्यावर हल्ला करायला निघालेल्या या दहा योद्धयांपैकीं प्रत्येकजण ठार झाला. हा पराक्रम गाजवल्यानंतर स्नेक जमातीचे लोक डाकोटांच्या संतापाची कल्पना करून घाबरले. आणि त्यांनीं ताबडतोब मृतांपैकीं एकाच्या

कवटीवरची केसासकट कातडी त्याच्या पक्षांतल्या लोकांना पाठवली आणि आपण तहाचीं बोलणीं करायला तयार आहोंत असं सुचवलं. या केसासकट कातडीबरोबरच मृताच्या नातेवाईकांसाठीं त्यांनीं थोडा तंबाखू पण पाठवला होता. मध्यस्थ म्हणून म्हातारा व्हास्किस हा काम करीत होता. किल्ल्या-वरच्या आम्हांला दिलेल्या खोलींत भिंतीवर विजयचिन्ह म्हणून ती कवटीवरची केसासकट कातडी टांगलेली होती ती हीच.

पण यामुळं व्हर्लविंडचा क्रोध थोडाहि कमी झाला नाहीं. व्हर्लविंड हा हाडाचा रेड इंडियन होता. स्नेक जमातीविषयीं त्याच्या मनांत खोल द्वेष. स्नेक लोकांनीं केसासकट कातडी पाठवण्याच्या अगोदरच त्यानं सूडाची तयारी करायला सुरुवात केली होती. त्यानं डाकोटा जमातीच्या तीनशें मैलांच्या परिसरांतील सर्व गटांना तंबाखूची भेट आपल्या दूतांकरवीं पाठवली आणि स्नेक लोकांना धडा शिकवण्यासाठीं एका विशिष्ट ठिकाणीं सर्वांनीं एकत्र होऊन जमायनं अशी सूचनाहि केली. त्याची ही योजना मान्य झाली. आणि जवळजवळ पांचसहा हजार डाकोटा सैनिक 'ला बॉंते' या ठरलेल्या ठिकाणीं जमण्यासाठीं म्हणून निघाले. इथं जमल्यानंतर अत्यंत गंभीरपणें ते सगळे त्यांचे युद्धपूर्व विधी करणार होते. हे पूजाविधि उरकल्यानंतर एक हजार योद्धे शत्रूच्या प्रदेशाच्या दिशेनं निघणार होते. या तयारीचा काय परिणाम झाला हें ओघानं पुढं येईलच.

त्यांचा हा बेत ऐकून मला फारच आनंद झाला. रेड इंडियनांचा स्वभाव, त्यांच्या चालीरीती यांचा अभ्यास करावा या हेतूनंच मी या प्रदेशांत आलों होतों. माझा हा हेतु साध्य करण्यासाठीं रेड इंडियनांच्या समाजांत राहणं, त्यांच्यांत मिसळून जाणं आवश्यक होतं. आणि म्हणूनच याप्रमाणं त्यांच्या एका वस्तीवर जाऊन राहण्याचा मीं बेत केला. या पुढची माझी सर्व हकीकत मी बाळगलेल्या या हेतूसाठीं किती प्रगति केली किंवा या मार्गांत मला कोणत्या अडचणी याविषयींची आहे.

'ला बॉंते'—जिथं हे डाकोटा योद्धे जमणार होते—इथं मी जायचं ठरवलं. डेस्लॉरिअर्सला किल्ल्यांत ठेवून त्याच्या ताब्यांत आमचं सर्व सामान आणि उत्तम घोडे ठेवायचे आणि आमचीं शस्त्रं आणि त्यांतल्या त्यांत जे वाईट घोडे असतील ते घेऊन आम्हीं पुढं जायचं असं आमचं ठरलं. इतके रेड इंडियन लोक एकत्र जमणार होते, पण त्यांचा प्रमुख असा कोणी नव्हता.

गवताळ प्रदेशांतून आणि डोंगरांतून त्यांच्यापैकीं कित्येकजण प्रथमच येत होते. अशा परिस्थितींत त्यांच्यांत द्वेष, भांडणं यांना सुरुवात होणार असंच मला वाटलं. ज्यामुळें या रेड इंडियनांच्या मनांत लोभ उत्पन्न होईल अशी कोणतीच वस्तु बरोबर न घेण्याची धूर्त सावधगिरी आम्हीं पाळली होती. अशी योजना आम्हीं आखली खरी, परंतु ती पुरी होण्याची विधियोजना नव्हती. कारण एके दिवशीं सकाळीं एक तरुण रेड इंडियन वाईट बातमी घेऊन किल्ल्यांत आला. या पोराच्या पोषाखाकडे पाहतांच तो पट्टीचा छानछोक्या असावा हें चटकन् कळत होतं. आपल्या कुरूप चेहेऱ्यावर त्यानं लाल रंग थापला होता. रान कोंबड्यांच्या शेपटीचा तुरा करून त्यानं केसांत अडकवला होता. शिंपल्यांचीं कर्णभूषणं त्यानें घातलीं होतीं. लालभडक ब्लँकेट त्यानं अंगा-भोंवतीं गुंडाळलं होतं. घोडदळांतल्या सैनिकाची तलवार त्यानें हातांत घेतली होती. ही तलवार त्यानं केवळ मिरवण्यासाठींच घेतली असावी हें उघड होतं. कारण या विभागांत सुरा, धनुष्यबाण आणि रायफल यांनींच भांडणांचा निवाडा होतो. तरवार वापरली जात नाहीं. या प्रदेशांतला कोठलाहि मनुष्य परक्या ठिकाणीं जातांना सशस्त्रच जातो. तेव्हां या छानछोक्यानं आपल्या पाठीला धनुष्यबाणहि लटकवलेलं होतं. असा सगळा वेष करून आपल्या पिवळट रंगाच्या घोड्यावर बसून प्रतिष्ठेचा आव घालीत तो पोरगा निरोप घेऊन आला होता. त्याचं नांव होतं हॉर्स. किल्ल्याच्या दरवाज्यांतून आंत आल्यावर आजूबाजूच्या रेड इंडियन स्त्रिया आणि त्यांचा पोरवडा यांच्याकडं त्यानं तुच्छतेच्या तिरक्या नजरेनं पाहिलं.

हॉर्सनं आणलेली वाईट बातमी पुढीलप्रमाणं होती: हेन्री शॅटिलार्ची रेड इंडियन स्त्री फार आजारी होती. या स्त्रीवर हेन्रीचा अतिशय लोभ होता. ती आणि तिचीं मुलं व्हलविंडच्या वस्तीवर होतीं. कांहीं दिवसांच्या प्रवासावर ही वस्ती होती. मृत्यूपूर्वीं आपल्या स्त्रीला भेटावं आणि मुलांच्या सुरक्षिततेची कांहीं तरतूद करावी असं हेन्रीला तीव्रतेनं वाटत होतं. त्याच्या या इच्छेला नकार देणं माणुसकीला सोडून झालं असतं. आणि म्हणून स्मोकच्या वस्तीवर आणि तिथून पुढं ला बॉंते इथं जाण्याचा बेत आम्हीं रद्द केला आणि व्हर्लविंडच्या वस्तीवर जायचं ठरवलं. गेले कित्येक आठवडे माझी प्रकृति फार बिघडली होती. विशेषतः लारामीच्या किल्ल्यावर पोंचल्यावर तिसऱ्या रात्रीं मी वेदनेनं अगदीं बेजार झालों. रिओ ग्रान्दे येथें लढणाऱ्या सैन्याचे

ज्या आमांशाच्या आजारानं बळी घेतले होते तोच आजार मला झाल्याचं माझ्या लक्षांत आलं. एकदोन दिवसांतच मला खूप अशक्तपणा आला—इतका की खूप वेदना सोसल्याशिवाय मला चालतांहि येईना. त्या प्रदेशांत डॉक्टरहि नव्हता किंवा खाण्याच्या बाबतींत प्रकृतीच्या दृष्टीनं पदार्थांची निवड करण्याचीहि सोय नव्हती. तेव्हां मी माझ्या प्रकृतीची काळजी परमेश्वरावर टाकली आणि आजाराची पर्वा न करतां अंगांत जेवढी शक्ति असेल तेवढी वापरायची असं ठरवलं.

२० जून रोजीं आम्हीं लारामीचा किल्ला सोडला आणि व्हर्लविंडच्या वस्तीवर जायला निघालों. मागं आणि पुढं उंच टेकू असलेलं डोंगराळ प्रदेशांत वापरण्यासाठीं खास तयार केलेलं खोगीर माझ्या घोड्यावर होतं. पण असं असूनहि मी कसाबसा घोड्यावर बसूं शकत होतों. किल्ला सोडतांना आम्हीं रेमंड या नांवाचा एक लांब केंसांचा नोकर बरोबर घेतला. रेमंड कॅनडियन होता. त्याचा चेहरा घुबडासारखा होता. डेस्लॉरिअर्सच्या तल्लख चेहेऱ्याशीं असलेला रेमंडच्या चेहेऱ्याचा विरोध चटकन् जाणवत असे. रेमंडप्रमाणेंच आणखी एक रेनॉल या नांवाचा उडाणटप्पू व्यापारी आमच्याबरोबर होता. रेनॉलबरोबर त्याची स्त्री मार्गाट, तिचे दोन पुतण्ये—छानछोक्या हॉर्स आणि त्याचा धाकटा भाऊ हेलस्टॉर्म—हेहि आमच्याबरोबर होते. या सगळ्या लोकांना बरोबर घेऊन आम्ही गवताळ प्रदेशाच्या दिशेनं निघालों. आम्ही सगळे एकूण आठ पुरुष आणि एक स्त्री असे नऊजणं होतों. मळलेल्या वाटेनं न जातां आम्ही लारामीच्या ओढ्याजवळ असलेल्या दरीलगतच्या टेकड्या ओलांडून पुढें झालों.

हॉर्सची तलवार आतां रेनॉल आपल्या हातांत घेऊन मिरवीत होता. आपलं अर्धं आयुष्य त्यानं रेड इंडियन लोकांतच घालवल्यामुळं त्यांच्या संवयी आणि विचार रेनॉलनं आत्मसात् केले होते. त्याची रेड इंडियन स्त्री मार्गाट या "प्राण्याचं" वजन दोनशें पौंडाहून अधिक होतं. ट्रॅव्ह्यू या टोपलीच्या वाहनांत ती बसली होती. या ट्रॅव्ह्यूचं वर्णन मीं पूर्वीं केलेलंच आहे. या टोपलींत तिच्या अवजड ओझ्याबरोबरच भांडींकुंडींहि ठेवलेलीं होतीं. सामान लादलेला एक घोडा तिच्यामागून येत होता. या घोड्याच्या गळ्यांतली दोरी तिनं आपल्या हातांत धरली होती. या घोड्याच्या पाठीवर रेनॉलचा तंबू लादलेला होता. डेस्लॉरिअर्स आपल्या गाडीच्या बाजूनं चालत होता आणि त्याच्या

मागून रेनॉल आपल्याबरोबरच्या राखीव घोड्याला शिव्या घालत येत होता. मार्गाटचे पुतण्ये झुडपांत लपलेल्या लांडग्यांना आणि काळविटांना हुसकीत टेकड्यांवरून फिरत होते. आम्ही मागं उरलेल्या स्वारांच्या टोळीबरोबर चालत होतों. आमच्या जवळ इतर कपडे नसल्यामुळें फासेपारधी घालतात तसलेच काळविटाच्या कातड्याचे कपडे आम्हीं घातले होते. घोड्यावर स्वार झालेला हेन्री शॅटिलॉँ आघाडीला होता.

टेकड्यामागून टेकड्या आणि घळीमागून घळी ओलांडीत आम्ही चाललों होतों. वाटेंत आम्हांला अनेक औषधी झुडपं लागत. एका टेकडीवर नाना तऱ्हेचे रंगीत दगडहि आम्हीं पाहिले. या टेकडीच्या माथ्यावर आम्ही पोंचलों आणि खालीं पाहिलं तेव्हां खालच्या खोल घळींतून लारामीचा ओढा कॉटनवुड वृक्षांच्या गर्दीतून वाट काढीत एखाद्या सापासारखा वळवळत पुढं जात असलेला आम्हांला दिसला. झाडांचा हा समूह पांढऱ्याशुभ्र टेकड्यांच्या रांगांनीं झांकला गेला होता. या झाडांच्या मध्यें एक कुरण होतं. या कुरणावर आम्ही उतरलों आणि रात्रीपुरते तिथंच राहिलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नदीलगत असलेला एक विस्तीर्ण गवताळ माळ आम्हीं ओलांडला. समोरच एक झाडांचा समूह होता. या झाडांच्या मध्यें आम्हांला एक मोडकळलेली ओंडक्यांची व्यापारी गढी दिसली. बाजूला असंख्य रानगुलाब उमलले होते. त्या गुलाबांच्या मधुर सुगंधांत घरच्या आठवणी दाटलेल्या होत्या. या झाडांच्या समूहांतून आम्ही बाहेर पडलों तेव्हां झुडपांच्या गर्दीतून एक खडखड्या नाग बाहेर आला. माणसाच्या हाताएवढा तो जाड होता. त्याची लांबी चार फुटांहून अधिक असावी. बाजूच्या एका खडकावर तो वेटोळं घालून बसला आणि आपल्या शेपटीनं खडखड आवाज करीत तो आमच्याकडे पहात रागानं फुसकारूं लागला. एक पांढऱ्या रंगाचा ससा मध्येंच उडी मारून पळाला. न्यु इंग्लंडमध्यें दिसणाऱ्या सशाच्या दुप्पट मोटा हा ससा होता. एक पक्षी आमच्या डोक्यावरून उडाला. उडतांना तो चीत्कार करीत गेला. इतक्यांत पलीकडच्या झुडपांतून एक काळवीट बाहेर आला आणि आपली पांढरी शेपटी उभारून त्यानं आमच्याकडे कुतूहलानं पाहिलं; एखाद्या ग्रे हाऊंड कुत्र्याप्रमाणं उड्या मारीत तो पसार झाला. आमच्याबरोबरच्या त्या दोन पोरांनीं एक पांढरा लांडगा पाहिला. एखाद्या वासराइतका तो मोठा होता. किंकाळ्या फोडत तीं पोरं त्या लांडग्या-

मागं लागलीं. लांडग्यानं पाण्यांत उडी मारली. आणि प्रवाहांतून पोहत पोहत पुढं जाऊं लागला. इतक्यांत गोळी झाडल्याचा आवाज झाला. सूं सूं करीत गोळी लांडग्याच्या डोक्यावरून पलीकडे गेली. लांडगा सुखरूपपणं पलीकडच्या कांठावर पोंचला आणि धडपड करीत चढण चढूं लागला. त्याच्या धडपडीमुळं आजूबाजूचे दगड घसरून खालच्या पाण्यांत पडूं लागले.

आम्ही थोडे पुढं गेलों तेव्हां आम्हांला त्या प्रदेशांत सहसा न दिसणारं एक दृश्य दिसलं. जवळजवळ दोनशें सांबरं कुरणावर चरत होतीं. तीं घोळका करून चालत असल्यामुळें एकमेकांच्या शिंगांवर शिंगं आपटून आवाज होत होता. आम्हांला पाहतांच तो सांबरांचा कळप भिऊन पळूं लागला आणि पलीकडच्या झाडींत अदृश्य झाला. आमच्या डाव्या बाजूला क्षितिजाला जाऊन भिडलेला विस्तीर्ण माळ होता. उजव्या बाजूला एक खोल घळ होती. या घळीच्या तळाहून लारामीचा फाटा वहात होता.

चालत चालत आम्ही एका खोल उतारापाशीं आलों. आमच्यासमोर वाहणाऱ्या प्रवाहाच्या लगतच एक निरुंद दरी होती. जवळ जवळ एक मैल ही दरी पसरलेली असावी. दरींत गवत खूप माजलं होतं; आणि अधून मधून वृक्षहि दिसत होते. या दरीच्या टोकाला आम्ही गेलों आणि तिथं आम्हीं आमचा तळ ठोकला. एका प्रचंड कॉटनवुड वृक्षाच्या खालीं आम्हीं आमचा तंबू घातला. आमच्या तंबूसमोरून अर्धवर्तुळाकार वळण घेऊन लारामीचा प्रवाह वहात होता, समोर उंच पांढरे कडे होते. त्यांच्या पायथ्याकडून हा प्रवाह पुढें गेला होता. आमच्या उजव्या हाताला दाट उगवलेलीं झाडं होतीं, या झाडीमुळें कडे देखील अर्धवट झांकले गेले होते. आमच्या मागच्या बाजूला हिरवा माळ होता. तिथें कांहीं कॉटनवुड वृक्ष उगवले होते. या माळावरून एका मैलाच्या अंतरावरील मित्र किंवा शत्रू आम्हांला सहज दिसूं शकत असे. अधूनमधून उगवलेल्या कॉटनवुड वृक्षाशिवाय दृष्टीआड यायला इथं कांहींच नव्हतं.

आम्हीं असं ठरवलं कीं इथं थांबायचं आणि व्हर्लविंडची वाट पहायची. ला बाँतेकडे जातांना तो निश्चितच इथून जाईल. आम्हीं त्याला शोधीत जाण्यांत कांहीं अर्थ नव्हता. एक तर प्रवास करण्याच्या दृष्टीनं हा प्रदेश सोईचा नव्हता. पण त्याहूनहि विशेष म्हणजे व्हर्लविंड आम्हीं शोधायला निघाल्यानंतर नेमका कुठं असेल हें सांगणं कठीण होतं. शिवाय, आमचे घोडे अतिशय थकले होते; आजारामुळं मीहि पुढं प्रवास करण्याच्या अवस्थेंत नव्हतों. आम्हीं

जिथं तळ ठोकला होता तिथं आजूबाजूला उत्तम गवत आणि पाणी होतं. झऱ्यांत बऱ्यापैकीं मासे मिळत होते. आणि गवे जरी नसले तरी हरणं आणि काळवीट यांची शिकार खूप होती. या जागेची एकच अडचण मात्र होती. आणि ती म्हणजे आजूबाजूच्या झुडपांत बऱ्याच खडखड्या नागांची वस्ती होती. हेन्री शॅटिलॅनने हॉर्सबरोबर व्हर्लविंडच्या वस्तीवर आपल्या स्त्रीला असा निरोप पाठवला कीं तिनं आपल्या नातेवाईकांना बरोबर घेऊन वेळ न गमावतां आमच्या तबूंतळाच्या दिशेनं निघावं.

एखाद्या सुव्यवस्थित कुटुंबांत असतो तसा आमच्या तंबूतळावर सकाळ-पासून संध्याकाळपर्यंतचा कार्यक्रम आखीव झाला होता. कॉटनवुड वृक्षाच्या बुंध्याला आम्हीं आमच्या रायफली टेकवून उभ्या केल्या होत्या. आमची खोगिरें आजूबाजूला जमिनीवर पसरलीं होतीं. कॉटनवुड वृक्षाच्या आडव्या-तिडव्या पसरलेल्या मुळांच्या दोन अतिशय सोईस्कर आरामखुर्च्या तयार झाल्या होत्या. वृक्षाच्या छायेंत आम्हीं वाचीत किंवा धूम्रपान करीत बसून रहात असूं. दिवसाच्या सगळ्या कार्यक्रमांत अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम भोजनाचा होता. झाडाच्या फांदीला एखादा काळवीट किंवा हरीण टांगून ठेवलेलं असे. आमच्या भोजनाची व्यवस्था उत्तम होती हें सांगायला नकोच.

या तंबूतळावरच्या आठवणी फोटो घेतल्यासारख्या माझ्या स्मरणांत ठसलेल्या आहेत. तो प्रचंड वृक्ष, तो पांढरा तंबू, सांवलींत झोपलेला तो शॉ, झऱ्याच्या कांठाशींच उभारलेला रेनॉलचा तो भिकार तंबू या सगळ्या गोष्टी अशा डोळ्या-समोर उभ्या राहिल्या आहेत. चुलांड्याच्या आकाराचा गव्याच्या फाटक्या मळलेल्या कातड्याचा बांधलेला रेनॉलचा तंबू अगदीच भिकार दिसत असे. तंबूची एक बाजू उघडी होती. तिथं रेनॉलच्या बंदुकीची दारू भरलेला शिंगाडा, गोळ्यांची पिशवी, लाल रंगाचा पाइप आणि धनुष्यबाण या वस्तु ठेवलेल्या दिसत होत्या. रंग सोडल्यास हा रेनॉल रेड इंडियनच होता असं म्हणायला हरकत नाहीं. त्यांच्या सर्व संवयी त्यानं आत्मसात केल्या होत्या. धनुष्यबाणा-सारख्या जुनाट शस्त्रांनींच शिकार करणं त्याला आवडे. त्याच्या या तंबूच्या गुहेसारख्या अंधारलेल्या जागेंत इतर घरगुती सामानाबरोबरच त्याची स्त्री मार्गोट हिचा प्रचंड विस्तारहि दिसत असे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ती तंबूंत बसलेली असे. खादाडपणा आणि आळस यांचा ती मूर्तिमंत अवतार होती. तिचा प्रेमळ धनी रेनॉल धूम्रपान करीत किंवा आमच्याकडून

बारीकसारीक बक्षिसं उकळण्याचा प्रयत्न करीत किंवा आपल्या पराक्रमाविषयीं आम्हांला थापा देत वेळ घालवीत असे. कधींमधीं तो स्वयंपाकालाहि लागे. गवताळ प्रदेशांतले कांहीं खास पदार्थ तयार करण्यांत तो वाकबगार होता.

रेनॉल आणि डेस्लॉरिअर्स हे दोघेजण समोर आग पेटवून जोरांत स्वयंपाकाच्या तयारीला लागलेले आहेत. रेमंड पांढरा रंग दिलेलं गव्याचं कातडं जमिनीवर पसरून जेवण्याचं सामान मांडण्याची तयारी करतो आहे. ही मांडामांड करून झाल्यानंतर तो कुत्र्यासारखा दोन हात आणि दोन पाय यांच्यावर चालत आमच्या तंबूकडे येऊन आंत तोंड घालतो. घुबडासारखे गरगरां फिरणारे त्याचे डोळे आम्हांला दिसतात. तो आम्हांला जो निरोप सांगायला आला होता तो विसरून गेल्यासारखं त्याच्या डोळ्यावरून भासतं. पण प्रयास करून तो तें आठवतो; जेवण तयार झालं असल्याचं तो आम्हांला सांगतो आणि परत फिरतो.

सूर्यास्त जवळ आला. अशावेळीं भोंवतालचा तो उग्र आणि वैराण परिसर वेगळंच रूप धारण करतो. चरायला सोडलेले आमचे घोडे तळावर आणले. सबंध दिवस ते चरत होते. तळावर आणून त्यांना खुंटांना बांधून टाकलं. अंधार पसरूं लागला. शेकोटीभोंवतीं बसून आम्हीं गप्पा मारीत होतों. शेवटीं झोपेनं पेंगुळलों, तेव्हां आम्हीं आपापलीं खोगिरं जमिनीवर अंथरलीं आणि ब्लँकेटं अंगावर ओढून आम्हीं झोपी गेलों. अंगात आळस शिरल्यामुळं आमची रात्रीं पहारा करण्याची योजना केव्हांच बारगळली होती. हेन्री शॅटिलॅं भरलेली बंदूक उशाशीं ठेवून झोपत असे. अशा ठिकाणीं बंदूक घेऊन झोपणं अत्यंत आवश्यक आहे असं तो म्हणे. हेन्रीसारखा धाडशी मनुष्य कारणाशिवाय इतकी सावधगिरी बाळगणं शक्य नाहीं हें उघड होतं. क्रो रेड इंडियनांचीं युद्धपथकं आजूबाजूच्या परिसरांत हिंडत असल्याच्या कित्येक खुणा आम्हांला दिसल्या होत्या. एखाद्या झाडाची साल काढून त्यावर या क्रो रेड इंडियनांनीं आपल्या भाषेंतलीं विशिष्ट चिन्हें कोरलेलीं असत. आजूबाजूच्या डाकोटांना ठार करून त्यांना आव्हान दिलेलं आहे असा त्या चिन्हांचा अर्थ असे.

एके दिवशीं सकाळीं दाट धुकं पडलं होतं. शॉ आणि हेन्री भटकायला गेले होते. अत्यंत महत्त्वाची बातमी घेऊन ते परत आले. आमच्या तंबूतळा-पासून बंदुकीचा नेम बरोबर लागेल इतक्या अंतरावर त्यांनीं तीस घोडेस्वारांच्या खुणा जमिनीवर उमटलेल्या पहिल्या होत्या. ते घोडेस्वार क्रो

जमातीचेच असावे हें उघड होतं. डाकोटा किंवा गोरे यांच्यापैकीं ते असणं शक्य नव्हतं. कारण त्यांचं पथक आजूबाजूला कुठंच नाहीं हें आम्हांला माहीत होतं. दाट धुक्यानं खैर केली. नाहींतर भयंकर युद्धाला आम्हांला तोंड द्यावं लागलं असतं. एक दोन दिवसांतच ते घोडेस्वार क्रो जमातीचे असल्याचा आमचा संशय खरा ठरला. त्याचं असं झालं कीं, डाकोटा जमातीचे दोन तीन रेड इंडियन आम्हांला भेटले. क्रो घोडेस्वार ज्या दिवशीं इथून गेले त्या दिवशीं सकाळीं हे तीन डाकोटा बाजूच्या घळींत लपलेले होते. या क्रो घोडेस्वारांकडे त्यांचं बारीक लक्ष होतं. या तिघां डाकोटांनीं आम्हांला सांगितलं कीं या क्रो स्वारांनीं बाजूलाच पडलेली डाकोटांचीं पांच प्रेतं गोळा केलीं—रेडइंडियन पद्धतीप्रमाणं तीं झाडाला टांगलेलीं होतीं. आणि त्या प्रेतांवर आपल्या बंदूका रोखून त्यांच्या चिंधड्या केल्या.

अशा या वातावरणांत आमचा तंबूतळ सुरक्षित जरी नसला तरी त्या परिसरांत सुखसोई बऱ्याच होत्या. कारण मी आजारामुळें मेटाकुटीला आलों होतों. आणि ज्या हेतूमुळं मी हा प्रवास पत्करला होता तो लांबणीवर पडंत चालल्यानं दगदगलोंहि होतों. थोडंसं बरं वाटतांच मी सशस्त्र स्वार होऊन गवताळ माळावर फिरून येत असे. कधीं कधीं शॉबरोबर झऱ्यावर आंघोळीला जात असे किंवा रिकामपणीं तिथल्या रानकुत्र्यांवर गोळ्या झाडीत बसत असे. रात्रीच्या वेळीं शेकोटीच्या भोंवती गप्पा मारीत बसलों कीं हे रेड इंडियन लोक चंचलपणामुळं एकदां आखलेली योजना नीट पार पाडीत नाहींत, मध्येंच सोडून देतात याविषयीं आम्हीं चिडून बोलत असूं. आणि व्हर्लविंड आणि त्याचे सहकारी योद्धे यांच्याविषयीं तुच्छतेचे उद्‌गार काढीत असूं. शेवटीं हा सगळा प्रकार मला असह्य झाला.

"उद्यां सकाळीं मी परत लारामीच्या किल्ल्यावर जातों, आणि तिथं कांहीं बातमी समजते का पहातों." असं मी म्हणालों. त्या दिवशीं रात्रीं शेकोटीची आग मंद झालेली होती. आम्हीं सगळे झोपीं गेलों होतों. इतक्यांत काळोखांतून एक आरोळी ऐकूं आली. हेन्री उडी मारून चटकन् उठला. आमचा छानछोक्या मित्र हॉर्स याचा तो आवाज असल्याचं त्यानं ओळखलं. व्हर्लविंडच्या वस्तीवरून हेन्रीच्या स्त्रीचा निरोप घेऊन तो आला होता. हॉर्स तंबूतळावर आला. त्यानं आपली घोडी बाजूच्या खुंटाला बांधली आणि एक शब्दहि न बोलतां शेकोटीसमोर बसून

त्यानं खाद्यपदार्थांचा समाचार घेण्यास सुरवात केली. त्याचं हें अचलतेचं तत्त्वज्ञान फार काळ सहन करणं आम्हांला शक्य नव्हतं. आम्हीं प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. वस्ती इथून किती लांब आहे ?—इथून दक्षिणेकडे जवळजवळ पन्नास मैलांवर; संथपणें वस्ती पुढं सरकते आहे. इथं येऊन पोंचायला कमींत कमी एक आठवडातरी लागेल. हेन्रीची स्त्री कुठं होती ?—'माहतो-ताटोंका' आणि आपले इतर भाऊ यांच्याबरोबर ती इथं यायला निघाली आहे. जितकें लवकर निघतां येईल तितकं निघण्याचा ते प्रयत्न करताहेत. परंतु हेन्रीची स्त्री इथं पोंचेल असं वाटत नाहीं. कारण ती मृत्युशय्येवर असून एकसारखी हेन्रीचं नांव घेते आहे. हें ऐकतांच हेन्रीचा पौरुषसंपन्न चेहेरा ढगाळून गेल्यासारखा दिसला. त्यानं मान खालीं घातली. तो म्हणाला, "तुमची परवानगी असल्यास मी तिला भेटून येईन." शॉ तावडतोब त्याच्या बरोबर जायला तयार झाला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्हीं सूर्योदयाच्या वेळीं घोड्यावर खोगिरं चढवलीं; दोघां केनडियांबरोनबर अणि ह्या दोन रेड इंडियन पोरांबरोबर आपल्याला एकटं टाकून आम्ही जात असल्याबद्दल रेनॉलनं जोराचा विरोध केला. आजूबाजूला शत्रूंचा संचार सुरू असल्यानें आमच्याशिवाय राहाणं त्याला धोक्याचं वाटत होतं. त्याच्या तक्रारींकडे लक्ष न देतां आम्हीं निघालों. छगवॉटरच्या मुखाशीं आम्हीं आलों. शॉ आणि हेन्री उजव्या बाजूला वळून ओढ्याच्या कांठानं पुढं झाले; आणि मी लारामीच्या किल्ल्याच्या दिशेनं निघालों.

माझे हे मित्र आणि आजारी असलेली ती दुर्दैवी रेड इंडियन स्त्री यांची हकिगत कांहीं वेळ थांबवून मी आतां फोर्ट लारामी इथं घडलेल्या हकिगतीकडे वळतों. छगवॉटरच्या मुखापासून लारामीचा किल्ला अठरा मैल अंतरावर होता, मी तिथं तीन तासांत जाऊन पोंचलों. दरवाज्याशीं पांढरा ओव्हरकोट घातलेला एक मनुष्य नुकताच पकडलेला एक केंसाळ जंगली घोडा घेऊन उभा होता. त्याचा चेहेरा एखाद्या जुनाट चामड्यासारखा दिसत होता. त्याची जिवणी भलतीच रुंद होती. त्यानं रेड इंडियन सहसा करतात त्यापेक्षां अधिक जिव्हाळ्यानं माझं स्वागत केलं. कारण यापूर्वी आमची मैत्री झालेली होती. आम्हीं एकमेकांची सोय पाहून घोड्यांची अदलाबदल केली होती. यामुळं खूष होऊन तो मनुष्य—त्याचं नांव पॉल—माझ्याविषयीं सर्वत्र चांगलं बोलत

फिरला होता. तो मिसुरीच्या प्रदेशांतल्या डाकोटा जमातींतला होता. मिश्र रक्ताचा दुभाषा पिअर डोरिअन याचा तो मुलगा. अर्व्हिंगच्या 'ॲस्टोरिया'-मध्यें डोरियनचा अनेकदां उल्लेख आलेला आहे.

रिचर्डच्या व्यापारी कोठीवर कुणातरी प्रवाशाला हा पकडलेला नवा घोडा विकण्यासाठीं जात असल्याचं पॉलनं मला सांगितलं. मला आपल्याबरोबर येण्याची त्यानं विनंती केली. मी तयार झालों. पॉलच्या मागून गळ्यांत दोरी अडकवलेला त्याचा घोडा येत होता. आम्हीं दोघांनीं ओढा ओलांडला. समोरचा रेताड माळ ओलांडून आम्हीं पुढं गेलों तेव्हां पॉल बोलूं लागला. खूप फिरल्यामुळं शॉचा दृष्टिकोन विश्वजनिन होता. गोऱ्यांच्या वसाहतींत तो राहिला होता, जवळजवळ हजार मैलांच्या परिसरांतल्या बहुतेक रेड इंडियन जमातींना युद्धाच्या आणि शांततेच्या काळांत तो भेटला होता. फ्रेंच आणि इंग्लिश यांच्या मोडक्या तोडक्या बोली बोलत असे. परंतु तो अंतर्बाह्य रेड इंडियन होता. आपल्या जमातीच्या लोकांच्या शौर्यकथा तो सांगूं लागला कीं त्याचे डोळे लकाकून उठत. डाकोटांनीं बायका, मुलं, पुरुष यांची कत्तल करून होहाय जमातीचा कसा नायनाट केला; अखेरपर्यंत लांडग्यासारख्या लढणाऱ्या सोळा डिलावेअर योद्ध्यांची त्यांनीं कशी कत्तल केली इत्यादि गोष्टी तो सांगत असे. पॉलनं मला आणखी एक गोष्ट सांगितली. ती ऐकत असतांना प्रथम माझा विश्वासच बसला नाहीं. परंतु नंतर इतर अनेक ठिकाणांहून ती खरी असल्याचं मला समजलं तेव्हां माझी खात्री पटली.

सहा वर्षांपूर्वीं जिम बेकवर्थ हा मनुष्य फर कंपनीच्या वतीनं व्यापार करण्यासाठीं म्हणून क्रो रेड इंडियनांच्या एका मोठ्या वसाहतीवर गेला. जिम बेकवर्थ हा फ्रेंच, अमेरिकन आणि निग्रो अशा तिन्हीं रक्तांची भेसळ असलेला हलक्या दर्जाचा होता. गेल्या उन्हाळ्यांत तो सेंट लुई या शहरांत होता. जिम बेकवर्थ हा प्रामाणिकपणा किंवा कसलीहि सामाजिक प्रतिष्ठा यांच्यावर निखारा ठेवून घराबाहेर पडलेला अत्यंत भयानक आणि विश्वासघातकी डाकू आहे अशीच त्याची कीर्ति निदान त्या गवताळ प्रदेशांत तरी होती. एकाद्या माणसाला झोपेंत ठार मारण्याचा क्षुद्रपणा जसा जिमच्या ठिकाणीं होता, त्याप्रमाणेंच विलक्षण साहसाची अचाट कृत्यं करण्याची शक्तीहि त्याच्याकडे होती. त्याच्या या स्वभावाचं दर्शन घडवण्यासाठीं पुढील उदाहरण पुरेसं होईल, ही गोष्ट घडली तेव्हां तो क्रो वस्तीवर होता. ब्लॅक फूट

रेड इंडियनांचं एक पथक लपतछपत या वस्तीवर आलं. हे योद्धे तीस चाळीसच्या आसपास होते. त्यांनीं कांहीं तुरळक माणसं मारलीं आणि घोडे पळवले. या गोष्टीचा सुगावा लागतांच क्रो योद्धयांचं एक पथक तयार झालं आणि त्यांनीं या ब्लॅकफुटांना गाठलं. ब्लॅकफुटांची अशी कोंडी झाली कीं त्यांना पळून जाणं शक्य नव्हतं. शेवटी हे सगळे ब्लॅकफुट रेड इंडियन एका टेकडीच्या पायथ्याशीं गेले आणि तिथं त्यांनीं आपल्याभोंवतीं लांकडांच्या ओंडक्यांचा उंचीला गळ्यापर्यंत येईल एवढा लहानसा तट उभा केला. या तटाच्या मागं ते योद्धे सुरक्षित उभे राहिले. या तटावर हल्ला करून क्रो योद्धयांना त्यांचा सहज नायनाट करतां आला असता, कारण क्रो योद्धे संख्येनं दसपट अधिक होते. परंतु त्यांच्या युद्धविषयक कल्पनांत ही गोष्ट बसेना. तेव्हां त्यांनीं गर्जना करीत या ओंडक्यांवर गोळ्यांचा आणि बाणांचा वर्षाव सुरू केला. एकाहि ब्लॅकफुटाला इजा झाली नाहीं; उलट अनेक क्रो गोळ्यांना बळी पडले. अशा तऱ्हेचं हें पोरकट युद्ध तास दोन तास चाललं होतं. अधूनमधून एकदा क्रो योद्धा शौर्याच्या धुंदींत युद्धगीत गात ओंडक्याच्या समोर जाई. पृथ्वीतलावर आपल्यासारखा शूर कोणी नाहीं अशा गर्वानं आपला परशु हातांत घेऊन तो त्या तटावर धाव घाली. परंतु आपल्या लोकांकडे परत येतांना तो त्याच्यावर झालेल्या बाणांच्या वर्षावामुळं वाटेंतच मरून पडे. असं असूनहि ते क्रो कांहीं एकत्र होऊन हल्ला करीनात. ब्लॅकफूट योद्धे आपल्या ओंडक्यांच्या तटाच्या मागे सुरक्षित राहून मात्र यांचे बळी घेत होते. हा सगळा प्रकार जिम वेकवर्थला पाहावेना. त्याच्या सहनशीलतेची दोरी तुटली. तो सगळ्या क्रो योद्धयांना उद्देशून म्हणाला, "तुम्हीं सगळे मूर्ख आहांत, थेरड्यांसारखे वागताहांत. तुमच्यांत कांहीं शौर्य शिल्लक असेल तर माझ्याबरोबर या. मी तुम्हांला कसं लढायचं तें शिकवतों." त्यानं असं म्हणून आपल्या अंगावरचा फासेपारधी घालतात तसला काळवीटाच्या कातड्याचा अंगरखा काढून फेकला, त्या रेडइंडियनांसारखा तो उघडा झाला. त्यानं आपली रायफल तिथंच ठेवली. आणि त्याऐवजीं एक लहानसा परशु हातांत घेतला. माळावरून तो उजव्या हाताच्या दिशेनं धावला. या उजव्या हाताला एक घळ होती. या घळींतून जातांना ब्लॅकफूट त्याला पाहूं शकत नव्हते. नंतर खडकावरून चढून तो ब्लॅकफुटांच्या मागच्या बाजूला जी टेकडी होती तिच्या माथ्यावर जाऊन पोंचला. चाळीसपन्नास क्रो योद्धे त्याच्या मागून

निघाले. टेकडीच्या माथ्यावर जातांच खडकावरून उड्या मारीत तो तटाच्या आंत बसलेल्या ब्लॅकफुटांच्य मध्यें जाऊन उभा राहिला. आंत जातांच त्यानं एकाचे केंस पकडले आणि हातांतल्या परशूनं त्याची गर्दन उडवली. मग त्यानं दुसऱ्याची बकोटी धरून त्याला एका गुद्यांतच खालीं लोळवलं. मग त्यानं क्रो लोकांची युद्धघोषणा केली. आपल्या हातांतला परशु तो इतक्या विलक्षण वेगानं फिरवीत होता कीं एकाहि ब्लॅकफुटाची पुढं होण्याची हिंमत झाली नाहीं. त्यांनीं त्याला जागा करून दिली. आतां खरं म्हणजे ओंडक्याच्या तटावरून उडी मारून त्याला पळून जातां आलं असतं; परंतु तसं करण्याची जरूर पडली नाहीं. कारण त्याच्यामागून आलेले ते चाळीसपन्नास योद्धे खडकावरून उड्या मारीत आले आणि त्याच्यासारखेच तटांत घुसले. त्याच वेळीं बाहेरील योद्धेहि समोरून आले आणि त्यांनीं हल्ला चढवला. एकच आकांत झाला. कोंडलेल्या वाघांसारखी गर्जना करीत ब्लॅकफूट योद्धे निकरानं लढले. परंतु लवकरच कत्तल थांबली. आणि कड्याच्या खालीं प्रेतांचा ढिगारा झाला, एकहि ब्लॅकफूट वांचला नाहीं.

पॉल सांगत असलेली गोष्ट संपली तेव्हां रिचर्डची व्यापारी गढी आम्हांस दिसूं लागली होती. गढीच्या भोंवती कांहीं माणसं गर्दी करून उभीं होतीं, समोरच्या बाजूला कांहीं अंतरावर प्रवाशांचा एक तळ होता.

मी म्हणालों, "पॉल, तुझ्या त्या मिनीकॉंग्युचा तळ कोठे आहे?"

पॉल म्हणाला, "अजून आलेला नाहीं. कदाचित् उद्यां येईल."

डाकोटा जमातीच्या दोन मोठ्या वस्त्या मिसुरीवरून युद्धांत भाग घेण्यासाठीं तीनशें मैलांचा प्रवास करून आल्या होत्या. त्यादिवशीं सकाळीं हे तीनशें लोक रिचर्डच्या गढीकडे पोंचतील असा अंदाज होता. परंतु अजूनपर्यंत त्यांचा पत्ता नव्हता. तेव्हां मी तर्र पिऊन गडबड करणाऱ्या लोकांतून वाट काढीत गढींतल्या एका दालनांत गेलों. तिथं नाना वंशांची आणि वर्णांची माणसं बसलेलीं होतीं. हे बहुतेक लोक झिंगलेले होते. कॅलिफोर्नियाला निघालेल्या प्रवाशांच्या रिचर्डच्या गढीकडे येतांच अचानक असं लक्षांत आलं होतं कीं आपल्याकडे सामान जरा वाजवीपेक्षां अधिकच आहे. इतकं सामान या दूरवरच्या प्रवासांत न पेलणारं ओझं होऊन बसलं असतं. आणि म्हणून त्यांनीं अतिशय कमी पैसे घेऊन, नुकसानींतच बरचंसं सामान गढीवरच्या व्यापाऱ्यांना विकायचं ठरवलं. या प्रवशांबरोबर बरीचशीं मिसुरीहून आणलेली व्हिस्की

होती. जितकी पितां येईल तितकी त्यांनीं इथंच पिऊन घेतली. पिऊन झिंगलेल्या कांहीं रेड इंडियन बाया जमिनीवर अंथरलेल्या गव्याच्या कातड्यावर पसरल्या होत्या. त्यांच्याच बाजूला घाणेरडे दिसणारे मेक्सिकन् रेड इंडियन लांब केंसाचे कॅनडियन आणि फासेपारधी, अमेरिकेंतले जंगल प्रदेशांतून आलेले लोक दिसत होते. हीं सगळीं माणसं व्यवस्थित प्यालेलीं होतीं. मेक्सिकनांजवळ धनुष्यबाण होते. तर या अमेरिकनांच्या कमरेला पिस्तुल आणि सुरा लटकलेला होता.

दालनाच्या मध्यभागीं एक उंच किडकिडीत मनुष्य जमलेल्या लोकांना धंदेवाईक वक्त्याप्रमाणं व्याख्यान देत होता. त्यानं अंगांत घातलेला कोट फारच मळला होता. व्याख्यान देतांना तो आवेशानं आपला एक हात करवतीसारखा हवेंत फिरवत होता. दुसऱ्या हातांत त्यानं ग्लास धरला होता. दोनदोन मिनिटांनीं तो ग्लास तोंडाला लावत असे. ग्लासांतली दारू त्यानं केव्हांच संपवलेली होती. आपण रिकामाच ग्लास पुन्हांपुन्हां ओठाला लावतों आहोंत ही गोष्ट त्याच्या ध्यानांत आलेली नव्हती. रिचर्डनं माझी त्याच्याशीं ओळख करून दिली तेव्हां तो कर्नल "आर" असल्याचं कळलं. तो एका प्रवासी— तांड्याचा प्रमुख होता. कर्नलनें माझ्या अंगरख्याला बटण नसल्यामुळं त्याची चामड्याची झालर पकडली आणि तो आपली भूमिका मला सांगूं लागला. त्याच्या तांड्यांतल्या लोकांनीं बंड करून कर्नलला नेतेपदापासून पदच्युत केलं होतं. परंतु असं असूनहि अजूनहि आपलं वर्चस्व त्यांच्यावर चालतं असं तो सांगत होता. फक्त प्रवाशांचा नेता ही उपाधि त्याला लावतां येत नव्हती. कर्नल मला हें सांगत असतांना त्याच्याबरोबर कॅलिफोर्नियाला निघालेल्या लोकांकडे मी दृष्टिक्षेप टाकला. अशा या लोकांना बरोबर घेऊन कर्नलनें कॅलि-फोर्नियाला जावं ही गोष्ट त्याला झेपणारी नव्हे हें माझ्या लक्षांत आलं. या जमलेल्या लोकांत तिघे उंच तरुण वेगळेच उठून दिसत होते. डॅनियल बूनचे हे तिघे नातू असल्याचं मला कळलं. सरहद्दभागांत प्रथम येऊन वस्ती करणाऱ्या लोकांत डॅनियल बून हा एक अग्रेसर होता. आपल्या आजोबाचा धाडसी स्वभाव या तिघां तरुणांत उरलेला दिसत होता. परंतु डॅनियल बूनच्या व्यक्तित्वाचा विलोभनीय विशेष असलेली त्याची शांत गंभीर वृत्ति मात्र या तिघां नातवांत दिसत नव्हती.

•

हा प्रवाशांचा तांडा कॅलिफोर्नियाच्या दिशेनं निघाल्यानंतर त्यांच्यावर भयानक संकटं कोसळलीं. कॅलिफोर्नियाहून अलिकडेच परत आलेल्या जनरल

किअर्नीनं ती बातमी आम्हांला सांगतली. हे सगळे लोक जात असतांना डोंगरांत खूप हिमवर्षाव झाला. भूक आणि थंडी यांच्या हल्ल्यामुळं हे लोक इतके पागल झाले कीं एकमेकांच्या मांसावर त्यांना गुजराण करावी लागली.

या प्रवाशांचा हा जो गोंधळ चालला होता त्याचा मला वैताग आला. मी म्हणालो, "पॉल, चल आतां आपण इथून निघूं या." गढीच्या भिंतीच्या खालीं पॉल सावलीला बसला होता. तो उडी मारून उठला आणि घोड्यावर स्वार झाला. आम्हीं दोघं लारामीच्या किल्ल्याच्या दिशेनं निघालों. आम्हीं किल्ल्याच्या दरवाज्याशीं पोंचलों तेव्हां एक मनुष्य खांद्यावर रायफल टाकून आणि आपलं सामान पाठीवर बांधून किल्ल्यांतून बाहेर आलेला आम्हांला दिसला. बरीचशीं माणसं त्याच्याभोंवतीं गोळा झालीं होतीं आणि त्याच्याशीं हस्तांदोलन करीत होतीं. जणुं कांहीं तीं माणसं त्याचा निरोप घेत असावींत. या गवताळ प्रदेशांत एकटं आणि शिवाय पायीं प्रवास करायला एखाद्यानं निघावं हें मला थोडं चमत्कारिक वाटलं. थोड्या वेळानं मला सगळा प्रकार कळला. हा बाहेर पडणारा मनुष्य किल्ल्यांतला एक कॅनडियन होता. मला जर नीट आठवत असेल, तर मला वाटतं त्याचं नांव पेरॉ होतं. पेरॉ आणि बोर्डो यांचं झालं भांडण. हा प्रकार इतका तापला कीं पेरॉला किल्ल्यांत राहणं अशक्य झालं. तात्पुरत्या मिळालेल्या अधिकाराचा मद बोर्डोला चढला होता. बोर्डोनं पेरॉला शिव्या घातल्या. प्रत्युत्तरादाखल पेरॉनं बोर्डोला एक ठोसा लगावला. किल्ल्याच्या आवारांत दोघांची झटापट सुरू झाली. बोर्डोला खालीं पाडून रागानं बेभान झालेला तो कॅनडियन उरावर बसला. बोर्डोच्या रेड इंडियन बाईचा भाऊ धावून आला. आणि त्यानं पेरॉला गच्च धरून ओढला, नाहींतर बोर्डोची खैर नव्हती. मदतीला धांवून आलेल्या त्या म्हाताऱ्या रेड इंडियनाच्या पकडींतून पेरॉनं आपल्याला सोडवून घेतलं आणि तो आपली बंदूक घेण्यासाठीं आपल्या खोलीकडे धावला. बोर्डोही बंदुकीसाठी आपल्या खोलीकडे धावला. पेरॉनं हातांत बंदुक घेऊन खोलीच्या उंबरठ्यावरून द्वंद्व युद्धाचं आव्हान मोठ्यानं गर्जून दिलं तेव्हां बोर्डो घाबरला. तो खोलींतून बाहेर पडेना.

त्याच्या रेड इंडियन स्त्रीच्या भावानं त्याच्या या भेकडपणाची निर्भर्त्सना करून त्याला सांगितलं कीं त्यानं माळावर जाऊन गोऱ्या लोकांना शोभेसं द्वंद्वयुद्ध करावं. बोर्डोचा भेकडपणा पाहून त्याच्या रेड इंडियन बाईचंहि माथं भडकलं.

त्यानं द्वंद्वयुद्धाला तयार व्हावं म्हणून तिनं 'तूं कुतरडा आहेस, म्हाताऱ्या म्रांईसारखा वागतो आहेस" असंहि त्याला म्हणून पाहिलं. परंतु बोर्डोवर त्याचा कांहींहि परिणाम झाला नाहीं. त्याच्या धूर्तपणानं शौर्यावर मात केली होती. पेरॉ बोर्डोवर शिव्यांचा वर्षाव करीत उभा होता. शिव्या देऊन देऊन तो थकला आणि शेवटीं त्यानं वैतागून आपलं सामान पाठीला बांधलं आणि तो एकटा पेरी किल्ल्याच्या दिशेनं निघाला हा किल्ला तीनशें मैलांचा वैराण प्रदेश ओलांडल्यानंतर लागतो. वाटेंत घातकी रेड इंडियन लोक आहेत.

त्या रात्रीं मी लारामीच्या किल्ल्यांतच राहिलों. सकाळीं न्याहारी आटोपून मॅक्लस्की या व्यापाऱ्याबरोबर मी गप्पा मारीत बाहेर आलों तेव्हां बळकट बांध्याचा एक उंच मनुष्य किल्ल्याच्या दरवाज्याला टेकून उभा असलेला मला दिसला.

"कोण तूं?" मीं विचारलं.

मॅक्लस्की म्हणाला, "त्याचं नांव व्हर्लविंड. युद्धाचं वातावरण त्यानंच पेटवलं. या सिऊ जातीच्या लोकांचा हाच धंदा. आपल्या तंबूंत बसून हिंवाळ्यांत आमच्याबरोबर गव्यांच्या कातड्यांचा व्यापार करण्याऐवजीं हे लोक एकमेकांचे गळे कापत बसतात. आणि तेंच त्यांना चांगलं जमतं. ही जर लढाई सुरू झाली तर पुढच्या मोसमांत आमचा व्यापार अगदीं ठार बसेल."

युद्धाला विरोध करणाऱ्या सगळ्या व्यापाऱ्यांचं अगदीं हेंच मत होतं. युद्धामुळं त्यांच्या व्यापाराला तडाखा बसणार होता, व्हर्लविंड आदल्या दिवशीं निघून लारामीच्या किल्ल्यावर आला होता. आपला मुलगा स्नेक लोकांनीं ठार केल्याची बातमी कळल्यापासून त्याला चढलेली युद्धाची खुमखुमी जराहि कमी झाली नव्हती. युद्ध करायचं म्हणजे बारीकसारीक तपशिलांत लक्ष घालून मोहिमेची दूरवरची तयारी करावी लागते. चंचल स्वभावाच्या व्हर्लविंडला हें जमणं कठीण होतं. त्या दिवशीं सकाळीं बोर्डोनं व्हर्लविंडला गाठलं. बोर्डोनं त्याला कांहीं भेटी दिल्या आणि त्याला सांगितलं कीं तो जर युद्धाच्या भरीला पडला तर त्यांत त्याचे अनेक घोडे मरतील. घोडे मेल्यामुळं गव्यांची शिकार करतां येणार नाहीं. म्हणजे अर्थातच गोऱ्या लोकांना तो कातडी विकू शकणार नाहीं. म्हणजे युद्ध हा एकूण मूर्खपणाच ठरणार होता—तेव्हां व्हर्लविंडनं युद्धाच्या भानगडींत न पडतां आपल्या तंबूंत आरामांत आपला पाइप ओढत बसावं हेंच शहाणपणाचं. बोर्डोनं व्हर्लविंडच्या मनावर हें

टसवतांच त्याचा युद्धाचा निश्चय डळमळला.

ब्रोर्डोनं व्हर्लविंड आतां युद्ध करीत नाहीं असं मोठ्या अभिमानानं भविष्य केलं.

रेड इंडियन लोकांच्या जीवनाचा अभ्यास करण्याविषयींचं माझं कुतूहल माझ्या माणुसकीपेक्षां वरचढ होतं. युद्धाच्या पूर्वी होणारे त्यांचे सगळे विधि मला पाहायचे होते. अर्थातच युद्ध न होण्याची शक्यता कळतांच माझं मन खट्टू झालं. वास्तविक व्हर्लविंडनं नुसतंच कोलीत टाकलं होतं. कोलीत टाकल्या-नंतर पेटलेला वणवा मात्र सार्वत्रिक होता. डाकोटा जमातीच्या पश्चिमेकडच्या शाखांना युद्ध झालेलं हवं होतं. चाळीस मैलांवर असलेल्या एका झऱ्याच्या कांठीं सहा मोठ्या वस्त्या, युद्धांत मदत व्हावी म्हणून इष्टदेवतेची प्रार्थना करण्यासाठीं जमल्या असल्याचं मला मॅक्स्कीकडून कळलं. मॅक्स्की तिथून जाऊन आला होता. या सहा वस्त्या ला बाँते इथं ठरल्याप्रमाणं जायला निघाल्या असल्याचंहि त्यानं सांगितलं. ला बाँते इथं गवे नाहींत असं कळलं तर हे लोक तिथं जाणार नाहींत. नाहींतर एका आठवड्यांत ते तिथं पोचतील असंहि मॅक्स्की म्हणाला. मॅक्स्कीनं सांगितलेली ही शेवटची अट अर्थातच मला रुचली नाहीं. कारण या मोसमांत आजूबाजूच्या प्रदेशांत गवे जरा कमीच होते.

मिनीकॉग्यूंच्या दोन वस्त्या रिचर्डच्या गढीवर येणार होत्या याचा मी आधींच उल्लेख केला आहे. परंतु दुपारीं बातमी आली कीं या वस्तींतल्या लोकांची आपापसांत भांडणं सुरू झाल्यामुळं ते लोक गटागटांनीं परत फिरत आहेत. प्रवाशांनीं आणलेल्या त्या व्हिस्कीचा हा प्रताप! गढीवर बसून जितकी व्हिस्की झोकतां येईल तितकी त्यांनीं झोंकली. तरीसुद्धां ती संपेना तेव्हां त्यांनीं ती या रेड इंडियनांना विकली. त्याचा काय परिणाम झाला असेल हें सांगण्यासाठीं भविष्यवेत्त्याची जरुरी नाहीं. दारूच्या कोठारांत आगीची ठिणगी टाकली असती तरीदेखील इतक्या लौकर भडका उडता ना! पोटांत व्हिस्की जातांच या रेड इंडियनांमधलीं जुनीं वैरं ऐनांत आलीं. स्नेक लोकांशीं युद्ध करण्यासाठीं म्हणून तीनशें मैलांचा प्रवास करून आपण इथवर आलों आहोंत ही गोष्ट ते पार विसरून गेले. भयानक वैरानं पेटलेलीं तीं माणसं लहान पोरांसारखीं बेबंद भांडूं लागलीं. अनेकांचे मुडदे पडले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं या दोन्ही वस्त्या गटागटांनीं विखुरल्या आणि मिसुरीकडे परत जायला निघाल्या. युद्धाच्या पूर्वी होणाऱ्या विधींची मी वाट पाहात होतों. रेड इंडियनांच्या अत्यंत भीतिदायक स्वभावाचं वैशिष्ट्यपूर्ण दर्शन घडण्याची आपली

संधि हुकणार याचं मला फार वाईट वाटलं. अर्थात ही संधि घेण्यासाठीं या लोकांत मिसळायचं म्हणजे जिवावर केव्हां बेतेल हें सांगतां येणार नाहीं अशी मी माझ्या मनाची समजूत घातली आणि ही बातमी सांगण्यासाठीं आमच्या तंबूतळाकडे निघायची तयारी करूं लागलों.

चरायला सोडलेला माझा घोडा मीं पकडून आणला. पाहतों तर त्याचा नाल निखळून पडला होता आणि खडक लागून त्याचा खूर दुखावला गेला होता. लारामीच्या किल्ल्यांत नाल बसवण्याचे दर अगदीं वाजवी आहेत. एक नाल बसवायला तीन डॉलर घेतात. हेंड्रीकला मी कोंडवाड्यांत एका खुंटाला बांधला आणि रोबिडो या लोहाराला नाल मारण्यासाठीं बोलावलं. रोबिडो आला आणि नाल ठोकायच्या कामाला लागला. बाजूला उभा राहून मी पहात होतों. इतक्यांत पुढील शब्द माझ्या कानावर पडले : "आणखी दोघेजण गचकले ! तरी अजून आम्ही बरेच जण उरलेले आहोंत. मी आणि गिॅफ्रस उद्यां डोंगरांत जायला निघणार आहोंत. मला वाटतं, यानंतर आमचीच पाळी आहे. हें आयुष्य अतिशय बिकट आहे !"

मी चमकून वर पाहिलं. बोलणारा मनुष्य पांच फूट उंच असेल नसेल, पण चांगला बळकट होता. त्याच्या अंगांतला काळवीटाचा कुडता, त्याचा पट्टा, सुरी, बंदुकीच्या दारूचा शिंगाडा या सगळ्या गोष्टी अनेक दिवस वापरल्यामुळं विटल्या होत्या. यामुळं हा मनुष्य दिसायला अगदींच मलीन दिसत होता. त्याच्या दोन्ही पायांच्या बोटांचीं पहिली पेरं हिमाघाता-मुळं गेलेलीं होतीं. त्यामुळं त्याच्या पायांतले जोडे किंचित् लहान करून घेतलेले होते. त्याच्याकडे पाहतांच तो 'स्वच्छंद फासेपारधी' असल्याचं चटकन कळत होतं. त्याच्या वाटोळ्या तांबूस चेहेऱ्यावर त्याच्या स्वभावांतली बेपार्वाई आणि आनंदी वृत्ती उजळून उमटली होती. तो बोलत असलेले शब्द त्याच्या या वृत्तीशीं अगदींच विसंगत वाटत होते.

"कोण दोघे गचकले ? मला नीट कळलं नाहीं, तुम्हीं, तुम्हीं काय म्हणतां तें !" मी त्याला विचारलं.

"आरापाहो रेड इंडियनांनीं डोंगरांत गांठून आमच्यापैकीं दोघांचे बळी घेतले. बुलटेल नुकताच डोंगरांतून आला आणि त्यानं ही बातमी मला सांगि-तली. त्या रेड इंडियनांनीं एकाच्या पाठींत सुरा भोसकला आणि दुसऱ्याला त्याचीच रायफल घेऊन गोळी घातली. असं आमचं आयुष्य आहे. माझी

रेड इंडियन बाई म्हणते कीं तिला एक जलद धावणारा घोडा आणि कांहीं लाल रिबिनी हव्यात. तिला हव्या असलेल्या या गोष्टी विकत घेतां येतील एवढं कातडं मी गोळा करीन आणि मग फासेपारध्याच्या या धंद्याला रामराम ठोकीन. पलीकडच्या उतारावर जाऊन मी एक शेत घेऊन राहायचा विचार केला आहे."

बाजूलाच दुसरा एक फासेपारधी उभा होता. तो याला म्हणाला, "शलो, तूं जर शेती करायला लागलास तर तुझी हड्डी सुकून निघेल." या फासेपारध्याचा चेहेरा एखाद्या बुलडॉगसारखा भयानक दिसत होता. त्याच्या या बोलण्यावर प्रत्युत्तरादाखल रोलो हंसला आणि कसलंसं गाणं गुणगुणत बोटांचीं पेरं गेलेल्या पायांनीं त्यानें नाचाचा ताल धरला.

तो दुसरा फासेपारधी म्हणाला, "तुमच्या तंबूतळावरून जातांना लवकरच तूं आम्हांला पाहशील." मला उद्देशून तो हें म्हणाला होता. तेव्हां मी त्याला सांगितलं, "आमच्या तंबूतळावरून जातांना आमच्याकडे या आणि कॉफी घेऊन मग पुढं जा." एव्हांना दुपार झाली होती, तेव्हां मी किल्ला सोडून आमच्या तळाच्या दिशेनं निघण्याच्या तयारीला लागलों. थोड्या वेळानं मी किल्ल्याच्या बाहेर पडलों तेव्हां प्रवाशांच्या गाड्यांचा तांडा ओढा पार करतांना मला दिसला. मी जवळ जातांच त्यांच्यापैकीं दोघांतिघांनीं मला विचारलं, "कुठवर निघालांत ?"

"या ओढ्याच्या पलीकडे अठरा मैल."

"पोंहचेपर्यंत बराच उशीर होईल ! जरा जलदीनंच जा आणि सावधगिरी राखा, नाहींतर वाटेंत रेड इंडियन गांठायचे."

त्यांनीं दिलेल्या या बहुमोल सल्ल्याकडे मला दुर्लक्ष करणं शक्य नव्हतं. मी ओढा ओलांडून पलीकडच्या माळावर आलों आणि झपाट्यानं घोडा पुढं घातला. परंतु, "जितकी करावी घाई तितका अधिक उशीर होई" या म्हणीचं मला प्रत्यंतर आलं. किल्ल्यापासून मी तीन मैल अंतरावर गेलों तेव्हां वाट अंधुक दिसत होती. सावधगिरीपेक्षां वेगावरच माझा अधिक भर असल्यामुळें मी वाट चुकलों. शेवटीं मी लारामीच्या ओढ्याच्या अनुरोधानं पुढें झालों. जातांना सायंकाळच्या सूर्याच्या प्रकाशांत माझ्या उजव्या हाताकडच्या एका खोल घळींत लारामीच्या ओढ्याचा प्रवाह चमकतांना मला अधूनमधून दिसत होता. ओढ्याच्या कांठाशीं मी पोंचलों तेव्हां दिवस मावळायला

अर्धा तास होता. त्या वैराण एकांतांत मन भारून टाकणारं कांहींतरी होतं. बाजूच्या झुडपांतून अचानक उडी मारून एक काळवीट माझ्यासमोर येऊन उभा राहिला. तीस यार्डांच्या अंतरावर तो होता. मी त्याच्यावर गोळी झाडली. तो गरगर फिरला आणि खालीं पडला. शिकार यशस्वी झाल्याची मला खात्री असल्यामुळं मी सावकाश माझी बंदुक पुन्हां भरली आणि घोड्यावर स्वार होऊन त्या काळविटाजवळ गेलों. आश्चर्य असं कीं मी जवळ जातांच तो काळवीट झटकन् उभा राहिला आणि तीन पायांवर धांवत एका काळोख्या घळींत अदृश्य झाला. त्याच्यामागून जाऊन त्याचा पाठलाग करायला मला वेळ नव्हता.

यानंतर दहा मिनिटांनीं मी एका खोल दरीच्या तळाहून जात होतों. तिथल्या त्या अंधुक प्रकाशांत कुणीतरी माझा पाठलाग करतोय् असा मला भास झाला. मी चटकन् खालीं उतरलों आणि बसून बंदुकीचा नेम धरला. कांहीं क्षणांतच तो एक काळवीट असल्याचं माझ्या ध्यानांत आलं. शंभर यार्डांच्या अंतरावर आतां तो काळवीट होता. मानेची उंच कमान करून माझ्याकडे तो डोळे फिरवून पहात होता. त्याच्या छातीवरच्या पांढऱ्या ठिपक्यावर मी बंदुकीचा नेम धरला. मी गोळी झाडणार इतक्यांत तो काळवीट वाऱ्यावर हेलकावणाऱ्या गल-बतासारखा एकदां डाव्या आणि एकदां उजव्या हाताला वळतवळत वेगानं पळूं लागला. कांहीं वेळानं तो थांबला, कुतूहलानं त्यानं मागं वळून पाहिलं आणि पुन्हां धावूं लागला. मी गोळी झाडली. त्या काळवीटानं एक उंच उडी मारली आणि तो खालीं कोसळला. दोनशें पावलांचं अंतर चालून मी त्याच्याजवळ आलों. अजून त्याच्यांत थोडी धुगधुगी होती. मरतां मरतां डोळे वर करून त्यानं माझ्याकडे पाहिलं. एखाद्या सुंदर स्त्रीच्या लकाकणाऱ्या काळ्याभोर डोळ्यासारखे त्याचे डोळे होते. माझ्या मनांत विचार आला : "मला मुक्कामावर लवकरच पोंचायची घाई आहे हें माझं सुदैवच म्हणायचं. कारण मला इथं थांबायला जर वेळ असता तर या काळवीटाकडे पहात मी पश्चात्ताप करीत बसलों असतों."

जमेल तितक्या कसबानें मी तो काळवीट कापला. त्याचं मांस घोड्यावर लादून घेतलं आणि पुढं निघालों. समोरच्या अनेक टेकड्यांनीं माझी वाट रोखली गेली. आतां बराच उशीर झालाय् तेव्हां इथेंच रात्र काढून उद्यां सकाळीं वाट शोधावी असा विचार माझ्या मनांत आला. परंतु शेवटचा प्रयत्न म्हणून मी एक उंच टेकडी चढून गेलों. टेकडीच्या माथ्यावरून पाहातों

तो लारामीचा ओढा झाडांतून वाट काढीत पुढं वहात असलेला मला दिसला. मला अतिशय आनंद झाला. पलीकडे दिसणाऱ्या झाडांच्या सावलींत ती मोडकळलेली जुनी गढी उभी होती. मी त्या झाडांजवळ जाऊन पोचलों. त्या अंधुक प्रकाशांत तिथल्या दाट झाडींतून वाट काढून पुढं जाणं मुळींच सुखाचं नव्हतं. माणसाच्या किंवा एखाद्या प्राण्याच्या पावलांचा आवाज येतो किंवा काय याचा मी काळजीपूर्वक कानोसा घेऊं लागलों. तपकिरी रंगाचा एक पक्षी झाडांच्या फांद्यांत बसून ओरडत होता. त्या आवाजाखेरीज दुसरा कसलाहि आवाज कानावर पडत नव्हता. थोड्या वेळानं मी उघड्या माळावर आलों. तिथं येतांच मला बरं वाटलं, कारण आजूबाजूनं कोणी आलं तरी मला दिसूं शकलं असतं. छगवॉटरच्या मुखापाशीं मी आलों तेव्हां चांगलाच अंधार पडला होता. मी लगाम सैल सोडला आणि घोड्याला त्याच्या मर्जीप्रमाणं जाऊं दिलं. अचूक प्रेरणेनं वाट शोधीत तो आमचा तळ जिथं होता त्या मैदानावर आला. पेटलेली शेकोटी कुठं दिसते किंवा काय यासाठीं मी आजूबाजूला पहात होतों इतक्यांत हेंड्रीक मोठ्यानं खिंकाळला. कांहीं अंतरावरून त्याला प्रतिसाद मिळाला. समोरच्या काळोखांतून हातांत रायफल घेऊन कोण येतं आहे तें पाहण्यासाठीं पुढं आलेल्या रेनॉलनं मला ओळखलं आणि हांक मारली. रेनॉल, त्याची रेड इंडियन बाई, ते दोघे कॅनडियन आणि ते रेड इंडियन पोरगे इतकींच माणसं त्यावेळीं तंबूतळावर होतीं. शॉ आणि हेन्री अजून आले नव्हते. दुसऱ्या दिवशीं दुपारीं ते आले. त्यांचे घोडे पार थकून गेले होते. हेन्री खिन्न दिसत होता. त्याची ती बाई वारली होती. आतां त्याच्या मुलांना रेड इंडियन लोकांच्या जीवनांतल्या संकटांना आणि नशिबाच्या चढउतारांना कुणाच्याहि आधाराशिवाय यापुढें तोंड द्यावं लागणार होतं. हेन्री इतका दुःखांत होता, परंतु त्याक्षणींहि आपल्या धन्याविषयींची त्याची निष्ठा तो जराहि विसरलेला नव्हता. तिथून परत येतांना त्यानं आपल्या नातेवाईकांकडून आमच्यासाठीं मुद्दाम आठवण ठेवून नक्षीकाम केलेलें गव्याच्या कातड्यांचे अंगरखे आणले होते.

शॉनं पाईप पेटवला आणि मला आपल्या या प्रवासाची हकिकत थोडक्यांत सांगितली. जातांना छगवॉटरच्या मुखाशीं त्यांनीं मला सोडलं आणि मी लारामीच्या किल्ल्याच्या दिशेनं निघालों. ते छगवॉटरच्या काठानं प्रवास करीत पुढं गेले. सबंध दिवस प्रवास केल्यानंतर एक मोठा वैराण माळ त्यांनीं


ओलांडला. ज्या योद्ध्यांच्या टोळीपासून दाट धुकं पडल्यामुळं आम्हीं वाचलो होतो त्या टोळीच्या पाऊलखुणा त्यांना अनेक ठिकाणीं दिसल्या. सूर्यास्ताच्या वेळीं ते ती रेड इंडियन बाई आणि तिचे भाऊ ज्या तंबूत रहात होते तिथं जाऊन पोचले. इथवर जाईपर्यंत वाटेंत त्यांना कुणीहि मनुष्य भेटला नाहीं. तंबूकडे जाऊन पोंचतांच ती सगळी मंडळी हेन्रीनं आधीच पाठवलेल्या निरोपाप्रमाणं तिथून निघाल्याचं कळलं. झऱ्याच्या बाजूलाच त्यांनीं आपले पांच तंबू ठोकले होते. ती आजारी बाई त्यांतल्या एका तंबूत होती. हाडांच्या सांगाड्यासारखी ती दिसत होती. कांहीं काळ तिला हलतां बोलतांहि येत नव्हतं. हेन्रीच्या ठिकाणीं तिची विलक्षण निष्ठा होती. केवळ त्याला भेटण्यासाठीं म्हणून ती जीव धरून राहिली होती. हेन्रीनं तंबूत पाऊल ठेवतांच तिच्या म्लान चेहऱ्यावर तरतरी आलेली दिसली. अर्ध्याहून अधिक रात्रपर्यंत ती त्याच्याशीं बोलत बसली होती.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तिला ट्रेन्युंत घालून सगळी मंडळी आमच्या कॅंपच्या दिशेनं निघाली. यांत पांच योद्धे होते आणि बाकीचीं सगळीं बायकामुलं होतीं. क्रो योद्ध्यांचं पथक कुठं आसपास असणार तर नाहींना अशी भीति सारखी त्यांना वाटत होती. कारण क्रो योद्धे जर वाटेंत त्यांना गाठते, तर दयामाया न दाखवतां त्यांची कत्तल केली असती. मैल दोन मैल चालून गेल्यानंतर दूर क्षितिजाकडे त्यांना एक घोडेस्वार दिसला. ते सगळे थांबले. घबराटीचं वातावरण पसरलं. तो घोडेस्वार नाहींसा झाला, तेव्हां कुठं यांची धडधड थांबली. मग ते पुन्हां पुढं चालूं लागले. हेन्री आणि शॉ या सगळ्या मंडळींच्या कांहीं गज पुढं होते. इतक्यांत त्या बाईचा धाकटा भाऊ माहतो–तार्टोका यानं त्यांना एकदम हांक मारली. मागं वळून पाहिलं असतांना ते सगळे रेड इंडियन आजारी बाईच्या ट्रेन्युभोंवतीं गोळा झाल्याचं दिसलं. हेन्री आणि शॉ जवळ गेले. तेव्हां तिला अखेरची घरघर लागली होती. कांहीं क्षणांनंतर तिनं डोळे मिटले. सर्वत्र शांतता पसरली, आणि मग ते सगळे रेड इंडियन प्रेताभोंवतीं जमून आक्रोश करूं लागले. त्यांच्या या आक्रोशांत ‘हल्लेलुयाह’ हा शब्द हेन्रीच्या कानीं पडला. या शब्दामुळें कांहीं लोकांनीं रेड इंडियनांच्या वंशासंबंधीं अगदीं अविश्वसनीय असा सिद्धांत मांडला आहे. तो असा कीं, इस्राएलमधल्या ज्या दहा जमाती नाहींशा झाल्या त्यांच्याच वंशांतले हे रेड इंडियन आहेत.

रेड इंडियनांच्या कायद्याप्रमाणें एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्या व्यक्तीच्या नातेवाईकांनीं तिच्या प्रेताभोंवतीं किंमती भेटी आणून ठेवाव्या लागतात. या

भेटी आणण्यासाठीं हेन्री आणि शॉ यांना परत तंबूतळावर येणं भाग होतं. ते तिथून निघून दुपारच्या सुमाराला तंबूतळावर आले आणि हव्या असलेल्या वस्तू घेऊन पुन्हां परत गेले. ते परत जाऊन पोंचले तेव्हां अंधार पडला होता. तंबूजवळ गेले तेव्हां सर्वत्र शांतता होती. तंबूंत माणसं नसावींत असं वाटत होतं. तंबूच्या दारापाशीं पोंचले तेव्हां एक रेड इंडियन स्त्री बाहेर आली आणि एक शब्दहि न बोलता तिनं या दोघांचे घोडे आपल्या ताब्यांत घेतले. शॉ व हेन्री यांनीं तंबूंत प्रवेश केला तेव्हां सगळे रेड इंडियन तंबूमध्यें धुनी पेटवून आगीभोंवतीं तीन रांगा करून वर्तुळाकार बसल्याचं त्यांना दिसलं. या दोघांच्यासाठीं तंबूच्या दाराशींच गव्याचं कातडं पसरून बैठक करून देण्यांत आली. पाईप पेटवून या दोघांना दिला. एक शब्दहि न बोलतां हें सगळं चाललं होतं. अर्धी अधिक रात्र अशीच गेली. मधेंच धुनींतले निखारे अगदीं मंद होत. मग त्या काळोखांत आजूबाजूचीं माणसं अगदीं अंधुक दिसूं लागत. अशा वेळीं एखादी रेड इंडियन स्त्री पुढं होई आणि त्या मंद झालेल्या निखाऱ्यांवर गव्याची चरवी टाकून ज्वाला फुलवी. त्या ज्वाळांच्या प्रकाशांत ब्रॉंझच्या पुतळ्यासारखे आजूबाजूच्या माणसांचे उग्र चेहेरे दिसूं लागत. आजूबाजूच्या निःशब्दतेचा जराहि भंग होत नव्हता. दुसऱ्या दिवशीं सकाळीं शॉ जेव्हां या शोकगृहांतून बाहेर पडला तेव्हां त्याला हायसं वाटलं, त्यानं आणि हेन्रीनं तंबूतळाकडे परतण्याची तयारी चालवली. निघण्यापूर्वीं हेन्रीनं भडक कपड्यांत गुंडाळून बसवलेल्या आपल्या स्त्रीच्या मृतदेहाशेजारीं भेटीदाखल आणलेल्या सर्व वस्तू ठेवल्या, प्रेताच्या जवळच एक उत्तम घोडा बांधून ठेवला होता. मृतात्म्याच्या सेवेसाठीं त्या घोड्याचा बळी देण्यांत येणार होता. हेतु हा कीं ती स्त्री लंगडी असल्यामुळं गवताळ प्रदेशाच्या पल्याड असलेल्या 'मृतांच्या वस्तीवर' तिला चालत जातां येणार नाहीं, तेव्हां तिला मदत म्हणून हा घोड्याचा बळी तिच्यासोबत दिला जाणार होता. तिच्या या प्रवासांत मदत व्हावी म्हणून अन्न आणि घरांत लागणाऱ्या इतर वस्तूहि मृत देहाच्या शेजारीं ठेवण्यांत आल्या होत्या.

तिचा मृत देह नातेवाईकांच्या ताब्यांत देऊन हेन्री शॉबरोबर तंबूतळावर परतला. या खिन्न मनःस्थितींतून बाहेर पडायला हेन्रीला बराच वेळ लागला.



# ११ | रेड इंडियनांच्या वस्तीवर

तंबूतळापासून मैल दोन मैलांच्या अंतरावर बंदुका झाडल्याचा आवाज रेनॉलनं ऐकला. गोळीबार ऐकतांच तो घाबरला. क्रो योद्धे आजूबाजूला असल्याचं चित्र तो कल्पनेनं पाहूं लागला. आम्ही जेव्हां परत आलों तेव्हां कॅनडियन आणि रेड इंडियन स्त्री यांच्याबरोबर आम्ही त्याला टाकून गेल्याबद्दल त्यानं पुन्हां बरीच तक्रार केली. दुसऱ्या दिवशींच रेनॉलला आपल्या भीतीचं कारण समजलं. ज्यांनीं गोळ्या झाडल्या होत्या ते क्रो नव्हते. मॉरीन, सरॅफिन, रोलो, आणि ग्रिग्रॅस हे चौघे फासेपारधी आमच्या तंबूतळाकडे येत होते. आमच्या बरोबर प्रवास करायचं त्यांनीं ठरवलं होतं. त्यांनींच या गोळ्या झाडल्या होत्या आणि आमचा सहयात्रिक रेनॉल त्यामुळं अस्वस्थ झाला होता. या चौघां फासेपारध्यांनीं आमच्या तंबूंच्या जवळच आपले तंबू ठोकले. अनेक दिवस वापरल्यामुळं जुनाट आणि मलीन दिसणाऱ्या त्यांच्या रायफली आमच्या रायफलींबरोबरच त्यांनीं बाजूच्या झाडाला टेकून उभ्या केल्या.

घोड्यांची ओबडधोबड खोगिरं, गव्याच्या कातड्याचे अंगरखे, पारध करायचे फासे आणि त्यांचं इतर बारीकसारीक सामान आमच्या तंबूशेजारींच त्यांनीं ढिगारा करून टाकलं होतं. बाजूच्या कुरणांत आमच्या घोड्यांबरोबरच त्यांनीं आपले घोडे चरायला सोडले होते. ते चौघे काटक पारधी झाडाच्या खालीं सावलींत गवतावर लोळत, धूम्रपान करीत आपल्या साहसाच्या गोष्टी आम्हांला सांगत. वीरांच्या शौर्याची नोंद ज्यांत केली गेली आहे अशा बखरींना मी आव्हान देऊन सांगूं शकतों की रॉकी पर्वतांत फिरणाऱ्या या फासेपारध्याइतकं साहसी जीवन या बखरींच्या कोठल्याहि पानावर आढळणार नाहीं.

असे हे चार शूर पारधी आम्हांला येऊन मिळाल्यानंतर रेनॉलची भीति कमी झाली. जिथं आम्हीं आमचे तंबू ठोकले होते त्या जागेविषयीं आम्हांला एक प्रकारचा जिव्हाळा वाटूं लागला होता. तशीच आवश्यकता असल्या-शिवाय एकाच जागेवर तळ ठोकून राहणं हें अत्यंत धोक्याचं असे. शिवाय आमच्या तंबूसमोरचं गवत येऊन जाऊन इतकं तुडवलं गेलं होतं कीं खालचा चिखल गवतावर आला होता. तेव्हां आम्हीं आमचे तंबू हलवले आणि नदीच्या कांठीं फर्लांगभर अंतरावर एका प्रचंड झाडाच्या खालीं आम्हीं आमचा तळ ठोकला. या झाडाचा घेर सहा फूट होता. झाडाच्या एका बाजूला बुंध्याच्या साली काढून रेड इंडियनांनीं आपल्या युद्धांतल्या पराक्रमाची नोंद करणारी चिन्हं कोरलीं होतीं. रेड इंडियनांच्या पद्धतीप्रमाणं प्रेतं टांगण्याकरितां केलेली काठ्यांची शिडीहि बाजूच्या फांद्यांना लटकावलेली दिसत होती.

आम्हीं गवतावर बैठका घालून जेवत बसलों होतों. इतक्यांत हेन्री शॅटिलॉं म्हणाला, "तो पहा बुलबेअर येतो आहे." आम्हीं वर पाहिलं. अनेक घोडे-स्वार पलीकडच्या टेकडीवरून येत होते. कांहीं वेळानं चौघे तरुण रुबाबदार घोडेस्वार पुढं आले आणि घोड्यावरून खालीं उतरले. त्यांच्यापैकीं एक बुलबेअर किंवा माहतो–तातोंका होता. ऑगीलाल्ला जमातीचा प्रमुख जो मोठा माहतो-तातोंका त्याचीं हीं दोन्ही नांवं या मुलाला मिळालीं. माहतो-तातोंका बरोबर त्याचा एक भाऊ आणि दोघेजण तरुण मित्र होते. ते येतांच आम्हीं त्यांच्याशीं हस्तांदोलन केलं आणि आमचं जेवण संपल्यानंतर रेड इंडियनांचं स्वागत करण्याच्या ठरलेल्या पद्धतीप्रमाणं आम्हीं त्यांना कॉफी आणि बिस्किटं दिलीं. कॉफी आणि बिस्किटं पाहतांच त्यांनीं गळ्याच्या खालून 'हाव् हाव्' असा आवाज केला. आपल्या अर्ध्याअधिक भावना रेड इंडियन लोक याच

शब्दांनीं व्यक्त करतात. मग आम्हीं पाइप पेटवले आणि झुरके घेऊन एक-मेकांकडे पाइप सरकवीत सरकवीत धूम्रपान केलं.

"वस्ती कुठं आहे?"

"इथं. दोन दिवसांत येईल."

दक्षिणेकडे बोट दाखवून माहतो-ताटोंका म्हणाला.

"हे सगळे युद्धाला तयार आहेत काय?"

"होय."

गवताळ प्रदेशांत कुठलाहि मनुष्य मानवतावादी नसतो. युद्ध होणार ही बातमी कळतांच आम्हांला फार आनंद वाटला. युद्ध होणार याचाच अर्थ बोर्डोचे व्हर्लविंडला रक्तपातापासून परावृत्त करण्याचे प्रयत्न फसले असाच होता. म्हणजे, ल बॉंतेच्या तळावर युद्धाची तयारी आणि युद्धपूर्व पूजा-विधि पाहण्याची माझी इच्छा पुरी होणार होती.

त्यानंतर बरेच दिवसपर्यंत माहतो-ताटोंका आणि त्याचे मित्र आमचे पाहुणे म्हणून राहिले होते. आमचं राहिलेलं जेवण ते फस्त करून टाकीत. आमचे पाइप ते भरीत आणि ते ओढायला आम्हांला मदत करीत! कांहीं वेळां झाडांच्या सावलींत आमच्याच बाजूला ते गवतावर पसरत आणि त्यांच्या-सारख्या शूर आणि महत्त्वाकांक्षी योद्ध्यांना न शोभणारी थट्टा आणि फाजील विनोद करीत. त्यांच्यापैकीं दोघे योद्धे होते.

दोन दिवस आम्हीं कसे बसे ढकलले. तिसऱ्या दिवशीं सकाळीं रेड इंडियनांची वस्ती आम्हांला दिसेल अशी आम्ही आशा बाळगून होतों. परंतु ते लोक कांहीं आले नाहींत. तेव्हां आम्हीच त्यांना शोधण्यासाठीं निघालों. आठशें लोकांची वस्ती आम्हांला वाटेंत लागेल अशी आमची अपेक्षा होती. परंतु माळावर वाटेंत आम्हांला फक्त एकच घोडेस्वार भेटला. रेड इंडियनांनीं आपला बेत बदलला असून तीन दिवसपर्यंत तरी ते कांहीं इथं येऊन पोंचत नाहींत असं त्यांनीं आम्हांला सांगितलं. ही वाईट बातमी सांगणाऱ्या त्या घोडेस्वाराला बरोबर घेऊन आम्ही आमच्या तंबूतळावर परतलों. वाटेंत या रेड इंडियनांच्या एक ना धड भाराभर चिंध्या अशा बेतांची आम्ही टर उडवीत होतों. आम्ही आमच्या तंबूतळाच्या जवळ आलों तेव्हां आमच्या तंबूच्या बाजूला एक मोठा थोरला तंबू आणखी कोणी तरी ठोकला असल्याचं आम्हांला दिसलं. हा तंबू वादळ आणि पाऊस यांचे तडाखे

सोसल्यामुळें बराच मलीन आणि जुनाट दिसत होता. त्याच्यावर काढलेलीं घोड्यांचीं, माणसांचीं आणि माणसांच्या पसरलेल्या हातांचीं चित्रं साफ अंधुक झालीं होतीं. तंबूच्या काठ्यांच्या छताच्या वर आलेल्या टोकांना औषधं आणि जादूचे ताईत वगैरे असलेली पिशवी लटकावलेली होती. आजूबाजूला वेग-वेगळ्या आकारांचीं आणि रंगांचीं बरींच माणसं फिरतांना दिसत होतीं.

मॉरीन हा फासेपारधी दोन दिवस तळ सोडून गेलेला होता. परत येतांना त्यानं आपलं सगळं कुटुंब बरोबर आणलं होतं. नव्यान ठोकलेला हा तंबू त्यांचाच होता. एका घोड्याच्या मोबदल्यांत मॉरीननं बायको मिळवली होती. दिसायला हा सौदा अगदीं स्वस्त वाटतो. परंतु शहाण्या माणसानं नीट विचार केल्याशिवाय या सौद्यांत कधीं गुंतूं नये. कारण घोडा देऊन घेतलेल्या बायकोबरोबर तिच्या नातेवाईकांना पोसण्याची जबाबदारी घ्यावी लागते. बायकोच्या नातेवाईकांचा हा खादाड घोळका फुकट बसून खाण्याचा आपला हक्कच आहे असं मानतो. जीं गोरीं माणसं विचार न करतां या सौद्यांत फसतात तीं चांगलींच ओरबाडलीं जातात. कारण या सौद्यांत रेड इंडियानांबरोबर आलेले नातेवाईक जळवांसारखे त्याचं शोषण करूं लागतात.

मॉरीननं आणलेली ही बाई रेड इंडियन समाजांतल्या खानदान घराण्यां-तली नव्हती. लोकशाहीची पद्धत असलेल्या या गवताळ प्रदेशांतल्या रेड इंडियन समाजांतदेखील हुद्दा आणि दर्जा यांचं स्तोम असतंच. मॉरीननें आणलेल्या बाईच्या नातेवाईकांचा दर्जा त्यांच्या समाजांत अगदींच हल्का मानला गेला होता. मॉरीनची ही बाई दिसायला बरी नव्हती. प्रवाशांच्या तांड्यांतल्या एका बाईकडून विकत घेतलेला जुनाट कापडचा झगा मॉरीननं तिला दिला होता. हें चांगल्या सौंदर्यदृष्टीचं द्योतक नव्हतं. कारण तरुण इंडियन स्त्रिया बहुतेक हरणाच्या कातड्याचा शुभ्र रंग दिलेला झगाच वापरतात.

मॉरीनच्या बायकोच्या नातेवाईकांचा हा जो काफिला होता त्यांत एक ऐंशी वर्षांची थेरडी होती. तिथले बरेचसे व्यवहार ही म्हतारीच करीत असे. माणसाच्या कल्पनाशक्तीनं कितीहि प्रयत्न केला तरी इतकी विद्रूप चेटकीण त्याला आपल्या डोळ्यांसमोर आणतां यायची नाहीं. ती थेरडी इतकी भयानक कुरूप होती. तिच्या सुरकुतलेल्या कातडींतून तिच्या बरगड्यांच्या सगळ्या फांसळ्या मोजतां आल्या असत्या. तिचा चेहेरा एखाद्या जुनाट कवटीसारखा दिसत असे. कवटीसारख्याच तिच्या डोळ्यांच्या

भोंवतीं काळ्या खोबणी होत्या. या खोबणीच्या तळाशीं तिचे ल्हानसे काळे डोळे लकाकतांना दिसत. तिचे हातपाय काटक्यांसारखे झाले होते. तिचे काळेपांढरे केस तिनं अस्ताव्यस्त सोडलेले होते आणि ते जवळजवळ जमिनी-पर्यंत लोंबत होते. एक जुनाट फाटकं गव्याचं कातडं तिनं कसंबसं आपल्या कंबरेभोंवतीं गुंडाळलं होतं. इतकं कृश शरीर असूनसुद्धां या म्हातारीचा कामाचा उरक भलताच होता. तंबू ठोकणं, घोड्यावर सामान लादणं, इत्यादि सगळीं कष्टाचीं कामं ती म्हातारीच करीत असे. सकाळपासून रात्रीपर्यंत तिची कामाची गडबड चालू असे. तिच्या मनाविरुद्ध कांहीं झालं कीं ती किंचाळूं लागे. तिचा भाऊ मांत्रिक होता आणि दिसायला तिच्यासारखाच रोड होता. त्याचा जबडा इतका मोठा होता कीं त्याची जिवणी कानापर्यंत पसरल्यासारखी वाटायची. आणि या जबड्याला साजेशीच त्याची भूकहि दांडगी होती. या काफिल्याबरोबर नुकतंच लग्न होऊन 'मधुचंद्र साजरा' करायला आलेलं एक जोडपंहि होतं. हा पुरुष पक्का आळसोबा होता. कांहींहि काम न करतां फुकट बसून खाणारे हे लोक रेड इंडियनांच्या वस्तीवर खूप असतात. रेड इंडियनांच्याच कां, सुशिक्षित समाजांतहि अशीं माणसं आढळताततच कीं! या माणसाला शिकारहि करतां येत नसे, लढण्याचीहि त्याला कांहीं माहिती नव्हती. त्याच्या मख्ख चेहेऱ्याकडे पाहतांच ही गोष्ट सहज कळून येत असे. तो आणि त्याची बायको मधुचंद्र साजरा करीत होती. चार काठ्या रोवून ती दोघं गव्याचं कातडं त्यांच्यावर छतासारखं पसरीत. या तात्पुरत्या छतामुळं उन्हाला आडोसा होई. सबंध दिवस तीं दोघं बहुत प्रेमळपणें एकमेकांशेजारीं बसलेलीं असत. त्यांच्यांत फारसं संभाषण होत नसे. कारण रेड इंडियन लोकांजवळ संभाषणासाठीं फारसे विषय नसतातच मुळीं! या तंबूच्या आजूबाजूला अशीं डझन पोरं आरडाओरड करीत खेळत होतीं. आपल्या हातांतल्या लहानशा धनुष्यबाणांनीं तीं पक्षी मारीत किंवा गौरवर्णाचीं मुलं जशी ठोकळ्यांचीं घरं करतात तशी काटक्यांची घरं करीत.

एक दिवस गेला; आणि मग हळूहळू रेड इंडियन लोक येऊं लागले. दोघादोघां, तिघातिघांचे गट घोड्यांवर बसून येत आणि शांतपणें गवतावर बसत. चवथ्या दिवशीं दुपारीं कांहीं घोडेस्वार पलीकडच्या टेकडीवर दिसूं लागले. त्यांच्यामागून घोडे, खेचरं, कुत्रे, अवजड सामान भरलेल्या ट्रेन्यु, घोड्यावर बसलेले योद्धे आणि चालत येणाऱ्या रेड इंडियन स्त्रिया, बरीचशीं पोरं असा

ताफ्याच्या ताफा येत होता. अर्धा तास तरी हा जमाव टेकडीवरून खालीं उतरत होता. झऱ्याच्या वळणाकडे आमच्या तंबूपासून एक फर्लांग अंतराव हा ऐसपैस बोळका जमला आणि कांहीं वेळांत जणूं कांहीं जादूनं उगवल्यासारखे दीडशें तंबू त्या परिसरांत दिसूं लागले. त्या एकाकी माळाचं गजबजलेल्या वस्तींत रूपांतर झालं, अनेक घोडे आमच्या भोंवतलच्या कुरणावर चरूं लागले. घोड्यावर बसलेल्या किंवा पांढरे झगे घालून फिरणाऱ्या अस्वस्थ आकृत्यांनीं तो परिसर जिवंत झाला. शेवटीं एकदांचा व्हर्लविंड आला होता. एकाच प्रश्नाचं उत्तर आतां मिळायचं होतं. "व्हर्लविंड युद्धावर जाणार आहे का? म्हणजेच त्याच्या सैन्यपथकाच्या आधारानं ला वाँतेच्या तळावर बिकट प्रवास करून आम्हीं पोंचणार का?"

या प्रश्नाचं निश्चित उत्तर अजून मिळायचं होतं. युद्धावर जावं किंवा नाहीं याविषयीं त्या रेड इंडियनांची चर्चा चालली होती. अनिश्चितता हा रेड इंडियनांच्या स्वभावाचा स्थायीभाव असल्याकारणानं निश्चित असा निर्णय घेतला जात नव्हता. रेड इंडियन लोक एकत्र जमले कीं कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी त्यांची अवस्था असते. एकत्र येऊन कांहीं निर्णय घेणं आणि एकजुटीनं तो पार पाडणं ही गोष्टच त्यांना कधीं जमत नाहीं. किंग फिलिप, पॉटिॲक, टेकमसेह या त्यांच्या सगळ्या पुढाऱ्यांनीं यामुळें अपार नुकसान सोसलेलं होतं. ऑगीलाल्ला जमातीचा एक युद्धप्रमुख होता. त्याची आपल्या जमातीवर कांहींशी हुकमत चालत असे. परंतु तो आतां जिवंत नव्हता आणि त्यामुळं हे सगळे रेड इंडियन आपल्या मनाच्या चंचल लहरींच्या आधीन झाले होते.

रेड इंडियनांची ही वस्ती आणि इथलीं हीं माणसं यांच्याविषयींच्या हकिगतींनंच मी सांगत असलेल्या गोष्टीची बरीचशी जागा व्यापली जाणार असल्यामुळें त्यांच्या एकूण समाजाविषयीं थोडी माहिती इथं सांगणं औचित्याला धरून होईल असं मला वाटतं. डाकोटा किंवा सिऊ ही जमात सेंट पीटर नदीपासून तों थेट रॉकी पर्वतापर्यंत पसरलेली आहे. या जमातीच्या अनेक शाखा असून त्या सगळ्यांचा मिळून एक असा कुणीच नेता नाहीं. मध्यवर्ती शासनकेंद्राचा इथं अभाव आहे. हे सगळे रेड इंडियन एकच भाषा बोलतात. त्यांच्या चालीरीति, अंधश्रद्धा समान आहेत—एवढाच त्यांच्यांतला दुवा. युद्ध झालं तरीसुद्धां ते एकत्र येत नाहींत. पूर्वेकडची शाखा अपर

लेकच्या प्रदेशांतील ऑजीबवा जमातीशीं युद्ध करीत असे. पश्चिमेकडच्या जमातीच्या रॉकी पर्वताच्या परिसरांत असलेल्या स्नेक जमातीशीं मारामाऱ्या चालू असत. या रेड इंडियनांची प्रत्येक शाखा वेगवेगळ्या वस्त्यांत विभागलेली असते. या प्रत्येक वस्तीचा एक प्रमुख असतो. या प्रमुखाचं स्थान त्याच्या वैयक्तिक गुणांवर आणि तो आपल्या वस्तीवरच्या लोकांत आपल्याविषयीं भीति आणि आदर कितपत निर्माण करूं शकतो यावर अवलंबून असतं. कांहीं वेळां असं घडतं कीं हा वस्तीप्रमुख नुसताच नांवाचा नेता असतो. तर कांहीं वेळां एखाद्या वस्तीप्रमुखाच्या हातांत त्याच्या शौर्यामुळें अनियंत्रित सत्ता येते आणि अनेक वस्त्यांची मिळून झालेली शाखा त्याला आपला प्रमुख मानूं लागते. अशा तऱ्हेचं प्रमुखपद गेलीं कांहीं वर्षं ऑगीलाह्ला जमातीला लाभलेलं होतं. धाडस, शौर्य या गोष्टी एखाद्या योद्ध्याला अत्यंत मोठ्या पदापर्यंत नेऊं शकतात. एखादा मनुष्य जर वस्तीप्रमुखाचाच मुलगा असेल किंवा त्याच्या कुटुंबांत त्याला आधार देणारीं आणि लढाया लढणारीं खूप माणसं असतील तर हें प्रमुखपद मिळणं सोपं होतं. एखाद्याला प्रमुखपद द्यायचं असलं कीं योद्धे आणि म्हातारीं माणसं एकत्र येऊन विधिपूर्वक त्याला हें पद बहाल करतात. हें पद बहाल केल्यानंतर असा मनुष्य कांहीं बाह्य चिन्हं धारण करतो असं मात्र समजण्याचं कारण नाहीं. आपलं आसन अत्यंत डळमळित असल्याची जाणीव या प्रमुखाला सतत असते. त्यामुळें आपल्या प्रजाजनांची तो सतत मनधरणी करीत असतो. त्याच्यापेक्षां अधिक घोडे आणि बाया असलेलीं अनेक माणसं त्याच्या वस्तीवर असतात. हीं माणसं आपल्या प्रमुखापेक्षां अधिक चांगले कपडे घालून फिरतात. जुन्या काळांतल्या ट्यूटन लोकांच्या प्रमुखांप्रमाणेंच यालाहि वस्तीवरच्या तरुण लोकांना सतत भेटी पाठवून त्यांची मनधरणी करावी लागते. अशा भेटी पाठवून पाठवून या प्रमुखाला हळूहळू गरिबी येते. वस्तीवरच्या या तरुण योद्ध्यांची मनधरणी न करावी तरीहि पंचाईत. कारण हे तरुण याची सत्ता केव्हां उलथून टाकतील याचा नेम नसतो. कारण या समाजांतल्या प्रमुखाच्या सत्तेला कायद्याचं असं अधिष्ठानच नसतं. यामुळें या पश्चिमेकडच्या रेड इंडियनांच्या शाखेत ज्या माणसाच्या कुटुंबांत खूप सभासद नाहींत अशा माणसाकडे सहसा सत्ता जात नाहीं. ज्या कुटुंबांत अनेक लोक आहेत असा कुटुंबप्रमुखच आपल्या नातेवाईकांच्या आधारावर सत्ताधारी होतो.

पश्चिमेकडची ही डाकोटांची जमात एका ठिकाणीं वस्ती करून रहात नाहीं. उन्हाळ्यांत आणि हिंवाळ्यांत शिकार आणि युद्ध करीत ते सारखे फिरत असतात. त्यांच्यापैकीं कांहींजण गव्यांच्या शिकारीपाठीं असतात. त्यांचीं घरं, अन्न, कपडे, बिछाने, सर्पण, धनुष्याच्या दोऱ्या, शिरस, दोरखंड, खोगीरावरचं आच्छादन, पाण्याचीं भांडीं, होड्या या सगळ्या जीवनावश्यक वस्तू त्यांना गव्याच्या शरीरापासूनच प्राप्त होतात. याखेरीज ज्या कांहीं इतर वस्तू लागतील त्यादेखील ते गव्याचं कातडं विकूनच खरेदी करतात. रानगवे जर नाहींसे झाले तर या रेड इंडियनांची जमातहि संपली असं समजायला हरकत नाहीं.

या लोकांना युद्ध ही श्वासोच्छ्वासाइतकी नेहमीची गोष्ट आहे. बहुतेक शेजारच्या जमातीशीं हाडवैर असतं. बापापासून मुलाकडे असं पिढ्यान् पिढ्या हें वैर चालू राहतं. आक्रमण आणि सूड यांच्यामुळें वैराचं हें कुंड नेहमींच धगधगीत ठेवलं जातं. वर्षांतून अनेक वेळां वस्तीवरचीं माणसं एकत्र जमतात आणि इष्टदेवतेची उपास करून प्रार्थना करतात. मग युद्धाची कवाईत समारंभपूर्वक केली जाते. या समारंभानंतर योद्धे गटागटांनीं शत्रूवर चाल करून जातात. या रेड इंडियनांच्या ठिकाणीं असलेल्या या उग्र झुंझारवृत्तीमुळेंच त्यांच्या आकांक्षा पेटत्या राहातात आणि त्यांच्यांतलं चैतन्य जागृत राहातं. या वृत्तीमुळेंच आळस आणि मानभंग यांच्यापासून या जमातीचं रक्षण होतं. ही वृत्ति जर नसती तर डोंगरापलीकडच्या जिवाणू आणि झाडांची मुळं यांच्यावर गुजराण करून पशूंप्रमाणं गुहांतून राहणाऱ्या कांहीं जमातींसारखीच यांचीहि गत झाली असती. डोंगराच्या पलीकडे राहणाऱ्या या जमातीचीं त्यांना माणसासारखीं शरीरं असल्यामुळं माणसांत गणना करायची एवढंच. परंतु या झुंजार वृत्तीमुळें कित्येक वेळां हे डाकोटा जमातींतले योद्धे गर्व वाटावा असा पराक्रम गाजवतात. युद्धांत पराक्रम गाजवल्याखेरीज डाकोटांच्या समाजांत कुणालाहि महत्त्व प्राप्त होणं शक्य नसतं. योद्धयांप्रमाणेंच आणखी दोघांना त्यांच्या समाजांत महत्त्व असतं. एक म्हणजे मांत्रिक आणि दुसरा त्यांच्यापैकीं त्यांतल्या त्यांत वक्तृत्वशक्ती असलेला वक्ता.

आतां मूळ विषयाकडे वळतां.

आमच्या तंबूत पहा. तंबूतली कोंडलेली हवा आणि गुदमरून टाकणारा धूर सोसत असेल तर आंतहि प्रवेश करायला हरकत नाहीं. या तंबूत कललेल्या

शरीराचे योद्धे वर्तुळांत सरकवल्या जाणाऱ्या पाइपचे झुरके घेत विनोद करीत, गोष्टी सांगत त्यांच्या पद्धतीप्रमाणं आनंद करताहेत. आमच्याहि तंबूंत नागड्याउघड्या मुलांची आणि सापासारख्या मुलींची झुंबड आली. आमच्याजवळ येऊन हीं पोरं कांहीं शब्द पुटपुटलीं. त्या शब्दांच्या अर्थ होता "खायला चला." हें बोलावणं आलं कीं डाकोटा लोकांच्या हेकट आतिथ्याला शिव्या घालीत आम्ही उठत असू. दर तासानंतर हा खाण्याचा कार्यक्रम होत असल्यामुळं विश्रांति घेणं अशक्यच होऊन बसलं होतं. नाहीं म्हणावं तर हे रेड इंडियन यजमान चिडतील ही भीति. या निमंत्रणाचा सगळ्यांत त्रास व्हायचा मला. कारण मी नुकताच आजारांतून उठलों होतों, साधं चालणंदेखील मोठ्या कष्टानं मला जमत होतं, अशा परिस्थितींत दिवसांत वीस जेवणं जेवण्याचा उरक माझ्यांत कुठून येणार? इतक्या मेजवान्यांचा वर्षाव ज्याअर्थी होत आहे त्या अर्थी रेड इंडियनांच्या मनांत आमच्याविषयीं विलक्षण सद्भाव आहे असंच एखाद्याला वाटेल. परंतु आमचा असा पाहुणचार करणाऱ्यांपैकीं अर्ध्या लोकांना तरी जर आम्ही निःशस्त्र अवस्थेंत कुठें एकटे भेटतों तर त्यांनीं आमचे घोडे चोरले असते आणि कदाचित् आमच्या छातींत बाणहि मारला असता.

एके दिवशीं सकाळीं एका वृद्ध मनुष्याच्या तंबूंत आम्हांला बोलावण्यांत आलं. तो वृद्ध मनुष्य त्यांच्या जमातीचा आचार्य होता. गव्याच्या कातड्याच्या बैठकीवर तो अर्धवट पहुडला होता. त्याचं वय होतं ऐंशी वर्षांचं. परंतु असं असूनहि त्याचे काळेभोर लांब केस त्याच्या चेहेऱ्याच्या दोन्ही बाजूंना रुळत होते. त्याच्या रोड शरीराकडे पाहतांच गेलेल्या शक्तीचा जितका प्रत्यय येत असे त्याहूनहि अधिक जाणीव त्याच्या चेहेऱ्यांतून जाणवणाऱ्या मानसिक शक्तीची होत असे. जमातीच्या या प्रमुखासमोर त्याचा पुतण्या—महत्त्वाकांक्षी तरुण माहतो-ताटोंका—बसला होता. याखेरीज त्या तंबूंत एकदोन स्त्रियाहि होत्या.

या म्हाताऱ्याची कथा मोठी वैशिष्ट्यपूर्ण आहे. या गोष्टींतून रेड इंडियन जमातीवर वर्चस्व गाजवणाऱ्या अंधश्रद्धांचीहि आपल्याला कल्पना येते. या वृद्ध पुढाऱ्याचा जन्म युद्धांतल्या पराक्रमाविषयीं रेड इंडियन जमातींत प्रसिद्ध असलेल्या एका समर्थ कुटुंबांत झाला. रेड इंडियन जमातींतल्या तरुण माणसाला प्रत्यक्ष व्यवसायांत पडण्यापूर्वी एक चमत्कारिक विधि करावा लागतो.

हा विधि करणारा तरुण आपलं तोंड काळ्या रंगानं रंगवून घेतो. मग तो ब्लॅक हिल्समधल्या एखाद्या एकांतस्थळीं गुहेंत जाऊन बसतो आणि बरेच दिवस उपवास करून आपल्या इष्ट देवतेची आराधना करतो. कांहीं काळानें त्याच्या शरीराला ग्लानी येते आणि त्याचं मन उत्तेजित होऊन त्याला कांहीं साक्षात्कार होऊं लागतो. या वृद्ध पुढाऱ्यानें अशा तऱ्हेनें उपवास करून जेव्हां ध्यान केलं तेव्हां त्याच्या इष्ट देवतेनं काळवीटाचं रूप घेऊन त्याला साक्षात्कार दिला. ऑगीलाह्ला जमातींत काळवीट हें शांतीचं प्रतीक मानलं जातं. परंतु तरुण माणसं जेव्हां असा उपवास करतात तेव्हां शांतीचं प्रतीक असलेला हा काळवीट त्यांच्या डोळ्यांसमोर येत नाहीं. त्यांच्या मनांतल्या युद्धांत पराक्रम गाजवण्याची आकांक्षा व्यक्त करणारं पहाडी अस्वलाचं प्रतीकच त्यांच्या डोळ्यापुढं येतं. अस्वल हें युद्धदेवतेचं प्रतीक मानलं जातं. या वृद्ध पुढाऱ्याच्या डोळ्यासमोर त्याच्या तरुण वयांत तो काळवीट उभा राहिला आणि त्यानं त्याला सांगितलं कीं, तूं युद्धाचा मार्ग अनुसरूं नकोस; शांति आणि स्नेह यांचा प्रसार करण्यासाठीं तुझं जीवन आहे. तुझ्या जमातींतलीं आपापसांतलीं भांडणं त्यांना सल्ला देऊन मिटवणं हेंच यापुढें तुझं काम. असा संदेश देऊन तो काळवीट अदृश्य झाला. जमातींतल्या इतर तरुणांना युद्ध करून समाजांत प्रतिष्ठा मिळवायची होती. परंतु काळविटाचा साक्षात्कार झालेल्या या तरुणासाठीं मात्र वेगळ्या प्रकारचं जीवन आखलेलं होतं, वेगळ्या प्रकारचा मोठेपणा त्याच्या वांट्याला आला होता. त्या दिवसांपासून तो वृद्ध पुढारी, ल बोर्ने हें त्याचं नांव, युद्धाचा विचार सोडून देऊन शांतीच्या उपासनेला लागला, अगदीं वेगळ्या प्रकारचा अधिकार त्याच्या वांट्याला आला होता, आणि त्यानं दिलेला सल्ला जमातींतले लोक मानूं लागले होते.

मोठा माहतो-तार्टोका हा त्याचा भाऊ त्याच्यापेक्षां संपूर्णपणें वेगळा होता. त्यानं आपलं रूप, नांव आणि इतर अनेक गुण आपल्या मुलाला दिले होते. हेन्री शॅटिलॉंच्या स्त्रीचा हा बाप. असंहि नातं असल्यामुळें ऑगीलाह्ला जमातींत फार मोठी प्रतिष्ठा असलेल्या त्या जमातीशीं आमचा संबंध जमला आणि ही गोष्ट आमच्या फायद्याचीच झाली. एका अर्थी माहतो-तार्टोका हा जमातीचा नायकच होता. रणक्षेत्रावरील पराक्रमांत किंवा त्याच्या जमातीवरील त्याच्या वर्चस्वांत दुसरा कुठलाहि प्रमुख त्याची बरोबरी करूं शकत नव्हता. त्याची वृत्ति साहसी होती आणि त्याचा निग्रह विलक्षण कठोर होता. त्याची इच्छा

हाच त्याच्या समाजांतला कायदा होता. तो अत्यंत चतुर होता. गोऱ्या लोकांशीं त्यानं मैत्री जोडली होती. आपण आणि आपले अनुयायी यांचा या मैत्रीपासून फायदा व्हावा असाच त्याचा हेतु होता. एखाद्या बाबतींत त्यानं आपला निर्णय घेतला कीं तो इतर योद्ध्यांना सन्मानपूर्वक चर्चेसाठीं बोलावीत असे. त्यांची चर्चा झाली कीं तो शांतपणें आपलं मत सांगे. त्यानं मत सांगितलं कीं त्याला कोणीहि विरोध करीत नसे. त्याची गैरमर्जी ओढवून घेणं हें दुर्दैवाला निमंत्रण देण्यासारखंच होतं. एखाद्यानं असं केलं तर तो तिथल्या तिथं त्याला ठार करीत असे. एखाद्या दुसऱ्या प्रमुखानें असा प्रकार केला असता तर तो प्राणालाच मुकला असता. परंतु माहतो-तार्टोकाच्या नांवाचाच असा धाक होता कीं तो अशा गोष्टी पुन्हां पुन्हां निर्भयपणें करीत असे. ज्या समाजांतलीं माणसं अगदीं पूर्वीपासून स्वतःची इच्छा हाच कायदा मानीत आलीं आहेत अशा त्या रेड इंडियनांच्या समाजांत माहतो-तार्टोंच्या हातांत अनियंत्रित सत्ता होती असंच म्हणावं लागेल.

अशा त्याच्या पराक्रमी जीवनाचा शेवट कांहीं काळानंतर येऊन ठेपला. माहतो-तार्टोकाला अनेक शत्रू होते, आणि ते योग्य वेळ येण्याची वाट पहात होते. आमचा जुना मित्र स्मोक आणि त्याचे नातेवाईक माहतो-तार्टोकाचा खोल द्वेष करीत असत. एके दिवशीं स्मोक आपल्या वस्तीवर त्याच्या तंबूंत बसला होता. इतक्यांत तिथं माहतो-तार्टोका एकटाच आला आणि स्मोकला गर्जना करून द्वंद्वयुद्धाचं आव्हान देऊं लागला. स्मोक आपल्या जागेवरून हालला नाहीं. तूं भेकड आहेस, थेरड्या बाईसारखा आहेस, असं म्हणून माहतो-तार्टोकानं स्मोकची निर्भर्त्सना केली. एवढ्यावरच तो थांबला नाहीं. स्मोकच्या तंबूजवळ बांधलेला त्याचा उत्तम घोडा माहतो-तार्टोकानं सुऱ्याचे वार करून ठार केला. स्मोक घाबरला होता. इतका अपमान होऊन देखील स्मोक आपल्या जागेवरून हलला नाहीं. माहतो-तार्टोका संतापानं परत फिरला. सर्वांनीं त्याला गुपचुप वाट करून दिली. असा पराक्रम त्यानं गाजवला हें खरं परंतु जाब देण्याची त्याची वेळहि जवळ येत चालली होती हेंहि तितकंच खरं.

पांचसहा वर्षांपूर्वीची एका दुपारची गोष्ट. स्मोक आणि त्याची माणसं यांनीं आपले तंबू, कांहीं खरेदी करण्यासाठीं म्हणून, फर कंपनीच्या व्यापारी गढीभोंवतीं ठोकले होते. वेगवेगळ्या वस्तूंचा व्यापार ही गढी करीत असे,

त्यांत व्हिस्कीचाहि समावेश होता. आपली कांहीं खरेदी करण्यासाठीं माहतो-ताटोंका बरोबर थोड्या लोकांना घेऊन तिथंच आला होता. या दोघांच्या अनुयायांत बाचाबाची सुरू झाली. युद्धघोषणा दिल्या गेल्या. गोळ्या आणि बाण यांचा वर्षाव सुरू झाला. तंबूतळावर एकच गोंधळ झाला. इतक्यांत माहतो-ताटोंका आपल्या तंबूतून बाहेर आला आणि संतापून त्यानं दोन्ही बाजूंच्या लोकांना मारामारी करूं नका असं सांगितलं. हें सांगण्यासाठीं तो बाहेर आला. तेव्हां मारामारीचा हा सगळा प्रकार पूर्वनियोजित आहे याची त्याला कल्पना नव्हती. माहतो-ताटोंका बाहेर येतांक्षणींच बंदुकीचे दोन तीन बार उडाल्याचा आवाज झाला. दहाबारा बाण त्याच्या दिशेनं झेंपावत आले आणि कांहीं क्षणांतच वर्मी जखम होऊन रेड इंडियनांचा हा वीरनायक खालीं कोसळला. हा सगळा प्रकार घडला तेव्हा रोलो तिथं हजर होता. त्यानंच मला ही हकिगत सांगितली. माहतो-ताटोंका खालीं कोसळल्यानंतर या अनुयायांत तिथं तुंबळ युद्ध माजलं. दोन्ही बाजूचे बरेच मुडदे पडल्यानंतर तें थांबलं. आम्ही त्या प्रदेशांत असतांना या दोन कुटुंबांतलं वैर अजूनहि धुमसत असल्याचं आम्हांला समजलं.

अशा रीतीनें माहतो-ताटोंकाचा अंत झाला. परंतु त्याची कीर्ति वाढवणारी आणि त्याच्या मृत्यूचा सूड घेणारी बरीच संतती त्यानं मागें ठेवली होती. बऱ्याच मुली त्याला होत्याच, पण विशेष म्हणजे त्याचा रंग व चेहेरा यांच्याशीं दाट साम्य असलेले तीस मुलगे त्याला होते. रेड इंडियन समाजाशीं ज्याचा परिचय आहे त्यांना ही गोष्ट मुळींच अविश्वसनीय वाटणार नाहीं. या तीस मुलांपैकीं तरुण माहतो-ताटोंका हा सर्वांत वडील मुलगा आपल्या बापाच्या गादीवर तोच बसणार असं सगळे म्हणत असत. तरुण माहतो-ताटोंकाचं वय एकवीस वर्षांहून अधिक नव्हतं. परंतु वस्तीवरच्या कुठल्याहि तरुण माणसापेक्षां त्यानं ठार केलेल्या शत्रूंची, आणि पळवलेल्या घोड्यांची व युवतींची संख्या अधिक होती. घोडे आणि तरुणी पळवणं हा रेड इंडियन समाजांत भूषणावह पराक्रम मानला जातो.

एकाद्या तरुणीला पळवणं एवढ्याच गोष्टीमुळें कांहीं मोठेपणा मिळत नाहीं; कारण या पळवण्यापळवण्यांतहि प्रकार असतात. एखादी तरुणी पळवल्यानंतर तिचा जो धनी असेल त्याला भेटी वगैरे देऊन गप्प करतां येतं. परंतु रेड इंडियन समाजांत अशा तऱ्हेचा व्यवहार पराक्रमशून्य आणि म्हणूनच तुच्छ

लेखला जातो. भेटी दिल्यामुळें धोका टळला तरी सामाजिक गौरवाची प्राप्ती होत नाहीं. तरुण माहतो-ताटोंका या बाबतींत विलक्षण साहसी होता. त्यानं अनेक डझन तरुणी पळवल्या होत्या. परंतु एकाहि तरुणीबद्दल आपण भेटीचा मोबदला दिलेला नाहीं असं तो गर्वानं सांगू शकला असता. भेट देणं तर दूरच राहो, उलट, ज्याची बाई पळवली त्या पुरुषाच्या तोंडासमोर बोटं मोडून तो त्याचा धिक्कार करीत असे आणि असं असूनहि अजूनपर्यंत तरुण माहतो–ताटोंकाविरुद्ध बोट उचलण्याचीहि कुणाची हिंमत होत नव्हती. समाजांतले तरुण आणि तरुणी या दोघांनाहि त्याच्याविषयीं विलक्षण आकर्षण वाटत असे. तरुण युद्धांत त्याला साथ देत, आणि तरुणी त्याच्या इतका आकर्षक पुरुषच नाहीं असं मानत. कदाचित् त्याच्या निर्भयतेमुळेंच ही कौतुकाची भावना जागृत होत असावी. एखाद्या घळींत राहून बाण मारणं किंवा काळोखांत मागून येऊन भोसकणं यासाठीं फारशा शौर्याची आवश्यकता नसते आणि सहसा रेड इंडियन लोक असेच छुपे हल्ले करतात. परंतु तरुण माहतो-ताटोंकाला असं करण्याची कधीं गरज पडली नाहीं. एक तर त्याचं शौर्य आणि धाडस यांच्या जोरावर तो आपल्या बरोबरच्या लोकांतून पुढें मुसंडी मारीत असे. परंतु या त्याच्या शौर्याबरोबरच लवकरच तरुण होणारे एकोणतीस भाऊ त्याला आहेत ही गोष्ट त्याच्या शत्रूंना विसरणं शक्य नव्हतं. शत्रूंनीं जर आपला राग माहतो-ताटोंकावर काढला असता तर त्याचे एकोणतीस भाऊ शत्रूच्या रक्ताचा घोट घेण्यासाठीं चवताळून उठले असते. कुत्रा जसा माग काढतो तसे हे भाऊ सूड घेण्यासाठीं सारखे शत्रूच्या मागावर राहिले असते. म्हणूनच, माहतो–ताटोंकाला मारणं हा आत्महत्या करण्याचाच प्रकार आहे याची जाणीव त्याच्या शत्रूंना होती.

समाजांतल्या तरुण पोरी माहतो-ताटोंकावर फिदा होत्या, पण असं असून छानछोकी किंवा पोषाखीपणा याकडे त्याची प्रवृत्ति नव्हती. आपल्या सहकाऱ्यांप्रमाणें भडक पोषाख आणि अलंकार घालून तो तरुणींना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत नसे. आपल्या पराक्रमावरच त्याची भिस्त होती. भडक ब्लँकेटं, चमकणाऱ्या माळा यांचा स्पर्शहि न झालेलं त्याचं शरीर अपोलोच्या ब्राँझच्या पुतळ्यासारखं रेखीव दिसत असे. हा बळकट रेखीवपणा हेंच त्याचं आकर्षण होतं. त्याचा आवाज खोल आणि गंभीर होता. इतकं सगळं असूनहि तो खराखुरा रेड इंडियन होता. आपल्या भावांबरोबर आमच्या

तंबूसमोरच्या उन्हांत हवेंत पाय झाडीत आणि विनोद करीत पडलेल्या माहतो-ताटोंकाकडे पाहा, आतां तो वीरनायक आहे असं वाटतं तरी कां ? पण आतां हें दुसरं चित्र पहा, सूर्यास्ताची वेळ आहे. आपल्या विशेष आवडीच्या अशा कांहीं तरुण सहकाऱ्यांना घेऊन उद्यां माहतो-ताटोंका शत्रूवर हल्ला करण्यासाठीं निघणार आहे. त्याच्या वैभवाचा हा क्षण आहे. या प्रतापी वीराला पाहण्यासाठीं सगळी वस्ती त्याच्याभोंवतीं जमा झाली आहे. गरुडांच्या पिसांचा तुरा त्यानं आपल्या शिरोभागीं लावला आहे. मध्यभागीं एखाद्या ताऱ्यासारखीं दिसणारीं पिसं लावलेली ढाल त्यानं आपल्या छातीला लटकावली आहे. त्याच्या बाणांचा भाता पाठीवर आहे. मावळत्या सूर्याच्या प्रकाशांत त्याच्या हातांतल्या उंच भाल्याचं टोक चमकतं आहे. शत्रूच्या कवट्यांवरच्या केंसासकट कातड्या त्याच्या गाडीच्या दोन चाकांमधल्या कण्याला लटकावलेल्या आहेत. चिलखत घातलेला हा योद्धा आपल्या घोड्यावर बसून रुबाबांत तंबूभोंवतीं फिरतो आहे. फिरत असतांना आपल्या डोळ्यांच्या भुंवया जराहि न हलवतां तो आपल्या इष्ट देवतेची प्रार्थना करणारं गीत म्हणतो आहे. त्याच्याशीं स्पर्धा करणारे तरुण योद्धे हेवा वाटून त्याच्याकडे पहात आहेत. लाल रंगानं गाल रंगवलेल्या युवती त्याच्याकडे कौतुकाचे कटाक्ष फेंकत आहेत. आजूबाजूला जमलेलीं मुलं आनंदानं ओरडत आहेत. वस्तींतल्या तंबूतंबूकडे तो गेला कीं तिथल्या वृद्ध स्त्रिया त्याचं नांव घेऊन त्याचा जयघोष करीत आहेत.

आमच्या सर्व रेड इंडियन मित्रांनीं तरुण माहतों-ताटोंता हाच आमचा उत्तम मित्र होता. रेड इंडियन लोकांच्या झुंडीच्या झुंडी जेव्हां आमच्या तळावर येत तेव्हां आमचं सामान लुटलं जाऊं नये यासाठीं तो बारीक लक्ष ठेवीत असे.

एके दिवशीं व्हर्लविंडनं आम्हांला आमंत्रण देऊन आपल्या तंबूंत बोलावलं. जेवण झालं आणि मग पाइपहि फिरवला गेला. तो पाइप उत्तम दर्जाचा होता. मी त्याची स्तुति केली. तेव्हां व्हर्लविंड म्हणाला, “ तुम्हांला तो आवडला असेल तर तुमच्याकडेच कां नाहीं ठेवत तो ? ”

ऑगीलाल्लांच्या जमातींत इतक्या उत्तम दर्जाच्या पाइपची किंमत कमींत कमी एक घोडा इतकी असते. जमातीचा प्रमुख असलेल्या योद्ध्यानं असा पाइप भेट म्हणून देणं त्याच्या प्रतिष्ठेला साजेसंच होतं. परंतु या जातीचं औदार्य व्हर्लविंडपाशीं नव्हतं. मला त्यानं चिलीम दिली आणि त्या चिलमीच्या

मोबदल्यांत अधिक किंमती वस्तू मी त्याला भेट म्हणून द्याव्या ही आपली अपेक्षा त्यानं उघडउघड बोलून दाखविली. रेड इंडियन लोक ऐकादी भेट देतात, परंतु तिच्या मोबदल्यांत त्यांना आवडणाऱ्या वस्तू जर भेट म्हणून दिल्या नाहींत तर आपली भेट ते परत मागतात. तेव्हां मी एका रंगीबेरंगी रुमालांत लाल रंग, तंबाखू, सुऱ्या, बंदुकीची दारू अशा गोष्टी एकत्र बांधल्या आणि व्हर्लविंडला आमच्या तंबूवर बोलावून ती परतभेट त्याला देऊन टाकली. रुमाल उघडून त्यानं वस्तू पाहिल्या आणि खुषी व्यक्त करणारा 'हाव् हाव्' असा उद्गार त्यानं काढला. मग या सगळ्या वस्तू घेऊन तो तंबूवर गेला.

एके दिवशीं दुपारीं झऱ्याच्या कांठीं असलेल्या झुडपांच्या मागून रेड इंडियन घोडेस्वारांचं एक पथक येतांना आम्हांला दिसलं. त्यांच्याबरोबर एक खेचर होतं आणि या खेचरावर जवळजवळ मरायला टेकलेला एक निग्रो तरुण बसला होता. त्याचीं गालफडं खोल गेलीं होतीं; त्याचे डोळे विचित्रपणें विस्फारल्यासारखे दिसत होते. एखाद्या प्रेतासारखे त्याचे ओठ फाकलेले होते. त्या रेड इंडियनांनीं त्या निग्रोला आमच्या तंबूसमोर आणलं आणि खेचरावरून खालीं उतरवलं. त्याला उभंहि राहण्याचं त्राण नव्हतं. तो गुडघ्यांवर सरपटत थोडा पुढं आला आणि मग थकून बाजूच्याच गवतावर बसला. आजूबाजूच्या तंबूंतून मुलं आणि बाया त्याला बघण्यासाठीं त्याच्याभोंवतीं जमलीं आणि किंकाळ्या फोडूं लागलीं. तो निग्रो तरुण हाताच्या आधारानं कसाबसा बसला होता आणि शून्य नजरेनं आजूबाजूला पहात होता.

भुकेमुळं तो मरायला आला होता. बरोबर कसलंहि शस्त्र नाहीं, पायांत जोडे नाहींत, अंगांत फक्त एक जुनं जाकीट आणि विजार, वाट ठाऊक नाहीं, गवताळ प्रदेशाची कसली माहिती नाहीं अशा अवस्थेंत तो तीस दिवस एकटा भटकत होता. या तीस दिवसांत सरडे, टोळ, रानांतले कांदे यांच्यावर त्यानं आपला जीव जगवला होता. एकदांच फक्त त्याला रानकबुतराच्या घरट्यांत तीन अंडीं मिळालीं होतीं. या तीस दिवसांत त्याला माणसाचं दर्शन झालं नव्हतं. त्या निर्मनुष्य वैराण प्रदेशांत चालून चालून तो थकला आणि चालण्याचं त्राण संपलं तेव्हां तो गुडघ्यांवर सरपटूं लागला. अशा तऱ्हेनं सरपटल्यामुळं त्याच्या गुडघ्याची कातडी फाटून आंतलीं हाडं दिसूं लागलीं होतीं. तो रात्रीचा प्रवास करी आणि दिवसा तळपत्या उन्हांत झोपीं जाई. मिसुरीला आपल्या मालकाच्या घरीं असतांना खाल्लेल्या केक्स आणि सूप या गोष्टी त्याला स्वप्नांत दिसत

असत. तो जिवंतपणं इथं पोंचला याचंच सर्वांना आश्चर्य वाटलं. भुकेच्या तडाख्यांतून तो जगला याचं तर आश्चर्य होतंच परंतु अस्वलं आणि लांडगे यांच्या तावडींतून तो जिवंत सुटला हें अधिक मोठं आश्चर्य होतं.

रेनॉल्नं त्या निग्रोला पाहतांक्षणींच ओळखलं; कारण ते दोघे पूर्वी एकाच धन्याकडे काम करीत असत. एका वर्षापूर्वी हा निग्रो आपल्या धन्याकडून पळाला होता आणि सरहद्द सोडून रॉकी पर्वताकडे निघालेल्या रिचर्डच्या टोळींत सामील झाला होता. मे महिन्याच्या अखेरीपर्यंत तो रिचर्डच्या टोळींतच होता. एके दिवशीं भटकत दूर गेलेले घोडे शोधण्यासाठीं म्हणून इतर कांहीं माणसं आणि रेनॉल यांच्याबरोबर तो बाहेर पडला. वाटेंत फार मोठं वादळ झालं, आणि त्या धांवपळींत तो निग्रो कुठं तरी हरवला. त्या दिवसांपासून या घटकेपर्यंत कुणालाहि त्याचा पत्ता नव्हता. या प्रदेशांतला त्याला कसलाहि अनुभव नसल्यानं तो जिवंत राहील अशी कुणाचीच अपेक्षा नव्हती. तो वाटेंत पडला होता आणि रेड इंडियनांच्या या टोळीनं त्याला आमच्या तंबूसमोर आणून टाकलं होतं.

तंबूसमोरच्या गवतावर जेव्हां तो बसला तेव्हां त्याच्या खप्पड चेहेऱ्याकडे पहावत नव्हतं. डेस्लॉरिअर्सनं त्याच्यासाठीं थोडी कांजी करून एका कटोऱ्यांतून ती त्याला दिली. कांहीं वेळ त्या कटोऱ्याला हातहि न लावतां तो तसाच स्तब्ध बसला. मग त्यानं चमचा आपल्या ओठांपर्यंत नेला, पुन्हां पुन्हां त्यानं तसं केलं. कांहीं वेळानं त्याची भूक वेड्यासारखी चवताळली. त्यानं कांहीं सेकंदांतच त्या कटोऱ्यांतली कांजी फस्त केली, आणि तो खाण्यासाठीं मांस मागूं लागला. आतां आणखी कांहीं खाऊं नकोस, सकाळपर्यंत थांब असं सांगून आम्हीं त्याला मांस देण्याचं नाकारलं; परंतु तो इतक्या केविलवाणेपणानें याचना करूं लागला कीं शेवटीं आम्हीं त्याला मांसाचा एक लहानसा तुकडा दिला. एकाद्या कुत्र्यासारखा त्यानें तो भराभर खाऊन टाकला. तो आणखी मांस मागूं लागला. तूं आतां जर जास्ती खाल्लंस तर मरशील असं आम्हीं त्याला सांगितलं. तुमचं म्हणणं खरं आहे, मी मूर्खासारखं मागतों आहे, असं तो म्हणाला आणि पुन्हां मांस मागूं लागला. आम्हीं त्याला देणार नाहीं असं स्पष्ट बजावलं. त्यामुळें आजूबाजूला उभ्या असलेल्या रेड इंडियन बायांना राग आला. आमचं लक्ष नाहीं असं पाहून कांहीं वेळानं त्याला सुकवलेल्या मांसाचे तुकडे त्या देऊं लागल्या.

इतकं खाऊनहि त्याला पुरे होईना. अंधार पडल्यानंतर तो सरपटत रेड इंडियनांच्या तंबूतळावर गेला. तिथं पोचल्यानंतर त्यानं मनस्वी खाऊन घेतलं. दुसरे दिवशीं सकाळीं त्याला परत आणण्यांत आलं. मग गिंग्रास या फासेपारध्यानं आपल्या घोड्यावर त्याला घातला आणि त्याला तो किल्ल्याकडे घेऊन निघाला. आपल्या आधाशीपणाच्या परिणामांतून तो निग्रो कसाबसा वांचला. आम्ही जेव्हां तो प्रदेश सोडला तेव्हां किंचित् वेडसरपणा सोडल्यास त्या निग्रोची प्रकृति एकूण बरी होती. कांहींहि झालं तरी आपण मरणार नाहीं असा ठाम विश्वास त्यानं आमच्यापाशीं व्यक्त केला.

सूर्य मावळायला एक तास असतांना वस्तीवर आनंदाचं वातावरण पसरलेलं असे. तंबूभोंवतीं शांतपणें फिरतांना, झऱ्याच्या कांठानं चालतांना किंवा माळावर चरणाऱ्या घोड्यांना पाहाण्यासाठीं जातांना योद्धे दिसत असत. अर्धअधिक रेड इंडियन तापलेले तंबू सोडून झऱ्याच्या पाण्यांत आंघोळ करण्यासाठीं उतरलेले असत.

सूर्य समोर उभ्या असलेल्या शिखरांच्या खालीं उतरला कीं जांभळ्या डोंगरांच्या प्रदीर्घ सावल्या माळावर अंथरल्या जात. सूर्याच्या तिरप्या किरणांत आमच्यासमोरचं जुनाट झाड तरंगूं लागे. हेलावणारं गवत आणि अधूनमधून उभीं असलेलीं झाडं यांना शांत, नाजुक सौंदर्य प्राप्त होत असे. सॅल्व्हेटरसारख्या चित्रकाराच्या कुंचल्याचा विषय व्हावा असं दृश्य आमच्या तंबूच्या भोंवतीं दिसत असे. पाठीमागें बाणांचे भाते लावलेल्या, हातांत बंदुक, भाला किंवा परशु घेतलेल्या रेड इंडियन घोडेस्वारांच्या पुतळ्यांसारख्या आकृती आमच्या तंबूसमोर उभ्या राहून हातांची घडी घालून डोळे खिळवून आमच्याकडे पहात असत. कांहींजण पांढराशुभ्र रंग दिलेलं गव्याचं कातडं पायापासून डोक्यापर्यंत अंगाभोंवतीं गुंडाळून स्तब्ध उभे असत. कांहीं केसाळ घोड्यांच्या मानेला अडकवलेल्या दोराचं टोक हातांत घेऊन गवतावर बसलेले असत. त्यांच्या अंगांतलं कुडतं कमरेपर्यंत घसरलेलं असल्यामुळें एखाद्या अर्ध्या पुतळ्यासारखे ते दिसत.

अंधार पडला कीं चरायला सोडलेले घोडे परत आणले जात आणि आजूबाजूची गर्दी हळूहळू ओसरूं लागे. शेकोट्या पेटत. त्या अंधुक प्रकाशांत राकट फासेपारधी आणि रेखीव शरीराचे रेड इंडियन दिसूं लागत. आमच्या जवळच्याच तंबूंत असलेलं एक कुटुंब सारखं आपल्या तंबूच्या समोरील

शेकोटीभोंवतीं बसलेलं असे. त्या शेकोटीच्या प्रकाशांत त्यांच्या तंबूच्या आंतला भाग दिसे. चेटकिणीसारख्या दिसणाऱ्या थेरड्या शेकोटीभोंवती इथंतिथं फिरत. वर्तुळाकार बसलेलीं मुलं, आणि तरुण मुली तासन्‌तास हंसत आणि गप्पा करीत बसलेल्या दिसत. त्यांचे वाटोळे आनंदी चेहेरे त्या तांबूस प्रकाशानं उजळून निघत. ढोलाच्या एकसुरी तालावर युद्धगीत गाईलेलं ऐकूं येई. थरथरणाऱ्या आवाजांत युद्धनृत्याला साथ म्हणून समूहगीतं म्हटलीं जात. या सगळ्या गीतांचे सूर दूर अंतरावर पसरत मंद होत. कांहीं रात्रीं आम्हांला लांडग्यांच्या कुईसारखे रडण्याचे आवाज ऐकूं आले. तें रडणं महातो-ताटोंकाच्या बहिणींचं आणि स्त्री-नातेवाईकांचं होतं. दुःखाच्या भरांत अंगावर चाकूचे वार करून घेऊन त्या हेन्री शॅटिलॅंच्या स्त्रीच्या मृत्यूचा शोक करीत होत्या. बरीच रात्र झाल्यानंतर ही सगळी मंडळी झोपायला जात. मंद झालेल्या निखाऱ्यांसमोर अंगाभोंवतीं ब्लॅंकेटं गुंडाळून पुरुष मंडळी जमिनीवर झोपीं जात. आणि मग गर्दी करून बांधलेल्या घोड्यांच्या आवाजाखेरीज दुसरा कसलाहि आवाज ऐकूं येत नसे.

हें सारं आठवीत असतांना सुखदुःखाची मिश्र भावना माझ्या मनांत जागी आहे. या काळांत आजारामुळं मला इतका अशक्तपणा आला होता कीं झोकांड्या खाल्ल्याखेरीज मला चालतां येत नसे. मी माझ्या अंथरुणावरून उठून बसत असे. आजूबाजूला उभीं असलेलीं झाडं आणि तंबू अशावेळीं अंधुक होऊन हलत आहेत असा मला भास होई. सभोंवतालच्या गवताळ माळावर समुद्रासारख्या लाटा हेलावतांना मला दिसत. माणसाला कधींहि इतका अशक्तपणा येऊं नये. विशेषतः ज्या प्रदेशांत अंगांतली शक्ति हाच जगण्याचा एकमेव आधार असतो अशा ठिकाणीं तर असा अशक्तपणा मुळींच येऊं नये. शरीराच्या अशा अवस्थेंत पावसानें ओल्या झालेल्या जमिनीवर झोंपणं अतिशय धोक्याचं ठरतं. कधींकधीं तर मला इतका अशक्तपणा जाणवे कीं या प्रदेशावरच्या माझ्या प्रेमाचं प्रायश्चित् म्हणून अखेरची विश्रांति मला इथंच घ्यावी लागणार असं मला वाटूं लागे.

मी विश्रांति घेत होतों आणि पथ्यावर राहिलों होतों. बरेच दिवसपर्यंत मी विलक्षण संयम ठेवला होता, आमच्या तंबूभोंवतीं किंवा फार म्हणजे रेड इंडियनांच्या वस्तीपर्यंत हळूंहळूं चालत जाऊन मी परत येत असे. इतकी काळजी घेऊनहि माझी प्रकृति सुधारेना. तेव्हां मी कडक उपवास करायचं

ठरवलं. पांच दिवसपर्यंत मी दिवसाकांठीं एखाद्या लहानशा बिस्किटाखेरीज कांहींहि खाल्लं नाहीं. पांच दिवसांचा हा उपवास संपल्यानंतर मला अधिक अशक्तपणा आला. परंतु त्याबरोबरच माझ्या आजाराचा जोरहि बराच कमी झाला. हळूंहळूं मी थोडंथोडं खाऊं लागलों.

माझ्या तंबूसमोर बसून ग्लानी आलेल्या अवस्थेंत भूत आणि भविष्य काळाचं चिंतन करीत मी शांतपणें पडून असे. माझे स्वप्नाळू डोळे दूरवर उभ्या असलेल्या ब्लॅकहिल्सवर खिळलेले असत. डोंगरामध्यें एक प्रकारचं चैतन्य असतं. जो कुणी मनुष्य डोंगरावर जातो त्याला या चैतन्याचा स्पर्श लाभतो. त्यावेळीं ब्लॅकहिल्ससंबंधानं रेड इंडियन लोकांच्या मनांत कोणकोणत्या अंधश्रद्धा आणि दंतकथा आहेत हें मला ठाऊक नव्हतं. परंतु माझ्या मनांत मात्र ब्लॅकहिल्सच्या अज्ञात भागांत फिरावं, जिथं अजून कुणी पोंचलेलं नाहीं अशा तिथल्या दऱ्या आणि टेकड्या शोधून काढाव्यात, तिथं दडलेलीं निःशब्द जंगलं आणि काळेभोर प्रवाह हुडकावेत अशी उत्कट इच्छा निर्माण झाली होती. या सगळ्या गोष्टी तिथं आहेत असं कल्पनाचित्र मीं रंगवलं होतं.



# १२ | दुर्दैवाचा क्षण

लारामीच्या किल्ल्यावरून एक कॅनडियन मोठी गंमतीची बातमी घेऊन आला.

मिसुरीहून आलेल्या एका प्रवाशांच्या तांड्यानें लारामीच्या किल्ल्याजवळच तळ ठोकला होता. या प्रवाशांतल्या एका कुटुंबांतल्या तरुणीच्या प्रेमांत नुकताच डोंगरांतून परत आलेला फासेपारधी पडला. युवतीचं मन शौर्यानं जिंकलं जातं हें जर खरं असेल तर शौर्याच्या बाबतींत रॉकी पर्वताच्या विभागांतील फासे-पारध्याची कोणीहि बरोबरी करूं शकणार नाहीं. याहि प्रकरणांतली विवाहयाचना व्यर्थ ठरली नाहीं. या दोघां प्रेमिकांनीं एक बेत आंखला आणि तो अत्यंत निकडीनं अंमलांत आणायला प्रारंभ केला. प्रवाशांच्या तांड्यानं आपला मुक्काम हलवला व ते पुढं निघाले. परंतु नेहमीप्रमाणें एक रात्र सोडून त्याच्या पुढच्या रात्रीं त्यांनीं वाटेंत आपला तळ ठोकला. मध्यरात्र उलटली होती. प्रेमांत पडलेला हा फासेपारधी घोड्यावर स्वार होऊन आणि दुसऱ्या एका घोड्याचा लगाम हातांत धरून प्रवाशांच्या तंबूतळावर आला. एखाद्या गव्यांच्या कळपाला गाठण्याच्या प्रयत्नांत तो असावा त्याप्रमाणं त्यानं हळूच पुढं होऊन गाड्यांच्या मागं जाऊन दोही घोडे एका झाडाला बांधले.

प्रवाशांनीं पहारा ठेवलेला होता. परंतु रात्रपाळीचा हा पहारेकरी बहुधा अर्धवट झोपेंत असावा. त्याचा डोळा चुकवून ठरल्याप्रमाणं हा फासेपारधी आपल्या प्रेयसीला तंबूतळाच्या सीमेवर भेटला. मग त्यानं तिला घोड्यावर बसवली आणि ते दोघंहि अंधारांत अदृश्य झाले. हें साहस केल्यानंतर पुढं त्या दोघांचं काय झालं हें मात्र आम्हांला समजलं नाहीं. दूरदर्शीपणाचा अभाव असलेल्या त्या पोरीला त्या फासेपारध्याची रेड इंडियन पद्धतीची झोपडी आवडली किंवा काय, तो वेड्बूट फासेपारधी नवरा म्हणून तिला कितपत रुचला याविषयीं आम्हांला अर्थातच कांहीं कळलं नाहीं.

शेवटीं एकदां व्हर्लविंड आणि त्याचे सहकारी योद्धे यांनीं मुक्काम हलवायचं ठरवलं. सगळी तयारी झाल्यानंतर त्यांनीं ठरवलं होतं कीं ल बॉंतेच्या तळावर न जातां ब्लॅकहिल्समधून जाऊन कांहीं आठवडे गव्यांच्या शिकारींत घालवायचे, आणि अन्न व पुढच्या वर्षीच्या तंबूसाठीं कातडीं यांची भरपूर तरतूद करून ठेवायची. हें सगळं केल्यानंतर एक छोटंसं स्वतंत्र योद्ध्यांचं पथक शत्रूवर पाठवलं जाणार होतं. त्यांच्या या अशा तऱ्हेच्या निर्णयामुळं आम्ही गोंधळांत पडलों. कारण समजा आम्हीं ल बॉंतेच्या तळावर गेलों आणि त्याच वेळीं रेड इंडियनांच्या इतर वस्त्यांनीं व्हर्लविंडप्रमाणेंच तिथं न जाण्याचा आयत्या वेळीं निर्णय घेतला म्हणजे पंचाईत! अशा परिस्थितींत आम्हांला कुठला मेळावा पहायला मिळणार?

आमचा जुना मित्र रेनॉल याला आमच्याविषयीं जिव्हाळा वाटूं लागला होता, किंवा हवं तर आपण असं म्हणूं कीं आमच्याकडून मिळत असलेली बिस्किटं, कॉफी आणि बारीक सारीक बक्षिसं यांच्याविषयीं त्याला जिव्हाळा वाटूं लागला होता. व्हर्लविंडच्या वस्तीबरोबरच जायची त्याची इच्छा होती, आणि आम्हींहि त्याप्रमाणं करावं असं तो सुचवीत होता. ल बॉंतेच्या तळावर कोणीहि येणार नाहीं, आणि ब्लॅकहिल्समधून आमच्या गाड्या आणि सामान नेणं सोपं होईल असं त्यानं सांगितलं. वास्तविक, ज्या बिकट खिंडींतून हे रेड इंडियन लोक जाणार होते, त्यांची कसलीहि माहिती रेनॉलला नव्हती. आमच्यापैकींहि कुणाला तो भाग ठाऊक नव्हता. इथून जेव्हां मी नंतर गेलों तेव्हां इथल्या अरुंद घळ्यांतून, खिंडींतून मोठ्या मुष्किलीनं मला घोडा बाहेर काढतां आला. पाईक पर्वताच्या शिखरावरून एक वेळ आमची गाडी सहज नेतां आली असती! परंतु रेनॉलनं रेड इंडियनांच्या वस्तीबरोबर जाण्याची जेव्हां सूचना केली, त्यावेळीं या ब्लॅकहिल्सच्या माहितीबाबत आम्ही अगदींच कोरे असल्यामुळें आम्हीं तिथून

जायचं ठरवलं. शिवाय, ल वॅतेच्या तळावर मेळावा जमेल किंवा नाहीं हें अनिश्चित होतं. तेव्हां हातचं सोडून पळत्याच्या पाठीं कां लागा! असाहि विचार आम्हीं केलाच.

आम्हीं आणि रेड इंडियन लोकांनीं एक जुलैच्या सकाळीं मुक्काम हलवला आणि प्रवासाला सुरुवात केली. मी इतका अशक्त झालों होतों कीं अधूनमधून घेत असलेल्या चमचाभर व्हिस्कीमुळेंच त्या दिवशीं मी कसाबसा घोड्यावर बसूं शकलों. आमच्या पुढें आणि मागें अर्ध्या मैल अंतरावर रेड इंडियनांचे घोळके दिसत होते. डाव्या आणि उजव्या हाताला विस्तीर्ण माळ पसरलेला होता आणि समोर दूर अंतरावर ब्लॅकहिल्सचे कडे दिसत होते. रेड इंडियनांच्या गर्दीतून वाट काढीत आम्ही जरा पुढं झालों. हेन्री शॅटिलॅनं दूरच्या माळाकडे मागं वळून पाहिलं आणि कोणी तरी घोडेस्वार येतो आहे असं तो म्हणाला. आम्हीं पाहिलं तेव्हां एक काळा ठिपका सरकत असल्याचं आम्हांलाहि दिसलं. हळूहळू तो ठिपका मोठा दिसूं लागला. हेन्री म्हणाला, "मला वाटतं, कोणीतरी गोरा माणूस आहे. त्याची घोडा चालवण्याची पद्धत पहा. रेड इंडियन लोक घोडा असा चालवत नाहींत. आपल्या खोगीराला त्यानं रायफलहि अडकवलेली दिसते आहे." कांहीं काळ तो घोडेस्वार माळावरच्या एका खोलवट्यामुळं दिसेनासा झाला. परंतु पुन्हां लवकरच तो दिसूं लागला. कांहीं वेळानं रेड इंडियनांच्या गर्दीतून वाट काढीत तो आमच्याकडे येऊं लागला. त्याचे लांब केस वाऱ्यावर उडत होते. तांबूस चेहेऱ्याचा आणि काळविटाच्या कातड्याचा जुना कुडता घातलेला तो मनुष्य म्हणजे फासेपारधी गिंग्रास आहे हें आम्हीं ओळखलं. तो लारामीहून आमच्यासाठीं एक निरोप घेऊन आला होता. बिसोनेट नांवाचा एक व्यापारी हेन्रीचा मित्र होता. बिसोनेट नुकताच वस्तीवरून आला होता आणि कांहीं लोक बरोबर घेऊन ल वॅतेच्या तळावर जाण्याचा त्याचा बेत होता. रेड इंडियनांच्या दहाबारा वस्त्या तरी इथं नक्की जमतील असं गिंग्रास म्हणाला. आम्ही रेड इंडियनांच्या वस्तीवर जाऊं तेव्हां आमचे घोडे सांभाळण्याचं काम आपण करूं असं आम्हांला बिसोनेटनं कळवलं होतं. हा निरोप कळतांच मी आणि शॉनं घोडे थांबवले, चर्चा केली आणि त्या दुर्दैवाच्या क्षणीं आम्हीं बिसोनेटबरोबर जाण्याचा निर्णय घेतला.

उरलेला दिवस आमचा आणि आमच्याबरोबरील रेड इंडियनांचा मार्ग एकच होता. तासाभरानें आम्ही ओलांडून जात असलेला माळ एका खोल

उतारापाशीं अचानक संपला. आम्हीं त्या कडेवर उभं राहून पाहिलं तेव्हां आम्हांला एक कुरण दिसलं. कुरणाच्या डाव्या बाजूनं लारामीचा फाटा वहात होता. ओढ्याच्या वेगवान् प्रवाहावर कड्यांच्या सावल्या अंथरल्या गेल्या होत्या. आमच्यासमोरून रेड इंडियन त्या उतारावरून खालीं उतरून पलीकडच्या कुरणाकडे जात होते. कांहीं वेळानं तें कुरण माणसांनीं भरून गेलं. एका कड्यावर कांहीं योद्धे बसून निश्चल चेहेऱ्यानें धूम्रपान करीत या सगळ्या गर्दीकडे पहात होते. हळूहळू झऱ्याच्या कांठाशीं रेड इंडियनांचे तंबू वर्तुळाकार उभे राहिले. शांतता लाभावी या दृष्टीनं या रेड इंडियनांच्या तळापासून अर्ध्या मैलाच्या अंतरावर कांहीं झाडं होतीं तिथं आम्हीं आमचे तंबू ठोकले. दुपारीं आम्ही या रेड इंडियनांच्या तळावर आलों. लखलखीत प्रकाश सर्वत्र पडला होता. वस्तीचा तळ माणसांनीं गजबजून गेला होता. तंबूच्या बाहेर बसून मुलं आणि तरुण मुली हंसत खिदळत होत्या. तंबूच्या समोर तिकट्यावर अडकवलेलीं धनुष्यं, भाले, आणि ढाली तिथं दिसत नव्हत्या. योद्धे घोड्यावर स्वार झाले होते आणि माळ ओलांडून पलीकडच्या टेकड्यांकडे चालले होते.

रेनॉलच्या तंबूसमोर मी आणि शॉ बसलों. एका म्हाताऱ्या रेड इंडियन बाईनें आतिथ्यपूर्वक आम्हांला कटोऱ्यांतून शिजवलेलं हरणाचं मांस आणून दिलं. कांहीं तरुण पोरी आजूबाजूच्या तंबूंत पकडापकडी खेळत होत्या. आम्ही त्यांचा खेळ मजेंत पहात बसलों होतों. इतक्यांत पलीकडच्या टेकड्यांतून प्रचंड घंटानादासारख्या युद्धघोषणा ऐकूं आल्या. भरधांव घोडे फेकत घोडेस्वार वस्तीच्या दिशेनं येऊं लागले. प्रत्येक घोडेस्वाराचे केंस त्याच्यामागें डोलकाठी-वरच्या पताकेसारखे वाऱ्यावर फडफडत होते. ते जवळ येतांच अस्ताव्यस्त पसरलेली गर्दी आवरून बसली. दोनदोन घोडेस्वार पुढं येऊन युद्धगीत गातगात वस्तीभोंवतीं फेरी घालूं लागले. त्यांतल्या कांहीं जणांचे पोषाख उत्कृष्ट होते. पिसांचा तुरा त्यांनीं केंसांत अडकवलेला होता. काळविटाच्या कातड्याचा घट्ट कुडता त्यांनीं घातला होता. या कुडत्याच्या शिवणीवर शत्रूच्या केसांची झालर लावलेली होती. त्यांच्या ढालीवरदेखील गरुडाचीं पिसं लावलेलीं होतीं. काळ्या आणि पांढऱ्या रंगाच्या घोड्यावर बसलेला व्हाईट शिल्ड या नांवाचा योद्धा आघाडीवर होता. माहतो-टाटोंका आणि त्याचे भाऊ हे बहिणीच्या मृत्यूच्या शोकांत असल्यामुळें त्यांनीं या कवायतींत भाग घेतला नव्हता.

डोक्यापासून पायापर्यंत पांढरी माती थापून ते आपल्या तंबूंतच बसले होते. त्या प्रत्येकाच्या कपाळावरच्या केंसांचा एकएक पुंजका कापलेला होता.

कवाईत करून दाखवणाऱ्या या योद्धयांनीं घोडे भरधांव सोडून वस्तीभोंवतीं तीन फेऱ्या केल्या. प्रत्येक योद्धा जवळ आला कीं तरुण मुलांच्या मनांत अनुकरणाची ईर्षा निर्माण करण्यासाठीं म्हाताऱ्या बाया या योद्धयाच्या नांवाचा जयघोष करीत. दोन वर्षांचीं लहान पोरं लुकलुकत्या डोळ्यांनीं हा युद्धाचा उत्सव पहात होतीं. आपल्या जमातींतल्या योद्धयांचं तीं कौतुकानं दर्शन घेत होतीं. थोड्या वेळानं घोडेस्वारांचीं हीं पथकं ज्या वाटेनं वस्तीवर आलीं होतीं, त्याच वाटेनं बाहेर गेलीं. अर्ध्या तासानंतर पुन्हां सगळे योद्धे दोघांदोघां तिघां-तिघांचे गट करून परत वस्तीवर आले. ही कवाईत संपल्यानंतर रेड इंडियन कुटुंबांतलं एक मोठं गंमतीचं दृश्य आम्हांला पहायला मिळालं. एक भयानक चेहेऱ्याची बाई संतापानं बेभान होऊन आपल्या नवऱ्याची खरडपट्टी काढीत होती. नवरा बाजूलाच पायाची फुली घालून पाइप ओढत बसला होता. जसं कांहीं कांहींच झालं नाहीं असा भाव त्याच्या मुद्रेवर होता. त्याच्या या थंडपणा-मुळें त्याची कर्कशा बायको अधिकच भडकली. तिनं संतापानं तंबूच्या काठ्या जोरानं हलवून तंबू छतासकट नवऱ्याच्या डोक्यावर पाडला. कासव आपल्या कवचांतून डोकं बाहेर काढतं तसं त्या नवऱ्यानं कांहीं वेळानं कोसळलेल्या छतांतून आपलं डोकं वर काढलं. बाहेर येऊन तो गवतावर बसला आणि पुन्हां धीमेपणानं चिलीम ओढूं लागला. त्याच्या मनांत धुमसणारा संताप त्याच्या डोळयांत उमटलेल्या क्रूर छटेखेरीज त्याच्या कुठल्याहि हालचालींत दिसत नव्हता. शिव्या घालून घालून त्याची बायको शेवटीं घोड्यावर बसली आणि चौकचालीनं घोडा हांकीत ती तळाच्या बाहेर निघाली. जवळपास कुठेंतरी असलेल्या आपल्या बापाच्या तंबूकडे ती जायला निघालेली असणार. ती गेल्यानंतर तिच्याकडे त्या योद्धयानं मेहेरबानी म्हणूनसुद्धा पाहिलं नाहीं. पण थोड्या वेळानं तो शांतपणें उठला. तंबूची काठी मोडून त्यानं तो सोटा आपल्या हातांत घेतला आणि आपल्या फाजील बायकोला शिस्त लावण्यासाठीं तो तिच्या मागें गेला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्हीं कुरणाकडे पाहिलं तेव्हां ती रेड इंडियन वस्ती तंबू आवरून निघण्याच्या तयारींत असलेली आम्हांला दिसली. आतां ते पश्चिमेकडे जाणार होते. आम्ही उत्तरेकडे निघालों. आम्हीं तिघे, चौघे

फासेपारधी आणि मॉरीनचं रेड इंडियन कुटुंब असं आमचं पथक होतं. रात्र पडेपर्यंत आम्हीं प्रवास केला आणि एका झऱ्याच्या कांठीं झाडालगत तळ ठोकला. दुसऱ्या दिवशीं बिसोनेटची वाट पहात आम्ही तिथंच राहिलों. परंतु बिसोनेट कांहीं आला नाहीं. त्या चौघां फासेपारध्यांपैकीं दोघांनीं आमचा निरोप घेतला आणि ते रॉकी पर्वताच्या दिशेनं निघाले. त्यानंतरच्या दिवशीं सकाळीं आतां बिसोनेट येत नाहीं हें मनांत समजून आम्हीं प्रवासाला सुरुवात केली. विषण्ण दिसणारे, उन्हानं रापलेले निर्मनुष्य माळ आम्हीं ओलांडले. वाटेंत वाऱ्यासारखा भरधांव जाणारा क्वचित् एखादा काळवीट आम्हांला दिसे. दुपारीं एक आगळं आणि सुखद दृश्य आम्हांला दिसलं. हॉर्स शू या ओढ्याच्या कांठीं बरींच झाडं उगवलेलीं होतीं. सुट्यासुट्या उभ्या असलेल्या या झाडांनीं जमिनीवर दाट वाढलेल्या गवतावर आपल्या हिरव्यागार पानांचं जणूं छत धरलं होतं. स्फटिकासारखा शुभ्र प्रवाह वहात होता. मी फार दमलों होतों. मी तिथंच जमिनीवर अंग टाकलं. त्याक्षणीं हलण्याचीहि शक्ति माझ्यांत उरली नव्हती.

दुसरे दिवशीं सकाळीं तेजस्वी सूर्य उगवला. इतका लखलखीत प्रकाश त्या प्रदेशावर पूर्वीं कधीं पडला नसेल. आम्हीं प्रवासाला सुरुवात केली होती. कांहीं वेळानं आम्ही उंच टेकड्यांनीं वेढले गेलों. या टेकड्यांवर लटकलेल्या सापांसारखीं दिसणारीं निवडुंगाचीं अनेक झुडपं होतीं. आमच्यासमोर एक सपाट आणि कठीण जमीन असलेला माळ होता. या माळावर गवताचा मागमूसहि दिसत नव्हता. टोकाच्या कडेला वाकड्यातिकड्या फांद्या असलेलीं कांहीं झाडं होतीं. आजूबाजूला माणसाचा किंवा पशूचा आवाजहि ऐकूं येत नव्हता. माळाच्या कडेला असलेल्या त्या वाकड्यातिकड्या झाडांपलीकडे ज्याची आम्ही इतक्या उत्सुकतेनं वाट पहात होतो तो रेड इंडियनांचा मेळावा जमणार अशी आशा आम्ही बाळगून होतों. माळ ओलांडून आम्ही पुढं गेलों तेव्हां कुठंहि रेड इंडियनांचा तंबू आम्हांला दिसला नाहीं. कोसच्या कोस वैराण भूमि पसरलेलीच फक्त दिसत होती. आम्हीं लगाम खेंचून घोडे थांबवले आणि अमेरिकेच्या त्या आदिवासींना भरपूर शिव्या हांसडल्या. आमचा इथवरचा प्रवास कष्टाचा तर होताच–पण इतके कष्ट करून ते फुकट गेले होते. मी तर अतिशय दगदगलों होतों. माझा आजार जर जरा वाढला तर चुकीनं टाकलेलं हें पाऊल मागं घेणं अशक्य होईल आणि ज्या हेतूनं तीनचार हजार मैलांचा

हा खडतर प्रवास मीं केला होता तो हेतूच विफल होईल, याची मला जाणीव होती.

आणि या क्षणीं ते रेड इंडियन कुठं होते? आम्ही जिथं होतों तिथून वीस मैलांच्या अंतरावर ते जमले होते आणि आपलीं युद्धनृत्यं करीत होते. ल बॅंतेच्या आसपास गवे अत्यंत कमी असल्यामुळें त्यांनीं तिथं जमण्याचा बेत रद्द केला होता. अर्थात् हें सगळं आम्हांला नंतर बऱ्याच आठवड्यांनीं कळलं.

शॉनें घोड्याला चाबकाचा फटकारा मारला आणि तो वेगानं पुढं झाला. खरं म्हणजे मी शॉपेक्षांहि अधिक वैतागलों होतों. परंतु आजारामुळें मी इतका थकलों होतों कीं रागाची वाफ बाहेर सोडण्याचा शॉनं अंगीकारलेला आतांचा मार्ग मला झेपण्यासारखा नव्हता. तेव्हां मी संथ गतीनं घोडा चालवत निघालों. कांहीं अंतरावर एक जुनाट वृक्ष एकाकी उभा होता. त्यांतल्या त्यांत तंबू ठोकण्यासाठीं हीच जागा बरी असं आम्हांला वाटलं. या जुनाट वृक्षाच्या अर्ध्याअधिक फांद्या निष्पर्ण होत्या. बाकीच्या फांद्यांवर तुरळक पानं होतीं आणि त्यांची नांवापुरती सावली खालीं पडली होती. आम्हीं झाडाच्या बुंध्याच्या सावलीचा छोटा पट्टा समोर पडला होता त्याच्यावर आमचीं खोगीरं अंथरलीं. एक शब्द न बोलतां तासभर उद्विग्न मनानं आम्ही धूम्रपान करीत बसलों होतों. ऊन भाजून काढीत होतं. सावलीचा पट्टा सरकला की आम्हीं आमचीं खोगीरं उचलून पुन्हां त्या सावलींत बसत असूं.



# १३ | रेड इंडियनांच्या शोधांत

शेवटीं आम्ही एकदांचे ल ब्रॅतेच्या तळावर पोचलों. त्या दिवशीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत आम्हीं खूप त्रास सोसला. अजूनपर्यंत आम्हांला खूप कष्ट झाले होते, परंतु हा दिवस त्या कष्टांचा कळसच समजावा लागेल. झाडाच्या खालीं बसून निश्चल सावल्यांकडे पहात मी आतां पुढं काय करावं याचा विचार करीत होतों. सूर्य आकाशांत खिळल्यागत दिसत होता. कोणत्याहि क्षणीं बिसोनेट आणि त्याचीं माणसं पलीकडच्या झाडींतून येतील असं आपलं मला उगीचंच वाटत होतं. टेहेळणी करण्यासाठी म्हणून सकाळींच गेलेले हेन्री आणि शॉ सूर्यास्ताच्या वेळीं परत आले. त्यांनीं जी-बातमी आणली तिच्यांत

उत्साहजनक असं कांहींच नव्हतं. शॉ म्हणाला, "आम्ही इथून जवळजवळ दहा मैल फिरून आलो. सर्वांत उंच अशा टेकडीवर चढून पाहिलं. पण कुठंहि एखादा गवा किंवा रेड इंडियन आम्हांला दिसला नाहीं. वीस मैलांच्या अंतरावर विस्तीर्ण माळाखेरीज कांहींहि दिसत नाहीं." चढउतार केल्यामुळं हेन्रीच्या घोड्याला जखमा झाल्या होत्या. शॉचाहि घोडा विलक्षण थकला होता.

संध्याकाळचीं जेवणं उरकल्यानंतर शेकोटीभोंवती गप्पा मारीत आम्ही बसलों होतों. मी शॉला म्हणालो," विसोनेटची वाट पहात आपण एक दिवस थांबू या आणि जर आला नाहीं, तर डेस्लॉरिअर्सला आपल्या गाड्या आणि सामान घेऊन आपण लारामीच्या किल्ल्यावर पाठवून देऊं आणि व्हर्लविंडच्या वस्तीला गांठण्यासाठीं आपण डोंगराच्या दिशेनं निघूं. रेड इंडियन समाजाचा अभ्यास करण्याचा हेतु शॉच्या मनांत नसल्यामुळें त्यांचा पाठलाग करण्याची ही माझी योजना त्याला पसंत पडली नाहीं. तेव्हां व्हर्लविंडच्या वस्तीला गाठण्यासाठीं आपण एकट्यानंच जायचं असं मीं ठरवलं. हा निर्णय अर्थातच मी मोठ्या कष्टानं घेतला. कारण सध्यांच्या माझ्या प्रकृतीच्या अवस्थेंत हा खडतर प्रवास करणं किती बिकट होतं याची मला जाणीव होती. मला आपलं उगीचंच वाटत होतं कीं, दुसऱ्या दिवशीं विसोनेट कांहींतरी चांगली बातमी घेऊन येईल आणि मग माझ्या सहकाऱ्यांच्या दृष्टीनं कसलाहि आक्षेपार्ह निर्णय न घेतां माझा रेड इंडियनांचा अभ्यास करण्याचा हेतु मला साध्य करून घेतां येईल.

मी नसतांना संरक्षणाच्या दृष्टीनं आमच्या तांड्याबरोबर हेन्री शॅटिलॅं असणं आवश्यक होतं. तेव्हां मी रेमंडला हांक मारली आणि त्याला माझ्याबरोबर निघण्याचा हुकूम केला. रेमंडनं आपली शून्य नजर गरगरा फिरवली. कांहीं वेळानं मी काय म्हणतों आहे याचा प्रकाश त्याच्या डोक्यांत पडला आणि गाड्याखालीं पडलेलं आपलं अंथरूण त्यानं आवरलं. रेमंड बळकट बांध्याचा होता. त्याच्या रुंद चेहेऱ्यावर अभेद्य मठ्ठपणा आणि असाधारण आत्मविश्वास या दोन्ही गोष्टी दिसत असत. निष्ठा, धोक्याविषयीं बेफिकिरी, सहज प्रेरणेतून निर्माण झालेलें चातुर्य हे रेमंडचे गुण होते. पुष्कळ वेळां शहाण्या माणसाचेंहि डोकं जिथं चालेनासं होई तिथं रेमंड आपल्या अंगच्या चातुर्यानं वाट काढीत असे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खुंटाला घोडे बांधणं आणि रायफल चालवणं या दोन्ही गोष्टी त्याला चांगल्या जमत.

दुसरा दिवस उजाडला. ऊन नुसतं भाजून काढीत होतं. निळसर रंगाचे गवताळ माळ या तळपत्या उन्हांत थरथरत होते. आमच्या रेड इंडियन सहकाऱ्यांचे तंबू नुसते भाजून निघाले होते. झाडाला टेकवून ठेवलेल्या आमच्या रायफली हातांत धरणं कठीण व्हावं इतक्या तापल्या होत्या. डांस आणि माशा यांची भुणभुण सोडल्यास शांततेचा भंग करणारा दुसरा आवाज नव्हता. हाताची उशी करून माझे सहकारी गाड्यांच्या खालीं झोपले होते. आमच्या तांड्यांतले रेडइंडियन तंबूंतच होते—नुकतंच लग्न झालेलं ते जोडपं, आणि म्हातारा रेड इंडियन मांत्रिक हेच याला अपवाद होते. तं जोडपं एकमेकांना बिलगून गव्याच्या कातडींच्या काठ्यांवर टाकलेल्या तात्पुरत्या छताखालीं बसलं होतं आणि निःसत्त्व चेहेऱ्याचा तो रोड म्हातारा मांत्रिक एखाद्या गिधाडासारखा त्या जुनाट वृक्षाच्या कोळपलेल्या फांदीवर बसून दूरवर नजर लावून शत्रू येतात किंवा काय तें पहात होता. आम्हीं जेवणं उरकलीं. थोड्या वेळानं शॉनं घोड्यावर खोगीर चढवलं. तो म्हणाला, "मी मागं हॉर्स शूच्या ओढ्यापर्यंत जातों आणि तिथं बिसोनेट आला आहे किंवा काय तें पाहतों."

मी म्हणालों, "मीहि तुझ्याबरोबर आलों असतों; परंतु माझ्या अंगांत शिल्लक असलेली शक्ति मला राखून ठेवली पाहिजे."

दुपार एकदांची टळली. पुढच्या प्रवासाची तयारी करायला मी लागलों. मी माझी पिस्तुलं आणि रायफल साफ केली. मी खोगीर उशाला घेऊन अंगाभोंवती ब्लँकेट गुंडाळून झोपलों तेव्हां बरीच रात्र झाली. शॉ अजून आला नव्हता. परंतु आम्हांला त्याची काळजी वाटली नाहीं. कारण बिसोनेट त्याला भेटला असणार आणि रात्रीं तो त्याच्याबरोबरच राहिला असणार असं आम्हीं धरून चाललों होतों. गेले दोन दिवस माझी प्रकृती बरी होती. परंतु रात्रीं विलक्षण वेदना होऊन मला अचानक जाग आली. त्यानंतर मी बराच वेळ झोंपू शकलों नाहीं. प्लाटच्या पात्रांत मध्यभागीं चंद्राचं प्रतिबिंब थरथरत होतं. पावलं वाजल्याचे, माणसं कुजबुजल्याचे अतर्क्य आवाज ऐकूं येत होते. या प्रदेशांत ज्यानं एकट्यानं रात्र घालवली आहे त्याला मी म्हणतों त्या आवाजांचा अनुभव असणारच. माझ्या डोळ्यावर किंचित् झोप आली. इतक्यांत मला कुणीतरी हांक मारली, मी जागा झालों. आमच्या तंबूच्या दिशेनं हातांत बंदूक घेतलेला शॉ पायींच येत होता. मी कोपराच्या आधारानं पाठ वर उचलली आणि विचारलं, "तुझा घोडा कुठं आहे?"

शॉ म्हणाला, "घोडा हरवला. डेस्लॉरिअर्स कुठं आहे?"

ब्लँकेटांच्या आणि गव्याच्या कातड्यांच्या एका ढिगाऱ्याकडे बोट दाखवून मी म्हणालो, "तो तिथं."

शॉनं बंदुकीच्या टोकानं त्याला हलवलं. तो एकनिष्ठ कॅनडियन सटकन् उठून उभा राहिला. शॉ म्हणाला, "डेस्लॉरिअर्स, चल लवकर, शेकोटी पेटव आणि मला कांहींतरी खायला आणून दे."

मी विचारलं. "ब्रिसोनेट, कुठं आहे?"

"कुठं आहे देव जाणे! हॉर्सशू ओढ्याजवळ तर कोणीच नाहीं."

दोन दिवसांपूर्वी हॉर्सशूच्या ओढ्याजवळ आम्हीं आमचा तळ ठोकला होता. ब्रिसोनेट तिथं आला आहे काय किंवा तें पहाण्यासाठीं शॉ तिथं गेला तेव्हां त्याला कोणीहि दिसलं नाहीं. झाडासमोर आमच्या विझलेल्या शेकोट्यांची राख तेवढी पाहिली. मग त्यानं आपला घोडा बाजूच्या झाडाला बांधला आणि तो झऱ्याच्या पाण्यांत आंघोळ करण्यासाठी उतरला. शॉ आंघोळ करीत असतांना कुठल्यातरी जनावरानें त्याच्या घोड्याला घाबरवलं. भ्याल्यामुळें लगाम तोडून घोडा पळाला. शॉनं दोन तास त्याला पकडण्यासाठीं पायपीट केली, पण व्यर्थ. आमचा तंबूतळ आतां जवळजवळ बारा मैल दूर असल्याचं त्याच्या लक्षांत आलं. शिवाय सूर्यास्ताचीहि वेळ झाली होती. तेव्हां त्यानं घोड्याला पकडायचा नाद सोडून दिला आणि तो पायींच आमच्या तंबूच्या दिशेनं निघाला. त्याला काळोखांत पायपीट करावी लागली. वाट धोक्याची होती. त्याच्या पायांतले हरणाच्या कातड्याचे जोडे फाटून त्यांच्या चिंध्या झाल्या आणि त्याचे पाय फाटून निघाले. इतका खडतर प्रवास करून तो जेव्हां तंबूतळावर येऊन पोंचला तेव्हांहि त्याची शांतवृत्ती जराहि ढळली नव्हती. तो शांतपणें खायला बसला होता. झोपतां झोपतां मी त्याच्याकडे जेव्हां पाहिलं तेव्हां तो खाणं संपवून शेकोटीसमोर पायाची फुली घालून बसला होता आणि पाईप ओढत होता.

मी जागा झालों तेव्हां हवेंत ताजा दमट वास भरून राहिला होता. पांढुरक्या अंधुक प्रकाशांत सभोंवतालचे माळ गुरफटले होते. पूर्वेकडच्या आकाशांत थंड तांबड्या रंगाचा पट्टा दिसत होता. मी आमच्याबरोबरच्या लोकांना हांका मारून जागं केलं. थोड्या वेळानं आग पेटवली गेली. पहांटेच्या त्या मंद प्रकाशांत न्याहारीची तयारी होऊं लागली. आम्ही गवतावर मांड्या

घालून खात बसलों होतों. त्यानंतर बरेच दिवसपर्यंत इतकं चांगलं जेवण मला आणि रेमंडला मिळालं नाहीं.

"आतां घोडे पकडून आणा."

माझी घोडी पॉलीन ही कांहीं वेळानं शेकोटीसमोर उभी असलेली मला दिसली. °ती चपळ व काटक होती. पॉल डॉरिनला माझा घोडा पाँटिॲक देऊन त्याच्या बदल्यांत मीं तिला घेतली होती. पॉलकडून तिला घेतली याची आठवण म्हणून मी तिचं नांव पॉलीन ठेवलं. मी पॉलीनकडे पाहिलं. सकाळच्या गंमतीच्या फेरफटक्यासाठीं तिला तयार करण्यांत आलेली नव्हती. काळ्या, उंच खोगीराच्या समोर लटकावलेल्या दोन्ही म्यानांत जड पिस्तुलं ठेवलेलीं होतीं. खोगीराला लावलेल्या पिशव्या, मागं ठेवलेलं ब्लँकेट, गव्याच्या कातड्यांत गुंडाळलेलं रेड इंडियनांना द्यायच्या बक्षिसांचं पार्सल, पीठ भरलेली पिशवी, चहा भरलेली एक छोटी पिशवी, दोरखंडाचं वेटोळं अशा सगळ्या जय्यत तयारीनिशीं पॉलीन उभी होती. रेमंडचं एक बळकट काळं खेचरहि असंच तयार केलं गेलं होतं. आम्हीं शिंगाड्यांत बंदुकीची दारू घट्ट भरून घेतली. आणि स्वार झालों.

"मी लारामीच्या किल्ल्यावर तुला एक ऑगस्टला भेटेन." मी शॉला म्हणालों.

शॉ उत्तरला, "म्हणजे त्यापूर्वी आपण भेटलों नाहीं तर. एक दोन दिवसांतच तुझ्यामागं यावं असा माझा बेत आहे."

शॉनं म्हटल्याप्रमाणें प्रयत्नहि केला. त्याचा प्रयत्न यशस्वी झाला असता, परंतु वाटेंत इतकीं संकटं आलीं कीं त्याच्या निग्रही वृत्तीलाहि हार खावी लागली. मी गेल्यानंतर दोन दिवसांनींच त्यानं गाड्या आणि सामान बरोबर घेऊन डेस्लॉरिअर्सला लारामीच्या किल्ल्यावर पाठवलं आणि तो हेन्री शॅटिलॅांबरोबर रॉकी पर्वताच्या दिशेनं निघाला. परंतु वाटेंत प्रचंड वादळ झालं आणि मार्ग दिसेनासा झाला. डोंगरांच्या पायथ्याशीं त्यानं तळ ठोकला. कुठल्या दिशेनं जावं हेंच त्यांना कळेना. सकाळीं उठून पहातो तर एका विषारी झुडपामुळं आपल्याला विषबाधा झाली असल्याचं शॉच्या लक्षांत आलं. या परिस्थितींत पुढं प्रवास करणं शक्य नव्हतं. तेव्हां शॉ आणि हेन्री नाइलाजानं लारामीच्या किल्ल्याकडे परत वळले. विषबाधेच्या या आजारांत शॉला किल्ल्यांत एक आठवडा पडून रहावं लागलं. बरा झाल्यावरहि तो किल्ल्यांतच होता—नंतर मी त्याला तिथंच गाठलं.

आतां मी माझ्या प्रवासाच्या हकीगतीकडे वळतों. मी आणि रेमंडनं आमच्या सगळ्या मित्रांशीं हस्तांदोलन करून निरोप घेतला. माळ ओलांडत, रेताड घळी पार करीत, शेवटीं आम्हीं एका उंचवरच्यावरच्या माळावर आलों. इथलं दृश्य इतकं विपण्ण करणारं होतं कीं त्या माळाला शाप देऊन देखील त्या विषण्णतेंत भर घालतां आली नसती. तुटक कडे, खोल रेताड घळी, विस्तीर्ण माळ असं तें दृश्य होतं. पण हें सगळं सूर्याच्या असह्य उन्हानं भाजून निघत होतं, लखलखत होतं.

इतक्या उन्हामुळेंच कीं काय हा सगळा प्रदेश अनेक घळींत भेगाळला होता. या घळ्यांचा बराच अडथळा आमच्या प्रवासांत आला. या घळींच्या दोन्हीं बाजूला पांढरी रेती होती. त्यांच्या पायथ्याशीं अस्वलांचे माग उमटलेले दिसत होते. या भागांत जितकीं अस्वलं आढळतात तितकीं इतरत्र दिसत नाहींत. टेकड्यांवरची चढण खडकांसारखी कठीण होती आणि वाटेंत गोटे विखुरलेले होते. एखाद्या घळीच्या कडेशीं आपल्या ओबडधोबड फांद्या पसरून एखादा पाईन वृक्ष उदास भासत उभा असे. या प्रदेशाच्या एकसुरी वैराणपणांत थोडा वेगळेपणा निर्माण होई तो या वृक्षामुळें. त्या वृक्षाचा विशिष्ट वास येतांच न्यू इंग्लंडमधल्या पाईन वृक्षांनीं झाकलेल्या डोंगरांची मला आठवण झाली. मी तहानेनं इतका व्याकुळ झालों होतों कीं न्यू इंग्लंड-मधल्या डोंगरांतले पांढरं शुभ्र पाणी उधळणारे ते अनेक धवधवे, झरे माझ्या डोळ्यांसमोर स्वप्नासारखे तरळूं लागले. सावल्यांनीं झाकलेल्या खडकांवर आदळणाऱ्या त्या पाण्याची खळखळ मला ऐकूं येऊं लागली. खडकांच्या भेगांतून झिरपणारा तिथल्या पाण्याच्या त्या धारा मला दिसूं लागल्या. हिरव्यागार शेवाळावर टपटपणारे थंडगार थेंब मीं पाहिले...

दुपारीं चालतां चालतां वाटेंत आम्हांला एक लहानसा झरा दिसला. झऱ्याच्या बाजूलाच थोडीं झाडं आणि झुडपं होतीं. आम्ही तासभर विश्रांति घेतली. मग सूर्याच्या अनुरोधानं आम्ही प्रवास सुरू केला. मावळतीच्या सुमाराला बिटर कॉटनवुड या झऱ्यापाशीं आम्ही आलों. झऱ्याच्या कांठाशीं झुडपांची दाटी होती. अधूनमधून वादळानं झोडपलेले वृक्षहि दिसत होते. अशाच एका झाडाच्या खालीं आम्ही आमची खोगिरं टाकलीं आणि घोड्यांना पायबंध बांधून त्यांना चरायला सोडलं. पांढऱ्या शुभ्र वाळूतून तो स्वच्छ आणि चपळ झरा झुळझुळ आवाज करत वहात होता. लहान लहान पक्षी पाण्यांत

आंघोळ करीत होते. त्यांच्या किलबिलाटानं हवा भरून गेली होती. लारामी पर्वताच्या मागच्या क्षितिजावर सोनेरी किरमिजी ढग ओथंबले होते. या ढगांत उभा असलेला सूर्य हळूहळू बुडत होता. पाण्याच्या बाजूलाच एका ओंडक्यावर बसून मी पाण्यांतल्या माशांची अस्वस्थ चंचल हालचाल पहात होतों. आश्चर्य असं कीं सकाळपासून मला माझी शक्ति वाढल्यासारखं वाटत होतं, माझी प्रकृति पूर्वीप्रमाणं होते आहे असंच जवळ जवळ मला वाटलं.

आम्ही शेकोट्या पेटवल्या. रात्र झाली. लांडग्यांनी कुई घालायला सुरवात केली. आधीं एक लांडगा कुई घाली, आणि जंगलांतून, माळावरून इतर लांडगे त्याला साथ देत. गवताळ प्रदेशांत अशा तऱ्हेच्या आवाजांनीं झोपमोड मुळींच होत नाहीं. माझी घोडी आणि रेमंडचं खेचर यांना आम्हीं खुंटांना बांधलं आणि दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत गाढ झोपी गेलों. सकाळीं या दोन्ही जनावरांना आम्हीं पायबंध घालून प्रवासाला निघण्यापूर्वी एक तासभर चरायला सोडलं. आमची न्याहारीची तयारी चालू होती. इतक्यांत अर्ध्या मैल अंतरावर रेमंडनं एक काळवीट पाहिला. त्याच्या मागं जाऊन शिकार करण्याची परवानगी तो माझ्याकडे मागू लागला.

मी त्याला म्हणालों, "या जनावरांकडे लक्ष ठेवणं हें तुझं मुख्य काम आहे. आजारामुळें मी इतका अशक्त झालों आहें कीं या जनावरांवर कुणी हल्ला केला तर मी कांहीं करूं शकणार नाहीं आणि म्हणूनच जनावरं चरायला सोडलेलीं असतांना तूं तंबूतळापासून फार दूर जाऊन चालायचं नाहीं."

तंबूतळापासून फार दूर न जाण्याचं रेमंडनं मला वचन दिलं आणि तो हातांत बंदूक घेऊन काळविटांच्या मागावर निघाला. माझी घोडी आणि त्याचं खेचर झरा ओलांडून पलीकडच्या कांठावर वाढलेल्या गवतावर चरत होतीं. तिथल्या त्या गवतांत हिरव्या डोक्याच्या मोठाल्या माशा होत्या. त्या माशा चरतांना त्यांना फार सतावत होत्या. मी त्यांच्याकडे पहात होतों. थोड्या वेळानं पॉलीन व तें खेचर एका घळींत शिरलीं. बराच वेळ झाला तरी हीं दोन जनावरं दिसेनात, तेव्हां मी जाग्यावरून उठलों आणि झरा तुडवून त्यांना पाहण्यासाठीं निघालों. पहातों तर काय पायबंध तोडून पॉलीन भरधांव पळत सुटली होती आणि पायबंध असलेलं ते खेचर लंगडत लंगडत पॉलीन मागून धावत होतं. रेमंडला परत बोलवण्यासाठीं मी हवेंत बंदुकीचा बार काढला. कांहीं वेळानं रेमंड झरा तुडवून माझ्या दिशेनं धांवत येत असतांना

मीं पाहिला. त्यानं डोक्यावर रुमाल बांधला होता. पळून जाणारीं तीं दोन्ही जनावरं मीं त्याला दाखवलीं आणि त्यांचा पाठलाग करायला सांगितलं. हातांतली रायफल हलवीत तो जोरांत धावत सुटला. मी टेकडीच्या माथ्यावर गेलों आणि पाहूं लागलों. दूरच्या माळावर पळणारीं हीं दोन्ही जनावरं मला दिसत होतीं. थकलेल्या अवस्थेंत काळजी करीत मी पुन्हां आमच्या शेकोटीपाशीं आलों आणि झाडाखालीं बसलों. तासामागून तास जात होते. झाडाची एक निखळलेली साल वारा आला कीं हलून फटफट आवाज येई. डांसाची कंटाळवाणी भुणभुण चाललेली होती. या दोन आवाजांखेरीज तिसरा आवाज तिथं ऐकूं येत नव्हता.

सूर्य हळूहळू वर चढत होता. आतां चांगलीच दुपार झाली असल्याचं मला जाणवूं लागलं. पळून गेलेलीं जनावरं परत हातीं लागतील असं मला वाटेना. तीं जनावरं जर मिळालीं नसतीं तर माझी परिस्थिति मोठी कठिण होणार होती. मी शॉचा निरोप घेतला त्याच्या दुसऱ्या दिवशीं सकाळींच शॉ निघणार होता. पण कोणत्या दिशेनं जावं हें त्यानं ठरवलं नव्हतं. त्यामुळें त्याला गाठण्याचा प्रयत्न करण्यांत अर्थ नव्हता. आम्हीं होतों तिथून लारामीचा किल्ला चाळीस मैल अंतरावर होता आणि माझी त्यावेळीं तर अशी परिस्थिति होती कीं मोठ्या कष्टानं मी कसाबसा मैलभर चालूं शकलों असतों. प्रचंड संकटं आलीं कीं आपण नमतं घ्यावं हें तत्त्वज्ञान मी त्यावेळीं शिकलों नसल्यानं कांहींहि झालं तरी रेड इंडियनांचा शोध घेण्याचा बेत रद्द करायचा नाहीं असंच मीं ठरवलं. त्यावेळीं मला फक्त एकच योजना सुचत होती आणि ती म्हणजे रेमंडला घोडे आणण्यासाठीं लारामीच्या किल्ल्यावर पाठवणं. तो प्रवास करून यायला त्याला तीन दिवस लागले असते परंतु धोकेबाज रेड इंडियनांनीं भरलेल्या त्या प्रदेशांत तीन दिवस एकटं रहाणं हें कांहीं फारसं व्यवहार्य नव्हतं. शिवाय, या योजनेमुळें रेड इंडियनांना गांठायचा माझा बेत लांबणीवर पडत होता.

या गोष्टींचा विचार करीत मी बसलों होतों. मला खूप भूक लागली. चार-पांच पौंड पीठ सोडल्यास आमच्याजवळचा शिधा संपला होता. कांहीं शिकार मिळते किंवा काय हें पहावं म्हणून मी उठलों. पांच मोठे कल्यू पक्षी माझ्या डोक्यावरून उडत गेले. त्यांच्याखेरीज कुठंच कांहीं दिसत नव्हतं. तेव्हां मी त्या पांचांपैकीं दोघांना खालीं पाडलं. ते पक्षी घेऊन मी आमच्या शेकोटीकडे परतत होतों. वाटेंत एक आश्चर्य वाटावं असं दृश्य मला दिसलं.

माणसाच्या डोक्यासारखं दिसणारं कांहींतरी झुडपांच्या मागं मला दिसलं आणि अचानक अदृश्य झालं. त्या प्रदेशांत प्रत्येक परका मनुष्य हा संभाव्य शत्रू असतोच. हें लक्षांत घेऊन त्या झुडपामागच्या आकृतीच्या दिशेनं मी माझ्या रायफलची नळी रोखली. कांहीं क्षणांत त्या झुडुपांत जोराची हालचाल झाली. दोन डोकीं दिसूं लागलीं पण तीं माणसांचीं नव्हतीं. दिसलेलीं तीं डोकीं पाहून मला विलक्षण आनंद झाला. कारण माझ्यासमोर पॉलीन आणि तें खेचर उभं होतं. रेमंड खेचरावर बसलेला होता. विलक्षण थकल्यामुळं त्याचा चेहेरा पांढराफटक पडला होता. आपल्या छातींत फार दुखत असल्याचं त्यानं सांगितलं. मी जनावरं ताब्यांत घेतली. रेमंड झऱ्याच्या कांठाशीं वाकून पाणी पिऊं लागला. लारामीच्या साईड फोर्ट या फाट्यापर्यंत म्हणजे जवळ-जवळ दहा मैलपर्यंत त्यानं त्या जनावरांचा पाठलाग केला होता. साईड फोर्टपाशीं मोठ्या प्रयासानं त्यानं त्यांना पकडलं. त्याच्या हातांत रायफल दिसत नव्हती. रायफल कुठं आहे असं मी विचारलं तेव्हां तो म्हणाला कीं धावतांना अडथळा होऊं लागला म्हणून मी रायफल वाटेंतच ठेवली. परत येतांना शोधण्याचा मी खूप प्रयत्न केला पण ती मिळेना. रायफल हरवणं हें आम्हांला परवडण्यासारखं नव्हतं. परंतु त्याक्षणीं मी या गोष्टीचा फारसा विचार केला नाहीं. कारण जनावरं घेऊन पळून जाण्याची शक्यता असतांनासुद्धा रेमंड निष्ठापूर्वक परत आला होता. या गोष्टीचा मला खूप आनंद झाला होता. मी रेमंडला चहा करून दिला. त्याला सांगितलं कीं तूं दोन तास विश्रांति घे आणि मग आपण पुढं निघूं. त्या दिवशीं त्यानं कांहीं खाल्लं नव्हतं. परंतु भूक लागली नसल्यामुळें तो तावडतोब झोपीं गेला. मी गवताचा चांगला कोपरा पाहून तिथं खुंट ठोकले आणि पॉलीनला आणि त्या खेचराला बांधून ठेवलं. माशा त्यांना फार सतावतील म्हणून मी कांहीं ओलीं झुडपं पेटवून त्यांचा धूर केला. मी परत येऊन झाडाखालीं बसलों. हळूंहळूं सरकणाऱ्या सूर्याकडे मी पहात होतों; गेलेला प्रत्येक क्षण आठवून कुरकुरत होतों.

दोन तास संपल्यानंतर मी रेमंडला उठवलं. स्वार होऊन आम्ही निघालों. प्रथम आम्ही रायफल शोधण्याच्या उद्योगाला लागलों. नशिबानं तासाभरांतच ती मिळाली. मग आम्हीं पश्चिमेकडे वळून ब्लॅक हिल्सच्या दिशेनं हळूहळू निघालों. सूर्यासमोर एक मोठा ढग आलेला असल्यामुळें उन्हाचा आम्हाला त्रास झाला नाहीं. इतक्यांत हवेंत गारवा वाटूं लागला. दूरचे डोंगरकडे

अधिकच विषण्ण वाटूं लागले. वादळाची हलकी गुरगुर ऐकूं येऊं लागली. तुटक शिखरांच्या मागें दाट काळे ढग जमा होऊं लागले. सुरवातीला दुपारच्या सूर्यामुळें या ढगांना चांदीची झालर लावल्यासारखे ते दिसत होते. पण हळूहळू या ढगांचा काळेपणा आकाशांत पसरूं लागला. आजूबाजूचा सगळा वैराण प्रदेश या काळेपणानं गुरफटला गेला. वादळ घुमूं लागलं. त्या आवाजांत एक प्रकारची भीतिदायक भव्यता होती. काळ्याभोर सांवल्यांनीं डोंगर आणि माळ झांकले गेले. डोळे दिपवणारी वीज कडकडूं लागली. पाण्याचे लोंढे आमच्या दिशेनं घोंगावूं लागले. पंचमहाभूतांच्या या निर्दय लीलांकडे पहात रेमंड शिव्या घालत होता. जवळपास कुठंच आसऱ्याला जाण्याची सोय नव्हती. थोड्याच वेळांत समोरच्या माळाला धाव लागल्यासारखी असलेली ऐक खोल घळ दिसली. या घळीच्या मध्यभागीं एक मोठा पाईन वृक्ष दिसत होता. आम्हीं तिथं जाऊन त्या पाईन वृक्षाच्या ओबडधोबड फांद्यांचा आडोसा करून उभे राहिलों. बाजूच्याच एका लहानशा खडकाला आम्हीं जनावरांना बांधून ठेवलं. मला वाटतं जवळजवळ तासभर आम्हीं तशा अवस्थेंत तिथं होतों. धबधब्यासारखा पाऊस कोसळत होता. पावसाच्या त्या प्रचंड माऱ्यामुळें आजूबाजूचे खडक आणि दऱ्या दिसत नव्हत्या असं म्हटलं तरी चालेल. हळूहळू वादळाचा जोर कमी झाला. परंतु पाऊस सारखा कोसळत होताच. शेवटीं रेमंड कंटाळला. तो सरपटत घळीच्या माथ्यावर आला आणि पलीकडे पाहूं लागला.

झाडाखालीं बसल्याबसल्याच मी त्याला विचारलं, “हवेचा रंग कसा काय दिसतो?”

“वाईट आहे. सगळीकडे काळोख.” असं म्हणून रेमंड खालीं उतरला आणि माझ्या शेजारीं येऊन बसला. दहा मिनिटांनीं मी त्याला पुन्हां वर पाठवला. तो वर चढून गेल्यानंतर विचारलं, “कसा काय रंग आहे?”

“आहे तसाच आहे—पलीकडच्या डोंगरमाथ्यावर मला एक पांढरा छोटा ठिपका दिसतोय् एवढंच.”

एव्हांना पावसाचा जोर कमी होऊं लागला होता. आम्हीं गुडघ्यापर्यंत पाण्यांत असलेल्या जनावरांना सोडवलं आणि खडकांतून वाट काढीत वरच्या माळावर गेलों. सगळं वातावरण धूसर दिसत होतं. डोंगरमाथ्यावर तो दिसत असलेला ठिपका हळूहळू मोठा होत होता आणि त्याला तांबूस झांक आली

होती. कांहीं वेळानं ढग बाजूला झाले आणि कड्यांवरून घसरत सूर्यकिरणांचा लोंढा खालीं आला. डोंगरांच्या टेकड्या वसंतऋतूंत ॲपेनाईन पर्वतावर दिसतो तसल्या नाजूक निळ्या रंगांत गुरफटल्या गेल्या. दुष्ट पिशाच्चांचा सैन्याचा धुव्वा उडावा तसे सगळे ढग नाहींसे झाले. भोंवतीचा माळ सूर्याच्या किरणांत तरंगूं लागला. उत्तरेपासून दक्षिणेकडे इंद्रधनुष्यानं कमान घातली होती. दूरवर झाडांचा समूह आम्हांला दिसला. तीं झाडं जणूं विश्रांति घेण्यासाठीं आम्हांला बोलावत होतीं. आम्हीं तिथं पोंचलों. सप्तरंगी पाण्याचे थेंब त्या झाडावर लकाकत होते. पक्ष्यांच्या पंखांचे आवाज आणि त्यांचा किलबिलाट यांनीं तिथलं वातावरण जिवंत झालं होतं. पावसामुळें सुन्न झालेले चित्रविचित्र पंखांचे किडे झाडांच्या बुंध्यांना आणि पानांना चिकटून बसले होते.

रेमंडनं मोठ्या प्रयासानं शेकोटी पेटवली. सभोंवतीं उगवलेल्या समृद्ध गवतांत आमची जनावरं चरायला गेलीं. मी अंगाभोंवती ब्लॅंकेट गुंडाळून पडलों आणि संध्याकाळच्या त्या दृश्याकडे पाहूं लागलों. कांहीं तासांपूर्वी उग्र विषण्ण दिसणारे ते डोंगर सहानुभूतीच्या स्मितानं उजळल्यासारखे दिसत होते. माळावरचं गवत ऊबदार सूर्यप्रकाशानं आनंदून डोलत होतं. मी भिजलों होतों, आजारी होतों, अगदी थकून गेलों होतों. परंतु त्या निसर्ग दृश्याकडे पाहतांना माझं मन हलकं झाल्यासारखं मला वाटलं. त्या दृश्यांत शुभशकुनाची प्रचीति मला येऊं लागली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्हीं उठलों. भिजण्याचा माझ्यावर कांहींच परिणाम झाला नव्हता. परंतु रेमंड मात्र जोरानं खोकत होता. आम्ही स्वार झालों, झरा तुडवून, झाडांतून वाट काढून पलिकडच्या माळावर गेलों. आतां आम्ही वाटेंत कुठं रेड इंडियनांच्या पावलांचा माग दिसतो आहे किंवा काय तें पहात हळूहळू जात होतों. दुर्दैवानं आजूबाजूला तीन चार इंच उंचीचं सुरकुतलेलं गवत होतं आणि जमीन इतकी कठीण होती कीं अनेक लोक तिच्यावरून गेले असते तरी त्यांचा माग तिथं उमटणं शक्य नव्हतं.

कडे चढत आणि उतरत, घळी पार करीत आम्हीं प्रवास पुढं चालू केला. एका टेकडीच्या पायथ्याशीं आम्हीं आलों. रेमंड कांहीं गज माझ्यापुढं होता. त्यानं एकदम लगामाला हिसका दिला. आणि तो खेचरावरून खालीं उतरला. हळूहळू सरसपटत तो बाजूच्या घळींत गेला थोड्या वेळानं त्याच्या रायफलचा बार ऐकला. जखमी झालेला एक काळवीट लंगडत लंगडत तिथं आला. मी पॉलीनला चाबकाचा फटका दिला आणि त्या काळविटाच्या मागं गेलों. चपळ

पॉलीननं थोड्याच वेळांत त्या काळविटाला गांठलं. उड्या मारून पळून जाण्याचा व्यर्थ प्रयत्न कांहीं वेळ त्या काळविटानं केला पण नंतर पळून जाणं अशक्य आहे ही जाणीव होऊन तो काळवीट स्तब्ध उभा राहिला. त्यानं आपले चमकणारे डोळे माझ्या डोळ्यांना भिडवले. त्याच्या त्या डोळ्यांत विलक्षण कारुण्य होतं. माझं मन सारखं मागं घेत होतं. पण तरीहि मन आवरून त्याच्या डोक्यावर नेम धरून पिस्तुल झाडलं. रेमंडनं सुरा काढून कापाकापी केली. चार तुकडे करून आम्ही ते घोड्यावर लादले आणि पुढं झालों. आमची अन्नाची तरतूद संपत आली होती. अशा वेळीं काळविटाची ही शिकार मिळाल्यामुळं मला फार आनंद झाला.

आम्ही टेकडीच्या माथ्यावर गेलों. लारामीच्या ओढ्याच्या कांठानं उगवलेलीं झाडं आणि माळाच्या टोंकाला उभ्या असलेल्या क्षितिजावर दाटलेले ढग आम्हांला दिसूं लागले. दुपार होण्याच्या आंत आम्हीं ओढ्याचा कांठ गांठला आणि पुन्हां रेड इंडियनांच्या पाऊलठशांचा शोध होऊं लागलों. हा शोध घेत झऱ्याच्या कांठानं आम्हीं अनेक मैल पुढं गेलों. कधीं कांठावर तर कधीं पाण्यांत असें आम्ही चालत होतों. प्रत्येक वाळूची टेकडी आणि चिखलाची जमीन आम्ही तपासून पाहिली. रेड इंडियनांचा माग काढत आम्ही इतके पुढं आलों कीं आम्हाला हवा असलेला माग मागेंच कुठंतरी आमच्या डोळ्याआड तर राहिला नाहींना अशी शंका मनांत येऊं लागली.

शेवटीं मला रेमंडनं हांक मारलेली ऐकूं आली. खेचरावरून खालीं उतरून तो त्या भुसभुशीत काठावर कसली तरी तपासणी करत होता. मी त्याच्याजवळ जाऊन पाहूं लागलों. रेड इंडियनाच्या पायांतल्या जोड्यांचा तो ठसा होता. उत्तेजित होऊन आम्हीं आमचा शोध पुढं चालू केला. कांहीं वेळानं माणसांच्या आणि मुलांच्या पावलांचे अर्धा डझन ठसे मला दिसले. एक छोटासा झरा पलिकडच्या कांठावरून या प्रवाहाला मिळत होता. या झऱ्याच्या मुखाशीं दक्षिणेच्या बाजूनं रेमंड शिरला. पाणी तुडवून तो पुढं झाला थोड्या वेळानं त्यानं हांक मारून मला बोलावलं. झऱ्याच्या कांठाशीं तीनचार घोड्यांच्या खुरांचे उमटलेले ठसे रेमंड खालीं वाकून पहात होता. आजूबाजूचीं झुडपं चेपलेलीं दिसत होतीं. ओढत नेलेल्या तंबूच्या काठ्यांच्या रेघोट्या उमटल्या होत्या. अनेक पावलांचे ठसेहि दिसत होते. आम्हांला रेडइंडियनांचा माग सांपडला होता हे निश्चित. झुडपांतून वाट काढत मी पलीकडच्या माळावर

आलों. जवळजवळ दीडशें विझलेल्या शेकोट्या तिथं होत्या. हाडं आणि गव्यांच्या कातड्यांचे तुकडे आजूबाजूला पडले होते. घोडे बांधण्यासाठीं रोवलेले खुंट तसेच उभे होते. आम्हांला मिळालेल्या या यशामुळें आमचा उत्साह वाढला होता. जनावरांना चरायला सोडून आम्हीं भोजनसिद्धीला लागलों. काळविटाची शिकार मिळालेलीच होती. त्यामुळें हा कार्यक्रम व्यवस्थित होणार होता.

प्रवासांतले कष्ट आणि तें उघड्यावरचं आयुष्य मला चांगलंच मानवलं होतं. ल बॉंतेचा तळ सोडल्यापासून माझी प्रकृति सुधारली होती आणि ताकदहि वाढली होती. रेमंडने आणि मी जेवण उरकलं. रेड इंडियनांच्या मागाचं एक टोंक सांपडल्यामुळं दुसरं टोंक 'आतां आम्हीं लवकरच शोधून काढूं' असं उत्साहाच्या भरांत आम्हीं धरून चाललों होतों. परंतु माग शोधीत आम्हीं पुढच्या प्रवासाला सुरवात केली तेव्हां दुर्दैवाचा पाठलाग अजून संपलेला नाहीं याची मला जाणीव झाली. मी पॉलीनवर खोगीर चढवत असतांनाच तिचे डोळे खूपच जड झाल्यासारखे मला जाणवले. तिचा पिवळट रंगहि कांहींसा काळवंडलेला दिसत होता. थोडंसं चालून गेल्यावर ती खालीं कोसळली आणि कुशीवर पडली. मोठ्या प्रयासानं आम्ही तिला उभं केलं. मान खालीं टाकून ती उभी राहिली. तिला साप चावला, एखाद्या झुडुपामुळं विषबाधा झाली किंवा कसला तरी आजार तिला सुरू झाला हें आम्हाला निश्चितपणें सांगतां येईना. परंतु ऐन वेळीं हें झाल्यामुळें दुर्दैव उभं राहिल्यासारखं आम्हांला वाटल. मी तिच्यावर स्वार झालों आणि तिला हळूहळू पुढं चालवत रेड इंडियनांचा माग काढूं लागलों.

रेड इंडियनांचा पाऊलखुणांवरून पुढं जातां जातां आम्हीं एका उंच टेकडी-वरून उतरून निर्मनुष्य माळावर आलों. इथं जमीन कठीण असल्यामुळें पाऊस ठसे कुठं दिसेनात. जे कांहीं थोडे उमटले होते ते आदल्या दिवशींच्या पावसानं धुपून गेले होते. रेड इंडियन लोकांची वस्ती बेशिस्तपणें अर्ध्या मैलाच्या अंतरावर पसरलेली असते. त्यामुळें त्याचा माग कुठंहि स्पष्ट उमटलेला नसतो आणि म्हणूनच अशा वेळीं तो शोधून काढणं अतिशय दगदगीचं आणि कठीण असतं. आमच्या नशिबानं कांहीं अंतरावर आम्हांला बरीचशी मुंग्यांची वारुळं दिसलीं. घोड्यांनीं आणि माणसांनीं तुडवून तीं फुटलीं होतीं. ओढत नेलेल्या तंबूच्या काठ्यांच्या रेघोट्या कांहीं वारुळांवर उमटल्या होत्या. आजूबाजूला असलेलीं हिरवीगार निवडुंगाचीं झुडपं अशींच चेपलीं-

मोडलीं गेलीं होतीं. एकएक इंच करीत आम्हीं पुढं जात होतों. मध्येंच हा माग नाहींसा होई आणि कांहीं वेळानं पुन्हां अचानक दिसूं लागे. दुपार टळून गेल्यानंतर आम्हीं चुकीच्या वाटेला आल्याचं आम्हांला कळलं. आम्हीं एकटे उभे होतों. कुठल्या बाजूनं जावं याचा अंदाज येत नव्हता. कोसच्या कोस माळ पसरला होता. उत्तरेपासून दक्षिणेकडे डोंगरकड्यांच्या पसरलेल्या रांगा दिसत होत्या. उजव्या बाजूला सर्व टेकड्यांच्यावर डोकं काढून उभा असलेला लारामीचा डोंगर आम्हांला दिसला. त्याच्याजवळच असलेल्या उतारावरच्या एका घळींत पांढऱ्या शुभ्र धुराचे लोट संथपणें वर जात असलेले आम्हीं पाहिले.

रेमंड म्हणाला; "तो धूर दिसतोय तिकडे जाऊं या. कदाचित् तिथं रेड इंडियनांचा तळ असेल." परंतु हा निर्णय असा चटकन् घेण्याजोगा नव्हता. शेवटीं आम्हीं त्या धुराच्या दिशेनं न जातां पूर्वीप्रमाणेंच रेड इंडियनांचा माग काढीत पुढं जायचं ठरवलं. आम्हीं हा निर्णय घेतला हें आमचं दुर्दैवच म्हटलं पाहिजे. कारण आम्हांला नंतर रेड इंडियनांनीं दिलेल्या माहितीवरून कळलं कीं क्रो जमातीचे योद्धे मुद्दामच आग पेटवून तसा धूर करतात. फसवण्यासाठीं त्यांनीं तें टाकलेलं जाळंच असतं.

संध्याकाळ झाली होती. डोंगराच्या पायथ्याशीं गेल्याखेरीज पाणी किंवा सर्पण मिळणं शक्य नव्हतं. तेव्हा आम्ही लारामीचा ओढा जिथं माळावर उतरतो त्या दिशेनं निघालों. आम्हीं तिथं जाऊन पोंचलों तेव्हां आजूबाजूच्या डोंगरांचे माथे सूर्यप्रकाशानं उजळलेले दिसत होते. घळीच्या काळोख्या तुरुंगांतून बाहेर पडून जणूं काय लारामीचा प्रवाह संतप्त वेगानं वहात होता. त्या डोंगरांच्या आणि उसळत्या पाण्याच्या सान्निध्यांत मन प्रसन्न उत्तेजित करून टाकणारं असं कांहींतरी होतं. कांठाच्याजवळच कुरण होतं. कुरणाच्या भोंवतीं कड्यांचा तट होता. तिथं राहून आम्हीं जर शेकोटी पेटवली असती तर कड्यांच्या संरक्षणामुळें ती कोणाला दिसली नसती. गेल्या हिंवाळ्यांत डाकोटांनीं तिथं ठोकलेल्या तळाच्या अनेक खुणा तिथं होत्या.

आम्ही झोपलों आणि दुसरे दिवशीं सूर्य उगवेपर्यंत जागे झालों नाहीं. एका मोठ्या खडकाच्या मागें पाण्याचा भोवरा तयार झाला होता. मला अनावर मोह झाला. मी कपडे काढले आणि त्या पाण्यांत उडी घेतली. एकटां त्या प्रवाहाच्या जोरांत मी वाहूनहि जाणार होतों, परंतु पाण्यांतील झुडुपांची मुळं मी घट्ट धरून ठेवलीं आणि कांठावर आलों. आंघोळीमुळें मला अतिशय प्रसन्न वाटलं. माझी

प्रकृति सुधारली आहे असा माझा गैरसमजहि झाला. परंतु थोड्या वेळांत स्वार होऊन आम्हीं जेव्हां प्रवास सुरू केला तेव्हां आंबोळीमुळं आलेली ही तात्पुरती तरतरी नाहींशी झाली. पुन्हा मला अतिशय गळून गेल्यासारखं वाटूं लागलं. मी कसाबसा घोडीवर मांड घालून बसलों होतों.

रेमंड म्हणाला, "ती पलीकडे घळ दिसते का? रेड इंडियन लोक इथून जर गेले असतील तर ते या घळींतूनच गेलेले असणार."

डोंगराचा कपचा उडाल्यासारखी ती घळ होती. आम्हीं तिथं जाऊन पोंचलों. तिथं एका मुंग्याच्या वारुळावर ओढीत नेलेल्या तंबूच्या काठ्यांच्या रेघोट्या दिसल्या. एवढी ही खूण पुरे होती. रेड इंडियन लोक इथूनच गेलेले असणार हें निश्चित. आम्हीं थोडे पुढं होतांच तुडवलीं गेलेलीं झुडपंहि आम्हांला दिसलीं. खडक ओलांडत आम्हीं जवळजवळ दोन तास प्रवास करीत होतों. रेमंड माझ्यापुढं कांहीं गज होता. आम्ही एका खोल खिंडीच्या टोकाशीं आलों. खिंडीचं तें सगळ्यांत उंच टोक होतं. पॉलीन कांहीं यार्ड मोठ्या कष्टानं पुढं गेली. परंतु पुढं चढून जाणं अशक्य झाल्यानं ती थांबली. मी खालीं उतरून तिला रेटण्याचा प्रयत्न केला. परंतु मी अतिशय थकल्यामुळं मला तिला पुढं रेटणं जमेना. तेव्हां मी तिच्या गळ्यांतल्या दोराचं एक टोक माझ्या हाताभोंवतीं घट्ट गुंडाळून घेतलं आणि हातावर आणि गुडघ्यांवर सर-पटत चढूं लागलों. खिंडीच्या माथ्यावर आम्हीं आलों तेव्हां मी घामानं थबथबलों होतों. पॉलीन एकाद्या पुतळ्यासारखी बाजूला उभी होती. उन्हानं भाजून निघालेल्या खडकावर पॉलीनची सावली पडली होती. त्याखेरीज इतरत्र कुठंहि सावलीचा मागमूस दिसत नव्हता. मी इतका थकलों होतों कीं मला चालवत नव्हतं. तेव्हां पॉलीनच्या त्या लहानशा सावलींतच मी पडून राहिलों. आजूबाजूच्या कड्यांचीं टोकं सुयांसारखीं दिसत होतीं. उन्हांत भाजून निघणाऱ्या त्या कड्यांवर शपथेलाहि एखादं झाड किंवा झुडूप नव्हतं. असह्य ऊन आग पाखडत होतं.

कांही काळ विश्रांति घेतल्यानंतर मी पुन्हां स्वार झालों आणि ती खिंड उतरून पश्चिमेकडे गेलों. तो क्षण अगदीं हास्यास्पद वाटावा असा होता. माणूस आणि घोडा दोघेहि सारखेच असहाय्य होते.

रेमंडच्या खेचराचा खोगीरबंध सैल होऊन सरकला. तो नीट बांधण्यासाठीं रेमंड खालीं उतरला. मी पुढं झालों. टेकडीच्या माथ्यावरून मी समोर पाहिलं

पलीकडच्या बाजूला मला सुखद दृश्य दिसलं. समोरील टेकड्यांच्यामध्यें हिरव्यागार कुरणाचा तुकडा दिसत होता. कुरणाच्या एका बाजूला झुडपं होतीं आणि दुसऱ्या बाजूला एक जुनाट खडबडीत पाईन वृक्ष होता. इतक्यांत टोळाचा किर्र आवाज मला ऐकू आला. न्यू इंग्लंडमधल्या शाळेंतले लहानपणाचे दिवस मला त्या आवाजामुळें आठवले. मी झुडपं ओलांडून थोडा पुढं चालून गेलों. पाण्याचा आवाज माझ्या कानीं आला. पॉलीन स्वतःच पुढं झाली आणि एका काळ्या खडकापाशीं उभी राहिली. हिरव्यागार पानांचं छत्र या खडकावर होतं. खडकाच्या एका बाजूनं थंडगार पाण्याची धार पलीकडच्या पांढऱ्याशुभ्र वाळूंत पडत होती. पाण्याला पुढं जायला वाट नसल्यानं तें पाणी त्या वाळूंतच जिरत होतं. मी पाण्याचा पेला भरून घेतला. बाजूला सांचलेल्या छोट्याशा तळ्यांत पॉलीननं आपलं डोकं बुडवलं. आमच्या अगोदर येऊन गेलेल्या सांबरं, हरिणं, अस्वलं, डोंगरांतल्या मेंढ्या इत्यादि प्रवाशांच्या खुणा दिसत होत्या. अस्वलाच्या पावलांच्या नखांची रांग वाळूंत उमटली होती. या डोंगरांतच कुठेतरी त्या अस्वलाची गुहा असावी.

झरा ओलांडून आम्हीं पुढं गेलों, तेव्हां आम्हांला एक लहानसं कुरण लागलं. हें कुरण डोंगरांनीं वेढलेलं होतं. या कुरणावर रेड इंडियनांचा माग उमटलेला पहातांच आम्हाला अतिशय आनंद झाला. रेमंडच्या सराईत डोळ्यांनीं कांहीं खुणांवरून जिथं रेनॉलनं आपला तंबू उभारला होता, घोडे बांधले होते, ती जागा शोधून काढली. मी रेमंडच्या जवळ येऊन त्यानं दाखवलेली जागा पाहूं लागलों. मी आणि रेनॉल यांच्यांत समान असा दुवा नव्हताच आणि म्हणूनच मी जेव्हा त्यांनीं पेटवलेल्या शेकोटीची राख, त्यांच्या तंबूची जागा न्याहाळूं लागलों तेव्हां मला आश्चर्यच वाटलं. आम्हीं दोघेहि युरोपियन वंशांतले होतों, हाच आमच्यांतला एकमेव नाजूक धागा होता.

अर्धा तास प्रवास केल्यानंतर आम्हीं डोंगराच्या वेढ्यांतून सुटलों आणि एका माळावर आलों. या निमर्नुष्य माळावर रानकुत्र्यांच्या वस्त्या होत्या. हे कुत्रे आपल्या बिळांच्या तोंडाशीं बसून आम्हीं तिथून जातांच आमच्या अंगावर जोरजोरानं भुंकूं लागले. तो माळ सहा मैल रुंद असावा; पण तो ओलांडायला आम्हांला दोन तास लागले. माळ ओलांडून पुढं गेल्यावर पुन्हां एक डोंगराची रांग आमच्यासमोर ठाकली. डोंगरावरच्या दाट झुडपांतूनच काळे कुळकुळीत उंच सुळके वरती आले होते. वादळाचे तडाखे

सोसल्यामुळें या कड्यांनां उग्र, भीतिदायक आकार घेतले होते. रेड इंडियनांचा माग शोधीत आम्ही एका अरुंद वाटेनं जाऊं लागलों तेव्हां हे कडे आमच्या डोक्यावर आले.

आमचा मार्ग दाट झाडांतून जात होता. डोक्यावरच्या फांद्यांतून ऊन-सावल्यांचं जाळं खालीं पडलं होतं. फांद्यांचा अडथळा चुकवण्यासाठीं आम्ही वाटेच्या अगदी कडेकडेनं चालत होतों. झाडांच्या पानांतून आम्हांला वेढून टाकणारे कडे दिसत होते. कड्यांच्या या वेढ्यांच्या मध्यें चौकोनी आकाराच्या काठ्यांनीं आणि लाकडांच्या ओंडक्यांनीं बांधलेल्या रेड इंडियनांच्या दोन गढ्या आम्हांला दिसल्या. या गढ्या बहुधा गेल्या वर्षी उभारल्या असाव्या. त्या जवळजवळ मोडकळून गेल्या होत्या. एका गढींत साधारण वीस माणसांची जागा होती. कदाचित् या गढींत त्या लोकांनीं आसरा घेतल्यानंतर शत्रूंनीं त्यांच्यावर हल्ला केला असेल. इतिहासांत न नोंदली गेलेली, जगाला अज्ञात अशी लढाई तिथं झाली असेल. त्या उग्र मुद्रेच्या खडकांनीं आणि त्या वादळांनं झोडपलेल्या झाडांनीं यानंतर पुन्हां असं युद्ध पाहिलं नसेल. इथं झालेल्या रक्तपाताच्या कांहीं खुणा असल्याच तर त्या या झुडपांनीं आणि उंच वाढलेल्या दाट गवतांनं झांकून टाकलेल्या असतील

आम्ही पुढं होतांच हळूहळू डोंगर दूर झाले. वाट अधिक मोकळी झाली आणि एका माळावर उतरली. या माळावर आम्हाला रेड इंडियनांनीं तळ टोकल्याच्या पुन्हां खुणा दिसल्या. बाजूला बरींच झाडं झुडपं होतीं. आम्हीं इथं थांबून तासभर विश्रांति घेतली. आम्हीं जेवणं उरकलीं. झाडाच्याखालीं पाईप पेटवून रेमंड धूम्रपान करीत बसला होता. अत्यंत गंभीर चेहेऱ्यानं तो पाईप ओढीत होता. मग माझ्याकडं पाहत त्यानं तोंडांतला पाईप काढला आणि आपण पुढं न जाणं हें बरं असं तो म्हणाला.

"कां नको?" मी विचारलं. तो म्हणाला, "यापुढें जाणं धोक्याचं आहे. कारण स्नेक, आरापाहो, ब्लॅकफूट या रेड इंडियनांच्या इडारल्यांत आपण सांपडून प्राणाला मुकण्याची शक्यता आहे. असं असलं तरी मी तुमच्याबरोबर कुठंहि यायला तयार आहे." असं सांगून रेमंडनं आपली निष्ठाहि व्यक्त केली. मीं त्याला जनावरं आणायला सांगितलीं. थोड्याच वेळांत स्वार होऊन आम्ही पुढं निघालों. थोडंसं पुढं गेल्यानंतर हें सगळं प्रकरण संशयास्पद आहे याची जाणीव मला झाली हें कबूल केलं पाहिजे. माझ्या शरीराची आणि मनाची

नेहमीची चिकाटी आणि एकादा काटक घोडा मला जर त्याक्षणीं कुणी देऊं केला असता तर त्याच्यावरून मीं सगळं जग ओवाळून टाकायला तयार झालों असतों.

कड्यांनीं आम्हांला वेढून टाकलं होतं. जसजसं पुढं जावं, तसतसे हे उंच कडे आमच्या अंगावर येत होते. आतांपर्यंतच्या प्रवासांत मीं पाहिली नव्हती इतकी एक खोल खिंड आम्हांला लागली, पायापासून माथ्यापर्यंत डोंगराला तडा जाऊन जणुं कांहीं ही खिंड तयार झाली होती. खिंडीच्या तळाहून आम्हीं जाऊं लागलों. दमट अंधारांतून आम्ही प्रवास करीत होतों. रेंव चिकटलेल्या खडकांवर घोड्यांच्या टापांचा आवाज येत होता. आमच्याबरोबर घोगऱ्या आवाजाचा एक झरा जणुं कांहीं रुसल्यासारखा येत होता. इथून बाहेर पडून आम्हीं एका मैदानावर आलों. हें मैदान कड्यांनीं वेढलेलं होतं. शांतता आणि एकांत यांचीं रूपं धारण करूनच जणुं कांहीं हे कडे उभे आहेत असं वाटे. या मैदानावरहि रेड इंडियनांनीं तळ ठोकल्याच्या खुणा दिसत होत्या. जो प्रवास आम्हीं एका दिवसांत केला, तो करायला त्यांना तीन दिवस लागले होते.

इथून बाहेर पडायचं म्हणजे कड्यांचे हे जिने चढून जाणं भाग होतं. मोठ्या प्रयासानं आम्हीं कड्यांच्या माथ्यांवर गेलों. तिथून पलीकडे पाहिलं तेव्हां आतां पुढं डोंगर आडवे येणार नाहींत हें आम्हांला कळलं. सर्वत्र विस्तीर्ण माळ पसरला होता. डाव्या हाताला एक टेकडी दिसत होती. या टेकडीच्या हिरव्या पृष्ठभागावर सरकणारे काळे ठिपके आम्हांला दिसले. तो उघडच गव्यांचा कळप होता. आम्हांला हा शुभ शकुनच वाटला. कारण ज्या अर्थीं तिथं गवे आहेत त्याअर्थीं आसपास कुठंतरी रेड इंडियनांची वस्ती असणार, असा अंदाज बांधायला हरकत नव्हती. म्हणजे त्याच दिवशीं रात्री-पर्यंत त्यांच्या वस्तीपर्यंत पोंचायला आम्हांला हरकत नव्हती. प्रवास संपवायची आम्हांला घाई लागली होती याचीं दोन कारणं होतीं. एक म्हणजे, आम्ही फार थकलों होतों. आणि दुसरं असं कीं दिवसा उजेडीं तिथं पोचण्यांत धोका कमी होता. परंतु जवळपास तळ ठोकणं तेवढं सुरक्षित नव्हतं. आम्हीं जातां-जातां सूर्यास्ताची वेळ झाली. सूर्य बुडायला अर्ध्या तासाचा अवकाश असेल नसेल. आम्ही एका टेकडीवर चढून, तळ ठोकण्यासाठीं सोईची जागा पाहूं लागलों.

सभोंवतालचा गवताळ प्रदेश खवळलेल्या समुद्रासारखा दिसत होता. गवतावर उंच लाटा आल्या कीं पिवळसर प्रकाशांत त्या गोठल्यासारख्या दिसत.

थोडंसं पुढं गेल्यानंतर आम्हांला एक हिरवं कुरण लागलं. बाजूलाच एक झरा होता. झऱ्याच्या आजूबाजूला छोटींछोटीं तळीं निर्माण झालीं होतीं. आम्ही या हिरव्या कुरणावर पोंचलों, आमचीं जनावरं चरायला सोडून आग पेटवली. काळवीटाचा थोडासा तुकडा शिल्लक होता तो आम्हीं आगीवर ठेवला. तो शेवटचाच तुकडा असल्यामुळें आम्ही खिन्न नजरेनं त्याच्याकडे पहात होतों. इतक्यांत एक मोठा ससा उड्या मारत आला आणि आमच्यापासून पन्नास यार्ड अंतरावर बसून आमच्याकडे पाहूं लागला. मी जराहि न विचार करतां माझी बंदुक उचलली. रेमंडनं मला आवरलं. बंदुकीचा आवाज रेड इंडियनांच्या कानीं गेला तर त्यांत धोका आहे असं तो म्हणाला. ज्यांच्या मागावर आम्ही होतों त्यांचाच आम्हांला धोका होता, ही मोठी गंमतीची गोष्ट होती. पण त्यांत अर्थ होता. त्याचं कारण असं कीं आगेमागें रेंगाळणाऱ्या एकाद्या रेड इंडियनाच्या टोळक्यानं जर आम्हांला पाहिलं असतं तर हे निष्ठावंत मित्र रात्रीच्या अंधारांत हळूच येऊन आमचे घोडे घेऊन पळाले असते. एवढ्यावरच सुटका झाली असती असं म्हणतां येत नाहीं—कदाचित् आमच्या कवटीवरची कातडीहि त्यांनीं केसासकट कापून नेली असती! पण असं आहे कीं गवताळ प्रदेशावर मनुष्य एकदां उतरला कीं भीतीचे चोचले फारसे पुरवणं त्याला शक्य नसतं. इतका सगळा धोका असूनहि माझ्या किंवा रेमंडच्या मनांत त्याचा विचार एकदोनदां देखील आला नसेल.

खोगीरांची उशी करून आम्ही आठ तास एकाद्या ओंडक्यासारखे झोपलों. मी जागा झालों तेव्हां पॉलीनंच पिवळट डोकं माझ्यावर झुकल्याचं मला दिसलं. मी तिच्याकडे नीट पाहूं लागलों. पॉलीनचे पाय बरेच खरचटले होते. परंतु तिचे डोळे आतां चांगले उजळ दिसत होते, आणि तिच्या हालचालींतहि अधिक तरतरी जाणवत होती. दोन दिवसांपूर्वीं तिला झालेला चमत्कारिक आजार आतां पूर्ण नाहींसा झाला होता. आम्हीं पुन्हां प्रवासाला सुरुवात केली. एका तासांत आम्ही रेड इंडियनांच्या वस्तीवर जाऊन पोचूं असा आमचा अंदाज होता. परंतु पुन्हां आमची कांहीं काळ निराशा झाली. कारण थोड्या अंतरावर लागलेल्या खडकाळ जमिनीवर त्या वस्तीचा माग कुठं दिसेना. आजूबाजूला आम्हीं बारीक नजरेनं तपासणी केली तेव्हां शेवटीं एकदांचा माग सांपडला. पुन्हां प्रवासाला सुरुवात झाली.

"त्या पलीकडच्या माळावर काळा ठिपका कसला दिसतोय्?"

"बहुतक मेलेला गवा असावा." रेमंड म्हणाला.

आम्ही जवळ जातांच तो एका भल्या मोठ्या गव्याचा सांगाडा असल्याचं आम्हांला दिसून आलं. इथून जातांना रेड इंडियनांनीं वाटेंत त्याची शिकार केली असावी. त्या गव्याचे जटा झालेले केस आणि त्याच्या कातड्याचे तुकडे आजूबाजूला विखुरले होते. रेड इंडियनांनीं कापाकापी करून ते पुढं गेल्यानंतर सांगाड्याला चिकटून जें कांहीं राहिलं त्यावर लांडग्यांनीं ताव मारला होता: त्यांनीं तो सगळा सांगाडा पोकळ करून ठेवला होता. काळ्या रंगाचे असंख्य किडे त्याच्यावर बसले होते. चारपांच दिवस तरी तो सांगाडा तिथं असावा असं वाटत होतं. तें दृश्य भयानक दिसत होतं. मी रेमंडला म्हणालों कीं इथून पन्नाससाठ मैलांवर ती रेड इंडियनांची वस्ती असणार. रेमंड म्हणाला कीं तें शक्य नाहीं—कारण स्नेक जमातीच्या त्यांच्या शत्रूच्या भीतीमुळें ही वस्ती इतक्या लांब जाणार नाहीं. आम्हीं थोडे पुढें चालून गेलों. एक चढ आम्ही चढलों आणि पुन्हां तो माग हरवला. आमच्यासमोर एक टेकड्यांची तुटक रांग दिसली. दहाबारा मैल अंतरावर ती असावी. आजूबाजूला कुठंहि एकहि गवा किंवा रेड इंडियन दिसत नव्हता.


"हें पाहिलंत ना आतां ? इथून मागें वळावं हेंच बरं !" रेमंड म्हणाला. परंतु त्याच्या धन्याला तसं वाटत नसल्यामुळें प्रवास पुढें सुरू झाला. आम्ही एक टेकटी उतरून माळावर येऊन तो माळ ओलांडूं लागलों. या क्षणीं आम्हीं इतके दूर आलों होतों कीं मी काय किंवा पॉलीन काय आम्हां दोघांतहि लारामीच्या किल्ल्यावर परत जाण्याचं त्राण उरलेलं नव्हतं. त्यामुळें गरज आणि माझ्या मनाचा कल या दोन्ही गोष्टी एकमेकांशीं जुळून आल्या—मागें न वळतां ठरल्याप्रमाणें पुढं जावं हेंच शहाणपणाचं असं मीं ठरवलं. थोडेसें पुढें गेल्यावर गव्यांचीं हाडं आणि कवट्या आम्हांला दिसल्या. वर्षा दोन वर्षांपूर्वीं रेड इंडियनांनीं इथं बरीच शिकार केली असली पाहिजे. परंतु एकहि जिवंत प्राणी कुठं आसपास दिसत नव्हता. इतक्यांत अचानक एक काळवीट आमच्यापासून साधारण ऐंशीं यार्डांच्या अंतरावर उभा राहिला आणि आमच्याकडे रोखून पाहूं लागला. आम्ही दोघांनींहि गोळ्या झाडल्या. दोघांचेहि नेम चुकले. आमच्याकडचा सगळा शिधा संपला होता, थोडंसं पीठ शिल्लक होतं, त्यामुळें काळवीट दिसतांच आम्हीं गोळ्या झाडतांना अतिशय उतावळेपणा केला. आमचे नेम चुकले याचं कारण हेंच.

कांहीं अंतरावर आम्हांला पाण्याचीं अनेक छोटींछोटीं तळीं चमकतांना दिसलीं. आम्ही जवळ गेलों तेव्हां उंच गवतांतून उड्या मारीत पसार होणारे ल्यांडग आणि काळवीट आम्हीं पाहिले. प्लॉव्हर पक्ष्यांचा एक थवाच्या थवा आमच्या डोक्यावरून उडत गेला. काळवीट नाहींतर नाहीं, निदान एकादा पक्षी तरी, अशा विचारानं रेमंडनं पुन्हां गोळी झाडली. यावेळींहि त्याचा नेम हुकला. पाण्याच्या बाबतींतहि आमची निराशा झाली. कारण आजूबाजूची जमीन गव्यांनीं तुडवल्यामुळें इतका चिखल वर आला होता कीं आमचीं भित्रीं जनावरं तिथं जाईनात. तेव्हां आम्ही तिथून निघालों आणि समोरच्या टेकड्यांच्या दिशेनं जाऊं लागलों. गवत चांगलं उंच वाढलेलं होतं. गव्यांनीं तें जिथं तुडवलेलं नव्हतं तिथं माझ्या घोडीच्या गळ्याला तें स्पर्श करीत होतं.

पुन्हां त्या भिकारड्या माळावर आमच्यासमोरचा रेड इंडियनांचा माग कुठं तरी हुकला. टेकडीच्या जवळ आम्ही गेलों. समोर एक घळ होती, रेड इंडियनांची वस्ती जर इथून गेली असेल तर ती याच वाटेनं जाणार हें अगदीं उघड होतं. आम्ही त्या वाटेनं चालूं लागलों. पावलाचा एक ठसाहि कुठं दिसेना. वाटेंत मात्र गव्यांच्या कवट्या दिसत होत्या. इतक्यांत हवेंत वादळाची गुरगुर ऐकूं येऊं लागली. घळ ओलांडून आम्ही चढावावर गेलों. क्षितिजावर ओबडधोबड काळ्या ढगांची रांग दिसत होती. या ढगांच्या समोरच रॉकी पर्वतांतला सर्वांत आघाडीचा डोंगर मेडिसिन बो याचं शिखर दिसत होतं. हळूहळू निर्मनुष्य माळ आमच्या दृष्टिपथांत येऊं लागला. या माळांतून वहात असलेला लारामीचा प्रवाहहि दिसला. प्रवाहाच्या कांठाशीं एकहि झाड किंवा झुडूप दिसत नव्हतं. मी थोडा पुढें झालों. इतक्यांत प्रवाहाच्या कांठालगतच्या माळावर मला कांहीं काळे ठिपके दिसले.

"गवे!" मी ओरडलों.

"ते घोडे आहेत, देवाच्यान्!" रेमंड म्हणाला. आपल्या खेचराला एक चाबकाचा फटका लगावून हें बोलत असतांना तो पुढे निघाला. आम्ही जसजसे पुढें गेलों तसतसे प्रवाहाच्या कांठाशीं विखुरलेले अनेक घोडे चरत असलेले आम्हीं पाहिले. इथून मैलभराच्या अंतरावर ऑगीलाल्ला जमातीच्या वस्तीचे उंच तंबूहि आम्हांला दिसूं लागले. एकाद्या भटकणाऱ्याला घर दिसतांच जितका आनंद होईल, त्यापेक्षां किती तरी पट आनंद मला रेड इंडियनांचा तो तळ दिसतांच झाला.



# १४ | ऑगिलाल्लांच्या सहवासांत

रेड इंडियन लोकांच्या स्वभावरचनेचं वर्णन करण्याचं हें स्थळ नव्हे. कांहीं अपवाद सोडल्यास मेक्सिकन विभागाच्या उत्तरेकडच्या बहुतेक जमातींचं चित्र बारीकसारीक रंगरेषा सोडल्यास जवळजवळ सारखंच असतं, असं म्हणायला हरकत नाहीं. विचारांच्या ठेवणींत जरी असं साम्य असलं तरी नदीकांठच्या आणि समुद्रकिनाऱ्यावरच्या, जंगलांतल्या आणि माळावर राहणाऱ्या, या जमातींच्या प्रत्यक्ष जीवन जगण्याच्या पद्धतींत मात्र खूप फरक आढळतो. गवताळ प्रदेशाच्या अगदीं दूरवरच्या विभागांत भटकणाऱ्या रेड इंडियनांच्या रानटी जमातींबरोबर बरेच आठवडे राहिल्यामुळें त्यांचं जीवन बारकाईनं न्याहाळण्याची संधि मला मिळाली. त्यामुळें माझ्या डोळ्यासमोर घडलेल्या ज्या अनेक दृश्यांचं चित्र मी रेखाटतों आहें तें चित्र आकर्षक होईल असं मला मनापासून वाटतं.

मी ज्यांच्या सहवासांत राहिलों, ते हे लोक संपूर्ण रानटी होते. सुशिक्षित लोकांच्या सहवासामुळें त्यांच्या विचारांत किंवा आचारांत तिळमात्रहि फरक झाला नव्हता. गोऱ्या लोकांचा स्वभाव आणि त्यांचं सामर्थ्य यांची त्यांना कांहींच कल्पना नव्हती. मला पाहतांच त्यांचीं पोरं भिऊन किंकाळ्या फोडत. त्यांचा

धर्म, अंधश्रद्धा, पूर्वग्रह या सगळ्या गोष्टी जराहि बदल न होतां पिढ्यान्‌पिढ्या तशाच चालत आल्या होत्या. त्यांचे बापजादे ज्या शस्त्रांनीं लढाई खेळत तींच शस्त्रं अजूनहि वापरलीं जात होतीं. पूर्वीचे लोक कातड्याचीं जीं वस्त्रं वापरत तींच पुढच्या पिढ्यांतहि वापरलीं जात होतीं. अश्मयुगांतील जिवंत प्रतिनिधि असंच या रेड इंडियनांचं वर्णन करावं लागेल. नाहीं म्हणायला त्यांच्या भाल्यांना व्यापाऱ्यांकडून विकत घेतलेल्या लोखंडांची टोकं लावलेलीं असत. परंतु अश्मयुगांतले दगडाचे हातोडे अजूनहि त्यांच्या वापरांत होते.

या सगळ्या प्रदेशांत आतां मात्र मोठे बदल होऊं घातले आहेत. ऑरेगॉन आणि कॅलिफोर्निया इथं स्थलांतर करून जाणाऱ्या गोऱ्या प्रवाशांमुळें हळूहळू गव्यांची संख्या कमी होऊं लागणार, आणि त्यामुळें ज्यांचं अस्तित्वच केवळ या गव्यांवर अवलंबून आहे असे हे रेड इंडियन लोक या गव्यांबरोबरच संपुष्टांत येणार हें उघड आहे. या रेड इंडियनांना खालीं ढकलणारी आणखी एक गोष्ट या भागांत अधिकाधिक येत चालली आहे. ती म्हणजे व्हिस्की. शिवाय, मिलीटरीचीं ठाणींहि वाढत आहेत. या परिस्थितीचा एकूण अर्थ असा कीं, कांहीं वर्षांनीं या भागांतून जाणाऱ्या प्रवाशांना फारसा धोका उरणार नाहीं. जसा इथला धोका जाईल, त्याप्रमाणेंच इथली गंमतहि नाहींशी होईल हेंहि खरं.

चढावावरून मी आणि रेमंडनं ज्याप्रमाणं ती रेड इंडियनांची वस्ती पाहिली त्याप्रमाणं त्या लोकांनींहि आम्हांला पाहिलं होतं. चढाव उतरून आम्ही माळावर आलों, तेव्हां वस्तीच्या कडेला उघड्या-वाघड्या रेड इंडियनांची आम्हांला पाहण्यासाठी एकच गर्दी झाली. त्या गर्दींत उभ्या असलेल्या रेनॉलचं हिरवं ब्लँकेट मीं दुरून ओळखलं. आम्ही जवळ जातांच हस्तांदोलनाचा कार्यक्रम पार पडला. आमच्याबरोबरच्या इतर लोकांचं काय झालं हें जाणून घ्यायला ते उत्सुक होते. मीं त्यांना आवश्य ती माहिती सांगितली आणि आम्ही तंबूच्या दिशेनं चालूं लागलों.

"तुम्हांला जरा उशीर झाला. तुम्ही जर इथं एक दिवस अगोदर येतां तर सभोंवतालचा हा माळ गव्यांनी भरून गेलेला तुम्हांला दिसला असता—अगदीं दूरच्या क्षितिजापर्यंत, अर्थात् ते सगळे नर होते. मादी एकहि नव्हती. कालपर्यंत आम्ही त्यांच्यामागें लागलों होतों. वस्तीकडे जरा नजर तर टाका—उत्तम बरकत झालेली दिसते आहे कीं नाहीं?" रेनॉल म्हणाला.

रेनॉल्चं म्हणणं खरं होतं. जिथं नजर टाकावी तिथं मांसाचे कापून सुकत घातलेले तुकडे दिसत होते. वस्ती मात्र गेल्या वेळेपेक्षां थोडी लहान दिसत होती. त्याचं कारण मी रेनॉलला विचारलं. त्यानं मला सांगितलं कीं ल बॉर्ने हा जमातीचा वृद्ध सल्लागार प्रकृति बिघडल्यानं अशक्त झाला होता. चढउतार करणं शक्य नाहीं असं त्याला वाटलं आणि म्हणून तो आपल्या नातेवाईकां-बरोबर मागं राहिला. माहतोताटोंका आणि त्याचे भाऊहि सोबत राहिले होते. भीति वाटत असल्यामुळें व्हर्लविंडसुद्धां इतक्या दूरवर यायला नाखूष होतीं. फक्त अर्धा डझन कुटुंबंच त्याच्याबरोबर राहिलीं होतीं. वस्तीवरचीं बरीचशीं कुटुंबं आपल्या प्रमुखाची मर्जी न सांभाळतां प्रवास करायचा ठरवून पुढं निघालीं होतीं.

आतां या वस्तीवर कुठले कुठले गटप्रमुख आहेत?" मीं विचारलं.

रेनॉल म्हणाला, "रेड वॉटर, ईगल फेदर, बिग क्रो, मॅड वुल्फ, पांथर, व्हाईट शिल्ड आणि तो मिश्र रक्ताचा मनुष्य...काय बर नांव त्याचं...हं, शिने...हे सगळे प्रमुख सध्यां वस्तीवर आहेत."

एव्हांना आम्हीं वस्तीवर जाऊन पोंचलों होतों. बहुतेक तंबू मोठे आणि नीटनेटके होते. परंतु एका बाजूला मात्र घाणेरड्या दिसणाऱ्या झोपड्यांचा पुंजका दिसत होता. मी त्या झोंपड्यांकडे पाहून माझ्या मनांतला विचार व्यक्त केला. थोड्याच वेळांत असं बोलल्यामुळें नाजूक गोष्टीला मी ात घा तल्याचं मला कळलं. कारण झटकन् त्या झोपड्यांकडे बोट दाखवून रेनॉल म्हणाला, "माझ्या रेड इंडियन बाईचे नातेवाईक त्या झोपड्यांत राहतात. इतक्या चांगल्या झोपड्या सगळ्या वस्तीवर सांपडायच्या नाहींत बरं!" यांपैकीं दोन झोपड्यांच्या मधून जाऊन आम्हीं वस्तीच्या मध्यावर आलों. उत्कृष्ट बांध्याचीं रेड इंडियन माणसं उभीं राहून आमच्याकडे पहात होतीं.

"बॅडवुंडचा तंबू कुठं आहे?" मीं रेनॉलला विचारलं.

"बॅडवुंड इथं आला नाहीं. तो व्हर्लविंडबरोबर मागं राहिला. तो जर इथं आला असतां तर त्यानं आपल्या तंबूत इथल्या कुठल्याहि माणसांपेक्षां तुमचं अधिक चांगलं स्वागत केलं असतं. असू दे, तो पाहा, बिग क्रोचा तंबू—रेड वॉटरच्या तंबूच्या बाजूला. बिग क्रो गोऱ्या लोकांना फार चांगलं वागवतो. तुम्हीं त्याच्याबरोबर रहावं असं मी सुचवीन."

मीं विचारलं, "त्याच्या तंबूत बायकापोरांची खूप गर्दी आहे का?"

"नाहीं, त्याच्या तंबूंत त्याची बायको आणि दोनतीन मुलं इतकींच मंडळी आहेत. आपलं बाकीचं लटांबर त्यानं दुसऱ्या तंबूंत ठेवलंय्."

आम्ही बिग क्रोच्या तंबूसमोर गेलों. आमच्यामागून आमच्याकडे पहात पहात रेड इंडियनांचा एक घोळका येत होता. बिग क्रोच्या तंबूच्या दारापाशीं आम्ही जाऊन पोंचतांच तंबूची कनात बाजूला करून एक रेड इंडियन स्त्री बाहेर आली आणि तिनं आमचे घोडे ताब्यांत घेतले. खालीं वाकून तंबूच्या दारांतून मी आंत शिरलों. गव्याच्या कातड्याच्या ढिगाऱ्यावर त्या अंधुक प्रकाशांत बिग क्रो बसला होता. "हाव् कोला" असे घशांतल्या घशांत उद्गार काढून बिग क्रोनं माझं स्वागत केलं. रेमंड आणि मी त्याच्याबरोबर राहणार आहोंत असं सांगण्याची विनंति मी रेनॉलला केली. रेनॉलनं तसं सांगतांच बिग क्रोनं पुन्हां एकदां मागच्या पद्धतीनेंच आनंदोद्गार काढले. आपलं आतिथ्य गोऱ्या माणसांनीं स्वीकारलं या गोष्टीचा रेड इंडियनांना विशेष अभिमान वाटतो याचा इथं मुद्दाम उल्लेख केला पाहिजे.

बिग क्रोच्या बायकोनं गव्याच्या कातड्याचं जाजम आम्हांला बसण्यासाठीं तंबूच्या दाराजवळच अंथरलं. आमचीं खोगिरं तंबूंत आणून ठेवलीं गेलीं. आम्ही बसतों न बसतों तोंच रेड इंडियन लोकांचा एक घोळकाच्या घोळका आम्हांला पाहण्यासाठीं म्हणून तंबूत घुसला. बिग क्रोनं आपला पाईप काढला. पाईपमध्यें तंबाखू आणि शॉगशासा—हा एका झाडाच्या तांबड्या सालीचा चुरा—यांचं मिश्रण भरलं. पाईप एकाकडून दुसऱ्याकडे सरकवला जात होता. धूम्रपानाबरोबर गप्पाहि रंगत होत्या. इतक्यांत त्या रेड इंडियन स्त्रीनं आमच्या दोघांसमोर शिजवलेल्या गव्याच्या मांसाचा कटोरा ठेवून आमचा पाहुणचार केला. परंतु दुर्दैवानं एवढ्यावरच भागणार नव्हतं. कारण तंबूंत तोंड घालून अनेक रेड इंडियन स्त्रिया आणि मुलं यांनीं आपापल्या तंबूवर येऊन भोजन करण्याचं आमंत्रण आम्हांला दिलं. त्यानंतर अर्धा तासपर्यंत निमंत्रणानुसार प्रत्येक तंबूवर जाऊन थोडं मांस खाणं आणि तिथं पुढं केलेल्या पाईपचा एकदवुसरा झुरका घेणं असा आमचा उद्योग चालला होता. हवेंत बदल होणार असल्याच्या खुणा दिसत होत्या—त्या आतां अधिकच तीव्रपणें जाणवूं लागल्या होत्या. आम्ही रेनॉलच्या तंबूवर गेलों. खरं म्हणजे तंबू असं म्हणण्याच्या लायकीचं तें घर नव्हतं. कारण गव्यांच्या जुन्या कातड्याचं छत कसंबसं चार काठ्यांवर टांगून तो 'तंबू' उभा केलेला होता; त्याची एक बाजू

तर साफ उघडी होती. आम्ही तिथं बसलों, आमच्याभोंवती कांहीं रेड इंडियन गोळा झाले.

मीं विचारलं, "हें जें वादळ होतं, तें कशामुळें होत असावं?"

रेनॉल म्हणाला, "मला असं वाटतं कीं एखादा प्रचंड दगड आकाशांतून गडगडत जात असावा."

मी म्हणालों, "असेलहि तसं! परंतु या रेड इंडियन लोकांना कोणत्या कारणानं वादळ होतं असं वाटतं तें मला जाणून घ्यायचं होतं."

रेनॉलनं माझा प्रश्न त्यांना त्यांच्या भाषेंत सांगितला. कांहीं काळ त्या रेड इंडियन लोकांत चर्चा झाली. शेवटीं आपला सुरकुतलेला चेहरा वर करुन म्हातारा मेनेसीला म्हणाला, "हें वादळ कां होतं हें मला कळलेलं आहे. एक काळा पक्षी आहे. तो ब्लॅकहिल्सवरुन आपल्या पंखांचा प्रचंड आवाज करीत येतो. तो आपले पंख पाण्यावर आपटतो. तेव्हां पाण्यांतून वीज वर येते. मी तो पक्षी एकदां स्वप्नांतहि पाहिलेला आहे. हें वादळ फार वाईट असतं बघा. या वादळानं गेल्या वर्षीं माझ्या भावाला ठार केलं."

भावाला कसं ठार केलं तें मी विचारलं. परंतु एकहि शब्द उत्तरादाखल न बोलतां तो खालीं मान घालून बसला. नंतर कांहीं वेळानं त्याच्या भावाला झालेल्या अपघाताविषयीं माहिती मला कळली. म्हाताऱ्याचा भाऊ आणि त्यांच्या गटांतील इतर कांहीं माणसं यांचा एक मांत्रिक संप्रदाय होता. इतर कुणाजवळहि नसलेलं वादळाशीं लढण्याचं सामर्थ्य आपल्यापाशीं आहे असा त्यांचा दावा होता. वादळ आलं कीं त्याला धाक घालून परतवण्यासाठीं हें मांत्रिकमंडळ धनुष्यबाण, बंदुका, ढोल, गरुडाच्या पंखांच्या हाडाची केलेली शिटी इतकं सगळं सामान घेऊन टेकडीच्या माथ्यावर जाई. वादळाला भिवविण्यासाठीं ते जोरजोरानं ढोल पिटत, रणगर्जना करीत, शिट्या वाजवत आकाशांत जमणाऱ्या ढगांवर गोळ्यांचा वर्षाव करीत. एके दिवशीं दुपारीं वादळी पावसाचे काळे ढग आकाशांत जमूं लागले असतांना म्हाताऱ्याचा हा भाऊ आपल्या बरोबरीच्या मांत्रिकांना घेऊन वादळाला चोपण्यासाठीं टेकडीवर गेला. त्यांच्या हातांतल्या लोखंडाच्या भाल्याचीं टोकं चमकत होतीं. या लोकांनीं आपलं सर्व सामान उपयोगांत आणलं. परंतु वादळ झाल्याचं कांहीं चिन्ह दिसेना. इतक्यांत वीज कोसळली आणि म्हाताऱ्याचा भाऊ ठार झाला. त्याच्या बरोबरीचे लोक भिऊन किंकाळ्या फोडत पळाले.

मी विग क्रोच्या तंबूंत माझं वास्तव्य ठेवलं होतं. त्या दिवशीं संध्याकाळीं त्या तंबूंतलं वातावरण एकाद्या चित्रासारखं होतं. तंबूंत दहाबारा रेड इंडियन बसले होते. मध्यभागीं धुमसणाऱ्या शेकोटीच्या मंद प्रकाशांत त्यांच्या काळ्या, नग्न आकृती दिसत होत्या. एकाकडून दुसऱ्याकडे सरकवला जाणारा पाईप लकाकत होता. निखारे मंद झाले कीं, विग क्रोची वायको गव्याची चरबी शेकोटींत टाकी. भपकन् ज्वाळा वर येत आणि त्या प्रकाशांत गप्पा करीत बसलेले सगळे रेड इंडियन स्पष्ट दिसत. कांहीं क्षणानंतर पुन्हां ज्वाळा मंद होत. आणि हळूहळू मघाचं उजळलेलं दृश्य काळोखांत बुडून जाई.

दुसरे दिवशीं सकाळीं मी तंबूंतून बाहेर आलों आणि फेरफटका करण्यासाठीं म्हणून निघालों. वस्तीवरचीं सर्व कुत्रीं भुंकत भुंकत माझ्यामागं लागलीं. तशीं तीं भित्रीं होतीं. माझ्यापासून एका यार्डाच्या अंतरावर राहूनच तोंड वर करून तीं भुंकत. त्यांतलं एक कुतरडं मात्र धीट होतं. तें पुढं येऊन माझ्या पायांतल्या रेड इंडियन जोड्याची मागं लोंबणारी वादी तोंडांत पकडूं लागलं. त्यानं वादी तोंडांत धरलेली असतांना मी पाऊल पुढं टाकलं कीं तें कुत्रं पाठीवर पडे. पुन्हा भुंकत तें पुढं येई. वस्तीवरचे सगळे लोक माझ्याकडे पहात आहेत हें मला माहीत होतं. आणि म्हणून मी जराहि भ्यायल्यासारखं दाखवत नव्हतों. शेवटीं मी रेनॉल्च्या तंबूवर आलों तेव्हां तीं कुत्रीं गुरगुरत परत गेलीं. फक्त एकच पांढऱ्या रंगाचा मोठा कुत्रा आपले दांत विचकून माझ्याकडे पहात समोर उभा राहिला. मी त्याला बोलावलं, तसा तो अधिकच गुरगुरूं लागला. मी त्याच्याकडे नीट न्याहळून पाहिलं. तो चांगला गुबगुबीत होता—जसा मला हवा होता तसा. मी त्या कुत्र्याला म्हणालों, "मित्रा, थांब! उद्यां सकाळीं तुला रेड इंडियनांच्या पोटांत घालून मी तुला याबद्दल शिक्षा देईन."

त्या दिवशीं माझा स्वभाव आणि एकूण सामाजिक प्रतिष्ठा यांची त्या रेड इंडियन लोकांवर छाप टाकण्यासाठीं मी एक जेवण द्यायचं ठरवलं होतं. अशा महत्त्वाच्या समारंभाला पांढऱ्या रंगाचा कुत्रा हे रेड इंडियन प्रथेप्रमाणें एकमेव पक्वान्न मानलं जातं. मी रेनॉल्चा सल्ला घेतला. रेनॉल्नं तो कुत्रा एका म्हाताऱ्या बाईच्या मालकीचा असल्याचं मला सांगितलं. मग मी एक भडक रंगाचा रुमाल घेतला. त्यांत लाल रंग, मणी, आणि इतर कांहीं किडूकमिडूक रुमालांत घातलं आणि मग त्या रेड इंडियन बाईला बोलावणं पाठवलं. ही बक्षिसी पाहून ती म्हातारी बेहद्द खूष झाली. कुत्रा मला देऊन टाकण्यांत आला. मग दुसऱ्या

एका बाईनं त्याला तंबूमागं नेऊन मारला. मग त्यांनीं त्याला आगीवर धरून त्याचे केस काढले. त्यानंतर त्याचे तुकडे करून दोन मोठ्या किटल्यांत ते शिजत टाकले. दरम्यान मी रेमंडला आमच्याजवळ जें थोडं पीठ शिल्लक होतं त्यांत गव्याचं मांस घालून तें तळायला सांगितलं. त्याचप्रमाणं आणखी एक पक्वान्न म्हणून एक किटलीभर चहा करण्याचा मीं हुकूम सोडला. जेवायला 'आमंत्रणं देण्याचं काम मी विग क्रोलाच करायला सांगितलं. असं करण्यामागें माझा धूर्तपणा होता. कुणाला जर चुकून आमंत्रण गेलं नाहीं तर त्याचा राग माझ्यावर ओढवूं नये हा यांतला हेतु होता. जेवण या गोष्टीसाठीं रेड इंडियनांना दिवसांतला कुठलाहि तास सोयीचा असतो. आमच्या जेवणाला अकरा वाजतां सुरुवात झाली. मी त्या दिवशींच्या जेवणाचा यजमान असल्यामुळं पायांत नवे जोडे घातले. अशा खास समारंभाकरतां मी ठेवणींतला कोट अंगांत घातला. वस्तऱ्यानं आधीं दाढी करून घेतली. रेड इंडियनांचं चांगलं मत व्हावं असं वाटत असेल तर दाढी ही करावीच लागते. अशा तऱ्हेनं समारंभाचा पोषाख करून मी तंबूच्या दाराशीं रेमंड आणि रेनॉल यांच्याजवळ बसलों. सगळे रेड इंडियन जेवणासाठीं आपापले कटोरे घेऊन आले होते. दोन रेड इंडियन 'पोलीस' हातांत डाव घेऊन वाढण्याचं काम करायला सज्ज होते. त्यांच्या हातांतला डाव रॉकी पर्वतांतल्या मेंढ्यांच्या शिंगांचा केलेला होता. वाढतांना म्हातारे आणि गटप्रमुख यांना ते इतरांच्या दुप्पट वाटत. बघतां बघतां दोन किटल्यांत शिजवलेला तो कुत्रा खलास झाला. पदार्थ संपल्याचं आमचे पाहुणे रिकामा कटोरा उलटा करून आम्हांला सांगूं लागले. त्यानंतर पिठाची रोटी वाटण्यांत आली, आणि मग चहा. चहा जेव्हां कटोऱ्यांत ओतला गेला तेव्हां त्याचा रंग मला चमत्कारिकच दिसला. त्याविषयीं मी रेनॉलला विचारतांच तो हळूच म्हणाला, "चहा पुरेसा नव्हता, तेव्हां मी किटलेली लागलेली काजळी काढून चहा कडक दिसावा म्हणून ती चहांत चुरली." सुदैवानें चवीच्या बाबतींत रेड इंडियनांची जीभ एवढी तल्लख नसते! चहा भरपूर गोड होता यावरच ते खूष होते. जेवणानंतर पाईप ओढण्याचा कार्यक्रम झाला. धूम्रपानानंतर भाषणं व्हायचीं होतीं. मी बोलूं लागलों. माझं प्रत्येक वाक्य रेनॉल त्यांच्या भाषेंत भाषांतर करून सांगत असे. श्रोत्यांतून वारंवार मान्यतेचे उद्‌गार निघत होते. माझं भाषण मला आठवतं. तें पुढीलप्रमाणें होतं.—

"मी खूप दूरच्या देशांतून तुम्हांला भेटण्यासाठीं म्हणून आलों आहें. माझा देश इतका दूर आहे कीं तुम्हीं तिथं जायचं म्हटलंत तर एक वर्षदेखील तुम्हांला पुरायचं नाहीं."

"हाव्! हाव्!"

"माझ्या देशांत इथल्या माळावर उदंड गवत उगवतं तसे गोरे लोक आहेत. तिथल्या स्त्रिया तुम्हीं पाहिलेल्या स्त्रियांहून कितीतरी अधिक सुंदर आहेत. तिथले पुरुष शूर योद्धे आहेत."

"हाव्! हाव्! हाव्!"

शेवटचे शब्द उच्चारतांना माझ्या सदसद्‌विवेकबुद्धीची बोंचणी मला जाणवत होती. तरीहि मी पुढं चालू केलंच—

"मी माझ्या देशांत रहात असतांना तिथं ऑगोलाल्ला जमातीविषयीं खूप ऐकलं होतं. मला कळलं होतं कीं तुमचं राष्ट्र शूर आहे. गोऱ्या लोकांशीं तुम्हीं चांगले वागतां. गव्यांची शिकार करणं आणि शत्रूंचा नाश करणं या बाबतींत तुमचा हात धरणं कठीण आहे. तुमच्याविषयीं इतकं सगळं ऐकल्यानंतर हें खरं आहे किंवा नाहीं याचा पडताळा घेण्यासाठीं मी इथवर यायचं ठरवलं."

"हाव्! हाव्! हाव्! हाव्!"

"मी घोड्यावर स्वार होऊन डोंगरांतून प्रवास करून आल्यामुळें मला तुमच्यासाठीं फारशा भेटी आणतां आल्या नाहींत."

"हाव!"

"परंतु असं असलं तरी मी माझ्याबरोबर मुद्दामच थोडा तंबाखू आणला आहे. तुम्ही सगळ्यांनीं तो ओढून पहा. आतांपर्यंत तुम्हीं व्यापाऱ्यांकडून विकत घेतलेल्या तंबाखूहून कितीतरी अधिक चांगला असल्याचं तुम्हांला कळून येईल."

"हाव्! हाव्! हाव्!"

"माझ्याजवळ बरीच बंदुकीची दारू, शिसं, सुऱ्या आणि तंबाखू इतकं सगळं आहे. पण तें सगळं लारामीच्या किल्ल्यांत आहे. या सगळ्या वस्तू तुम्हांला भेट द्याव्या अशींच माझी इच्छा आहे. मी हा प्रदेश सोडण्यापूर्वी जर तुम्ही लारामीच्या किल्ल्यावर येऊन मला भेटलांत, तर मी तुम्हांला चांगल्या भेटी देईन."

"हाव्! हाव्! हाव्! हाव्!"

मग रेमंडनं जवळजवळ दोनतीन पौंड तंबाखू कापून त्यांना वाटला. तंबाखू वाटून झाल्यानंतर मेनेसीला उत्तरादाखल भाषण करायला उभा राहिला. त्याचं भाषण बरंच लांब होतं; परंतु त्याचा थोडक्यांत सारांश पुढीलप्रमाणं सांगतां येईल :

"गोऱ्या लोकांवर आमचं प्रेम आहे. या पृथ्वीतलावर ते सर्वांत शहाणे लोक आहेत असं आम्हांला वाटतं. ते कांहींहि करूं शकतील, असं त्यांचं सामर्थ्य आहे. ऑगीलाल्लांच्या वस्तीवर गोरे लोक पाहुणे म्हणून आले कीं आम्हांला बरं वाटतं. आमच्या आतां आलेल्या या गोऱ्या पाहुण्यांनीं आम्हांला फारशा भेटी दिल्या नाहींत हें खरं आहे. पण त्याचं कारणहि त्यानें सांगितलं आमच्यावर या पाहुण्याचं प्रेम आहे हें निःसंशय. नाहींतर इतक्या दूरवरचा प्रवास करून कोणी इथं आला असता का ?"

अशाच तऱ्हेचीं आणखीहि कांहीं भाषणं झालीं. मधेमधे पाइपहि ओढला जाई. हंसणं आणि गप्पागोष्टीहि चालत. इतक्यांत मेनेसीला उभा राहिला. आणि आपल्या मोठ्या आवाजांत पुढीलप्रमाणें भाषण करूं लागला :

"सगळे गटप्रमुख आणि वृद्ध माणसं आज इथं जमलेलीं आहेत. ही फार चांगली गोष्ट आहे. तेव्हां आतां आपण पुढं काय करायचं हें ठरवलं पाहिजे. आमचे तंबू जुनाट झाल्यामुळें नवीन तंबूसाटीं कातडं मिळवावं म्हणून आम्ही इथं आलों. परंतु इथं येऊन आमची थोडी निराशाच झाली आहे. कारण आतांपर्यंत आपण ज्या गव्यांची शिकार केली ते सगळे नर होते. तंबूसाटीं आपल्याला कापड लागतं ते गव्यांच्या माद्यांचं. मेडिसीन बो या डोंगराच्या आसपास गव्यांच्या माद्या असतात. तेव्हां आपण तिथं गेलं पाहिजे. हें ठिकाण पश्चिमेच्या अगदीं टोकाला आहे. इथं आपण गेल्यानंतर कदाचित् स्नेक जमातीचे लोक हल्ला करतील. कारण शिकारीचं तें क्षेत्र त्यांच्या ताब्यांत आहे. परंतु हा धोका असला तरी आपले तंबू फाटून गेल्यामुळं तो पत्करणं भाग आहे. स्नेक लोकांची भीति आपणांला वाटतां कामा नये. कारण आपले योद्धे शूर आहेत आणि युद्धाची सर्व तयारी करून ते आले आहेत. दुसरं असं कीं, आपल्याबरोबर तीन गोरे लोक असून त्यांच्या रायफली आपल्या मदतीला सिद्ध आहेत."

म्हाताऱ्या मेनेसीलाच्या या व्याख्यानानंतर त्या रेड इंडियन लोकांत बरीच चर्चा झाली. रेनॉल्नं त्या चर्चेचं भाषांतर करून सांगितलं नाहीं. तेव्हां चर्चा

करणाऱ्यांच्या आवाजावरून आणि हातवाऱ्यांवरून मी त्यांच्या आशयाचा अंदाज बांधला. त्यांची चर्चा संपल्यानंतर त्या बहुतेकांचं मत मेनेसीलासारखंच असल्याचं दिसून आलं. कांहीं क्षण शांतता पसरली. मग म्हातारा मेनेसीला उठून उभा राहिला आणि त्यानं बेसूर आवाजांत गायला सुरुवात केली. मीं दिलेल्या मेजवानीबद्दल आभार व्यक्त करणारं तें गाणं होतं असं मला नंतर कळलं. गाणं म्हणून झाल्यावर म्हातारा म्हणाला, "आतां या गोऱ्या लोकांना विश्रांति घ्यायला आपण थोडा वेळ देऊं या." सगळे लोक आपापल्या तंबूवर गेले. म्हातारा कांहीं वेळ मघाचं तें आभाराचं गाणं म्हणत वस्तीवर फिरत होता. रेड इंडियनांची तशी प्रथा असते.

संध्याकाळ झाली. चरायला सोडलेले घोडे परत आणून त्यांना खुंटांना बांधण्यांत आलं. ठिकठिकाणीं शेकोट्या पेटल्या. आणि त्यांच्या भोंवतीं बसलेल्या रेड इंडियनांच्या आकृत्या दिसूं लागल्या. मी रेनॉल्च्या तंबूजवळ जाऊन बसलों. मेनेसीलाचा मुलगा आणि माझा यजमान बिग क्रो याचा भाऊ ईगल फ़ेदर हा आधींच आला होता. उद्यां सकाळीं मुक्काम हलवून सगळे निघणार किंवा काय असं मीं त्याला विचारलं. तेव्हां तो मान हलवून म्हणाला कीं त्याविषयी कांहीं नक्की सांगतां यायचं नाहीं. मोठा माहतों–ताटोंका जिवंत होता तेव्हां एकादा निर्णय घेऊन तो जमातीला आपल्याबरोबर नेऊं शकत असे. परंतु त्याच्या मृत्यूनंतर आतां या लोकांची परिस्थिति अगदी लहान मुलासारखी झाली आहे. त्यांना काय हवं हें त्यांचं त्यानांच समजत नाहीं. डोकं नसलेल्या धडासारखी त्यांची अवस्था आहे. तात्पर्य, उद्यां निघणार किंवा काय याविषयीं मला कांहींच कळूं शकलं नाहीं. कांहीं वेळानं आम्ही गाढ झोपलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझी आंघोळ आटोपून नदीवरून परत आलों तेव्हां तंबू आवरण्यांत येत असल्याचं मला दिसलं. कांहीं वेळानं तंबूंच्या जागीं फक्त घोडे आणि ते रेड इंडियन यांचीच गर्दी दिसूं लागली. किटल्या, दगडी हातोडे, तंबूचं सगळं सामान, सुकवलेलं मांस यांचे ढिगारे आजूबाजूला पडले होते. घाईघाईत काम करीत असलेल्या स्त्रिया दिसत होत्या. कांहीं थेरड्या छातीचा भाता ताणून एकमेकांवर खेकसत होत्या. शांतपणं उभ्या असलेल्या केसाळ घोड्यांच्या पाठीवर सामान लादलं होतं. जीभ बाहेर काढून, आळसावून धापा टाकणारे कुत्रे निघायच्या वेळेची वाट पहात होते. विझत चाललेल्या शेकोट्यांचं आगीजवळ घोड्याच्या गळ्यांतलं दोरीचं वेटोळं हातांत धरून योद्धे शांतपणं

उभे होते. सगळी तयारी संपल्यानंतर प्रवासाला सुरुवात झाली. टेकडीच्या जवळची नदी ओलांडून ते रांगेनें पुढं चालले होते. सगळे निघून गेल्यानंतर मी घोड्यावर स्वार होऊन त्यांच्यामागून निघालों. रेमंड माझ्या मागून येत होता. आम्ही टेकडीच्या माथ्यावर गेलों तेव्हां रेड इंडियनांचा जमाव पलीकडच्या माळावरून जात होता. योद्ध्यांच्या हातांतल्या उंच भाल्यांचीं टोकं चमकत होतीं. रेड इंडियनांच्या त्या जमावाचं तें दृश्य मोठं चित्रविचित्र होतं. म्हाताऱ्या बाया सामान लादलेल्या घोड्यांच्या गळ्यांतले दोरे हातांत धरून चालत होत्या. त्यांच्या पाठुंगळीला दोनदोन तीनतीन पोरं होतीं. साज चढवलेल्या खेचरांवर आणि तट्टांवर बसलेल्या तरुण स्त्रिया आम्ही त्यांच्याकडे पाहिलं कीं दांत विचकून हंसत आणि लाजून आपला आनंद व्यक्त करीत. छोटीं छोटीं धनुष्यं हातांत घेतलेलीं पोरं पायीं चालत होतीं. कुत्रे घोड्यांच्या पायाजवळ लुडबुड करीत पुढं जात होते. तरुण योद्धे रंग फासून आणि डोक्याला पिसं लटकावून सजले होते. ते आपल्या घोड्यावरून चालले होते मधेंच आपल्या घोड्यांच्या गतीचा अंदाज घेण्यासाठीं कांहीं योद्धे आपले घोडे भरधांव सोडत. ज्यांच्याविषयीं त्या जमातींत विशेष आदर होता असे वृद्ध योद्धे शुभ्र रंग दिलेले गव्याच्या कातड्याचे कपडे घालून एका रांगेंत चालले होते. हें दृश्य मी अनेक वेळां पाहिलं होतं. परंतु पुन्हांपुन्हां पाहूनहि या चित्रमय दृश्याचा माझ्यावर होणारा परिणाम कधीं फिकट झाला नाहीं.

या सगळ्या घोक्यांतून वाट काढून मी एका टेकडीच्या पायथ्याशीं आलों. मघांशीं उल्लेख केलेले म्हातारे सर्वांअगोदर इथं येऊन बसले होते. पाईप ओढत हंसत ते गोष्टी सांगत होते. जसजसे मागून लोक येत तसतसे ते या म्हाताऱ्यांभोंवती थांबत आणि गोष्टी ऐकूं लागत. बहुतेक माणसं आल्यानंतर ते म्हातारे उठले. आपले कुडते खांद्यावर ओढून घेऊन पुढें चालूं लागले. टेकडीच्या माथ्यावर आलों तेव्हां पुढें एक खोल उतरण असल्याचं आम्हांला दिसलं. जराहि न थांबतां सगळा घोळका धूळ उडवत खालीं उतरला. पायांना नेट लावून घोडे उतरत होते. बायका आणि पोरं किंचाळत होतीं. कुत्र्यांच्या पायांवर पाय पडलें कीं तीं केंकाटत. उतरणीवरचे दगड गडगडत खालीं जात. थोड्या वेळानं ही सगळी वस्ती पलीकडच्या माळावर उतरली.

दुपारीं आम्हीं तळ ठोकला तेव्हां पुन्हां मला आजाराचा झटका आला. गेले कित्येक आठवडे मला मिळालेली माझी शक्ति अर्ध्या तासांत पार गळून

गेली. सूर्य मावळल्यानंतर मी बिग क्रोच्या तंबूंत जाऊन झोपलों. सकाळीं जाग येईपर्यंत मला कशाचीहि दाद नव्हती. सकाळीं डोक्यावर कापड फड-फडल्याचा आवाज झाल्यानं मी जागा झालों. तंबू आवरण्याचं काम चालू झालं होतं. त्याचा तो आवाज होता. मी उठलों आणि आतां आपली प्रकृति बरी आहे असा विचार करत ब्लँकेट झाडलं. परंतु मी उभा राहिल्यानंतर कांहीं क्षणांतच मला असहायतेची जाणीव होऊं लागली. मी इतका गळून गेलों होतों कीं मला नीट उभंदेखील राहतां येईना. पॉलीन आणि आपलं खेचर यांना घेऊन रेमंड आला. जमिनीवरचं माझं खोगीर घ्यायला मी खालीं वाकलों. परंतु तें खोगीर वर उचलून घेण्याचीहि ताकद माझ्यांत नव्हती. तेव्हां पॉलीनवर खोगीर चढव असं रेमंडलाच सांगून बाजूच्या गव्याच्या कातड्यांच्या गठ्ठ्यावर बसलों. रेमंडनं खोगीर चढवल्यानंतर मोठ्या प्रयासानं मी स्वार झालों.

टेकड्यांनीं वेढलेल्या एका माळावरून आम्ही जात होतों. मी इतरांच्या थोडा पुढें होतों. तें स्थळ व काळ ओलांडून माझे विचार दूरवर भटकत होते. इतक्यात अचानक आकाश अंधारलं, वादळ गुरगुरू लागलं. भावी संकटाच्या पूर्वसूचनेसारखे काळेकुट्ट ढग टेकड्यांवर ओथंबलेले दिसूं लागले. क्षणार्धांत सगळा परिसर सावल्यांनीं झांकला गेला. मी मागे वळून पाहिलं. रेड इंडियनांची वादळापासून संरक्षण करण्याची तयारी चालली होती. माझ्या आजाराला सुरुवात झाल्यापासून पावसाचा माझ्यावर फारच वाईट परिणाम होतो याचा मला अनुभव होता. घोड्यावर कसंबसं स्वार होण्यापलीकडे माझ्या अंगांत शक्ति उरली नव्हती. कां कुणाला ठाऊक, प्रथमच मला अशी जाणीव झाली कीं मी हा प्रदेश सोडून जिवंत बाहेर पडणारच नाहीं. हा विचार येतांच मी माझ्याशींच म्हणालों, "ठीक आहे. या गवताळ प्रदेशांत काम कसं झटपट उरकलं जातं. घोड्यावर स्वार होऊन आपण बसलेले असतांना मरण येणं हें घरांत आजाऱ्याच्या खोलींत, तिथल्या गुदमरून टाकणाऱ्या हवेंत मरण येण्यापेक्षां कितीतरी पटीनं बरं. आपापल्या घरांत आजारानं झिजत झिजत कित्येक माणसं वर्षानुवर्षं खिचपत असतात. तसलं आयुष्य वाट्याला येण्यापेक्षां इथेंच झटपट मरण येणं चांगलं नाहीं का?" असं म्हणून गव्याचं कातडं मी डोक्यावर ओढून घेतलं आणि वादळाला सुरुवात होण्याची मी वाट पाहूं लागलों.

चाललेली होती—कारण घोडा कितीहि वेगवान असला तरी सहसा तो काळविटाची बरोबरी करूं शकत नाहीं. टेकडी उतरून तो काळवीट जिथं इतर रेड इंडियन लोक होते त्या माळाच्या दिशेनं धावला. माळावरचे घोडेस्वार त्याला पाहातांच अडवण्यासाठीं म्हणून पुढं धावले. त्याबरोबर तो काळवीट डाव्या हाताला वळला आणि विलक्षण वेगानं त्याचा पाठलाग करणाऱ्या सर्व घोडेस्वारांना मागें टाकून पुढें गेला. आपल्या घोड्याविषयीं विशेष गर्व असलेला पांथरहि मागें पडला.

कांहीं वेळानंतर आम्हांला दुसरा खेळ पहायला सांपडला. बाजूच्या घळींतून एक केसाळ गवा उड्या मारत बाहेर आला. त्याच्या बरोबरीनेंच एक रेड इंडियन तरुण त्याचा भरधांव पाठलाग करीत होता. जीभ बाहेर काढून त्या गव्यानें आपली सगळी शक्ति एकवटून पळण्याचा यत्न केला. पण तरीहि तो तरुण, त्याचं नांव हेलस्टॉर्म, त्याच्याजवळ येऊन ठेपला. हेलस्टॉर्मनें हातांतला लगाम घोड्याच्या मानेवर ठेवला. विजेसारखा आपल्या भात्यांतून चटकन बाण काढला आणि तो धनुष्याला जोडून गव्यावर सोडला.

हा खेळ पाहतांपाहतां रेनॉल्चं कौतुक आणि भाष्य चालूं होतं—"मी तुला सांगतां, एका वर्षांत हा हेलस्टॉर्म वस्तीवरच्या उत्तम शिकाऱ्यांच्या पंक्तीला जाऊन बसेल. तो बघा त्यानं बाण लगावला! शाबास, हा दुसरा दिला ठेऊन! म्हातारड्या गव्या, फुप्फुसांत घुसलेले दोन बाण कसे लागतायत? अरे वा! आणखी एक बाण मारला त्यानं! बाण सोडतांना हेलस्टॉर्म केवढी किंकाळी फोडतो पहा! पहा, पहा! तो गवा त्याच्या अंगावर चालून जातोय्. हवा तेवढा प्रयत्न कर लेका! अख्खा दिवस उड्या मारल्यास तरी तुझीं शिंगं तुला हेलस्टॉर्मच्या घोड्याच्या अंगांत खुपसतां यायचीं नाहींत."

तो गवा हेलस्टॉर्मवर पुन्हापुन्हा चालून जात होता. परंतु हेलस्टॉर्मचा घोडा विलक्षण त्वरेनं त्याला पुन्हापुन्हा चकवत होता. शेवटीं त्या गव्यानं सगळी शक्ति एकवटून हेलस्टॉर्मवर मुसंडी रोखली. हेलस्टॉर्म पळूं लागला. गवा त्याच्या पाठीमागें धावूं लागला. हा खेळ चालू असतांना आपल्या भरधांव घोड्याच्या पाठीवर एखाद्या जळूसारखा चिकटलेला हेलस्टॉर्म आमच्याकडे पाहून हंसत होता. कांहीं वेळानं तो पुन्हां गव्याच्या बाजूला आला. गव्याच्या नाकातोंडांतून रक्त वहात होतं, तरीहि तो लढण्याचा प्रयत्न करत होता. थोड्या वेळानं ते दोघंजणं टेकडीपलीकडे गेले. बरेचसे रेड इंडियन

आपले घोडे घेऊन त्या दिशेनं धांवल. आम्हीहि तिथं निघालों. पोंचलों तेव्हां टेकडीच्या बाजूला तो गवा मरून पडलेला होता. ते रेड इंडियन लोक आपल्या सुऱ्या घेऊन विलक्षण कौशल्यानं कापाकापीचं काम भराभर उरकत होते. थोड्याच वेळांत त्या प्रचंड सांगाड्याचे रक्तानं माखलेले अवशेषच तेवढे जमिनीवर राहिले—खाण्याजोग मांस सर्व कापून घेण्यांत आलं. आजूबाजूला जमलेल्या त्या रानटी लोकांचं तें दृश्य सुशिक्षितांच्या नजरेला फारसं रुचण्यासारखं नव्हतं. त्यांतले कांहीं लोक गव्याच्या मांडीचं हाड फोडून त्यांतला मगज काढून खात होते, कांहींनीं त्याच्या कलेजाचे तुकडे करून खायला सुरुवात केली होती. भुकेलेल्या लांडग्यां प्रमाणं तिथल्या तिथं त्यांचा फराळ चालला होता. त्यांचीं तोंडं या कानापासून त्या कानापर्यंत रक्तानं भरलीं होतीं. त्यांमुळं त्यांचे चेहेरे भलतेच क्रूर दिसत होते.

माझा मित्र व्हाईटशिल्ड यानं एक हाड फोडून मोठ्या कौशल्यानं त्यांतला सगळा मगज काढून माझ्यापुढं धरला. दुसरा एक त्याचवेळीं त्या गव्याच्या पोटऱ्याचा एक नाजूक भाग कापून मला देऊं लागला. परंतु या दोन्हीहि प्रेमळ देणग्यांना मी क्षमा मागून नकार दिला. एक छोटासा मुलगा हातांत सुरी घेऊन ती त्या गव्याच्या गळ्यावर आणि जबड्यावर चालवत होता. खाण्यासाठीं कसलातरी विशेष अवयव तो कापत असावा. अर्थात् अशा ताज्या मेजवानीच्या वेळीं शिकार केलेल्या प्राण्याचे कांहीं विशिष्ट अवयवच खाल्ले जातात याचा मात्र इथं उल्लेख केला पाहिजे.

त्या रात्रीं आम्ही तळ टोकला. आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही पश्चिमेच्या दिशेनं निघालों. माझ्या डायरींतली नोंद जर चुकलेली नसली तर तो १७ जुलै हा दिवस होता. दुपारीं आम्हीं एका तळ्याच्या कांठीं थोडी विश्रांति घेतली आणि संध्याकाळीं पुन्हां प्रवासाला आरंभ केला. ते रेड इंडियन एकदां मुक्काम केल्यानंतर तो खरं म्हणजे इतक्या लवकर हलवत नाहींत. परंतु होतां होईल तितके गवे शक्यतों लवकर मारून शत्रूंचा धोका असलेल्या त्या प्रदेशांतून परत यावं असंच त्यांना वाटत होतं. मावळतीला आम्ही एका झऱ्यापाशीं आलों. त्या विभागाची फारशी माहिती नसल्यानं त्या झऱ्याचं नांव बरोबरच्या रेड इंडियनांना सांगतां आलं नाहीं. आजूबाजूची भूमि इतकी वैराण होती की तिथं घोड्यांना चरण्यापुरतं गवतहि उगवलं नव्हतं. त्यामुळें इथून मुक्काम हलवणं भाग पडलं.

कुठल्या दिशेनं गेलं असतांना गवे आढळतील हा प्रश्न मेनेसीलानं रेड इंडियनांच्या श्रद्धेप्रमाणं एका दैवी शक्ति असलेल्या प्राण्याला विचारला. हा दैवी शक्ति असलेला प्राणी म्हणजे एक टोळ! टोळ मेनेसीलाच्या हातांत होता. आणि ते सगळे त्याच्याभोंवती बसले होते. रूट डिगर जमातीचे डोंगरापलीकडे राहणारे रेड इंडियन या टोळांचं कढण करतात. हें कढण फार चवदार लागतं असं कांहीं सर्वभक्षक फासेपारधी सांगतात! डाकोटा जमातींतले लोक गवे कुठल्या दिशेला आहेत हें दाखविण्याची दैवी शक्ति या टोळांत असते असं समजतात. मेनेसीलानं तो टोळ आपल्या चिमटींत धरला आणि त्याला विचारलं. "माझ्या बापा, उद्यां गवे शोधण्यासाठीं आम्हीं कुठल्या दिशेनं जावं हें तूं आम्हांला सांगशील काय?" त्या टोळानं पश्चिमेच्या दिशेनं फडफड केली तेव्हां पश्चिमेकडेच गवे आहेत अशी सर्वांची खात्री झाली.

संध्याकाळच्या वेळीं आम्ही कड्यांनीं वेढलेल्या एका कुरणावर आलों. या कुरणामधून एक झरा वहात होता. मी सगळ्यांत मागें होतों. टेकडीच्या माथ्यावरून मी खालीं पाहूं लागलों तेव्हां झऱ्याच्या कांठावरचा चढाव ते रेड इंडियन चढत असलेले मला दिसले. त्यांच्या हातांतले भाले चमकत होते. कांहीं जण झरा ओलांडतांना दिसत होते. सूर्य आतां बुडायला आला होता, टेकड्यांमधून येणारा त्याचा मृदु प्रकाश या रेड इंडियनांवर ओघळत होता.

मी रेनॉलला म्हणालों, "शेवटीं तळ ठोकायला चांगली जागा मिळाली."

रेनॉल खंवचटपणानं म्हणाला, "फारच चांगली! जर कां स्नेक जमातीचे योद्धे टेकड्यांच्या मागें लपून गोळ्या झाडतील तर विशेषच चांगली! या खबदाडांत तळ ठोकण्याची कल्पना मला मुळींच पसंत नाहीं."

टेकड्यांच्या मागून येऊन स्नेक जमातीचे लोक आपल्यावर हल्ला करतील याची जाणीव रेड इंडियनांना अर्थातच होती. एका उंच कड्यावर आपला घोडा घेऊन एक योद्धा गेला होता आणि तिथून तो आजूबाजूच्या प्रदेशाचं बारकाईनं अवलोकन करीत होता. टेहेळणी करण्यासाठीं म्हणून वेगवेगळ्या दिशांना बरेच तरुण आधींच गेले होते.

तबूं उभारले जाण्यापूर्वी कड्यांपर्यंत सावल्या पडल्या होत्या. हळूहळू सर्वत्र शांतता पसरली. इतक्यांत एक मोठी आरोळी ऐकूं आली. तेव्हां सगळीं माणसं विलक्षण उत्साहानं टेकड्यांच्या मधल्या वाटेनं, जिथून पश्चिमेकडे झरा वाहतो तिथून धावत पुढं गेलीं. पलीकडच्या टेकडीवर काळे ठिपके हलतांना

मला दिसत होते. कांहीं वेळानें ते ठिपके नाहींसे होऊन त्याऐवजीं दुसरे दिसूं लागले. तो गव्यांच्या माद्यांचा कळप होता. याचा अर्थ आम्ही शिकारीच्या क्षेत्रावर येऊन पोचलों होतों. उद्याचं आश्वासन आम्हांला मिळालं होतं.

मी अतिशय थकलों होतों. कोंग्रा टोंगाच्या तंबूंत जाऊन जरा पडलों. इतक्यांत रेमंडनं तंबूच्या दारांतून डोकं आंत घातलं आणि शिकारीचा खेळ पाहण्यासाठीं मला बाहेर बोलावलं. वस्तीच्या पश्चिमेच्या बाजूला कांहीं रेड इंडियन लोक गोळा झाले होते आणि समोर दोन मोठे गवे आपल्या अवजड चालीनं चालतांना दिसत होते. वारा त्यांच्या अंगावरून वस्तीच्या दिशेनं वहात होता. या गव्यांचा मठ्ठपणा आणि आंधळेपणा इतका होता कीं ते निर्धास्तपणें शत्रूंच्या दिशेनं स्वतःच चालत येत होते. आम्ही उभे होतों तिथून वीस यार्ड अंतरावर एका घळींत दोन तरुण पोरं बंदुका घेऊन लपून बसलीं असल्याचं रेमंडनें मला सांगितलं. ते दोन, मठ्ठ गवे डुलतडुलत चालत होते. ज्या घळींत तीं तरुण पोरं दबा धरून बसलीं होतीं त्या घळीपासून चारपांच गज अंतरावर ते गवे आले. इथं आल्यानंतर कांहींतरी चुकतं आहे याची जाणीव त्या दोघांना झाल्यासारखी दिसली. कारण डाव्या किंवा उजव्या बाजूला न पाहतां ते कांहीं क्षण स्तब्ध उभे राहिले. यानंतर त्यांच्यांतला एक जो अधिक हुशार होता त्यानं परत जाण्याचा निर्णय घेतला असावा. तो वाटोळा फिरत फिरत मागं निघाला. इतक्यांत पांढरा धूर दिसला आणि त्याबरोबर रायफलचा बार ऐकूं आला. त्या गव्यानें अवजडपणें उडी मारली आणि तो धूम पळत सुटला. मागें राहिलेला गवासुद्धा त्याच्या मागून शक्य तेवढी त्वरा करून धावूं लागला. दुसऱ्या पोरानं त्याच्यावर गोळी झाडली. आतां ते दोन्ही गवे जोरांत धावूं लागले होते. वस्तीवरचीं सगळीं तरुण पोरं मोठमोठ्यानं आरडाओरडा करत मागे धावलीं. पहिला गवा थांबला. कांहीं अंतरावर उभीं राहून तीं पोरं त्यांच्याकडे पाहूं लागलीं. झोकांड्या खात तो गवा एका बाजूनं खालीं पडला. दुसऱ्या गव्याला मर्मी जखम झाली नसल्यामुळें तो टेकड्यांत शिरून नाहींसा झाला.

अर्ध्या तासांत सर्वत्र अंधार पडला. मी झोपायला गेलों. माझी प्रकृति बरी नव्हती. परंतु उद्यां खूप शिकार मिळणार या जाणीवेमुळें मला तद्यांतहि उत्साह वाटत होता.



# १५ | गव्यांची शिकार

सूर्योदय होण्यापूर्वींच तंबूंच्या आवराआवरीला सुरुवात झाली. मेनेसीलाच्या तंबूतल्या बायकांनीं सगळ्यांच्या अगोदर आपली आवराआवर उरकली. हवा थंड होती. म्हातारा मेनेसीला आपलीं सुरकुतलेलीं बोटं शेकोटीच्या मंद झालेल्या निखाऱ्यांवर धरून बसला होता. इतर तंबू आवरले जात होते, नेहमीप्रमाणेंच सर्वत्र गोंधळ आणि अव्यवस्थता होती. कांहीं कुटुंबांचे तंबू तसेच होते, त्यांनीं अजून आपल्या तंबूंना हातहि लावला नव्हता. तें पाहून मेनेसील अस्वस्थ झाला. गव्याचं कातडं अंगाभोंवती गुंडाळून तो वस्तीच्या मध्यभागीं उभा राहिला आणि लवकर निघण्याविषयीं व्याख्यान देऊं लागला. शत्रूंचा हल्ला होण्याची या प्रदेशांत शक्यता असतांना लहान पोरांसारखं वागणं मूर्खपणाचं आहे असं त्यानं सांगितलं. त्याच्या भाषणाचा चांगला परिणाम झाला.

आळशासारख्या बसून राहिलेल्या त्या कांहीं कुटुंबानीं आपले तंबू आवरून सामान घोड्यावर लादलं. सूर्य उगवला तेव्हां प्रवासाला सुरुवात झाली.

यावेळीं तळ ठोकण्यासाठीं अधिक चांगली आणि सुरक्षित जागा शोधण्याकरितां इथून मुक्काम हलवला होता. तीनचार मैलांवर सोईस्कर जागा पाहून तिथं तळ ठोकला गेला. पुरुष मंडळी मात्र घोड्यावरून उतरली नाहीं. यावेळीं हे योद्धे त्यांच्याजवळच्या अतिशय सामान्य घोड्यांवर बसले होते. प्रत्येकानं आपला उत्तम घोडा गळयांत दोरी बांधून बरोबर घेतला होता. बायका तंबू ठोकत असतांना हे घोडेस्वार पश्चिमेकडच्या माळाकडे निघाले.

मीं कांहीं खाल्लं नव्हतं. अधिक संयम दाखविण्याची माझी इच्छा नव्हती. तेव्हां मी माझ्या यजमानाच्या तंबूंत गेलों आणि तंबूच्या मध्यभागीं जाऊन बसलों. तंबूच्या मध्यभागीं बसलं कीं भूक लागली आहे असं सुचवलं जातं. सुकवलेल्या मांसाचा पदार्थ माझ्या यजमानाच्या बायकोनं कटोऱ्यांत घालून समोर आणून ठेवला. माझ्या उपवासाचं पारणं मीं फेडलं आणि तंबूच्या बाहेर आलों. शिकाऱ्यांचा शेवटचा गट जाण्याच्या तयारींत होता. मी चटकन् पॉलीनवर स्वार झालों आणि त्यांच्यामागून निघालों. खरं म्हणजे घोडा चालवण्याची शक्ति माझ्यांत नव्हती. पॉलीन पुढें जात होती. मी फक्त तोल सावरण्याची दक्षता घेत होतों.

एका टेकडीच्या माथ्यावर येऊन मी उभा राहिलों. पलीकडच्या माळावर पाहिलं. रेड इंडियन घोडेस्वारांचे गट वेगानं जात असलेले दिसत होते. मी पुढें झालों आणि शेवटच्या स्वाराला गाठलं. मैलभर गेल्यानंतर आम्ही सगळे एकत्र आलों. शिकारीला सुरुवात करण्यासाठीं सर्व उत्सुक होते. प्रत्येक शिकाऱ्यानं सर्वांत प्रथम शिकार गाठण्यासाठीं म्हणून आपापल्या घोड्याला चाबूक लगावला. अशा वेळीं रेड इंडियन शिकारी एकत्र जमले कीं सहसा असंच होतं. मन मानेल त्या दिशेनं प्रत्येकजण दौडूं लागतो. यावेळीं तर विशेषच तसं झालं. याचं कारण असं कीं जमातीचा प्रमुख हजर नव्हता. आणि दुसरं कारण म्हणजे शिकारीची दिशा दाखवण्याचं ज्यांच्या अनेक कामांपैकीं एक काम असतं असे वस्तीवरचे रेड इंडियन 'पोलीस'हि यावेळीं कमी होते. आम्ही सगळे झुडपं आणि टेकड्या ओलांडत चौक चालीनं घोडे फेकत निघालों. वाटेंत कुणीहि बोलत नव्हतं. फक्त एकदांच मी एक म्हातारा रेमंडला दम देत होता तें ऐकलं. रेमंड आपली रायफल विसरून आला होता.

जिथं शत्रूचा धोका आहे तिथं रायफल विसरून येणं हें किती चुकीचं आहे ही गोष्ट तो म्हातारा रेमंडला सांगत होता. दाट झुडपं असलेला एक माळ आम्हीं ओलांडला. आघाडीवरील घोडेस्वार जमिनींत गडप झाल्यासारखा एकदम नाहींसा झाला. जमिनीला प्रचंड भेग पडून एक खोल घळ तयार झाली होती. घळ उतरून आम्ही तळाशीं गेलों आणि तिथून घोड्यांना चढून पलीकडे जाणं शक्य होईल अशी एक वाट शोधून काढली. कांहीं वेळानं आम्ही एका रुंद झऱ्यापाशीं आलों. झऱ्याचं पाणी उथळच होतं. बरेच स्वार घोड्यावरून उतरले आणि कांठावर गुडघे टेकून खालीं वाकून पाणी प्यायले.

दरम्यानच्या काळांत पुढे गेलेल्या टेहेळ्यांचा गट पलीकडच्या टेकड्यांवर जाऊन गव्याचीं कातडीं हवेंत हलवून कळप दिसत असल्याचं आम्हांला खुणेनं सांगत होता. प्रथम आम्हांला मागें राहिलेले कांहीं गवे दिसले. याखेरीज कळप असा कांहीं दिसला नाहीं. पुन्हां कांहीं वेळानं टेकड्यावर उभे असलेले टेहेळे खुणा करूं लागले. यावेळीं ते टेकड्यांच्या माथ्यावर उभे न राहतां किंचित् खालीं वाकून लपल्यासारखे खुणा करीत होते. यावरून बरेच गवे त्यांच्या दृष्टीला पडलेले असावेत हें उघड होतं. सगळ्या घोडेस्वारांनीं आपल्या थकलेल्या घोड्यांना जोरांत दामटलं. आजारी पॉलीन थकून धापा टाकूं लागली. तिचा पिवळट रंग घामामुळें काळसर दिसत होता.

वाटेंत एक टेकडी आली. आम्ही ती ओलांडून जात होतों. इतक्यांत डाव्या बाजूनं रेनॉल आणि रेमंड मला हांका मारत असल्याचं मीं ऐकलं. मी तिथं पाहिलं. अगदीं भिकार दिसणाऱ्या वीस एक रेड इंडियनांच्या ताफ्यामागून हे दोघे जात होते. रेनॉलची वाई मार्गारेट हिचे तें नातेवाईक होते. त्यांना सगळ्यांबरोबर या शिकारींत भाग घ्यायचा नव्हता आणि म्हणून ही सगळी मंडळी तिथून कांहीं अंतरावर असलेल्या एका घळीकडे निघाली होती. त्या घळींत गव्यांचा एक छोटासा कळप होता. तो कळप मनांतल्या मनांत त्यांनीं आपल्यासाठीं राखून ठेवला होता. मी रेमंडला हांक मारून परत फीर आणि माझ्या मागें चल असा हुकूम केला. माझी आज्ञा होतांच रेमंड मनाविरुद्ध परत फिरला. रेनॉलला शिकार केल्यानंतर कापाकापी करण्यासाठीं आणि मांस तंबूतळापर्यंत नेण्यासाठीं रेमंड बरोबर यायला हवा होता. परंतु तो येत नाहीं असं पाहून त्यानं जोरानं ओरडून सांगितलं कीं तुम्ही जर आमच्याबरोबर

आलं नाहीं तर तुम्हांला खरी शिकारच पहायला मिळणार नाहीं. मी आणि रेमंड रेनॉलला त्याच्या वाटेवर सोडून इतरांबरोबर निघालों. आणि रेनॉल एकटाच त्याच्या बाईच्या नातेवाईकांच्या तांड्यामागून जाऊं लागला.

सगळे मिळून शंभर रेड इंडियन दौडत निघाले होते. त्यांच्या घोड्यांच्या टांपांमुळें धुळीचे ढग हवेंत उडत होते. मी थोडा मागं राहिलों होतों. जिथं ते टेहेळे उभे होते तिथं पोचल्यानंतर सर्व शिकारी थांबले तेव्हांच मी त्यांना गांठूं शकलों. प्रत्येक शिकाऱ्यानं आपला उत्तम घोडा आपल्याबरोबर घेतला होता याचा उल्लेख मीं पूर्वीं केलाच आहे. ज्या घोड्यावर बसून इथपर्यंत ते आले होते त्यावरून आतां ते उतरले आणि आपापल्या उत्तम घोड्यांवर स्वार झाले. कुणाजवळहि खोगीर किंवा लगाम नव्हता. खोगीराच्या ऐवजीं गव्याचं कातडं आणि लगामाच्या ऐवजीं वळलेल्या केसाची दोरी हीं साधनं वापरलीं गेलीं होतीं. प्रत्येक घोडेस्वाराच्या अंगावर लंगोटीखेरीज दुसरा कपडा नव्हता. सांबराच्या शिंगाची मूठ असलेला चाबूक प्रत्येकाच्या हातांत होता. प्रत्येकानं आपापलं धनुष्य हातांत घेतलं होतं आणि माशाच्या किंवा चित्त्याच्या कातड्याचा केलेला भाता खांद्याला लटकावला होता. त्यांच्यापैकीं तीस शिकारी डाव्या हातानं टेकड्यांना वळसा घालून गेले गव्यांच्या कळपाला दोन्हीं बाजूंनीं गाठावं म्हणून ही योजना होती. ते जाऊन पोचेपर्यंत उरलेले शिकारी कांहीं वेळ थांबून राहिले, त्यानंतर आम्ही टेकडीच्या माथ्यावर जाऊन पोंचलों. पलीकडच्या माळावर गव्यांचा कळप आम्हांला दिसला.

त्या सगळ्या माद्या होत्या. त्यांची संख्या चारपांचशेंच्या आसपास असावी. एका रुंद झऱ्याच्या कांठाशीं हा कळप चरत होता. पुढे गेलेले शिकारी त्यांच्या दिशेनं जात असलेले आम्हीं पाहिले. वाऱ्याची दिशा शिकाऱ्यांच्या विरुद्ध होती. त्यामुळें गव्यांना त्यांचा वास आला. त्यांचे घोळके अस्वस्थ झाल्याचं चिन्ह दिसूं लागलं.

अनेक म्हातारे गवे माळावर इतस्ततः विखुरले होते. आमची चाहूल लागतांच कळप सोडून ते टेकड्यांच्या दिशेनं पळूं लागले. एक म्हातारा गवा मागे राहिला होता. त्याचा एक पाय मोडलेला होता. तो मोडलेला पाय उगीचच आपला लोंबत होता. तो तीन पायांवर धांवत जातांना हास्यास्पद दिसत होता. तशा त्या घाईतहि ही गंमत पाहण्यासाठीं म्हणून मी कांहीं क्षण उभा राहिलों. थोड्या वेळानं मी त्याच्याजवळ गेलों. तेव्हां हे लंगडेश्वर झोकांड्या खात

जिथं शत्रूचा धोका आहे तिथं रायफल विसरून येणं हें किती चुकीचं आहे ही गोष्ट तो म्हातारा रेमंडला सांगत होता. दाट झुडपं असलेला एक माळ आम्हीं ओलांडला. आघाडीवरील घोडेस्वार जमिनींत गडप झाल्यासारखा एकदम नाहींसा झाला. जमिनीला प्रचंड भेग पडून एक खोल घळ तयार झाली होती. घळ उतरून आम्ही तळाशीं गेलों आणि तिथून घोड्यांना चढून पलीकडे जाणं शक्य होईल अशी एक वाट शोधून काढली. कांहीं वेळानं आम्ही एका रुंद झऱ्यापाशीं आलों. झऱ्याचं पाणी उथळच होतं. बरेच स्वार घोड्यावरून उतरले आणि कांठावर गुडघे टेकून खालीं वाकून पाणी प्यायले.

दरम्यानच्या काळांत पुढे गेलेल्या टेहेळ्यांचा गट पलीकडच्या टेकड्यांवर जाऊन गव्याचीं कातडीं हवेंत हलवून कळप दिसत असल्याचं आम्हांला खुणेनं सांगत होता. प्रथम आम्हांला मागें राहिलेले कांहीं गवे दिसले. याखेरीज कळप असा कांहीं दिसला नाहीं. पुन्हां कांहीं वेळानं टेकडयावर उभे असलेले टेहेळे खुणा करूं लागले. यावेळीं ते टेकडयांच्या माथ्यावर उभे न राहतां किंचित् खालीं वाकून लपल्यासारखे खुणा करीत होते. यावरून बरेच गवे त्यांच्या दृष्टीला पडलेले असावेत हें उघड होतं. सगळ्या घोडेस्वारांनीं आपल्या थकलेल्या घोड्यांना जोरांत दामटलं. आजारी पॉलीन थकून धापा टाकूं लागली. तिचा पिवळट रंग घामामुळें काळसर दिसत होता.

वाटेंत एक टेकडी आली. आम्ही ती ओलांडून जात होतों. इतक्यांत डाव्या बाजूनं रेनॉल आणि रेमंड मला हांका मारत असल्याचं मीं ऐकलं. मी तिथं पाहिलं. अगदीं भिकार दिसणाऱ्या वीस एक रेड इंडियनांच्या ताफ्यामागून हे दोघे जात होते. रेनॉलची बाई मार्गांट हिचे ते नातेवाईक होते. त्यांना सगळ्यांबरोबर या शिकारींत भाग घ्यायचा नव्हता आणि म्हणून ही सगळी मंडळी तिथून कांहीं अंतरावर असलेल्या एका घळीकडे निघाली होती. त्या घळींत गव्यांचा एक छोटासा कळप होता. तो कळप मनांतल्या मनांत त्यांनीं आपल्यासाठीं राखून ठेवला होता. मी रेमंडला हांक मारून परत फीर आणि माझ्या मागें चल असा हुकूम केला. माझी आज्ञा होतांच रेमंड मनाविरुद्ध परत फिरला. रेनॉलला शिकार केल्यानंतर कापाकापी करण्यासाठीं आणि मांस तंबूतळापर्यंत नेण्यासाठीं रेमंड बरोबर यायला हवा होता. परंतु तो येत नाहीं असं पाहून त्यानं जोरानं ओरडून सांगितलं कीं तुम्ही जर आमच्याबरोबर

आलं नाहीं तर तुम्हांला खरी शिकारच पहायला मिळणार नाहीं. मी आणि रेमंड रेनॉलला त्याच्या वाटेवर सोडून इतरांबरोर निघालों. आणि रेनॉल एकटाच त्याच्या बाईच्या नातेवाईकांच्या तांड्यामागून जाऊं लागला.

सगळे मिळून शंभर रेड इंडियन दौडत निघाले होते. त्यांच्या घोड्यांच्या टापांमुळें धुळीचे ढग हवेंत उडत होते. मी थोडा मागं राहिलों होतों. जिथं ते टेहेळे उभे होते तिथं पोचल्यानंतर सर्व शिकारी थांबले तेव्हांच मी त्यांना गांठूं शकलों. प्रत्येक शिकाऱ्यानं आपला उत्तम घोडा आपल्याबरोबर घेतला होता याचा उल्लेख मीं पूर्वी केलाच आहे. ज्या घोड्यावर बसून इथपर्यंत ते आले होते त्यावरून आतां ते उतरले आणि आपापल्या उत्तम घोड्यांवर स्वार झाले. कुणाजवळहि खोगीर किंवा लगाम नव्हता. खोगीराच्या ऐवजीं गव्याचं कातडं आणि लगामाच्या ऐवजीं वळलेल्या केसाची दोरी हीं साधनं वापरलीं गेलीं होतीं. प्रत्येक घोडेस्वाराच्या अंगावर लंगोटीखेरीज दुसरा कपडा नव्हता. सांबराच्या शिंगाची मूठ असलेला चाबूक प्रत्येकाच्या हातांत होता. प्रत्येकानं आपापलं धनुष्य हातांत घेतलं होतं आणि माशाच्या किंवा चित्त्याच्या कातड्याचा केलेला भाता खांद्याला लटकावला होता. त्यांच्यापैकीं तीस शिकारी डाव्या हातानं टेकड्यांना वळसा घालून गेले गव्यांच्या कळपाला दोन्हीं बाजूंनीं गाठावं म्हणून ही योजना होती. ते जाऊन पोचेपर्यंत उरलेले शिकारी कांहीं वेळ थांबून राहिले, त्यानंतर आम्ही टेकडीच्या माथ्यावर जाऊन पोंचलों. पलीकडच्या माळावर गव्यांचा कळप आम्हांला दिसला.

त्या सगळ्या माद्या होत्या. त्यांची संख्या चारपांचशेंच्या आसपास असावी. एका रुंद झऱ्याच्या कांठाशीं हा कळप चरत होता. पुढे गेलेले शिकारी त्यांच्या दिशेनं जात असलेले आम्हीं पाहिले. वाऱ्याची दिशा शिकाऱ्यांच्या विरुद्ध होती. त्यामुळें गव्यांना त्यांचा वास आला. त्यांचे घोळके अस्वस्थ झाल्याचं चिन्ह दिसूं लागलं.

अनेक म्हातारे गवे माळावर इतस्ततः विखुरले होते. आमची चाहूल लागतांच कळप सोडून ते टेकड्यांच्या दिशेनं पळूं लागले. एक म्हातारा गवा मागे राहिला होता. त्याचा एक पाय मोडलेला होता. तो मोडलेला पाय उगीचच आपला लोंबत होता. तो तीन पायांवर धांवत जातांना हास्यास्पद दिसत होता. तशा त्या घाईंतहि ही गंमत पाहण्यासाठीं म्हणून मी कांहीं क्षण उभा राहिलों. थोड्या वेळानं मी त्याच्याजवळ गेलों. तेव्हां हे लंगडेश्वर झोकांड्या खात

माझ्यावर चालून येऊं लागले. इतक्यांत माझ्याबरोबरचे शिकारी जवळजवळ शंभर यार्ड पुढें गेल्याचं माझ्या ध्यानांत आलं तेव्हां गव्याचा नाद सोडून मी निघालों आणि त्यांना गाठलं. सगळे शिकारी त्या कळपावर एकदम हल्ला करतां यावा म्हणून आपले घोडे सर्व बाजूंनीं आंत घुसवण्याच्या वेतांत होते. धुळीचे ढग उडत होते, आरडाओरड, किंकाळ्या ऐकूं येत होत्या. घोडेस्वार भरधांव घोडे फेकत होते.

कळपावर आम्हीं दोन्ही बाजूंनीं हल्ला केला. गव्यांचे छोटेछोटे गट रांग करून पळतांना दिसूं लागले. त्यांच्यावर बाणांचा वर्षाव करत रेड इंडियन त्यांचा पाठलाग करूं लागले. अंगांत बाण घुसलेले गवे ताठ केस उभे राहिलेल्या एकाद्या प्रचंड मांजरासारखे जळजळीत डोळ्यांनीं पहात घोड्यां-जवळून पळून जाण्याचा दुबळा प्रयत्न करत. घसटून जाणाऱ्या गव्यांचं रक्त माझ्या पॉलीनला लागत होतं.

त्या दिवशीं सकाळीं तंबूतळ सोडतांना मी अगदीं तात्त्विक निश्चय करून निघालों होतों. माझी प्रकृति बरी नव्हती आणि माझी घोडीहि आजारी होती. तेव्हां अशा परिस्थितींत आपण प्रत्यक्ष शिकारींत भाग न घेतां तटस्थपणें तो शिकारीचा खेळ पहायचा हाच तो माझा निश्चय होता. परंतु शिकारीच्या स्थळीं जेव्हां घोड्यांची आणि गव्यांची धावाधाव सुरू झाली, धुळीचे ढग उटूं लागले, तेव्हां स्वस्थ बसून हा खेळ पाहणं मला अशक्य झालं. चारपांच गवे रांगेनें माझ्याजवळून धावत गेले. त्याक्षणीं मी पॉलीनला चाबूक मारला आणि पाठलाग सुरू केला. झऱ्याचं पाणी आणि रेती तुडवत, कांठावरची चढण चढत, झुडपं ओलांडत मी त्यांचा पाठलाग करत होतो. पॉलीन चांगल्या जातीची घोडी होती. तिनं जोरांत धावावं म्हणून मी चाबूक फटकावत होतों. परंतु पॉलीन इतकी थकलेली होती कीं कशानेंहि तिच्या वेगांत भर पडणं शक्य नव्हतं. पळून जाणाऱ्या गव्यांना गाठणं, नव्हे, आमच्यांतलं अंतर एक इंचानेंहि कमी करणं शक्य झालं नाहीं.

वेगानं धावत धावत तो कळप एका घळीच्या तोंडापाशीं आला. घळ रुंद असल्यामुळें उडी मारून जाणं शक्य नव्हतं. त्यामुळें अचानक तो कळप डावीकडे वळला. कळपांतल्या शेवटच्या गव्यापासून दहाबारा यार्ड अंतरावर आतां मी येऊन ठेपलों होतों. कळपाच्या शेवटीं असलेली ती मादी मागं वळली आणि माझ्यावर चाल करून आली. मीं गोळी झाडली. ती तिच्या

मानेंत जाऊन बसली. ती तशीच तडमडत घळ उतरून ज्या वाटेनं कळप गेला होता त्या वाटेनं गेली. घळीच्या तळाशीं गव्यांचे काळे पृष्ठभाग वेगानं सरकत पुढं जात असलेले मला दिसत होते. घळीची एक बाजू एकामागून एक चढत ते पलीकडे गेले. जखमी झालेली ती मादी सगळ्यांच्या मागून जात होती.

मीं मागं वळून पाहिलं. रेमंड आपल्या काळ्या खेचरावर बसून मला शोधत येत होता. आम्ही दोघेजण माळ ओलांडत निघालों. वाटेंत अनेक गव्यांचे सांगाडे पडलेले दिसत होते. दूर अंतरावर घोडेस्वार गव्यांचा पाठ-लाग करतांना आम्हीं पाहिले. इथें धुळीचे ढग उडत होते. टेकड्यांच्या बाजूंनीं भ्यालेल्या गव्यांच्या रांगा वेगानं धावत होत्या.

आतां शिकारी परतले. टेकडीच्या मागें घोडे धरून उभी असलेलीं पोरं माळावर आलीं. गवे कापण्याचं आणि सोलण्याचं काम सुरू झालं. माझा यजमान कोंग्रा-टोंगा झऱ्याच्या पलीकडच्या बाजूला त्यानं नुकत्याच मारलेल्या गव्याच्या शेजारीं घोड्यावरून उतरत होता. मी त्याच्याजवळ गेलों. गव्याच्या अंगांत घुसलेला बाण तो बाहेर काढत होता. बाणाचं शेवटचं लहानसं टोंक सोडल्यास सगळा बाण आंत घुसला होता. मी त्याच्याजवळून तो बाण मागून घेतला. ज्या कौशल्यानं आणि सामर्थ्यानं रेड इंडियन आपला बाण मारतात त्याचा पुरावा म्हणून—अर्थात हा कांहीं अगदीं बिनतोड पुरावा आहे असं म्हणतां येणार नाहीं—तो बाण मीं अजून जपून ठेवला आहे. गव्याची कातडी आणि मांस घोड्यावर लादून आतां सगळे परत निघाले होते. मी आणि रेमंडसुद्धां आतां कंटाळलों होतों. वाटेंतला रेताड माळ ओलांडून आम्ही दोघे वस्तीवर जायला निघालों. आम्हीं जिथून जात होतों तिथं वाट अशी नव्हतीच. वस्तीकडे कुठल्या दिशेनं जायचं याची कसलीच खूण दिसेना. परंतु कुठल्या दिशेनं जायचं याचं रेमंडला अचूक ज्ञान होतं. —नव्हे त्याची एकप्रकारची सहजप्रेरणा त्याला होती. अनेक काळवीट धावतांना दिसत होते. गव्यांच्या कळपाच्या आसपास असले कीं या काळविटांच्या अंगांत एकप्रकारची धिटाई येते. खडकाळ चढणीवर जाऊन ते आमच्याकडे पहात उभे रहात. जातांजातां आम्हांला दूरच्या एका उंच खडकावरचा जुनाट पाईन वृक्ष दिसला. त्याच्या खालींच आमचा तळ होता. अजूनपर्यंत वस्ती मात्र आम्हांला दिसूं शकली नव्हती. थोड्या वेळानं आम्ही एक गवताळ टेकडी चढून गेलों. टेकडीच्या

माथ्यावरून खालीं पाहिलं तेव्हां फटक्यातुटक्या कातड्याचे बांधलेले अनेक तंबू आम्हांला दिसूं लागले.

मीं माझ्या यजमानाच्या तंबूंत प्रवेश केला. त्याच्या बायकोनं चटकन् मला पाणी आणि कटोऱ्यांतून खाणं आणून दिलं. आम्हांला विश्रांति घेण्यासाठीं म्हणून गव्याचं कातडं अंथरलं. मी इतका थकलों होतों कीं थोडयाच वेळानं मी गाढ झोपलों. साधारण एका तासानंतर कोंग्रा-टोंगा आंत आला तेव्हां मला जाग आली. त्याचे हात कोपरापर्यंत रक्तानं माखले होते. डाव्या बाजूच्या नेहमीच्या जाग्यावर तो बसला. बायकोनं हात धुण्यासाठीं पाणी आणि बाजूला शिजवलेल्या मांसाचा कटोरा आणून ठेवला. तो खातां खातां तिनं त्याच्या पायांतले रक्तानं माखलेले जोडे काढून ठेवले. आणि नवे स्वच्छ जोडे त्याच्या पायांत घातले. खाणं संपल्यानंतर थोडयाच वेळांत हातपाय पसरून तो झोपी गेला.

सगळे शिकारी गटागटानं आतां परत येत होते. आपल्या बायकोच्या हवालीं घोडा करून ते तंबूंत शिरले. बायका घोडयाच्या पाठीवर लादलेलं कातडं आणि मांस काढून घेत. प्रत्येक तंबूसमोर मांस आणि कातडं यांचा ढिगारा झाला होता. थोडया वेळानं अंधार पडला. शेकोट्या पेटलेल्या दिसूं लागल्या, त्यांच्या प्रकाशानं वस्ती उजळून निघाली. रेड इंडियन बायका आणि पोरं मांसाच्या ढिगाऱ्याभोंवती जमून एकादा विशेष चवदार भाग खायला मिळतो काय हें पहात होत्या. कांहीं जणी काठीला मांस टोचून आगीवर भाजून खात. परंतु कांहीं जणी या निष्कारण उपाधीच्याहि फंदांत पडत नसत, एकादा तुकडा उचलून तसाच तोंडांत टाकत. रात्र बरीच झाली होती. शेकोट्या अजून जळत होत्या. खाण्याचा कार्यक्रम अजूनहि चालू होता. शेकोट्यांच्या प्रकाशांत ताव मारणारीं माणसं दिसत होतीं.

कोंग्रा-टोंगाच्या शेकोटीभोंवती अनेक शिकारी जमले होते. आपापल्या शिकारीचं रसभरित वर्णन करून ते सांगत होते. इतक्यांत म्हातारा मेनेसीला तिथं आला. ऐंशीं वर्षांचं त्याचं वय होतं. पण तरीहि त्यानं शिकारींत भाग घेतला होता. आपण दोन गवे मारल्याचं त्यानं मोठ्या अभिमानानं सांगितलं धूळ डोळ्यांत गेल्यामुळें आपले डोळे दुखूं लागले, पुढचं कांहीं दिसेना नाहींतर आणखी एक तिसरा गवा आपल्या बाणाला बळी पडला असता असं त्यानं सांगितलं. त्याच्या सुरकुतलेल्या देहावर शेकोटीचा प्रकाश पडला होता.

तो गंमतीदार हातवारे करून आपली गोष्ट सांगत होता. आणि शेकोटीभोंवतीचीं माणसं त्याच्या पराक्रमाचं आख्यान ऐकतांना मोठमोठ्यानं हंसत होतीं.

ज्याच्याजवळ मी डोळे मिटून विश्वासानं राहू शकलों असतों असा मेनेसीला हा एकच रेड इंडियन होता. त्यानं जर मला एकादी भेट दिली तर मी ती निश्चिंत मनानं घेऊं शकत असे. कारण त्यामागें कसलाहि स्वार्थी हेतु नसणार याची मला खात्री असे. गोऱ्या लोकांचा तो खराखुरा मित्र होता. त्यांच्या सहवासांत राहणं त्याला आवडे. गोऱ्या लोकांकडून एकादी भेट मिळणं हीं अभिमानाची गोष्ट आहे असं तो मानी. एकदां दुपारीं त्याच्या मुलाच्या तंबूंत आम्ही बसलों असतांना त्यानं मला सांगितलं होतं कीं या पृथ्वीतलावर ज्यांना शहाणे म्हणतां येईल असे दोघेच—एक म्हणजे बीव्हर हा प्राणी आणि दुसरे म्हणजे गोरे लोक. बीव्हर आणि गोरे लोक खरं म्हणजे एकच आहेत अस त्यांचं मत होतं. आपल्या या मताविषयीं ज्यामुळं त्याची इतकी खात्री पटली तो प्रसंगहि त्यानं मला सांगितला. तो म्हणाला कीं तरुण असतांना त्यानं पूर्वी कधीं गोरे लोक पाहिले नव्हते. तो आणि त्याचे तीनचार मित्र असेच एकदां बीव्हरच्या शिकारीला निघाले. बीव्हरच्या एका मोठ्या विवरा-पाशीं ते आले. मेनेसीला विवराच्या तोंडापाशीं गेला आणि सरपटत आंत शिरला. बरंच अंतर सरपटून पुढं गेल्यानंतर श्वास कोंडला जाऊन त्याला मूर्च्छा आली. तो शुद्धीवर आला तेव्हां विवराबाहेर उभ्या असलेल्या आपल्या सहकाऱ्यांचा आवाज त्याला अंधुक अंधुक ऐकूं येऊं लागला. विवरांत शिरलेला मेनेसीला मेला या कल्पनेनं ते मृत्युगीत गात होते.

मेनेसीलानं डोळे उघडून आजूबाजूला पाहण्याचा प्रयत्न केला. विवरांतल्या त्या दमट काळोखांत त्याला प्रथम कांहींच दिसेना; पण थोड्या वेळानं त्याला समोर कांहीं तरी पांढऱ्या वस्तू हलल्यासारखा भास होऊं लागला. शेवटीं त्या आकृती स्पष्ट झाल्या. तीं तीन गोरीं माणसं होतीं. एक पुरुष आणि दोन स्त्रिया. काळंभोर पाणी असलेल्या एका छोट्याशा तळ्याच्या कांठाशीं हीं तीन माणसं बसलीं होतीं. मेनेसीला भ्याला. तो तसाच विवराच्या बाहेर आला. बाहेर आल्यानंतर विवराच्या पलीकडच्या तोंडाकडे जिथं त्या तीन पांढऱ्या आकृती दिसल्या होत्या तिथं गेला. बरोबर आणलेल्या मोठ्या पहारीनें त्यानं तिथं एक भोक केलं. आणि बाजूलाच पुढं काय होतं हें पाहण्यासाठीं तो बसला. इतक्यांत त्या भोकाच्या तोंडाशीं एका बीव्हरचं डोकं दिसलं. तो नर होता. मेनेसीला

चटकन् पुढं झाला आणि त्यानं त्या बीव्हरला वर खेचून काढलं. त्याच्यामागून त्या दोन माद्या आल्या. मेनेसीलानं त्यांचीहि तीच गत केली. आपली ही गोष्ट सांगून मेनेसीला म्हणाला होता, विवराच्या आंतल्या बाजूला पाण्याच्या कडेला बसलेले जे तीन गोरे लोक पाहिले ते म्हणजे हे तीन बीव्हरच होत. मेनेसीलानं हा सगळा प्रकार स्वप्नांतच पाहिला असावा.

जमातीची परंपरा आणि पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या कहाण्या यांचा फार मोठा सांठा मेनेसीलाकडे होता. या त्याच्या कहाण्यांपैकीं मला फार थोडाच भाग मिळाला. मला एवढं कमी कथाधन मिळण्याचं कारण म्हणजे मेनेसीलाची अंधश्रद्धा हेंच होय. गोष्ट सांगायला सुरुवात केली कीं तो मध्येंच थांबे आणि म्हणे, "उन्हाळ्यांत गोष्ट सांगणं हें चांगलं लक्षण नव्हे. तूं पुढच्या हिंवाळ्यापर्यंत थांब मग मी मला ठाऊक असलेलं सर्व तुला सांगतों. आमचे लोक आतां युद्धावर गेलेले आहेत. हिंवाळ्यांतलं धुकं पडायच्या आंत जर मी गोष्टी सांगितल्या तर आमचे योद्धे लढाईत मारले जातील."

विषयांतर सोडून आतां मी मूळ हकिगतीकडे वळतों. पांच दिवस आमचा या ठिकाणीं तळ होता. पहिले तीन दिवस शिकारी सारखे काम करीत होते. मांसाचे आणि कातड्याचे ढिगारे आणले जात होते. वस्तीवर या दिवसांत मात्र घबराटीचं वातावरण होतं. सगळेजण अतिशय सावध होते. तरुण माणसं टेहेळणी करण्याकरतां आजूबाजूच्या परिसरांत जाऊन येत होतीं. म्हातारीं माणसं स्वप्नं, शकुन, लक्षणं यांच्याकडे डोळ्यांत तेल घालून पहात होतीं. खरं म्हणजे शत्रू जर आजूबाजूला असते तर त्यांना हा तळ सहजच दिसला असता. परंतु त्यांना भिववण्यासाटीं म्हणून टेकड्यांवर पहारेकऱ्यांचा भास होण्यासाटीं काठ्या आणि दगड उभे करून ठेवण्यांत आले होते.

आजहि तें दृश्य माझ्या डोळ्यासमोर तसंच्या तसं उभं राहातं. तो उंच पांढरा खडक, त्याच्या माथ्यावर असलेला तो जुनाट पाईन वृक्ष, या चढावाच्या पायथ्याकडून वाहणारा, वस्तीला अर्धं वेढून टाकणारा झरा, मंद हिरव्या रंगाचीं तीं झुडपं आणि त्यांचा औषधासारखा वास, तंबूपासून झऱ्यापर्यंत हातांत भांडीं घेऊन येरझारा करणाऱ्या तरुण स्त्रिया हें सगळं माझ्या डोळ्यांसमोर उभं आहे. तरुण माणसं शिकारीला जात आणि अर्धाअधिक दिवस स्त्रिया, मुलं, अतिशय म्हातारीं अशीं दोनतीन माणसं आणि कांहींहि काम न करणारे कांहीं आळशी तरुण एवढेच वस्तीवर आढळत. यांच्याबरोबरच

भरपूर खायला मिळाल्यामुळें माजलेले आणि त्यामुळें थोडे सुस्वभावी झालेले वस्तीवरचे कुत्रेहि असत. पण असं असूनहि तें दृश्य धांवपळीचं, गडबडीचं दिसे. सगळ्या तंबूंच्या समोर चामड्याच्या वाद्यांवर टांगलेलं गव्यांचं मांस उन्हांत सुकत असे. म्हाताऱ्या, आणि तरुण स्त्रिया गव्यांचीं कातडी जमिनीवर पसरून प्रथम त्यावरचे केस तासून तीं स्वच्छ करत. त्यानंतर त्या कातड्यांना नरमपणा आणि लवचिकपणा यावा म्हणून त्या गव्यांचे मेंदू त्यावर घासत.

दुसऱ्या दिवशीं माझ्या घोडीवर आणि खुद्द माझ्यावरहि दया दाखवून मी कांहीं शिकारीला उतरलों नाहीं. गेले कांहीं दिवस आजाराचा झटका मला आला नसल्यामुळें माझ्या अंगांत बरीचशी शक्ति आलेली होती. फारसे कष्ट न पडतां लवकरच मला चालतां येऊं लागलं. मी आणि रेमंड जवळच्याच माळावर काळविटीच्या किंवा चुकून मागं राहिलेल्या गव्याच्या शिकारीसाठीं पायींच जात होतों. एके दिवशीं सकाळीं मी कोंग्रा-टोंगाच्या तंबूतून बाहेर आलों. इतक्यांत पलीकडच्या बाजूला असलेल्या रेनॉलनं मला हांक मारली आणि न्याहारीला बोलावलं. न्याहारी चांगली यथास्थित होती. गव्याच्या मादीच्या मांडीचा मागचा भाग खाण्यासाठीं ठेवलेला होता. तो चांगला रसरशीत आणि चमचमीत होता. एका काठीला टोंचून तो भाग आगीवर भाजला गेला. मग रेनॉलनं ती काठी तशीच घेतली आणि तंबूसमोरच्या जमिनीवर रोवून ठेवली. आम्हीं आमच्या सुऱ्या काढल्या. त्या रोवलेल्या काठीच्या भोंवती बसलों. त्या मांसावर टाकायला मीठ नव्हतं किंवा बरोबर रोटीहि नव्हती. वैद्यकशास्त्र माझ्या प्रकृतीविषयीं कांहींहि म्हणो तें मांस मला उत्तम मानवलं हें सत्य आहे.

रेनॉल म्हणाला, "रात्र पडायच्या आंत पाहुणे येणार आहेत."

"तुला कसं कळलं?" मी विचारलं.

"मला तसं स्वप्न पडलं. या रेड इंडियन लोकांप्रमाणेंच माझींहि स्वप्नं खरीं होतात. माझ्या सारखंच हेलस्टॉर्मलाहि स्वप्न पडलं. तो आणि त्याचा मित्र रॅबिट शोध घेण्यासाठीं म्हणून निघाले आहेत."

रेनॉलच्या अंधश्रद्धेचं मला हंसू आलं. मी माझ्या यजमानाच्या तंबूंत गेलों. माझी रायफल घेतली आणि बाहेर पडलों. माळावर मैल दोन मैल पुढं गेल्या-नंतर मला एक म्हातारा गवा एकटाच उभा असलेला दिसला. मी गोळी

झाडली परंतु तो पळाला. मी थकून निरुत्साही मनानं परतलों. परत येऊन पाहतों तर योगायोगाचं आश्चर्यकारक उदाहरण मला दिसलं :

रेनॉलचं स्वप्न खरं झालं होतं. दोन पाहुणे आले होते. हे दोन पाहुणे म्हणजे पंधरा दिवसांपूर्वी आमचा राम राम घेऊन शिकारीसाठीं मेडिसिन बो या डोंगरावर गेलेले रोलो आणि सॅरॅफिन हे दोघे फासेपारधी होते. त्यांचा सहवास कांहीं विशेष संस्कारी होता, हवाहवासा वाटावा असा होता असं कांहीं म्हणतां येणार नाहीं. परंतु वस्तीवर माणसं अगदींच कमी असल्यामुळें या दोघांची भर आम्हांला स्वागतार्ह वाटली.

उरलेला दिवस आम्हीं रेनॉलच्या तंबूत बसून धूम्रपान करीत गप्पा मारून घालवला. फाटकी कातडी बांबूवर टाकून कशीबशी तयार केलेली झोपडी असंच रेनॉलच्या तंबूचं स्वरूप होतं. तंबूच्या आंत मात्र बरीच गव्यांचीं कातडीं अंथरलेलीं होतीं. आजूबाजूला रेनॉलची बाई मार्गोट हिचीं भांडींकुंडीं पसरलेलीं होतीं. वस्तीवर सर्वत्र शांतता पसरली होती. शिकारी त्या दिवशीं शिकारीला गेलेले नव्हते. परंतु ते तंबूत झोपून गेले होते. बायका शांतपणें आपलीं कामं करत होत्या. कांहीं तरुण पोरं चेंडू घेऊन खेळत होतीं. थोड्या वेळानं त्यांना कंटाळा आला. तेव्हां त्यांनीं आपलं लक्ष आजूबाजूच्या पोरींकडे वळवलं—पहिला खेळ संपवून त्यांनीं दुसरा सुरू केला. कांहीं अंतरावर प्रौढ रेड इंडियन स्त्रिया कातड्याच्या चादरीवर आपल्या मुलाला ठेवून त्याला उंच उडवण्याचा खेळ खेळत होत्या. डॉन क्विक्झोटमधल्या सांको पांझाला ज्याच्यापासून चांगलाच त्रास सहन करावा लागला होता त्या प्राचीन खेळाचाच हा भाग होता.

पलीकडच्या माळावर छोटेछोटे धनुष्यबाण हातांत घेऊन कांहीं पोरं पांखरांचा आणि खारींचा पाठलाग करत फिरत होतीं. त्यांच्या क्रूर हातांत जे बिचारे लहानसहान गरीब प्राणी सांपडत त्यांच्या हालांना अंत नसे. शेजारच्या तंबूतल्या तरुण स्त्रीचं नांव होतं वीहू वाशटाय—या नांवाचा अर्थ चांगली स्त्री असा रेड इंडियन भाषेत होतो. ती तरुण स्त्री सुगृहिणी होती. तिनं एका मोठ्या कटोऱ्यांतून आम्हांला शिजवलेलं मांस आणून दिलं. मी तिला भेट म्हणून हिरव्या काचेची एक अंगठी दिली. अशा आंगठ्या मी माझ्या बोटांत मुद्दाम ठेवलेल्या असत. अंगठीची भेट मिळतांच ती बेहद्द खूष झाली.

सूर्यास्त व्हायला आला होता. अर्धअधिक आकाश लालभडक रंगलं होतं.

झुडपांना वळसा घालून जाणाऱ्या झऱ्याच्या पाण्यांत आकाशाचं प्रतिबिंब पडलं होतं. कांहीं तरुण पोरांनीं वस्तीबाहेर जाऊन चरायला सोडलेले घोडे परत आणले. शिकाऱ्यांनीं उठून आपापल्या घोड्याची नीट तपासणी केली आणि तंबू समोरच्या खुंटाला प्रत्येकानं आपला घोडा बांधला. अर्ध्या तासांत सर्वत्र शांतता पसरली. एव्हांना जवळजवळ अंधारून आलं होतं. आगीवर किटल्या चढवण्यांत आल्या होत्या. आगीच्या भोंवती बायकापोरं बसून हंसत खिदळत होतीं.

वस्तीच्या मध्यभागीं म्हातारी माणसं आणि प्रतिष्ठित योद्धे यांचा गट पाईप ओढत गप्पा मारत बसला होता. सहसा रेड इंडियनांना चिकटवण्यांत आलेला गंभीरपणा आणि अबोलपणा या दोन्ही गोष्टींचा लवलेशहि या मंडळींत दिसत नव्हता. मी त्यांच्यांत जाऊन बसलों. तिथं मी एक गंमत करायची ठरवून गेलों होतों. 'फ्रेमॉन्ट्स् अेक्सपीडिशन' नांवाचं एक पुस्तक माझ्याकडे होतं. त्याचीं पानं फाडून मी शिसपेन्सीलींच्या भोंवती गुंडाळलीं आणि त्यांत बंदुकीची दारू भरून फटाके तयार केले. मग मी एक जळती काडी घेऊन ते फटाके लावले. फटाके वर उडूं लागतांच भीतीनं आरडाओरड करत गप्पा मारणारे ते रेड इंडियन इतस्ततः विखुरले. कांहीं क्षणानं ते परत आले. त्यांतले जे कोणी धीट होते त्यांनीं जळते कागद हातांत घेऊन माझ्या जादूचं रहस्य शोधण्यासाठीं तपासणी चालू केली. त्या दिवसा पासून मी 'अग्निमांत्रिक' म्हणून वस्तीवर प्रसिद्ध झालों.

वस्तीवर नाना तऱ्हांचे आवाज ऐकूं येत असत. कांहीं बायका आपल्या अंगावर सुरीचे घाव करीत जेव्हां मोठमोठ्यानं शोक करूं लागत तेव्हां लांडग्यांच्या कुईसारखा त्यांचा आवाज येई. कुटुंबांतल्या आदल्या वर्षी मारल्या गेलेल्या योद्ध्यांची आठवण येऊन हा शोक केला जात असे. वस्तीच्या पलीकडे असलेल्या टेकडीवरूनहि काळोखांतून असाच मोठा आवाज येई. युद्धावर जाण्यासाठीं तयार झालेले तरुण या टेकडीवर जाऊन आपल्या इष्ट देवतेची आळवणी करत असत. त्या आळवण्यांचा तो आवाज असे.

ते सगळे आवाज मी लक्षपूर्वक ऐकत असातांना रोलेनं मला हाक मारली आणि दुसऱ्या एका दृश्याकडे माझं लक्ष वळलं. वीह्वाशटाय्च्या तंबूसमोर एक स्त्री उभी होती. तिच्यासमोर पंजांत नाक खुपसून एक पिवळ्या रंगाचा म्हातारा कुत्रा बसला होता. त्या कुत्र्याला उद्देशून ती स्त्री बोलत होती. आपल्या झोपाळू डोळ्यांनीं त्या बाईच्या चेहऱ्याकडे पहात तो कुत्रा ऐकण्याचं सोंग

करीत होता, परंतु तिचं भाषण संपतांच त्याचा झोंपी जाण्याचा बेत असावा. ती बाई त्या कुत्र्याला उद्देशून पुढीलप्रमाणं बोलत होती :

"तुला शरम वाटायला हवी. तुला मी खाऊंपिऊं घातलं, नजर फुटली नव्हती तेव्हांपासून तुझी काळजी घेतली. मला वाटलं होतं, तूं मोठा झाल्यावर चांगला कुत्रा होशील. तूं चांगला बळकट होतास. माळावरून प्रवास करतांना मी तुझ्या पाठीवर सामान लादत असे. तेव्हां तूं कधींहि घोड्यांच्या पायांजवळ लुडबुडला नाहींस. पण असं असलं तरी एकूण तुझी नियतच वाईट; कारण झुडपांत एकादा ससा दिसला कीं तूं उडी मारून त्या सशामागं धांवायचास आणि मग बाकीचे सर्व कुत्रे तुझ्यामागून धांवूं लागायचे. असं करणं धोक्याचं आहे हें तुला कळायला हवं होतं. तूं अशा तऱ्हेनं आडवाटेला गेल्यानंतर बळींतून उडी मारून एकादा लांडगा आला असता म्हणजे? पाठीवर सामान लादलेला कुठलाहि कुत्रा लांडग्याशीं लढूं शकत नाहीं. म्हणजे त्या लांडग्यानं तुला खलास केलं असतं. तीन दिवसांपूर्वी तूं असाच प्रकार केलास. तुझ्या पाठीवरच्या सामानांत तंबूचं पुढचं दार लावायच्या लाकडी पिना मी ठेवल्या होत्या. त्या पिना कुठंतरी तूं हरवल्यास. त्यामुळें तें पहा तिथं तंबूचं दार उघडं पडलंय. संध्याकाळीं तूं मी माझ्या मुलांसाठीं भाजलेला मांसाचा चांगला मोठा तुकडा लंपास केलास. मी तुला सांगतें, मेल्या तुझी नियतच वाईट. तुला जिवंत ठेवून उपयोगी नाहीं."

असं म्हणून ती बाई आंत गेली आणि तंबूतून तिनं भला मोठा दगडी हातोडा बाहेर आणला. त्या हातोड्याच्या एका घावासरशीं तिनं त्या कुत्र्याचा कपाळमोक्ष केला. तिनं कुत्र्याला उद्देशून केलेल्या भाषणामुळें रेड इंडियनांच्या समजुतींवर चांगलाच प्रकाश पडतो. माणसं जें बोलतात तें प्राण्यांना सगळं समजतं असं त्यांना वाटतं. परंपरेनं चालत आलेल्या समजुतीनुसार त्यांच्या-पैकीं कांहींजण अस्वलं, लांडगे, हरीण, कासवं हे आपले पूर्वज होते असंहि सांगतात.

बराच उशीर झाला होता. तेव्हां मी कोंग्रा–टोंगाच्या तंबूंत गेलों. शेकोटीच्या शेजारीं तो पेंगत बसला होता. त्याची हंसतमुख रुंद चेहेऱ्याची बायको घरकामांत मग्न होती. दुर्दैवानं ती आणि तिचा नवरा एवढींच कांहीं त्या तंबूंतली माणसं नव्हती : सहा पोरं होतीं आणि तीं जागा मिळेल तिथं आडवीं तिडवीं झोपलीं होतीं. तंबूच्या दाराशीं माझं खोगीर होतं. आणि

त्याच्यासमोर गव्याच्या कातड्याचं जाजम अंथरलं होतं. मी अंगावर ब्लँकेट घेतलं आणि झोपायला गेलों. आजूबाजूला इतके आवाज घुमत होते कीं मी जर अतिशय थकलों नसतों तर त्या आवाजामुळें मला कांहीं झोप आली नसती. ढोल वाजत होता आणि त्या ढोलाच्या आवाजांत अधूनमधून किंकाळ्या आणि वीस लोकांनीं म्हटलेलं संघगीत मिसळत होतं. बाजूच्याच तंबूंत जुगाराचा अड्डा बसला होता. हे जुगारी आपले दागिने, घोडे, वस्त्रं आणि फारच झालं तर शस्त्रसुद्धा पणाला लावून खेळत होते. पॅरीसमधल्या अड्ड्यां-वरच वेछूट जुगार चालतो असं समजण्याचं कारण नाहीं. आपल्या एकसुरी जीवनांत विरंगुळा मिळावा म्हणून हे रेड इंडियन लोकहि जुगार खेळतात. ढोलाचा आवाज कानीं पडत होता...मला हळूहळू झोप लागली. शेजारच्या अड्ड्यावरचा हैदोस सकाळपर्यंत चालूं होता.

रांगत सरपटत कांहीं पोरं माझ्या बिछान्याजवळ आलीं आणि त्यांनीं ब्लँकेटाचं टोक हातांत धरून ओढायला सुरुवात केल्यामुळं मला जाग आली. कांहीं पोरं तर जरा ज्यादाच माझ्याजवळ येण्याचा प्रयत्न करूं लागलीं. मी माझ्या उशागतीं नेहमी एक छोटीशी काठी ठेवत असे. अख्खा दिवस झोपणं आणि खाणं यांशिवाय दुसरा उद्योग नसल्यामुळें हीं मुलं भारीच अस्वस्थ होतात. मी हातांत काठी घेऊन एका पोराच्या डोक्याला टोचली. त्या रात्रीं चारपांच वेळांतरी हा प्रयोग मला करावा लागला.

माझ्या यजमानाला असलेली संवय ही एक असह्य डोकेंदुखी होती. युद्ध, प्रेम, शिकार या आणि इतर कार्यांत यश मिळावं म्हणून हे रेड इंडियन लोक नेहमीं कांहींना कांहीं धर्मविधि करीत असतात. हा विधि मंत्रतंत्राचाच प्रकार असतो. पुष्कळ वेळां कोणता विधि करावयाचा हें त्या त्या माणसाची इष्टदेवता स्वप्नांत येऊनच त्याला सांगत असते. या मंत्रविधींचे प्रकार किती चमत्कारिक असतात हें पाहण्याजोगं आहे : उदाहरणार्थ, कांहीं रेड इंडियन यशःसिद्धी-साठीं झुरका मारल्यानंतर पाईपचं टोक जमिनीवर आपटतात. प्रत्येक वेळीं झुरका घेतला कीं हा विधि करावाच लागतो. दुसरा एक विधि असा कीं आपल्याला जें म्हणायचं आहे त्याच्या नेमकं उलट बोलत रहायचं, म्हणजे ऐकणाऱ्यावर उलट अर्थ घेऊन याचं म्हणणं समजवून घेण्याची जबाबदारी आली. मला आणि शॉला एक म्हातारा भेटला होता. गोरा मनुष्य भेटला रे भेटला कीं त्याला कटोऱ्यांतून थंड पाणी प्यायला लावणं हा त्याचा विधि

होता. माझ्या यजमानाच्या वाटेला आलेला विधि दुर्दैवाचाच होता असं म्हणावं लागेल. त्याच्या इष्टदेवतेनं त्याला स्वप्नांत सांगितलं कीं त्यानं मध्यरात्रीं उठून एक विशिष्ट गाणं गायलं पाहिजे. रात्रीं बारा वाजतां त्याचं हें भयानक गाणं ऐकून मला जाग येई. तो आपल्या आसनावर बसून आपल्या शोकाकुल गाण्याचा हा कार्यक्रम शांतपणें पार पाडत असे.

याच्या जोडीला याहूनहि अधिक बेसूर असे आणखीहि आवाज येत. सूर्यास्तापासून तो थेट दिवस उजाडेपर्यंत वस्तीवरचे शेकडो कुत्रे भयानक संघगीत गाऊं लागत. लांडग्यांपेक्षांसुद्धां हें कुत्र्यांचं केंकाटणं भयानक होतं. एखाद्या भेदरट माणसानं जर तें ऐकलं तर त्याच्यावर भयंकर परिणाम होईल. हें कुत्र्यांचं ओरडणं चालू असतांना त्यांत आपल्याला झोपायचं असतं हाच प्रकार फार बिकट असतो. प्रथम एक कुत्रा ओरडायला सुरुवात करतो. मग दुसरा त्याचा आवाज झेलतो—म्हणतां म्हणतां त्या बेसूर भुंकण्यानं सगळी वस्ती वेढली जाते. कांहीं क्षण हें भुंकणं असंच चालू राहतं. मध्येंच एकदम शांतता पसरते.

सकाळ झाली, कोंग्रा-टोंगा घोड्यावर स्वार होऊन इतरांबरोबर शिकारीला निघाला. या ठिकाणीं बाप आणि नवरा या दोन्ही नात्यांनीं कोंग्रा-टोंगा कसा वागत असे याचं थोडंसं मी वर्णन केलं तर ते औचित्याला सोडून होणार नाहीं याची मला खात्री आहे. सगळ्याच रेड इंडियनांप्रमाणें कोंग्रा-टोंगा आणि त्याची बायको यांचं आपल्या पोरांवर अत्यंत प्रेम होतं. हे रेड इंडियन लोक आपल्या पोरांचे जरा ज्यादाच लाड करतात. सहसा ते त्यांना शिक्षा करत नाहींत. समजा, एखाद्या पोरानं थंड पाण्याचा कटोराच घेऊन आईबापांच्या अंगावर ओतला तर एखादे वेळीं त्याला शिक्षा व्हायची. या अती लाडांमुळें हीं पोरं एक नंबरची कामचुकार आणि उद्धट झालेलीं आहेत. या शिक्षण-पद्धतीमुळें रेड इंडियन लोकांच्या स्वभावांत मूलतः असलेल्या संयमाचा अभाव आणि स्वातंत्र्याविषयींच्या उच्छृंखल कल्पना या गोष्टींना विशेषच उत्तेजन मिळतं.

कोंग्रा–टोंगाइतके पोरांचे लाड करणारा बाप मिळणं कठीण. त्याच्या मुलांपैकीं एकावर त्याचा विशेष लोभ होता. तें मूल दोन फूट उंच असेल नसेल. तंबूत गव्याचं कातडं अंथरून त्यावर कोंग्रा-टोंगा बसे. समोर मुलाला उभा करी, आणि युद्धनृत्याच्या वेळीं म्हणायचें गाणें गुणगुणूं लागे. मग नुकता आपला तोल सांवरायला लागलेलं तें मूल बापाच्या गाण्याच्या तालावर पाय उचलून

वाटोळं फिरूं लागे. त्याचं तें नृत्य पाहून कोंग्रा–टोंगाला फार आनंद होई आणि आपल्या मुलाच्या नृत्यकलेचं मी कौतुक करावं म्हणून तो माझ्याकडे पाही.

नवरा म्हणून कोंग्रा–टोंगा इतका कोमल नव्हता. त्याच्या तंबूंत राहणारी स्त्री गेलीं कित्येक वर्षं त्याची बायको होती. त्याच्या संसाराची आणि मुलांची ती चांगली काळजी घेई. ती त्याला आवडत असे. आणि माझ्या तरी आढळण्यांत त्यांचं भांडण कांहीं झालं नाहीं. परंतु तिच्यापेक्षां अधिक तरुण असलेल्या ज्या बायका होत्या त्यांच्याकडे कोंग्रा-टोंगाचा जरा जास्त ओढा होता. सध्या अशी एकच बाई होती. ती दुसऱ्या तंबूंत रहात असे. एके दिवशीं तिच्यावर कांहीं कारणानं कोंग्रा–टोंगा संतापला. त्यानं तिला खेचून तंबूच्या बाहेर काढली. तिचे सगळे कपडे आणि दागिने तिचं सर्व सामान तंबूबाहेर फेकून दिलं आणि आपल्या बापाच्या घरीं चालती हो असं सांगितलं. अशा तऱ्हेनं हा तडकाफडकी घटस्फोट देऊन, त्याच्या दृष्टीनं तो समर्थनीय होता, कोंग्रा–टोंगा आपल्या तंबूंत आला आणि त्याच्या ठरलेल्या जागेवर बसून शांतपणें समाधान पावून धूम्रपान करूं लागला.

एके दिवशीं दुपारीं मी त्याच्या तंबूंत बसलों होतों. त्याच्या उघड्या शरीरावर अनेक घावाचे वण मीं पाहिले. त्यांपैकीं कांहीं वण कुठल्या घावांमुळें झाले होते हें मला माहीत होतं, म्हणून मी कांहीं त्यांची चौकशी केली नाहीं. सुरी मारून घाव केल्याच्या अनेक खुणा त्याच्या दोन्ही हातांवर दिसत होत्या. त्याच्या छातीवर आणि पाठीवर असलेले वण मात्र वेगळ्या प्रकारचे होते. आपलं शौर्य आणि सहनशीलता दाखवण्यासाठीं आणि इष्टदेवतेची कृपा संपादन करण्यासाठीं रेड इंडियन लोक आपल्या शरीरावर जे अत्याचार करतात त्यांचे ते वण होते. अत्याचाराचा हा विधि असा : हे रेड इंडियन लोक लाकडाचा एक अणकुचीदार ढलपा घेतात. हा टोकदार ढलपा छातीच्या किंवा पाठीच्या मांसांत खुपसून त्याचं एक टोक दुसरीकडून बाहेर काढतात. अशा रीतीनं बाहेर येणाऱ्या दोन्ही टोकांना गव्याच्या कवट्या बांधतात. मग त्याचे सहकारी दोन्ही बाजूंला उभे राहतात आणि हा जोरानें धावूं लागतो. धांवतांना जड कवट्यांना हिसके बसून ढलपा अडकलेलें मांस फाटतें आणि कवट्या खालीं पडतात.

कोंग्रा-टोंगाच्या अंगावरचे कांहीं वण अपघातांचे होते. पण याच बरोबर युद्धांत झालेल्या जखमांचे वणहि त्याच्या अंगावर दिसत होते. वस्तीवरच्या

अत्यंत शूर योद्ध्यांपैकीं तो एक गणला जाई. आपल्या एकूण आयुष्यांत त्यानं आतांपर्यंत चौदा माणसं ठार केलीं होतीं, असं त्यानं मला अभिमानानं सांगितलं. इतर रेड इंडियनांप्रमाणें कोंग्रा-टोंगाहि अस्सल थापाड्या होता. परंतु त्यानं सांगितलेली ही माहिती खरी असल्याचं मला इतर अनेक लोकांकडून कळलं.

मी त्याच्या या वर्णांची जेव्हां चौकशी करूं लागलों तेव्हां कोंग्रा-टोंगा खुलला आणि आपण युद्धांत गाजवलेल्या पराक्रमांच्या खऱ्याखोट्या गोष्टी तो सांगूं लागला. त्यांतली एक गोष्ट रेड इंडियनांच्या स्वभावांतल्या भयानकतेवर प्रकाश टाकणारी असल्यामुळें मी मुद्दाम ती इथं सांगतों. मेडिसिन बो या पर्वताकडे बोट दाखवून कोंग्रा-टोंगा म्हणाला कीं कांहीं वर्षांपूर्वीं तरुण योद्ध्यांची एक टोळी घेऊन तो तिथं गेला होता. फिरतां फिरतां त्यांना शिकारीसाठीं आलेले स्नेक जमातींतले दोघेजण दिसले. त्यांपैकीं एकाला त्यांनीं बाणांनीं ठार केला. दुसरा पळाला. तेव्हां कोंग्रा-टोंगा आणि त्याचे सहकारी यांनीं त्याचा पाठलाग करून त्याला पकडला. दोघे योद्धे चटकन् पुढें झाले आणि तो स्नेक तरुण जिवंत असतांनाच त्यांनीं त्याच्या कवटीवरची केंसासकट कातडी कापली. मग त्यांनीं मोठी आग पेटवली. त्या तरुणाच्या पायाचे आणि हाताचे स्नायू कापून त्याला त्या आगींत टाकून दिला. तो उठूं नये म्हणून लांब काठ्यांनीं त्याला घट्ट दाबून ठेवला होता. शेवटीं तो जळून मेला. या भयानक अत्याचाराचं इतकं तपशीलवार वर्णन मला कोंग्रा-टोंगानं सांगितलं कीं त्या सगळ्या तपशीलांचा केवळ उल्लेख करणं अशक्य आहे. कोंग्रा-टोंगाचा चेहरा विलक्षण सौम्य आणि मोकळा होता. इतर रेड इंडियनांच्या तोंडावर दिसतो तसा क्रूरपणा त्याच्या ठिकाणीं दिसत नसे. या सैतानी अत्याचाराचं वर्णन करून सांगत असतांना एकादं लहान मूल आईला आपले पराक्रम सांगत असतांना जसं तिच्याकडे पाहतं, तशाच भाबडेपणानं कोंग्रा-टोंगा माझ्याकडे पहात होता.

कोंग्रा-टोंगाच्या तंबूंत ब्लॅकफूट जमातींतला एक मुलगा होता. त्याच्यावरून आणखी एक गोष्ट त्यानं सांगितली. ब्लॅकफूट ही जमात अतिशय विश्वासघातकी आणि खुनशी आहे. आरापाहो आणि ब्लॅकफूट या दोन्ही जमातींचं सख्य आहे. वर्षांपूर्वीं कोंग्रा-टोंगा आणि सहकारी योद्धे असे शिकारीला गेले असतांना त्यांना या ब्लॅकफूट जमातीचे वीस तंबू एके ठिकाणीं दिसले. रात्रीं कोंग्रा-टोंगानं त्यांच्यावर हल्ला केला आणि पुरुष, बायका, मुलं यांची सरसहा कत्तल केली. एकाच लहान मुलाला फक्त त्यानं ठार मारलं नाहीं. त्याला त्यानं बरोबर आणलं.

एका म्हाताऱ्यानं त्याला वाढवलं. हें मूल आतां ऑगीलाल्ला जमातीच्या मुलांत पूर्णपणें मिसळून गेलं आहे. या मुलाप्रमाणेंच क्रो जमातींतला एक योद्धा वस्तीवर होता. बऱ्याच वर्षांपूर्वी युद्धकैदी म्हणून त्याला इथं आणण्यांत आलं. एका रेड इंडियन बाईला मुलगा नव्हता. तिनं त्याला आपला मुलगा म्हणून पाळला. 'आपण क्रो जमातीचे आहोंत हें तो आतां विसरूनहि गेला होता. वृत्ति आणि कृति या दोहोंनीं आतां तो पूर्णपणें ऑगीलाल्ला जमातींतला एक बनला होता. स्नेक आणि क्रो या जमातींशीं युद्ध करण्याच्या कल्पनेनं प्रथम याच वस्तीवर जन्म घेतला. आतां ही कल्पना मागें पडलेली असली तरी निखारे अजून कांहीं संपूर्णपणें विझलेले नव्हते. युद्धाला जाण्यासाठीं अकरा माणसं तयार झालेलीं होतीं आणि चवथ्या दिवशीं निघायचं असं त्यांनीं ठरवलं होतं. बळकट बांध्याचा व्हाईटशील्ड हा योद्धा या टोळीचा प्रमुख होता. व्हाईटशील्ड हा अत्यंत नीटनेटके कपडे घालत असे, टापटिपीनं रहात असे हें मी पाहिलेलं होतं. वस्तीवरच्या सर्व तंबूंत त्याचा तंबू सर्वांत चांगला होता. त्याची वायको वस्तीवरच्या सुंदर गणल्या जाणाऱ्या स्त्रियांपैकीं एक होती. व्हाईटशिल्डचा गोऱ्या लोकांकडे कांहींसा ओढा होता. त्यामुळें दिवसाच्या कुठल्याहि प्रहरीं तो मला जेवायला बोलवत असे. मी वारंवार त्याच्या तंबूवर जात असे.

एकदां मी त्याच्या तंबूवर गेलों असतांना पाहुणचाराचा अत्यंत महत्त्वाचा भाग जो जेवण, तो उरकून आम्ही दोघं धूम्रपान करीत बसलों होतों. त्यानं तंबूंत ठेवलेला आपला युद्धाचा सरंजाम गोळा करून मला दाखवण्यासाठीं मोठ्या अभिमानानं माझ्यासमोर ठेवला. त्या सरंजामांत एक अतिशय सुंदर दिसणारं पिसांचं शिरोभूषण होतं. तें शिरोभूषण त्यानं डोक्यावर घातलं आणि तो माझ्यासमोर उभा राहिला. त्याच्या रेखीव आकृतीला आणि काळ्या चेहेऱ्याला त्या शिरोभूषणामुळें विशेष शोभा प्राप्त झाली होती. आपल्या देखणेपणांत त्यामुळें भर पडते आहे याची व्हाईटशील्डलाहि जाणीव होती. त्या शिरोभूषणांत तीन गरुडांचीं पिसं असल्याचं त्यानं मला सांगितलं. त्या प्रत्येक पिसाची किंमत एक चांगला घोडा असल्याचं तो पुढें म्हणाला. मग त्यानं पिसं लावलेली आणि छानपैकीं रंगवलेली आपली ढाल उचलली. हीं सगळीं रानटीं आयुधं मोठीं आकर्षक दिसत होतीं. ब्लॅकहिल्स येथें आढळणाऱ्या चित्त्याच्या कातड्याचा त्याच्या बाणांचा भाता केलेला होता

अत्यंत शूर योद्धयांपैकीं तो एक गणला जाई. आपल्या एकूण आयुष्यांत त्यानं आतांपर्यंत चौदा माणसं ठार केलीं होतीं, असं त्यानं मला अभिमानानं सांगितलं. इतर रेड इंडियनांप्रमाणें कोंग्रा-टोंगाहि अस्सल थापाड्या होता. परंतु त्यानं सांगितलेली ही माहिती खरी असल्याचं मला इतर अनेक लोकांकडून कळलं.

मी त्याच्या या वर्णांची जेव्हां चौकशी करूं लागलों तेव्हां कोंग्रा-टोंगा खुलला आणि आपण युद्धांत गाजवलेल्या पराक्रमांच्या खऱ्याखोट्या गोष्टी तो सांगूं लागला. त्यांतली एक गोष्ट रेड इंडियनांच्या स्वभावांतल्या भयानकतेवर प्रकाश टाकणारी असल्यामुळें मी मुद्दाम ती इथं सांगतों. मेडिसिन बो या पर्वताकडे बोट दाखवून कोंग्रा-टोंगा म्हणाला कीं कांहीं वर्षांपूर्वीं तरुण योद्धयांची एक टोळी घेऊन तो तिथं गेला होता. फिरतां फिरतां त्यांना शिकारीसाठीं आलेले स्नेक जमातींतले दोघेजण दिसले. त्यांपैकीं एकाला त्यांनीं बाणांनीं ठार केला. दुसरा पळाला. तेव्हां कोंग्रा-टोंगा आणि त्याचे सहकारी यांनीं त्याचा पाठलाग करून त्याला पकडला. दोघे योद्धे चटकन् पुढें झाले आणि तो स्नेक तरुण जिवंत असतांनाच त्यांनीं त्याच्या कवटीवरची केंसासकट कातडी कापली. मग त्यांनीं मोठी आग पेटवली. त्या तरुणाच्या पायाचे आणि हाताचे स्नायू कापून त्याला त्या आगींत टाकून दिला. तो उठूं नये म्हणून लांब काठ्यांनीं त्याला घट्ट दाबून ठेवला होता. शेवटीं तो जळून मेला. या भयानक अत्याचाराचं इतकं तपशीलवार वर्णन मला कोंग्रा-टोंगानं सांगितलं कीं त्या सगळ्या तपशीलांचा केवळ उल्लेख करणं अशक्य आहे. कोंग्रा-टोंगाचा चेहरा विलक्षण सौम्य आणि मोकळा होता. इतर रेड इंडियनांच्या तोंडावर दिसतो तसा क्रूरपणा त्याच्या ठिकाणीं दिसत नसे. या सैतानी अत्याचाराचं वर्णन करून सांगत असतांना एकादं लहान मूल आईला आपले पराक्रम सांगत असतांना जसं तिच्याकडे पाहतं, तशाच भाबडेपणानं कोंग्रा-टोंगा माझ्याकडे पहात होता.

कोंग्रा-टोंगाच्या तंबूंत ब्लॅकफूट जमातींतला एक मुलगा होता. त्याच्यावरून आणखी एक गोष्ट त्यानं सांगितली. ब्लॅकफूट ही जमात अतिशय विश्वासघातकी आणि खुनशी आहे. आरापाहो आणि ब्लॅकफूट या दोन्ही जमातींचं सख्य आहे. वर्षांपूर्वीं कोंग्रा-टोंगा आणि सहकारी योद्धे असे शिकारीला गेले असतांना त्यांना या ब्लॅकफूट जमातीचे वीस तंबू एके ठिकाणीं दिसले. रात्रीं कोंग्रा-टोंगानं त्यांच्यावर हल्ला केला आणि पुरुष, बायका, मुलं यांची सरसहा कत्तल केली. एकाच लहान मुलाला फक्त त्यानं ठार मारलं नाहीं. त्याला त्यानं बरोबर आणलं.

एका म्हाताऱ्यानं त्याला वाढवलं. हें मूल आतां ऑगीलाल्ला जमातीच्या मुलांत पूर्णपणें मिसळून गेलं आहे. या मुलाप्रमाणेंच क्रो जमातींतला एक योद्धा वस्तीवर होता. बऱ्याच वर्षांपूर्वी युद्धकैदी म्हणून त्याला इथं आणण्यांत आलं. एका रेड इंडियन बाईला मुलगा नव्हता. तिनं त्याला आपला मुलगा म्हणून पाळला. 'आपण क्रो जमातीचे आहोंत हें तो आतां विसरूनहि गेला होता. वृत्ति आणि कृति या दोहोंनीं आतां तो पूर्णपणें ऑगीलाल्ला जमातींतला एक बनला होता. स्नेक आणि क्रो या जमातींशीं युद्ध करण्याच्या कल्पनेनं प्रथम याच वस्तीवर जन्म घेतला. आतां ही कल्पना मागें पडलेली असली तरी निखारे अजून कांहीं संपूर्णपणें विझलेले नव्हते. युद्धाला जाण्यासाठीं अकरा माणसं तयार झालेलीं होतीं आणि चवथ्या दिवशीं निघायचं असं त्यांनीं ठरवलं होतं. बळकट बांध्याचा व्हाईटशील्ड हा योद्धा या टोळीचा प्रमुख होता. व्हाईटशील्ड हा अत्यंत नीटनेटके कपडे घालत असे, टापटिपीनं रहात असे हें मी पाहिलेलं होतं. वस्तीवरच्या सर्व तंबूंत त्याचा तंबू सर्वांत चांगला होता. त्याची बायको वस्तीवरच्या सुंदर गणल्या जाणाऱ्या स्त्रियांपैकीं एक होती. व्हाईटशिल्डचा गोऱ्या लोकांकडे कांहींसा ओढा होता. त्यामुळें दिवसाच्या कुठल्याहि प्रहरीं तो मला जेवायला बोलवत असे. मी वारंवार त्याच्या तंबूवर जात असे.

एकदां मी त्याच्या तंबूवर गेलों असतांना पाहुणचाराचा अत्यंत महत्त्वाचा भाग जो जेवण, तो उरकून आम्ही दोघं धूम्रपान करीत बसलों होतों. त्यानं तंबूंत ठेवलेला आपला युद्धाचा सरंजाम गोळा करून मला दाखवण्यासाठीं मोठ्या अभिमानानं माझ्यासमोर ठेवला. त्या सरंजामांत एक अतिशय सुंदर दिसणारं पिसांचं शिरोभूषण होतं. तें शिरोभूषण त्यानं डोक्यावर घातलं आणि तो माझ्यासमोर उभा राहिला. त्याच्या रेखीव आकृतीला आणि काळ्या चेहेऱ्याला त्या शिरोभूषणामुळें विशेष शोभा प्राप्त झाली होती. आपल्या देखणेपणांत त्यामुळें भर पडते आहे याची व्हाईटशील्डलाहि जाणीव होती. त्या शिरोभूषणांत तीन गरुडांचीं पिसं असल्याचं त्यानं मला सांगितलं. त्या प्रत्येक पिसाची किंमत एक चांगला घोडा असल्याचं तो पुढें म्हणाला. मग त्यानं पिसं लावलेली आणि छानपैकीं रंगवलेली आपली ढाल उचलली. हीं सगळीं रानटीं आयुधं मोठीं आकर्षक दिसत होतीं. ब्लॅकहिल्स येथें आढळणाऱ्या चित्त्याच्या कातड्याचा त्याच्या बाणांचा भाता केलेला होता

चित्त्याची शेपटी आणि त्याचीं ताणलेलीं नखं या भात्यावर अजूनहि लटकत होतीं. माझा सगळा हा पाहुणचार केल्यानंतर रेड इंडियन प्रथेला अनुसरून त्यानं माझ्याकडे भेटीची मागणी केली. धनुष्यबाणांप्रमाणेंच व्हाईटशिल्डकडे एक बंदूकहि होती. माझ्याकडे तो भेटीदाखल बंदुकीची दारू आणि गोळ्या यांची मागणी करीत होता. दारू आणि गोळ्या यांचा साठा माझ्याकडेच कमी असल्यामुळें मी कांहीं त्याला दाद दिली नाहीं. त्याला वाईट वाटूं नये म्हणून लाल रंगाची एक पुडी मी त्याला भेट दिली. त्या भेटीमुळें व्हाईट-शिल्ड खूप झाला.

दुसरे दिवशीं सकाळीं व्हाईटशिल्डला खूप सर्दी झाली आणि त्याचा घसाहि सुजला. हा आजार येतांच वस्तीवरचा हा अतुल्य योद्धा अगदीं खचून गेला आणि चेहेरा टाकून या तंबूकडून त्या तंबूकडे फिरूं लागला. शेवटीं तो रेनॉलच्या तंबूकडे आला. परंतु रेनॉल किंवा मी त्याच्यावर कांहीं उपाय करूं शकत नाहीं हें त्याला कळलं तेव्हां तो मांत्रिकाकडे गेला. त्या तोतया मांत्रिकानं व्हाईट शिल्डवर इलाज करायला सुरुवात केली. प्रथम त्यानं व्हाईट शिल्डच्या अंगांतल्या भुतावर व्हाईटशिल्डच्या कानशीलाचा नेम धरून भराभर गुद्दे लगावले; मग तो किंचाळ्या फोडत आणि खेकसत त्याच्या अंगावर धावून गेला. मग त्यानं एक ढोल घेऊन व्हाईटशिल्डच्या कानापाशीं मोटमोठ्यानं पिटायला सुरवात केली. इतका सगळा इलाज करुनहि व्हाईटशिल्डला सर्दी आणणारं तें भूत उतरेना. तेव्हां व्हाईटशिल्ड परत आपल्या तंबूवर गेला आणि कांहीं तास अतिशय अस्वस्थ मनानं पडून राहिला. दुपारीं पुन्हा तो रेनॉलच्या तंबूवर आला. त्यानं आपल्या दोन्ही हातांनीं घसा धरला होता. कांहीं वेळ तो न बोलतां बसून राहिला. शेवटीं त्यानं हलक्या आवाजांत बोलायला सुरुवात केली. तो म्हणाला, "मी एक शूर योद्धा आहे. वस्तीवरच्या सगळ्या तरुणांचं असंच मत आहे. या तरुणांपैकीं दहाजण उद्यां माझ्याबरोबर युद्धावर जायला निघणार आहेत. मी त्यांना शत्रु कुठं आहे तें दाखवून देईन. गेल्या उन्हाळ्यांत स्नेक जमातीच्या लोकांनीं माझ्या भावाला ठार केलं. माझ्या भावाच्या मृत्यूचा सूड घेतल्याखेरीज मी स्वस्थ बसूं शकत नाहीं. उद्यां आम्ही निघणार. माझ्या शत्रूंना गांठून मी त्यांच्या कवट्यांवरच्या केंसासकट कातड्या कापून आणणार." आपला हा निश्चय आम्हांला सांगत असतांना व्हाईट-शील्डच्या डोळ्यांतली नेहमीची झळाळी आम्हांला दिसली नाहीं. उलट हें

सगळं बोलत असतांना हिंमत खचलेल्या माणसासारखी त्यानं मान टाकली होती.

त्या दिवशीं संध्याकाळीं मी शेकोटीसमोर बसलों असतांना युद्धाचा सगळा साज चढवून घोड्यावर स्वार झालेला व्हाईटशिल्ड त्याच्या तंबूसमोर उभा असलेला मी पाहिला. नंतर आपल्या घोगऱ्या आवाजांत मोठमोठ्यानं युद्धगीत गात तो वस्तीवर फिरूं लागला. बायका कर्कश स्वरांत त्याचा जयजयकार करत होत्या. मग तो घोड्यावरून खालीं उतरला आणि साष्टांग नमस्कार घातल्यासारखा जमिनीवर पालथा झाला. याचा अर्थ तो इष्टदेवतेकडे कृपायाचना करीत होता. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आतां सगळे योद्धे लढाईवर जायला निघतील म्हणून मी उत्सुकतेनं पाहूं लागलों परंतु एकहि योद्धा मला निघतांना दिसेना. दुपारपर्यंत वस्तीवर सर्वत्र शांतता होती. जेव्हां व्हाईटशील्ड रेनॉलच्या तंबूवर आला तेव्हां तो युद्धावर कां गेला नाहीं असं त्याला रेनॉलनं विचारलं.

माझ्याकडे बोट दाखवून तो म्हणाला, "मी जाऊं शकत नाहीं. कारण याला मी माझे कांहीं बाण दिले आहेत." त्याचा स्वर पडलेला होता.

रेनॉल म्हणाला, "तूं याला फक्त दोनच बाण दिले आहेस आणि त्यांच्यामुळेंच जर तुझं अडत असेल तर तुला ते परत मिळूं शकतील."

कांहीं क्षण व्हाईटशील्ड कांहींच बोलला नाहीं. मग तो उदास स्वरांत म्हणाला, "माझ्याबरोबर येणाऱ्या तरुण योद्धयांपैकीं एकाला अशुभ स्वप्न पडलं. त्याच्या स्वप्नांत मृतात्मे आले आणि त्यांनीं त्याच्यावर दगड मारले."

असं स्वप्न जर खरोखरीनं एकाद्या योद्धयाला पडलं असतं तर रेड इंडियन योद्धयांची कुठलीहि टोळी घाबरून गेली असती यांत शंका नाहीं. परंतु मला आणि रेनॉलला खात्रीपूर्वक असं वाटत होतं कीं खरोखरीनं असं स्वप्न पडलेलं नसून युद्धावर न जातां घरीं राहायला सबब मिळावी म्हणून व्हाईटशिल्डनं ही थाप ठोकली होती.

व्हाईटशिल्ड हा त्याच्या पराक्रमाबद्दल प्रसिद्ध असलेला योद्धा होता. शत्रूंनीं त्याच्यावर कितीहि अत्याचार केले असते, त्याच्या वर्मी जखम झाली असती तरीसुद्धां तें त्यानं सारं धीमेपणानं सहन केलं असतं. अशा तऱ्हेच्या वेदना सहन करण्याचं शिक्षण रेड इंडियन तरुणांना लहानपणापासून मिळतं. आपल्यावर कोण हल्ला करतो आहे हें रेड इंडियन माणसाला जेव्हां दिसतं आणि कळतं तेव्हां तो शत्रूवर तुटून पडतो आणि आपल्या पराक्रमाची शर्थ

करून दाखवतो. परंतु आपल्याला भूत लागलं किंवा आपल्यावर कोणीतरी करणी केली असं एकादां कां त्याच्या मनानं घेतलं कीं त्याचं सगळं पौरुष, त्याचा सगळा पराक्रम या जाणीवेमुळें अगदीं खच्ची होऊन जातो. एकादा आजार दीर्घकाळ टिकला कीं पिशाच्चबाधेविषयींचं हें चक्र रेड इंडियनाच्या डोक्यांत सुरू होतं आणि मग तो आपणच आपल्या कल्पनेचा बळी होतो. अशा परिस्थितींत तो अतिशय हैराण झाल्यामुळें जिवावर उदार होऊन एकटाच शत्रूच्या गोटांत जाऊन हल्ला करतो किंवा कुणाच्याहि मदतीविना पहाडी अस्वलाशीं झुंज घेतो. पिशाच्चबाधेनं जाचल्या गेलेल्या जीवनाचा शेवट व्हावा हाच यामागें हेतु असतो.

तात्पर्य, उपवास करुन, इष्टदेवतेच्या आळवण्या करून, स्वप्न पाहून शेवटीं व्हाईटशील्ड आणि त्याची टोळी युद्धावर कांहीं गेली नाहीं !



# १६ | फांसेपारधी

रेड इंडियनांच्या एकूण स्वभावाविषयीं मी सांगत होतों. हें करत असतांना साहसी जीवन जगणाऱ्या वेगळ्या जातीच्या आणखी दोन व्यक्तींविषयीं थोडी माहिती सांगणं आवश्यक आहे या गोष्टीची मला आठवण झाली. वेगळ्या जातीच्या या दोन व्यक्ती म्हणजे रोलो आणि सॅरॅफिन हे दोन फासेपारधी होत. या दोघांनीं अत्यंत धाडसाचा कार्यक्रम आंखला होता. आमच्या तंबूंच्या पश्चिमेच्या दिशेनं एक दिवस प्रवास केल्यानंतर आरापाहो जमातीच्या रेड इंडियनांचा प्रदेश लागतो. रोलो आणि सॅरॅफिन या प्रदेशाकडे जायला निघाले होते. या आरापाहो लोकांशीं माझी आणि शॉची पुढं गांठ पडली. ही जमात अतिशय क्रूर आहे. आपल्या प्रदेशांत पाऊल टाकणाऱ्या गोऱ्या माणसाला तिथल्यातिथं ठार केलं जाईल, असं त्यांनीं नुकतंच जाहीर केलं होतं. त्यांच्या या निश्चयाला कारण घडलं तें असं :

गेल्या १८४५ च्या वसंतऋतूंतली गोष्ट. कर्नल किर्नी लिव्हनवर्थच्या किल्ल्यावरून बरोबर घोडदळांतले बरेच सैनिक घेऊन लारामीच्या किल्ल्यावर गेला. तिथून ते डोंगराच्या पायथ्याशीं असलेल्या बेंटच्या किल्ल्यावर गेले.

बंटच्या किल्ल्यावरून पूर्वेकडे वळून पुन्हां जिथून निघालें होते तिथं पोचले. लारामीच्या किल्ल्यावर असतांना कर्नल किर्नीनं आपले सैनिक पश्चिमेकडे स्वीटवॉटरपर्यंत पाठवले. आणि स्वतः किल्ल्यावर राहून त्यानं आजूबाजूच्या सगळ्या रेड इंडियनांना चर्चेसाठीं येण्याचं निमंत्रण केलं. जेव्हां ते रेड इंडियन आले आणि त्यांनीं गोऱ्या सैनिकांचे उत्तम कपडे, शिस्त, त्यांचं युद्धसाहित्य, बळकट घोडे इत्यादि गोष्टी पाहिल्या तेव्हां ते आश्चर्यचकितच झाले. या रेड इंडियनांत आरापाहो जमातीचे लोक संख्येनं अधिक होते. अलिकडेच या जमातीच्या लोकांनीं बरेच खून केले होते. तेव्हां कर्नल किर्नीनं त्यांना दम देऊन सांगितलं कीं यापुढे एक गोरा माणूस जरी मारला गेला तरी माझं सैन्य तुमच्यावर पाठवून मी सगळी आरापाहो जमात नाहींशी करून टाकीन. हा दम भरून झाल्यानंतर संध्याकाळीं कर्नल किर्नीनं या रेड इंडियनांना तोफा उडवून आणि अग्निबाण सोडून आपल्या युद्धसामर्थ्याचं लुटूपुटीचं प्रात्यक्षिक दाखवलं. रेड इंडियनांच्या इष्टदेवता आकाशांतच रहात! गोऱ्या लोकांनीं सोडलेले अग्निबाण आपल्या इष्टदेवतांकडेच जात असं जेव्हां रेड इंडियांनीं पाहिलं तेव्हां ते मनांतल्या मनांत चांगलेच हादरून गेले. त्यानंतर कित्येक महिने ते शांत होते, कसलाहि त्रास त्यांनीं दिला नाहीं. आम्हीं या प्रदेशांत आलों त्या अगोदरच कांहीं दिवस बूट आणि मे हे दोघे गोरे फासेपारधी शिकारीसाठीं डोंगरांत गेले असतांना या रेड इंडियनांनीं त्यांना ठार केलं. खरं म्हणजे याला कांहीं कारण नव्हतं. रेड इंडियनांच्या स्वभावांत खोल दडून राहिलेली जी क्रूरता असते तिचाच हा आविष्कार होता. या दोघांचा खून केल्यानंतर मात्र या रेड इंडियन जमातीची पांचावर धारण बसली. गोऱ्या सैनिकांची धाड आतां आपल्याला शिक्षा करण्यासाठीं केव्हां येईल आणि केव्हां नाहीं याची त्यांना भीति वाटूं लागली—आपण आणि आपले शत्रू यांच्यांत नऊशें मैल वाळवंटाचं अंतर आहे ही गोष्ट ते विसरून गेले होते!

शेवटीं या रेड इंडियन जामातीनं आपण केलेल्या या कृत्याबद्दल पश्चात्ताप व्यक्त करण्यासाठीं घोड्यांची भेट बरोबर देऊन एक शिष्टमंडळ लारामीच्या किल्ल्यावर पाठवलं. बोर्डोनं ही भेट नाकारली. तेव्हां घाबरून जाऊन त्या शिष्टमंडळानं ज्यानं हे खून केले होते त्याला आम्ही तुमच्या हवालीं करूं असं सांगितलं. पण बोर्डोनं हीहि गोष्ट नाकारली. त्यामुळें आरापाहो जमातीचं शिष्टमंडळ हादरलेल्या अवस्थेंत परत गेलं. परंतु यानंतर बरेच आठवडे गेले

तरीहि जेव्हां गोऱ्या सैनिकांचा हल्ला येईना तेव्हां नेमका उलटा परिणाम झाला. रेड इंडियन लोकांचा स्वभाव ज्यांना माहीत होता त्यांनीं हें भाकित अगोदरच केलं होतं. गोरे लोक घाबरले असावे या सगळ्या प्रकाराचा निष्कर्ष त्या रेड इंडियनांनीं काढला. आतां त्यांच्या भीतीची जागा उद्दाम आवेशानं घेतली. हे गोरे लोक भ्याड आहेत, म्हाताऱ्या बायकांसारखे आहेत असं म्हणून त्यांनीं आपल्या प्रदेशांत जो गोरा माणूस पाऊल टाकील त्याला ठार करण्याचा निश्चय केला. लारामींतल्या किल्ल्यांतल्या लोकांशीं स्नेहसंबंध असलेल्या एका डाकोटा रेड इंडियनानं येऊन हें सांगितलं.

लारामीच्या किल्ल्यावर पुरेसे अधिकार असलेला एकादा सैन्याधिकारी असता, आणि त्यानं त्या गोऱ्यांचा खून करणाऱ्या रेड इंडियनाला ताब्यांत घेऊन त्यांच्या सगळ्या जमातीसमोर जर त्याला गोळी घातली असती तर हे सगळे रेड इंडियन घाबरून जाऊन गप्प बसले असते आणि त्यामुळें बराचसा धोका कमी झाला असता. परंतु आतां मात्र मेडिसिन बो या डोंगराच्या आसपासच्या प्रदेशांत पाऊल टाकणं धोक्याचं होऊन बसलं होतं. म्हातारा मेनेसीला हा गोऱ्या लोकांचा सच्चा मित्र होता. तो आणि इतर कांहीं रेड इंडियन रोलो आणि सॅरफिन यांनीं आरापाहोंच्या प्रदेशांत जाऊं नये म्हणून त्यांचं मन वळवत होते. परंतु या दोघांनींहि त्यांचं ऐकलं नाहीं. तिसऱ्या दिवशीं सकाळींच ते आपल्या प्रवासाला निघणार होते. त्याच्या आदल्या दिवशीं सकाळीं मेडिसिन बो डोंगराच्या पायथ्याजवळून धुराचे लोट दिसूं लागले. तावडतोब टेहेळ्यांना पाठवण्यांत आलं. त्यांनीं बातमी आणली कीं आरापाहोंचा तळ तिथं पडलेला होता, कांहीं तासांपूर्वींच त्यांनीं आपला मुक्काम हलवला. पण इतकं सगळं असूनहि रोलो आणि सॅरफिन यांनीं तिथं जाण्याचा आपला हेका कांही सोडला नाहीं.

सॅरफिन उंच आणि बळकट बांध्याचा होता. त्याच्या चेहेऱ्यावर क्रौर्याची भावना दिसत असे. रेड इंडियन किंवा गवे यांच्याखेरीज आणखीहि कुणाचं तरी रक्त त्याच्या रायफलनं सांडलेलं असाव असं मानायला बरीच जागा होती. रोलोचा चेहेरा तांबूस आणि रुंद होता. एकाद्या लहान मुलाच्या चेहेऱ्यावर चिंतेच्या किंवा विचाराच्या फारच थोड्या छटा दिसतात तसंच रोलोच्या चेहेऱ्याचं होतं. हिमाघातामुळें त्याच्या दोन्ही पायांच्या बोटांचीं पहिलीं पेरं तुटून गेलेलीं होतीं. कांहीं दिवसांपूर्वींच तो घोड्यावरून पडला होता आणि

घोड्यानं त्याला तुडवलं होतं. त्यामुळें त्याच्या छातीला जबर मार बसला होता. परंतु इतकं सगळं असूनहि त्याची आनंदी वृत्ति जराहि कमी झालेली दिसत नव्हती. पेरं तुटलेल्या बोटांच्या पायांनीं किंचित् लंगडत चालत, रेड इंडियन बायकांशीं हंसतखिदळत, त्यांची थट्टा करत तो वस्तीभर हिंडत असे.

रोलोचा रेड इंडियन बायकांकडे जरा ज्यादाच ओढा होता. त्याची कोणी ना कोणी बाई नेहमीं असेच. या आपल्या बाईला रिबीनी, मणी, उत्तम रेड इंडियन पोषाख यांनीं तो चांगली नटवत असे. तो प्रवासाला निघाला कीं या बाईला मागं ठेवून त्याला जावं लागे. पण यामुळें त्याच्यामध्यें असूयेची भावना जराहि निर्माण होत नसे. फासेपारध्यांच्या व्यवसायांत जो कांहीं थोडा-फार फायदा त्याला होई तो सगळा रोलो आपल्या या प्रेयसीवर उधळून टाकी. त्यांतला कांहीं भाग जर यदाकदाचित् शिल्लक उरलाच तर मित्रांना मेजवानी देऊन तो खर्च करून टाकी. जर दारू मिळाली नाहीं—आणि सहसा असंच होई—तर त्याऐवजीं कडक कॉफी या मेजवानीला दिली जाई. या प्रदेशांतलीं माणसं संयम या गोष्टीबद्दल कधींच प्रसिद्ध नसल्यामुळें समोर ठेवलेला पदार्थ कितीहि महाग असो किंवा कितीहि भरपूर असो हां हां म्हणतां तो नाहींसा होत असे!

इतर फासेपारध्यांप्रमाणेंच रोलोचं जीवनहि विरोध आणि वैचित्र्य यांनीं भरलेलं होतं. फासेपारध करण्यासाठीं तो विशिष्ट हंगामांतच प्रवासाला जाई. उरलेला वर्षाचा काळ तो किल्ल्यांत तरी घालवी किंवा आजूबाजूला आपल्या मित्रांबरोबर शिकार आणि मजा करण्यांत घालवी. परंतु बीव्हर प्राणी पकडायला एकदां का तो निघाला कीं डोंगराळ मुलखांत अनेक संकटांना त्याला तोंड द्यावं लागे, त्याचे खूप हाल होत. पुष्कळ वेळां आग पेटवली तर आजूबाजूच्या रेड इंडियनांना ती दिसेल म्हणून त्याला कच्चंच जेवण खावं लागे. कधींकधीं तो शेकोटी पेटवून शेकोटीपासून दूर अंतरावर आपला मागोवा शत्रूला घेतां येऊं नये म्हणून कुठंतरी अंधारांत बसून राही. असं हे हालाचं जीवन रॉकी पर्वतांत फासेपारध करण्यासाठीं जाणाऱ्या अनेक लोकांना भोगावं लागतं. मला एकदां एक मूळ न्यू इंग्लंडचा राहणारा फासेपारधी या प्रदेशांत भेटला. त्याच्या छातीवर गोळ्यांच्या आणि बाणांच्या सहा जखमांचे वण होते. बंदुकीची गोळी लागून त्याचा एक हात तुटलेला होता. आणि त्याचा एक गुडघा फुटून गेला होता. पण इतकं असूनहि न्यू इंग्लंडचं पाणी त्याला स्वस्थ

बसूं देत नव्हतं. फासेपारध्याचा व्यवसाय त्यानं अजूनहि सोडला नव्हता.

आमच्या इथल्या मुक्कामाच्या शेवटच्या दिवशीं रोलो आणि सॅरॅफिन प्रवा .ला निघण्यासाठीं तयार झाले. ब्लॅकहिल्समध्यें त्यांनीं सात बीव्हर पकडले हो . त्यांची कातडी या दोघांनीं आतांच्या या प्रवासाहून परत येईपर्यंत ेनॉल्कडे ठेवायला दिली. आमच्याशीं हस्तांदोलन करून या दोघांनीं आमचा निरोप घेतला. उग्र चेहेऱ्याचा सॅरॅफिन पुढें झाला. त्याच्यामागून रोलो दुडक्या चालीनं घोडा चालवत मोठ्या आवाजांत एक कॅनेडियन गाणं म्हणत जाऊं लागला. स्वार्थभरल्या चेहेऱ्यानं त्यांच्याकडे पहात रेनॉल मला म्हणाला, "हे दोघे जर तिथं मारले गेले तर त्यांनीं माझ्याकडे ठेवायला दिलेलीं कातडीं अर्थातच माझ्या मालकीचीं होतील. हीं कातडीं जर किल्ल्यांत नेऊन विकलीं तर मला पन्नास डॉलर्स तरी मिळतील."

सॅरॅफिन आणि रोलो यांची आणि माझी यानंतर पुन्हां कांहीं गांठ पडली नाहीं.

पांच दिवस आमचा तळ इथं होता. वाळत घातलेलं मांस आतां सुकलं होतं. त्यामुळें प्रवासाला निघायला हरकत नव्हती. पुढच्या वर्षीच्या तंबूंसाठीं गव्यांचं कातडंहि भरपूर मिळालं होतं. तंबूंसाठीं बांबू मात्र अजून मिळवायचे होते. ब्लॅकहिल्सला असलेल्या स्प्रूस वृक्षांच्या जंगलांत या काठ्यांसाठीं जावं लागणार होतं. गव्याची जीभ आणि कातडी यांच्यावर शिकार करणाऱ्याचा पहिला हक्क असला तरी मांसाचा भाग जमातीमधल्या सगळ्याच लोकांना मिळतो. या वेळीं भरपूर शिकार मिळाल्यानं अशक्त आणि म्हातारे त्याच-प्रमाणें शिकारीला न जाणारे आळशी तरुण यांपैकीं कुणाचेच खाण्यापिण्याच्या बाबतींत हाल होणार नव्हते. एरवीं, ज्यांना उपास घडले असते अशा म्हाताऱ्या बायकांनींहि भरपूर मांस गोळा केलं होतं.

२५ जुलैच्या संध्याकाळीं आम्हीं मुक्काम हलवला. म्हातारीं माणसं आघाडीवर पुढें चालत होतीं. कांहीं मैल प्रवास झाल्यानंतर म्हातारीं माणसं धूम्रपान करत बसलीं आणि इथें पुन्हां तळ ठोकला गेला. मी माझं खोगीर रेमंडकडे दिलं आणि या म्हाताऱ्या लोकांत जाऊन बसलों. चर्चा चाललेली असतांना जर गोरा माणूस तिथं आला कीं जो संकोच किंवा एक प्रकारचा संशय या रेड इंडियनांत जागा होतो तो या वेळीं मला मुळींच दिसला नाहीं. सुशिक्षित लोकांच्या मंडळांविषयीं कुणीसं म्हटलं आहे कीं, 'तिथं विनोद जरी

घोड्यानं त्याला तुडवलं होतं. त्यामुळें त्याच्या छातीला जबर मार बसला होता. परंतु इतकं सगळं असूनहि त्याची आनंदी वृत्ति जराहि कमी झालेली दिसत नव्हती. पेरं तुटलेल्या बोटांच्या पायांनीं किंचित् लंगडत चालत, रेड इंडियन बायकांशीं हंसतखिदळत, त्यांची थट्टा करत तो वस्तीभर हिंडत असे.

रोलेचा रेड इंडियन बायकांकडे जरा ज्यादाच ओढा होता. त्याची कोणी ना कोणी बाई नेहमीं असेच. या आपल्या बाईला रिबीनी, मणी, उत्तम रेड इंडियन पोषाख यांनीं तो चांगली नटवत असे. तो प्रवासाला निघाला कीं या बाईला मागं ठेवून त्याला जावं लागे. पण यामुळें त्याच्यामध्यें असूयेची भावना जराहि निर्माण होत नसे. फासेपारध्यांच्या व्यवसायांत जो कांहीं थोडा-फार फायदा त्याला होई तो सगळा रोले आपल्या या प्रेयसीवर उधळून टाकी. त्यांतला कांहीं भाग जर यदाकदाचित् शिल्लक उरलाच तर मित्रांना मेजवानी देऊन तो खर्च करून टाकी. जर दारू मिळाली नाहीं—आणि सहसा असंच होई—तर त्याऐवजीं कडक कॉफी या मेजवानीला दिली जाई. या प्रदेशांतलीं माणसं संयम या गोष्टीबद्दल कधींच प्रसिद्ध नसल्यामुळें समोर ठेवलेला पदार्थ कितीहि महाग असो किंवा कितीहि भरपूर असो हां हां म्हणतां तो नाहींसा होत असे !

इतर फासेपारध्यांप्रमाणेंच रोलेचं जीवनहि विरोध आणि वैचित्र्य यांनीं भरलेलं होतं. फासेपारध करण्यासाठीं तो विशिष्ट हंगामांतच प्रवासाला जाई. उरलेला वर्षाचा काळ तो किल्ल्यांत तरी घालवी किंवा आजूबाजूला आपल्या मित्रांबरोबर शिकार आणि मजा करण्यांत घालवी. परंतु बीव्हर प्राणी पकडायला एकदां का तो निघाला कीं डोंगराळ मुलखांत अनेक संकटांना त्याला तोंड द्यावं लागे, त्याचे खूप हाल होत. पुष्कळ वेळां आग पेटवली तर आजूबाजूच्या रेड इंडियनांना ती दिसेल म्हणून त्याला कच्चंच जेवण खावं लागे. कधींकधीं तो शेकोटी पेटवून शेकोटीपासून दूर अंतरावर आपला मागोवा शत्रूला घेतां येऊं नये म्हणून कुठंतरी अंधारांत बसून राही. असं हे हालाचं जीवन रॉकी पर्वतांत फासेपारध करण्यासाठीं जाणाऱ्या अनेक लोकांना भोगावं लागतं. मला एकदां एक मूळ न्यू इंग्लंडचा राहणारा फासेपारधी या प्रदेशांत भेटला. त्याच्या छातीवर गोळ्यांच्या आणि बाणांच्या सहा जखमांचे वण होते. बंदुकीची गोळी लागून त्याचा एक हात तुटलेला होता. आणि त्याचा एक गुडघा फुटून गेला होता. पण इतकं असूनहि न्यू इंग्लंडचं पाणी त्याला स्वस्थ

बसूं देत नव्हतं. फासेपारध्याचा व्यवसाय त्यानं अजूनहि सोडला नव्हता.

आमच्या इथल्या मुक्कामाच्या शेवटच्या दिवशीं रोलो आणि सॅरॅफिन प्रवासाला निघण्यासाठीं तयार झाले. ब्लॅकहिल्समध्यें त्यांनीं सात बीव्हर पकडले होते. त्यांची कातडी या दोघांनीं आतांच्या या प्रवासाहून परत येईपर्यंत रेनॉलकडे ठेवायला दिली. आमच्याशीं हस्तांदोलन करून या दोघांनीं आमचा निरोप घेतला. उग्र चेहेऱ्याचा सॅरॅफिन पुढें झाला. त्याच्यामागून रोलो दुडक्या चालीनं घोडा चालवत मोठ्या आवाजांत एक कॅनेडियन गाणं म्हणत जाऊं लागला. स्वार्थभरल्या चेहेऱ्यानं त्यांच्याकडे पहात रेनॉल मला म्हणाला, "हे दोघे जर तिथं मारले गेले तर त्यांनीं माझ्याकडे ठेवायला दिलेलीं कातडीं अर्थातच माझ्या मालकीचीं होतील. हीं कातडीं जर किल्ल्यांत नेऊन विकलीं तर मला पन्नास डॉलर्स तरी मिळतील."

सॅरॅफिन आणि रोलो यांची आणि माझी यानंतर पुन्हां कांहीं गांठ पडली नाहीं.

पांच दिवस आमचा तळ इथं होता. वाळत घातलेलं मांस आतां सुकलं होतं. त्यामुळें प्रवासाला निघायला हरकत नव्हती. पुढच्या वर्षीच्या तंबूंसाठीं गव्यांचं कातडंहि भरपूर मिळालं होतं. तंबूंसाठीं बांबू मात्र अजून मिळवायचे होते. ब्लॅकहिल्सला असलेल्या स्प्रूस वृक्षांच्या जंगलांत या काठ्यांसाठीं जावं लागणार होतं. गव्याची जीभ आणि कातडी यांच्यावर शिकार करणाऱ्याचा पहिला हक्क असला तरी मांसाचा भाग जमातीमधल्या सगळ्याच लोकांना मिळतो. या वेळीं भरपूर शिकार मिळाल्यानं अशक्त आणि म्हातारे त्याच-प्रमाणें शिकारीला न जाणारे आळशी तरुण यांपैकीं कुणाचेच खाण्यापिण्याच्या बाबतींत हाल होणार नव्हते. एरवीं, ज्यांना उपास घडले असते अशा म्हाताऱ्या बायकांनींहि भरपूर मांस गोळा केलं होतं.

२५ जुलैच्या संध्याकाळीं आम्हीं मुक्काम हलवला. म्हातारीं माणसं आघाडीवर पुढें चालत होतीं. कांहीं मैल प्रवास झाल्यानंतर म्हातारीं माणसं धूम्रपान करत बसलीं आणि इथें पुन्हां तळ ठोकला गेला. मी माझं खोगीर रेमंडकडे दिलं आणि या म्हाताऱ्या लोकांत जाऊन बसलों. चर्चा चाललेली असतांना जर गोरा माणूस तिथं आला कीं जो संकोच किंवा एक प्रकारचा संशय या रेड इंडियनांत जागा होतो तो या वेळीं मला मुळींच दिसला नाहीं. सुशिक्षित लोकांच्या मंडळांविषयीं कुणीसं म्हटलं आहे कीं, 'तिथं विनोद जरी

कमी असला, तरी हंशा मात्र खूप मोठा होतो.' तसंच या रेड इंडियनांविषयीं त्या वेळीं म्हणतां आलं असतं.

पहिला पाईप ओढल्यानंतर मी उठलों आणि माझ्या यजमानाच्या तंबूंत गेलों. खोगिराला अडकवलेला बंदुकीच्या दारूचा शिंगाडा आणि गोळ्यांची पिशवी मी उतरून घेत होतों. इतक्यांत जवळच कांहीं अंतरावर मला आरडा-ओरड आणि युद्धघोषणा ऐकूं आल्या. तो गलवला कानीं पडतांच कोंग्रा-टोंगाच्या बायकोनं आपलं धाकटं मूल उचलून घेतलं आणि ती तंबूच्या बाहेर पळाली. मी तिच्यामागून बाहेर आलों. बाहेर येऊन पहातों तर वस्तीवर एकच गोंधळ आणि आरडाओरडा चाललेला मला दिसला. धूम्रपान करीत वर्तुळाकार बसून गप्पा मारणारे म्हातारे आतां जाग्यावर दिसत नव्हते. हातांत शस्त्रं घेऊन योद्धे झपाट्यानं बाहेर पडत होते आणि मोठमोठ्यानं किंकाळ्या फोडत वस्तीच्या पलीकडच्या टोकाकडे धांवत निघाले होते. मीदेखील त्या दिशेनं कांहीं गज पुढें गेलों तेव्हां मला प्रक्षुब्ध जमाव दिसला.

इतक्यांत कांहीं अंतरावरून रेमंड आणि रेनॉल यांनीं मला हांक मारल्याचं ऐकूं आलं. तंबूतळाच्या सीमेवरून वहात जाणाऱ्या झऱ्याच्या पलीकडच्या कांठावर हातांत रायफल घेऊन रेनॉल उभा होता. तो रेमंडला आणि मला बोलावीत होता. रेमंड मख्ख चेहेरा करून आपल्या नेहमीच्या धीरगंभीर चालीनं रेनॉलच्या दिशेनं निघालाहि होता.

हाच शहाणपणाचा मार्ग होता यांत शंका नाहीं. रेड इंडियनांत आपापसांत सुरू झालेल्या बाचाबाचींत जर आम्हांला भाग घ्यायचा असता तर तिथं रहाणं योग्य ठरलं असतं. मी रेनॉलच्या दिशेनं जायला निघालों. इतक्यांत मला शेजारच्या तंबूच्या दरवाज्यांतून सापासारखे चकाकणारे दोन डोळे दिसले. तो वृद्ध चेहेरा माझ्या ओळखीचा होता. एका हातांत धनुष्यबाण आणि दुसऱ्या हातांत सुरा घेऊन म्हातारा मेनेसीला लढण्यासाठीं बाहेर पडत होता. तंबूच्या दरवाज्यांतून बाहेर येतां येतां त्याचा पाय अडखळला आणि हातपाय पसरून तो तोंडावर धाडकन् पडला. त्याच्या हातांतलीं शस्त्रं आजूबाजूला फेकलीं गेलीं. हातांत आपलीं पोरं घेऊन मोठमोठ्यानं किंकाळ्या फोडत बायका पळत होत्या. मारामारी होऊं नये म्हणून कांहीं स्त्रियांनीं तंबूखालीं हाताला लागतील तीं शस्त्रें उचलून ठेवलीं होतीं. तंबूतळाच्या जवळच असलेल्या एका उंचवट्याच्या जागीं कांहीं म्हाताऱ्या बाया रांगेत उभ्या राहून ही मारामारी थांबावी म्हणून मंत्र गात होत्या.

मी झऱ्याच्या पलीकडच्या कांठाला पोंचलों. इतक्यांत मला बंदुकीचे बार ऐकूं आले. मी मागें वळून पाहिलं. मघाशीं गर्दी करून उभे राहिलेले योद्धे आतां दोन रांगांत विभागले गेले होते आणि गोळीं झाडत किंवा बाण सोडत शत्रूचा हल्ला चुकवण्यासाठीं किंकाळ्या फोडत उडया मारत होते. किडयासारखा घों घों आवाज करीत माझ्याहि डोक्यावरून कांहीं बाण गेले तेव्हां हा धोका जिथं बाचाबाची चालली होती तेवढ्या क्षेत्रापुरताच मर्यादित नाहीं हें मला कळलं व मी, रेनॉल आणि रेमंड गवतावर बसलों आणि सशस्त्र अलिप्ततेनं पलीकडे चाललेल्या बाचाबाचीचा काय निकाल होतो तें पाहूं लागलों.

सुरू झाल्यानंतर लवकरच ही बाचाबाची थांबली. आमची अशी अपेक्षा नव्हती. अर्थात् झालं तें आमच्या बऱ्याकरतांच झालं असावं. मी पुन्हां पाहिलं तेव्हां सगळे योद्धे एकत्र मिसळले होते. गोळीबार आणि शरसंधान थांबलं होतं. अधूनमधून किंकाळ्या मात्र ऐकूं येत होत्या. पांचसहा माणसं या गर्दीतून घाईघाईनं फिरत होती. शांतताप्रस्थापनेचं कार्य बहुधा तीं करत असावींत. वस्तीवरच्या दवंडीवाल्यानं मोठ्या आवाजांत कांहींतरी जाहीर केलं. परंतु रेनॉल आणि रेमंड या दोघांचंहि लक्ष तिथं काय होतं याकडे लागून राहिल्यामुळें त्या दवंडीचं भाषांतर करून त्यांनीं मला सांगितलं नाहीं.

आतां जमाव ओसरूं लागला होता. योद्धे हळूहळू तंबूकडे परतत होते. कांहींच्या खोबणींत घट्ट बसलेल्या डोळ्यांत द्वेषाची ठिणगी लकाकतांना दिसत होती. मेनेसीलासारखे मारामारीची खुमखुमी ज्यांना नव्हती असे कांहीं वृद्ध आणि त्यांच्या मदतीला असलेले वस्तीवरचे रेड इंडियन 'पोलीस' यांनीं हा दंगा थांबवला होता.

अनेक बाण आणि गोळ्या यांचा उपयोग केला गेला होता. परंतु आश्चर्य असं कीं, कुणाच्याहि वर्मीं असा घाव लागलाच नव्हता. दोन्ही बाजूंचे योद्धे सारखे धावत पळत असल्यामुळें असं झालं असणार हें मीं ताडलं. वस्तीवरची बरीचशीं माणसं या बाचाबाचींत भाग घेण्यासाठीं आलीं असावीं. कारण सगळ्या वस्तीवर डझनापेक्षां अधिक बंदुका नव्हत्या आणि मी आठ किंवा दहा तरी बार ऐकले होते.


पंधरा मिनिटांच्या आंत सर्वत्र शांतता पसरली. वस्तीच्या मध्यभागीं कांहीं योद्धे वर्तुळाकार बसले होते. मी तिथं जाऊन बसलों नाहीं. कारण या वेळीं पाईप डाव्या हाताकडून उजव्या हाताच्या माणसांकडे सरकत वर्तुळांत फिरवला

जात असल्याचं मी पाहिलं. याजा अर्थ असा होता कीं, तडजोडीसाठीं म्हणून हें मंत्रविधियुक्त असं धूम्रपान चाललेलं होतं. अशा वेळीं गोऱ्या माणसाची त्यांना अडचण झाली असती. मी पुन्हां तंबूतळावर आलों तेव्हां अंधार पडला होता. संतापाचं वातावरण अजूनहि पूर्णपणें शमलेलं नव्हतं. कांहीं तंबूंतून रडण्याचे आवाज येत होते. या रडण्याचा कांहीं वेळांपूर्वी झालेल्या मारामारीशीं संबंध होता कीं गेल्या वर्षी मारल्या गेलेल्या नातेवाईक योद्धयांच्या स्मरणार्थ हें रडणं चाललं होतं तें कांहीं मला ठरवतां आलं नाहीं.

मारामारी कशामुळें झाली याची चौकशी त्यावेळीं खोलांत जाऊन करणं दूरदर्शीपणाचं ठरलं नसतं. कांहीं दिवसांनंतर कारण मला समजलं. डाकोटा जमातींत वेगवेगळीं मंडळं असतात. युद्धविषयक, सामाजिक, जादूटोणाविषयक अशी वेगवेगळीं कार्यक्षेत्रं या मंडळांचीं असतात. ॲरो ब्रेकर्स हें अशाच मंडळांपैकीं एक होतं. खरं म्हणजे आतां हें मंडळ बरचसं मोडलं होतं, विस्कळित झालं होतं. या वस्तीवर या मंडळाचे चार लोक होते. आपल्या मंडळाची खूण म्हणून हे चौघेजण कपाळाच्यावर केसांचा असा उंच पुंजका ठेवत. या केसांच्या रचनेमुळें त्यांची उंचीहि अधिक वाटे आणि त्यांचा चेहेराहि अधिक हिंस्र दिसे. या चौघांचा प्रमुख होता मॅड वुल्फ हा योद्धा. मॅड वुल्फचं शरीर विलक्षण बळकट होतं. त्याची शक्ति, धैर्य आणि उग्रता एकाद्या राक्षसासारखी होती. या वस्तीवरच्या सगळ्या माणसांत हा मनुष्य सर्वांत धोकेबाज आहे अशी खूणगांठ मीं माझ्या मनाशीं बांधली होती आणि म्हणून त्यानं जेव्हांजेव्हां मला तंबूवर जेवायला बोलवलं तेव्हांतेव्हां माझी शस्त्रं बरोबर घेतल्याखेरीज मी कधींच गेलों नाहीं. वस्तीवर टॉल बेअर नांवाचा दुसरा एक योद्धा होता. टॉल बेअरचा गव्यांच्या शिकारीला न्यायचा घोडा मॅड वुल्फच्या मनांत भरला. तो घोडा आपल्याला मिळावा म्हणून त्यानं जवळ जवळ तितक्याच किंमतीचा आपला घोडा टॉल बेअरला भेट दिला. भेट दिली कीं प्रतिभेट मिळालीच पाहिजे ही रेड इंडियनांची प्रथा असते. मॅड वुल्फनं भेट आणून देतांच आपला शिकारी घोडा प्रतिभेट म्हणून त्याला उपटायचा आहे हें टॉल बेअरनं ओळखलं. अनेक दिवस गेले तरी कसलीहि प्रतिभेट टॉल बेअरनं दिली नाहीं. ज्या दिवशीं बाचाबाची झाली त्या संध्याकाळीं मॅड वुल्फ टॉल बेअरच्या तंबूवर गेला आणि आपला भेट दिलेला घोडा घेऊन परत निघाला.- हें पाहतांच टॉल बेअरला रेड इंडियनांच्या स्वभावानुसार क्रोधाचा झटका

आला. आपला सुरा घेऊन तो धावला आणि मॅड वुल्फ घेऊन चाललेल्या घोड्यावर धांवत जाऊन तीन वार केले. हें पाहतांच मॅड वुल्फनं बाण जोडून धनुष्याची दोरी आकर्ण ओढली. रक्तानं माखलेला सुरा हातांत घेऊन टॉल वेअर त्याच्या धनुष्यापुढं शांतपणें उभा राहिला. टॉल वेअरच्या जीवाला आतां धोका आहे हें कळतांच त्याचे नातेवाईक मदतीला आले. हें पहातांच ॲरो ब्रेकर्स मंडळाचे उरलेले तीन सभासद मॅड वुल्फच्या मदतीला धावले. त्यांचे त्यांचे मित्रहि धावून आले. युद्धाच्या घोषणा केल्या गेल्या आणि पाहतां पाहतां या बाचाबाचीला एक प्रकारचं सार्वत्रिक स्वरूप आलं.

ज्या रेड इंडियन 'पोलिसांनीं' हा दंगा काबूंत आणला त्यांचं काम वस्तीवर अत्यंत महत्त्वाचं असतं. वस्तीवरच्या धैर्यशील आणि शौर्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या माणसांकडे हें काम सोपवलं जातं. वस्तीवरची म्हातारीं माणसं आणि प्रतिष्ठित योद्धे यांची बैठक भरून चर्चा होते आणि मग हे 'पोलीस' निवडले जातात. ज्येष्ठांची आणि श्रेष्ठांची ही समिति या निवडलेल्या पोलिसांकडे कांहीं अधिकार सुपूर्द करते. वस्तीवर कांहीं उलट्या काळजाचे लोक असतात. त्यांनीं अपराध केला असतां वस्तीवरचे शूर योद्धे त्यांच्यावर हात टाकायला कचरतात. परंतु निवडले गेलेले हे पोलीस त्यांच्याकडे सुपूर्द केलेल्या अधिकारामुळें वस्तीवरच्या गुन्हेगारांना वठणीवर आणूं शकतात.



## १७ | ब्लॅक हिल्स

पूर्वेच्या दिशेनं दोन दिवस प्रवास केल्यानंतर ब्लॅक हिल्सच्या विषण्ण दिसणाऱ्या डोंगरकड्यांची रांग आमच्यासमोर उभी राहिली. रेड इंडियनांची वस्ती कांहीं मैल उतारावरून पुढं गेली. अधूनमधून वाटेंत येणाऱ्या चित्रविचित्र आकारांच्या कड्यांनाहि त्यांना वळसे घालून जावं लागे. डाव्या हाताला वळल्यानंतर एक खोल घळ आम्हांला दिसली. घळीच्या तळाहून एक झरा वहात होता. झऱ्याच्या कांठाशीं दाट गवत होतं आणि खूप झाडं वाढलीं होतीं. झाडाझुडपांच्या या गर्दीत अनेक बीव्हरांची विवरं होतीं. कड्यांच्या समोरासमोर असलेल्या दोन रांगांमधून वाट काढत आम्हीं पुढं गेलों. या कड्यांवर क्वचितच एखादं झाड किंवा झुडूप दिसत होतं.

चळवळे रेड इंडियन पोरगे या कड्यांच्या टोकावर जाऊन खालून जाणाऱ्या वस्तीकडे पहात. आम्ही जसजसे पुढें जाऊं लागलों तसतशी वाट अधिकाधिक अरुंद होऊं लागली. शेवटीं ही वाट एका हिरव्यागार कुरणावर उतरली. हें

कुरण संपूर्णपणें डोंगरांनीं वेढलेलं होतं. सगळीं रेड इंडियन कुटुंबं इथं थांबलीं आणि बघतां बघतां जादू झाल्याप्रमाणें तंबूतळ उभारलेला दिसूं लागला.


तंबू उभारून झाले असतील नसतील इतक्यांत नवीन बांबू गोळा करण्याच्या ज्या कामासाठीं ही वस्ती इथवर आली होती त्या कामाला जाण्यासाठीं घाई-घाईनं सर्वजण निघाले. जवळजवळ अर्धे लोक घोड्यावर बसून डोंगराच्या आंतल्या भागांत गेले. कडे, खडक, घळीं आणि उतार यांनीं भरलेली ही वाट होती. जवळजवळ सहा ते आठ मैल आंत गेल्यानंतर दृश्य बदललेलं आणि उतारावर उंच सरळ वाढलेलं स्प्रूस वृक्षांचं जंगल दिसूं लागलं. आपले परशु आणि सुऱ्या घेऊन तंबूंना लागणाऱ्या काठ्या कापण्यासाठीं सगळे रेड इंडियन डाव्या उजव्या हाताला विखुरले. मी एकटाच राहिलों. त्या एकाकी डोंगरांच्या शांततेंत परशूंचे आवाज आतां घुमूं लागले होते.

रेनॉल्ला सुद्धा तंबूसाठीं काठ्या हव्याच होत्या. मी रेमंडला आपल्या मदतीला पाठवावं अशी त्यानं विनंति केली. मी होकार देतांच रेमंडला घेऊन रेनॉल जंगलांत शिरला. मी माझी घोडी रेमंडच्या ताब्यांत दिली होती. ते पुढे गेले तसा मी डोंगर चढायला सुरवात केली. मी फार थकलों होतों. हळू हळू चढत जवळजवळ तासाभरानें मी एका कड्याच्या टोकावर जाऊन पोंचलों. तिथून मी खालीं पाहिलं तेव्हां ज्या बाजूनं मी वर आलों होतों ती घळ एखाद्या खोल घळीसारखी दिसूं लागली. इथल्या डोंगरांपैकीं सर्वांत उंच जें शिखर होतं तें मी उभा होतों त्या शिखराहून कितीतरी उंच होतं. लहानपणा-पासून माझ्या परिचयाचीं असलेलीं दृश्यं मला सभोंवतालीं दिसत होतीं; कडे आणि खडक, खळखळ आवाज करत वहाणारा काळा आणि गंभीर झरा, शेवाळलेल्या झाडांचं जंगल, जुनाट झाल्यामुळें किंवा वादळानें उखडल्यामुळें पाण्याच्या प्रवाहांत पडलेले झाडांचे बुंधे, त्या बुंध्यांवर आपटून फेसाळणारं पाणी...मी या दृश्याकडे पहात कांहीं क्षण तटस्थ उभा राहिलों.

या डोंगराळ जंगलांत बरेच प्राणी होते. मी थोडं पुढं गेल्यानंतर सांबरांच्या खुरांनीं मळलेली वाट मला दिसली. हरणांनीं तुडवलेलं गवतहि दिसलं. कित्येक ठिकाणीं लांडग्यांचीहि पावलं उमटलीं होतीं. कांहीं ठिकाणीं उमटलेले खूर मात्र माझ्या परिचयाचे नव्हते. ते रॉकी पर्वतांतल्या मेंढ्यांचे असावेत असा मीं तर्क केला. मी एका खडकावर बसलों. सर्वत्र शांतता पसरली होती. वाऱ्यानं पानहि हालत नव्हतं. एखाद्या किड्याचादेखील आवाज ऐकूं येत नव्हता.

अशा स्थळीं वाट चुकून हरवण्याचा फार मोठा धोका असतो. या गोष्टीची जाणीव होतांच समोरच्या डोंगराच्या एका उंच शिखरावर माझी नजर मी खिळवली. पायथ्याच्या जंगलांतून हा डोंगर वर उभा होता. या डोंगराच्या शिखरावर एक प्रचंड सुटा खडक दिसत होता. तो तिथं अलगद कसा राहूं शकला हें निसर्गाचं एक कोडं होतं. शिखरावरच्या त्या खडकाची ती खूण सहसा विसरणं शक्य नव्हतं. त्या निश्चित खुणेमुळें मला सुरक्षित वाटूं लागलं आणि मी थोडा पुढें आलों. इतक्यांत बाजूच्या झुडपांतून एक पांढरा लांडगा उडी मारून पुढं गेला. थोड्या वेळानं मागं वळून तो माझ्याकडे पाहूं लागला. त्याची कातडी ब्लॅक हिल्सचं स्मृतिचिन्ह म्हणून बरोबर घ्यावी असं मला वाटलं. परंतु मी माझी बंदूक रोखण्याआधींच तो पलीकडच्या खडकांत अदृश्य झाला. थोड्या वेळानं पलीकडच्या झाडींत सळसळ ऐकूं आली म्हणून मी पाहिलं तेव्हां मला सांबराची शिंगं दिसलीं. शिकाऱ्यांचा स्वर्ग तो हाच असावा असं मला वाटलं.

जुलै महिन्यांतल्या ब्लॅक हिल्सचं दर्शन हें असं असतं. परंतु हिंवाळा आला कीं ब्लॅक हिल्सचा हा परिसर वेगळंच रूप धारण करतो. बर्फाच्या भारानं फर वृक्षांच्या रुंद फांद्या जमिनीपर्यंत वाकतात आणि काळे कुळकुळीत डोंगरकडे पांढरेशुभ्र दिसूं लागतात. उन्हाळ्याची सफर संपवून आलेले फासेपारधी पुन्हां इथं जमू लागतात. शिकार भरपूर असते. तंबू घालून हे फासेपारधी या मोसमांत इथं सुखानं रहातात. कांहीं वेळां आपल्या बाया आणि त्यांचे रेड इंडियन नातेवाईक यांच्यासह हे फासेपारधी या शिकारीच्या सावजांनीं वेढलेल्या हिमशुभ्र एकांतांत तळ ठोकून राहतात. प्राणी पकडण्यासाठीं ते खड्डे खणून फास लावून ठेवतात. आजूबाजूच्या डोंगरांतून लांडग्यांचं भीतिदायक संघगान रात्रभर चालू असतं. परंतु आपल्या ओंडक्यांच्या घरांच्या आंत शेकोटीसमोर हे फासेपारधी मजेंत पडलेले असतात. सकाळ झाली कीं आपल्या घराच्या दारांतूनच बंदूक रोखून ते एकादं सांबर किंवा हरीण टिपतात.



# १८ | डोंगरांतली शिकार

नवीन वर्षाच्या तंबूसाठीं कापून आणलेल्या काठ्यांचे तंबूतळावर ढीग पडले होते. तंबूसाठीं काठ्या तासण्याचं आणि योग्य आकारांत त्या कापण्याचं काम चालू होतं. गेल्या तंबूतळाच्या वेळीं मिळवलेली कातडीं आतां तासून आणि घासून तयार ठेवण्यांत आली होती. हीं कातडीं तंबूसाठीं शिवण्याच्या कामांत सगळ्या स्त्रिया गुंतल्या होत्या. पुरुष मंडळी झऱ्याच्या कांठच्या झुडपांतून फिरून शॉंगशासा या झुडपाच्या काठ्या गोळा करत होती. या काठ्यांचा चुरा तंबाखूंत मिसळून रेड इंडियन ओढतात. रेनॉल्ची बाई हातांत दाभण घेऊन तंबूचीं कापडं शिवण्याच्या कामाला जोरांत लागली होती आणि तिचा धनी प्रचंड न्याहारीचं आपलं कार्य नुकतंच संपवून माझ्याबरोबर आणि रेमंडबरोबर गप्पा मारत पाईप ओढत होता. बोलतां बोलतां रेनॉल्नं शिकारीला जाण्याची सूचना केली. तो म्हणाला, "माझं जर खोटं ठरलं तर तुझ्या घोडीऐवजीं माझा घोडा मी द्यायचा अशी पैज मारायला मी तयार आहें. तुम्हीं रायफली घेऊन चला. मी नक्की सांगतों इथून साधारण दोन मैलांच्या अंतरावर एकादं काळ्या शेपटीचं हरीण किंवा सांबर नक्कीच मिळेल. कुणी सांगावं! कदाचित् एखादा गवाहि आढळेल. मी माझ्या बाईची पिवळी घोडी बरोबर घेतों. ही घोडी तासाला चार मैलांपेक्षां अधिक कांहीं दामटतां येणार नाहीं. पण असं असलं तरी डोंगराळ भागांत ती एकाद्या खेचरासारखी उपयोगी पडते."

मी रेमंडच्या काळ्या खेचरावर स्वार झालों. हें खेचर काटक तर होतंच, पण स्वभावानंहि नरम होतं. परंतु गेले कांहीं दिवस त्याच्या स्वभावांत बदल होऊन तें अतिशय हट्टी आणि नाठाळ बनलं होतं. त्याचं असं झालं : आठवड्यापूर्वी वस्तीवरच्या एका रेड इंडियनाशीं माझा थोडा खटका उडाला. त्या रेड इंडियनानं मनांत डूख ठेवला. हें खेचर कुरणांत चरत असतांना तो रेड इंडियन सुरा घेऊन हळूंच तिथं गेला आणि त्यानं त्या खेचराच्या मांडीवर वार केला. ती जखम आतां थोडीबहुत भरली होती. परंतु घाव फारच खोल बसल्यानं त्या खेचराला खूपच त्रास झाला होता आणि त्यामुळें इतर खेचरांच्या मानानं आतां तें खेचर अतिशय हट्टी बनलं होतं.

सकाळ अगदीं झकास होती. गेल्या दोन महिन्यांत कधींच नव्हती इतकी माझी तब्येतहि आज चांगली होती. मी आणि रेनॉल एका खडकाळ घळींतून जाऊं लागलों. थोड्या वेळानं आमचा तंबूतळ नजरेआड झाला. इतक्या घाणेरड्या वाटेनं मी पूर्वी पायीं गेलों होतों. पण स्वार होऊन गेलों नव्हतों. तो अनुभव मी कधींहि पुन्हां घेणार नाहीं. त्या वाटेनं जातांना माझं खेचर विलक्षण चिडचिडं बनलं. रेनॉलची दांडगी घोडीसुद्धां पावलोपावलीं अडखळूं लागली. खडकांच्या तीक्ष्ण टोकांनीं तिचे पाय कापले गेले आणि त्यामुळें ती सारखी कण्हूं लागली.

निःशब्द, निर्मनुष्य असं तें दृश्य होतं. उंच कड्यांखेरीज कांहींहि दिसत नव्हतं. क्वचित् कुठेंतरी एकादं झुडूप कुठल्यातरी कड्यावर दिसे तेवढाच काय तो वेगळेपणा. थोड्या वेळानं हा खडकाळ भाग ओलांडून आम्हीं जंगलवाटेवर आलों. इथं आल्यानंतर पुन्हां आदल्या वाटेवरच्या खडकावर जावं असं आम्हांला वाटूं लागलं. कारण इथं इतकी दाट झाडी होती कीं एक बांबू एवढ्या अंतरावरचं देखील आम्हांला कांहीं दिसेना.

जोखीम आणि विनोद यांचं बेमालूम मिश्रण असलेला प्रसंग जर एखाद्याला अनुभवायचा असेल तर त्यानं नाठाळ खेचरावर बसून पंचेचाळीस अंशाचा कोन करणाऱ्या जंगलवाटेच्या उतारावरून प्रवास करावा. या प्रवासांत जर त्याच्याबरोबर मोठी रायफल असेल, काळविटाच्या कातड्याचा लांब झालरी लावलेला अंगरखा त्यानं घातला असेल आणि त्याचे केस जर लांब असतील तर या प्रसंगाला विशेषच लज्जत येईल. कारण त्याचे लांब केस आणि अंगरख्याची झालर सारख्या फांद्यांत अडकूं लागतात. अधूनमधून फांद्यांचे

फटकारे तोंडावर बसतच्च असतात. डोक्यावरच्या मोठ्या फांद्या आपटतच्च असतात. मधेंच खेचर आपल्या स्वभावानुसार थांबतं आणि अचानक जोरांत पुढं धांवूं लागतं. अशा वेळीं त्याच्या पाठीवर सावरून बसणं कठीण होतं मधेंच्च आपण वरची फांदी डोक्याला आपटूं नये म्हणून खेचराला खालीं वाकून घट्ट धरतों. मधेंच मागं झुकून पाय खेचराच्या मानेजवळ नेतो कारण तसं जर केलं नाहीं तर खेचराची बरगडी आणि एखादा झाडाचा बुंधा यांच्यांत आपला पाय चेपला जाण्याची शक्यता असते. या वाटेनं जातांना रेनॉल सारखा शिव्या घालत होता. आम्हीं कुठं चाललों आहोंत याची आम्हां दोघांना कल्पना नव्हती. वाईट रस्त्यावरून मीं पूर्वी प्रवास केलेला होता. परंतु आतां आम्ही ज्या वाटेनं जात होतों ती भयानक वाट मी आयुष्यांत कधीं विसरणं शक्य नाहीं.

हा भयानक मार्ग मागं टाकून आम्ही उताराशीं आलों. उताराच्या पायथ्याशीं एक झरा वळसा घालून जात होता. झरा ओलांडून आम्ही पुढं जाऊं लागलों. झाडांच्या हिरव्या छतांमुळें उन्हाच्या झळा आमच्यापर्यंत पोंचत नव्हत्या. परंतु हे सौख्याचे क्षण फारच्च थोडावेळ टिकले. जो झरा तुडवत आम्ही जात होतों तो एका खडकाळ टेकडीवरून घळींत उतरत होता. या घळीचा तळ कांहीं आम्हांला दिसत नव्हता. तेव्हां नाइलाज होऊन आम्ही आम्हांला नकोशा असलेल्या जंगलवाटेवर परत आलों. कांहीं वेळानं तिथून प्रवास करून अवकाशांत खुपसल्यासारख्या उभ्या असणाऱ्या कड्याच्या माथ्यावर आम्ही आलों. समोर दूरवर पसरलेली एक वैराण दरी दिसत होती. एकाग्रतेनं तिथं पहात रेनॉल म्हणाला, "अनेक वेळां या रेड इंडियनांबरोबर सोनं शोधण्यासाठीं म्हणून मी ब्लॅकहिल्सच्या परिसरांत हिंडलों आहें. इथं सोनं खूप आहे यांत शंका नाहीं. पन्नास वेळां तरी मी तें स्वप्नांत पाहिलं आहे. आणि हें पहा, माझीं स्वप्नं खोटीं झालीं असं कधींच्च घडलेलं नाहीं. पलीकडे ते एकावर एक चढलेले काळे खडक दिसतात ना, तिथं सोनं असेल असं नाहीं वाटत ? परंतु गोऱ्या लोकांनीं तिथं फार उसकाउसकी करणं बरं नव्हे. कारण तो भाग पिशाच्चांनीं भरलेला आहे असं रेड इंडियन लोक मानतात. आणि म्हणून अशा परिस्थितींत तिथं सोनं हुडकायला जाण्यांत धोका आहे. पुन्हां कधींतरी एखाद्या रेड इंडियनाला मंत्रसामर्थ्य असलेली काठीं घेऊन इथं आणलं पाहिजे. मग पिशाच्चांची भीति उरणार नाहीं. मी

तुला सांगतों, सोन्याची खाण सांपडेल इथं आपल्याला. असूं दे. हा सोन्याचा विषय सध्यां आपण सोडून देऊं. पलीकडच्या घळींत तिथं झाडं दिसतायत् ना, तिथं आपण जाऊं. माझी खात्री आहे, एकाद्या काळ्या शेपटीचं हरीण आपल्याला सांपडेल.''

परंतु प्रत्यक्ष आम्ही त्या घळींत पोंचलों तेव्हां रेनॉलचा अंदाज साफ चुकल्याचं आढळून आलं. घळीमागून घळी आणि कड्यांमागून कडे ओलांडत होतों परंतु एकहि सावज आम्हांला दिसत नव्हतं. रेनॉलचे डोळे आसपासच्या खडकांवर खिळलेले होते. एकादी मेंढी दिसेल अशी त्याला आशा वाटत होती. शेवटीं डोंगराच्या पायथ्याशीं कांहींतरी धावतांना दिसलं. कांहीं वेळानं काळ्या शेपटीचं एक हरीण खडकावर उभं राहून आमच्याकडे पाहूं लागलं आणि त्या खडकामागें नाहींसं झालं. रेनॉल चटकन् खालीं उतरला आणि त्या खडकाकडे धावत गेला. अशक्तपणामुळें मला धावणं शक्य नव्हतं. मी रेनॉलची घोडी धरून तसाच उभा राहिलों. थोड्या वेळानं रेनॉल दिसेनासा झाला. लवकरच बंदुकीचा बार मला ऐकूं आला. कांहीं वेळानं पडलेल्या चेहेऱ्यानं हात हालवीत येणारा रेनॉल मला दिसला. पुन्हां आम्ही त्या लांब दरींतून खालीं उतरलों. कांहीं वेळानें आम्ही एका रुंद आणि उथळ अशा डबक्यापाशीं आलों. त्याच्या तळाशीं उन्हानं सुकलेल्या पांढऱ्या मातीचा थर दिसत होता. बाहेरून अगदीं साधंसुधं वाटणारं हें डबकं धोकेबाज आहे हें रेनॉलच्या सराईत नजरेनं ओळखलं. त्यानं मला थांबायला सांगितलं. त्यानं एक दगड घेतला आणि डबक्यांत फेकला. पिवळट पाणी किंचित् वर आलं आणि थोड्याच वेळांत तो दगड अदृश्य झाला. नंतर पांचसहा फूट लांब अशी काठी आम्हीं त्या डबक्यांत घातली. इतक्या खोलीवर त्या डबक्याचा तळ आम्हांला लागला. पुष्कळ वेळां असं होतं कीं आंधळेपणानं फिरतां फिरतां एखादा गवा या डबक्यांत येऊन फसतो. तो प्रचंड केसाळ प्राणी जितकी धडपड करतो तितका अधिकाधिक रुतत जातो. शेवटीं चिखल त्याच्या डोक्यावर येतो. आणि त्या गव्याच्या मरणकाळच्या झटक्यांची कल्पना पृष्ठभागावरच्या हालचालींवरून साधारण करतां येते.

बराच वेळ शोधल्यानंतर हें डबकं ओलांडून जाण्याची वाट आम्हांला सांपडली. या वाटेनं पुढं गेल्यानंतर कांहीं वेळानं आम्ही माळावर आलों. पलीकडे कांहीं अंतरावर हेलावणाऱ्या गवतांत तीनचार काळे ठिपके हलतांना

दिसले. ते गवे आहेत असं रेनॉल म्हणाला. "चल, त्यांच्यापैकीं एकादा गवा आपल्याला टिपलाच पाहिजे. तंबूसाठीं माझ्या बाईला आणखी थोडं कातडं हवं आहे. मलाहि थोडा शिरस तयार करायचा आहे."

असं म्हणून रेनॉलनं जितकी शक्य होती तेवढी आपली घोडी पुढं दामटली. मीहि माझ्या खेचराला टांच मारली. थोड्याच वेळांत आपल्या हलक्या वेगाच्या प्रतिस्पर्ध्याला खेचरानं गाठलं. आम्हीं एक मैल पुढं गेलों. माझं खेचर जोरानं धावत होतं. इतक्यांत एक ससा जोरांत उडी मारून माझ्या खेचराच्या पायाखालीं आला. त्यामुळें बुजून माझ्या खेचरानं जोरानं उडी मारली. मी बंदुकीसकट फेकला गेलों. मी जमिनीवर पडलों. माझ्या डोक्या-लगत असलेली माझी बंदुक आघातानं उडाली. बार झाल्याचा आवाज ऐकतांच मी दचकलों. कांहीं क्षण स्तब्ध पडून राहिलों. मला बहुतेक गोळी लागली असणार अशा समजुतीनं खेचराला शिव्या घालत रेनॉल जवळ आला. मी उठून उभा राहिलों. माझी रायफल उचलून घेतली. तिच्या दस्त्याला तडा गेल्याचं मला आढळलं, इतकंच नव्हे, तर एक महत्त्वाचा स्क्रूहि निखळल्याचं मला दिसलं त्यामुळें बंदुकीचा घोडा दोऱ्यानं घट्ट बांधावा लागला. नशीब मात्र एवढंच कीं इतकं होऊनहि रायफल निरुपयोगी कांहीं झाली नव्हती. मी रायफल नीट पुसून काढली. तिच्यांत दारू ठासून घेतली. मी ती रेनॉलच्या हातांत दिली आणि माझ्या खेचरावर स्वार झालों. मी स्वार होतांच तें खेचर मागेंपुढें ओढ घेऊन दंगामस्ती करूं लागलं. माझ्या हातांत रायफल नव्हती आणि या प्रसंगाला तोंड द्यायची माझी तयारीहि होती. थोड्याच वेळांत त्या खेचराला मी वठणीवर आणलं. मग मी रायफल रेनॉलकडून घेतली आणि आणि प्रवास पुढं सुरू केला.

डोंगर ओलांडून आम्ही आतां विस्तीर्ण माळावर आलों होतों. आम्हांला मघाशीं दिसलेले गवे अजूनहि दोन मैल अंतरावर होते. आम्ही त्यांच्याजवळ जाऊन गवताच्या एका फुगवट्यामागें थांबलों. मी रेनॉलचा घोडा घेऊन उभा राहिलों. रेनॉल रायफल घेऊन पुढं धावला. तो उंचवट्यापलीकडे गेल्यावर दिसेनासा झाला. अशींच कांहीं मिनिटं गेलीं. मग बंदुकीचा आवाज ऐकूं आला. उजव्या हाताला एक गवा वेगानं पळतांना दिसूं लागला. त्यानंतर पडेल चेहेऱ्यानं रेनॉल येतांना दिसला. हात हलवीत तो आला आणि घोड्यावर स्वार झाला. ब्लॅकहिल्स आणि तिथले गवे यांच्यावर त्यानं शिव्यांचा वर्षाव

सुरू केला. आपण उत्तम शिकारी आहोंत असं तो मला आवर्जून सांगूं लागला. त्याचं तें म्हणणं खरंहि होतं. आपण कधींहि या डोंगराळ प्रदेशांतून निदान दोनतीन हरणं तरी मारल्याशिवाय परत आलों नाहीं असं त्यानं मला सांगितलं.

आतां आम्हीं आमच्या तंबूतळाच्या दिशेनं वळलों. वाटेंत आम्हांला वेगांत पळणारीं अनेक सांबरं दिसलीं. पण त्यांतलं एकहि उभं रहायला तयार नसल्या-मुळें गोळीं झाडणं कांहीं शक्य नव्हतं. आमचा तंबूतळ आणि आम्ही यांमध्यें एक डोंगरउतार होता. आम्ही पायथ्याशीं जाऊन पोंचलों तेव्हां दूरच्या वाटेनं जायचा कंटाळा आला होता. म्हणून आम्हीं डावीकडे वळलों आणि खडकाळ चढण चढून जाऊं लागलों. इथंहि बरींच सांबरं पळतांना दिसलीं, मी आणि रेनॉलनं गोळीं झाडली. परंतु अंतर अधिक असल्यानं नेम चुकला. शेवटीं आम्ही एकदांचे त्या चढणीच्या माथ्यावर पोंचलों. खालीं असलेल्या खोऱ्यांत आमचा तंबूतळ दिसत होता. शिकार कांहींच मिळाली नसल्यामुळें लहान तोंड करून आम्हीं वस्तीच्या दिशेनं निघालों.

वस्तीवर पोंचल्यानंतर आम्हीं शिकार करून बरंच ताजं मांस आणलेलं असणार अशा आशेनं बरींच माणसं आमच्याभोंवती जमलीं. परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिति दिसतांच रेड इंडियन स्त्रियांच्या तोंडांतून वेगवेगळे दबले उद्गार बाहेर पडूं लागले. रेनॉलला त्यामुळें फार राग आला. परंतु मान खालीं घालण्याचा खरा प्रसंग येणार होता, रेनॉलच्या तंबूवर गेल्यानंतर. आम्ही तिथं जाऊन पोंचतांच रेनॉलच्या बाईचा नातेवाईक हेलस्टॉर्म आणि त्याचा मित्र रॅबिट हे दोघे कटोऱ्यांतल्या मांसावर ताव मारत बसलेले दिसले. त्याच्या शेजारीं नुकत्याच मारलेल्या हरणाचं कातडं दिसत होतं. तंबूतळापासून मैल दोन मैलाच्या अंतरावर जाऊनच त्यानं या हरणाची शिकार केली होती. आपल्या या विजयामुळें हेलस्टॉर्म खूष झाला होता. परंतु चेहेऱ्यावर मात्र दाखवत नव्हता. आम्हीं आलों याचंदेखील त्याला भान होतं असं दिसलं नाहीं. त्याचा देखणा चेहरा शांत दिसत होता. रेड इंडियन लोकांतला हा संयम विलक्षण असतो. मूळ भावना न दाबतांसुद्धां तिचं प्रदर्शन करण्याचं ते टाळूं शकतात.

गेले दोन महिने मी हेलस्टॉर्मला ओळखत होतों. या काळांतसुद्धां त्याच्या व्यक्तित्वाचा होत असलेला विकास मला जाणवला होता. जेव्हां प्रथम मी त्याला पाहिला तेव्हां पोरवयांतून शिकार आणि युद्ध यांच्याविषयीं महत्त्वाकांक्षा

वाळगणाऱ्या तरुण वयांत त्यानं नुकता प्रवेश केला होता. त्यानं नुकतीच हरणाची पहिली शिकार केली होती; आणि त्यामुळें शिकारीच्या क्षेत्रांत विशेष पराक्रम करून दाखविण्याची आकांक्षा त्याच्या मनांत निर्माण झाली होती. आपल्या या पहिल्या शिकारीच्या दिवसापासून तो सारखा सावजांच्या शोधांत असे. शिकारीच्या बाबतींत वस्तीवरचा कोणताहि तरुण त्याच्याइतका चपळ आणि नशिबवान नव्हता. या सगळ्या यशामुळें त्याच्या स्वभावांत वैशिष्ट्यपूर्ण बदल होत होते. मीं जेव्हां त्याला प्रथम पाहिलं तेव्हां तरुण पोरींत मिसळायला तो लाजत असे. त्यांच्या घोळक्यांत अगदींच बावरल्यासारखा तेव्हां वागे. परंतु नव्यानंच मिळालेल्या यशामुळें आतां त्याच्यांत आत्मविश्वास निर्माण झाला होता आणि आतां स्त्रीपूजेच्या कलेंत त्याची प्रगति होऊं लागली होती. आपलं लाल ब्लॅंकेट तो मोठ्या रुबाबांत खांद्यावरून ओढून घेई; दररोज लाल रंगानं आपले गाल रंगवी, कानांत लोलक घाली. या त्याच्या नव्या मार्गांत त्याला हळूहळू यश येत आहे हें मला दिसत होतं. अर्थात् त्यांच्या समाजांत योद्धा ही पदवी प्राप्त व्हायला हेलस्टॉर्मला अजून पुष्कळ पुढं जाणं भाग होतं. वस्तीवरच्या तरुण पोरींत आतां जरी तो आत्माविश्वासानं वावरू लागला असला तरीदेखील गटप्रमुख आणि वस्तीवरची वृद्ध माणसं यांच्या सहवासांत तो लाजूनच असे. कारण अजूनपर्यंत त्यानं एकाहि माणसाला मारलेलं नव्हतं किंवा युद्धांत शत्रूचा वध करून त्याच्या डोक्यावरची केसासकट कातडी कापून आणली नव्हती. हा पराक्रम करण्यासाठीं हेलस्टॉर्मचा सुरा अगदी तहानेलेला होता हें मला ठाऊक होतं—आणि म्हणूनच त्याच्या हालचालींवर बारीक पाळत ठेवल्याखेरीज मी त्याच्याबरोबर एकटा कधींच राहिलों नसतों.

हेलस्टॉर्मचा भाऊ हॉर्स हा अगदींच वेगळा होता. छानछोकीपणा आणि आळस हाच हॉर्सच्या स्वभावाचा स्थायीभाव होता. पराक्रम करून आपण कीर्ति मिळवावी असं त्याला मुळींच वाटत नसे. हेलस्टॉर्मनं त्याला फार मागं टाकला होता. आपलं कुरूप तोंड लाल रंग थापून रंगवण्यांत आणि मी भेट म्हणून दिलेल्या छोट्या आरशांत आपला मुखडा न्याहाळण्यांत त्याचा बहुतेक वेळ जात असे. यांतून जो कांहीं वेळ उरेल तो खाणं, झोपणं आणि तंबूबाहेर उन्हांत पडून राहणं यांत खर्च होई. नटूनथटून तंबूबाहेर तो तासन्तास बसून राही. अशावेळीं आपला रुबाब वाढवण्यासाठीं घोडदळांतल्या सैनिकाची एक जुनी तलवार तो हातांत घेई. आजूबाजूच्या सगळ्या तरुण स्त्रिया आपल्याकडेच

पहात आहेत अशी त्याला आंतून खात्री असे. तरीपण आपण त्या गांवचेच नाहीं असं दाखवण्यासाठीं गंभीर, चिंतनशील चेहेरा करून तो बसत असे. परंतु अधूनमधून त्या बायांकडे त्यानं टाकलेले तिरपे कटाक्ष पाहिले असतां त्याच्या डोक्यांत कोणते विचार चालू असत हें सहज कळून येई.

हेलस्टॉर्म, हॉर्स आणि रॅबिट हे वस्तीवरच्या तरुणांचे प्रातिनिधिक नमुने होते. हेलस्टॉर्म आणि रॅबिट यांची दाट मैत्री होती. खाणं, पिणं, झोपणं, शिकार या सगळ्या गोष्टी ते जोडीनेंच करत. त्यांच्याजवळ जें कांहीं होतं त्याबाबतींतहि माझं तुझं असं ते करीत नसत. अशा तऱ्हेची ही दाट मैत्री हें गवताळ प्रदेशांतल्या रेड इंडियन जमातीचं एक वैशिष्टय आहे.

संथ गतीनं दुपार एकदांची ओसरली. सगळ्या वस्तीवर एक प्रकारची सुस्ती आली होती. मीसुद्धां गुंगी आल्यासारखा रेनॉल्च्या तंबूंत पडून होतों. त्या दिवसाचं काम संपलेलं असो वा नसो, वस्तीवरच्या सगळ्यांनीं कामाला हात न लावतां त्या दिवशीं झोपा काढायचं ठरवलं होतं. आळस आणि झोप यांत वस्ती बुडून गेली होती. मधूनच एकादी मुलगी हंसल्याचा किंवा कांही पोरं रडल्याचा आवाज येई तेवढाच. या सगळ्या वातावरणाचा माझ्यावरहि परिणाम झाला. मला सरळ विचारहि करतां येईना. माझ्या सगळ्या वृत्ती स्वप्नाळू तंद्रींत भटकूं लागल्या, आणि शेवटीं इतरांप्रमाणें मीहि झोपी गेलों.

संध्याकाळीं शेकोट्या पेटल्या. रेनॉल्च्या तंबूंत हेलस्टॉर्म आणि रेनॉल्च्या बाईचे इतर नातेवाईक शेकोटीभोंवती जमले. रेनॉल्च्या बायकोचे हे सगळे नातेवाईक एकजात भिकार होते. ज्याच्या भविष्यकाळाविषयीं उमेद बाळग-ण्याजोगी होती असा हेलस्टॉर्म हा एकटाच होता. परंतु या दरिद्री नातेवाईकां-मुळें हेलस्टॉर्मचा भविष्यकाळहि नाहीं म्हटलं तरी संशयास्पदच होता. या भिकार नातेवाईकांना खानदान नव्हती म्हणूनच नव्हे तर हेलस्टॉर्मच्या बाजूनं लढायला यांच्यापैकीं उभं राहणार होतं कोण? मी आणि रेमंड बराच वेळ त्यांच्याबरोबर बसलों. शेकोटीभोंवतीं आठ पुरुष होते आणि जवळजवळ तेवढ्याच तरुण आणि म्हाताऱ्या स्त्रिया होत्या. या तरुण स्त्रियांपैकीं कांहींजणी दिसायला जरा बऱ्या होत्या. धूम्रपान चालू होतं. गप्पागोष्टी आणि विनोद यांना भर आला होता. 'दोनतीन प्रौढ बायकांनीं (कारण तरुण मुली लाजून बसल्या होत्या) रेमंडची टिंगल करायला सुरवात केली. कांहीं पुरुषांनींहि त्यांत भाग घेतला. एका म्हाताऱ्या बाईनं रेमंडला कसलं तरी गंमतीदार

टोपणनांव बहाल केलं. त्या नांवाचा उच्चार होतांच सगळेजण मोठमोठ्यानं हंसूं लागले. रेमंडने हंसून प्रत्युत्तर करण्याचा प्रयत्न केला, पण त्याला तें जमलं नाहीं. जरा सैल वागलों असतां आपणहि यांच्या टिंगलीचा विषय होऊं याची जाणीव असल्यामुळें मी दूरदर्शीपणें अत्यंत गंभीर चेहेरा करून बसून राहिलों होतों. यामुळें त्या थट्टेच्या माऱ्यांतून मी वांचलों.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं वस्ती आणखी एक दिवस राहणार असल्याचं मला कळलं. हें कळतांच मला वैताग आला. तिथल्या त्या कंटाळवाण्या एकसुरी-पणाचा मला जाच होऊं लागला होता. तेव्हां कांहीं वेळ तरी तिथून सटकावं म्हणून शिकारीच्या निमित्तानं डोंगरांत फिरावं असं मीं ठरवलं. माझा अत्यंत विश्वासू मित्र मी सोबत घेतला—हा विश्वासू मित्र म्हणजे माझी रायफल होय : कारण रेड इंडियन प्रदेशांत रायफलीइतका कोणावरहि विश्वास टाकतां येत नाहीं. बरेचसे रेड इंडियन गोऱ्या लोकांशीं चांगले वागतात खरे, परंतु माझा आणि इतरांचा अनुभव जमेला धरतां त्यांच्यावर फार विश्वास टाकणं धोक्याचं असतं असं म्हणावं लागेल. याचं कारण असं कीं हे रेड इंडियन लोक आपल्या बेलगाम वृत्तींच्या केव्हां आधीन होतील हें कांहीं सांगतां येत नाहीं. तुम्ही जर गैरसावध असाल तर धोका तुमच्या अगदीं जवळच आहे असं तुम्ही समजा. याउलट तुम्ही जर सशस्त्र आणि सावध असाल तर हा धोका दूर आहे असं मानायला हरकत नाहीं. भित्रेपणा आणि दुबळेपणा दुसऱ्यांत दिसला कीं या रेड इंडियन लोकांच्या स्वभावांतला हिंस्रपणा अधिकच भडकून उठतो.

डोंगरांत झाडाझुडपांनीं वेढलेल्या अनेक घळीं होत्या. अनेक रेड इंडियन झाडांच्या कडेकडेनं फिरत होते. लहान पोरं हातांत धनुष्यबाण घेऊन पक्ष्यांना मारत आपल्यामधल्या संहारक प्रवृत्तींना वाव देत होतीं. समोरच एक घळ होती. ती अगदीं त्या डोंगराच्या हृदयालाच भिडल्यासारखी वाटत होती. या घळींत उतरून पलीकडच्या बाजूनं मी वर चढूं लागलों. खडक आणि झाडंझुडपं यांचा सारखा अडथळा मला येत होता. एका मोठ्या खडकांतून पाण्याची एक बारीक धार गळत होती. या पाण्याच्या धारेला त्या दाट झाडींत सूर्यकिरणांचा स्पर्शहि झाला नसावा असं वाटत होतं.

इथून कांहीं वेळ पुढं गेल्यानंतर मी एकटा असल्याचं मला आढळून आलं. जिथं झाडांची गर्दी जरा कमी होती अशा एका जागेवर येऊन मी उभा राहिलों. इतक्यांत कांहीं अंतरावर झुडपांच्या मागं एका रेड इंडियन माणसाचं

काळं डोकं आणि लाल खांदे मला दिसले. आतां कांहींतरी रोमांचकारी प्रसंगाचं वर्णन आपल्याला वाचायला मिळणार अशी वाचकांनीं अपेक्षा धरूं नये. कारण तसा कांहींच प्रसंग घडला नाहीं. झुडपामागें मला दिसलेली आकृति मेनेसीलाची होती. तो माझा उत्तम मित्र होता. मी पायाचा आवाज न करतां जवळ गेलों. त्या खडकांत आणि झाडांत मेनेसीला एकाद्या अचल पुतळ्यासारखा बसला होता. समोरच्या एका कड्यावर उभ्या असलेल्या पाईन वृक्षावर त्यानं आपली नजर खिळवली होती. वृक्षाचा शेंडा वाऱ्यामुळें हलत होता. झाडाच्या फांद्या हलल्या कीं तें झाड एकाद्या जिवंत आकृतीसारखं भासूं लागे. मेनेसीला-कडे पहातांच झाडावर नजर खिळवून तो ध्यानस्थ बसला आहे हें माझ्या लक्षांत आलं. त्याच्या मनांत याक्षणीं कोणते विचार येत असतील तें जाणून घेण्याची माझ्या मनांत इच्छा निर्माण झाली. अर्थात् त्या विचारांविषयीं केवळ अंदाज बांधणं एवढंच माझ्या हातीं होतं.

रेड इंडियन माणसाची बुद्धि या विश्वावर राज्य करणाऱ्या सर्वशक्तिमान अशा परमेश्वराची कल्पना समजून घेऊं शकेल. परंतु असं झालं तरी इतक्या विराट, अनाकलनीय अशा शक्तीशीं मनानं समरस होणं त्याला जमणार नाहीं. आयुष्य धोक्यांत आहे असं वाटूं लागलं, आशांच्या ठिकऱ्या उडाल्या, संकटं झाकोळून टाकूं लागलीं म्हणजे त्याच्या मनाच्या आवाक्यांत येऊं शकेल अशा-दैवी शक्तीच्या कल्पनेचा तो आधार घेणार. त्यानं मानलेली इष्ट देवता हें अशाच शक्तीचं प्रतीक असतं. या इष्टदेवतेवर तो मार्गदर्शनासाठीं, मदतीसाठीं अवलंबून राहातो. आजूबाजूचा निसर्ग या गूढ शक्तीनं भारून राहिला आहे असं त्याला वाटतं. त्या डोंगरांतून हिंडणारं जनावर, गाणारा पक्षी, वाऱ्यानं हलणारं पान या सगळ्यांतून त्याला आपल्या भविष्याची सूचना मिळते. त्यामुळें एकाद्या ज्योतिषानं ग्रह पहावेत तसा तो आजूबाजूचा निसर्ग पाहतो. पुष्कळ वेळां आपली ही इष्टदेवता तो सभोंवतालच्या कोणत्या तरी प्राण्याच्या प्रतीकांतच पाहतो. अस्वल, लांडगा, गरुड, साप यांपैकीं कोणतीहि आकृति त्याची इष्टदेवता होऊं शकते. पाईन वृक्षाकडे डोळे खिळवून पाहणारा मेनेसीला त्या वृक्षाच्या आकारांतच आपल्या इष्टदेवतेचं दर्शन घेत असावा.

म्हाताऱ्या मेनेसीलाच्या मनांत कसलेहि विचार येत असले तरी या क्षणीं त्याची ध्यानावस्था मोडूं नये असं मला वाटलं. पायांचा आवाज न करतां मी मागं आलों, घळींत उतरून मी पलीकडच्या बाजूनं चढून डोंगराच्या एका

बाजूच्या कड्यावर आलों. समोरच मला एक त्याहून उंच कडा दिसला. त्या कड्याकडे पाहतां क्षणींच चढून त्याच्या माथ्यावर जावं अशी विलक्षण उत्कट इच्छा मनांत निर्माण झाली. मी तो कडा चढूं लागलों. गेले कित्येक दिवस मला जाणवली नव्हती अशी शक्ति आणि चपळपणा माझ्या अंगीं असल्याचं मला त्या क्षणीं जाणवलं. दीड तास मधूनमधून थांबत मी तो कडा चढून गेलों आणि त्याच्या माथ्यावर जाऊन पोंचलों. तिथून मी पलीकडे पश्चिमेकडे पाहिलं तेव्हां दूरच्या क्षितिजाकडे फिकट निळ्या रंगाचा गवताळ माळ एकाद्या शांत गंभीर समुद्रासारखा पसरलेला मला दिसला. आजूबाजूचे डोंगर भव्य आणि उग्र दिसत होते. परंतु गवताळ माळाच्या या विरोधी दृश्यामुळें या डोंगरांच्या उग्रतेंत विशेषच भर पडल्यासारखी वाटत होती.



# १९ | डोंगरदऱ्यांतली वाट

लबाँतेच्या तळावर मी शॉचा निरोप घेतला तेव्हां लारामीच्या किल्ल्यावर ऑगस्टच्या पहिल्या तारखेला भेटेन असं वचन मीं त्याला दिलं होतं. माझ्याबरोबरच्या रेड इंडियन वस्तीलासुद्धां किल्ल्याकडेच जायचं होतं. आमचा जिथं तळ होता, तिथूनच वाट नसल्यामुळें हें अशक्य होतं. बारा किंवा चौदा मैल दक्षिणेकडे गेलों असतों तर लारामीकडे जाणारी वाट आम्हाला सापडूं शकली असती. संध्याकाळीं मुक्काम हलवून प्रवासाला सुरवात केली. मी

सगळ्यांच्या पिछाडीला तीनचार रेड इंडियन तरुणांबरोबर येत होतो. सूर्यास्ताच्या तांबूस प्रकाशांत किंवा डोंगरांच्या काळ्या सावल्यांत चालणारी ती वस्ती माझ्यासमोरून पुढें होत होत दूरवर पसरली होती. त्यांनीं तळ ठोकण्याकरितां मात्र जी जागा शोधून काढली ती चांगल्या शकुनाची नव्हती.

गेल्या वर्षी त्यांनीं इथेंच तळ ठोकला होता, आणि इथून व्हर्लविंडच्या मुलाच्या नेतृत्वाखालीं दहा योद्धे शत्रूवर चाल करून गेले होते. या योद्धयांपैकीं एकहि परत आला नव्हता. या कारणामुळेंच युद्धाची घोषणा केली गेली होती. या जागेवर तळ ठोकल्यानंतर मृत योद्धयांच्या आठवणीनं रडारड सुरू झाली. चाकूनं आपल्या पायावर घाव करीत बायका मोठमोठ्यानं आक्रोश करूं लागल्या. वस्तीवरच्या एका योद्धयाचा भाऊ मारला गेला होता. आपलं हें दुःख व्यक्त करण्यासाठीं त्यानं वेगळा मार्ग शोधून काढला. हे रेड इंडियन लोक जसे अत्यंत स्वार्थी असतात तसेच कांहीं वेळां ते विलक्षण निःस्वार्थी बनतात. शोकाच्या किंवा दुसऱ्या कसल्याहि गंभीर क्षणीं ते आपल्याकडील असेल नसेल तें सर्व दान करून पूर्णपणें कंगाल होतात. या योद्धयानं आपले दोन उत्तम घोडे आपल्या मित्रांना दिले. त्याच्या या औदार्याबद्दल गाणीं गाऊन त्याची स्तुति करण्यांत आली. बायकांची रडारड आणि स्तुतिगीतांचे स्वर एकमेकांत मिसळत होते.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्हीं पुन्हां डोंगरांतून प्रवास सुरू केला. या डोंगरांचं वर्णन करावं अशी भव्यता किंवा चित्रमयता त्यांच्यांत नव्हती. एवढंच कीं या डोंगरांवर कसलंहि झाडझुडूप नव्हतं, काळेकुळकुळीत खडक सर्वत्र पसरलेले होते आणि त्यामुळें हे डोंगर दिसायला अत्यंत उग्र वाटत होते. आम्हीं एका रुंद दरींतून चालत होतों. एका तरुण रेड इंडियन बाईच्या जवळून रेमंड तिची गोडगोड शब्दांत स्तुति करीत चालला होता. आजूबाजूच्या म्हाताऱ्या बाया रेमंडच्या हालचालींकडे कौतुकानं पहात होत्या आणि ती पोरगीसुद्धां बाजूला मान वळवून हंसत होती. इतक्यांत रेमंडच्या खेचराला अचरटपणाचा झटका आला. तें मागें होऊन जोरांत मुसंड्या मारूं लागलं. रेमंड हा कसलेला स्वार होता. तो प्रथम मांड जराहि न ढळूं देतां घट्ट बसून राहिला. परंतु कांहीं वेळांनंतर तें खेचर आपले मागचे पाय हवेंत झाडतांना दिसूं लागलं. रेमंड खेचराच्या कानाला डोकं लावून झुकून बसला. सगळ्या बायका मोठमोठ्यानं हंसूं लागल्या. रेमंडची ही नवी प्रेयसीहि त्यांत सामील झाली. त्या

सगळ्या बायकांनीं मिळून रेमंडची इतकी टिंगल करायला सुरवात केली कीं तो पुढें पळाला आणि त्यांचे शब्द ऐकूं येणार नाहींत इतक्या अंतरावर गेला. मी रेमंडच्या जवळ गेलों. इतक्यांत मला हांक मारून तो एकदम ओरडला. एका खडकाळ टेकडीकडे तो बोट दाखवत होता. या टेकडीच्या मागून सांबरांची एक रांग जोरानं धावत दोन टेकड्यांच्या मधें जातांना दिसत होती. ही रांग दिसेनाशी झाली आणि इतक्यांतच जवळजवळ पन्नास लोकांचा आरडाओरडा माझ्या कानीं आला. त्या सांबरांचा पाठलाग करण्याकरतां तरुण पोरं घोडे फेकत निघालीं. त्यांच्यामागून रेनॉलहि निघाला. रेनॉल म्हणाला, "लवकर चला! लवकर चला! सांबरांचा कळप दिसतोय ना पलीकडे? एक सांबर जरी दिसलं तरी तिथं शंभर आहेत असं धरून चालायला हरकत नाहीं."

ही शिकार पाहण्यासाठीं मी एका खडकाळ टेकडीवर जिथपर्यंत माझी घोडी मला नेऊं शकली तिथपर्यंत गेलों. इथं आल्यावर एका जुनाट पाईन वृक्षाला घोडी बांधली. इतक्यांत रेमंडनं मला मेंढ्यांचा एक कळप दाखवला. दोन टेकड्यांच्या मधल्या जागेंत मी धांवलों. इथून मला पलीकडची खडकाळ घळ पूर्णपणें दिसत होती. पन्नाससाठ मेंढ्यांचा कळप पलीकडच्या बाजूनं ही घळ चढून जाण्याचा प्रयत्न करीत होता. बंदुकीच्या गोळीच्या अंतराआंतच हा कळप होता. ते उघडेवाघडे रेड इंडियन उड्या मारत त्यांच्या मागावर चालले होते. कांहीं वेळानं तो मेंढ्यांचा कळप आणि शिकारी दोघंहि दिसेनासे झाले. अधूनमधून बंदुकींचा आवाज ऐकूं येऊं लागला. तो आवाज आजूबाजूच्या खडकांत घुमत असे.

मी घळींत खालीं उतरलों. थोड्या वेळानं ते सगळे रेड इंडियन मला दिसले. थोडंसं पुढें चालून गेल्यानंतर सगळी वस्तीच मला दिसली. तळ ठोकण्याच्या तयारींत ते होते. मी वस्तीवर जाऊन पोंचलों. थोड्या वेळानं रेनॉल आणि रेमंड परत आले. त्यांनीं एक मेंढी बरोबर आणली होती. ही मेंढी त्यांनीं दगड फेकून मारली होती. हळूहळू बाकीचे शिकारीहि आले. रॉकी पर्वतांतल्या मेंढ्या किती चपळ असतात याचं प्रत्यंतर मला त्याक्षणीं आलं. कारण जवळजवळ सत्तर शिकारी या मेंढ्यांच्या कळपामागें असतांनादेखील त्यांनीं फक्त सहाच मेंढ्या टिपून आणल्या होत्या. या सहापैकीं एक उत्तम माजलेला मेंढा होता. त्याचीं शिंगं आपल्याला कल्पना येणार नाहीं इतकीं मोठीं होतीं. रेड इंडियन लोक मेंढ्याच्या शिंगाचा वाढण्यासाठीं डाव

करतात. अशा मोठाल्या शिंगापासून केलेल्या डावांत पाव गॅलनाची तरी जागा असते.

दुसरे दिवशीं सगळी सकाळ आम्ही डोंगरांतून प्रवास करत होतों. त्याच्या पुढच्या दिवशीं आम्ही डोंगरांच्या अगदीं ऐन मध्यावर येऊन पोंचलों. कड्यांनीं आम्हांला सर्व बाजूंनीं वेढलं होतं. वस्तीनं आपला मुक्काम हलवण्यापूर्वी मी ईगलफेदरबरोबर पुढं निघालों. ईगलफेदर बांध्यानं वळकट होता. परंतु त्याचा चेहेरा मात्र फारच क्रूर दिसत असे. ईगलफेदरचा चपळ अंगकाठीचा मुलगा आमच्याबरोबर होता. त्याचप्रमाणें पांथर नांवाचा एक रेड इंडियनदेखील आमच्याबरोबर होता. आम्ही सगळे एका खडकाळ खिंडीतून पुढें जात होतों. वस्ती आमच्या बरीच मागें होती, दिसतहि नव्हती. जातां जातां वाटेंत कांहीं अंतरावर ईगलफेदरला एक सावज दिसलं. तो त्या सावजाच्या मागं गेला. मी आणि पांथर पुढं निघालों. पांथर हें त्याचं टोपणनांव. आपलं खरं नांव तो लावत नसे. यामागें त्याची कसलीतरी अंधःश्रद्धा होती. पांथर दिसायला उमदा होता. त्याचा कातड्याचा अंगरखा सरकून कमरेपर्यंत आला होता. तो अत्यंत सहजपणें घोड्यावर बसला होता. त्यानं केसांत खोवलेली रान-कोंबड्यांचीं पिसं डौलानं फडफडत होतीं. रेखीव शरीराच्या पांथरकडे पाहतांना गवताळ प्रदेशांतल्या घोडेस्वाराचा तो आदर्श नमुना आहे असंच वाटे. इतर रेड इंडियनांसारखे त्याच्या चेहेऱ्यावरचे भाव नव्हते. त्याच्या चेहेऱ्यावरचे भाव जर खोटे नव्हते असं धरून चाललं तर द्वेष, संशय आणि क्षुद्र कावेबाजपणा या इतर रेड इंडियनांत असलेल्या गोष्टी पांथरच्या स्वभावांत मुळींच नव्हत्या असं म्हणायला हरकत नाहीं.

सुशिक्षित गोऱ्या माणसाला आपण आणि रेड इंडियन यांच्या स्वभावांत फारच थोडं साम्य आढळून येतं. रेड इंडियन माणसांतल्या चांगल्या गुणांना मुळींच अन्याय करायचा नाहीं असं ठरवलं तरीदेखील तो आणि आपण यांच्या स्वभावांत एक दुर्लंघ्य दरी आहे याची जाणीव त्याला होतेच. आपल्या आणि त्याच्या स्वभावांत गोऱ्या माणसाला इतका विरोध जाणवतो कीं कांहीं महिने किंवा आठवडे या प्रदेशांत राहिल्यानंतर रेड इंडियन मनुष्य हा त्याला एकाद्या धोकेबाज रानटी पशूसारखाच वाटूं लागतो. परंतु पांथरकडे पहात असतांना त्याच्या आणि माझ्या वृत्तींत कांहीं साम्य असल्याची मला जाणीव झाली. आम्ही दोघे उत्तम मित्र झालों. त्या खडकाळ खिंडींतून

आम्ही जात असतांना तो मला डाकोटा रेड इंडियनांची भाषा शिकवूं लागला. थोड्या वेळानं आम्हीं एका छोट्याशा कुरणावर आलों. एका खडकाच्या पायाशीं बरींचशीं गुजबेरीचीं झुडपं होतीं. या झुडपांवर फळं पाहातांच रेड इंडियन भाषेचं माझं शिक्षण तसंच सोडून देऊन पांथर त्या झुडपाकडे वळला. तो फळं गोळा करण्यांत गुंतला. इतक्या वेळांत वस्तीनं आम्हांला गांठलं. सामान लादलेल्या घोड्याच्या गळ्यांतली दोरी धरून चालणारी एक म्हातारी बाई सगळ्यांत पुढें होती. थोड्याच वेळांत ती छोटी दरी रेड इंडियनांनीं भरून टाकली. मी एका टेकडीच्या माथ्यावर गेलों आणि खालच्या दरींतून जाणारा रेड इंडिनांचा तो जथा पाहूं लागलों. तो सगळा जथा पुढें जाईपर्यंत मी उभा होतों. वस्ती कांहीं अंतरावर गेल्यानंतर मी टेकडीवरून खालीं उतरलों आणि त्यांच्यामागून चालूं लागलों. थोडं अंतर चालून गेल्यानंतर डोंगराच्या खोबणींत एक छोटं कुरण लागलं. इथं वस्तीनं तळ ठोकला. तंबू उभे करण्याची एकच घाई सुरू झाली. बायका एकमेकांवर ओरडूं लागल्या. घोडे खिंकाळूं लागले. आपल्या पाठीवरचं सामान उतरावं म्हणून कुत्रे भुंकूं लागले. केसांत खोवलेल्या पिसांमुळें आणि चकाकणाऱ्या त्यांच्या रानटी अलंकारांमुळें त्या दृश्यांत जिवंतपणाची भर पडत होती. लहान पोरं गर्दींत धांवत होतीं. कांहीं पोरगे आपलीं छोटीं धनुष्यं हातांत घेऊन खडकावर चढून उभे राहिले आणि खालीं तळ ठोकण्याच्या गडबडींत असलेल्या वस्तीकडे पाहूं लागले. ही सगळी घाई, गडबड चालूं असतांना म्हाताऱ्या माणसांचं एक टोळकं वर्तुळाकार बसून अलिप्त शांतपणें धूम्रपान करीत होतं.

कांहीं वेळानं ही घाई, गडबड संपली. जनावरांना जवळच्याच दरींत चरायला सोडण्यांत आलं. सर्वत्र शांतता पसरली. दुपार नुकतीच संपली होती. पूर्वेकडे धुराचं छत सूर्याचे किरण झांकून टाकत होतं. असह्य उष्णता जाणवत होती. त्या छोट्या जागेंत तंबू एकमेकांना खेटून उभारण्यांत आले होते. उन्हाच्या माऱ्यानं तंबू तापले होते आणि प्रत्येक तंबूचा मालक आंत आळसावून झोपला होता. तळावर स्मशानशांतता पसरली होती. एका तंबूंतून दुसऱ्या तंबूकडे जाणाऱ्या एकाद्या म्हाताऱ्या बाईच्या हालचालीखेरीज दुसरी कसलीहि हालचाल दिसत नव्हती. आजूबाजूच्या पाईन वृक्षांखालीं तरुण, तरुणी गटागटानं बसल्या होत्या. कुत्रे धापा टाकत उभे होते. ते इतके थकले होते कीं गोऱ्या माणसावर गुरगुरण्याचीसुद्धां त्यांना ताकद राहिली नव्हती. कुर-

णाच्या तोंडाशीं एका मोठ्या खडकांतून एक थंडगार पाण्याचा झरा पाझरत होता. झाडाझुडपांनीं हा झरा वेढला गेला होता. या शीतल जागेंत बऱ्याच पोरी जमून वस्तीवर घडलेल्या गोष्टींची चवीनं चर्चा करत होत्या, हंसत होत्या. गोरा मनुष्य जर तिथं गेला तर त्याच्या अंगावर त्या पाणी उडवत.

प्रत्येक मिनिट तासासारखं भासत होतं. मी पांथरच्या शेजारीं एका झाडाखालीं बसून रेड इंडियनांची भाषा शिकत होतों. थोड्या वेळानं मला कंटाळा आला. झऱ्याचं पाणी सांठवून एक स्वच्छ आणि खोल असं तळं निर्माण झालं होतं. मी त्या तळ्याच्या कांठाशीं जाऊन बसलों. त्या तळ्यांत टांचणीएवढे असंख्य मासे क्रीडा करत होते. हे सगळे मासे अत्यंत सलोख्यानं नांदत आहेत असंच प्रथमदर्शनीं वाटे. परंतु बारकाईनं पाहिल्यानंतर त्यांच्यांतल्या हिंस्र संघर्षाची जाणीव मला झाली. लहान मासा मोठ्या माशाच्या पोटांत गडप होत होता. दर वेळीं तीन इंच लांबीचा एक मोठा मासा ढासळत्या कांठाकडून आपले कल्ले आणि शेपटी हालवत पाण्याच्या मध्यभागीं येई. बटबटीत डोळ्यांचा हा मासा त्या तळ्यांतला दादा होता. त्याचं आगमन होतांच बारकाले मासे आपल्या मारामाऱ्या थांबवून भीतीमुळें वाट फुटेल तिथं जोरजोरानं पळूं लागत. माझ्या मनांत विचार आला, "कोमल हृदयाचे मानवतावादी आपल्या कल्पनेंतल्या शांततामय स्वर्गासाठीं कितीहि सुस्कारे टाकोत; परंतु लहान माशापासून तो माणसापर्यंत अखंड संघर्ष हाच जीवनाचा स्थायीभाव आहे."

संध्याकाळ झाली. डोंगरांचे माथे अजूनहि सूर्यप्रकाशानं उजळ दिसत होते. आम्ही ज्या खोल घळींत होतों ती मात्र सावल्यांनीं पूर्णपणें झाकली गेली होती. मी वस्ती सोडून बाजूच्या एका टेकडीवर गेलों. पाईन वृक्षावरून पश्चिमेकडच्या डोंगरांत सूर्य अजूनहि तळपतांना दिसत होता. कांहीं वेळानं सूर्य बुडाला. अंधार पडला. मी पुन्हां वस्तीवर आलों. टेकडीवरून मी उतरतांना आजूबाजूच्या जंगलांतून कोल्ह्यांची आणि लांडग्यांची कुई ऐकूं येत होती. वस्तीवरच्या शेकोट्या पेटल्या होत्या. आजूबाजूच्या खडकांवर पडलेल्या शेकोट्यांच्या प्रकाशांत इथेंतिथें फिरणाऱ्या रेड इंडियनांच्या सावल्या भुतासारख्या दिसत होत्या.

त्या रेड इंडियनांतला एक योद्धा त्याच्या मनमिळावू स्वभावाबद्दल प्रसिद्ध होता. त्याच्या तंबूच्या समोर एक टोळकं धूम्रपान करत बसलं होतं. निरोप

घेण्यापूर्वीचं धूम्रपान करण्यासाठीं म्हणून मी माझ्या या रानटी मित्रांत जाऊन बसलों. त्या दिवशीं ऑगस्टची पहिली तारीख होती आणि लारामीच्या किल्ल्यावर मी तुला भेटतो असं वचन मी शॉला दिलं होतं. लारामीचा किल्ला दोन दिवसांच्या प्रवासाच्या अंतरावर होता. शॉला उगीच माझ्याविषयीं काळजी वाटू नये म्हणून मी होईल तितक्या लवकर लारामीच्या दिशेनं निघायचं ठरवलं. मी हेलस्टॉर्मजवळ गेलों आणि त्यानं मला डोंगरांतून दुसरे दिवशीं सकाळीं वाट दाखवावी म्हणून त्याला कांहीं भेटी दिल्या. भेटी मिळतांच हेलस्टॉर्म खूष झाला. त्यानं 'हाव्' असा आवाज केला. यानंतर कांहींहि बोलणं झालं नाहीं. सगळं ठरलं होतं. मी कोंग्रा-टोंगाच्या तंबूत जाऊन झोपलों. सूर्योदय होण्यापूर्वींच रेमंडनं माझे खांदे हलवून मला उठवलं आणि तो म्हणाला, "सगळी तयारी आहे."

मी तंबूच्या बाहेर आलों. हवेंत गारठा होता. सगळी वस्ती झोपेंत बुडून गेली होती. तंबूच्या समोर घोड्यावर स्वार झालेला हेलस्टॉर्म उभा होता. माझी घोडी पॉलीन आणि रेमंडचं खेचर बाजूलाच बांधलेलं होतं. आम्हीं खोगीरं चढवलीं, इतर सर्व तयारी केली. परंतु आम्ही निघण्याच्या आंतच सगळी वस्ती जागी झाली आणि तंबू आवरून प्रवासाला निघण्याची जोरांत तयारी सुरू झाली. आम्ही निघालों तेव्हां नुकता प्रकाश उमटत होता. खडकांतून वाट काढत कुरण ओलांडून आम्हीं पूर्व दिशेनं निघालों. या वाटेच्या टोकावर आल्यानंतर मी मागें वळून वस्तीकडे पाहिलं. प्रवासाच्या तयारीची एकच घाई तिथं सुरू होती. मी तसाच पुढें झालों. त्या रेड इंडियनांचा अखेरचा निरोप घेतांना माझं मन जड झालं होतं.

खडक आणि कडे ओलांडत आम्ही चाललों होतों. डोंगराचे माथे धुक्यांत लपेटले गेले होते. कांहीं वेळानं सगळ्यांत उंच असलेल्या डोंगराचं शिखर उगवत्या सूर्याच्या सोनेरी प्रकाशानं उजळलेलं दिसलं. माझ्यापुढे हेलस्टॉर्म होता. त्याच्या तोंडून कसलासा अस्पष्ट उद्गार मीं ऐकला. मी बाजूला पाहतों तर पलीकडच्या पाईन वृक्षांच्या दिशेनं उधळलेल्या वेगानं धावणारं एक सांबर मला दिसलं. रेमंड चटकन् घोड्यावरून खालीं उतरला. त्यानं आपली बंदूक उचलली तेव्हां तें सांबर दोनशें यार्ड अंतरावर गेलं होतं. रेमंडनं झाडलेली गोळी त्या सांबराला लागली, परंतु ती मर्मीं बसली नाहीं. तें सांबर वेगानं धावत सुटलं. मीं दुसरी गोळी झाडली. ती त्या सांबराच्या खांद्यांत घुसली. तरीसुद्धां

तें लंगडत लंगडत बाजूलाच दाट झाडी असलेल्या घळींत शिरलं. हेलस्टॉर्म वेगानं तिथं गेला आणि त्यानं त्या सांबराला ठार केलं. आम्ही जवळ गेलों तेव्हां आम्हांला कळलं कीं तें सांबर नसून काळ्या शेपटीचं हरण होतं. सर्वसामान्य हरणाच्या हें दुप्पट मोठं असतं. आम्हीं झाडलेल्या गोळ्यांचे आवाज ऐकून मागून येणाऱ्या वस्तींतले कांहीं लोक दौडत येऊन आम्हीं होतों तिथं ठेपले. हरणाच्या कापाकापीला सुरुवात झाली. आम्हीं हरणाचं कातडं हेलस्टॉर्मला दिलं. बरोबर घेतां येणं शक्य होतं तितकं मांस आम्हीं घेतलं आणि बाकीचं त्या रेड इंडियनांना वाटून दिलं. इतकं सगळं होईपर्यंत ती वस्ती बरीच पुढं गेली होती. तिला मागें टाकणं आतां शक्य नव्हतं. जितकं पुढं जातां येईल तितकं जावं असं म्हणून आम्हीं निघालों. वस्तीला गाठलं. पुन्हां एकदां मी त्या रेड इंडियन जमावांत आलों होतों. नेहमीपेक्षां अधिक घाईनं वस्ती चालली होती. आम्ही सगळे डोंगराच्या पूर्वेकडच्या उतारावर होतों. कांहीं वेळानं एका बिकट खिंडीपाशीं आम्ही येऊन पोंचलों. या खिंडीचा उतार फार खोल होता. एकाद्या प्रक्षुब्ध डोंगरझऱ्यासारखा रेड इंडियनांचा हा जथा खिंडींत उतरला. आमच्या आजूबाजूच्या डोंगरांत वणवा पेटला होता. समोरचं दृश्य धुराच्या समुद्रांत बुडालं होतं. दोन्ही बाजूंना पाईन वृक्षांचे तुरे असलेले उंच डोंगर दिसत होते. त्या दृश्याचं वर्णन करायचं तर स्कॉटसारखीच समर्थ लेखणी हवी.

कांहीं वेळानं आम्हीं वणव्यानं भाजून निघालेला जमिनीचा एक तुकडा ओलांडला. घोड्यांचे पाय चांगलेच भाजत असावेत. थोड्या वेळानं आम्हांला एक झरा दिसला. झऱ्याच्या कांठाशीं बरींच गुजबेरीचीं झुडपं होतीं. सगळीं पोरं आणि कांहीं मोठीं माणसंसुद्धां फळं गोळा करण्यासाठीं धावलीं. मला तहान लागली होती. मी झऱ्याच्या कांठाशीं पाणी पिण्यासाठीं वाकलों. पुन्हां मी माझ्या घोडीवर स्वार झालों आणि पुढें निघालों. माझ्या डोक्यांत कसले-तरी विचार चालू असल्यामुळें त्या तंद्रींत पाणी पितांना बाजूला ठेवलेली रायफल मी तिथंच विसरलों. बरंच पुढें गेल्यानंतर माझ्या तें ध्यानीं आलं. रेड इंडियनांचा जथा जात होता. मी त्यांतल्या प्रत्येक माणसाकडे बारकाईनं न्याहाळून पाहू लागलों. त्यांतल्या एका योद्धयाच्या हातांत मला माझी रायफल दिसली. मी जवळ जाऊन ती माझी आहे असं सांगतांच त्यानं मला ती ताबडतोब देऊन टाकली. त्याच्या या उपकारांची फेड करण्यासाठीं त्याला

कांहीं तरी भेट देणं आवश्यक होतं. माझ्याकडे त्याक्षणीं दुसरी कांहीं वस्तू नव्हती. मी माझ्या एका पायाला बांधलेला खिळा असलेला टांच-पट्टा सोडला आणि त्या योद्धयाला दिला. टांच-पट्टा पाहतांच तो योद्धा विलक्षण खूष झाला. त्यानं तो बांधून घेण्यासाठीं आपला पाय समोर केला. मी तो पट्टा त्याला बांधून दिला. त्याबरोबर तो आपल्या घोड्यावर स्वार झाला आणि या नव्या पट्टयाचा अनुभव घेण्यासाठीं त्यानं घोड्याला जोरांत टांच मारली. त्याबरोबर तो घोडा ताडकन् उडी मारून जोरांत धावूं लागला. आजूबाजूचे रेड इंडियन मोठ्यानं हंसले आणि त्यांनीं आपल्या घोड्यांना जोरांत टांचा मारल्या. त्यांचेहि घोडे बाणाच्या वेगानं धांवत सुटले. सगळ्या रेड इंडियन बाया मोठमोठ्यानं हंसूं लागल्या. मी दिलेल्या भेटीचा हा परिणाम पाहून उरलेल्या रेड इंडियनांनीं त्या वेगानं धावणाऱ्या घोड्यांकडे पहात, "वॉशटाय ! झकास !" असे उद्‌गार काढले. मी ज्याला टांचपट्टा दिला होता त्या योद्धाच्या घोड्यावर खोगीरहि नव्हतं. लगामाच्या ऐवजीं एक चामड्याची वादी त्यानं आपल्या घोड्याच्या तोंडांत अडकवली होती. जोरांत टांच मारल्यामुळें बेफाम वेगानं त्याचा घोडा धावत गेला होता आणि कांहीं वेळानं एका गवताळ उंचवट्यामागं अदृश्य झाला होता. त्या योद्धयाची आणि माझी पुन्हां कांहीं भेट झाली नाहीं. परंतु तो सुखरूप असेल असं मी धरून चालतों. मांजराला अनेक जन्म असतात असं आपण म्हणतों, पण घोड्यावर स्वार झालेल्या रेड इंडियनाला मांजरापेक्षांहि अधिक जन्म असतात !

डोंगराच्या पायथ्याशीं वस्तीनं तळ ठोकला. सूर्य भाजून काढत होता. हवा खेळावी म्हणून तंबूचं छत प्रत्येकानं नेहमीपेक्षां एक फूट अधिक उंच केलं होतं. फासेफारध्याचे अंगावरचे कपडे काढून रेड इंडियनांसारखी लंगोटी लावूनच वावरायचं रेनॉलनं ठरवलं. अशा तऱ्हेचा हा उत्तम पोषाख घालून आपला पाईप ओढत उन्हाला शिव्या घालत रेनॉल तंबूंत पडून राहिला. त्याच्या बाईच्या नातेवाईकांपैकीं कांहींजण तंबूंत होते. निरोपाच्या भोजनासाठीं कुत्र्याचं पोर शिजवण्यांत आलं होतं. डोंगरांतून गोळा करून आणलेलीं गुजबेरीचीं फळंहि होतीं.

तंबूंतून बाहेर बोट दाखवून रेनॉल मला म्हणाला, "तिकडे पहा, डोंगरांची रांग दिसते ? अगदीं पलीकडचा तोंडावर पांढरा ठिपका असलेला डोंगर दिसतो ! तो पूर्वीं पाहल्याचं आठवतं का ?"

मी म्हणालों, "सहा किंवा आठ आठवड्यांपूर्वी लारामीच्या ओढ्यापाशीं आपण तळ ठोकला होता, तेव्हां पांढऱ्या ठिपक्याची ती टेकडी आपल्या बाजूलाच होती."

"अगदीं बरोबर." रेनॉल म्हणाला.

"रेमंड, जनावरं आण. आपण रात्रीपुरता इथंच तळ ठोकूं आणि उद्यां सकाळीं किल्ल्याकडे जायला निघूं."

माझी घोडी आणि रेमंडचं खेचर यांना तंबूसमोर आणण्यांत आलं. आम्हीं खोगिरं चढवलीं. बरेचसे रेड इंडियन आमच्याभोंवतीं गोळा झाले होते. माझी घोडी पॉलीन हिचा काटक चपळपणा वस्तीवरच्या सर्वांना माहीत झाला होता. त्यामुळें बरेचसे रेड इंडियन आपापल्याजवळचे चांगले घोडे मला भेट देण्यासाठीं घेऊन आले होते. मी ही भेट तावडतोब नाकारली. कारण ज्याच्याकडून मी घोडा भेट म्हणून घेईन त्याला परतभेट म्हणून पॉलीन द्यावी लागणार हें मला ठाऊक होतं. आम्हीं रेनॉलची रजा घेण्याचा प्रश्नच नव्हता कारण असले उपचार त्यांना ठाऊकच नाहींत.

तळ सोडून आम्ही गवताळ माळावरून 'पांढऱ्या चेहेऱ्याच्या' त्या डोंगरकड्याच्या दिशेनं निघालों. आमच्याबरोबर एक रेड इंडियनहि आला. त्याचं नांव आतां मला आठवत नाहीं. परंतु त्याचा रुंद जबडा आणि कुरूप चेहरा मात्र मला घट्ट आठवतो आहे. वाटेंत आम्हांला अनेक काळवीट दिसत. परंतु आम्हीं लक्ष दिलं नाहीं. झपाट्यानं प्रवास करत आम्हीं लारामीच्या ओढ्याच्या काठाशीं असलेल्या झाडाजवळ येऊन पोंचलों. अगदीं मोडकळीला आलेल्या कॉटनवुड झाडांमधून वाट काढत आम्ही पलीकडच्या बाजूला गेलों. फेंसाळणाऱ्या पाण्यांत खूप मासे होते. पलीकडच्या कांठाशीं आम्ही जाऊन पोंचलों तेव्हां पाणी पिण्यासाठीं आमचे घोडे थांबले. आम्ही सुद्धां गुडघे टेकून कांठाशीं वाकलों आणि पाणी पिऊन घेतलं. थोडंसं पुढं गेल्यानंतर ओळखीचा परिसर दिसूं लागला.

मी म्हणालों, "आपण किल्ल्याच्या अगदीं जवळ येत चाललों, रेमंड"

ज्याच्याखालीं आम्हीं अनेक दिवस तळ ठोकला होता तो मोठा वृक्ष समोर दिसत होता. ओढ्याच्या वळणाकडे आमचे तंबू ठोकलेले असतांना त्यांच्याकडे वरून पाहाणारे ते कडेहि समोर दिसत होते. जिथं आमचे घोडे अनेक आठवडे चरले तें कुरणहि बाजूला पसरलं होतं. कांहींहि उद्योग नव्हता

म्हणून ज्यांच्यावर मी गोळ्या झाडत फिरत होतों ती माळावरल्या कुत्र्यांची वस्तीहि कांहीं अंतरावर मला दिसली.

"आतां आपली चांगलीच फजिती होणार." आपला रुंद चेहेरा वर करून आकाशाकडे पहात रेमंड म्हणाला.

कडे, झाडं, कुरणं, पाण्याचा प्रवाह सगळं झांकोळून निघत होतं. दक्षिणेकडे काळ्याकुट्ट ढगांचे ढिगारे जमत होते. एखाद्या दुःशकुनासारखं वादळ गुरगुरूं लागलं होतं.

पलीकडे असलेल्या दाट झाडकांडे बोट दाखवत मी म्हणालों, "आतां आपण तिथं तळ ठोकूं या." मी आणि रेमंड त्या झाडांच्या दिशेनं निघालों. परंतु आमच्याबरोबरच्या त्या रेड इंडियनानं आम्हांला थांबवलं आणि त्या झाडांखालीं आम्हीं तळ ठोकूं नये असं तो आम्हांला कळवळून सांगूं लागला. आम्हीं कारण विचारतांच त्यानं सांगितलं कीं दोन योद्ध्यांचीं भुतं त्या झाडांवर आहेत. आम्ही जर त्या झाडांखालीं झोपलों तर किंकाळ्या फोडत तीं भुतं आमच्यावर दगड फेकतील आणि आमचीं जनावरंहि पळवून नेतील. त्याला वाईट वाटूं नये म्हणून आम्हीं त्या पछाडलेल्या झाडांचा नाद सोडला आणि छागवॉटरच्या दिशेनं झपाट्यानं निघालों. एव्हांना मोठाले थेंब अंगावर पडूं लागले होते. थोड्या वेळानं छगवॉटरच्या तोंडाशीं अनेक झुडपं आम्हांला दिसलीं. त्यांतलीं उंच झुडपं वाकवून आम्हीं त्यांवर काटक्या रचल्या आणि पावसासाठीं आडोसा तयार केला. पण आमचे हे सगळे श्रम फुकट गेले. कारण वादळ आमच्यापर्यंत येऊन पोंचलंच नाहीं. अर्धा मैल अंतरावर धबधब्यासारखा पाऊस कोसळत होता. आणि माळावर तोफा वाजवाव्या तसा वादळाचा आवाज येत होता. आमच्या नशिबानं अगदीं कडेच्या ढगांची ल्हानशी सर आमच्या अंगावर आली तेवढीच.

हवा निवळली. वैभवशाली सूर्यास्त दिसूं लागला. आम्हीं तयार केलेल्या छताखालीं बसून मला वीह वॉशटाय हिनं दिलेल्या जेवणाची आम्ही चर्चा करूं लागलों. त्या रेड इंडियनानं पाईप आणि शॉगशासाचा चुरा बरोबर आणला होता. झोपण्यापूर्वीं कांहीं वेळ आम्हीं धूम्रपान केलं. झोपण्याआधीं प्रथम त्या रुंद जबड्याच्या आमच्या रेड इंडियन मित्रानं आजूबाजूची जागा नीट पाहून घेतली. निरीक्षण करून झाल्यावर तो म्हणाला, "इथं आठ लोकांनीं तळ ठोकला होता. त्यांपैकीं बिसोनेट, पॉल डोरियन, अँटनी–ल–रुज, आणि रिचर्डसन हे

चौघे होते. उरलेल्या चौघांचीं नांवं त्याला आठवेनात. त्यानं केलेला हा अंदाज अगदीं बरोबर होता हें आम्हांला मागाहून कळलं. कोणत्या विद्येनें त्या रेड इंडियनाला हें कळलं असेल हें मात्र मला अजूनहि समजलेलं नाहीं.

मी जागा झालों आणि रेमंडला हांक मारली तेव्हां अंधार होता. आमच्या-बरोबरचा तो रेड इंडियन आमच्या अगोदरच उठून किल्ल्याच्या दिशेनं निघाला होता. त्यानंतर आम्हीहि निघालों. अंधारांतून आम्ही प्रवास करत होतों. अखेर जेव्हां सूर्य उगवला, तांब्याच्या तापलेल्या गोळ्यासारखा क्षितिजावर दिसूं लागला तेव्हां आम्ही लारामीच्या किल्ल्यापासून दहा मैल अंतरावर आलों. झऱ्याच्या जवळ असलेला लारामीचा किल्ला त्या असीम विस्तारावर एका छोटयाश्या ठिपक्यासारखा दिसत होता. मीं घोडी थांबवली आणि कांहीं क्षण त्या किल्ल्याकडे पहात राहिलों. सुखसोई आणि संस्कृति यांचं तो किल्ला म्हणजे माहेरघर आहे असं मला क्षणभर वाटलं. आम्ही लवकरच तिथं जाऊन पोंचणार होतों, कारण आम्ही अतिशय वेगानं निघालें होतों.


आम्ही आणि किल्ल्याच्या भिंती यांमध्यें लारामीचा ओढा आला. ओढ्याच्या कांठाशीं जिथं आम्हीं उभे होतों, तिथूनच आम्हीं घोडे पाण्यांत घातले. आम्ही आमचे पाय मागल्या बाजूनं वर करून खोगीरापर्यंत आणले होते. त्यामुळें पायांतले जोडे न भिजवतां आम्ही पलीकडच्या कांठाला जाऊन पोंचलों. आमचं स्वागत करण्यासाठीं किल्ल्याच्या दारांतून तीन माणसं पुढं येतांना दिसलीं. कांहीं क्षणांतच मी शॉ, हेन्री शॅटिलॅ आणि मागून येणारा डेस्लॉरिअर्स यांना ओळखलं. आमची भेट झाली. या भेटींत अर्थात् उपचाराचा भाग नव्हताच. रानटी माणसांच्या आणि रानटी माणसांपेक्षां किंचित् वरच्या दर्जाच्या अशा लोकांच्या समाजांतून मी आतां सुशिक्षित माणसांना येऊन भेटत होतों या गोष्टीचा मला विलक्षण आनंद झाला होता. मला पाहतांच शॉलाहि अतिशय आनंद झाला. कारण मी येण्यापूर्वीं माझ्या-विषयीं काळजीमुळें बरेवाईट विचार त्याच्या मनांत येऊं लागले होते.

बोर्डोनं जिव्हाळ्यानं माझं स्वागत केलं आणि मोठ्यानं ओरडून स्वयंपाक्याला तयारीला लागण्याची आज्ञा केली. फोर्ट पिअरीवरून आलेल्या व्यापारी गाड्यांबरोबर हा नवा स्वयंपाकी लारामीला आला होता. आपल्या पाक-कौशल्याविषयीं त्याला केवढाहि अभिमान असला तरी इथं तें कौशल्य दाखवायला त्याला फारसा वाव नव्हता. कॉफी, बिस्किटं आणि खारावलेलं

डुकराचं मांस असा त्यानं न्याहारीसाठीं बेत केला. हातांत कांटासुरी घेऊन समोरच्या टेबलावर ठेवलेल्या थाळ्यांकडे आणि चहाच्या पेल्यांकडे पाहतांना मला अस्तित्वाचं एक नवं पर्व सुरू झाल्यासारखं वाटलं. गेले तीन आठवडे मी मिठाशिवाय मांस खात होतों. त्यामुळें माझ्यासमोरची कॉफी मला अतिशय चवदार लागली, आणि रोटी तर एखाद्या पक्वान्नासारखी भासली. जेवतांना सोबतहि मोठी चांगली होती. माझ्यासमोरच घरांतले कपडे घालून शॉ बसला होता. आपल्या वृत्तीशीं जुळणाऱ्या मित्रांचं सुख काय असतं हें एकाद्या माणसाला जर खरखुरं समजून घ्यायचं असेल तर त्यानं कांहीं आठवडे ऑगीलाह्ला रेड इंडियनांच्या वस्तीवर घालवावेत. या त्याच्या वास्तव्यांत जर शरीर दुबळं करून टाकणारा आजार त्याला झाला तर मी म्हणतों तें त्याला अधिकच चांगलं समजलं.

शॉ दोन किंवा तीन आठवडे किल्ल्यांत राहिला होता. पॅपिनच्या खोलींत तो होता. खोलीच्या एका कोपऱ्यांत गव्याची कातडीं अंथरलीं होतीं. मी त्याच्यावर जाऊन पडलों. शॉनं तीन पुस्तकं मला आणून दिलीं. तो म्हणाला, "हा तुझा शेक्सपिअर आणि हा बायरन्; आणि हा बायबलचा जुना करार. शेक्सपिअर आणि बायरन् या दोघांची जरी बेरीज केली तरी जेवढं काव्य मिळणार नाहीं त्याहून कितीतरी अधिक काव्य या बायबलमध्यें आहे."

या तिघांतल्या तिसऱ्या क्रमांकाची, बायरनची, मीं निवड केली. त्याच्या तेजस्वी प्रतिभेनें निर्माण केलेल्या विश्वांत मी मग्न झालों. लेखकाच्या स्त्रैण वृत्तीचा विसर पडावा असं सामर्थ्य या काव्यांत आहे हें त्याचं मोठं यशच समजलं पाहिजे.



# २० | एकाकी प्रवास

मी ज्या दिवशीं जाऊन पोंचलों त्या दिवशींचीच गोष्ट. आम्हांला अगत्यानं देण्यांत आलेल्या लारामीच्या किल्ल्यांतल्या मोठ्या दालनांत गव्याच्या कातड्याच्या जाजमावर मी आणि शॉ पडलों होतों. शस्त्रं आणि घोड्यांचा सरंजाम पाहण्यासाठीं म्हणून हेन्री शॉटिलॉंहि आमच्या खोलींत आला होता. आणखी दोघे तिघे रेड इंडियन खोलींत येऊन बसले होते आणि डोळे खिळवून आमच्याकडे पहात होते.

शॉ म्हणाला, "मी इथं अगदी मजेंत राहिलों. शॉंगसाशाचीच मला उणीव भासली. पैसे देऊन किंवा स्नेहाखातरहि मला शॉंगसाशा मिळूं शकलं नाहीं." मीं येतांना उत्तम दर्जाची शॉंगसाशा भरलेली पिशवी आणली होती. ती मी शॉला दिली. शॉ म्हणाला, "हेन्री, पॅपिनची तंबाखू कापायची फळी घेऊन ये. नाहीं तर असं कर, तें सगळं काम या रेड इंडियनाकडे सोपव. तंबाखू आणि शॉंगसाशा यांच्या मिश्रणाचं प्रमाण गोऱ्या माणसांपेक्षां त्यांनाच अधिक कळतं." खोलींतल्या त्या रेड इंडियनानं मिश्रण तयार केलं. मग आम्हीं

पाईप भरला आणि धूम्रपान केलं. त्यानंतर आतां पुढं काय करायचं याची मीं आणि शॉनं थोडी चर्चा केली. त्यापूर्वीं शॉनं लारामीच्या किल्ल्यांत मी नसतांना काय काय घडलं तें थोडक्यांत सांगितलं.

आठवड्यापूर्वीं डोंगराच्या पलिकडचीं चार माणसं किल्ल्यावर आलीं होतीं. सबलीट, रेड्डीक हे त्या चौघांपैकीं दोघेजण. लारामीच्या किल्ल्याँकडे येतांना त्यांना रेड इंडियनांची एक टोळी भेटली. या टोळींतलीं बहुतेक माणसं तरुण होतीं. गोऱ्या लोकांशीं स्नेहसंबंध ठेवणाऱ्या स्मोकच्या वस्तीवरची ही टोळी होती. त्यामुळें हे चौघे प्रवासी मनांत कसलाहि संशय न ठेवतां त्यांच्याशीं गप्पागोष्टी करूं लागले. इतक्यांत अकस्मात् कांहीं लोक पुढं आले आणि या चौघांच्या घोड्यांचे लगाम हातांत धरून त्या रेड इंडियनांनीं यांना खालीं उतरायला सांगितलं. त्यांनीं सांगितल्याप्रमाणें न करतां क्षणार्धांत या चौघांनीं आपापल्या घोड्याला जोराचा फटकारा लगावून घोडे भरधाव सोडले. त्या रेड इंडियनांनीं गोळ्या झाडल्या. रेड्डीकच्या हाताच्या अगदीं जवळ एक इंचाच्या अंतरावर एक गोळी लगामावर बसली. सुदैवानं कुणालाहि जखम झाली नाहीं. रेड इंडियन लोकांच्या स्वभावाचा हा मासला पाहिल्यानंतर यापुढें असला अधिक धोका पत्करण्यांत अर्थ नाहीं हें त्यांनीं ओळखलं. दक्षिणेकडच्या वाटेनं डोंगराच्या पायथ्याकडून बेंटच्या किल्ल्यावर जायचं त्यांनीं ठरवलं. आमचाहि तसाच बेत असल्यामुळें आम्हीं सगळ्यांनीं बरोबर निघायचं ठरलं. पॉनी आणि कॅमॉश जमातीचे रेड इंडियन वाटेंत भेटण्याची शक्यता असल्यामुळें हा प्रवास धोक्याचा होता.

बेंटच्या किल्ल्यावर आल्यानंतर आणखी एक मनुष्य आमच्या बरोबर येणार असल्याची आमची अपेक्षा होती. तो केंटकीचा राहणारा एक तरुण होता. रॉकी पर्वताकडे रसेलच्या नेतृत्वाखालीं निघालेल्या प्रवाशांच्या तांड्याबरोबर तो आला होता. एक तरी रेड इंडियन ठार करायचा ही आकांक्षा बाळगून तो घरांतून निघाला होता. आपली ही आकांक्षा त्यानं पुरी केली. परंतु त्यामुळें आम्हांला मात्र भलताच त्रास झाला. कारण ज्या पॉनी रेड इंडियनाचा त्यानं वध केला त्याचे नातेवाईक भयंकर संतापले होते. आणि या पॉनींच्याच प्रदेशांतून आम्हांला प्रवास करायचा होता. ज्या प्रवाशांच्या तांड्याबरोबर हा तरुण आला होता त्यांना तो कंटाळला. आणि थोड्या दिवसांपूर्वीं कांहीं लोकांना बरोबर घेऊन अर्कांसास पर्वतांच्या दिशेनं निघाला. बेंटच्या किल्ल्यावर आम्हीं

येऊन पोंचेपर्यंत मी थांबेन आणि तिथून पुढं आमच्याबरोबरच येईन असं पत्र त्यानं आमच्यासाठीं ठेवलं होतं. परंतु तो किल्ल्यावर येऊन पोंचला तेव्हां चाळीस लोकांचं एक पथक घरच्या दिशेनं चालल्याचं त्याला कळलं. तेव्हां त्या लोकांबरोबरच जाण्याचं त्यानं ठरवलं आणि तें शहाणपणाचंहि होतं. तो निघाल्यानंतर सहा आठवड्यांनीं आम्ही बेंटच्या किल्ल्यावर जाऊन पोंचलों. आतां आम्हांला प्रवासांत कुणाचीहि सोबत नव्हती. आम्हांला आमच्यावरच अवलंबून रहावं लागणार होतं.

चार ऑगस्टला दुपारीं आम्हीं लारामीच्या किल्ल्यांतल्या अतिथ्याचा निरोप घेतला. पुन्हां एकदां मी आणि शॉ माळावरून बरोबर प्रवासाला निघालों. पहिल्या पन्नास मैलांपर्यंत ट्रोशे हा फासेपारधी आणि रॉव्हिल हा फर कंपनींतला एक नोकर हे दोघे आमच्याबरोबर होते. हॉर्सक्रिकजवळ बिसोनेट या व्यापाऱ्याचा तळ होता. तिथं ते निघाले होते. सहाआठ मैल प्रवास केल्यानंतर आम्ही एका झऱ्याच्या कांठाशीं थांबलों. झऱ्याचं पाणी झाकून जावं इतकी चेरी वृक्षांची दाटी कांठाशीं होती. हीं झाडं फळांनीं वाकलीं होतीं. आम्हांला तंबू ठोकायचा अगदीं आळस आला होता. आम्हीं खोगीरं जमिनीवर ठेवलीं. त्यावर दोनदोन गव्याचीं कातडीं पसरलीं आणि त्यावर पडून धूम्रपान करूं लागलों.

डेस्लॉरिअर्स तवा घेऊन स्वयंपाकाच्या तयारीला लागला होता. रेमंड आजूबाजूला चरणाऱ्या घोड्यांवर नजर ठेवून बसला होता. रॉव्हिल हा स्वयंपाकाच्या कलेंत निष्णात असल्यानं या कामीं डेस्लॉरिअर्सला मदतनीस मिळाला. रॉव्हिल हा सेंट लुईस इथल्या एका सर्कशींत घोडेस्वार होता. लारामीच्या किल्ल्यावर असतांना त्यानं एकदां घोड्यावर शीर्षासन करून घोडा भरधांव चालवून दाखवला होता. त्यानं केलेलं हें प्रात्यक्षिक पाहून तिथले रेड इंडियन आश्चर्यानं थक्क झाले होते. लारामीच्या किल्ल्यांत अत्यंत विनोदी स्वभावाचा म्हणून रॉव्हिल प्रसिद्ध होता. त्या रात्रीं आमच्या तळावर रॉव्हिलच्याच गोष्टींनीं खरी गंमत आणली. तो मधेंच डेस्लॉरिअर्सजवळ जाई आणि काळवीटाच्या मांसाची शीग भाजण्याची खरी पद्धती त्याला सांगूं लागे. तें सांगून झालं कीं तो आमच्यांत येई आणि घोड्याच्या शेपटीची उत्तम वेणी कशी घालावी याची आम्हांला विस्तारानं माहिती सांगे. शिकारीच्या कपोलकल्पित कथा सांगणं हा तर त्याचा अगदीं हातखंडा विषय. एकदां म्हणे

त्यानं नुसत्या सुऱ्यानं रानगव्याची शिकार केली होती. प्रथम आपण रानगव्याच्या मागें जाऊन त्याची शेपटी कापली आणि नंतर वेगानं धावणाऱ्या रानगव्याला खलास केला असं त्यानं सांगितलं. लारामीच्या किल्ल्यावरचा मुख्य धनी पॅपिन याच्याहि अनेक विक्षिप्त गोष्टी त्यानें आम्हांला ऐकवल्या. बाजूला गवतावर पडलेला शेक्सपिअर त्यानं उचलला आणि अडखळत अडखळत दोन ओळी वाचून आपल्याला वाचतांहि येतं हें त्यानं दाखवून दिलं. सबंध दिवस तळावर तो माकडचेष्टा करीत असे. त्याच्याबरोबरचा ट्रॉशे मात्र एक शब्दहि न बोलतां अत्यंत कुरूप दिसणाऱ्या उटाह जमातीच्या रेड इंडियन बाईवर लक्ष ठेवून बसलेला असे. त्याला तिची विलक्षण असूया वाटे.

दुसऱ्या दिवशीं आम्हीं गॉश होल या नांवानं ओळखली जाणारी घळ ओलांडून पुढे गेलों. रात्र जवळ आली तेव्हां आम्ही अनेक दऱ्यांच्या गुंतागुंतींत सांपडलों. परंतु तिथें कुठेंच पाणी दिसेना त्यामुळें बऱ्याच उशीरापर्यंत आम्हांला प्रवास करावा लागला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पाऊस आणि वारे यांचे तडाखे खाऊन भेसूर दिसणारे अनेक डोंगरकडे ओलांडले. इथं आम्हांला राक्षसाच्या पावलांसारखीं उमटलेलीं पहाडी अस्वलांचीं पावलं दिसलीं. यानंतर क्षितिजापर्यंत पसरलेला गवताळ माळ आम्हीं ओलांडूं लागलों. पलिकडच्या टेकड्या मृगजळामुळें विचित्र आकारांच्या दिसत होत्या. मी आणि शॉ बरोबर चालत होतों. हेन्री कांहीं गज आमच्यापुढें होता. इतक्यांत त्यानं घोडा थांबवून आम्हांला हांक मारली. आम्ही जवळ गेलों. हेन्रीनं मैलभराच्या अंतरावरला काळा ठिपका दाखवला. तो म्हणाला, "चला, आपण तिथं जाऊं या. एखाद्या म्हाताऱ्या गव्याची शिकार करण्यापेक्षां बलिष्ठ आणि चपळ अशा अस्वलाची शिकार करायला गंमत येईल."

आम्ही सगळे त्या पहाडी अस्वलाच्या दिशेनं निघालों. आम्हीं शिकारीची जय्यत तयारी केली होती. कारण ही पहाडी अस्वलं दिसायला जरी भोंगळ दिसत असलीं तरी तीं भयंकर चपळ आणि क्रूर असतात. माळावरच्या गवताच्या फुगवट्यानं तो अस्वलाचा काळा ठिपका कांहीं क्षण आमच्या नजरेआड झाला. परंतु आम्ही थोडे पुढें गेल्यानंतर पुन्हां तो ठिपका दिसूं लागला. आम्ही कांहींसे पुढें जाऊन त्या ठिपक्याकडे पाहूं लागलों. आणि काय आश्चर्य ! त्या अस्वलाचे दोन भाग होऊन ते परस्पर विरुद्ध दिशांना पंख हलवत उडून गेल्याचं आम्हीं पाहिलं. आम्हीं घोडे थांबवून हेन्रीकडे पाहिलं, त्याचा चेहेरा शरमेनं

एवढासा झाला होता. खरी गोष्ट अशी होती कीं पन्नास गजांच्या अंतरावर दोन मोठे कावळे शेजारीं शेजारीं बसले होते. मृगजळामुळें हे कावळे हेन्रीला एक मैल अंतरावर असलेल्या अस्वलासारखे दिसले. प्रवासाच्या अखेरपर्यंत आम्ही हेन्रीची पंख असलेल्या अस्वलावरून सारखी थट्टा करत होतों.

दुपारीं आम्ही एका उंच टेकडीच्या पायथ्याशीं आलों. रॉव्हिल टेकडी चढतांना आम्हांला आमच्या घरची माहिती विचारत होता. शॉनं त्याला आपल्या काल्पनिक बायकोमुलाची हकिकत सांगितली. ही सगळी हकिकत रॉव्हिल अगदी श्रद्धापूर्वक ऐकत होता. टेकडीच्या माथ्यावर चढून गेल्यानंतर हॉर्सक्रिकच्या वळणावरचं कुरण आम्हांला दिसलं. त्या तिथंच डाव्या बाजूला हॉर्सक्रिकच्या कांठाशींच झाडालगत बिसोनेटचा तळ दिसत होता. बिसोनेटचा तंबू दिसतांच रॉव्हिलचा चेहेरा एकदम पडला. काय झालं असं विचारलं तेव्हां आम्हांला कळलं कीं बिसोनेटनं रॉव्हिलला तंबाखूचा साठा आणण्यासाठीं म्हणून मुद्दाम लारामीच्या किल्ल्यावर पाठवला होता. इतक्या धोक्याचा जवळ-जवळ शंभर मैलांचा प्रवास करून आल्यानंतर गडबड्या रॉव्हिलला आपण तंबाखू आणायला विसरलों हें आठवलं होतं. हॉर्सक्रिक ओलांडून आम्हीं गेलों. त्या कांठावर असलेल्या पलीकडच्या कांठावर एका झाडाखालीं एक रेड इंडियन घोडेस्वार होता. एकहि शब्द न बोलतां तो आम्हांला बिसोनेटच्या तळाकडे घेऊन जाऊं लागला.

बिसोनेटनं मोठी छान जागा शोधून काढली होती. झरा, आजूबाजूला दाट झाडं, तिन्ही बाजूला हिरवंगार कुरण असं तें स्थळ होतं. या कुरणावर डाकोटा जमातीचे चाळीस तंबू होते आणि त्यांच्या पलिकडे शेन्स जमातीच्या रेड इंडियनांचे थोडे तंबू होते. डाकोटा आणि शेन्स यांचे संबंध सलोख्याचे आहेत. बिसोनेट रेड इंडियनांच्या पद्धतीनेंच रहात असे. बिसोनेटच्या तंबूंत आम्हीं गेलों. तंबूच्या दरवाज्याजवळच तो बसला होता. गवताळ प्रदेशांत न दिसणाऱ्या सुखचैनीच्या अनेक वस्तू त्यांच्या तंबूंत आजूबाजूला दिसत होत्या. त्याची रेड इंडियन बाई बाजूलाच होती आणि छापील कापडाचे झगे घातलेली गुलाबी रंगाचीं त्याचीं मुलं आजूबाजूला फिरत होतीं. तंबूंत चामड्यासारखं तोंड असलेला पॉल डोरिअन आपला जुनाट पांढरा ओव्हरकोट घालून बसला होता. त्याच्या बरोबरच अँटनी-ल-रुज हा मिश्र रक्ताचा पॉनी रेड इंडियन, सिबिल हा व्यापारी आणि इतर कांहीं गोरे लोक बसले होते.

बिसोनेट म्हणाला, " प्युब्लोच्या किल्ल्यावर निघण्यापूर्वी इथं तुम्ही एकदोन दिवस राहिलांत तर तुमचं कांहींहि नुकसान होणार नाहीं. "

बिसोनेटच्या निमंत्रणाचा आम्हीं स्वीकार केला आणि त्याच्या तळाच्या जवळच असलेल्या एका उंचवट्यावर आम्हीं आमचा तंबू ठोकला. बिसोनेटनं लवकरच आम्हांला जेवायला बोलावलं. मी जेव्हां ब्लॅकहिल्सच्या पलीकडे रेड इंडियनांच्या वस्तीवर होतों तेव्हां तिथून पुढल्या प्रवासाला निघतांना त्या वस्तीवरच्या कांहीं लोकांनीं यायचं नाकारलं होतं या गोष्टीचा उल्लेख मी पूर्वी केलेलाच आहे. इथं तळ ठोकून राहिलेले रेड इंडियन हे पुढच्या प्रवासाला येण्याचं नाकारणारे त्या वस्तीवरचे लोक होते. प्रवासाला पुढं गेलेल्या आपल्या नातेवाईकांची चौकशी करण्याकरतां मी इथं येतांच ते रेड इंडियन माझ्याभोंवती गोळा झाले. धीर करून पुढे गेलेल्या आपल्या नातेवाईकांनीं पुढच्या वर्षीच्या तंबूसाठीं कातडी मिळवली, अन्नाचीहि भरपूर तरतूद केली आणि आपण भित्रेपणामुळें उपासमार सहन करीत इथे राहिलों हें कळल्यानंतरसुद्धां त्यांना फारशी शरम वाटल्याचं मला दिसलं नाहीं. हे कर्मदरिद्री लोक कसेबसे चेरीचीं फळं खाऊन गुजराण करत होते.

दुसरे दिवशीं अर्कांसास इथून एक रेड इंडियन आपल्या कुटुंबासहित तळावर आला. आम्हांला सगळ्यांना विशेष उत्सुकता वाटली. आपण कोणीतरी विशेष आहोंत असं दाखवत त्यानं गोऱ्या लोकांना सांगण्यासाठीं आपण एक खास बातमी आणल्याचं सांगितलं. थोड्या वेळानं त्याच्या रेड इंडियन बायांनीं तंबू उभा केला. तंबू उभारल्यानंतर त्यानं आपल्या लहान मुलाला पाठवून सर्व गोऱ्यांना आणि त्या रेड इंडियन वस्तीवरच्या प्रतिष्ठितांना आपल्या तंबूवर जेवायला बोलावलं. सगळे पाहुणे आले. आणि त्या गरम, कोंदट तंबूंत एकमेकांना घट्ट चिकटून बसले. जेवायला बोलावणाऱ्या त्या रेड इंडियन यजमानाचं नांव होतं स्टॅब्रर. स्टॅबरनं आमच्या तळावर येतांना वाटेंत एक म्हातारा गवा मारला होता. या म्हाताऱ्या गव्याची चामड्यासारखी चिवट अशी उकडलेलीं आतडीं हा त्या जेवणाचा खास बेत होता. या आंतड्यांबरोबरच उकडलेली चेरीचीं फळंहि होती. जेवण कटोऱ्यांत वाढलं गेलं. कांहीं क्षण शांतता पसरली. आंतड्यांचा समाचार घेतांना त्यांच्या चिवटपणाचा भेद करण्यासाठीं दांत परिश्रमांची पराकाष्ठा करत होते. कांहीं वेळानं यजमानाच्या अतिथ्याचा आपण मनसोक्त उपभोग घेतल्याचं सुचवण्या-

साठीं जेवणाऱ्या रेड इंडियनांनीं रिकामे झालेले आपले लाकडी कटोरे उलटे करून दाखवले. थोड्या वेळानं धूम्रपानाचा कार्यक्रम पार पडला. धूम्रपान संपल्यानंतर बरेचसे हातवारे करीत स्टॅबरनं हकिकतीला प्रारंभ केला. सगळ्याच रेड इंडियनांच्या हकीकतींप्रमाणेंच स्टॅबर सांगत असलेली हकीकतहि थापेबाजींनीं इतकी भरलेली होती कीं त्यांतून सत्याचा कण वेगळा काढणं जवळजवळ अशक्य होतं असं म्हटलं तरी चालेल. त्याच्या हकीकतीची आम्ही केलेली थोडक्यांत गोळावेरीज अशी :

तो अर्कांसास येथून आला होता. तिथं त्यानं गोऱ्या लोकांचीं सहा मोठीं युद्धपथकं पाहिलीं होतीं. त्या संख्येच्या अर्ध्याइतकेहि गोरे लोक या पृथ्वीतलावर असू शकतील याची त्याला पूर्वी मुळींच कल्पना नव्हती. त्या सगळ्यांकडे बळकट घोडे होते. लांब सुऱ्या आणि छोट्या रायफली होत्या आणि स्टॅबरनं पूर्वी कधींहि न पाहिलेला असा उत्तम गणवेष त्यांच्यापैकीं कांहीं गोऱ्या योद्धयांनीं घातला होता. या त्याच्या हकीकतीवरून अर्कांसासकडे घोडदळाचं पथक गेलं असल्याचं आम्हीं अनुमान केलं. या गोऱ्या लोकांच्या तंबूचं सामान लांब शिंगाचे गवे ओढून नेत असल्याचं स्टॅबरनं पाहिलं होतं. सैन्याचं सामान नेण्या-साठीं गाडयांना जुंपलेले हे बैल असावेत हें आम्हीं ताडलं. इतकं सगळं सांगून झाल्यानंतर स्टॅबरनं आणलेली महत्त्वाची बातमी सांगायला सुरुवात केली. कॅमॉश जमातीचा एक रेड इंडियन त्याला भेटला होता आणि त्याच्याकडून स्टॅबरला कळलं होतं कीं कांहीं मेक्सिकन लोक गव्यांच्या शिकारीसाठीं गेले असतांना एका घळींत दडलेल्या अमेरिकनाशीं त्यांची मारामारी झाली. या मेक्सिकनांजवळचे सगळे बाण संपून गेले. तेव्हां घळींत दडलेले अमेरिकन बंदुका घेऊन युद्धाच्या गर्जना करीत बाहेर आले आणि त्यांनीं त्या सगळ्या मेक्सिकनांचा निकाल लावला. आम्ही या बातमीवरून असं अनुमान केलं कीं मेक्सिकोशीं युद्ध पुका-रल्याचं सरकारनं जाहीर केलं असावं आणि स्टेबर सांगत असलेल्या लढाईत अमेरिकन सैन्यपथकानं विजय मिळविला असावा. यानंतर कांहीं आठवडयांनीं आम्हीं प्युबलोच्या किल्ल्यावर गेल्यानंतर जनरल किर्नी अर्कांसासपर्यंत गेल्याचं आणि जनरल टेलरनं मॅटमोरास येथे मिळविलेल्या विजयाचं वृत्त आम्हांला कळलं.

सूर्यास्ताच्या वेळीं आमच्या तंबूच्या समोर बरेच घोडेस्वार गोळा झाले होते. आपल्या घोडयाच्या गतीचा अंदाज घेण्यासाठीं ते सगळे जमले होते. वेगवेगळ्या रंगांचे व आकारांचे हे घोडे होते. कांहीं कॅलफोर्नियांतले होते,

डोंगराळ प्रदेशांतले होते आणि कांहीं गवताळ प्रदेशांतले होते. कांहीं पांढरे, काळे, तांबडे होते त्याचप्रमाणें कांहीं रंगीबेरंगीहि होते. शहरांतल्या काळजीपूर्वक पोसलेल्या घोड्यांपेक्षां हे घोडे अगदी वेगळे भासत होते. त्यांच्या डोळ्यांत बिचकल्याची भावना दिसत होती. त्यांच्यापैकीं जे विशेष चपळ घोडे होते त्यांच्या आयाळींत आणि शेपटींत सजावट म्हणून गरुडाची पिसं अडकवण्यांत आलीं होतीं. डाकोटा जमातींतली पन्नास साठ माणसं तिथं होतीं. पांढरा रंग दिलेल्या गव्याचं कातडं त्यांनीं पायापासून डोक्यापर्यंत गुंडाळलं होतं. शेन्स जमातीचेहि कांहींजण होते. त्यांनीं मेक्सिकन डगला घातला होता. हा डगला उजवा हात उघडा ठेवून खांद्याभोवतीं लपेटलेला होता. या रेड इंडियनांबरोबर बिसोनेटकडे नोकरी करत असलेले कांहीं कॅनडियन लोकहि होते. या कॅनडियन लोकांना घरांतल्या चुलीपेक्षां रानांत पेटवलेल्या शेकोटीची आग अधिक पसंत होती. कष्ट आणि संकटं यांना तोंड देण्याचा प्रसंग आला कीं ते खुषींत येत. या कॅनडियन लोकांप्रमाणेंच मिश्र रक्ताचे आणखी तिघेजण तिथं होते. या त्यांच्या रक्ताचा मिश्रपणा रूढ भाषेंत सांगायचा झाल्यास ते अर्धे रेड इंडियन, अर्धे गोरे आणि अर्धे राक्षस होते असंच म्हणावं लागेल.

सैल विजार आणि कॅलीकोचा शर्ट घातलेला ॲंटनी-ल-रूज हा यांच्यापैकीं चटकन् नजरेंत भरत असे. लटालटा असलेले आपले केस त्यानं डोक्याभोंवतीं रुमाल बांधून झाकले होते. त्याच्या लहान्या डोळ्यांत मिस्किलपणाची चमक होती. त्याच्याजवळ फिकट पिवळ्या रंगाचा एक घोडा होता. इतरांप्रमाणें रूजलाहि आपल्या घोड्याच्या वेगाचा अंदाज घ्यायचा होता. त्यानं खोगिराच्या ऐवजीं गव्याचं कातडं घोड्याच्या पाठीवर ठेवलं आणि उडी मारून तो स्वार झाला. आजूबाजूची गर्दी बाजूला झाली. त्या सगळ्यांनीं आपले घोडे भरधांव पिटाळले. कांहीं क्षण अंधारांत ते दिसेनासे झाले. थोड्या वेळानं ठरलेल्या जागीं जाऊन रूज सर्वांआधीं परत आला. धापा टाकणाऱ्या घोड्याला आनंदित होऊन तो कौतुकानं थोपटत होता.

मध्यरात्रीं गव्याचं कातडं पांघरून मी झोपलों असतांना रेमंडनं मला जागं केलं. कसलीतरी गर्दी जमली होती आणि मी ती पहावी म्हणून रेमंडनं मला उठवलं होतं. एक मोठी शेकोटी पेटवून तिच्या भोंवतीं अनेक रेड इंडियन जमले होते. या गर्दीच्या मध्यावरून मोठ्या आवाजांतलं गाणं ऐकूं येत होतं. अधूनमधून मोठमोठ्या किंकाळ्याहि ऐकूं येत होत्या. हवेंत खूप गारठा होता. मी

गव्याचं कातडं अंगाभोवतीं नीट लपेटून घेतलं आणि काय चाललं आहे तें पाहण्यासाठीं त्या गर्दीच्या दिशेनं निघालों. मी गर्दीतून घुसून पुढें जात होतों इतक्यांत एका गटप्रमुखानं मला सांगितलं कीं अशा गंभीर प्रसंगाच्या वेळीं गोऱ्या माणसानं फार जवळ जाणं बरं नव्हे. तेव्हां मी मागेंच उभा राहिलों. गर्दीमधल्या फटींतून पुढं काय चाललं आहे हें स्पष्ट दिसत होतं.

स्ट्रॅाँग हार्ट्स या नांवानं ओळखलं जाणारं मंडळ युद्धनृत्य करत होतं. स्ट्रॅाँग हार्ट्स या मंडळांत डाकोटा आणि शेन्स या दोन्ही जमातींचे लोक असतात. विशेष पराक्रमी अशा तरुण योद्धयांचं हें मंडळ आहे. एकदां कुठलंहि काम हातांत घेतलं कीं कुठल्याहि परिस्थितींत पाऊल मागं घ्यायचं नाहीं हें मंडळाचं मुख्य तत्त्व. कोल्हा ही आपली संरक्षक देवता आहे असं हें मंडळ मानतं. त्यांनीं मानलेलं हें प्रतीक एका अर्थी योग्यच आहे असं म्हणायला पाहिजे. कारण या रेड इंडियनांची युद्धनीति कोल्ह्याच्या स्वभावाशीं मिळतीजुळतीच असते. नाच करणारे योद्धे शेकोटीच्या प्रकाशानं उजळले होते. आपली संरक्षक देवता जो कोल्हा त्याची चाल आणि आवाज यांचं ते अनुकरण करत होते. मधेंच मोठी किंकाळी फोडली जाई. मग इतर कांहीं योद्धे उडी मारून आंतल्या वर्तुळांत सामील होत. एकहि तारा नसलेल्या अंधारलेल्या आकाशाकडे पहात ते पाय आपटीत, किंकाळ्या फोडीत आणि क्षुब्ध झालेल्या पिशाच्चांप्रमाणें आपल्या हातातलीं हत्यारं फिरवीत.

दुसऱ्या दिवशीं दुपारपर्यंत आम्हीं इथं राहिलों. प्युब्लोचा किल्ला इथून तीनशें मैल अंतरावर होता. तिथं पोंचायला आम्हांला पंधरा दिवस लागतील असा आमचा अंदाज होता. या पंधरा दिवसांच्या प्रवासांत वाटेंत आम्हांला कोणीहि माणूस भेटणार नाहीं असा आमचा अंदाज होता. जर कां माणसं भेटलींच तर बहुधा तीं आमचीं शत्रूच असणार. आमच्या हातांतल्या रायफली हे अशा परिस्थितींत इथून जाण्याचे परवानेच होते असं म्हणायला हरकत नाहीं.

पहिले दोन दिवस विशेष कांहीं घडलं नाहीं. तिसऱ्या दिवशीं सकाळीं एक त्रासदायक घटना घडली. एका छोट्याशा झऱ्याच्या कांठाशीं आम्हीं आमचा तळ ठोकला होता. डेस्लॉरिअर्स सूर्य उगवण्यापूर्वींच जागा झाला होता आणि न्याहारी तयार करायला लागण्यापूर्वीं त्यानं घोड्यांना चरायला सोडलं होतं. सगळीकडे दाट धुकं पसरलं होतं, आम्हीं जेव्हां जागे झालों तेव्हां आमचीं

जनावरं आम्हांला कुठं दिसेनात. बराच वेळ शोधाशोध केल्यानंतर त्यांच्या खुरांचा माग शोधून काढला. जनावरांपैकीं एका बंडखोर म्हाताऱ्या खेचराच्या नेतृत्वाखालीं हीं सगळीं जनावरं लारामीच्या दिशेनं पळालीं होतीं. बहुतेक जनावरांना पायबंध घातलेले होते. परंतु असं असूनसुद्धां आमच्या तंबूतळापासून तीं तीन मैल पुढं पळालीं होतीं. शेवटीं त्यांना एकदांचं पकडून परत आणलं.

जवळजवळ दोनतीन दिवस आम्हीं शुष्क वाळवंटांतून प्रवास करत होतों. उन्हानं करपलेलं क्वचित् कुठंतरी खुरटं गवत दिसे तेवढंच. नाना तऱ्हेचे प्राणी आणि जिवाणू तिथं स्वैरपणें फिरतांना आम्हांला दिसले. काळ्या आणि हिरव्यागार रंगाचे मोठमोठे टोळ, सरडे इथंतिथं फिरत होते. सगळ्यांत वैशिष्ट्यपूर्ण प्राणी मी तिथं पाहिला आणि तो म्हणजे शिंगं असलेला बेडूक. तसला एक बेडूक मी पकडला आणि डेस्लॉरिअर्सच्या हवालीं केला. त्यानं तो एका जोडयांत घालून काळजीपूर्वक बांधून ठेवला. यानंतर एका महिन्यानं जोडयांतल्या या कैद्याची परिस्थिती कशी आहे ती पहावी म्हणून मी तें पुडकं सोडलं. तो बेडूक अजून जिवंत होता. तेव्हां मी त्याच्यासाठीं गव्याच्या कातडयाचा एक छोटासा पिंजरा केला आणि बेडूक आंत ठेवून पिंजरा गाडींत टांगला. अशा तऱ्हेनं प्रवास करत सेंट लुईसपर्यंत तो सुखरूप आला. तिथून मी त्याला एका ट्रंकेंत घालून बोस्टनला नेला. दररोज रात्रीं ट्रंकेंतून बाहेर काढून मी त्याला मोकळ्या हवेची मेजवानी देत असे. बोस्टनला पोंचल्यानंतर त्याला एका काचेच्या भांड्यांत ठेवण्यांत आलं. या भांडयांत तो कांहीं महिने शांतपणें राहिला. त्याला पहायला येणाऱ्या लोकांना आपला पांढरा गळा विस्फारून आणि आकुंचित करून तो दाखवी आणि कौतुकास पात्र होई. परंतु हिंवाळ्याच्या मध्याला एके सकाळीं त्यानं या जगाचा निरोप घेतला. सध्यां ॲगासीस म्युझियममधें तो मद्यार्कांच्या बाटलींत ठेवलेला आहे. उपासमारीमुळें त्याचा मृत्यु झाला असं सांगण्यांत आलं. हें बहुधा खरं असावं. त्याला बघायला येणारी पोरं नाना तऱ्हेचे पदार्थ त्याच्यापुढं टाकत. परंतु सहा महिनेपर्यंत त्यानं अन्नाला स्पर्श केला नव्हता.

या प्रवासांत आम्हांला आढळलेले इतर प्राणी म्हणजे गवताळ प्रदेशांतले कुत्रे. त्यांच्या बिळाशेजारच्या माती उकरलेल्या उंचवटयांनीं मैलच्या मैल व्यापलेले असत. आम्ही जाऊं लागलों कीं कर्कश आवाजांत ते आमच्यावर

भुंकत. बिळाच्या तोंडाकडे त्यांचीं नाकं दिसत. परंतु त्यांचं कुतूहल संपलं कीं क्षणार्धांत ते बिळांत नाहींसे होत. त्यांतल्या त्यांत कांहीं धीट कुत्रे—त्यांना कुत्रे म्हणण्यापेक्षां सशापेक्षां लहान आकाराच्या मोठ्या खारीच म्हणणं बरं— बिळाच्या तोंडाशीं बसून जोरजोरानं शेपटी हलवत आमच्यावर भुंकूं लागत. आम्ही फार जवळ गेलों कीं मात्र हवेंत पाय झटकून ते बिळांत शिरत आणि डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोंच नाहींसे होत.

सूर्यास्ताची वेळ होती. पाऊस पडेल असं वाटत होतं. कुत्र्यांची ही सगळी वसाहत बिळाबाहेर पडली होती. एका महत्त्वाच्या, प्रतिष्ठित नागरीकाच्या बिळाभोंवती बरेच कुत्रे जमून मोठमोठ्यानं भुंकत आवडीच्या विषयावर चर्चा करत होते. बिळाचा मालक आपल्या पाहुण्यांच्या सुखाकडे स्वयंतुष्ट वृत्तीनं पहात बसला होता. कांहीं कुत्रे या बिळाकडून त्या बिळाकडे धावत होते. जमिनीखालच्या त्यांच्या राष्ट्रकुलांतलं कसलं तरी महत्त्वाचं काम ते करत असावेत. साप हे या कुत्र्यांचे शत्रु. या कुत्र्यांविषयीं माझं चांगलं मत असल्यानें सापांचे आणि या कुत्र्यांचे संबंध सलोख्याचे असतील असं मला वाटत नाहीं. हे सापहि तिथंच राहतात. बिळाबाहेर ऊन खात ते बसलेले असतात. त्यांना कोणी त्रास द्यायला आलं कीं ते चटकन् बिळांत जात. या सापांप्रमाणेंच प्रौढ गंभीर चेहेऱ्याचीं कांहीं घुबडंहि इथेंच वस्ती करून असतात. त्यांचे आणि कुत्र्यांचे संबंध कसे काय असतात याची मला कल्पना नाहीं.

बिसोनेटचा तंबूतळ सोडल्यानंतर पांच दिवसांनीं आम्हीं ज्याच्या दिशेनं चाललों होतों त्या झऱ्याकडे आलों. तो झरा फार मोठा असेल अशी आमची कल्पना होती. परंतु जवळ जातांच कोरडं पात्रच आम्हांला दिसलं. त्या रेताड पात्रांत पाणी जिरून नाहींसं झालं होतं. आम्हीं वेगवेगळ्या दिशांना जाऊन त्या प्रवाहाचा मागोवा घेतला; परंतु पाणी तर सोडाच, ओली मातीहि आम्हांला कुठं दिसली नाहीं. झऱ्याच्या कांठानं जुनाट कॉटनवुड उभे होते. वीज आणि वादळ यांच्या मारानं त्यांची अगदीं दशा झाली होती. कांहींच्या फांद्या पार कोळपून गेल्या होत्या. त्यांतल्या सगळ्यांत उंच वृक्षाच्या शेंड्यावर सहा कावळे बसून घोगऱ्या आवाजांत मोठमोठ्यानं काव काव करत होते. अपशकुनी पक्ष्यांसारखी त्यांची ओरड चालली होती. पाणी मिळेपर्यंत पुढं जाणं आम्हांला भागच होतं. दहा मैल अंतरावर असलेल्या प्लाट नदीच्या

दक्षिणेकडच्या फाट्यापर्यंत गेल्याखेरीज जवळपास कुठं पाणी मिळण्याची शक्यता नव्हती. समुद्रासारख्या पसरलेल्या या सपाट वाळवंटावरून आम्ही चिडलेल्या मनानं पाण्याच्या दिशेला निघालों; दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्लाट नदीच्या दक्षिण फाट्याच्या जवळ पोंचलों. एके ठिकाणीं गवत, झुडपं यांनीं वेढलेलं कुरण आम्हांला लागलं. तिथं बसून आम्हीं भरपूर न्याहरी केली आणि पुढं निघालों. दोनतीन गज अंतरावर असलेल्या शॉनं एकदम आपलं खेचर थांबवलं, बंदुक रोखली आणि गवतांत गोळी झाडली. त्यानंतर डेस्लॉरिअर्स उडी मारून पुढं आला आणि थयथयाट करत त्या अदृश्य शत्रूला चाबकानं मारूं लागला. थोड्या वेळानं तो खालीं वाकला आणि त्यानं त्या गवतांतून एक प्रचंड खडखड्या नाग बाहेर काढला. शॉनं झाडलेल्या गोळीनं त्या नागाचं डोकं छिन्नविच्छिन्न झालं होतं. एकाद्या बळकट माणसाच्या दंडाएवढा तो जाड होता. यानंतर प्युबलोच्या किल्ल्यावर जाईपर्यंत आम्ही दररोज कमींत कमी चार किंवा पांच तरी खडखडे नाग मारत असूं. मारलेल्या नागांच्या खडखड आवाज करणाऱ्या त्या शेपट्या कापून शॉ गोळ्या ठेवण्याच्या थैलींत त्या जमवत असे. कांहीं दिवसांनीं ती थैली विविध प्रकारच्या लहानमोठ्या शेपट्यांनीं भरून गेली. डेस्लॉरिअर्ससुद्धां आपल्या हातांतला चाबूक घेऊन या कर्तृत्वांत थोडा भाग घेत असे. एकदां त्यानं एक वीतभर लांबीचा, लहानशी शेपटी असलेला खडखड्या नाग मारला.

प्लाट नदीचा दक्षिण फाटा आम्हीं ओलांडला. पलीकडच्या कांठावर आरापाहो जमातीच्या रेड इंडियनांचा तळ असल्याच्या खुणा दिसत होत्या. गेले कांहीं महिने तिथं कुणीच राहिलेलं नसावं. त्यांच्या पेटवलेल्या शेकोट्यांची राख ठिकठिकाणीं दिसत होती. कांहीं मैल पुढं गेल्यानंतर रेड इंडियनांच्या पावलांच्या खुणा आम्हांला दिसल्या. त्या खुणांवरून आदल्याच दिवशीं ती माणसं गेलीं असल्याचं आमच्या ध्यानांत आलं. आपला घोडा काटकसरीसाठीं काळजीपूर्वक वापरणाऱ्या त्यांतल्या एकानं जाड तळ लावून घेतला असावा असं उमटलेल्या खुणेवरून दिसत होतं. या खुणा पाहून आम्ही मुळींच अस्वस्थ झालों नाहीं. कारण त्यांची संख्या आमच्यापेक्षां कमी होती.

दुपारीं आम्ही एका मोठ्या किल्ल्याच्या भिंतींच्या आडोशाला तळ ठोकून विश्रांति घेतली. या निर्मनुष्य जागीं एम्. सेंट व्रेन यानं हा किल्ला बऱ्याच वर्षांपूर्वीं बांधला होता. तिथं कुणीहि रहात नव्हतं. किल्ल्याचे मोठे दरवाजे

सांध्यांतून निखळून खालीं पडले होते. पडझड झालेलं किल्ल्याचं प्रवेशद्वार इतकं भयानक होतं कीं घोडे तिथून आंत जायला तयार होईनात. पूर्वी इथं वेगवेगळे व्यापारी, कॅनेडियन लोक, रेड इंडियन बाया राहिल्या होत्या. परंतु आतां तिथं गवत वाढलं होतं. मोडकळीला आलेली ती गढी भेसूर दिसत होती. इथून बारा मैलांवर असाच आणखी एक मोडकळीला आलेला निर्मनुष्य किल्ला होता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्हांला धक्का देणारा एक शोध लागला. आरापाहो जमातीच्या लोकांनीं जिथें तळ ठोकला होता अशी एक जागा आम्हांला दिसली. धक्का देणारा शोध असं मी म्हटलं याचं कारण हें कीं जवळजवळ पन्नास शेकोट्या तिथं अजूनहि धुमसत होत्या. याचा अर्थच असा होता कीं आम्हीं तिथं पोंचण्यापूर्वी दोन तास अगोदर हे रेड इंडियन तळ सोडून गेले असले पाहिजेत. आमच्या वाटेच्या डाव्या बाजूला ९० अंशाचा कोन करून त्या रेड इंडियनांची वाट अर्धा मैल पुढं असलेल्या टेकड्यांच्या दिशेनं गेली होती. रेड इंडियनांच्या या वस्तीवर बायकामुलं असल्याच्या खुणा उमटल्या होत्या. म्हणजे लढण्याची जर पाळी आलीच तर धोका थोडा कमी होता. हेन्री शॅटिलॉनं आपल्या सराईत नजरेनं त्या वस्तीच्या उमटलेल्या मागाचं निरीक्षण केलं.

मी म्हणालों, "हेन्री, समजा त्यांची आणि आपली गाठ पडली असती तर?"

हेन्री म्हणाला, "त्यांची आणि आपली गाठ पडली असती तर हात वर करून आपण त्यांना सांगितलं असतं आमच्याजवळ असलेलं सर्व सामान घेऊन जा आणि आपण सामान दिल्यानंतर मला वाटतं त्यांनीं आपल्याला ठार मारलं नसतं. किंवा ते आपल्यावर चाल करून आले असते तर आपण एकाद्या घळींत घुसलों असतों आणि त्यांच्याशीं लढलों असतों."

दुपारीं आम्ही चेरी क्रीक येथें जाऊन पोंचलों. या झऱ्याच्या कांठाशीं चेरी, गुजबेरी यांचीं अनेक झाडं होतीं. झरा रेताडांत पार जिरून गेला होता. आम्हीं त्या वाळूंत खड्डे खणून आमच्यापुरतं आणि घोड्यापुरतं पाणी मिळवलं, यानंतर दोन दिवसांनीं आम्ही निघालों आणि प्लाट नदी आणि अर्कोसास नदी यांच्यामधले डोंगरकडे ओलांडूं लागलों. आतां निसर्गदृश्य बदललं होतं. पेटलेल्या वाळवंटाऐवजी खोल घळी आणि उंच पाईन वृक्षांनीं

भरलेले कडे आम्हांला दिसूं लागले. १६ ऑगस्टच्या रात्रीं आम्हीं इथं तळ ठोकला. सर्वत्र शांतता होती. वादळ होईल असं वाटत होतं. काळ्याकुट्ट ढगांच्या मागें सूर्य गेला होता. त्या काळ्या ढगांना लाल कडा आल्या होत्या. अशा या अरिष्टसूचक खुणा निसर्गांत दिसत असूनहि आम्ही निष्काळजीपणानें तसंच, दमलों होतों म्हणूनहि, तंबू न घालतां जमिनीवरच झोपलों. मध्यरात्रीं वादळ घोंगावूं लागलं. त्या काळोखांत आणि गडगडांटांत आम्हीं तंबू उभारले. सकाळ झाली तेव्हां हवा निवळली होती. पाईक या डोंगराचं शिखर हिमानें झाकून गेलं होतं. दूरवरच्या जंगलांतून उठून उंच उभं राहिल्यासारखं तें दिसत होतं.

पाईन वृक्षांच्या मोठ्या जंगलांतून वाट काढत आम्ही पुढं गेलों. काळ्या रंगाच्या मोठ्या खारी फांद्यांवरून उड्या मारत होत्या. या जंगलाच्या पली-कडच्या टोकाला गेल्यानंतर एका मोठाल्या घळींत आम्हांला गवताळ माळाचा प्रदेश दिसला. आम्ही उभे होतों तिथून एका मैलाच्या अंतरावर एक काळा ठिपका पुढं सरकतांना आम्हांला दिसला. तो गवा असणार हें आम्हीं ताडलं. आपली बंदूक सावरून हेन्री पुढं झाला. तो गवा जिथं उभा होता त्याच्या डाव्या बाजूला एक उंच खडकाळ टेकाड होतं. हेन्री या टेकाडावर जाऊन पोंचला. कांहीं वेळानं बंदुकीचा बार आम्हांला ऐकूं आला. जवळजवळ तीनशें यार्ड अंतरावर हेन्रीनं झाडलेली गोळी त्या गव्याच्या मर्मी लागली होती. तो जखमी गवा वर्तुळांत गरगर फिरत होता. मी आणि शॉ घोडे भरधांव फेकून त्याच्याजवळ गेलों. त्या गव्याच्या तोंडांतून संताप आणि वेदना यांच्यामुळें फेस गळत होता. आम्ही त्याला समांतर धावूं लागलों आणि आमचीं पिस्तुलं काढून त्याच्या बरगड्यांत गोळ्या झाडल्या. एक दोनदां त्यानं आमच्यावर चाल करून येण्याचा प्रयत्न केला परंतु आतां त्याची शक्ति पूर्णपणें संपुष्टांत आली होती. तो गुडघ्यावर खालीं कोसळला. एक क्षणभर त्यानं आपल्या गुंतलेल्या काळ्या-भोर आयाळींतून पेटलेल्या डोळ्यांनीं आपल्या शत्रूकडे पाहिलं आणि दुसऱ्या क्षणीं तो एका बरगडीवर पडला, गतप्राण झाला. तो गवा रोड होता. परंतु आपल्याकडच्या मोठ्यांत मोठ्या बैलाहून तो कितीतरी अधिक जड आणि भक्कम होता. हेन्रीनं सुरी घेऊन त्याचा कांहीं भाग कापला. मांस अत्यंत चिवट असल्यामुळें खाण्याच्या उपयोगाचं नाहीं असं हेन्रीनं आम्हांला सांगितलं. आमच्या अन्नाच्या तरतुदींत या शिकारीमुळें भर पडेल असं आम्हांला वाटलं

होतं. परंतु आमची आशा व्यर्थ गेल्यामुळें त्या मेलेल्या गव्याला लांडग्यांच्या भक्ष्यस्थानीं तसाच सोडून आम्हीं पुढं निघालों.

दुपारीं चालतां चालतां एकाद्या प्रचंड भिंतीसारखी आमच्या उजव्या हाताला डोंगरांची रांग उभी राहिली. त्या डोंगरांच्या पायथ्याकडे आपला चाबूक दाखवत डेस्लॉरिअर्स एकदम किंचाळला, "रानटी टोळ्या! रानटी टोळ्या!" हेन्री, मी आणि शॉ निरखून पाहूं लागलों. कांहीं अंतरावर वेगांत असलेल्या घोडेस्वारांसारखे काळे ठिपके सरकतांना दिसत होते. आम्ही तिघे टेहेळणीसाठीं म्हणून जरा पुढं गेलों. ज्यांना आम्ही आरापाहो जमातीचे घोडेस्वार समजलों होतों ते रांगेनं उभे असलेले पाईन वृक्ष असल्याचं आमच्या ध्यानीं आलं. गवताच्या वर या वृक्षांचे शेंडेच तेवढे दुरून दिसत असल्यामुळें घोडेस्वारांच्या टोळीचा आम्हांला भास झाला होता.

बाजूच्या एका घळींत आम्हीं मुक्काम केला. या घळींतून एक झरा वेगानं फेसाळत धांवत होता. सूर्योदयापूर्वी डोंगरांच्या हिमशुभ्र शिखरांना नाजूक गुलाबी झूब चढली. उजव्या हाताला सहा किंवा आठ मैल अंतरावर पाईक् आणि इतर डोंगरांची शिखरं गवताच्या समुद्रांतून उठून उभीं राहिल्यासारखीं दिसत होतीं. हे डोंगर शिखरापासून पायापर्यंत वाऱ्यानं एकसारख्या सरकणाऱ्या ढगांच्या चादरींत लपेटले गेले होते. एकाद्या क्षणीं हिमाच्छादित डोंगरशिखर दृष्टीला पडे. डोंगरांना वेढणारे ढग विरळ झाले. तेव्हां भयाण जंगलं, प्रचंड कडे, बर्फाचे पांढरे पट्टे, रात्रीसारख्या काळ्याकुट्ट दऱ्या आणि घळी यांचं कांहीं क्षण आम्हांला दर्शन झालं. पुन्हां ढग जमले आणि त्यांनीं हें दृश्य झाकून टाकलं.

एके दिवशीं आम्ही हे डोंगर ओलांडून थोडे पुढें गेलों. एक प्रचंड काळा ढग त्यांच्या शिखरावर उतरत असतांना आम्हांला दिसला. ढगाच्या मागून येणाऱ्या वादळाचा आवाज कड्याकड्यांतून दुमदुमला. कांहीं क्षणांनीं भोंवताल्चा परिसर झाकोळून गेला, आणि धबधब्यासारखा पाऊस कोसळूं लागला. झऱ्याच्या कांठाशीं असलेल्या एका जुन्या कॉटनवुड वृक्षाखालीं आम्हीं उभे राहिलों. वादळाचा संताप ओसरेपर्यंत आम्ही त्या झाडाच्या आसऱ्यानं होतों.

त्या दिवशीं दुपारीं आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं बॉइलिंग स्प्रिंग क्रीक या नांवानं ओळखल्या जाणाऱ्या झऱ्याच्या कांठानं जात होतों. प्युब्लोच्या किल्ल्यापासून सहा किंवा आठ मैलांच्या अंतरावर आम्हीं दुपारीं थोडा मुक्काम केला

विश्रांति घेऊन झाल्यानंतर आम्हीं पुन्हां प्रवासाला सुरवात केली तेव्हां आम्ही कुठवर आलों आहोंत याची पाहणी करण्यासाठीं आलेल्या घोडेस्वाराचा माग उमटलेला आम्हीं पाहिला. आमचा तळ जिथं होता त्याच्याभोंवती त्या घोडेस्वारानं अर्धवर्तुळ पुरं केल्याच्या खुणा दिसत होत्या. यानंतर तो घोडेस्वार भरधांव वेगानं प्युब्लोच्या किल्ल्याकडे गेला हें देखील त्या उमटलेल्या खुणां- वरून आम्हीं ताडलं. आम्हांला न भेटतां जावं इतका संकोच त्याला कां वाटला हें मात्र कळलं नाहीं. तासभर चालल्यानंतर आम्ही एका कड्याच्या माथ्यावर आलों. इथून आम्हांला मोठं सुखद दृश्य दिसलं. खालीं पसरलेल्या दरींतून अर्कोसास नदी वहात होती. पलीकडे हिरव्या कुरणांत आणि विस्तीर्ण शेतांत गाई चरत होत्या. तिथंच प्युब्लोच्या किल्ल्याच्या मातीच्या भिंती दिसत होत्या.



# २१ | प्युब्लो आणि बेंट

प्युबलोच्या किल्ल्याच्या दरवाजाच्या दिशेनं आम्ही चाललों होतों. हा किल्ला अगदीं जुनाट बांधणीचा, भिकार होता. चौकोनी आवाराभोंवतीं उभारलेल्या मातीच्या भिंती अशीच त्याची बांधणी होती. याहि भिंतींना भेगा गेल्या होत्या आणि त्या मोडकळीला आल्या होत्या. किल्ल्याच्या भोंवतीचं टोकेरी खुंटांचं कुंपण जवळजवळ अर्धं मोडलं होतं. दरवाज्याचे लाकडी सांधे इतके सैल झाले होते कीं दरवाजा उघडल्यानंतर किंवा बंद केल्यानंतर तो तुटून खालीं पडेल कीं काय असंच वाटत होतं. दरवाज्याच्या समोरच्या नदीच्या कांठावर दोनतीन दरिद्री दिसणारे मेक्सिकन उभे होते. त्यांचे वाढलेले केस त्यांच्या

क्रूर दिसणाऱ्या तोंडावर आले होते. त्यांच्या दाढ्या वाढल्या होत्या. आम्हांला येतांना पाहतांच ते नाहींसे झाले. किल्ल्याच्या दरवाजाजवळ आम्ही येतांच आमचा जुना मित्र रिचर्ड आमचं स्वागत करण्यासाठीं बाहेर आला. आमच्याशीं जिव्हाळ्यानं हस्तांदोलन करून तो आम्हांला किल्ल्यांत घेऊन गेला. तिथल्या प्रथेनुसार आमचं स्वागत करण्याची जाबाबदारी त्यानं आपल्यावर घेतली होती. रिचर्ड लारामीच्या किल्ल्यावरून व्यापाराच्या कामासाठीं ताओस इथं चालला होता. प्युबलोच्या किल्ल्यावर तो आला तेव्हां युद्ध चालू असल्यामुळें त्याला पुढं जातां येईना. तो सगळा प्रदेश आपल्या सैन्यानं जिंकल्यानंतरच पुढं जातां येईल हें ओळखून तो प्युबलोच्या किल्ल्यावरच राहिला होता.

सांताफे येथून आणलेल्या त्याच्या मालाच्या गाड्या किल्ल्याच्या आवारांत आम्हांला दिसल्या. कांहीं रेड इंडियन आणि स्पॅनिश बायका आणि कांहीं मेक्सिकन माणसं आवारांत फिरतांना दिसत होतीं. या किल्ल्यासारखींच तीं माणसंहि अवकळा आलेलीं दिसत होतीं. रिचर्ड आम्हांला किल्ल्यांतल्या मुख्य दालनांत घेऊन गेला. मातीच्या लिंपलेल्या भिंतींची ही खोली होती. एक क्रूस, आरसा, मेरीचं चित्र आणि एक पिस्तुल यांनीं ती खोली सजवण्यांत आली होती. खोलींत खुर्च्या नव्हत्या. त्याऐवजीं बरीचशीं कपाटं आणि खोकीं खोलींत मांडून ठेवण्यांत आलीं होतीं. पलीकडच्या बाजूला आणखी एक खोली होती ती इतकी सजवलेली नव्हती. तिथं तीनचार स्पॅनिश मुली, त्यांच्यापैकीं एक देखणी होती, कोपऱ्यांतल्या चुलीवर रोट्या भाजत होत्या. त्यांनीं एक मोठा अंगरखा टेबलक्लॉथसारखा जमिनीवर पसरला. आणि त्याभोंवतीं बसण्यासाठीं गव्याची कातडी ठेवली. जेवण वाढण्यांत आलं. तं जेवण आम्हांला चांगलं ऐषआरामाचं भासलं. आमच्याबरोबर दोनतीन आणखी अमेरिकनहि होते. तुर्की लोक बसतात तसे आम्ही वर्तुळाकार जेवायला बसलों. जेवतां जेवतां आम्हीं एकमेकांना बातम्या विचारत होतों.

रिचर्डनं आम्हांला सांगितलं कीं, तीन आठवड्यापूर्वीं जनरल किर्नीच्या सैन्याची तुकडी बेंटचा किल्ला सोडून सांताफेकडे निघाली होती. घळी ओलांडून हें सैन्य शहराच्या दिशेनं जात असल्याची अगदीं अलिकडची बातमी होती. त्या अमेरिकनांपैकीं एकानं आपल्याजवळचं मळकट वर्तमानपत्र आम्हांला दाखवलं. त्या वर्तमानपत्रांत पालो आल्टो आणि रिसाका द ला पामा इथल्या

ल्ढायांची हकीकत आली होती. आम्ही या बातम्यांवर चर्चा करत असतांना दरवाज्यांत एक उंच हेंगाड्या पायांचा मनुष्य येऊन उभा राहिला. खिशांत हात घालून त्यानं खोलींत प्रवेश करण्यापूर्वी सगळी खोली नीट न्याहाळून घेतली. त्याच्या डोक्याला मोठं बॅंडेज बांधलं होतं. निरीक्षण करून संपल्या-नंतर पाठींत वाकून त्यानं खोलींत प्रवेश केला आणि खोलींतल्या एका छोट्या कपाटावर बसला. त्याच्यामागून त्याच्यासारखींच आठदहा माणसं आलीं. शांतपणें येऊन तीं खोलींत बसलीं आणि आमच्याकडे पाहूं लागलीं. त्यांचा हा प्रकार पाहतांच आम्हांला पूर्वी भेटलेल्या ऑरेगॉनला निघालेल्या प्रवाशांची आठवण झाली. या प्रवाशांसारख्याच आतां या खोलींत आलेल्या लोकांनीहि आमच्यावर प्रश्नांचा भडीमार सुरू केला. डोक्याला बॅंडेज बांधलेला तो मनुष्य कांहीं दिवसांपूर्वी एका दुर्दैवी अपघातांत सांपडला होता. पाणी आणण्यासाठीं तो नदीवर गेला. आजूबाजूला दाट झुडपं होतीं. त्यामुळें झुडपांच्या मागं असलेलं धिप्पाड अस्वल कांहीं त्याला दिसलं नाहीं. तें अस्वल नुकतंच एका गव्यावर ताव मारून भोजनोत्तर विश्रांति घेत झुडपांच्या आडोशाला पडलं होतं. हा मनुष्य तिथं जातांच तें अस्वल आपल्या मागल्या पायांवर उभं राहिलं आणि या माणसाच्या डोक्यावर एक रपाटा ठेवून दिला. त्या रपाट्यासरशीं पंजाच्या नखांनीं या माणसाच्या डोक्यावरची कातडी सोलली गेली. नशीब होतं म्हणून त्याचा डोळा बचावला. भरपूर जेवण झाल्यामुळें तें अस्वल जरा सुस्तच होतं. त्या माणसाचे इतर दोस्त आजूबाजूला होते त्यांनीं आरडाओरड करायला सुरुवात केली. त्यांचे आवाज ऐकून तें अस्वल झुडपं तुडवत शांतपणें निघून गेलं.

खोलींत आलेलीं हीं सगळीं माणसं मॉर्मन संप्रदायाचीं होतीं. इतर प्रवाशांची भीति वाटत असल्यामुळे त्यांचे तांडे पुढं निघून जाईपर्यंत हे सगळे सरहद्दी-वरच थांबले होते. यामुळें ते लारामीच्या किल्ल्यावर इतक्या उशीरा पोचले कीं कॅलिफोर्नियाच्या दिशेनं प्रवास पुढं चालू करणं त्यांना शक्य झालं नाहीं. अर्कासास नदीच्या जवळपास चांगली जमीन आहे असं कळल्यावरून ते रिचर्डबरोबर इथं आले होते. प्युब्लोच्या किल्ल्यापासून अर्धा मैल अंतरावर असलेल्या जागेवर तळ ठोकून हिंवाळा तिथंच काढण्याचा त्यांचा बेत होता.

रिचर्डचा आम्ही निरोप घेतला तेव्हां जवळजवळ सूर्यास्ताची वेळ झाली होती. आम्हीं दरवाजांतून बाहेर आलों आणि नदीच्या प्रवाहाच्या बाजूलाच

असलेल्या एका घळींतलं सुंदर दृश्य पाहूं लागलों. बराच काळपर्यंत वाळवंट आणि डोंगर यांच्याखेरीज फारसं कांहीं न दिसल्यामुळें हें दृश्य आम्हांला विशेषच विलोभनीय वाटलं. उंच झाडांचं जंगल नदीच्या कांठाकाठानं उभं होतं. दोन्ही बाजूंना हिरवीगार कुरणं पसरलीं होतीं. घळीच्या दुतर्फा उभे असलेले उंच कडे ऊन खात पडले होते. एक मेक्सिकन घोडेस्वार गुरांचा कळप किल्ल्याच्या दरवाज्याकडे हाकून नेत होता. हिरव्यागार कुरणांत एका झाडा-खालीं उभारलेला आमचा पांढराशुभ्र तंबू या सगळ्या दृश्याच्या पार्श्वभूमीवर विशेषच खुलून दिसत होता. रिचर्डनं एका मेक्सिकन नोकराला आजूबाजूच्या शेतांतून भाजीपाला आणि धान्य आणण्यासाठीं पाठवलं होतं. प्युब्लोच्या किल्ल्याच्या आसपास असलेल्या शेतांतून काय हवं तें घ्या असं रिचर्डनं आम्हांला सांगितलं होतं. आम्हीं शेतांत जाऊन कांहींहि घेतलं असतं तरी कोणालाच कांहीं विशेष वाटलं नसतं. याचं कारण शेतावर एक मोठी धाड येण्याची वाट हीं माणसं पहात होतीं. दरवर्षी शेतं पिकण्याची वेळ आली कीं अक्षरशः हजारों आरापाहो रेड इंडियन प्युब्लोच्या किल्ल्याच्या आसपास तळ ठोकून राहतात. किल्ल्यावरची मूठभर गोरीं माणसं रेड इंडियनांच्या एवढ्या मोठ्या संख्येला कसला विरोध करणार? तेव्हां प्राप्त परिस्थितींत सौजन्यच सोईस्कर असं म्हणून ते या रेड इंडियनांचं स्वागत करतात आणि या शेतांतलं तुम्हांला काय लागेल तें घ्या असं या रेड इंडियनांना मोठ्या प्रेमानं सांगतात. हे रेड इंडियन या बोलण्याचा अगदीं शब्दशः अर्थ घेऊन शेतांतून जितकं धान्य घेतां येईल तेवढं घेतात आणि एवढ्यावरच न थांबतां मागाहून आपले घोडेहि शेतांत सोडतात. या रेड इंडियनांच्या दूरदर्शीपणाचा एक उल्लेख या संदर्भात मुद्दाम केला पाहिजे. जे जमीन कसतात त्यांना पुढल्या वर्षी शेती करण्याइतपत उत्साह रहावा यासाठीं उभं पीक कापून न नेतां ते त्यांच्यासाठीं थोडं शिल्लक ठेवतात.

अर्धा तास प्रवास केल्यानंतर मॉर्मन संप्रदायाच्या प्रवासी तांड्याच्या पांढऱ्या गाड्या झाडांच्या बाजूला उभ्या असलेल्या आम्हांला दिसल्या. ओंडक्यांच्या झोपड्या बांधण्यासाठीं कुऱ्हाडीनं झाड तोडण्याचं काम चाललं होतं. आम्ही जवळ येतांच त्या लोकांनीं काम थांबवलं आणि आमच्याशीं धार्मिक चर्चा करण्यासाठीं ते बाजूच्या लाकडांच्या ओंडक्यावर येऊन बसले. इतर संप्रदायाचे लोक आपल्याशीं किती वाईट वागतात, न्यॉव्हू इथलं आपलं देऊळ कसं

गेलं इत्यादि गोष्टी सांगत त्यांनीं आपलं रडगाणं सुरू केलं. त्यांच्याबरोबर अर्धा तास घालवून आम्ही आमच्या तंबूतळावर परतलों. हे संप्रदायांध मॉर्मन लोक सरहद्द विभाग सोडून गेले हें फार बरं झालं असं आम्हांला वाटलं.


दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्युब्लोचा परिसर सोडून आम्ही बेंटच्या किल्ल्याकडे निघालों. अलीअलीकडे रेमंडची वर्तणूक फारच बिघडत चालल्याचं आमच्या लक्षांत आलं होतं. तेव्हां प्युब्लोला येतांच आम्हीं त्याला रजा देऊन टाकली. आतां आम्ही चौघंच उरलों होतों. पुढं कोणत्या वाटेनं कसं जावं हें आमचं अजून निश्चित होत नव्हतं. बेंटच्या किल्ल्यापासून तो थेट सरहद्द विभागापर्यंतचं अंतर सहाशें मैलांचं होतं. सध्यां या विभागांतलं वातावरण फार तापलेलं होतं. जनरल किर्नीचं सैन्य इथून गेल्यानंतर पॉनी आणि कॅमॉश जमातीचे बरेचसे चिडलेले लोक या विभागांत जमले होते. हळूहळू या प्रक्षुब्ध रेड इंडियनांची संख्या आणि धारिष्ट्य इतकं वाढलं कीं बेंटच्या किल्ल्यापासून सरहद्दीकडे निघालेलं प्रवाशांचं कुठलंहि पथक या झळींतून सुटलं नाहीं. या काळांतल्या वर्तमानपत्रांत यासंबंधीं अनेक बातम्या येत. बरीचशीं माणसं ठार मारलीं गेलीं. कितीतरी घोडे आणि खेचरं त्यांनीं पळवून नेले.

कांहीं दिवसांआधींच मला एक मनुष्य भेटला होता. तो उन्हाळ्यांत सांताफेवरून बेंटच्या किल्ल्यावर आला होता. इथं त्याला सत्तर प्रवाशांचा एक ताफा भेटला. हे सगळे प्रवासी लष्करी मदतीशिवाय एकटं जाणं शक्य नाहीं म्हणून घाबरून तिथंच थांबले होते. या गोष्टीवरून त्या प्रवशांचा आत्यंतिक भितरेपणा दिसून येतो हें खरं, परंतु त्याचबरोबर एकूण परिस्थिति कशी होती याचाहि अंदाज येतो. आम्हीं ऑगस्ट महिन्यांत तिथं असतांना परिस्थिति इतकी चिघळलेली नव्हती. अर्धा हिंवाळा होईपर्यंत जरी आम्ही थांबलों तरी आम्हांला सोबत मिळणार नाहीं हें आम्ही ओळखून होतों. सबलिट आणि त्याच्याबरोबरचे इतर कांहीं लोक आमच्याबरोबर येतील असं आम्ही धरून चाललों होतों परंतु ते अगोदरच बेंटच्या किल्ल्याकडे निघून गेल्याचं रिचर्डनं सांगितलं. अजूनपर्यंत दैवानं आम्हांला साथ दिली होती. नशिबाची अशी कृपादृष्टि आहे तोपर्यंत हा प्रवास उरकून घ्यावा असं आम्हांला वाटलं. कोणीहि बरोबर नसलं तरी मी, हेन्री, डेस्लॉरिअर्स आणि शॉ अशा चौघांनीं निघायचं आणि वाटेंत रेड इंडियनांचा धोका निर्माण झालाच तर जितकं होईल तितकं त्याला तोंड द्यायचं आम्हीं ठरवलं. प्युब्लोच्या नदीपासून

पंचाहत्तर मैल पुढं असलेल्या नदीच्या कांठावर बेंटचा किल्ला उभा आहे. तिसऱ्या दिवशीं दुपारीं आम्ही किल्ल्यापासून तीनचार मैलांच्या अंतरावर जाऊन पोंचलों. एका झाडाखालीं आम्हीं तंबू ठोकले. फांद्यांना आरसे लावून जमेल तितकं प्रसाधन करून घेतलं आणि असे टापटीप होऊन आम्ही किल्ल्याच्या दिशेनं निघालों. जनरल किर्नीचं घोडदळ इथून गेल्यामुळें त्यांच्या घोड्यांनीं खाल्लेलं आजूबाजूचं गवत तिथं टोळधाड येऊन गेल्यासारखं दिसत होतं. आम्ही किल्ल्यावर जाऊन पोचतांच गवताच्या बाबतींत जे घोड्यांनीं केलं होतं तेंच सैनिकांनीं किल्ल्याच्या कोठारांतल्या बाबतींत केलेलं आढळलं. त्यामुळें घरच्या दिशेनं चाललेल्या या आमच्या प्रवासांत ज्या कांहीं आवश्यक वस्तू आम्हांला घ्यायच्या होत्या त्यादेखील महत्प्रयासानं आम्हांला मिळवाव्या लागल्या. सैन्य किल्ल्यावर असेपर्यंत तिथलं वातावरण गजबजलेलं होतं. परंतु सैन्य निघून जातांच सुस्त शांततेचं वातावरण तिथं पसरलं. हवा उष्ण होती. किल्ल्याच्या आवारांत जखमी झालेले अधिकारी आणि सैनिक फिरत होते. किल्ल्यावरचे धनी तिथं नव्हते. होल्ट नांवाचा एक मनुष्य किल्ल्याचा तात्पुरता प्रमुख होता. त्यानं आमचं स्वागत केलं. होल्टनं आम्हांला जेवायला बोलावलं. या जेवणासाठीं पांढरं कापड पसरलेलं टेबल आणि सभोंवताली खुर्च्या असा थाट पाहतांच आम्हांला आश्चर्य वाटलं. या अनपेक्षित मेजवानीचा समाचार घेऊन आम्हीं आमच्या तळावर परतलों.

आम्हीं धूम्रपान करत बसलों होतों. संध्याकाळच्या अंधुक प्रकाशांत किल्ल्यावरून तीन माणसं आमच्या दिशेनं घोड्यावरून येत असलेलीं दिसलीं. सगळ्यांत पुढें असलेला स्वार उंच आणि बळकट बांध्याचा होता. त्याच्याकडे पाहातांच त्याच्याविषयीं विश्वास वाटावा असा त्याचा चेहेरा होता. दुसरा मनुष्य दिसायला तरतरीत आणि थोडा रंगेल दिसत होता. त्याची उंची सव्वापांच फूट असावी. मेक्सिकनांसारखा त्याचा चेहेरा रापलेला होता. त्याची कुरळी दाढी वाढली होती. त्यानं आपल्या डोक्याभोंवती एक रुमाल बांधला होता. तिसरा मनुष्यहि चांगला उंचापुरा आणि बळकट होता. त्याच्या चेहेऱ्याकडे पाहतांच एक प्रकारच्या असहाय्यतेची, मंदपणाची जाणीव होई. त्याच्याजवळ एक अमेरिकन बंदुक होती. इतकं चांगलं हत्यार असूनसुद्धां त्याला त्याचा नेम कधींच नीट लागला नाहीं. पहिले दोघे कॅलिफोर्नियाहून बरेच घोडे घेऊन आले होते. ते त्यांनीं बेंटच्या किल्ल्यावर विकले. त्या

तिघांतल्या सर्वांत जो उंच होता त्याचं नांव होतं मन्‌रो. तो मनमोकळा, दिलदार आणि हुशार होता. दुसऱ्या माणसाचं नांव होतं जिम गर्ने. तो बोस्टनचा खलाशी होता. या प्रवासांत त्याला डोंगराळ प्रदेशाचा उत्तम सराव झाला होता. खलाशी असूनहि त्याला घोडा उत्कृष्ट हाताळतां येत होता. तिसऱ्या माणसाचं नांव होतं एलिस. तो मिसुरीचा होता. ऑरेगॉनला निघालेल्या प्रवासी तांड्याबरोबर तो आला होता. ब्रिजरच्या किल्ल्यापर्यंत तो आला आणि त्याला घरची फारच आठवण होऊं लागली. घरची आठवण म्हणजे बायकोची आठवण असं जिमनं ठासून सांगितलं. तेव्हां त्यानं घरींच जायचं ठरवलं. आम्हांला भेटतांच त्या तिघांनीं आमच्याबरोबरच निघावं असा निर्णय घेतला. जिम आणि मन्‌रो हे दोघे प्रथमदर्शनींच आम्हांला आवडले होते. तेव्हां आम्हीं ही योजना तत्काळ मान्य केली. किल्ल्यापासून सहा मैल अंतरावर दुसरे दिवशीं संध्याकाळीं एका ठिकाणीं भेटायचं असं आम्हीं सर्वांनीं ठरवलं. आम्हीं धूम्रपान केलं. मग या दोस्तांनीं आमचा निरोप घेतला आणि आम्हीं झोपायला गेलों.



## २२ | टिटे रूज : एक वल्ली

दुसरे दिवशीं सकाळीं गाडी घेऊन डेस्लॉरिअर्सला जिथं आम्ही सगळे भेटणार होतों तिथं पाठवलं; आणि आम्ही प्रवासाची इतर तयारी करण्यासाठीं किल्ल्यावर आलों. तयारीची कामं उरकलीं आणि कांहीं शिएन् जमातीच्या रेड इंडियनांबरोबर धूम्रपान करीत बसलों. इतक्यांत आमच्या समोरून सैनिकी गणवेष घातलेली एक गंमतीदार व्यक्ति येतांना दिसली. या माणसाचा चेहेरा लहानखोर, वाटोळा होता. त्याच्या डोळ्याभोंवतीं सुरकुत्या पडल्या होत्या. त्यानं डोक्यावर एक लहानशी टोपी घातली होती आणि या टोपींतून त्याचे लाल कुरळे केस त्याच्या डोळ्याभोंवतीच्या सुरकुत्यांवर आले होते. त्या माणसाकडे पाहातांच त्याला गवताळ प्रदेशांतल्या खडतर जीवनाचा कांहींच अनुभव नाहीं, त्याला संवय आहे विलासी आयुष्याची, हें चटकन दिसत होतं. तो आमच्या जवळ आला आणि आम्हीं त्याला आमच्यासोबत सरहद्द

विभागाकडे घेऊन जावं यासाठीं तो आमची आर्जवं करूं लागला. आम्हीं जर नेलं नाहीं तर आपल्याला सगळा हिंवाळा या किल्ल्यावर काढावा लागेल असं तो सांगूं लागला. या माणसाला पाहतांच आमचा ग्रह मुळींच अनुकूल झाला नव्हता. त्यामुळें आम्हीं त्याला नकार दिला. आमचा नकार मिळतांच तो अत्यंत अस्वस्थ चेहेऱ्यानं आमची करुणा भाकूं लागला. शेवटीं एकदां मनांत शंका बाळगून कां होईना पण त्याला 'होय' म्हटलं. त्याचं नांव आमच्या बरोबरच्या फ्रेंच नोकरांना कांहीं उच्चारतां येईना. हेन्रीनं तें उच्चारण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्याला तें झेपलं नाहीं. तेव्हां त्यानं त्याच्या लाल केसांची खूण म्हणून 'टिटे रूज' असं थंडपणें त्याचें नामकरण करून टाकलं. टिटे रूजनं मिसिसिपी नदींतून प्रवास करणाऱ्या एका बोटीवर कारकुनाचं काम केलं होतं; न्याव्हूच्या एका व्यापारी कंपनींत तो एजंट म्हणून राहिला होता. याखेरीज त्यानं इतरहि अनेक उद्योग केले होते. हे सगळे धंदे करत असतांना आपल्याला झेपणार नाहीं इतकी त्यानं आयुष्याची 'चव' घेतली होती. उन्हाळ्यांत हा प्रवास गंमतीचा होईल असं वाटल्यानं सेंट लुईस इथं सैन्यांत भरती झालेल्या स्वयंसेवकांत तो सामील झाला.

टिटे रूज म्हणाला, "आम्हीं तिघं होतों. मी, बिल स्टीफन्स, आणि जॉन हॉपकिन्स. आम्हीं तिघांनीं असं ठरवलं की सैन्यांत भरती व्हावं; विजय मिळाल्यानंतर युद्ध संपलं की आम्हांला सैन्यांतून मोकळं करतील. मग आपला पगार घेऊन मेक्सिकोला जावं. तिथं फार मजा असते असं आम्हीं ऐकलं होतं. तिथून मग व्हेराक्रूजच्या वाटेनं न्युऑरीन्झला जावं असा बेत केला."

टिटे रूजनं असा हा बेत केला खरा, परंतु कोणत्या परिस्थितीशीं सामना द्यावा लागणार याचा त्याला अंदाज नव्हता. मेक्सिकनांशीं लढणं हें त्याला वाटलं होतं तसं सोपं आणि गंमतीचं नव्हतं. टिटे रूज निघाला होता सहलीला. बेंटच्या किल्ल्याकडे सैन्याबरोबर येतांना मेंदूच्या दूषित तापानं तो बिछान्यावर आडवा झाला. त्याला गाडींत घातलं. वाटेवर गाडीला चांगले हिसके गचके बसत होते. बेंटच्या किल्ल्यावर आल्यानंतर आजारी माणसांबरोबर टिटे रूजला तिथंच ठेवून सैन्य पुढं निघून गेलं. बेंटच्या किल्ल्यावर आजारी लोकांसाठीं कांहीं विशेष चांगली सोय नव्हती. एका छोट्या खोलींत टिटे रूज आणि त्याच्यासारखाच ताप येत असलेला दुसरा एक माणूस यांना ठेवण्यांत आलं. या दोघांच्या मधें फक्त एक गव्याचं कातडं अंथरण्यांत आलं होतं. एक

दिवस आड करून असिस्टंट सर्जनच्या हाताखालचा डॉक्टर किल्ल्यावर येऊन त्यांना तपासून जात असे. तो परत जातांना त्या दोघांनाहि जालीम रेचकाचा भला मोठा डोस पाजून जाई. त्याला हें एकच औषध माहीत होतं असं या डॉक्टरच्या तावडींतून वाचलेला टिटे रुज म्हणाला.

टिटे रुज एके दिवशीं सकाळीं जागा झाला आणि पाहतो तर• त्याच्या शेजारच्या अंथरुणावरचा रोगी काचेसारख्या निर्जीव डोळ्यांनीं छताकडे पहात पडलेला. आपला शेजारी मेला आहे हे टिटे रूजला कळलं आणि त्या क्षणीं सैन्यांत भरती झालेला हा स्वयंसेवक बेशुद्ध पडला. पण आश्चर्य असं कीं त्या डॉक्टरचं औषध घेऊनहि टिटे रूज जिवंत राहिला. मेंदूच्या तापामुळें आणि त्या जालीम रेचकामुळें त्याचं मूळचंच दुबळं मन अधिकच दुबळं झालं होतं. आम्हीं जेव्हां किल्ल्यावर आलों तेव्हांहि टिटे रूजचं डोकं धडपणें स्थिरावल्याच्या खुणा कांहीं दिसत नव्हत्या.

टिटे रूजची ही करुण कहाणी ऐकली. परंतु त्याचा तो पोषाख आणि एकूण अवतार इतका हास्यास्पद होता कीं आम्हांला हसूंच आवरेना. सैनिकी गणवेष अंगावर आणि वृत्ती त्या गणवेषाशीं संपूर्ण विशोभित असा त्याचा थाट होता. त्याच्याकडे बंदूक आहे किंवा काय असं आम्हीं त्याला विचारलं. तो म्हणाला, "माझ्याकडे एक होती. पण मी आजारी असतांना ते घेऊन गेले. कदाचित् वाटेंत आपल्याला रेड इंडियन गाठतील तेव्हां तुम्हीं तुमच्याकडचं एक मोठं पिस्तुल मला द्या." त्यानंतर मी त्याला घोडा आहे काय असं विचारलं. हो तर, मोठं उमदं जनावर आहे असं त्यानं सांगतांच आम्हीं त्या घोड्याचं निरीक्षण केलं. त्याचा घोडा मूळचा बऱ्यापैकी असावा. पण सध्यां त्याचे डोळे खोल गेले होते. त्याच्या बरगडीचं प्रत्येक हाड मोजतां येत होतं. टिटे रूज आजारी असतांना बाकीच्या सैनिकांनीं त्याच्या या घोड्याला तोफ ओढायला जोडलं होतं. त्यामुळें घोड्याच्या खांद्याला जखमा होऊन वण पडल्याच्या खुणा दिसत होत्या. हा घोडा बदलून त्याच्या ऐवजीं एकादं खेचर घे असं जेव्हां आम्हीं टिटे रुजला सांगितलं तेव्हां आश्चर्यचकित होऊन तो आमच्याकडे पाहूं लागला. किल्ल्यावरचे लोक टिटे रूजची पीडा घालवायला इतके उत्सुक झाले होते कीं ही पीडा जर जात असेल तर एखादं खेचर गेलं तरी परवडलं असं म्हणून त्यांनीं घोडा बदलून त्याऐवजीं एक बऱ्यापैकीं खेचर दिलं. एका माणसानं गळ्यांत दोरी बांधून तें खेचर पुढं आणलं. खेचराच्या गळ्यांतली

दोरी त्यानं टिटे रुजच्या हातांत दिली. तें खेचर ठिय्या देऊन उभं राहिलं. टिटे रूज लाडेलाडे आर्जवं करून त्या खेचराला पुढं व्हायला सांगूं लागला. खेचर कांहीं हलेना. शेवटीं कांहीं लोकांनीं त्या खेचराला मागून दोनचार गुद्दे लगावले. तसं तें खेचर किल्ल्याच्या पलीकडच्या बाजूला गेलं आणि मघांसारखं पुन्हां उभं राहिलं. आजूबाजूचे लोक मोठमोठ्यानं हंसूं लागले. तेव्हां टिटे रूजनं आपलं सगळं धैर्य एकवटून खेचराच्या गळ्यांतली दोरी जोरानं ओढायला सुरवात केली. हिसके देत देत तें खेचर किल्ल्याच्या दरवाज्याकडेच जाऊं लागलं. हातांत घट्ट दोरा धरलेला टिटे रूज कांहीं गज हेलकावे खात त्या खेचराबरोबर गेला. इतक्यांत त्या खेचरानं जोराचा हिसडा दिला. टिटे रूजनं हातांतली दोरी सोडली. समोरच्या गवताळ माळावर तें खेचर दूरपर्यंत पळालं. शेवटीं एक मेक्सिकन नोकर घोड्यावर बसला आणि त्यानं त्या खेचराला पकडून आणलं.

या प्रदेशांतल्या प्रवासाला आपण कसे लायक आहोंत याचं हें प्रात्यक्षिक दाखवल्यानंतर टिटे रूज प्रवासांत लागणाऱ्या शिध्याच्या तरतुदीसाठीं निघाला. ज्याच्या ताब्यांत शिधावाटप होतं त्या अधिकाऱ्याला टिटे रूजची ब्याद केव्हां एकदां जाते असं झालं होतं. तेव्हां त्यानं आपल्या जवळच्या गंजलेल्या किल्लीनं कोठाराचं कुलूप उघडलं आणि टिटे रूजला चाळीस दिवसांचं राशन दिलं. टिटे रूजनं आपलं राशन डेस्लॉरिअर्सच्या हवालीं केलं.

इतकं सगळं झालं. आतां एखादी बंदूक कुठं मिळाली तर बघ असं आम्हीं टिटे रूजला सांगितलं. टिटे रूजनं बंदुकीसाठीं किल्ल्यावर अनेकांची करुणा भाकली. परंतु त्याच्या प्रयत्नांना कांहीं यश आलं नाहीं. आम्हांलाहि कांहीं त्याचं विशेष वाटलं नाहीं. कारण या सोंगाच्या हातांत जर बंदूक असती तर बंदुकीचा ताप शत्रूंऐवजी खुद्द त्यालाच आणि बरोबर आम्हांलाहि झाला असता. प्रवासाची सगळी तयारी झाल्यानंतर आम्हीं घोड्यावर खोगीरं चढवलीं आणि आतां घोड्यावर स्वार होणार इतक्यांत टिटे रूज एका नव्या अडचणींत सांपडलेला दिसला. तें खेचर सारखं गरगर फिरूं लागलं आणि कांहीं केल्या पाठीवर खोगीर लादूं देईना. थोड्याशा मदतीनंतर खोगीर लादण्याचं काम उरकलं गेलं. अखेर मोठ्या प्रयासानं टिटे रूज खेचरावर स्वार झाले. आतां हे महाशय दौडतदौडत निघून मेक्सिकन लोकांवर दरारा बसवणार होते !

"चल, पुढं चल, चल बाबा, आतां चल." टिटे रूजनं असं बऱ्याच वेळां आर्जव केल्यानंतर तें खेचर मोठ्या कष्टानं आवारांतून किल्ल्याच्या दरवाजाबाहेर आलं. कांहीं वेळापूर्वीचा खेचराचा एकूण अवतार बघून त्याला चाबूक लावण्याची हिंमत कांहीं टिटे रूजला होत नव्हती. शेवटीं एकदांचे आम्हीं निघालों. ज्या ठिकाणीं आम्हीं भेटायचं ठरवलं होतं तिथं डेस्लॉरिअर्स आधींच पोंचला होता. आम्ही पोंचलों आणि मागें वळून पाहिलं तेव्हां कांहीं अंतरावर टिटे रूज आणि त्याचं खेचर आम्हांला दिसलं. खेचरानं आपल्यावरच्या स्वाराचं पाणी जोखलं होतं. तें कांहीं केल्या हलेना. टिटे रूज धमकावण्या देत होता आणि तें खेचर त्याला भीक न घालतां स्वस्थपणें चरत होतं. तेव्हां आम्हीं पुन्हां मागें गेलों आणि त्या खेचराला आमच्याबरोबर आणलं. मनरो, जिम आणि एलिस शेकोटी पेटवून बसले होते. त्यांची खोगीरं, सामान आणि हत्यारं आजूबाजूला पडलीं होतीं. त्यांनीं आपले घोडे बाजूलाच खुंटाला बांधले होते. डेस्लॉरिअर्ससुद्धां आमच्या छोट्या गाडीबरोबर तिथं होता. डेस्लॉरिअर्सनं कॉफीसाठीं आग पेटवली. आम्हीं आमच्या नव्या दोस्तांना कॉफी प्यायला बोलावलं. त्या तिघांपैकीं दोघे त्यांच्या तंबूच्या पलीकडे गेले असतांना पाईप ओढत जिम गर्नी म्हणाला, "आपण एकूण आठजणं आहोंत. आठ कसे, सहाच म्हणायला पाहिजेत. कारण हा एलिस आणि तुमच्याबरोबरचा हा नवा मनुष्य यांना मोजण्यांत कांहीं अर्थच नाहीं. कॅमॉश रेड इंडियनांची जर धाडच आपल्यावर आली तर गोष्ट वेगळी नाहींतर मला वाटतं आपला प्रवास सुरळीत होईल."



# २३ | रेड इंडियनांचा धोका

सरहद्द विभागाकडे जायला आम्हीं २७ ऑगस्टला निघालों. अर्कांसास नदीच्या वरच्या कांठाच्या वाटेनं आमच्याइतकं दरिद्री दिसणारं घोडेस्वारांचं पथक यापूर्वी कधीं गेलं असेल असं मला वाटत नाहीं. वसंतऋतूंत जेव्हां आम्ही सरहद्द विभाग सोडून निघालों तेव्हां आमच्याबरोबर जे बळकट आणि उमदे घोडे घेतले होते त्यापैकीं एकहि शिल्लक उरला नाहीं. त्यांच्याऐवजीं आम्हीं वाटेंत गवताळ प्रदेशांतले खालच्या दर्जाचे घोडे घेतले. गवताळ प्रदेशांतले हे घोडे खेचरांइतकेच काटक आणि कुरूपहि होते. आमच्याबरोबर बरींचशीं भिकार खेचरंहि होतीं. हीं खेचरं खूप काटक असतात. परंतु एवढा मोठा आणि खडतर प्रवास केल्यामुळें आमच्या जवळची बरीचशीं खेचरं टेकीला आलीं होतीं. शिवाय एकाहि खेचराला नाल मारून घेतलेला नसल्यानें त्यांचे पाय भेगाळून सुजले होते.

प्रत्येक घोड्याच्या आणि खेचराच्या मानेभोवतीं गव्याच्या कातडीचा विणलेला दोरा गुंडाळलेला होता. त्यामुळें त्यांच्या सौंदर्यात कसली भर पडणार ? आमची खोगीरं आणि इतर सामान फाटकं तुटकं झालं होतं. आमची शस्त्रंहि गंजलीं होतीं. घोडेस्वारांचा पोषाख या सगळ्या मोडकळीला आलेल्या

सरंजामाला शोभेसा होता. आमच्या सगळ्या पथकांत मी आणि शॉ यांच्याइतका वाईट पोषाख कोणाच्याहि अंगावर नव्हता. पुढच्या बाजूला उघडा असलेला लाल फ्लॅनेलचा शर्ट शॉनं घातला होता. एखाद्या झग्यासारखा हा शर्ट त्यानं कमरेभोंवतीं पट्ट्यासारखा बांधला होता. माझ्यापाशीं दुसरे कसलेच कपडे नसल्यामुळें मी काळविटाच्या कातड्याचा सूट घातला होता. बरेच दिवस वापरल्यामुळें तोहि बराचसा झिरझिरला होता.

एखाद्या भिकाऱ्यांची टोळी जशी निष्काळजीपणें सुखांत जावी तसे आम्हीं अकॉंसास नदीच्या कांठाच्या वाटेनं मजल दरमजल करत चाललों होतों. टिटे रूजच्या कटकटी सारख्या चालू होत्या. त्याला आपलं खेचर कधींच पकडून आणतां येत नसे. खेचरावर खोगीर लादतां येत नसे—कसलीहि गोष्ट त्याला इतरांची मदत घेतल्याशिवाय करतां येत नसे. दररोज कसलं तरी खरं किंवा काल्पनिक दुखणं त्याला येई आणि तो कुरकुर करूं लागे. एखाद्या क्षणीं तो अतिशय दुःखी आणि अस्वस्थ होऊन बसे तर दुसऱ्या क्षणीं त्याच्या उत्साहाला एकदम उधाण येई आणि हंसून, शिव्या घालून आणि गोष्टी सांगून तो आपला हा उत्साह व्यक्त करी. करमणुकीचं इतर कांहीं साधन उरलं नाहीं तेव्हां टिटे रूजला छळून त्याला आम्हीं करमणुकीचा विषय बनवला. त्यानं आम्हाला इतका त्रास दिला होता कीं त्याच्या बदल्यांत ही करमणूक हा बऱ्यापैकीं सौदा होता. दुबळेपणा, तऱ्हेवाईकपणा आणि चांगुलपणा यांचं विचित्र मिश्रण टिटे रूजच्या स्वभावांत झाल्यामुळें आपण सगळ्यांच्या टिंगलीचा विषय झालों आहोंत याचं त्याला बरं वाटे.

टिटे रूज हा खरोखरीच अशा अवतारांत असे कीं चित्रकाराला तो उत्तम विषय झाला असता. खेचराच्या पाठीवर तो बसला होता. कुठल्या तरी किल्ल्यांतल्या दयाळू माणसानं दिलेल्या गव्याच्या कातड्याचा प्रचंड अंगरखा त्यानं घातला होता. हा अंगरखा एवढा मोठा होता कीं टिटे रूजच्या आकाराची दोन माणसं त्यांत सहज मावूं शकली असती. हा अंगरखा टिटे रूजनं कां घेतला होता हें त्याचं त्यालाच माहीत. कितीहि गरम हवा असली तरी टिटे रूज अंगांतून तो अंगरखा काढीत नसे. त्या अंगरख्याला अनेक ठिकाणीं ठिगळं लावलेलीं होतीं आणि त्याचं कातडं इतकं जुनं होतं कीं दरदिवशीं तें नव्या ठिकाणीं फाटे. आपण सैन्यांत भरती झालेले आहोंत हें दाखवण्याकरतां त्यानं एक लहानशी टोपी डोक्यावर अक्कडबाजपणें तिरकी

घातली होती. या टोपींतून त्याच्या लाल कुरळ्या केसांचा झुबका बाहेर आलेला दिसत होता. खोगीरावर बसण्याची त्याची पद्धत त्याच्या पोषाखाला आणि व्यक्तित्वाला शोभेशी होती. एक पाय तो खेचराच्या बाजूला घट्ट रोवून धरत असे आणि दुसरा पंचेचाळीस अंशांचा कोन करून पुढें करत असे. त्याच्या विजारीवर सैन्यांतल्या गणवेषाची लाल फीत होती. आणि या गोष्टीचा त्याला विशेष अभिमान वाटत असे. परंतु ही विजार इतकी आखूड होती कीं त्याचे सगळेच्या सगळे बूट दिसत असत. खोगीराच्या मागें त्यानं आपलं ब्लँकेट सैलपणें गुंडाळून ठेवलं होतं. त्यानं तें एका दोरीनं बांधलं होतं आणि तें सारखं डुगुडुगू हालत असे. दिवसांतून चारपांच वेळांतरी तें खालीं पडायचं. ठराविक मिनिटांनीं आपला पाईप, सुरी, चकमक, तंबाखू यांच्यापैकीं कांहींतरी तो खालीं पाडत असे आणि मग खेचरावरून उतरून ही वस्तू उचलून घेण्यासाठीं त्याची धडपड चालायची. ही धडपड करत असतांना तो अर्थातच इतर स्वारांच्या वाटेंत यायचा. सभ्य भाषेच्या वापराबद्दल आमच्यापैकीं फारसा कुणीच प्रसिद्ध नसल्यामुळें टिटे रूज मधें अडमडला कीं त्याच्यावर शेलक्या शिव्यांचा वर्षाव होई. अशा वेळीं या मानवी जीवनांत अर्थ नाहीं, इतकी असभ्य माणसं आपण कुठं पाहिलीं नाहींत असं टिटे रूज गंभीरपणें जाहीर करी.

बेंटच्या किल्ल्यावरून निघाल्यानंतर एकदोन दिवसांनीं हेन्री एलीसला घेऊन शिकारीला गेला. कांहीं वेळानं ते आम्हांला समोरच्या टेकडीवरून येतांना दिसले. त्यांच्याबरोबर घोडदळाच्या सैनिकांचे तीन घोडे होते. कदाचित् हे घोडे पळून गेले असतील किंवा त्यांनीं सोडूनहि दिले असतील. त्या तिघांपैकी एक बऱ्या अवस्थेंत होता. पण बाकीचे दोघे अगदीच रोडावले होते. आणि लांडग्यांनीं त्यांना अनेक चावे घेतले होते. त्यांतले दोन घोडे आम्हीं सरहद्दीवर घेऊन गेलों आणि एक हेन्रीनं आरापाहो रेड इंडियनांना देऊन त्याच्या बदल्यांत एक उत्तम खेचर पैदा केलं.

यानंतर एक दिवस सोडून दुसऱ्या दिवशीं दुपारीं विश्रांति घेण्यासाठीं म्हणून आम्हीं थांबलों असतांना सांताफेच्या गाड्यांची रांगच्या रांग येतांना आम्हांला दिसली. मॅगॉफिन या व्यापाऱ्याच्या त्या गाड्या होत्या. मॅगॉफिनचा भाऊ आणि इतर कांहीं माणसं आमच्याजवळ येऊन बसलीं. त्यांनीं आम्हांला जी बातमी सांगितली ती कांहीं विशेष चांगली नव्हती. खालीं जाणारी वाट

त्यांच्यामतें फार धोक्याची होती. रात्रीच्या वेळीं त्यांच्या तंबूतळाच्या भोंवती चोर पावलांनीं फिरणारे रेड इंडियन त्यांनीं अनेकदां पाहिले होते. वॅटच्या किल्ल्यावरून आमच्या अगोदर कांहीं आठवडे निघालेल्या प्रवाशांच्या तांड्यावर या रेड इंडियनांनीं हल्ला केला होता. ह्या हल्ल्यांत मॅसेच्युसेट्सचा स्वान नांवाचा एक माणूस ठार झाला होता. स्वानच्या सहकाऱ्यानं त्याचं दफन केलं. परंतु मॅगॉफिन येत असतांना त्याला असं आढळलं कीं रेड इंडियनांनी थडगं उकरून स्वानचं प्रेत बाहेर काढलं आहे. स्वानच्या कवटीवरची केसासकट कातडी कापून नेण्यांत आली होती. लांडग्यांनींहि हें प्रेत नंतर छिन्नविच्छिन्न केलं होतं. या सगळ्या बातम्यांवर उतारा म्हणून त्यांनीं एकच चांगली बातमी सांगितली—ती म्हणजे कांहीं दिवस प्रवास केल्यानंतर असंख्य गवे आम्हांला दिसतील ही होय.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं आम्हीं चालत असतांना दूरवर क्षितिजाकडे गाड्यांची पांढरी छतं आम्हांला दिसलीं. नजरेच्या टप्प्यांत जेव्हां ही रांग आली तेव्हां या गाड्या सांताफेच्या व्यापारी गाड्यांसारख्या ऐटदार नव्हत्या हें आम्हांला दिसलं. भोंगळ दिसणाऱ्या बैलगाड्यांची ही रांग सैन्यासाठीं शिधा आणि इतर सामान घेऊन चालली होती. आम्हीं जवळ जातांच गाड्या थांबल्या आणि गाडीवान आमच्याभोंवती गोळा झाले. त्यांच्यापैकीं बरेचजण हातांतला नांगर नुकताच सोडून आलेले पोरगे होते. सांताफेच्या व्यापाऱ्यांनीं सांगितलेल्या सगळ्या बातम्या आणि माहिती खरी असल्याचं त्यांनीं आम्हांला सांगितलं. दररोज रात्रीं खऱ्या किंवा काल्पनिक रेड इंडियनांवर गोळी झाडण्याचा प्रसंग त्यांच्यावर येत असे. रात्रीच्या वेळीं तंबूतळाच्याभोंवती संशयास्पद रीतीनं वावरणाऱ्या एका रेड इंडियनाला ल्युइंग नांवाच्या केंटकीच्या तरुणानं गोळी घालून ठार केल्याचं त्यांनीं सांगितलं. त्यांच्यापैकीं कांहींजण म्हणाले कीं आम्हीं परत फिरावं हें बरं. इतर कांहीं म्हणाले कीं परत न फिरतां जितक्या लवकर पुढं जातां येईल तेवढं जावं. वेळ गमावूं नये. तीं सगळीं माणसं इतकीं घाबरलेलीं होतीं कीं शांत डोकं ठेवून विचार करणं त्यांना शक्य नव्हतं. त्यामुळें त्यांनीं दिलेल्या सल्ल्याला आम्हीं फारसं महत्त्व दिलं नाहीं. त्यांनीं एक बातमी मात्र महत्त्वाची सांगितली आणि ती म्हणजे नदीच्या खालच्या बाजूला कांहीं अंतरावर आरापाहो रेड इंडियनांची वस्ती तळ ठोकून राहिली आहे ही होय. त्यांच्या मतें गोऱ्या लोकांशी ही वस्ती चांगली वागते. परंतु आम्ही आणि ते लोक यांच्यांत एक महत्त्वाचा फरक होता. एक तर गाड्या घेऊन चाललेल्या लोकांची

संख्या तीस होती आणि त्यांच्याबरोबर बैलगाड्या होत्या. रेड इंडियन लोकांना बैलांची विशेष किंमत नसते. आमची परिस्थिति याच्या अगदी उलट होती. संख्येनं आम्ही होतों मूठभर. आमच्याकडच्या खेचरांचा आणि घोड्यांचा मोह रेड इंडियनांना अर्थातच वाटला असता आणि म्हणून आरापाहोंच्या वस्तीवरचे रेड इंडियन या गाडीवानांशीं चांगले वागले म्हणून आमच्याशीं चांगले वागतील असं धरून चालणं कठीण होतं.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं आम्ही क्षितिजाकडे पाहिलं तेव्हां करवतीच्या दातां-सारखी दंतुर रेषा आम्हांला दिसली. ही रेषा म्हणजे आरापाहोंच्या तंबूंची रांग होती. आरापाहोंच्या या वस्तीवर आम्हीं जाऊन पोंचलों तेव्हां सूर्यास्ताला अजून दोनतीन तास अवकाश होता. नदीपासून कांहीं अंतरावर एका हिरव्यागार कुरणाच्या मध्यभागीं जवळजवळ दोनशें तंबू उभारलेले होते. नदीच्या दोन्हीं कांठांना या रेड इंडियनांची खेचरं आणि घोडे चरत होते. त्यांची संख्या पंधराशेंच्या आसपास असावी. वाटेंत कुठंहि टेकडी नसल्यामुळें किंवा झाडझुडूपदेखील मधें येत नसल्यामुळें हा सगळा जमाव एकदम दिसत होता.

कांहीं रेड इंडियन लोक घोड्यांवर लक्ष ठेवत इथंतिथं फिरत होते. या सगळ्या रेड इंडियनांना पाहतांच टिटे रूजनं डेस्लॉरिअर्सला गाडी थांबवण्याची विनंति केली. गाडींत ठेवलेलं मिलीटरी जाकिट टिटे रूजला अंगांत घालायला हवं होतं. या निमित्तानं इतके दिवस अंगावरून न हलवलेला गव्याच्या कातड्याचा तो प्रचंड अंगरखा त्यानं हलवला. जाकिट अंगांत घातलं. रुबाबांत डोक्यावरची टोपी डाव्या बाजूला कलती केली. खोगीरावर सैनिकाच्या थाटांत तो बसला आणि अर्ध्या तासापुरती कोणीतरी मला बंदुक किंवा पिस्तुल द्या अशी विनंति तो करूं लागला. हा सगळा प्रकार कशासाठीं हें आम्हीं त्याला विचारलं. तेव्हां टिटे रूजनं सांगितलं कीं सैनिकी गणवेष घातलेला मनुष्य पाहिला कीं हे रेड इंडियन लोक थोडे वचकून असतात. आमच्या-बरोबर एक सैनिक आहे ही गोष्ट त्यांच्या मनावर ठसावी यासाठीं टिटे रूजनं हें वेषांतर केलं होतं. ज्या डोंगरप्रदेशांतून हे रेड इंडियन लोक येतात तिथं त्यांना भेटणं आणि त्याऐवजीं अर्कांसास नदीच्या परिसरांत तिथं भेटणं या दोन गोष्टींत फार फरक आहे. इथे आणखी एक गोष्ट आमच्या बाजूची होती. कांहीं दिवसांपूर्वींच जनरल किर्नी आपलं घोडदळ घेऊन इथूनच गेला होता.

गेल्या वर्षीप्रमाणेंच या वर्षींहि त्यानं या रेड इंडियन लोकांना खडसावून सांगितलं होतं कीं कुठल्याहि गोऱ्या माणसाच्या केसाला जरी तुम्हीं धक्का लावलांत तरी मी तुमच्या सगळ्या समाजावरून वरवंटा फिरवीन. जनरल किर्नीनं दिलेल्या धमकीचा धाक अजूनहि या आरोपाहोंच्या मनावर होता आणि त्यामुळें ते चांगलं वागण्याच्या मनस्थितींत होते. शिवाय आम्हीं धोरण म्हणून असंहि ठरवलं कीं आमच्या मनांत त्यांच्याविषयीं कसलाहि संशय नाहीं अशाच अविर्भावानं सरळसरळ त्यांना जाऊन भेटायचं. शॉ, मी आणि हेन्री यांनीं नदी ओलांडून तिथं जायची तयारी केली. आमच्याबरोबरचे इतर लोक रात्र पडण्याच्या अगोदर या रेड इंडियनांच्या तळापासून जितकं दूर जातां येईल तितकं जावं या हेतूनं जलदीनं पुढे गेले. घोड्यावर स्वार होऊन आम्हीं पलीकडच्या कांठाला गेलों. उंच वाढलेल्या गवतांतून वाट काढून जात असतांना जवळच कांहीं अंतरावर बरेच रेड इंडियन जमलेले पाहिले. आम्हीं जवळ जाईपर्यंत त्यांच्यापैकीं एकजण तसाच उभा राहिला. आपल्या सापासारख्या डोळ्यांनीं तिरक्या नजरेनं तो आमच्याकडे पहात होता. कांहीं क्षण मुळींच न बोलतां तो तसाच उभा राहिला: हेन्रीनं खुणांच्या भाषेनं आम्हीं कशासाठीं आलों आहोंत हें त्याला सांगितलं. तेव्हां तो एकहि शब्द न बोलतां वाट दाखवण्यासाठीं आमच्यापुढं झाला. आरापाहो लोकांची भाषा अतिशय कठीण आहे. त्यांच्या भाषेचे कठोर आणि कण्ठ्य उच्चार गोऱ्या लोकांना जमत नाहींत. मॅक्स्वेलसारखा या लोकांबरोबर राहणारा व्यापारी सुद्धां त्यांच्याशीं खुणांच्या भाषेनंच बोलतो. खुणांची ही भाषा गवताळ प्रदेशांतल्या सगळ्या जमातींना समजते. हेन्रीला खुणांची ही भाषा उत्तम येत होती.

आम्हीं वस्तीवर पोंचलों तेव्हां ठिकठिकाणीं गव्याच्या टाकून दिलेल्या मांसाचे ढिगारे आम्हांला दिसले. सगळे तंबू एका वर्तुळांत उभारले होते. डाकोटा रेड इंडियनांचे तंबू आणि या आरापाहो जमातीच्या लोकांचे तंबू यांच्यांत सगळ्या बाबतींत साम्य होतं. एकाच बाबतींत फरक होता आणि तो म्हणजे डाकोटा लोकाचे तंबू कितीतरी अधिक स्वच्छ असत. आम्हाला मार्ग दाखवणाऱ्या त्या माणसानं जमातीच्या प्रमुखाच्या तंबूपाशीं आम्हांला नेलं. वाटेंत आम्हांला बघण्यासाठीं ही गर्दी जमली होती. त्याच वेळीं वस्तीवरच्या कुत्र्यांनीं बेसूर भुंकायला सुरवात केली. जमातीच्या प्रमुखाच्या तंबूपाशीं येतांच

आम्हीं घोड्यावरून खालीं उतरलों. तंबूच्या दाराजवळच आम्हीं बसलों. आमच्या रायफली आम्हीं मांडीवर घेतल्या होत्या आणि तंबूबाहेर उभ्या असलेल्या आमच्या घोड्यांच्या गळ्यांतले दोर आम्हीं हातांत घट्ट धरून ठेवले होते. वस्तीवरच्या त्या प्रमुखानं आमच्याशीं हस्तांदोलन केलं. तो उंच होता. त्याच्या चेहेऱ्यावर क्षुद्रपणाचा भाव होता. त्याच्या अंगावर नाममात्रच कपडे होते. आम्हीं तंबूंत बसतों न बसतों इतक्यांत वस्तीवरची अनेक माणसं आम्हांला पाहण्यासाठीं लोटलीं. आमच्याभोंवतीं रानटी चेहेऱ्याचीं भिंतच्या भिंत उभी राहिली. या सगळ्या गर्दींत ज्याच्यावर माणुसकीच्या औदार्याची छटा उमटली आहे असा एकतरी चेहेरा दिसतो किंवा काय म्हणून मी ती चेहऱ्यांची गर्दी न्याहाळूं लागलों. परंतु लांडग्यासारख्या क्रूर चेहऱ्यांच्या गर्दीत मी शोधत होतों तसा एकहि चेहरा दिसला नाहीं. डाकोटा जमातीच्या रेड इंडियनांची अंगकांती चांगली असे. आरापाहोंची अंगकांती फारच वाईट होती. वस्तीच्या प्रमुखानं एका बाईला हांक मारली. त्या बाईनं लाकडी कटोऱ्यांतून आमच्यापुढं मांस आणून ठेवलं. आश्चर्य असं कीं आम्हांला पाईप देण्यांत आला नाहीं. उपचार म्हणून त्या कटोऱ्यांतील थोडं मांस आम्हीं चाखलं आणि मग मी माझ्या भेटीचं पुडकं उघडलं. तंबाखू सुऱ्या, लाल रंग आणि इतर अनेक वस्तू यांत होत्या. या सगळ्या वस्तू पाहतांच त्या गर्दीच्या आधाशी चेहऱ्यावर हास्य उमटूं लागलं. त्यांचे डोळे चमकूं लागले. या वस्तू आपल्याला मिळाव्यात म्हणून अनेक काटकुळे हात गर्दीतून पुढं झाले.

आरापाहो लोकांची ढाल त्यांच्या समाजांत मूल्यवान वस्तू समजली जाते. घराण्याची ढाल बापापासून मुलाकडे चालत येते. अशी एक ढाल मला हवी होती आणि म्हणून एका जांभळ्या कापडावर तंबाखू आणि एक सुरी ठेवून ढालीच्या मोबदल्यांत या तिन्ही गोष्टी देण्याचं मीं जाहीर केलं. कांहीं वेळानं एक बऱ्यापैकीं ढाल पुढं आणण्यांत आली. ही ढाल घेऊन मी काय करणार हें जाणून घ्यायला सगळेजण उत्सुक होते. त्यांचे शत्रू पॉनी यांच्याशीं लढण्याकरतां मी ही ढाल वापरणार आहे असं हेन्रीनं सांगतांच ते खूष झाले. या खुषींत भेटीच्या वस्तू वाटल्यानंतर अधिकच भर पडली.

माझ्या या भेटीच्या वस्तूंत दाभणांचं एक मोठं पाकीट होतं. आरापाहो जमातींतल्या सुंदरी पाहण्याची माझी इच्छा होती. तेव्हां हेन्रीनं ही दाभणं घेण्यासाठीं वस्तीवरच्यां सर्व बायकांना इथंच बोलवावं असं सुचवलं. कुत्र्यांना

बोलवण्यासाठीं हांक घालावी तशी एका योद्ध्यानं उठून हांक घातली. त्या हांकेसरशी सोळा वर्षांच्या पोरीपासून ऐंशीं वर्षांच्या थेरड्यापर्यंत सगळ्या बाया आमच्या तंबूंत घुसल्या. दांत विचकत, हंसत त्या दाभणांसाठीं हात पसरून आमच्यासमोर उभ्या राहिल्या. त्यांच्या उत्सुकतेमुळें मूळच्या कुरूपतेंत अधिकच भर पडत होती.

इतका वेळ आमच्या घोड्यांच्या गळ्यांतल्या दोऱ्या आम्हीं हातांतच ठेवल्या होत्या. आम्हीं बाहेर येऊन स्वार झालों. गर्दी दुतर्फा उभी राहून आमच्याकडे पाहूं लागली. थोडंसं पुढें गेल्यानंतर माझ्या मनांत एक कल्पना आली. प्रवासांत आम्हांला पॉनी लोक भेटण्याची शक्यता होती. पॉनी आणि आरापाहो यांचं वैर. आरापाहोंचं एकादं युद्धपथक बरोबर घेऊन जावं आणि त्या दोघांची लढाई जुंपली असतांना आपण आरामांत गव्यांची शिकार करावी अशी माझ्या डोक्यांतली ही कल्पना होती. माझी ही कल्पना अतिशय चातुर्याची आहे असं आम्हांला प्रथम वाटलं, परंतु ताबडतोब आमच्या मनांत असाहि विचार आला कीं नदीच्या खालच्या वाटेला गेल्यानंतर पॉनी भेटण्याच्या अगोदर आमच्याबरोबर येणारे आरापाहो योद्धेच आम्हांला लुटतील. या विचारासरशीं माझ्या डोक्यांत आधीं आलेल्या चतुर कल्पनेचा आम्हीं तत्काळ त्याग केला. नदीच्या कांठापाशीं आम्हीं पोंचलों. कांहीं वेळ चालून गेल्यानंतर पलीकडच्या कांठावर आमची छोटी गाडी आम्हांला दिसली. आम्हीं गाडीच्या जवळ पोचलों तेव्हां बरेच रेड इंडियन गाडीच्या बाजूला बसलेले दिसले. भुकेलेल्या गिधाडांसारखे ते दिसत होते. गाडीच्या दुसऱ्या बाजूला सैनिकी गणवेष घातलेला टिटे रूज एका रेड इंडियनाशीं बोलत होता. खुणांची आणि हातवाऱ्यांची भाषा आपल्या उपयोगीं पडत नाहीं असं पाहतांच टिटे रूज कांहीं इंग्रजी शब्द पुन्हां पुन्हां मोठमोठ्यानं उच्चारूं लागला. गणवेष घातलेल्या या माणसाबद्दल तिरस्काराच्या खेरीज त्या रेड इंडियनांच्या डोळ्यांत दुसरी कुठलीहि भावना दिसत नव्हती. काय सांगायचाय तें एकदां लौकर सांगून टाक असं टिटे रूजला आम्हीं बजावलं. दम मिळतांच टिटे रूज गाडीखालीं जाऊन गुपचूप बसला. त्याला पाहण्यासाठीं हेन्री शॅटिलॅं गाडीखालीं वाकला आणि म्हणाला कीं, एक रेड इंडियन हंसत हंसत असलीं दहा माणसं सहज ठार करील.

एकामागून एक हे रेड इंडियन उठले आणि चालूं लागले. हळूहळू दाट काळोख पडला आणि भेसूर आवाजांची सलामी लांडगे देऊं लागले. रेड


इंडियनांनीं शिकार केलेल्या गव्याचं नको असलेलं मांस ते आजूबाजूला फेकून देतात. त्यामुळें वस्तीच्या आजूबाजूच्या परिसरांत या मेजवानीवर ताव मारण्यासाठीं शेंकडों लांडगे जमा होतात. सूर्यास्त झाल्यानंतर भयानक आवाजांत ते कुई घालतात. आमच्या शेकोटीपासून कांहीं अंतरावर फिरत असलेले लांडगे आम्हांला• दिसत होते. या लांडग्यांपासून आम्हांला कसलंच भय नव्हतं. कारण गवताळ प्रदेशांतले हे लांडगे अतिशय भित्रे असतात.

आम्हांला खरं भय वाटत होतं तें कांहीं अंतरावर वस्ती करून राहिलेल्या मानवी लांडग्यांचं. त्या रात्रीं आम्हांपैकीं प्रत्येक जण उशाशीं ठेवलेल्या बंदुकीवर हात ठेवून झोपला होता. आम्ही आमचे घोडे इतक्या जवळ बांधले होते कीं मी झोपलों असतांना एका घोड्याचा पाय सारखा माझ्या अंगावर पडत होता. पहारा ठेवण्याची पद्धत आम्हीं ठेवली नव्हती, परंतु आमच्यापैकीं प्रत्येक मनुष्य जागरूक होता. मी अर्धवट झोपेंत मध्यरात्रीपर्यंत गस्त घालत होतो. कांहीं वेळानं मी येऊन झोपलों. मला गाढ झोप लागली. थोड्या वेळानं मला कोणीतरी खांदे हलवून जागं केलं. मीं वर पाहिलं. टिटे रूजचा पांढराफटक पडलेला चेहेरा आणि विस्फारलेले डोळे आम्हांला दिसले.

मीं विचारलं, "काय, झालं काय ?"

नदीच्या पलीकडच्या कांठाशीं हळूंहळूं सरकत असलेले दोन रेड इंडियन आपण पाहिले नंतर ते जवळ आले आणि आपले दोन घोडे त्यांनीं पळवले असं टिटे रूज म्हणाला. घाबरल्यामुळें आणि ही हकीकत आतिशय विस्कळित-पणें सांगत असल्यामुळें टिटे रूजवर माझा प्रथम विश्वास बसला नाहीं. आणि त्यामुळें इतर लोकांना उठवावं असं मला मुळींच वाटलं नाहीं. पण पुन्हां मनांत विचार आला कीं टिटे रूजनं सांगितलेलं जर खरं असेल तर या बाबतींत लक्ष घालणं आवश्यक आहे. तेव्हां मी अधिक विचार न करतां माझी बंदूक घेतली आणि टिटे रूजनं सांगितलेल्या दिशेनं जवळजवळ तीनशें यार्ड पुढं गेलों. मी अतिशय सावधपणें चाहूल घेत होतों. आजूबाजूला पहात होतों. परंतु उड्या मारत जाणाऱ्या एका लांडग्याशिवाय—आणि रेड इंडियन लांडग्यांचं कांहीं इतकं अनुकरण करणं शक्य नाहीं—मला कुणीहि दिसलं नाहीं. मी परत आलों तेव्हां आमच्या तळावरचे सगळे लोक जागे झालेले दिसले. शॉनं सर्व घोडे बरोबर असल्याचं सांगितलं. टिटे रूजला आम्हीं पुन्हां विचारलं तेव्हां मला आधीं सांगितलेली हकीकत तो अधिकच ठासून सांगूं लागला. तेव्हां जिम

गर्नी चिडून म्हणाला कीं या टिटे रूजचं डोकं ठिकाणावर नाहीं. टिटे रूजनं हा आरोप नाकारला. तेव्हां जिम गर्नीनं आम्हांला सांगितलं कीं तुम्हींच काय तें आतां या बाबतींत ठरवा. या नाजूक बाबीवर मत देण्याचं आम्हीं टाळलं. तेव्हां त्या दोघांचं भांडण अधिकच वाढलं. तेव्हां आम्हीं टिटे रूजला दम देऊन झोपीं जा असं सांगितलं. त्याला मीं बजावून सांगितलं कीं एकच काय पण रेड इंडियनांची सगळी वस्तीच्या वस्ती येतांना दिसली तरी आम्हांला कुणाला उठवायचं नाहीं.



# २४ | गव्यांचा पाठलाग

आम्ही ज्या परिसरांत होतों तिथं असंख्य गवे होते. तेव्हां गव्यांची शिकार कशी करतात याविषयीं मी जर इथं थोडं लिहिलं तर तें औचित्याला सोडून होईल असं मला वाटत नाहीं. गव्याची शिकार करण्याच्या दोन पद्धति आहेत. एक, घोड्यावरून पाठलाग करून केलेली शिकार आणि दुसरी पायीं जाऊन केलेली शिकार. गवा चिडून ज्यावेळीं चाल करतो त्यावेळीं घोड्यावरच्या शिकारींत धोका निर्माण होतो आणि धाडसहि अधिक लागतं. पण तसं नसेल तर फारशा साहसाला यांत वाव नसतो. चांगल्या घोड्यावर बसलेला तरबेज शिकारी कळपांत आपला घोडा घालून पुन्हां पुन्हां आपली बंदुक भरून पांच किंवा सहा गवे सहज मारतो. एकाद्या छोट्या कळपावर हल्ला करण्यांत किंवा एका गव्याला कळपापासून वेगळा काढून त्याचा पाठलाग करण्यांत धोकाहि कमी आणि गंमतहि कमी.

हे गवे पुष्कळ वेळां इतके मठ्ठपणानं आणि आळसावून वागतात कीं त्यांची शिकार करण्यांत गंमत अशी उरतच नाहीं. धीट आणि शिकवलेला घोडा जर असेल तर घोडेस्वार गव्याच्या इतक्या जवळून दौड करतो कीं त्या गव्याच्या अंगाला सहज हात लावतां यावा. जोपर्यंत गवा थकलेला नाहीं, त्याला धाप लागलेली नाहीं, तोपर्यंत असं करण्यांत फारसा धोका नसतो. पण गवा जेव्हां थकतो, त्याची जीभ बाहेर येते, तोंडांतून फेस गळूं लागतो आणि वेगांत धांवणं त्याला शक्य उरत नाहीं तेव्हां मात्र धोका निर्माण होतो. अशा

वेळीं शिकाऱ्यानं सुरक्षित अंतरावर राहणं हेंच चांगलं. कारण शिकाऱ्यानं गोळीं झाडतांच गवा मुसंडी मारून केव्हां त्याच्या अंगावर येईल हें सांगतां येणार नाहीं. गवा अंगावर चालून आला कीं घोडा उडी मारतो. अशावेळीं स्वाराची मांड जर घट्ट नसेल तर तो फेकला जाऊन खलास होण्याची शक्यता असते. परंतु अंगावर चालून जाऊनसुद्धां कांहीं उपयोग नाहीं हें ध्यानांत येतांच गवा पुन्हां पळूं लागतो. अशा वेळीं गोळी जर बरोबर नेम धरून झाडली तर पळतां पळतां तो थांबतो, कांहीं क्षण तसाच उभा राहतो, मग दुडक्या चालीनं किंचित् पुढं जातो आणि मग कोसळून जमिनीवर पडतो.

गव्याच्या शिकारींत माझ्या दृष्टीनं सगळ्यांत मोठी अडचण म्हणजे धावत्या घोड्यावरून बंदुक भरण्याची. बंदुक भरणं सोईचं व्हावं म्हणून कांहीं शिकारी तीनचार गोळ्या तोंडांत धरतात. मग बंदुकीच्या नळींतून दारू भरून आंत तोंडानं गोळी सोडतात. मग खोगीराच्या खुंटावर दस्ता आपटून ती गोळी आंत बसवतात. या प्रकारांतील एक धोका उघड आहे. खोगीराच्या खुंटावर दस्ता आपटून झाल्यानंतर जर खालीं जाऊन गोळीं नीट बसली नाहीं तर बंदुक रोखल्यानंतर घरंगळून गोळी पुढं येते. अशा वेळीं ठांसून भरलेली दारू उडाल्यानंतर तिथं गोळी नसल्यामुळें बंदुकीची नळी फुटण्याची शक्यता असते. अशा वेळीं स्वाराचा हात फाटून जातो, तर कांहीं वेळां याहूनहि भयंकर अपघात घडतात. ही गोष्ट टाळण्यासाठीं कांहीं शिकारी नळींतून ढकललेली गोळीं खालीं नीट बसवण्यासाठीं बरोबर एक काठी वापरतात. अर्थात् यामुळें बंदुक भरण्याची अडचण कमी होत नाहींच. रेड इंडियन लोक गव्याची शिकार करण्यासाठीं धनुष्यबाण वापरतात. बंदुकीपेक्षां धनुष्य अधिक सोईचं असतं. गोरे लोकहि पुष्कळ वेळां धनुष्य वापरतांना दिसतात. शिकार करत असतांना जखमी होऊन हल्ला करणाऱ्या गव्यापेक्षांहि खरा धोका असतो जिथून आपण घोडा चालवतो त्या जमिनीचा. गवताळ प्रदेशांतली जमीन नेहमीं सरळसपाट नसते. पुष्कळ वेळां टेकड्या, घळी, आणि झुडपं यांनीं ती भरलेली असते. पण सगळ्यांत त्रासदायक आणि धोक्याची जर कोणती गोष्ट असेल तर ती कुत्रे आणि लांडगे यांचीं बिळं हीं होय. पुष्कळ वेळां अशा बिळांचं जमिनीवर जणूं कांहीं जाळंच पसरलेलं असतं. गव्याचा पाठलाग करण्याच्या आवेशांत शिकारी बिळांनीं भरलेल्या या जमिनीवरून घोडा दौडवतो. वेगांत असलेल्या घोड्याचा पाय एकाद्या बिळांत जातो आणि

त्याच्या पायाचं हाड मोडतं. या धक्क्यामुळें घोड्याच्या पाठीवरचा स्वार जोरांत पुढं फेकला जातो आणि मृत्यु ओढवतो. पण असं असलं तरी गव्याच्या शिकारींत अपघातांचं प्रमाण फार असतं अशी कल्पना करून घेण्याचं कारण नाहीं. एकाद्या दारू प्यालेल्या माणसासारखी गव्याच्या पाठलागाची शिकाऱ्यांला नशा चढते. या नशेच्या ताकदीवरच तो घळी आणि उतार पार करून जातो. नेहमीच्या मनोवस्थेंत म्हणजे शिकारीची अशी नशा नसतांना तो जर अशा वाटांनीं गेला तर बहुधा न चुकतां आपली मान मोडून घेईल.

घोड्यावरून केलेल्या शिकारीपेक्षां पायीं केलेल्या शिकारीचे अधिक फायदे असतात. पायीं केलेल्या शिकारींत घोडा दुखावला जाण्याची किंवा स्वतःचा जीव धोक्यांत येण्याची शक्यता नसते. पायीं शिकार करतांना शिकारी जागरूक आणि शांत असला पाहिजे. गव्यांची वागण्याची पद्धत त्यानं समजून घेतली पाहिजे. आजूबाजूचा परिसर आणि वाऱ्याची दिशा त्याला ठाऊक असली पाहिजे. आणि रायफल हाताळण्यांत तो कुशल असला पाहिजे. गवा हा एक मोठा विचित्र प्राणी आहे. कांहीं वेळां हे गवे इतके मठ्ठपणें आणि मोहून गेल्यासारखे वागतात कीं शिकारी त्यांच्या कळपांत घुसून त्यानं बरेच गवे मारीपर्यंत इतरांना पळून जावं याचंदेखील भान येत नाहीं. परंतु कांहीं वेळां हेच गवे अतिशय सावधपणें वागतात. अशा वेळीं शिकारी अनुभवी, कुशल असा असावा लागतो. घोड्यावरून गव्याची शिकार करण्यांत किट कार्सन याचा पहिला नंबर लागे. आणि पायीं शिकार करण्यांत हेन्री शॅटिलॉंचा हात कोणीहि धरणार नाहीं.

टिटे रूजनं त्या रात्रीं सर्वांना जागं केल्यानंतर पुन्हां कसली गडबड झाली नाहीं. आरापाहो रेड इंडियनांनीं आम्हांला त्रास देण्याचा कसलाहि प्रयत्न केला नाहीं. आणि तसा प्रयत्न करण्याच्या मार्गावर जरी ते असले तरी आम्ही सगळे जागरूक असल्यामुळें त्याचा हेतु कांहीं साध्य झाला नाहीं. दुसरा दिवस हा शिकारीच्या धांवपळीचा आणि धमालीचा होता. आमच्या पथकांतला सर्वांत पुढें असलेला मनुष्य "गवे! गवे!" असं ओरडला. आम्हीं सगळ्यांनीं पाहिलं तेव्हां समोरच्या घळींत गव्यांचा एक कळप चरत असलेला आम्हांला दिसला. कळप पाहतांच आम्हांला मोह आवरेना. मी आणि शॉ त्यांच्या दिशेनं निघालों. आमचे प्रवासांतले घोडे खरं म्हणजे शिकारीच्या लायकीचे नव्हते. परंतु चाबकानं फटकारून आम्हीं त्या कळपाला गांठलं.

शॉनं एका गव्याला आपल्या रायफलच्या दोन गोळ्यांचा प्रसाद दिला. तो गवा मर्मांतिक वेदनेमुळें संतापून जाऊन शॉवर चाल करून आला. पण प्रत्येक वेळीं शॉचा घोडा उडी मारून बाजूला होई आणि त्या गव्याची मुसंडी फुकट जाई. मीं केलेल्या पाठलागाला जरा वेळ लागला, पण शेवटीं मींहि माझ्या पिस्तुलानं एका गव्याला खालीं लोळवला. मारलेल्या गव्यांच्या॰ शेपट्या विजयचिन्ह म्हणून आम्हीं कापून आमच्याबरोबर घेतल्या. आणि साधारण पंधरा मिनिटांत आम्हीं आमच्या पथकाला येऊन मिळालों.

त्या दिवशीं सकाळीं पुन्हांपुन्हां गवे दिसल्याची आरोळी आमच्यापैकीं कोणीतरी मारी. थोड्याथोड्या वेळानं नदीलगतच्या विस्तीर्ण कुरणांवर गव्यांचे कळप आम्हांला दिसत. आम्ही जवळ येतांच आपलीं केसाळ डोकीं वर करून खुळचट आश्चर्यानं ते आमच्याकडे पहात. आणि मग वांकड्यातिकड्या उड्या मारत रांगेत वाट ओलांडून पलीकडच्या उंचवट्याच्या दिशेनं धांव घेत. दुपारीं आमच्यासभोंवतालच्या परिसरांत अक्षरशः हजारों गवे होते—नर, माद्या, बछडीं सर्व प्रकार. आम्ही जवळ गेलों म्हणजे सगळे जोरांत धांवूं लागत. आणि मग समोरचं मैदान अगदीं क्षितिजापर्यंत काळ्या ठिपक्यांनीं भरून गेल्यासारखं भासे. आमच्या सगळ्या पथकांत अभूतपूर्व उत्साह संचारला होता. नदीच्या जवळच कांहीं झाडं होतीं. दुपारच्या विश्रांतीसाठीं आम्ही तिथं थांबलों.

डेस्लॉरिअर्सनं जेवण तयार करून आम्हांला वाढलं. हरणाच्या मांसाचा बेत होता. पण हरणाच्या मांसाकडे किंचित् तिरस्कारानं पहात शॉ म्हणाला. "उद्यांच्या जेवणासाठीं गव्यांची जीभ आणि बरगड्या." जेवण संपवून आराम करण्यासाठीं म्हणून आम्ही पडलों. इतक्यांत हेन्री शॅटिलॉंनं हांक मारून आम्हांला उठवलं. गाडीच्या चाकावर उभा राहून तो नदीच्या पलीकडच्या मैदानाकडे पहात होता. आम्हींहि त्या दिशेला पाहिलं. ढगाच्या काळ्या सावलीसारखा एक मोठा ठिपका दूरच्या मैदानावरून वेगानं सरकतांना दिसला. दुसरा एक तसाच ठिपका अधिक वेगानं पहिल्या ठिपक्याचा पाठलाग करत होता. आरापाहो जमातींतले शिकारी गव्यांच्या कळपाचा पाठलाग करत होते. मी आणि शॉ उठलों आणि आमच्या उत्तम घोड्यावर खोगीरं चढवलीं. कांठावरची रेती आणि नदीचं पाणी तुडवत आम्ही नदीच्या पलीकडे गेलों.

पण आम्हांला खूपच उशीर झाला होता. आरापाहो शिकारी केव्हांच कळपांत घुसले होते आणि कत्तलीचं काम त्यांनीं संपवलंहि होतं. आम्हीं त्या

स्थळीं पोंचलों तेव्हां शिकार झालेल्या गव्यांचीं धुडं जिकडेतिकडे पडलेलीं दिसत होतीं. गव्यांचा कळप भीतीनं उधळला होता आणि ते रेड इंडियन शिकारी त्याचा पाठलाग करत होते. घायाळ होऊन खालीं पडलेल्या गव्यांकडे त्यांच्यापैकीं कांहीं शिकारी थांबले होते. आदल्या दिवशीं भेटलेला आरापाहो वस्तीवरचा प्रमुख मला या थांबलेल्या शिकाऱ्यांत दिसला. गव्याची एक मादी त्यानं मारलेले पांचसहा बाण शरीरांत घुसून जमिनीवर पडली होती. तिच्या शेजारीं वस्तीचा हा प्रमुख उभा होता. शिकारीला त्याच्याबरोबर आलेली त्याची बायको त्याला भांड्यांतून पाणी पाजत होती. आम्ही नदी ओलांडून परत आलों. आमचं पथक पुढं निघालं होतं, त्यांना आम्हीं गाठलं. आम्ही एक मैल पुढं गेलों असूं नसूं इतक्यांत नदीच्या कांठीं गव्यांचा मोठा कळपच्या कळप आम्हांला दिसला. जवळजवळ पाव मैलाचा परिसर त्यांनीं व्यापला होता. ते इतक्या दाटीवाटीनं उभे होते कीं त्यांच्या एकत्र आलेल्या काळ्या पाठींची कृष्णभूमि तयार झाल्यासारखी वाटत होती. कांहीं ठिकाणीं गवे जमिनीवर लोळत होते आणि त्यामुळें धुळीचे छोटे लोट वर उठत होते. कुठेंकुठें गव्यांची झुंजहि चालूं होती. त्यांच्या घोगऱ्या हुंबरण्याचा आणि शिंगं आपटण्याचा आवाज ऐकूं येत होता. शॉ आणि हेन्री आमच्यापुढं होते. इतक्यांत हेन्रीनं चामड्याचं आवरण बाजूला करून बंदूक सरसावल्याचं मीं पाहिलं. गव्यांच्या कळपाचं असं दृश्य समोर असतांना याशिवाय दुसरा कसलाच विचार करणं शक्य नव्हतं. सकाळीं मी पिस्तुलांचा उपयोग करून शिकार केली होती. आतां बंदुकीनं शिकार कशी काय जमते तें पाहावं असं माझ्या मनांत आलं. डेस्लॉरिअर्सकडे बंदुक होती. गाडीच्या छताखालीं तोंडांतला पाईप दांताखालीं चावत तो उत्तेजित होऊन बसला होता.

"डेस्लॉरिअर्स, मला तुझी बंदुक दे."

खेचराला थांबविण्यासाठीं डेस्लॉरिअर्सनं जरा जोर लावला. तें खेचर हट्टीपणानं पुढं जाण्याचा प्रयत्न करत होतं. मग थोड्या वेळानं डेस्लॉरिअर्स सरपटत गाडींत गेला. गाडीच्या छताच्या बाहेर फक्त त्याचे जोडे दिसूं लागले. गाडींतल्या सामानाची उसकाउसकी करून त्यानं बंदूक ओढून काढली.

"बंदुक भरलेली आहे का?" मीं विचारलं.

"होय धनी, तुम्हीं बरोबर गवा टिपाल बघा यानं." डेस्लॉरिअर्स म्हणाला. मी त्याच्याकडे माझी रायफल दिली. आणि बंदुक घेऊन शॉकडे गेलों.

"झाली का तयारी?" शॉनं विचारलं.

"होय, निघूं या." मी म्हणालों.

"त्या घळींतून जा म्हणजे त्या कळपाच्या अगदीं जवळ जाईपर्यंत तुम्ही त्यांना दिसूं शकणार नाहीं." हेन्री म्हणाला. आम्ही त्या घळींतून पुढं आलों. कांहीं वेळानं आमची चाहूल लागतांच आमचा रोख ज्या जागेवर होता त्या जागेपासून ते गवे दूर पळूं लागले. गवे पळाल्यामुळें कळपाच्या मध्यभागीं जागा तयार झाली. आम्ही त्या जागेवर गेलों. अजूनहि आमचे उत्तेजित झालेले घोडे आवरलेले होते. क्षणाक्षणाला गलबला वाढत होता. आमच्या सभोंवतालीं झुंडीझुंडीनं गवे पळत होते. स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव नसलेले ते शेंकडों गवे दोन घोडेस्वारांना बघून भयानं जीव घेऊन पळत होते. आतां अधिक काळ शांत रहाणं शक्य नव्हतं. शॉ मला म्हणाला, "तूं डाव्या बाजूनं हल्ला कर. मी समोरून घोडा घालतो." असं म्हणून कांहीं क्षणांतच शॉ दिसेनासा झाला. माझ्या मनगटाला मी एक जाडजूड चाबूक बांधून ठेवलेला होता. माझ्या हातांतली सगळी शक्ति एकवटून मी माझ्या घोड्याला चाबकाचा फटका मारला. कांहीं क्षणानं माझ्यासमोर धुळीच्या प्रचंड ढगाखेरीज मला कांहींहि दिसेना. या धुळीच्या ढगामागं शेंकडो गवे आहेत हें मला माहीत होतं. थोड्याच वेळांत मी त्या धुळीच्या ढगाच्या मध्यावर आलो. धुळीनं मी अगदीं गुदमरून गेलों आणि उधळलेल्या कळपांच्या खुरांच्या आवाजानं माझ्या कानठळ्या बसल्या. परंतु शिकारीची मला नशा चढली होती. गव्यांखेरीज मला दुसरं कांहींहि सुचत नव्हतं. कांहीं वेळानं धुळींतून गव्यांची एक काळी झुंड मला दिसली. शेपट्या उभारून ते पळत होते. मी त्यांच्या इतका जवळ आलों कीं बंदुक लांबवून मी त्यांना सहज स्पर्श करूं शकत होतो. इतक्यांत मला त्या गव्यांचे खूर झटक्यानं हवेंत झाडलेले दिसले. क्षणभर ते गवे जमिनींत बुडाल्यासारखे वाटूं लागले. तो क्षण माझ्या डोळ्यांसमोर तसाच्या तसा उभा आहे. मी आणि तो कळप नकळत एका घळींत आलों होतों. परत येतांना जेव्हां मी अंदाज घेतला तेव्हां ती घळ बारा फूट खोल आणि तळाशीं खोलीच्या जवळजवळ दुप्पट रुंद होती. या घळींत थांबावं असं मला वाटलं. पण थांबणं शक्य नव्हतं. कारण कलत आणि पुढं झुकत झुकत माझी घोडी पुढं जात होती. घळीच्या तळाशी असलेल्या रेतीवर येतांच ती गुडघे वाकवून बसली. मीं पुढं झुकून तिच्या मानेला डोकं टेकवलं. घळींत भराभर उड्या मारणाऱ्या

गव्यांचा एकच कोलाहल माजला होता. क्षणार्धांत गुडघे टेकून बसलेली माझी घोडी उभी राहिली आणि घळीच्या दुसऱ्या बाजूनं मांजरासारखी वर चढूं लागली. एक क्षणभर मला वाटलं कीं आतां ही पडून मलाहि चिरडून टाकील. परंतु मोठ्या प्रयासानं ती वर चढली आणि घळीवरच्या कठीण जमिनीच्या माळावर आली. शेवटीं एकदां पुन्हां मी सगळ्या गव्यांच्या कळपानं वेढला गेलों. माद्या पुढं धांवत होत्या. आणि गवे त्यांच्या संरक्षणासाठीं मागं रहात. मी जवळून जाऊं लागलों कीं हे गवे माझ्या घोड्याला शिंगांनीं भोसकण्याचा प्रयत्न करत. परंतु ते स्वतः वेगांत धांवत असल्यानं त्यांच्या या हल्ल्यांत जोर नसे. शिवाय माझी घोडी पॉलीन अधिक वेगांत धांवत असल्यामुळें ते गवे मागेंहि पडत. मी बारकाईनं न्याहाळून मला हवी होती तशी मादी शोधून काढली. तिच्याजवळ जाऊन खांद्यापाशीं मी गोळी झाडली. गोळी लागतांच गव्याची ती मादी उलटली आणि विजेसारखी पॉलीनवर चाल करून आली. पॉलीननं तो हल्ला चुकवला. पण इतक्या त्या गोंधळांत त्या सगळ्या झुंडींत ती जखमी मादी कुठं दिसेनाशीच झाली. तेव्हां मी दुसरी एक मादी पाहिली आणि तिच्यावर एकामागून एक दोन्ही पिस्तुलं झाडलीं. कांहीं वेळ या जखमी झालेल्या मादीवर माझं लक्ष होतं पण मी बंदुक भरूं लागलों, आणि या प्रयत्नांत मी असतांना जखमी झालेलं माझं हें दुसरं सावजहि त्या गर्दींत दिसेनासं झालं. सगळी झुंड पुढं धांवत होती. धुळीचा लोट थोडासा दबल्यानंतर कळपाच्या मागं एक मादी अवजडपणें धांवत असलेली मला दिसली. मी पॉलीनचा वेग वाढवला आणि त्या मागं राहिलेल्या मादीला गाठलं. माझीं पिस्तुलं रिकामी झालीं होतीं. बंदुकींतहि गोळ्या नव्हत्या. माझ्याकडे रायफलच्या कांहीं गोळ्या होत्या पण त्या पिस्तुलांच्या मानानं मोठ्या आणि बंदुकीच्या मानानं लहान होत्या. पण तरीहि मी बंदुकींत दारू ठांसली आणि त्यांत गोळी घालून बंदुक झाडली. परंतु बंदुकीच्या मानानं गोळी लहान असल्यानं ती घरंगळत पुढं आली आणि ठांसलेल्या दारूचा फटाक्यासारखा स्फोट झाला. मी त्या मादीच्या पुढं गेलों आणि तिला मागं वळवण्याचा प्रयत्न केला. परंतु तिनं माझ्यावर संतापून चाल केली. मी तिच्यापुढं गेलों, कीं ती माझ्यावर पुन्हां चाल करून येई. आतां पॉलीनला चेव आला होता. गव्याच्या मादीनं केलेला हल्ला ती शिताफीनं चुकवत असे, शेवटीं थकल्यामुळें ती मादी उभी राहिली, तिची जीभ बाहेर लोंबूं लागली. मी थोडासा पुढें गेलों

आणि पॉलीनवरून खालीं उतरलों. गोळी घसरूं नये यासाठीं गवताची गोळी करून आंत भरावी असं मला वाटलं. मी जमिनीवरून खालीं उतरलों इतक्यांत ती मादी माझ्यावर वेगानं चाल करून आली. मी उडी मारून विलक्षण त्वरेनं पॉलीनवर स्वार झालों. मी माझी सुरी बाहेर काढली आणि त्या मादीवर जवळ जाऊन वार करूं लागलो. मी असं करत असतांना तिच्या शिंगांनीं ती एकदां तर पॉलीनला अगदीं भोसकणार होती. शेवटीं मी माझ्या कुडत्याला आणि विजारीला लावलेली चामड्याची झालर तोडली आणि या झालरीचा गोळा करून गोळी घरंगळूं नये म्हणून तो बंदुकींत घातला. शेवटीं एकदां मी गोळी झाडली आणि ती गोळी त्या मादीच्या काळजांतून आरपार गेली. ती मादी जमिनीवर कोसळली. मी जवळ गेलों तेव्हां मला आश्चर्य वाटलं कारण मी समजत होतों त्याप्रमाणें ती मादी नसून तो साधारण एक वर्ष वयाचा नर होता. त्यानं इतका प्रखर लढा कसा दिला हें मला तेव्हां कळलं. मी त्या गव्याचा जबडा उघडला आणि त्याची जीभ कापून खोगीराच्या मागें बांधली. नराला मादी समजण्याचा हा घोटाळा धुळीच्या ढगामुळें झाला होता. धुळीच्या ढगांतून कळपाचा पाठलाग करतांना माझ्यापेक्षा अधिक अनुभवी अशा शिकाऱ्याचीहि हीच चूक होऊं शकेल.

माझी ही शिकार झाल्यानंतर मी स्वस्थपणें जरा आजूबाजूला पाहिलं. समोरच्या मैदानावर गव्यांची काळी झुंड धावत जातांना दिसत होती. अर्कांसास नदींत तीनचार मैल दूर नदीच्या दिशेनं मी निघालों. बऱ्याच वेळानं दूरवर मला आमची गाडी आणि तिच्यामागून जाणारे घोडेस्वारांचे ठिपके दिसले. आणखी थोडं अंतर काटल्यानंतर शॉचा लाल फ्लॅनेलचा शर्ट मला ओळखूं आला. थोड्या वेळानं मी त्यांना गांठलं. शॉच्या शिकारीची हकीगत मीं विचारली. त्यानं एका पुष्ट मादीवर दोन गोळ्या झाडल्या होत्या. त्या दिवशीं मी किंवा शॉ कोणीच शिकारीच्या अशा तयारीनं न गेल्यामुळें शॉजवळ दोन गोळ्या संपल्यानंतर गोळींच उरली नाहीं. तेव्हां त्यानं त्या जखमी जनावराच्या पाठलागाचं काम हेन्रीवर सोपवलं. हेन्री पुढं झाला आणि त्यानं आपल्या रायफलनं त्या सावजाचा निकाल लावला. घोड्यावर मांस लादून तो परत आला.

नदीच्या जवळच आम्हीं आमचा तळ ठोकला. ती रात्र दाट काळोखी होती. आम्ही झोपायला गेलों तेव्हां किनाऱ्यावर समुद्राच्या लाटा आदळाव्या तसा लांडग्यांचा आणि गव्यांचा मिसळलेला आवाज आमच्या कानीं येत होता.



# २५ | आणखी शिकार

आमच्या पथकांत जिम गर्नीइतका उद्योगी जसा कुणी नव्हता त्याप्रमाणें एल्सिच्या अर्ध्यानेंहि कोणी आळशी नव्हता. जिम आणि एल्सि यांच्यांत तेढ होती. जिम सूर्योदयापूर्वी जागा व्हायचा आणि उठून कामाला लागायचा. एल्सि इतरांनीं त्याला उठणं भाग पाडल्याखेरीज अंथरुणांतून हलायला तयार नसायचा. नेहमीप्रमाणें त्या दिवशीं सकाळींहि जिमच्या आवाजामुळें आम्हांला सगळ्यांना जाग आली.

"ए रडोबा, उठ आतां. खाणं आणि झोपणं या खेरीज दुसरं कांहीहि करण्याची तुझी लायकी नाहीं. आतां तुझी कुरकुर थांबव आणि पांघरुणाबाहेर ये; नाहींतर तुझं पांघरूण मी ओढून बाजूला करीन." जिमच्या प्रत्येक वाक्याच्या शेवटीं अनेक शिव्या येत असल्यामुळें त्या वाक्यांच्या जोरांत भर पडत असे. आपल्या पांघरुणांतून एल्सि गेंगाण्या आवाजांत कांहींतरी बोलला. पांघरूण बाजूला करून हळूंहळूं तो उठून बसला. मग त्यानं हात लांब करून एक भेसुर जांभई दिली. आणि शेवटीं एकदां चारी दिशांना टकाटका बघत तो

उभा राहिला. थोड्याच वेळांत डेस्लॉरिअर्सनं आग पेटवली. घोडे आणि खेचरं यांना जवळच्या कुरणावर चरण्यासाठीं मोकळं करण्यांत आलं. पहांटेच्या अंधुक प्रकाशांत आम्ही न्याहरी करायला बसलों. सूर्य उगवल्यानंतर आम्हीं स्वार होऊन प्रवासाला सुरवात केली. कांहीं वेळ चालून झाल्यानंतर मनूरो एकदम ओरडला, "तो पहा पांढरा गवा!"

शॉ म्हणाला, "माझा घोडा थकून मेला तरी चालेल, मी त्या गव्याला गाठणार." बंदुकीचं चामड्याचं आवरण काढून त्यानं डेस्लॉरिकडे फेकलं आणि घोडा भरधांव सोडून शॉ मनरोनं दाखवलेल्या पांढऱ्या गव्याच्या दिशेनं निघाला. हेन्री त्याला मोठ्यानं ओरडून सांगत होता, "शॉ, थांब, जाऊं नको. तो पांढरा गवा नसून साधा बैल आहे. निष्कारण घोड्याला थकवशील." पण एव्हांना शॉ इतका दूर गेला होता कीं हेन्रीचे शब्द त्याला ऐकूं येणं शक्य नव्हतं. सरकारी सामान घेऊन जाणाऱ्या गाड्यांच्या तांड्यांतला तो मागं राहिलेला बैल होता. परंतु तो बैल उभा होता त्यापासून नजिकच्याच अंतरावर एक गव्यांचा कळप चरत होता. पांढऱ्या गव्याला गांठण्यासाठीं शॉ तिथं जातांच हा गव्यांचा कळप घाबरून पळत सुटला आणि टेकडीवरून पलीकडच्या उंचवट्याच्या माळावर जाण्यासाठीं धडपडत चढूं लागला. ही धडपड करत असतांना त्या गव्यांपैकीं एक पाय घसरून खालीं असलेल्या मोठ्या दलदलींत पडला. एव्हांना आम्ही सगळे तिथं जाऊन पोंचलों होतों. त्या गव्याचं प्रचंड धूड चिखलांत जवळजवळ अर्धं रुतलं होतं. चिखल त्याच्या हनुवटी-पर्यंत आला होता आणि त्याची केसाळ आयाळ चिखलाच्या पृष्ठ भागावर पसरली होती. जितकी अधिक धडपड करी तितका तो गवा आणखी बुडूं लागे. आम्ही मागं जाऊन त्याची शेपटी पिरगाळून त्याला वर काढण्याचा प्रयत्न करत होतो. पण याचा कांहींहि उपयोग नव्हता. त्याच्या नाकपुडी-पर्यंत चिखल आला होता. शेवटीं आपण खलास होणार हें त्या गव्यानं ओळखलं. क्षुब्ध डोळ्यांनीं तो आम्हांकडे पाहूं लागला. इतक्यांत एलिस खालीं उतरला, त्यानं त्या गव्यावर गोळी झाडली आणि एकाद्या यशस्वी शिकाऱ्याच्या अभिनिवेशानं तो घोड्यावर स्वार झाला. या सगळ्या प्रवासांत एलिसच्या बंदुकीच्या गोळीनं चाखलेलें तें पहिलं आणि शेवटचं रक्त होतं.

दुपारपर्यंत आमचा प्रवास चालूं होता. दुपारीं आम्हीं अर्कांसास नदीच्या काठाशीं तळ ठोकला. इतक्यांत शॉहि पलीकडच्या टेकडीवरून आपली शिकार

संपवून येत होता. आम्हीं इथं तळ ठोकण्यापूर्वीं कांहीं वेळ अगोदर तो शिकारीला गेला होता. तो परत आला तेव्हां त्याचा घोडा अतिशय थकलेला होता. त्याच्या खोगीराच्या मागं गव्यांच्या दोन शेपट्या मी पाहिल्या. आम्हीं आमचे घोडे चरायला सोडले. इतक्यांत हेन्रीनं आपली रायफल घेतली आणि मनरोला सोबत घेऊन गव्यांच्या शिकारीसाठीं तो पायीं निघाला. थोड्या वेळानं डेस्लॉरिअर्सनं जेवण वाढलं. आमचं जेवण संपतं न संपतं इतक्यांत मनरो परत आला. हेन्रीनं चार माद्या मारल्या होत्या आणि त्यांचं मांस वाहण्यासाठीं त्यानं घोडा आणायला मनरोला पाठवलं होतं. शॉ आणि मनरो हेन्रीसाठींहि एक घोडा घेऊन स्वार होऊन निघाले. थोड्या वेळानं ते तिघे परत आले. निवडक मांसाचे तुकडे त्यांनीं लादून आणले होते. आम्हीं दोन माद्यांचं मांस आमच्यासाठीं ठेवून बाकीचं सगळं मनरो आणि त्याचे सोबती यांना देऊन टाकलं.

प्रवासांतल्या अन्नाची तरतूद करण्यासाठीं म्हणून इथं कांहीं दिवस थांबायचं असं आम्हीं ठरवलं. सरहद्दीवर पोंचण्यासाठीं आम्हांला जवळजवळ एक महिना लागणार होता. हें अंतर जरी दुपटीनं मोठं असतं, आणि आमच्या पथकांतल्या माणसांची संख्या दहापटीनं अधिक असती तरीसुद्धां हेन्री शॅटिलॉंच्या रायफलनं दोन दिवसांत इतक्या दिवसांसाठीं आणि माणसांसाठीं लागणाऱ्या अन्नाची तरतूद सहज केली असती. अर्थात् शिकार करून मिळवलेलें मांस सुकेपर्यंत थांबणं भाग होतं. तेव्हां आम्ही तंबू ठोकून तिथं राहिलों. कॅलिफोर्नियाच्या त्या माणसांजवळ तंबू नव्हते. त्यांनीं शेकोटीभोवती सामान रचून आडोसा तयार केला.

या मुक्कामांत आपला जीव रमवण्याखेरीज आम्हांला दुसरा उद्योग नव्हता. पाणी पिण्यासाठीं गव्यांचे कळप नदीवर येत असत. अर्थातच त्यांचा बळी घेऊन आम्ही आमचा जीव रमवणार होतो. म्हातारा गवा हा विलक्षण कुरूप दिसतो—त्याच्या कुरूपतेला तुलना नाहीं. त्याच्याकडे आपण एकदां पाहिलं कीं, मनांत असली नसली दयेची भावना नाहींशी होते. गव्यांच्या माद्या मात्र लहानखोर आणि नाजूक असतात. तिथं असतांना आम्हीं त्यांच्यावर हल्ला करण्याच्या मोहाला आवर घातला होता. कुठल्या मादीचं मांस खायला योग्य असेल हें प्रथम हेन्री ठरवत असे आणि माद्यांची शिकार तोच करत असे. आम्हीं शिकार करण्याच्या मोहाला आवर घातला होता तो एवढ्याच मर्यादेपयत परंतु

नर गवे होते त्यांच्याविरुद्ध मात्र आम्हीं दयामाया न ठेवतां युद्ध पुकारलं होतं. नरांची संख्या माद्यांच्या मानानं किती तरी पटीनं अधिक असते. त्यामुळें नर जरी कितीहि ठार केले तरी गव्यांच्या वंशविस्तारावर त्याचा परिणाम होण्याची भीति नसते. व्यापारासाठीं आणि तंबू बांधण्यासाठीं माद्यांचंच कातडं उपयोगांत येत असल्यामुळें माद्यांची शिकार पुष्कळ वेळां प्रमाणाबाहेर होते.

आमचे घोडे फार थकले होते, आणि त्यामुळें आम्ही पायींच शिकार करत असूं. नुकतीच आमचीं जेवणं संपलीं होतीं. धूम्रपान करत आम्हीं टिटेरुजची टिंगल करत पडलो होतो. इतक्यांत कुणी तरी नदीपलीकडच्या माळावर गव्यांचा कळप पाहिला. त्यानं पाईपचा शेवटचा झुरका घेतला आणि बंदुक घेऊन डुलतडुलत तो त्या गव्यांच्या दिशेनं निघाला. जेवणानंतर धूम्रपान करत गप्पा मारत आम्ही पडलों कीं, नेहमीं हा प्रकार होत असे.

गव्यांचा कळप ठराविक वाटेनं पाणी पिण्यासाठीं नदीवर येतो. एकादा गवा एकटा पाणी पिण्यासाठीं येतांना दिसला कीं त्याच्या वाटेच्या आसपास शिकारी दबा धरुन बसतो. गव्याचें तें प्रचंड धूड डुलत झुलत पाण्याजवळ येतं आणि गुटगुट आवाज करत तो पाणी पिऊं लागतो. पाणी प्याल्यानंतर तो मान वर करतो. भिजलेल्या दाढींतून पाण्याचे थेंब ओघळत असतात. आपल्या जीवाला धोका आहे याची जराहि कल्पना नसलेलं तें जनावर मठ्ठपणें उभं असतं. बंदुक रोखून, बंदुकीचा दस्ता खांद्यांत रोवून शिकारी तयार असतो. पण अजूनहि गोळी झाडण्याची घाई करत नाहीं. पाणी पिऊन झाल्यानंतर गवा संथपणें वाळूतून पलीकडच्या बाजूला जाऊं लागतो. त्यानं पुढचे पाय टाकले कीं त्याच्या पाठीवरचा, खांद्यालगतचा केस नसलेला भाग दिसूं लागतो. नेमका या भागावर शिकारी नेम धरतो. बंदुकीचा चाप आतां ओढला जातो. क्षणार्धांत गव्याच्या पाठीवरच्या त्या केस नसलेल्या भागावर लाल ठिपका दिसूं लागतो. तो गवा थरथरतो. मृत्यूनं झडप घातलेली असते, पण कुठून हें त्याला समजत नाहीं. पण अजूनहि तो गवा कोसळत नाहीं. कांहींहि झालेलं नाहीं अशा अभिनिवेशानं तो वाळूतून पुढं जाऊं लागतो. थोडं अंतर चालून गेल्यानंतर तो थांबतो. दुडक्या चालीनं पुढं सरकण्याचा प्रयत्न करतो. पुन्हां थांबतो. त्याचे गुडघे वाकतात. जमिनीच्या दिशेनं त्याचं डोकं झुकतं आणि तो जमिनीवर कोसळतो. किंचित् हालचाल होते न होते—त्याचा प्राण गेलेला असतो.

अशा तऱ्हेनं कळपापासून वेगळ्या झालेल्या गव्याची शिकार करणं हें अतिशय सोपं असतं. नदीकांठाप्रमाणेंच एखाद्या टेकडीमागें किंवा घळ चढून जाऊन पलीकडच्या माळावर अशा रीतीनेंच गव्याला गांठतां येतं. हें सोपं असतं खरं पण कांहीं वेळां अत्यंत अनुभवी अशा शिकाऱ्यालासुद्धां अशावेळीं आपलं सगळं कौशल्य पणाला लावावं लागतं. हेन्री शॅटिलॅँसारखा तरबेज शिकारीसुद्धां अशा तऱ्हेच्या प्रयत्नानंतर विलक्षण थकून काट्यांनीं सगळं शरीर ओरबाडून घेऊन परत आलेला मी पाहिला आहे. पुष्कळ वेळां अशी शिकार करतांना जमिनीवर पडून अनेक गज अंतर गव्याचा मागोवा घेत सरपटत जावं लागतं.

आमच्या इथल्या मुक्कामाच्या दुसऱ्या दिवशीं दुपारीं हेन्री शिकारीसाठीं बाहेर पडला. मी आणि शॉ तंबूतळावरच राहिलों होतों. परंतु नदीच्या पलीकडच्या बाजूला कांहीं गवे पाणी पिण्यासाठीं येत असल्याचं आम्हांला दिसलं. तेव्हां आम्हीं तळ सोडला आणि त्यांच्या दिशेनं निघालों. परंतु पलीकडल्या कांठाच्या ते इतक्या जवळ होते कीं आम्हीं तिथं जातांच वाळूवरून चालतांना आमच्या पायाचा आवाज येऊन ते गवे नदीच्या समांतर रेषेंत पळूं लागले. कांठावरचा चढाव चढून मी त्यांच्यामागें धांवलों. गवे जोरानं चालत होते. कांहीं वेळानं ते मागें वळून माझ्याकडे पहात आणि पुन्हां चालूं लागत. ते मागं वळले कीं मी त्यांना दिसूं नये म्हणून चटकन् जमिनीवर पडून रहात असे. मी जमिनीवर पडलों कीं ते माझ्याकडे ही कसली विचित्र वस्तू आहे अशा नजरेनं पहात पुन्हां चालूं लागत. मग मी उठून उभा राही आणि पुन्हां पाठलाग सुरू करी. ते पुन्हां मागें वळून पाहूं लागले कीं मी पुन्हां जमिनीवर पडून राही. हा प्रकार तीनचार वेळां झाला. शेवटीं मी आणि ते गवे यांच्यांत शंभर यार्डांचं अंतर आहे याचा मला अंदाज येतांच मी जमिनीवर बसलों आणि बंदुक रोखली. त्या कळपाच्या मध्यभागीं असलेला गवा मी आजवर पाहिलेल्या सर्व गव्यांत मोठा होता. त्याच्या खांद्यांच्या जरा मागें नेम धरून मी गोळी झाडली. त्याच्या बरोबरचे दोन गवे जोरांत पळूं लागले. जखमी गव्यानं त्यांच्यामागें धांवण्याचा प्रयत्न केला परंतु थोड्याच वेळानं तो थांबला आणि शेवटीं एखादा बैल जसा रवंथ करत खालीं पडतो तसा खालीं पडला. मी सावधपणें त्याच्याजवळ गेलो. त्याच्या डोळ्यांकडे पाहतांच तो मेलेला आहे हें मीं ओळखलं.

मी जेव्हां पाठलाग सुरू केला तेव्हां त्या माळावर जवळजवळ कोणीच नव्हतं. परंतु थोड्या वेळानं अचानक अनेक गव्यांचा कळप पन्नास गज अंतरावर दिसूं लागला. मी त्यांच्याजवळ जाऊं लागलों. त्या गव्यांनीं माझ्या येण्याची मुळींच दखल घेतली नाहीं. त्या कळपांत माद्या आणि वछडीं यांचीच संख्या जास्त होती. कडेला कांहीं म्हातारे गवेहि होते. मी त्यांच्या-जवळ जातांच त्यांनीं अशा क्रुद्ध नजरेनं माझ्याकडे पाहिलं कीं याहून पुढं जाण्यांत अर्थ नाहीं हें मी ताडलं. मी जमिनीवर बसलो आणि बंदुकीच्या गोळीच्या अंतरांत असलेल्या त्या गव्यांच्या हालचालींचं निरीक्षण करूं लागलो. कांहीं वेळां ते गवे एकाच बाजूला तोंडं करून स्तब्ध रहात. मग पुन्हां जणूं कांहीं समान प्रेरणेनं दुडक्या चालीनं पुढें जात. अशा वेळीं त्यांचीं शिंगं आणि खूर एकमेकांवर आपटून आवाज होई. थोड्या वेळानं कांहीं अंतरावर शॉच्या दोन नळ्यांच्या बंदुकीचा आवाज मीं ऐकला. हेन्रीनं बंदुक चालवली कीं भरपूर मांस मिळणार हें निश्चित असे. मी घोडा आणण्यासाठीं म्हणून नदी ओलांडून गेलों आणि हे दोघे शिकारी जिथं होते तिथं जाऊन पोंचलों. दूरच्या माळावर गव्यांचा कळप दिसत होता. दहाबारा गवे शिकार होऊन पडलेले होते. हातांत सुरी घेऊन पडलेल्या मादीच्या जवळ जाऊन हेन्री उत्तम मांसाचे भाग कापून घेत होता. हेन्रीनं आम्हांला आवश्यक तेवढ्या माद्या मारलेल्या होत्या. शॉनं एकूण पांच गवे मारले होते.

गव्यांची जात मोठी विलक्षण. कधीं ते अत्यंत मठ्ठपणें आणि गुंगल्या सारखे वागतील तर कधीं अतिशय सावध आणि हिंस्र बनतील. या दोन्ही प्रकारच्या वागण्यांतल्या विरोधाचं आश्चर्य वाटतं. गव्यांचीं हीं सगळीं वैशिष्ट्यं हेन्रीच्या परिचयाचीं होतीं. एखाद्या विद्यार्थ्यानं पुस्तकांचा कसून अभ्यास करावा तसा हेन्रीनं या गव्यांच्या वागण्याचा, हालचालींचा विचार केला होता. या आपल्या व्यवसायांतून त्यानं खूप आनंद मिळवला होता. आजूबाजूला गवे असले कीं आपल्याला एकाकी कधीं वाटत नाहीं असं तो म्हणत असे. आपल्या शिकारीच्या कौशल्याविषयीं त्याला अभिमान वाटे. हेन्री स्वभावानं अतिशय नम्र होता. परंतु असं असूनहि आपल्या मनमोकळ्या स्वभावानुसार आपलं शिकारीचं कौशल्य ही एक वादातीत गोष्ट आहे असं तो समजत असे. परंतु लोकांना वाटे त्याहून आपलं कौशल्य कमीच आहे असं तो समजे. सैन्यांत भरती झालेल्या दोन स्वयंसेवकांनीं एकदां पहिल्याच

प्रथम एक गवा मारला. आणि त्यानंतर त्यांनीं गव्याची पायीं शिकार करण्याची उत्तम पद्धत कोणती यावर हेन्रीला व्याख्यान द्यायला सुरवात केली. हेन्रीच्या चेहऱ्यावर आत्यंतिक तुच्छतेचा भाव मी पाहिला तो त्या वेळीं. गवे आणि त्यांच्या विषयींची एकूण माहिती हा आपल्याला लिहून दिलेल्या हक्कांचाच एक भाग आहे अशीच हेन्रीची भावना होती. गव्यांच्या मांसाची आवश्यकता नसतांना जर कोणीं हत्या केली तर त्याला विलक्षण चीड येई. गव्यांच्या बछड्यांना मारणं ही गोष्ट तर हेन्री महत्पाप आहे असं समजे.

हेन्री शॅटिलॉं आणि टिटे रूज एकाच वयाचे होते—म्हणजे जवळजवळ तिशींतले. हेन्री टिटे रूजच्या दुपटीनं मोठा दिसे आणि त्याची ताकद टिटे रूजच्या सहा पट तरी होती. अनेक वादळांचे आघात सोसून हेन्रीचा चेहेरा खरबरीत झाला होता. याच्या उलट दारु पिऊन पिऊन टिटे रूजचा चेहेरा सुजमट दिसे. हेन्री रेड इंडियन आणि गवे यांच्याविषयीं बोलत असे. नाट्यगृह आणि हॉटेल हे टिटे रूजच्या बोलण्यांतले विषय असत. हेन्रीनं कष्टांचं खडतर जीवन अनुभवलेलं होतं. विलासाची लहर आली रे आली कीं पहिली संधि मिळतांच टिटे रूजनं ती पुरी केली नाहीं असं कधीं झालं नाहीं. हेन्री हा अत्यंत निःस्वार्थी होता. टिटे रूज हा तसा स्वभावानं चांगला होता परंतु आपल्या स्वार्थाशिवाय दुसरं त्याला दिसत नसे. टिटे रूज असा असूनहि आम्ही त्याला सोडायला मात्र तयार झालो नसतो. मध्ययुगीन किल्ल्यांत जसा एकादा विदूषक असतो तसा तो होता. तो नसता तर आम्हांला सगळ्यांनाच चुकल्याचुकल्यासारखं वाटलं असतं. गेल्या कांहीं दिवसांत टिटे रूज चांगलाच गलेलठ्ठ झाला होता. त्याची असाधारण भूक पाहतां या गोष्टीचं आश्चर्य वाटण्याचं कारण नाहीं. सकाळपासून रात्रीपर्यंत तो सारखा चरत असे. गेला आठवडाभर तो फारच खुशींत होता. सगळा दिवस तो गात असे, शिट्या वाजवीत असे, हंसत असे, गोष्टी सांगत असे. जिम गर्नीची त्याला अतिशय भीति वाटत असल्यामुळें तो नेहमी आमच्याच तंबूच्या जवळपास असे. वाह्यात जीवन भरपूर जगल्यामुळें फाजील गोष्टींचे किस्से त्याच्याकडे भरपूर असत. दुसऱ्यांना हंसवण्यासाठीं स्वतः हास्यास्पद ठरायलाहि त्याला कांहींच वाटत नसे. त्याच्या किस्स्यांमुळें आमची बरीच करमणूक होई.

टिटे रूजचा कांहीं वेळां फार त्रासहि होई. कारण खाण्याच्या गोष्टी लांबवण्याची त्याला जुनाट संवय होती. याबद्दल आम्हीं सगळ्यांनीं अनेकदां

त्याचा निषेध केला. पण येरे माझ्या मागल्या. एकाद्या वेळीं आम्ही फारच चिडलों कीं तो पश्चात्ताप व्यक्त करी. पण अर्ध्या तासाच्या आंतच शिधा ठेवलेल्या पेट्यांच्या आसपास मांजर-पावलांनीं घुटमळतांना तो दिसे. डेस्लॉरिअर्सनं जेवणासाठीं काढून ठेवलेल्या वस्तू तो हां हां म्हणतां लांबवी. धूम्रपानाची टिटे रूजला फार आवड. त्याच्याजवळ तंबाखू नव्हता. आम्ही त्याला एका वेळीं जितका लागेल तितकाच देत असू. प्रथम प्रथम आम्ही त्याला अर्धा अर्धा पौंड तंबाखू देत होतों. परंतु हा तंबाखूच काय पण तो कापायची सुरीदेखील टिटे रुज कुठेंतरी हरवून बसे आणि मग आमची माफी मागत तो तंबाखूसाठीं नव्यानं याचना करूं लागे. तेव्हां त्याला एकावेळीं खूप तंबाखू न देतां प्रत्येक धूम्रपानाच्या वेळीं जितका लागेल तेवढाच द्यायचा असं ठरवलं.

या तळावर आम्ही दोन दिवस होतों. आम्हीं मिळवलेल्या मांसापैकीं बरचसं मांस नेण्याइतकं सुकलंहि होतं. इतक्यांत मोठं वादळ होण्याचा रंग दिसूं लागला. संध्याकाळच्या वेळीं काळ्याभोर शाईसारखं आभाळ दिसूं लागलं. मनरो आणि त्याचे दोन साथी यांनीं आपल्या बंदुका आणून आमच्या तंबूंत ठेवल्या. त्यांच्याजवळ तंबू नव्हता. तेव्हां त्यांनीं वाऱ्याबरोबर वहात असलेल्या काटक्या गोळा करून धबधब्यासारख्या पावसालाहि जुमानणार नाहीं अशी भलीमोठी शेकोटी तयार केली. गव्याचं कातडं अंगाभोंवती गुंडाळून ते वादळाला तोंड द्यायला सज्ज झाले. डेस्लॉरिअर्स सामानाचा गार्डीत बसला. मी, शॉ, हेन्री आणि टिटे रुज आमच्या छोट्या तंबूंत आलो. प्रथम गव्याचं कातडं तंबूंत नीट अंथरून त्याच्यावर सुकवलेलं मांस नीट रचून ठेवलं. नऊ वाजतांच्या सुमाराला दाट काळोख असतांना वादळाला सुरवात झाली. सोसाट्याचा वारा आणि पाऊस यांचा एकदम मारा सुरूं झाला. माळाच्या असीम विस्तारावर पाऊस धो धो कोसळूं लागला. आमच्या तंबू धुक्यानं भरून गेला. तंबूच्या छतांतून पाणी ठिबकून आंत येऊं लागलं आणि आम्ही चिंब भिजून गेलो. वीज कडाडली कीं तिच्या प्रकाशांत आम्हांला एकमेकांचं दर्शन होई आणि एक क्षणभर आजूबाजूचा विस्तीर्ण प्रदेश आमच्या डोळ्यांना दिसे. अशा या वादळांत तंबू किती वेळ तग धरील याची आम्हांला काळजी वाटत होती. तास दोन तास तरी आमच्या तंबूनं वादळाला दाद दिली नाहीं. पण शेवटीं मात्र छत खालीं आलं. आम्हीं बसल्या बसल्याच आमच्या बंदुका उभ्या केल्या आणि डोक्यावर तें छत

उचलून धरलं. अशा या सुखद अवस्थेंत आम्ही अनेक तास तसे बसून होतों आमच्याभोंवतीं पाण्याचं तीन इंची डबकं साचलं होतं. जवळजवळ अर्धी रात्रभर आम्ही थंडगार पाण्याचं स्नान करत होतों. वादळपावसाचं असं हें थैमान चालू असतांना टिटे रूजच्या उत्साहाला विशेषच भरती आली होती. तो हंसत होता, शिट्या वाजवत होता आणि वादळाला न जुमानतां गात होता. आम्हीं जितकी कांहीं शिल्लक होती तितकी त्याची निर्भर्त्सना करून घेतली. आम्हीं आमचं सगळं मनोधैर्य गोळा करून या वादळपावसाला तोंड देण्याचा प्रयत्न करत होतों आणि टिटे रूज इथं आमची टिंगल करत बसला होता. पहांटेचे तीन वाजले तेव्हां या तंबूंत बसून भिजण्यापेक्षां बाहेर उघड्यावर येऊन छळ सोसणं अधिक बरं असं वाटून, आम्ही त्या बंदुकींनीं सांवरलेल्या तंबूबाहेर पडलो. वाऱ्याचा सोसाटा आतां कमी झाला होता, परंतु पाऊस मात्र सारखा पडत होता. कॅलिफोर्नियाच्या त्या तरुणांनीं पेटव-लेली शेकोटी अजून जळत होती. आम्हीं त्या शेकोटीसमोर जाऊन बसलों. तरतरीत वाटावं म्हणून आम्हीं थोडी कॉफी तयार केली. एकदा कॉफी घेऊन झाल्यानंतर पुन्हां पेला भरावा म्हणून आमच्यापैकीं कांहीं जण कॉफीच्या भांड्याकडे गेले तेव्हां टिटे रुजनं हळूंच जाऊन आधींच तें भांडं खलास केल्याचं त्यांच्या लक्षांत आलं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं निरभ्र सूर्योदय झाला तेव्हां आम्हांला बरं वाटलं. आमचे पाण्यानं थबथबलेले कपडे अंगाला चिकटल्यामुळें आम्हीं अगदी विनोदी दिसत होतों. ऊन पडल्यानंतर अंगावरच हे कपडे सुकले आणि खडखडीत झाले. त्या कडक कपड्यांचं जणूं कांहीं चिलखतच झालं. सगळा दिवस घोडदौड करून आणि दोन तीन गव्यांची शिकार करूनहि पहिल्या-सारखे आमचे कपडे लवचिक झाले नाहींत. आमच्या पथकांत मी, हेन्री आणि शॉ एवढे तीनच शिकारी होतों. सकाळीं मनरोनं गव्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला परंतु त्याच्या घोड्याला तें झेपेना. शॉ मनरोबरोबर गेला. शॉचा घोडा चांगला असल्यामुळें तो कळपाच्या मध्यभागीं जाऊन थडकला. कळपांत सगळीकडे माद्या आणि वछडीं असल्यामुळें त्यानं आपला घोडा आवरला. इतक्यांत कांहीं अंतरावर एक म्हातारा गवा त्याला दिसला. शॉ माद्या ओलांडून पलीकडे गेला आणि त्या गव्याच्या खांद्यावर नेम धरून त्यानं त्याच्या काळजांत गोळी घातली. आमच्या तंबूच्या आसपासच्या झाडांवर अनेक

त्याचा निषेध केला. पण येरे माझ्या मागल्या. एखाद्या वेळीं आम्ही फारच चिडलों कीं तो पश्चात्ताप व्यक्त करी. पण अर्ध्या तासाच्या आंतच शिधा ठेवलेल्या पेट्यांच्या आसपास मांजर-पावलांनीं घुटमळतांना तो दिसे. डेस्लॉरिअर्सनं जेवणासाठीं काढून ठेवलेल्या वस्तू तो हां हां म्हणतां लांबवी. धूम्रपानाची टिटे रूजला फार आवड. त्याच्याजवळ तंबाखू नव्हता. आम्ही त्याला एका वेळीं जितका लागेल तितकाच देत असू. प्रथम प्रथम आम्ही त्याला अर्धा अर्धा पौंड तंबाखू देत होतों. परंतु हा तंबाखूच काय पण तो कापायची सुरीदेखील टिटे रुज कुठेंतरी हरवून बसे आणि मग आमची माफी मागत तो तंबाखूसाठीं नव्यानं याचना करूं लागे. तेव्हां त्याला एकावेळीं खूप तंबाखू न देतां प्रत्येक धूम्रपानाच्या वेळीं जितका लागेल तेवढाच द्यायचा असं ठरवलं.

या तळावर आम्ही दोन दिवस होतों. आम्हीं मिळवलेल्या मांसापैकीं बरचसं मांस नेण्याइतकं सुकलंहि होतं. इतक्यांत मोठं वादळ होण्याचा रंग दिसूं लागला. संध्याकाळच्या वेळीं काळ्याभोर शाईसारखं आभाळ दिसूं लागलं. मनरो आणि त्याचे दोन साथी यांनीं आपल्या बंदुका आणून आमच्या तंबूंत ठेवल्या. त्यांच्याजवळ तंबू नव्हता. तेव्हां त्यांनीं वाऱ्याबरोबर वहात असलेल्या काटक्या गोळा करून धबधब्यासारख्या पावसालाहि जुमानणार नाहीं अशी भलीमोठी शेकोटी तयार केली. गव्याचं कातडं अंगांभोंवती गुंडाळून ते वादळाला तोंड द्यायला सज्ज झाले. डेस्लॉरिअर्स सामानाच्या गाडींत बसला. मी, शॉ, हेन्री आणि टिटे रुज आमच्या छोट्या तंबूंत आलो. प्रथम गव्याचं कातडं तंबूंत नीट अंथरून त्याच्यावर सुकवलेलं मांस नीट रचून ठेवलं. नऊ वाजतांच्या सुमाराला दाट काळोख असतांना वादळाला सुरवात झाली. सोसाट्याचा वारा आणि पाऊस यांचा एकदम मारा सुरूं झाला. माळाच्या असीम विस्तारावर पाऊस धो धो कोसळूं लागला. आमच्या तंबू धुक्यानं भरून गेला. तंबूच्या छतांतून पाणी ठिबकून आंत येऊं लागलं आणि आम्ही चिंब भिजून गेलो. वीज कडाडली कीं तिच्या प्रकाशांत आम्हांला एकमेकांचं दर्शन होई आणि एक क्षणभर आजूबाजूचा विस्तीर्ण प्रदेश आमच्या डोळ्यांना दिसे. अशा या वादळांत तंबू किती वेळ तग धरील याची आम्हांला काळजी वाटत होती. तास दोन तास तरी आमच्या तंबूनं वादळाला दाद दिली नाहीं. पण शेवटीं मात्र छत खालीं आलं. आम्हीं बसल्या बसल्याच आमच्या बंदुका उभ्या केल्या आणि डोक्यावर तें छत

उचलून धरलं. अशा या सुखद अवस्थेंत आम्ही अनेक तास तसे बसून होतों आमच्याभोंवतीं पाण्याचं तीन इंची डबकं साचलं होतं. जवळजवळ अर्धी रात्रभर आम्ही थंडगार पाण्याचं स्नान करत होतों. वादळपावसाचं असं हें थैमान चालू असतांना टिटे रूजच्या उत्साहाला विशेषच भरती आली होती. तो हंसत होता, शिट्या वाजवत होता आणि वादळाला न जुमानतां गात होता. आम्हीं जितकी कांहीं शिल्लक होती तितकी त्याची निर्भर्त्सना करून घेतली. आम्हीं आमचं सगळं मनोधैर्य गोळा करून या वादळपावसाला तोंड देण्याचा प्रयत्न करत होतों आणि टिटे रूज इथं आमची टिंगल करत बसला होता. पहांटेचे तीन वाजले तेव्हां या तंबूंत बसून भिजण्यापेक्षां बाहेर उघड्यावर येऊन छळ सोसणं अधिक बरं असं वाटून आम्ही त्या बंदुकींनीं सांवरलेल्या तंबूबाहेर पडलो. वाऱ्याचा सोसाटा आतां कमी झाला होता, परंतु पाऊस मात्र सारखा पडत होता. कॅलिफोर्नियाच्या त्या तरुणांनीं पेटव-लेली शेकोटी अजून जळत होती. आम्हीं त्या शेकोटीसमोर जाऊन बसलों. तरतरीत वाटावं म्हणून आम्हीं थोडी कॉफी तयार केली. एकदा कॉफी घेऊन झाल्यानंतर पुन्हां पेला भरावा म्हणून आमच्यापैकीं कांहीं जण कॉफीच्या भांड्याकडे गेले तेव्हां टिटे रुजनं हळूंच जाऊन आधींच तें भांडं खलास केल्याचं त्यांच्या लक्षांत आलं.


दुसऱ्या दिवशीं सकाळीं निरभ्र सूर्योदय झाला तेव्हां आम्हांला बरं वाटलं. आमचे पाण्यानं थबथबलेले कपडे अंगाला चिकटल्यामुळें आम्हीं अगदी विनोदी दिसत होतों. ऊन पडल्यानंतर अंगावरच हे कपडे सुकले आणि खडखडीत झाले. त्या कडक कपड्यांचं जणूं कांहीं चिलखतच झालं. सगळा दिवस धोडदौड करून आणि दोन तीन गव्यांची शिकार करूनहि पहिल्या-सारखे आमचे कपडे लवचिक झाले नाहींत. आमच्या पथकांत मी, हेन्री आणि शॉ एवढे तीनच शिकारी होतों. सकाळीं मनरोनं गव्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला परंतु त्याच्या घोड्याला तें झेपेना. शॉ मनरोबरोबर गेला. शॉचा घोडा चांगला असल्यामुळें तो कळपाच्या मध्यभागीं जाऊन थडकला. कळपांत सगळीकडे माद्या आणि वछडीं असल्यामुळें त्यानं आपला घोडा आवरला. इतक्यांत कांहीं अंतरावर एक म्हातारा गवा त्याला दिसला. शॉ माद्या ओलांडून पलीकडे गेला आणि त्या गव्याच्या खांद्यावर नेम धरून त्यानं त्याच्या काळजांत गोळी घातली. आमच्या तंबूच्या आसपासच्या झाडांवर अनेक

गिधाड होतीं. या गिधाडांत अमेरिकेचा राष्ट्रीय पक्षी मानला गेलेला एक गरुडहि होता. आपण हा गरुड मारणार अशी देशभक्तीला न शोभेशी घोषणा करून टिटे रूजनं डेस्लॉरिअर्सकडून बंदूक घेतली. आमच्या अपेक्षे-प्रमाणेंच टिटे रूजपासून त्या गरुडाला कोणतीहि इजा झाली नाहीं. टिटे रूज परत आला. तो म्हणाला कीं तो गरुड कुठं दिसला नाहीं. परंतु आपण एक गिधाड मारलं. मारलेलं गिधाड कुठं तें दाखव असं म्हणतांच तो म्हणाला कीं तें गिधाड मेलं असं कांहीं म्हणतां येणार नाहीं, पण ज्या तऱ्हेनं तें उडालं त्यावरून तें जखमी झालेलं असणार हें नक्कीच. तो पुढें म्हणाला, "तुम्हांला जर पुरावाच हवा असेल त्या गिधाडाची पिसं मी आणून दाखवतों. कारण माझी गोळीं लागतांच त्या गिधाडाचीं बरीच पिसं खालीं पडलेलीं मी पाहिली आहेत."

आमच्या तंबूतळाच्या समोर एक झुडपांचं बेट होतं. या झुडपांच्या मागें पाण्याचं एक खोल तळं होतं. या तळ्यावर आंघोळ करण्यासाठीं मी दुपारीं गेलों तेव्हां एक पांढरा लांडगा तिथं आला न्यू फाउंडलंड मधला सगळ्यांत मोठा कुत्रा जरी घेतला तरी त्याच्याहून तो लांडगा अधिक मोठा होता. दगड फेकून मारतां येईल इतक्या अंतरावर तो लांडगा उभा होता. त्याचे लाल डोळे आणि मुस्कुरावरचे केस मला दिसत होते. त्याची शेपटी केसाळ, डोकं भलं मोठं होतं. तो हरामखोर अतिशय कुरूप दिसत होता. माझ्याजवळ रायफल नव्हती. त्याचा कपाळमोक्ष करण्यासाठीं आजूबाजूला कुठं दगडही नव्हता. हाताला कांहीं लागतं की काय यासाठी मी आजूबाजूला पहात होतों इतक्यांत आमच्या तळावरत कोणीतरी गोळी झाडली. लांडग्याच्याच कांहीं अंतरावर ती गोळी मातींत घुसली. तेव्हां उडी मारून तो लांडगा पसार झाला. शिकारीमुळें अनेक गव्यांचे मुडदे माळावर पडलेले असतात. लांडग्यांची वर्दळ अशा भागांत अर्थातच्र वाढते. मी पुष्कळ वेळां नदीवर जाऊन मेलेल्या गव्यांवर ताव मारणाऱ्या लांडग्यांना पहात बसे. तीन प्रकारचे लांडगे मीं पाहिले. पांढऱ्या आणि करड्या रंगांचे लांडगे चांगले मोठे असतात. स्पॅनिअल कुत्र्याएवढा एक तिसऱ्या जातीचा लांडगा असतो. हे लहान लांडगे एखाद्या मेलेल्या गव्याभोवती जमतात आणि कुई घालत एकमेकांशीं भांडतात. परंतु त्यांच्या जवळपास जर आपण गेलों तर त्यांना तें फार लौकर कळतं. मी सरपटत

गोळी घालण्याएवढ्या अंतरावरून पुष्कळ वेळां त्यांना मारण्याचा प्रयत्न केला. परंतु एवढ्या अंतरावरूनहि त्यांना चाहूल लागते आणि ते पळून जातात असं मला आढळून आलं. या परिसरांत काळीं गिधाडंहि खूप असतात. गव्याच्या एखाद्या मुड्द्यापासून लांडगे दूर हटले कीं ही गिधाडं त्या मुडद्याला भिडतात अशा वेळीं जर एक गोळी झाडली तर त्या मुडद्याला चिकटलेल्या खादाड गिधाडांपैकीं तीन तरी खालीं पडतील.

या तळावर आम्हीं चार दिवस मुक्काम केला आणि पांचव्या दिवशीं आम्हीं निघालों. आमच्याजवळ पांचशें पौंड सुकलेलं मांस होतं. आमच्या-बरोबरच्या कॅलिफोर्नियाच्या माणसांजवळ तीनशें पौंड होतं. हें मांस माद्यांची शिकार केल्यानंतर त्यांच्या उत्तम भागांचं कापून घेतलेलं होतं. चांगलं मांस कापून घेतल्यानंतर मादीचं उरलेलं धूड आम्हीं लांडग्यांसाठीं तिथंच टाकून जात होतों. आम्हीं प्रवासाची तयारी केली. टिटे रूजचीसुद्धां तयारी झाली तेव्हां आम्ही तो तळ सोडून पूर्वेच्या दिशेनं निघालों. कांहीं मैल पुढे गेल्यानंतर आपल्याजवळची एक उत्तम सुरी आपण मागें विसरून आल्याचं शॉच्या लक्षांत आलं. तो दिवस अगदीं अंधारवाणा होता. शॉ जेव्हां सुरी शोधण्यासाठीं परत तंबूतळावर आला तेव्हां आमच्या धुमसत असलेल्या शेकोट्या, आसपासचं तुडवलं गेलेलं गवत, आम्हीं टाकलेला केरकचरा त्याच्या नजरेला पडला. आम्हीं गेल्यानंतर पडलेल्या गव्यांवर ताव मारण्यासाठीं अनेक गिधाडं आणि लांडगे तिथं जमले होते. शॉ तिथं जातांच ही सगळी मंडळी भराभर दूर झाली. गव्याच्या सांगाड्यावर चिकटून बसलेलीं गिधाडं धड उडूनहि जात नव्हतीं, धड बसतहि नव्हती. तशीच पंख झापत खिळून राहिलीं होतीं. शॉ सुरी शोधत असतांना पलीकडच्या टेकडीवर बसून तो केव्हां जातो याची लांडगे वाट पहात होते. बरीच शोधाशोध केल्यानंतरहि शॉला सुरी कांहीं मिळाली नाहीं. तेव्हां त्या लांडग्यांना आणि गिधाडांना त्यांच्या मेजवानीच्या स्थळाचा ताबा देऊन शॉ परत फिरला.



## २६ | परतीची वाटचाल

१८४६ च्या उन्हाळ्यांत अर्कांसास नदीच्या ओसाड आणि एकाकी अशा वरच्या कांठानं पहिल्या प्रथम सैन्य जातांना पाहिलं. यापूर्वी कुठलीहि सैन्याची तुकडी या वाटेनं गेलेली नव्हती. जनरल किर्नीची तुकडी सांताफे येथें जातांना सिमॅरोनच्या जुन्या वाटेनं न जातां या वाटेनं गेली. आम्हीं जेव्हां इथं आलों तेव्हां सैन्याचा बहुतेक भाग इथून अगोदरच गेला होता. प्राईसच्या नेतृत्वाखालीं येणारं मिसुरीचं पथक मात्र अजून यायचं होतं. कारण हें पथक सर्वांच्या शेवटीं सरहद्दविभाग सोडून निघालं होतं. आम्हांला एकदोन तुकड्या या वाटेनं जातांना दिसूं लागल्या.

मिसुरीच्या या पथकाइतकं धामधुमीच्या आवडीनं निघालेलं दुसरं पथक शोधून काढणं कठीण. परंतु असं असलं तरी शिस्त आणि आज्ञाधारकता या दृष्टीनं मात्र हें मिसुरीचं पथक अगदी निरुपयोगी होतं असं म्हणायला हरकत नाहीं. या पथकाचा पराक्रम सर्व अमेरिकाभर गाजल्यामुळें छुप्या हल्ल्यांसाठीं

हें पथक अतिशय उत्कृष्ट होतं हें नाकारणं चुकीचं होईल. युद्धाच्या इतिहासांतले जुने पायंडे मोडून या पथकानं जे विजय संपादन केले तें या लोकांच्या अंगीं कांहीं विशेष सैनिकी गुणवत्ता असल्यामुळेंच. डॉनीफनच्या नेतृत्वाखालीं निघालेल्या पथकांतलीं माणसं आधुनिक शासनयंत्रणेनं धाडलेल्या सैनिकांपेक्षांहि मुलूखगिरी करायला निघालेल्या टोळीसारखीं वाटत होती. जनरल टेलरनं जेव्हां डॉनीफनचं त्याच्या तुकड्यांनीं मिळविलेल्या विजयाबद्दल अभिनंदन केलं तेव्हां डॉनीफननं दिलेल्या उत्तरानं तो आणि त्याचे सैनिक यांचे संबंध कोणत्या प्रकारचे होते यावर चांगलाच प्रकाश पडतो. डॉनीफन टेलरला म्हणाला, "हें पहा, डावपेंच वगैरे कांहीं मला माहिती नाहींत. माझे सैनिक माझ्याकडे येत आणि आतां हल्ला हढवूं किंवा काय असं विचारत. चांगली संधी पाहून मी त्यांना हल्ला करण्याची परवानगी देत असे. मी हल्ला करा असं म्हटलं कीं बंदुकीच्या गोळीसारखे ते सुसाटत जात. मला एवढंच माहीत आहे." डॉनीफन आज्ञेपेक्षांहि आपली तुकडी ताब्यांत ठेवण्यासाठीं मनधरणीच्यात्र मार्गाचा अवलंब करत असे. चारित्र्य आणि शिक्षण या दोन्ही गोष्टींनीं नेतृत्व करायला त्याच्या तुकडींतले कित्येक लोक अधिक लायक होते.

सॅक्रॅमेंटो इथं झालेल्या लढाईंत त्याची तुकडी मोठ्या बिकट परिस्थितींत लढली. मेक्सिकन सैनिकांनीं खंदक वगैरे खणून, तोफा लावून मोक्याच्या जागा रोखून ठेवल्या होत्या. डॉनीफनच्या तुकडीपेक्षां मेक्सिकन सैनिक संख्येनं पांचपट अधिक होते. अमेरिकनांच्या तुकडीवरून एक गरुड उडत गेला तेव्हां त्यांच्यांत एकच गजबज उडाली. शत्रूंच्या तोफा आग ओकीत होत्या. शेवटीं हल्ला करा अशी आज्ञा होतांच हे लोक त्या मेक्सिकनांवर तुटून पडले. अर्ध्या वाटेवर एका प्यालेल्या अधिकाऱ्यानं थांबा अशी आज्ञा केली. ही आज्ञा पाळावी कीं न पाळावी अशा मनाच्या दोलाचल अवस्थेंत सैन्याची ही तुकडी असतांना अकस्मात एक सैनिक ओरडला. "दोस्त, पुढं सरा!" तो सैनिक असं ओरडतांच ही तुकडी वाघासारखी शत्रूवर तुटून पडली. चारशें मेक्सिकन सैनिक तिथल्या तिथं गारद झाले, आणि बाकीचे पळून गेले. त्यांच्या तोफा आणि सगळं सामान अमेरिकनांच्या हातीं आलं. अमेरिकन सैनिकांना त्यांचा पराभव केल्यानंतर बांधण्यासाठीं या मेक्सिकनांनीं आणलेल्या दोऱ्यादेखील त्यांच्या सामानांत सांपडल्या!

डॉनीफनचे हे सैनिक सैन्याच्या मुख्य भागाबरोबर अगोदरच गेले होते. प्राईसच्या तुकडीचे सैनिक या आधीं गेलेल्या सैनिकांच्या आसपासच्या

विभागांतलेच होते. हे सैनिक वृत्तीनं आणि दिसायला त्यांच्यासारखेच होते. एके दिवशीं सकाळीं तास दोनतास विश्रांति घ्यावी म्हणून आम्हीं एका मोठ्या कुरणावर उतरलों. इतक्यांत समोरून कांहीं घोडेस्वार आमच्या दिशेनं येत असल्याचें आम्हांला दिसले. मी आणि शॉ धूम्रपान करत बसलों होतों. शॉ म्हणाला, " ते इकडेच येतायत. आतां ते आपल्याला जरासुद्धां शांतता लाभूं देणार नाहींत." त्या तुकडींतले जवळजवळ अर्धे सैनिक आमच्या दिशेनं येत होते.

त्यांच्यापैकीं प्रथम आमच्याजवळ पोचलेला सैनिक घोड्यावरून उतरला आणि आम्हांला अभिवादन करून जवळच बसला. त्याच्यानंतर बाकीचे आले. सेंट लुईस इथं भरती झालेले हे सगळे सैनिक होते. त्यांच्यापैकीं कांहींचे चेहेरे गुंडांसारखे दिसत होते, तर कांहीं आत्यंतिक व्यसनामुळें निस्तेज दिसत होते. परंतु एकूण सैन्यांत सर्वसामान्यतः भरती होणाऱ्या सैनिकांच्या मानानं ते उजवेच होते. त्यांनीं आमची माहिती विचारली. गव्यांची शिकार करायला आतां कितपत अवसर आहे याची चौकशी केली. आपले घोडे सांताफेपर्यंत टिकाव धरतील किंवा काय असं त्यांनीं विचारलं. इथपर्यंत सगळं ठीक होतं. परंतु तेवढ्यांत दुसरी जी तुकडी आली तेव्हां खरी डोकेदुखीला सुरवात झाली.

गवताची जुनी हॅट घातलेला या नव्यानं आलेल्या तुकडींतला एक सैनिक आमच्याजवळ आला आणि त्यानं तुम्हीं कोण? कुठून आलांत? कुठें चाललांत? इत्यादि प्रश्नांचा भडिमार सुरू केला. ही नवी तुकडी अगदीच अडाणी दिसत होती. कसलीहि भीड न बाळगतां ते टकाटका आमचे चेहेरे न्याहाळत होते.

" तूं कॅप्टन आहेस काय?" एकानं मला विचारलं.

" इथं काय करताहांत तुम्ही?" दुसऱ्यानं विचारलं.

" घरीं गेल्यानंतर कुठं रहाणार तूं?" तिसऱ्यानं विचारलं.

" मला वाटतं तुम्ही व्यापारी आहांत" चवथ्यानं अंदाज केला. आणि या सगळ्यांवर कडी करण्यासाठीं पांचवा माझ्याजवळ आला आणि त्यानं हलक्या आवाजांत मला विचारलं, " तुझ्या या सोबत्याचं नांव काय?" प्रत्येक सैनिक येऊन पुन्हां पुन्हां याच प्रश्नाचा भडिमार करूं लागला तेव्हां हा त्रास आम्हांला असह्य झाला. शेवटीं आम्हीं आमचा प्रवक्ता म्हणून या प्रश्नांच्या भडिमाराला उत्तरं देण्याची कामगिरी टिटे रूजवर सोंपवली. तो खूष झाला आणि थोड्याच वेळांत या सगळ्या प्रश्नांचा धबधबा आमच्यापासून

दूर झाला. थोड्या वेळानं चार घोडे जोडलेली एक तोफ अवजडपणें तिथं आली. त्या चारांपैकीं एका घोड्यावर बसलेला मनुष्य आमच्याकडे पाहात म्हणाला, "तुम्ही कुठून आलांत? कशासाठीं प्रवासाला निघालांत?" या सगळ्या घोळक्यांत त्या तुकडीचा कॅप्टनहि होता. त्या सैनिकांपैकीं बहुतेक जण कॅप्टनची जागा घ्यायला अधिक लायक होते असं त्यांच्या चेहेऱ्यांकडे बघून वाटत होतं. थोड्या वेळानं कॅप्टन म्हणाला, "आतां बराच उशीर झालाय्, आपण इथून लवकर निघावं हें बरं." एक सैनिक डोक्याखालीं हात ठेवून आरामांत पडला होता. तो म्हणाला, "कॅप्टन, कशाला इतकी घाई?"

"ठीक आहे, ठीक आहे. तुमच्या मनाप्रमाणें होऊं द्या. आपण आणखी थोडा वेळ थांबूं." ती खुषामत्या कॅप्टन म्हणाला.

शेवटीं एकदां हे सगळे सैनिक गटागटांनीं निघून गेले. ते गेल्यावर आम्हांला हायसं वाटलं. सुटकेचा खरा श्वास टाकला डेस्लॉरिअर्सनं. कारण त्यानं केलेलं जेवण थंड होत होतं. डेस्लॉरिअर्सनं जेवण वाढण्याची सर्व तयारी केली. टुणकन् उडी मारून टिटे रूज सगळ्यांत अगोदर जागा पकडून बसला.

बोटीवर कारकुनाचं काम केलेलं असल्यामुळें प्रत्येकाच्या नांवामागें 'मिस्टर' जोडण्याची टिटे रूजला संवय झाली होती. डेस्लॉरिअर्सला त्याच्या आयुष्यांत मिस्टर डेस्लॉरिअर्स अशी हांक मारणारा टिटे रूज हा पहिलाच. पण असं असलं तरी डेस्लॉरिअर्सच्या मनांत त्याच्याविषयीं असलेली शत्रुत्वाची भावना जराहि कमी झाली नव्हती. डेस्लॉरिअर्स स्वयंपाकाचं काम करूं लागला कीं टिटे रूज तिथं लुडबुड करून त्याला त्रास देत असे. डेस्लॉरिअर्सच्या स्वभावांत दोन टोकं होतीं. एक तर तो हंसतमुख, आनंदी असे, किंवा तो संतापानं पेटलेला तरी दिसत असे. तो टिटे रूजला कांहीं बोलत नसे. पण त्यानं दिलेला त्रास डेस्लॉरिअर्सच्या मनांत सारखा सलत असे. टिटे रूज जेवायला येऊन बसला होता. तो त्याच्या जीवनांतला सर्वांत सुखद असा क्षण होता. अंगरख्याच्या अस्तन्या वर करून तो जेवणावर तुटून पडण्याच्या तयारींत होता. कॉफीचा पेला आणि सुरी त्यानं बाजूलाच ठेवली होती. गव्याच्या मांसल बरगड्या समोर येतांच त्या चवीची मनांतल्या मनांत कल्पना केल्यामुळें त्याचे डोळे आनंदानं विस्फारले. डेस्लॉरिअर्स त्याच्या समोरच बसला होता. टिटे रूजनं त्याला विचारलं, "हें काय डेस्लॉरिअर्स, तूं पुरेशी रोटी आम्हांला दिलेलीच नाहींस!" त्याचे हे शब्द ऐकतांच डेस्लॉरिअर्सचा शांत

चेहरा संतापानं पिळवटून निघाला. त्यानं मोडक्यातोडक्या इंग्रजी शब्दांची फैर झाडायला सुरुवात केली. टिटे रूज आश्चर्यानं बघूं लागला. जेवणासाठीं काढून ठेवलेल्या चार मोठ्या रोट्या टिटे रूजनं आधींच चोरून खाल्ल्याबद्दल डेस्लॉरिअर्स त्याची हजेरी घेण्याचा यत्न करत होता एवढा बोध त्याच्या मोडक्यातोडक्या शब्दांतून आम्हांला झाला. आपलं तोंड आणि डोळे विस्फारून एक शब्दहि न बोलतां टिटे रूज गोंधळून अकस्मात् हल्ला करणाऱ्या डेस्लॉरिअर्सकडे पहात होता. शेवटीं टिटे रूजनं बोलायला सुरुवात केली. रोट्या चोरल्याचा खोटा आरोप मिस्टर डेस्लॉरिअर्स आपल्यावर करतो आहे असं तो म्हणूं लागला. दोघांची आरोप–प्रत्यारोपांची इतकी फैर झडूं लागली कीं आम्हांला दुसरं कांहींच ऐकूं येईना, टिटे रूजला इंग्रजी भाषेवरच्या प्रभुत्वामुळें थडाथडा बोलतां येत होतं. याच्या उलट डेस्लॉरिअर्सची भाषेमुळें अडचण झाली होती. खेचराला चाबूक मारल्यानंतर डेस्लॉरिअर्स आपल्या बोलींत जे शब्द उच्चारायचा ते उच्चारून रागारागांत तिथून उठून निघून गेला.

त्या दिवशीं संध्याकाळीं आम्हीं नदीच्या कांठाजवळ थोड्या अंतरावरच तळ ठोकला. मध्यरात्रीची वेळ होती. आम्ही जमिनीवर गव्याची कातडी अंथरुन गाढ झोपलों होतों. माझ्याजवळच झोपलेल्या माणसानं खांदे हलवून मला जागं केलं आणि त्याच वेळीं हलूं नकोस अशी सावधगिरीची सूचनाहि दिली. आकाश चांदण्यांनीं भरलं होतं आणि त्यांचा स्वच्छ प्रकाश पडला होता. मी हळूंच डोळे उघडून पाहिलं. तेव्हां एक मोठा पांढरा लांडगा आमच्या शेकोटीच्या आसपास जमीन हुंगत चोरपावलांनीं फिरत असल्याचं मला दिसलं. मी माझा हात ब्लँकेटांतून बाहेर काढून जवळ असलेल्या बंदुकीच्या नळीवरचं चामड्याचं आवरण दूर केलं. माझ्या या हालचालीमुळें त्या लांडग्याला चाहूल लागली आणि तो उड्या मारत पळत जाऊं लागला. मी चटकन् उडी मारून उठलों आणि पळून जात असलेल्या त्या लांडग्यावर गोळी झाडली. साधारण तीस यार्ड अंतरावर तो लांडगा होता. बंदुकीच्या आवाजामुळें माझे सगळे सहकारी जागे झाले.

"तूं मारलायस त्याला." एकजण म्हणाला.

"नाहीं. नदीच्या कांठानं तो पहा पळून जातोय." मी म्हणालों.

"मग ते दोन लांडगे असणार. तूं ज्याच्यावर गोळी झाडलीस तो लांडगा पलीकडे पडलेला तुला दिसत नाहीं?"

आम्हीं जवळ जाऊन पाहिलं तेव्हां तिथं मेलेल्या पांढऱ्या लांडग्याऐवजी रानगव्याची एक कवटी पडलेली आढळली. माझा नेम चुकला होता. आणि त्याहून विशेष म्हणजे मी गवताळ प्रदेशांतला एक महत्त्वाचा नियम मोडला होता. ह्या अलिखित नियम असा की तंबूतळावरून गोळी झाडणं अत्यंत धोक्याचं असतं. कारण गोळींचा आवाज आसपास कुठंतरी असणाऱ्या रेड इंडियनांच्या कानीं जाण्याची शक्यता असते.

सकाळीं घोड्यावर खोगीरं चढवलीं गेलीं. विझत चाललेल्या शेकोटींतला निखारा घेऊन एकानं आपला पाईप पेटवला. त्या सकाळच्या सौंदर्यानं आम्हांला उत्साही वाटत होतं. या सौंदर्याचा परिणाम एलिसवर झाला. वाटेंत जातां जातां अधून मधून एलिस बोलूं लागला. जिम गर्नी आपल्या समुद्र-पर्यटनाच्या न संपणाऱ्या गोष्टी सांगू लागला. आम्ही जिथून जात होतों तिथं डाव्या हाताला एक टेकडी होती. या टेकडीवरून गव्यांचा एक मोठा कळप धांवत जात असलेला आम्हाला दिसला.

"ही संधी घालवण्यांत कांहीं अर्थ नाहीं," शॉ म्हणाला. आम्हीं त्या गव्यांच्या दिशेनं घोडे पिटाळले. शॉनं एका गव्याला खालीं लोळवला. मी दुसऱ्याला कळपापासून बाजूला काढला आणि गोळी घातली. गोळी त्या गव्याला मागच्या बाजूला लागल्यानं वेग जराहि कमी न करतां तो धावूं लागला. मी माझं पिस्तुल त्याच्या अंगावर रिकामं केलं. मी तीनचार वेळां माझं पिस्तुल भरलं. परंतु पिस्तुलाचा काना चोंदल्यामुळें पिस्तुल काम देईना. तेव्हां तें पिस्तुल मी ठेवलं आणि दुसरं रिकामं पिस्तुल भरायचं ठरवलं. इतकं सगळं होईपर्यंत तो गवा थकून धापा टाकत होता. त्याची जीभ बाहेर येऊन तोंडांतून फेस गळत होता. माझं पिस्तुल भरून होण्याच्या आंतच तो गवा माझ्यावर चाल करून आला. आतां पळून जाणं किंवा मरणं अशा दोनच शक्यता उरल्या होत्या. मी पळून जाऊं लागलों आणि तो प्रक्षुब्ध गवा माझा पाठलाग करूं लागला. एव्हांना माझं पिस्तुल भरून झालं होतं. मी मागें वळून पाहिलं. माझ्या घोड्याच्या शेपटीमागें पांचसहा यार्ड अंतरावर मला त्या गव्याचं डोकं दिसलं. त्या गव्याच्या डोक्यावर गोळी झाडण्यांत अर्थ नव्हता. कारण गव्याची कवटी वज्रासारखी कठीण असते, तेव्हां मी माझा घोडा किंचित् वळवून पुढें घातला. तो गवा अत्यंत वेगानं धांवत असल्या-मुळें त्याला माझ्या घोड्यासारखं चटकन् वळतां आलं नाहीं. आतां मी मागें

वळून पाहिलं तेव्हां त्याचा खांदा आणि मान माझ्या नजरेच्या टप्प्यांत आली. मी खांद्याजवळ नेम धरून तिरकी गोळी झाडली–ती थेट त्याच्या काळजापर्यंत. माझा पाठलाग थांबवून तो गवा खालीं कोसळला. गवा असा पाठलाग करत असतांना त्याची शिकार करण्याचा प्रयत्न करणं अत्यंत धोक्याचं आहे असं एका इंग्रज प्रवाशानं लिहिलं आहे. परंतु हें खरं नव्हे. कारण गवा फार काळ पाठलाग करूं शकत नाहीं. आणि दोनतीन मिनिटंहि जर त्याचा पाठलाग घोडा चुकवूं शकत नसला तर तो घोडा अगदींच भिकार असला पाहिजे.

आतां आम्ही अशा विभागांत होतों कीं अत्यंत सावधगिरी बाळगणं आवश्यक होतं. आम्ही आळींपाळींनं रात्रीं पहारा देऊं लागलों. उशाजवळ रायफल ठेऊन आम्ही झोपत होतों. एके दिवशीं सकाळीं कॅमांझ जमातीच्या रेड इंडियनांनीं तळ ठोकल्याच्या खुणा आम्हांला दिसल्या. आमच्या सुदैवानं त्यांनीं ही जागा सोडून जवळजवळ आठवडा झाला होता. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं आम्हांला अगदीं अलीकडेच विझलेली एक शेकोटी आढळली, आणि त्यामुळें आम्ही अस्वस्थ झालों. शेवटीं आम्हीं कॅरोस या कुप्रसिद्ध स्थळीं आलों. आजूबाजूला सर्वत्र रेताड टेकड्या आणि मधें खोल घळी अशी ही जागा होती. रेड इंडियनांनीं ज्याला ठार केला होता त्या स्वान या माणसाचं थडगं इथंच होतं. दोन तीन आठवड्यांपूर्वीची ही गोष्ट होती. त्याचं प्रेत रेड इंडियनांनीं आणि लांडग्यांनीं उकरून काढलं होतं. आतां मात्र त्याच्या प्रेताचे अवशेष इथं तसेच होते—अगदी अल्किडे तिथं कोणी फिरकल्याचं दिसत नव्हतं.

प्राईसच्या नेतृत्वाखालीं निघालेल्या सुट्या सुट्या तुकड्या आम्हांला कित्येक दिवस भेटत होत्या. रात्रींच्या वेळीं या सैनिकांचे घोडे पळून जात. एके दिवशीं दुपारीं आम्हांला असेच पळालेले तीन घोडे नदीकाठीं चरतांना दिसले. त्या संध्याकाळीं आम्हीं तळ ठोकला तेव्हां जिम गर्नीनं बातमी आणली कीं असे पळालेले अनेक घोडे आजूबाजूला आहेत. अंधार पडूं लागला होता. हवेंत गारठा होता. आणि पाऊस रिमझिमत होता. आम्हीं एक तासभर पाठलाग करून नऊ घोडे पकडले. त्यांच्यापैकीं एक घोडा तर खोगीर लादलेला होता. त्याच्या खोगीराच्या दोन्ही बाजूंला पिस्तुलं अडकलेलीं होतीं, खोगीराच्या खुंटाला रायफल होती. आणि मागें एक ब्लँकेटहि घडी करून ठेवलं होतं. दुसरे दिवशीं सकाळीं आम्हीं प्रवासाला सुरवात केली तेव्हां आमचं हें घोडदळ पूर्वी

कधीं नाहीं इतकं रुबाबदार दिसूं लागलं. दुपारपर्यंत आमचा प्रवास चालू होता. दुपारच्या वेळीं मागून दूर अंतरावरून तीन घोडेस्वार आमच्या दिशेनं येतांना दिसले. त्यांनीं आपले घोडे भरधांव सोडले होते. लवकरच त्या घोडेस्वारांनीं आम्हांला गाठलं. आम्हीं घेतलेले ते नऊ घोडे आपले आणि आपल्या तुकडींतल्या इतर लोकांचे असल्याचं त्यांनीं सांगितलं. ते घोडे परत देणं आतां अर्थातच आम्हांला भाग होतं. आम्हीं घोडे परत देतांच एलिस आणि जिम गर्नी यांचीं तोंडं चिमणीएवढीं झालीं.

१४ सप्टेंबरच्या दुपारीं सांताफेहून निघालेला एक मोठा गाड्यांचा तांडा आम्हांला भेटला. या गाड्यांना पांढरीं छतं होतीं. घोड्यांचा आणि खेचरांचा कळप या प्रवाशांबरोबर होता. कांहीं लोक घोड्यावरून जात होते, कांहीं चालत होते. ही सगळी मंडळी आम्ही जिथं होतों तिथेंच उतरली. त्यांच्या रुबाबदार गाड्यांच्या शेजारीं आमची किरकोळ गाडी अगदींच बेकार दिसूं लागली. तो तांडा एवढा मोठा होता कीं आम्ही त्यांच्यापुढें संख्येनंहि अगदी किरकोळच होतो. टिटे रूज त्यांना भेटण्यासाठीं म्हणून त्या तळावर गेला. तो परत येतांना एका हातांत अर्धा डझन बिस्किटं आणि दुसऱ्या हातांत ब्रँडीची बाटली घेऊन आला. हें कसं काय पैदा केलं असं मी विचारतांच तो म्हणाला, "तिथले कांहीं व्यापारी माझ्या ओळखीचे आहेत. शिवाय डॉ. डॉब्जसुद्धां तिथंच आहेत." डॉ. डॉब्ज कोण असं मी विचारलं. तेव्हां तो म्हणाला, "तो आमचा सेंट लुईचा एक डॉक्टर आहे." गेले ऐन दिवस माझ्या दुखण्यानं उचल खाल्ली होती. मला अतिशय अशक्त वाटत होतं. मी चवकशी करतांच टिटे रूजनं डॉब्ज हा पहिल्या दर्जाचा डॉक्टर असल्याचं मला सांगितलं. टिटे रूजच्या स्तुतीवर अर्थातच माझा विश्वास बसला नाहीं; परंतु मी त्या डॉक्टर-कडून तपासून घ्यायचं ठरवलं. मी शोधतशोधत त्या डॉक्टरकडे गेलो तेव्हां तो गाडीखालीं गाढ झोपला होता. त्याचा चेहरा पांढराफटक दिसत होता. आणि त्यावरून त्याच्या वैद्यकीय कौशल्याची कसलीहि ग्वाही मिळत नव्हती. त्याची हॅट बाजूलाच पडली होती. त्याचे पिवळट केस अस्ताव्यस्त झाले होते. डोक्याखालीं त्यानं हातांची उशी केली होती. गुडघ्यापर्यंत त्याची विजार चुरगळलेली होती. झोपेंत लोळल्यामुळें त्याच्या अंगाला गवत लागलं होतं. एका मेक्सिकनानं त्या डॉक्टरला उठवलं. तो विद्वान डॉक्टर शेवटीं एकदांचा उठला आणि डोळे चोळत भांबावल्यागत आजूबाजूला पाहूं लागला. तुम्हांला

उगीच त्रास दिला, माफ करा असं म्हणून मी तपासून घेण्यासाठीं आलों होतों असं म्हणालों.

मला तपासल्यानंतर डॉक्टर गंभीरपणानं म्हणाला, "यंत्र बिघडलेलं आहे."

"नेमकं कसलं दुखणं आहे ?"

"लिव्हर फारच खराब आहे. थांब, मी तुला औषध देतों."

डॉक्टर एका गाडीचा पडदा दूर करून आंत शिरला. कांहीं वेळ पडद्याबाहेर आलेले त्याचे बूटच मला दिसत होते. शेवटीं एकदांचा तो औषध घेऊन बाहेर आला.

"कसलं औषध आहे हें ?" मीं विचारलं.

"रेचक." डॉक्टर म्हणाला.

त्या परिस्थितींत रेचकच काय पण मी कांहींहि घेतलं असतं. रेचक घेतल्यामुळें आहे त्यापेक्षां प्रकृति अधिक बिघडणं शक्य नाहीं हें मला माहीत होतं—कारण ती फारच बिघडलेली होती. तेव्हां मीं म्हटलं कीं न जाणो या रेचकाचा कदाचित् चांगलाहि परिणाम होईल.


त्या तळावरच्या व्यापाऱ्यांनीं आम्हांला सांगितलं कीं जर जीव गमवायचा नसेल तर नदीजवळून जाणाऱ्या मोठ्या वाटेनं जाऊं नका. नदी इथं एक वळण घेते आणि रिच पाथ नांवाची एक छोटीशी वाट गवताळ प्रदेशाच्या पलीकडे जाते. हें अंतर साठसत्तर मैलांचं असेल. या वाटेनं आम्ही सातआठ मैल गेलों तेव्हां एक छोटा झरा आम्हांला दिसला. इथं आम्हीं तळ ठोकला. झऱ्याचं पाणी घळींत खोल होतं. आणि कांठ उंच होते. घळींत असलेल्या गवतांत खुंट रोऊन आम्हीं आमचे घोडे बांधले आणि वरच्या बाजूच्या माळावर आमचा तंबू ठोकला. फारसा विचार न करतांच आम्हीं ही जागा निवडलेली होती. आमचे घोडे पळवायला आणि आमच्यावर हल्ला करायला ही अगदीं उत्तम संधी होती.

अंधार पडला, आम्ही सगळे जेवायला बसलों होतों. टिटे रूजच्या समोर हेन्री बसला होता. इतक्यांत टिटे रूजची भयानं बोबडी वळलेली आम्हांला दिसली. आम्ही पलीकडे पाहतो तर एक काळ्या रंगाची भुतासारखी प्रचंड आकृति डुलतडुलत आमच्या दिशेनं येत असलेली दिसली. हेन्रीला या प्रकाराची गंमत वाटली. तो उडी मारून उठला आणि हात पसरून ओरडला. आमच्या तळाच्या दिशेनं येणारी आकृति भुताची नसून गव्याची होती. तो गवा

मठ्ठपणानं चक्क आमच्या तंबूकडे येत होता. आम्हीं मोठमोठ्यानं आरडाओरड केली तेव्हां तो पळून गेला.

पूर्ण चंद्र उगवलेला होता. परंतु अधूनमधून त्याला काळे ढग झाकून टाकत. त्यामुळें एका क्षणीं प्रकाशांत तर दुसऱ्या क्षणीं अंधारांत असं होई. रात्र पडली तेव्हां वादळाचं थैमान एकाएकीं सुरू झालं. वारा इतक्या सोसाट्यानं वाहूं लागला कीं आम्हांला वाटलं आतां तंबू उडून जाणार. तेव्हां आम्हीं वाऱ्याचा मारा कमी करण्यासाठीं तंबूच्या आड गाडी उभी केली. शेवटीं एकदांचा वाऱ्याचा जोर कमी झाला आणि संथपणें पाऊस पडूं लागला. तंबूच्या छतावरची थेंबांची टपटप ऐकत मी रात्रभर जागा होतों. रात्रीं बारा वाजतां शॉ पहारा देत होता. मनरोहि सावध होता. दोन तासानंतर शॉ हेन्रीकडे आला आणि त्यानं त्याला हलक्या आवाजांत आपल्याबरोबर यायला सांगितलं. "काय आहे ?" मी विचारलं. शॉ हलकेंच म्हणाला, "रेड इंडियन असावेत असं मला वाटतं. पण तूं उठूं नकोस. मारामारीचा प्रसंग आलाच तर मी तुला हांक मारीन." शॉ आणि हेन्री निघून गेले. मी माझी रायफल तयार ठेवली. पांच मिनिटांनींच शॉ परत आला. "सगळं ठीक आहे." असं म्हणून तो झोपायला गेला. शॉऐवजी आतां हेन्री पहारा करूं लागला. दुसरे दिवशीं सकाळीं हेन्रीनं मला सर्व सांगितलं. मनरोनं कांहीं माणसं गुडघ्यांवर सरपटतांना पाहिलीं. शॉला घेऊन त्यानं त्यांना दाखवलं. ते रेड इंडियन असावेत अशी शॉचीहि खात्री पटली. शॉनं हेन्रीला बोलवलं. हेन्रीचे डोळे तरबेज असल्यामुळें त्यानं चटकन् ओळखलं कीं ते रेड इंडियन नसून आमच्या घोड्यांच्या आसपास फिरणारे लांडगे होते.

तंबूतळाच्या जवळ बांधलेले असले कीं घोडे अशा गोष्टींना भीत नाहींत. हे लांडगे घोड्यांना खुंटाला ज्या दोरींनीं बांधलेलं असतं ती दोरी कुरतडतात. या प्रवासांत अनेक वेळां माझ्या घोड्याची दोरी रात्रीच्या या पाहुण्यांनीं कुरतडलेली मला आढळली.



# २७ | निरोप

दुसरा दिवस उजाडला. सकाळपासून रात्रीपर्यंत आम्ही सारखा प्रवास करीत होतों. वाटेंत कुठंहि एकादं झाड किंवा पाण्याचा थेंब आम्हांला आढळला नाहीं. ऊन तर असं रणरणत होतं कीं सांगतां सोय नाहीं. आमच्यापेक्षांहि आमच्या घोड्यांना आणि खेचरांना अधिक त्रास होत होता. सूर्यास्ताची वेळ जवळ येतांच या जनावरांनीं कान वर केले आणि गति वाढवली. आतां पाणी लवकरच आढळणार होतं. आम्हीं एका रुंद दरीच्या उताराशीं आलों तेव्हां आम्हांला एक वेगळंच दृश्य दिसलं. दरीच्या तळाहून एक झरा वहात होता. आणि या झऱ्याच्या कांठाशीं अनेक तंबू बांधलेले होते. कुरणावर शेंकडों गुरं चरत होतीं. पलीकडच्या टेकडीवरून अनेक सैनिक कांहीं घोड्यांवरून, कांहीं पायीं, उतरत होते. या सैनिकांच्या मागून बायकापोरं असलेल्या गाड्यांचा तांडा येत होता. सैन्यांत भरती झालेले हे मॉर्मन लोक होते. या मॉर्मन लोकांबरोबर मिसुरीचं भरती झालेलं पथकहि होतं. हे मॉर्मन लोक कॅलिफोर्नियाला पोंचल्यानंतर त्यांचा पगार मिळणार होता आणि त्यांना नोकरींतून मुक्त करण्यांत येणार होतं. आपली कुटुंबं आणि चीजवस्त बरोबर घेण्याची त्यांना सरकारनें

परवानगी दिली होती. अर्धं सैन्यांतलं आणि अर्ध कुटुंबांतलं असं मोठं गंमतीचं मिश्र वातावरण त्यांच्या तळावर होतं. आम्हीं साधारण पाव मैल पुढं गेलों तेव्हां आम्हांला तंबू ठोकायला मोकळी जागा मिळाली. या मिसुरीयन आणि मॉर्मन लोकांचे घोळकेच्या घोळके आम्हांला भेटायला येऊं लागले. या सगळ्या सैन्याचा प्रमुख अधिकारीहि आम्हांला भेटायला आला.

ज्यांत धोका आहे असा कसलाहि प्रसंग उद्भवला कीं टिटे रूजचा जीव गलबलत असे. पण गंमत अशी कीं एके दिवशीं संध्याकाळीं टिटे रूजवर एका बिकट संकटाला तोंड द्यायचा प्रसंग आला. एवढं बिकट संकट आमच्या पथकापैकीं कुणावरहि अजून आलेलं नव्हतं. त्याचं असं झालं कीं टिटे रुजला व्हिस्की पिण्याची तलफ आली. त्यानं आपलं खेचर एका सैनिकाला देऊन एक घोडा घेतला होता. या घोड्याचं नांव होतं जेम्स. टिटे रूज जेम्सवर स्वार झाला आणि आपल्या आवडत्या पेयाच्या शोधार्थ निघाला. बराच वेळ झाला तरी तो आला नाहीं. तेव्हां आम्हांला वाटलं कीं बहुतेक हा रेड इंडियनांच्या तडाक्यांत सांपडला असणार. बरीच रात्र झाल्यानंतर टिटे रूजनं काळोखांतून हांक मारलेली मला ऐकूं आली. थोड्या वेळानं टिटे रूज आणि त्याचा घोडा आम्हांला दिसला. टिटे रूजनं घडलेली हकिकत सांगितली ती अशी—

टिटे रूजनं आमचा तळ सोडला तेव्हां कोणती वेळ होती हें त्याला नक्की माहीत नव्हतं. तो त्या गाड्यांच्या तळावर गेला तेव्हां चांगलाच अंधार पडला होता. तळावरचे लोक शेकोट्या पेटवून बसले होते. आपण येत आहोंत हें त्यांना कळावं म्हणून टिटे रूजनं "कॅंप, हो हो हो" अशी उंच स्वरांत विक्षिप्त आरोळी ठोकली. ही तऱ्हेवाईक सलामी ऐकतांच तळावरचे लोक घाबरले. त्यांना वाटलं, बहुतेक पॉनी लोकांचा घाला आपल्यावर आला. भराभर बंदुका रोखून ते गाड्यांच्या मागें उभे राहिले. टिटे रूजकडे बोट दाखवून त्यांचा प्रमुख म्हणाला, "त्याला गोळी घाला."

घाबरून किंकाळी फोडत टिटे रूज ओरडला, "गोळी घालूं नका, गोळी घालूं नका; मी तुमचा मित्र आहे, मी अमेरिकन आहे."

त्या तांड्याचा प्रमुख म्हणाला, "तूं आमचा मित्र आहेस काय? मग एखाद्या इंजिनासारख्या किंकाळ्या का फोडतो आहेस? हिंमत असेल तर आतां पुढें ये."

टिटे रूज पुढें झाला. तेव्हां तो तांड्याचा प्रमुख पुन्हां ओरडला, "सगळ्यांनीं

आपल्या बंदुका त्याच्यावर रोखून ठेवा. कदाचित त्याला पुढं घालून रेड इंडियन आपल्याला फसवत असतील.”

रोखलेल्या बंदुकांसमोर थरथर कांपत टिटे रूज उभा राहिला. शेवटीं एकदां त्यानं आपण कोण आहोंत हें त्या मिसुरीयनांच्या गळीं उतरवलं. खात्री पटल्या-नंतर त्यांनीं टिटे रूजला तळावर येऊं दिलं. टिटे रूजला व्हिस्की कांहीं मिळाली नाहीं. आपण फार दमलों आहोंत, प्रवासाचा खूप त्रास झालाय् असं टिट रुजनं खूप गयावया करून सांगितलं तेव्हां त्यांनीं त्याला बिस्किटं; तांदूळ आणि थोडी साखर दिली.

सकाळीं न्याहारीच्या वेळीं त्यानें ही हकीकत आम्हांला सांगितली. त्याच्यावर कितपत विश्वास ठेवावा हें आम्हांला कळेना. तेव्हां आम्हीं त्याला उलटसुलट प्रश्न विचारून पाहिले. परंतु त्याच्या सांगण्यांत कांहीं विसंगति आढळेना. नंतर आम्हीं खुद्द त्या तळावरच्या लोकांकडे चौकशी केली तेव्हां टिटे रूजची हकीकत तंतोतंत खरी असल्याची कळलं. तळावरच्या त्या माणसांपैकीं एकजण म्हणाला, “माझ्यासमोर पैशांचा ढीग जरी कुणी ओतला तरी तुमच्या त्या माणसावर आला तसा प्रसंग मी ओढवून घेणार नाहीं.”

एकदोन दिवसांनंतर या तळावरच्या लोकांचा मोठा गंमतीचा अनुभव आम्हांला आला. मी आणि हेन्री शिकारीसाठीं बाहेर पडलों होतों. काऊ क्रीक या झऱ्यालगत आम्ही होतों. एका टेकडीवर गव्यांचा कळप दिसला. मी आणि हेन्री सरपटत जवळ गेलों. हेन्री रायफल रोखून बसला. त्यानं एका पुष्ट मादीवर नेम धरला. आतां ती मादी कोसळणार असं मला वाटलं. इतक्यांत बाजूच्या घळींतून बंदुकीचे अनेक आवाज ऐकूं आले. अनेक लांबटांगे मिसुरीयन आडामागून उड्या टाकत गव्यांच्या कळपामागें धावूं लागले. ते सगळे चांगले बरकंदाज होते. पण एकचीहि गोळी लागली नाहीं. हेन्रीनं जेव्हां त्यांना सांगितलं कीं तुम्हीं जर घाई केली नसती तर मी दहा मिनिटांत तुम्हां सगळ्यांना पुरतील इतके गवे मारले असते, तेव्हां ते लोक लाजले. बंदुकांचे हे आवाज ऐकून आमचे मित्र घाबरले. त्यांना वाटलं रेड इंडियनांनीं आमच्यावर हल्ला केला. शॉ भरधांव वेगानं आम्ही जिवंत आहोंत कीं नाहीं हें पाहण्यासाठीं आला.

काऊ क्रीक या झऱ्याच्या आसपास द्राक्षांच्या वेली आम्हीं पाहिल्या. कांहीं अंतरावर लिट्ल् अर्कोसास हा झरा आहे. तिथं आम्हीं शेवटचा गवा पाहिला

तो म्हातारा होता. गवताळ माळावर तो उदास, एकटा फिरत होता. इथून पुढें प्रदेश बदलल्याचं जाणवूं लागलं. खुरट्या गवताचे वैराण माळ आम्हीं मागे टाकले होते. आतां आम्हांला फुलांनीं भरलेले हिरवेगार गालिचे वाटेंत ठिकठिकाणीं आढळत होते. गव्यांच्या ऐवजीं रानकोंबडीं आम्हांला दिसत होतीं. वाट जराहि न सोडतां आम्हीं अनेक डझन कोंबडीं टिपलीं. तीनचार दिवसांनीं आम्हीं कौन्सिल ग्रोव्ह या ठिकाणीं आलों. ॲश, ओक, एम्, मेपल इत्यादि प्रचंड वृक्षांच्या आणि फळांनीं लगडलेल्या द्राक्षवेलींच्या गर्दीतून जातांना आम्हांला मोठी गंमत वाटली. कांहीं वेळानं नाइलाजास्तव या स्थळांचा निरोप घेऊन आम्ही पुन्हा उघड्या माळावर आलों. सरहद्दविभाग इथून शंभर मैलांच्या आसपास होता. वाटेंत सर्वत्र हिरवीगार कुरणं होतीं. कवींनीं आणि कादंबरीकारांनीं रंगवलेला गवताळ प्रदेश आतां इथून सुरू होत होता. धोक्याचा प्रदेश आम्हीं मागें टाकला होता. सॅक्स, फॉक्सेस, कांझास, ओसेझ या जमातींचे रेड इंडियन या प्रदेशांत होते; परंतु त्यांच्यापासून कसलाहि धोका नव्हता.

गेले पांच महिने आम्हीं अत्यंत धोक्याच्या अशा प्रदेशांतून प्रवास केला होता. आमची संख्या अगदींच तुटपुंजी होती. कुठल्याहि क्षणीं आम्ही लुटले जाण्याची शक्यता होती. पण नशीब असं कीं आमच्या जनावरांपैकीं एकहि चोरीला गेलं नव्हतं. आमच्या खेचरांपैकीं एक तेवढं खडखड्या नागानं दंश केल्यानं मेलं होतं. आम्ही सरहद्द विभागांत पोंचल्यानंतर तीन आठवड्यांनीं पॉनी आणि कॅमांझ जमातीचे रेड इंडियन प्रक्षुब्ध झाल्याच्या बातम्या आमच्या कानीं आल्या. अर्कांसास नदीच्या वाटेनं जाणाऱ्या प्रवाशांच्या प्रत्येक तांड्यावर त्यांनीं न चुकतां हल्ला चढवला. जवळजवळ सहा महिनेपर्यंत हा प्रकार चालू होता.

लवकरच आम्ही लिव्हनवर्थच्या किल्ल्याकडे जाणाऱ्या एका छोट्या वाटेवर आलों. इथून एका दिवसाच्या अंतरावर हा किल्ला होता. टिटे रूजनं इथं आमचा निरोप घेतला. आपण सैन्यांत केलेल्या अमोल कामगिरीबद्दल टिटे रूजला किल्ल्यावर जाऊन पगार घ्यायचा होता. जितका शिधा दपटतां येईल तेवढा आमच्याकडून घेऊन स्वारी एकदांची गेली. त्या दिवशीं संध्याकाळीं पाऊस होता. त्यांतल्या त्यांत सोईस्कर जागा पाहून आम्हीं शेवटचा तळ ठोकला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्हीं प्रवासाला सुरुवात केली. आदल्या दिवशीं पाऊस पडूनसुद्धां सकाळ मोठी स्वच्छ होती. अर्धसुसंस्कृत शॉनी रेड

इंडियनांच्या प्रदेशांतून आम्ही जात होतों. तो प्रदेश मोठा सुंदर होता. ठिकठिकाणीं समृद्धतेच्या खुणा विखुरलेल्या होत्या. हिरव्या सालांतून मक्याचीं पक्व कणसं वर डोकं काढून उभीं होतीं. नाना तऱ्हेचे पक्षी उडत होते. आम्ही आमच्या घराच्या, संस्कृतीच्या जवळ येत आहोंत याच्या खुणा आम्हांला सर्वत्र जाणवत होत्या. मिसुरीच्या हद्दीवर असलेलं जंगल आम्हांला लागलं. सीमेवरच्या दाट झुडपांत आम्हीं प्रवेश केला.

इथं येतांना आम्ही याच वाटेनं आलों होतों. तेव्हां वसंतऋतु होता. आतां परततांना इथल्या सृष्टीनं नवं रूप धारण केलं होतं. तेव्हां मोहरानं घमघमणारीं सफरचंदांचीं झाडं आतां तांबूस फळांनीं वाकलीं होतीं. त्यावेळीं जिथं बारीकबारीक अंकुर दिसत होते ती रस्त्यालगतची जमीन आतां उंच गवतानं भरून गेली होती. द्राक्षवेली द्राक्षांनीं वाकल्या होत्या. लाल फुलांनीं भरून गेलेले तेव्हांचे मेपल वृक्ष आतां धुक्यामुळें गडद किरमिजी रंग चढलेल्या पानांचं प्रदर्शन करीत होते. पिकलेंपण आणि अविकलेंपण यांच्या खुणा सर्वत्र दिसत होत्या. आम्हीं जंगलांत प्रवेश केला. प्रकाश आणि छाया यांची चट्टेरीपट्टेरी जाळीं जमिनीवर उमटलीं होतीं. सूर्याच्या किरणांनीं दाट पानांतून कशीबशी वाट काढली होती. कांहीं पानांना या किरणांमुळें पारदर्शक हिरवेंपण आलं होतं. फांद्यावरून खारी आमच्याकडे पहात आवाज करत होत्या. नाना तऱ्हेचे पक्षी भराऱ्या घेत होते. या सगळ्या दृश्यांचं, सुंदर स्वरांचं आम्हीं स्वागत केलं. पण हें स्वागत करीत असतांना सुखदुःखाच्या मिश्र भावना मनांत उमटत होत्या. सरहद्दीच्या या वरच्या प्रदेशाचं आकर्षण जसं एकीकडे मनाला जाणवत होतं तसंच दुसरीकडे जो प्रदेश आम्हीं मागें टाकला होता त्याच्या आठवणीहि आम्हांला खिन्न करीत होत्या.

कांहीं अंतर चालून गेल्यानंतर झाडांच्यामधून एका गौरवर्णीय माणसाच्या घराचं छप्पर दिसलं. त्यानंतर ओंडक्यांचा भिकार पूल ओलांडून आम्हीं वेस्टपोर्टला गेलों. वेस्टपोर्टनं यापूर्वीं अनेक गोष्टी पाहिल्या असतील, परंतु आमच्याइतके विटलेल्या पोशाखाचे आणि सामानाचे घोडेस्वार पूर्वीं तिथं कधीं दिसले नसतील! बूनचं किराणामालाचं दुकान, व्हॉगेलचा गुत्ता ओलांडून आम्हीं पलीकडच्या कुरणावर तळ ठोकळा. इथं आमच्याजवळचीं जनावरं आणि सामान विकत घेण्यासाठीं अनेक लोक भेटायला आले. ही गोष्ट निकालांत काढून आम्हीं एक गाडी भाड्यानं घेतली आणि कांझासच्या बंदरावर गेलों.

इथं कर्नल चिकनें आपल्या घरीं आमचं स्वागत केलं. पुन्हां एकदां मिसुरी नदीच्या पाण्यातल्या भोवऱ्यांचं दर्शन आम्हांला झालं.


सकाळीं डेस्लॉरिअर्स भेटायला आला. त्यानं गुळगुळीत दाढी केली होती, कोट घातला होता, हॅट चढविली होती, त्यामुळें तो अगदीं वेगळा भासत होता. त्याचं ओंडक्याचं घर इथून फारसं दूर नव्हतं. परत आल्यानंतरची खुषी म्हणून त्यानं बॉल डान्सचा एक कार्यक्रम करायचं ठरवलं होतं. धन्यांना आमंत्रण दिल्यास ते येतील किंवा काय असं त्यानं हेन्रीला विचारलं. हेन्रीनं आम्ही नक्की येऊं असं सांगितलं. तेव्हां आम्हांला नृत्याचं आमंत्रण देण्यांत आलं. अँटनी लाजीन्युज हा फिड्ल वाजवणार आहे आणि हें या कार्यक्रमाचं खास आकर्षण आहे असं आम्हांला डेस्लॉरिअर्सनं सांगितलं. आम्ही नक्की येऊं असं त्याला म्हटलं होतं; परंतु संध्याकाळच्या अगोदरच लिव्हनवर्थवरून बोट आल्यामुळें आम्हांला जाणं शक्य झालं नाहीं. आमचा निरोप घेण्यासाठीं तो बंदरावर आला होता. बोट सुटली तेव्हां खडकावर उभा राहून उड्या मारत आणि हॅट उंच हालवत तो म्हणाला, "धनी, राम राम, धनी, राम राम. पुन्हां जर तुम्ही रॉकी पर्वतांत जाणार असाल तर मी तुमच्याबरोबर येईन. नक्की येईन, अगदीं नक्की येईन." आपला हा निश्चय व्यक्त करण्यासाठीं डेस्लॉरिअर्स पुन्हां पुन्हां उड्या मारुन हॅट हलवत होता. बोट दूर गेली. तेव्हां शेवटची आकृति आम्हांला दिसली ती डेस्लॉरिअर्सची. मनरो आणि जिम गर्नी यांचा आम्ही वेस्टपोर्ट इथंच निरोप घेतला. हेन्री बोटींतून आमच्याबरोबर आला.

सेंट लुईसला जायला आठ दिवस लागले. त्यांतला एकतृतीयांश वेळ बोट वाळूंत रुतल्यामुळेंच गेला. शेवटीं सेंट लुईसच्या गजबजलेल्या धक्क्यावर आम्ही पोंचलों. प्लँटर्स हाऊसवर जाऊन सामानाच्या खोलींत ठेवलेलं आमचं सामान आम्हीं शोधून काढलं. शिंप्याच्या कलेनं केलेल्या जादूमुळें सकाळीं आम्हीं प्रयासानं एकमेकांना ओळखूं शकलों !

निघायच्या दिवशीं संध्याकाळीं हेन्री प्लँटर्स हाऊसवरच्या खोलींत आमचा निरोप घेण्यासाठीं आला. रॉकी पर्वतांतून नुकताच आलेला हा शिकारी आहे हें त्याच्याकडे पाहून कुणालाहि ओळखतां आलं नसतं. गडद कापडाचा साधा नेटका सूट त्यानं घातला होता. सोळाव्या वर्षापासून त्याचं बहुतेक वास्तव्य डोंगराजंगलांतच असे. एकादा महिना तो माणसांत येऊन राही. परंतु त्याची मूळचीच अभिरुचि चांगली असल्यानं त्याची रहाणी अत्यंत नेटकी असे.

त्याचा मर्दानी बांधा, लवचिक हालचाली, अनेक वादळांचे तडाखे झेललेला राकट चेहेरा त्यानं घातलेल्या कपड्यांमुळें विशेषच खुलून दिसत होता. त्यानं निष्ठेनं आणि उत्साहानं आमची सेवा केली होती. हेन्रीची स्तुति करावी तितकी थोडी.

उदास अंतःकरणानं आम्हीं त्याचा निरोप घेतला. हेन्रीचं अंतःकरणहि आमच्यासारखंच भरून आलं होतं. श्यॉनं वेस्टपोर्टला आपला घोडा त्याला दिला होता. माझी रायफल हेन्रीला विशेष आवडत असे. ती मी त्याला देऊन टाकली. कदाचित् आतां हें मी लिहीत असतांना हेन्रीच्या हातांतल्या त्या रायफलचे प्रतिध्वनी रॉकी पर्वतांत उमटत असतील. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्हीं सेंट लुईस सोडलं. आगगाडी, बोट, गाडी असा प्रवास करत करत पंधरा दिवसांनीं आम्हीं आमच्या घरच्या परिचित वातावरणांत येऊन पोंचलों.



REFBK 0014262

REFBK-0014262